# विचार - दर्शन

लेखक

**रा. ना चव्हाण**

संपादक

**डॉ. गो. मा. पवार**

**डॉ. द. ता. भोसले**

**रमेश चव्हाण**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# विचार-दर्शन

**दलितमित्र रा. ना. चव्हाण यांचे**

**निवडक लेख**

◆ संपादक ◆

डॉ. गो. मा. पवार

डॉ. द. ता. भोसले

श्री. रमेश चव्हाण

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

वाय ३४९-१

▸▸ **पुस्तकाचे नाव : विचार-दर्शन**

दलितमित्र रा. ना. चव्हाण यांचे निवडक लेख

▸▸ **संपादक :**

डॉ. गो. मा पवार

डॉ. द. ता. भोसले

श्री. रमेश चव्हाण

▸▸ **प्रथमावृत्ती : २०१६**

▸▸ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

▸▸ © **प्रकाशकाधीन :**

▸▸ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

▸▸ **किंमत :** रु. १७२/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | अध्यक्षांचे निवेदन | एक |
| | संपादकीय | तीन |
| | प्रस्तावना | पाच |
| १. | छ. शिवाजी व महात्मा जोतीबा फुले | १ |
| २. | महात्मा जोतीबा फुले यांचे सामाजिक-राजकीय विचार व कार्य | १७ |
| ३. | म. फुले : काळ, कार्य आणि विचार यांचे नवदर्शन | २९ |
| ४. | म. फुले, न्या. रानडे आणि डॉ. आंबेडकर | ३७ |
| ५. | राजर्षी शाहूंची सामाजिक विचारसरणी | ५७ |
| ६. | धर्मसुधारक–अस्पृश्योद्धारक राजर्षी शाहू महाराज | ६५ |
| ७. | कर्मवीर शिंदे यांच्या जीवनाचे मर्म व वर्म | ६९ |
| ८. | डॉ. आंबेडकर : प्रभाव व परिणाम | ७९ |
| ९. | डॉ. आंबेडकरांचे अद्बितीयत्व | ८९ |
| १०. | डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराची एक नम्र चिकित्सा | १०१ |
| ११. | सत्यशोधक समाज | ११५ |
| १२. | ब्राह्मणेतर चळवळ | १२३ |
| १३. | भारतातील धर्म व राजकारण | १२९ |
| १४. | लोकशाही राजकारणात सामाजिक प्रबोधनाचा झालेला संकोच | १३७ |
| १५. | प्रख्यात चिकित्सक सुधारक- ‘दीनबंधू’ राजारामशास्त्री भागवत | १५३ |
| १६. | यशवंतरावांचे समाजकारण | १६३ |
| १७. | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (एक दर्शन) | १७१ |

| अ.क्र. | लेखाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १८. | परमेश्वराचे प्रेमस्वरूप | १८१ |
| १९. | परमेश्वराचे स्वरूप व साक्षात्कार | १८५ |
| २०. | धर्मजागृतीचा मार्ग | १८९ |
| २१. | परमेश्वराची प्रचीती | १९१ |
| २२. | प्रार्थनेचे ध्येय | १९५ |
| २३. | ब्राह्मधर्म आणि बहुजन समाज | १९७ |
| २४. | अवतारवाद व ब्राह्मसमाजाची शिकवणूक | १९९ |
| २५. | महात्मा जोतीराव फुले यांचे धर्मपर विचार | २०३ |
| २६. | महात्मा फुले व ब्राह्मधर्म | २०९ |
| २७. | तरुण व धर्म | २११ |
| २८. | परमेश्वराची सार्वत्रिक कृपा व एकेश्वरी धर्माचा समतावादी संदेश | २१५ |
| २९. | मी ब्राह्मधर्मीय कसा झालो व ब्राह्मधर्मीय का आहे ? | २१९ |
| ३०. | परिशिष्ट क्र. १ | २२५ |
| ३१. | परिशिष्ट क्र. २ | २२८ |
| ३२. | परिशिष्ट क्र. ३ | २३४ |

# अध्यक्षांचे निवेदन

लेखन आणि प्रकाशन हे सांस्कृतिक जबाबदारीचे काम म्हणून त्याकडे पाहिले जात असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात बहुजन लेखक-विचारवंतांची आणि सुधारकांची तशीच उपेक्षा स्वातंत्र्यानंतरही सुरूच राहिली. याचे एक महत्त्वाचे उदाहरण म्हणून सातत्याने आपल्या लेखनातून प्रबोधन करणारे विचारवंत श्री. रा. ना. चव्हाण एक आहेत. अशीच उपेक्षा या अगोदर महाराजा सयाजीराव गायकवाड या महाराष्ट्राच्या दुसऱ्या सुपुत्राचीही केली होती. नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्याचा हा बारा वर्षांचा पोरगा योगायोगाने बडोद्याचा राजा बनतो. राजा बनल्यानंतर स्वतः शिकून शिक्षणाची गंगा प्रजेच्या दारी नेऊन दूरद्रष्टा कल्याणकारी राष्ट्रप्रेमी राजा बनतो. इतिहासाने याकडेही पुरेसे लक्षच दिले नाही.

श्री. रा. ना. चव्हाणही शेतकऱ्याचा एक पोरगा, साठ वर्षे महाराष्ट्राचा वैचारिक क्षेत्रात निष्ठेने व्यासंगपूर्ण लेखन करतो; पण या विवेकनिष्ठ लेखक सुपुत्राचीही आमच्या क्षेत्राने चांगली उपेक्षाच केली आहे. लेखनाद्वारे समाजप्रबोधन, समाजसुधारणा आणि जनसामान्यांसंबंधीची कणव-यासाठी आयुष्यभर लेखन केलेल्या आपल्या पित्याचे अक्षरधन महाराष्ट्राला उपलब्ध करून देण्याचे कार्य श्री. रा. ना. चे चिरंजीव श्री. रमेश चव्हाण आणि कुटुंबीयांनी कर्तव्यभावनेच्या जबाबदारीने स्वीकारले. त्यातून रा. नां. चे ३० ग्रंथ संपादित करून स्वतः छापले. रा. ना. कुटुंबीयांचे हे कार्य पितृऋण फेडण्याचे मिशनच झाले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ श्री. रा. ना. चव्हाण यांच्या निवडक लेखांचे 'विचारदर्शन' हा ग्रंथ प्रकाशित करत आहे. मंडळाचा अध्यक्ष म्हणून कार्यभाग स्वीकारल्यानंतर मंडळातर्फे प्रकाशित करावयाच्या पहिल्या ग्रंथाला निवेदन लिहिण्याचे भाग्य श्री. रा. ना. च्या पुस्तकामुळे मल मिळत आहे. याचा मला आनंद आहे. प्रस्तुत ग्रंथातील निबंधाची निवड संपादक मंडळाने चौकसपणे केली असून यात (१) काही लेख तौलनिक स्वरूपाचे, (२) महाराष्ट्रातील थोर विभूती, (३) चळवळी आणि चौथ्या भागात धार्मिक-आध्यात्मिक विषयांवरील लेखांचा समावेश आहे.

या ग्रंथासाठी आमचे ज्येष्ठ लेखक प्रा. द. ता. भोसले यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. यात श्री. रा. नां. च्या वैचारिक वेगळेपणाच्या सर्व पैलूंचे ते दर्शन घडवितात. त्यात ते म्हणतात, श्री. रा. नां. च्या या चौफेर वैचारिक लेखनातून काळाचा युगधर्म समोर येतो. या ग्रंथात राजर्षी शाहू महारांच्या कार्यावर दोन लेख आहेत. या लेखात सामान्य वाचकांना माहिती नसलेली माहिती श्री. रा. नां. नी महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या संबंधाने दिलेली आहे. त्यात ते लिहितात, सयाजीराव महाराजांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांचा जो पाया घातला; तोच आदर्श समोर ठेवून शाहू महाराजांनी त्यावर सुंदर मंदिर उभे केले.

महाराष्ट्राचे १९ वे शतक अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे. या काळातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक चळवळींसंबंधी तटस्थपणे लेखन केलेले श्री. रा. ना. चव्हाण आहेत. बहुजनहिताची त्यांना कणव होती. प्राचीन संतांपासून वर्तमानापुढे दूरदृष्टी असलेल्या महाराजा सयाजीरावांपर्यंत त्यांची दृष्टी होती. तटस्थ समाजचिंतकासोबत, विवेकाची कास न सोडण्याचे व्रत त्यांनी आयुष्यभर सांभाळले.

महाराष्ट्राची वैचारिक परंपरा पुढे नेण्यात साठ वर्षे सातत्याने लेखनकार्य केलेल्या श्री. रा. ना. चव्हाणांच्या निवडक लेखांचे प्रकाशन साहित्य आणि संस्कृती मंडळ करत आहे. हे अक्षरधन महाराष्ट्राच्या वैचारिक साहित्यातील अमोल ठेवा आहे. या प्रकाशनाने तो विचारप्रवाह आणखी सक्षम होण्यास मदत होईल. असा हा ग्रंथ मराठी वाचकांना सादर करताना मंडळाचा अध्यक्ष म्हणून मला आनंद होत आहे.

**मुंबई**
२८ सप्टेंबर, २०१५

**बाबा भांड**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ

# संपादकीय

२०१२-१३ हे वर्ष रा. ना. चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. यानिमित्त त्यांच्या लेख संकलनाचा प्रकल्प राबविणारे श्री. रमेश चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळास रा. ना. चव्हाण यांच्या निवडक लेखांचे पुस्तक प्रकाशित करावे, अशी विनंती केली. महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या व परिवर्तनाच्या चळवळीला रा. ना. चव्हाण यांच्या साहित्याचे फार मोठे योगदान आहे; त्यांच्या लेखनसांभारामधून अभ्यासाच्या अनेक शक्यता आणि मुख्य म्हणजे वर्तमानाशी लढण्याचा मूल्य विचार दृग्गोचर होतो. त्यांच्या लेखनातील अभ्यास, सूक्ष्म संशोधन, तौलनिक, समन्वयी व समकालीनतेशी जोडणारी पध्दती विचारात घेता, हा प्रस्ताव स्वीकारण्यात आला. मंडळाचा दृष्टिकोन नेहमीच समाजाभिमुख राहिला असल्याने मंडळाने "परिवर्तनाची क्षितिजे" (दलितमित्र रा. ना. चव्हाण यांचे निवडक लेख) हे पुस्तक डॉ. एस. एस. भोसले, औरंगाबाद यांच्या संपादनाखाली १९९९ मध्ये प्रकाशित केले. रा. ना. चव्हाण यांच्या लेख संग्रहाची ३० पुस्तके (६५०० पाने, ५७० लेख) श्री. रमेश चव्हाण यांनी संकलन करून प्रकाशित केली आहेत. यातील निवडक लेखांच्या पुस्तकाचे संपादन डॉ. गो. मा. पवार (सोलापूर) व डॉ. द. ता. भोसले यांनी करावे असे ठरले. पुढे या संपादक मंडळात श्री. रमेश चव्हाण यांचा सुध्दा समावेश करण्यात आला. संपादक मंडळाच्या ४-५ बैठकातून त्यांच्या पुस्तक रूपातील लेखांचे परिशिलन करून लेख निवडण्यात आले. त्यांचे वेचक लेख निवडून ते प्रातिनिधीक रूपात सुसंगतरीत्या मांडणे ही वेळखाऊ, कष्टाची आणि जिकीरीची गोष्ट होती. त्यामुळे मंडळाच्या इच्छेप्रमाणे रा. ना. चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्षात सदरचे पुस्तक प्रकाशित होऊ शकले नाही. याचा खेद होतो.

रा. ना. चव्हाण स्वतः प्रबोधनाच्या चळवळीचे साक्षेपी साक्षीदार होते व स्वतः सत्यशोधक चळवळीतून व ब्राह्मधर्माच्या चळवळीतून संस्कारित झालेले वैचारिक व्यक्तिमत्व होते. त्यामुळे लेख निवडताना या दोन्ही भूमिकेस न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांची तौलनिक व समन्वयवादी दृष्टी पुनरपि वाचकांसमोर येणे महत्त्वाचे वाटले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

यांचे शिष्य असलेले रा. ना. चव्हाण, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे सहकारी असलेले रा. ना. चव्हाण या गोष्टींचा विचार करता त्यांचे संस्कार दृग्गोचर होणे क्रमप्राप्त वाटले. त्यामुळे चिंतनपर प्रगल्भ लेखांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे रा. ना. चव्हाण यांनी ठेवलेला प्रबोधनाचा वारसा निश्चितच या पुस्तकाच्या रूपाने समाजासमोर येईल असा विश्वास आहे.

मंडळाच्या या निर्णयाची कार्यवाही करण्याची संधी आम्हास मंडळाचे त्यावेळचे अध्यक्ष थोर साहित्यिक श्री. मधु मंगेश कर्णिक व मंडळाच्या वाङ्मय प्रकल्प समितीचे सदस्य यांचेमुळे मिळाली. आम्ही त्यांचे आभारी व ऋणी आहोत. तसेच मंडळाच्या सचिव मीनाक्षी रा. पाटील यांनी या कामात लक्ष घालून, नेटाने पाठपुरावा करून पुस्तक तयार करून घेतले. त्यांच्याविषयी आदर प्रकट करून आम्ही त्यांचे आभार मानतो. सदर पुस्तकाची सविस्तर व समर्पक, न्याय देणारी प्रस्तावना डॉ. द. ता. भोसले यांनी लिहिली. त्यांचे आभार मानणे कर्तव्याचे वाटते. त्यांनी प्रस्तावनेतून रा. ना. चव्हाण यांची ओळख व परिचय करून दिल्यामुळे त्यांचा स्वतंत्र परिचय दिला नाही.

मंडळाचे सांप्रत अध्यक्ष मा. श्री. बाबा भांड यांनी संपादक मंडळाच्या विनंतीस मान देऊन आपले मनोगत दिले. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो तसेच शासकीय मुद्रणालयाचे संचालक व त्यांचे सहकारी यांचे आभार मानणे कर्तव्याचे वाटते.

वैचारिक सामाजिक नेतृत्व घडविण्यास हा लेख संग्रह चालना देईल, असा विश्वास आहे.

**डॉ. गो. मा. पवार, सोलापूर**
**डॉ. द. ता. भोसले, पंढरपूर**
**श्री. रमेश चव्हाण, पुणे**

# प्रस्तावना

महाराष्ट्रात वैचारिक लेखन करणाऱ्या विचारवंतांची मोठी तेजस्वी आणि समृद्ध परंपरा आहे. लोकहितवादींची शतपत्रे आणि इतर लेखन हे याचे आद्य उगमस्थान. आर्थिक विषमता, धार्मिक शोषण आणि वैयक्तिक सुखोपभोग यावर उभी असलेल्या पेशवाईचा शेवट झाल्यावर अवघ्या पंधरा-वीस वर्षांत जुन्याचा त्याग आणि नव्याचा स्वीकार याचा ध्यास घेऊन गेल्या पावणेदोनशे वर्षांपासून सुरू झालेली ही परंपरा जितकी तेजस्वी आहे; तितकीच समाज जीवनाला व्यापून उरणाऱ्या साऱ्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारी आहे. धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, पंथ, संघटना, चळवही, आंदोलने या विषयीचे प्रबोधन आमच्या या विचारवंतांनी केले. पण त्याच वेळी वर्णश्रेष्ठत्व, आपले हक्क; आणि धर्माच्या बंदिस्त पण मृतप्राय चौकटीच्या आधारे ज्यांचे जीवन कष्टाविना सुखोपभोगात जात होते; त्यांनीच या प्रबोधनाला प्रखर विरोध केला, असा आपला इतिहास सांगतो. या विचारवंतांनी त्या काळच्या काही व्यावहारिक गोष्टींवर म्हणजे निरर्थक प्रथा-परंपरेवर जसा प्रहार केला; तसाच मानवी जीवनाला फार बंदिस्त करणाऱ्या गुलामगिरीवरही प्रहार केले. या तेजस्वी विचारवंतांच्या परंपरेत काहींना भरपूर मान्यता मिळाली. काहींना थोडीशी उशिरा मिळाली, काहींना आधी प्रहार अन् मग हार या स्वरूपात मिळाली. मातीच्या मोराला लावलेली मोरपिसे गळून पडावीत; तशी काहींची लोकप्रियता आज पार गळून गेलेली आहे. तर काही विचारवंतांचे बहुआयामी, कसदार अन् आजही ताजेतवाने वाटावे अशा साहित्याला अंधाऱ्या कोपऱ्यात उपेक्षेचे दुःख सोसत अंग चोरून उभे राहावे लागले. त्यांना मिळाली घोर उपेक्षा, अघोर निंदा आणि जन्मभर पुरून उरावे एवढे दारिद्र्य!

महाराष्ट्राने उपेक्षा केलेल्या मानकऱ्यांमध्ये ज्यांचा समावेश झालेला नाही; अशा विचारवंत आणि प्रबोधनकारांमध्ये श्री. रा. ना. चव्हाण यांचाही समावेश करावयास हवा. प्रा. गं. बा. सरदार यांच्या ग्रंथात असे समाविष्ट होऊ शकणारे अनेक जण आहेत. ‘कीर्ती वा मान्यता माणसाला मृत्यूनंतर मिळणारे खाद्य आहे’ या अर्थाचे एक आंग्लवचन आहे. याची आठवण करून देणारी ही घटना आहे. वाईसारखे सनातनी परंपरेचा

अभिमान बाळगणारे गाव, लेखनाला सर्वस्वी प्रतिकूल असणारे वातावरण; प्रज्ञा आणि प्रतिभा यांना खच्ची करून टाकणारी नोकरी; आर्थिक विवंचना, पाहुणा म्हणून आलेल्या आजाराने दहा वर्षे केलेला अमानुष छळ आणि अक्षराचे सत्त्व, सामर्थ्य व सौंदर्य न ओळखणारा अवतीभवतीचा समाज. या साऱ्या नाऊमेद करणाऱ्या गोष्टींची आयुष्यभर साथ आणि सोबत असतानाही एक शेतकऱ्याचा मुलगा त्यातही पुन्हा महाविद्यालयीन शिक्षणाचे ओझरते तोंड पाहिलेला, साठ वर्षांहून अधिक काळ कमालीच्या निष्ठेने, तितक्याच निरपेक्ष भावनेने दीड हजार लेखांची निर्मिती करतो ही खरोखर अविश्वसनीय गोष्ट आहे. आजकाल दीडहजार ओळी लिहिणारा लेखक झपाट्याने प्रतिष्ठित होतो. मान्यता पावतो आणि एखाद्या पदाला नि पुरस्काराला पात्रही समजतो. पण एवढे मोठे सखोल, सर्वस्पर्शी, समतोल आणि चिंतनाचा स्पर्श लाभलेले व्यासंगपूर्ण लेखन असतानाही रा. ना. चव्हाणांची आम्ही महाराष्ट्रीय मंडळींनी कसलीही बाकी न ठेवता छान उपेक्षा केली. आम्ही किती पुरोगामी, स्वागतशील, साहित्यप्रेमी आणि कृतज्ञ आहोत, याचा पुरावा म्हणजे श्री. रा. ना. चव्हाणांच्या लेखनाची आम्ही केलेली उपेक्षा होय.

आणखी एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. सुमारे २९-३० ग्रंथांचा ऐवज असणारे त्यांचे हे लेखन तसे जुजबी नाही. तात्कालिक नाही. केवळ मनोरंजन करणारे नाही. कथा-कादंबरीसारखे ललित लेखन एखाद्या लेखकाला जमू शकेल. चार पुस्तकांच्या आधारे पाचवे पुस्तक तयार करणाऱ्या लेखक-गड्याला मोठ्या संख्येने ग्रंथनिर्मिती करता येईल. किंवा ओल्या-सुक्या शब्दांचा पालापाचोळा ग्रंथरुपी गोणीत गोळा करणाऱ्या उत्साही महाभागाला दर वर्षाला ग्रंथरूपी बालकाला जन्मास घालता येईल. पण तात्त्विक स्वरूपाचे, आध्यात्मिक स्वरूपाचे. धर्मापासून ते शिक्षणापर्यंत अन् शिक्षणापासून तो परिपूर्ण व समाधात जीवनापर्यंत नाना विषयांवर सखोल नि सर्वस्पर्शी लेखन करणे ही दुरापास्त गोष्ट म्हणावी लागेल. त्यांचे हे सारे लेखन म्हणजे लौकिक सुखोपभोगाचा जाणीवपूर्वक त्याग करून एक 'धर्म' म्हणून स्वीकारलेली ज्ञानोपासना आहे. ती एक निष्ठेने केलेली जीवनसाधना आहे. देहाची भूक मारल्याशिवाय प्रज्ञेची भूक शांत होत नसते. वासनेच मुख बंद केल्याशिवाय विवेकाचे मुख उघडले जात नसते. आणि विवेकाच्या मुखात चिंतन, मनन, अवलोकन आणि आकलन यांचा घास घातल्याशिवाय दर्जेदार लेखन होत नसते. जो स्वतःला जाळून घेतो, तोच समाजाला उजळवून टाकतो. थोडक्यात, समाज प्रबोधन, समाजसुधारणा आणि सामान्य माणसाच्या जगण्याला पूर्णता लाभावी यासाठी अवघे आयुष्य खर्ची घालणाऱ्या एका ऋषितुल्य व्यक्तीची ही निर्मिती आहे.

घर-संसाराकडे दुर्लक्ष करून आयुष्यभर उभा केलेला हा त्यांचा 'लेखनसंसार' कशासाठी होता? सत्ता-संपत्ती, पद-प्रतिष्ठा, मान-सन्मान या आमीषापोटी त्यांनी ही साधना केलेली नव्हती. पाणी नसलेला नारळ आणि गंध नसलेल्या फुलांचा हार गळ्यात पडावा आणि दुसऱ्या दिवशी रद्दीत जाणाऱ्या दैनिकामध्ये फोटोसह चमकावे या मोहापोटी त्यांनी हा ज्ञानयज्ञ पेटता ठेवलेला नव्हता. तर आपला अवघा समाज जाचक नि गतार्थ रूढी-परंपरेच्या आणि वर्णजातीच्या जोखडातून मुक्त व्हावा, समाजातली श्रेष्ठ-कनिष्ठ भावना नष्ट व्हावी, वैर आणि द्वेष यांची बाधा माणसाला वा जातीला होऊ नये. कर्मकांड प्रधान उपासनेला शुद्धत्व लाभावे, समाजामध्ये सनातन मूल्यांची प्रतिष्ठा व्हावी. अवघा समाज इहवादी आणि विज्ञाननिष्ठ व्हावा, सर्वांनी उदारधर्माचा स्वीकार करावा; शूद्रातिशूद्रांच्या गळ्यात अडकलेला वेदनेचा हुंदका कमी व्हावा, प्रत्येकाने स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांचा अंगीकार करावा. माणसाने माणसाला 'माणूस' म्हणून प्रेमाने जवळ घ्यावे. समाजात नांदणारी विषमता दूर व्हावी व अवघ्या मानव समाजाचे कल्याण व्हावे यासाठी लेखणी वापरणारा हा थोर विचारवंत होता. थोर भाष्यकार होता. विवेक, व्यासंग, न्यायबुद्धी, समतोल, तटस्थता, संशोधन आणि शिस्त यांचे व्रतासारखे पालन करून आपल्या चिंतनाचे शाश्वत सार समाजाच्या ओंजळीत टाकणारा हा व्रतस्थ प्रबोधनकार होता, यात शंका नाही.

**चरित्र आणि व्यक्तीमत्त्वाची जडणघडण :**

साहित्यविश्वात रा. ना. या नावाने प्रसिद्ध असलेले रामचंद्र नारायण चव्हाण यांचा जन्म २९ ऑक्टोबर, १९१३ रोजी वाई या गावी झाला. कृष्णाकाठी असलेल्या या गावाला तीर्थक्षेत्राचे स्थान प्राप्त झाले होते. वाईला दक्षिणकाशी असे संबोधले जात होते. जी गावे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असतात. तिथे चार गोष्टींचे पीक उदंड माजलेले असते. पहिली गोष्ट म्हणजे अशा ठिकाणी शास्त्री, पुरोहित, धर्ममार्तंड आणि उच्चवर्णीय लोकांची संख्या मोठी असते. दुसरी गोष्ट म्हणजे तेथे वर्णाचा नि जातीचा अभिमानी दर्प पराकोटीला पोचलेला असतो. आपण आईच्या पोटातून नव्हे, तर ईश्वराच्या मुखातून जन्माला आलो अशा भ्रामक कल्पनेत ते वावरत असतात. तिसरी गोष्ट म्हणजे ही मंडळी आपला सारासार विवेक गहाण टाकून निरर्थक, घातक, अनिष्ट, गतार्थ व स्वार्थमूलक रूढी परंपरांना आपल्या छातीशी धरून जगत असतात आणि चौथी गोष्ट म्हणजे खऱ्या धर्माचे शुद्ध रूप न पाहता सकाम कर्मकांडांनी लिप्त झालेल्या धर्माचरणाला धर्म समजून त्याआधारे समाजाच्या मानगुटीवर बसून जगत असतात. एकीकडे गीता आणि ज्ञानेश्वरीवर प्रवचन करताना चराचरात-प्रत्येक माणसात ईश्वर व्यापून उरला आहे

असे सांगायचे; अन् रोजच्या व्यवहारात लूत भरलेल्या कुत्र्याला मांडीवर घेऊन थोपटतील व दारात उभ्या असलेल्या अस्पृश्याची सावली अंगावर पडेल या भीतीने त्याला शंभर फुटावर उभे करतील. या लोकांना ग्रंथातील अक्षरांची ओळख असली तरी जगण्यातले 'क्षरत्व' आणि 'अक्षरत्व' जराही समजलेले नसते. या चारी गोष्टी वाई या तीर्थक्षेत्री होत्या. त्यामुळे मुठीएवढ्या या गावात दोनशेपेक्षा अधिक दशग्रंथी ब्राह्मण वास्तव्याला होते. त्यांचे उपरणे धरून प्रवचनापुरते वाचन केलेले ब्राह्मण तर शेकड्यांनी असावेत. या छोट्याशा गावात चार संस्कृत पाठशाळा होत्या व पाच वेदशाळा होत्या. असलीच तर नेहमीचे प्राथमिक शिक्षण देणारी एखादी शाळा असावी. तीसुद्धा नगरपालिकेमार्फत चालविलेली; वर्ण आणि जातीचा अतिरेकी दर्प असल्याने ब्राह्मणांचा नदीकाठ वेगळा, ब्राह्मणांचा घाट वेगळा, ब्राह्मणांचे कुंड वेगळे, ब्राह्मण बायकांचे हळदीकुंकू वेगळे आणि ब्राह्मणांची स्मशानभूमी वेगळी होती. निरर्थक व स्वार्थमूलक रूढी-परंपरांचा अभिमान आणि धर्मग्रंथांचा उथळ अभ्यास असणाऱ्या या 'ज्ञानी' मंडळींनी सातारच्या प्रतापसिंह महाराजांना क्षत्रिय मानले नाही. कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या वेदोक्त प्रकरणी त्यांना क्षत्रिय मानले नाही. एवढेच नव्हे तर साऱ्या भारतात वेद, उपनिषदे, धर्मशास्त्र व इतर शास्त्रांचा सखोल अभ्यास केलेल्या आणि पुरोगामी आचार विचार असलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचा छळ केला. त्यांना जातीतून बहिष्कृत केले. त्यांचा जाहीर निषेधही केला. याचे खरे कारण सकाम कर्मकांडाला धर्म समजून त्याचा चैनीत जगण्यासाठी केलेला वापर. भूमीला कुठलीही जात नसते. तिच्यातून निर्माण होणाऱ्या अन्नाला जात नसते. पावसाला वा पाण्याला जात नसते. आणि अन्न शिजविणाऱ्या अग्नीलाही जात नसते. तरीही रा. ना. चव्हाण शिकत असलेल्या प्राथमिक शाळेत स्नेहसंमेलनानिमित्ताने शाळेतील मुलांना 'स्नेह' नसलेले जे भोजन दिले जायचे; त्यावेळी जातवार पंक्तीप्रपंच आणि भेदाभेद पाडले जायचे. हे सनातनी व कर्मठ वातावरण आणि अमानवी रूढी याविरूद्ध रा. ना. चव्हाण व त्यांचे मित्र शंकरराव जेजुरीकर यांनी तीव्र चळवळ केली आणि मोजक्या विद्यार्थ्यांना घेऊन सहभोजनाचा प्रसंग घडवून आणला. या सहभोजनात ढोर समाजातली मुले सामील झाली होती हे एक नवल म्हणावे लागेल. ज्ञानोपासना आणि धर्मोपासना यांची समृद्ध परंपरा असलेल्या गावाने या अठरा वर्षाच्या पोराला नकळत कसे घडविले याचे हे उदाहरण आहे. अनेकदा समाजाचे वा गावाचे प्रेम, प्रोत्साहन व प्रेरणा यापेक्षा मत्सर, द्वेष आणि उपेक्षा हीच माणसाच्या गगनगामी कर्तुत्वाला खतपाणी घालतात, हेच खरे. रा. ना. चव्हाण यांच्या बाबतीत तर ते शंभर टक्के खरे म्हणावे लागेल.

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' अशी एक म्हण मराठीत प्रचलित आहे. रा. नां. च्या बाबतीत केवळ पायच नव्हे तर पाळण्यात असलेल्या मुलाचे हातही दिसत होते. प्राथमिक शाळेत असताना त्यांनी केवळ परीक्षेचा अभ्यास केला नाही. आपल्या व्यक्तित्वाला आकार देणाऱ्या गोष्टींची आवड जोपासली. घरी येणारी वृत्तपत्रे ते मनापासून वाचत. शाळेजवळ असलेल्या वाचनालयात जाऊन अधाशासारखे वाचन करीत. एवढेच नव्हे तर समवयस्क विद्यार्थी मित्रांच्या मदतीने 'सूर्यप्रकाश', 'रणशूर तानाजी' आणि 'वर्तमानसार' अशी हस्तलिखित मासिके प्रसिद्ध केली. आपल्या लोकासाठी नव्याने वाचनालय सुरू केले. 'सूर्यप्रकाश' नावाचे हस्तलिखित तर १९२३ साली, म्हणजे वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी तयार केले. माझ्या दृष्टीने या साऱ्या गोष्टी मोठ्या वैशिष्ट्यपूर्ण 'सिग्निफिकंट' वाटतात. दहा-बारा वर्षाचा एखाद्या शेतकऱ्याचा पोरगा या वयात काय करील? एक तर तो कोकरा-वासराबरोबर खेळत बसेल. अथवा बैलगाडीच्या खेळण्याबरोबर खेळत बसेल. हातात थोडीफार कला असेल तर मातीचे बैल, घोडा तयार करील. म्हणजे ज्या वयात हातात चाबूक किंवा विळा-कोयता असायचा; त्या वयात रामचंद्र नारायण नावाच्या मुलाच्या हातात लेखणी स्थिरावली होती. आणि ती लेखणी पुरोगामी विचारांची निर्मिती करण्यात अनंद मानत होती. ज्या घरात गेल्या अनेक पिढ्यांपासून विद्येची परंपरा आहे. ज्या घरात मंत्रघोषाच्या निमित्ताने सरस्वतीच्या वीणेचा झंकार निनादतो आहे. ज्या घरात शैक्षणिक वातावरण आहे; तिथल्या एखाद्या कुमाराने पुस्तकांत रमून जाणे; हस्तलिखित मासिकाचा 'उद्योग' करणे आपण समजू शकतो. पण शेतकऱ्याच्या मुलाने यात रस घेणे मला विशेष वाटते. अर्थात याच्या पाठीमागे कर्तबगार, विद्याप्रेमी, समाजहितैषी व बंडखोर कृती करणाऱ्या पिताजींची प्रेरणा होती, हेही विसरून चालणार नाही.

श्री. रा. ना. चव्हाण वाईला प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर पुण्याला पुढील शिक्षणासाठी शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये दाखल झाले आणि त्यांच्या अवलोकनाचा परिघ विस्तारला. थोरा-मोठ्यांच्या गाठीभेटी, वि. रा. शिंदे यांच्यासारख्या ऋषितुल्य समाजसेवकाचा सहवास, स्वातंत्र्य चळवळींची आंदोलने, नामवंतांनी भाषणे आणि समृद्ध ग्रंथालयाचा वापर यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व नानाविध अनुभवांनी समृद्ध झाले. विचारांना दिशा मिळाली. विचारांना परिपक्वता आली. विचारमंथनचा प्रदेश विस्तारला. म. फुल्यांच्या कार्याचा जवळून परिचय झाला. त्याकाळची मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर ते १९३६ साली स. प. महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी दाखल झाले. त्या महाविद्यालयातून ते प्रथम वर्षाची परीक्षा पासही झाले. पण त्याच दरम्यान त्यांच्या मातोश्रींचे दुःखद निधन

झाले. या निधनामुळे घराला मोठा धक्का बसला. घरी सर्वजण लहान असल्याने आणि घरच्या आर्थिक अडचणींमुळे त्यांनी शिक्षण सोडून पुणे नगरपालिकेत शिक्षकाची नोकरी पत्करली. नंतरच्या पाच वर्षात म्हणजे १९३८ ते १९४३ मध्ये इगतपुरी, देवळाली, अंबरनाथ याठिकाणी शिक्षक आणि लिपिक म्हणून नोकऱ्या केल्या. नंतर ते वाईला परत आले आणि १९६८ पर्यंत सातारा जिल्हा लोकलबोर्डात लिपिक म्हणून नोकरी केली. सन १९३७ च्या मे महिन्यात त्यांचा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ब्राह्मोसमाजाच्या विधीप्रमाणे विवाह झाला. विवाहानंतर प्रीतीभोजनात सर्व जातीजमातीचे लोक सहभागी झाले होते. ते वाई नगरीतील पहिले सहभोजन होते. वाईला परत आल्यानंतर त्यांचा ब्राह्मो समाजाचे सचिव, वाईची वसंत व्याख्यानमाला, लोकमान्य टिळक संस्था, स्वामी विवेकानंद संस्था, महाराष्ट्र साहित्य परिषद अशा अनेक सार्वजनिक संस्थांशी सक्रीय व घनिष्ट संबंध आला. सार्वजनिक जीवनात त्यांना अनेक सहृदय मित्र भेटले. हितचिंतक भेटले. त्यांचा नम्र आणि शांत स्वभाव, निगर्वी वृती, गुणग्राहकता आणि संघर्षावेळी समेटाची भूमिका, यामुळे ते जगन्मित्र बनले. आपल्या नोकरीच्या काळातही त्यांनी आपले लेखन-वाचन थांबविले नाही. उलट त्यात वाढच झाली.

कोणत्याही लेखकाला आपल्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाशिवाय समृद्ध साहित्याची निर्मिती करता येत नाही. ललित लेखकाला अनुभवांची समृद्धी आवश्यक असते तर वैचारिक लेखकाला विचारांची समृद्धी आवश्यक असते. ललित लेखकाला जीवनाचा अर्थ आणि अन्वयार्थ शोधावा लागतो; तर वैचारिक लेखन करणाऱ्याला त्या त्या काळाचा युगधर्म शोधावा लागतो. ललित लेखकाला माणूस नावाच्या प्राण्याचा शोध घ्यायचा असतो. तर ललितेतर लेखकाला माणसांनी बनलेल्या समाजाचे अंतरंग आणि अंतःप्रवाह शोधायचे असतात. दोघांचेही काम तसे अवघडच असते आणि त्यासाठी समृद्ध व्यक्तिमत्वाची तितकीच गरज असते. असे हे समृद्ध व्यक्तिमत्त्व लेखकाला आकाशातून प्राप्त होत नाही. उधार उसनवारीने अथवा विकतही मिळत नाही. समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी (१) मातापित्यांचे संस्कार (२) घरातील वातावरण (३) थोरामोठ्यांचा सहवास (४) चांगल्या ग्रंथांचे वाचन (५) आणि जगत असलेल्या काळाचे जीवनावर होणारे साद-पडसाद या पाच गोष्टी कारणीभूत ठरतात. याशिवाय स्वतःच्या मनाचा असणारा उपजत कल आणि त्यातून जीवनाला लाभणारी दिशा याही तितक्याच महत्त्वाच्या बाबी आहेत. भगवद्‌गीतेने म्हटल्याप्रमाणे ‘तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार आहेस’ किंवा गौतम बुद्धाने शिष्यांना सांगितल्याप्रमाणे ‘तूच तुझ्या आयुष्याचा प्रकाशदीप हो’ अशी आपली स्वतःचीच भावना असेल तर या पाच गोष्टींचे योगदान व्यक्तिमत्त्वाच्या समृद्धीसाठी खूप उपयोगी

पडते. या दृष्टीनेच श्री. रा. ना. चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाची आपण ओळख करून घ्यायला हवी.

श्री. नारायण चव्हाण हे रा. नां. चे पिताजी. हे नारायण चव्हाण म्हणजे पुरोगामी विचारांना उर्जा पुरविणारे वादळच जणू! मरणाची शिक्षा भोगणाऱ्या उपेक्षितांच्या दुःखाचे निराकरण करणारा पुरोगामी हुंकारच जणू! धर्मांध, कर्मठ आणि परंपरानिष्ठ अशा वाईमध्ये त्यांनी समाजविकृती कमी करण्याचा निष्ठेने प्रयत्न केला. त्यांनी श्री. रा. ना. चव्हाण यांना तसा सांपत्तिक वारसा मिळाला नसला तरी जगण्यासाठी आवश्यक असणारे संस्कार मिळाले. त्यांच्या पारमार्थिक वृत्तीची शिदोरी मिळाली. ग्रंथवाचनाची आवड, सार्वजनिक जीवनातील सहभाग, शेती आणि शेतकऱ्याच्या दुःस्थितीविषयीची करूणा, ईश्वरावरील अढळ निष्ठा, कर्मकांडाचा त्याग, सत्यशोधक चळवळ, ब्राह्मोसमाजाची चळवळ, लोकनाट्य आणि मेळे याद्वारे समाज जागृती, पुरोगामी विचारावरील अभंग निष्ठा, अस्पृश्यता निवारणासाठीचा कृतीतील, सहभाग, ग्रामीण शिक्षणासाठी पुढाकार या सारख्या लोकोत्तर गुणांचा वारसा त्यांना आपल्या पित्याकडून मिळाला. महर्षी शिंद्यांच्या सहवासामुळे आणि त्यांच्या प्रोत्साहनामुळे ब्राह्मोसमाजाचे रोपटे वाढविण्यात त्यांनी मोलाचे कार्य केले. वाई नगरपालिकेचे ते पहिले ब्राह्मणेत्तर अध्यक्ष होते. थोडक्यात, सेवा, समर्पण, सदाचरण, सद्‌विचार, साधेपणा, पुरोगामित्व, ग्रंथप्रेम आणि संतत्व या साऱ्या जीवनाला श्रीमंत आणि समृद्ध करणाऱ्या मूल्यांचे खोल संस्कार रा. ना. वर झाल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण व सखोल झाले. त्यांच्या जीवनाचे शिल्पकार हे नारायणराव चव्हाणच होते. माणसाने कशासाठी जगायचे, कसे जगायचे नि कुणासाठी जगायचे आणि जगणे कृतार्थ कसे करायचे यांचा एक आदर्श वस्तुपाठच या नारायणराव चव्हाणांनी आपल्या मुलासमोर ठेवलेला होता. गीतेने ज्यांची थोरवी गायलेली आहे त्या ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग अन् संन्यास या चारी योगांचा सुंदर मिलाफ या नारायणराव चव्हाण यांच्या ठायी झालेला होता. अन् हे चारही योग भूमीने जसे पाणी धरून ठेवावे त्याप्रमाणे रा. ना. चव्हाण यांनी आपल्या पितामहाचे हे योगसंमेलन आपल्या जीवनाचे अधिष्ठान मानले होते. आपल्या व्यक्तित्वात मुरवून ठेवले होते. त्यांचे अनुसरण केले होते.

श्री. रा. ना. चव्हाण यांच्या जडणघडणीमध्ये त्यांच्या पिताश्री इतकेच किंबहुना थोडेसे अधिकच योगदान श्री. वि. रा. शिंदे या ऋषितुल्य विभुतींचे झालेले आहे. वाईला प्रार्थनासमाजाची स्थापना झाल्यापासून म्हणजे सन १९३३ पासून तो अखेरपर्यंत या दोघांचे संबंध वेगवेगळ्या पातळीवर दृढ होत गेले. एकतर दोघांचे घरगुती संबंध होतेच;

पण गुरू आणि शिष्य, प्रवक्ता आणि कार्यकर्ता, शिक्षक आणि अनुयायी, प्रार्थनासमाजाचे संस्थापक आणि प्रचारक अशा विविध नात्यांनी हे संबंध दृढ होत गेले. महर्षी शिंदे यांचे जीवन आणि आचरण एखाद्या व्यासंगी आणि निर्मोही संताप्रमाणे असल्याने त्यांच्या व्यक्तित्वाचा खोल ठसा रा. ना. चव्हाण यांच्या जीवनावर पडला. जगण्याची पद्धत, लेखनाची पद्धत, विषयाची चिकित्सा, लेखनातील ताटस्थ, सत्यासत्य पारखण्याची दृष्टी आणि समतोल-समन्वयाची भूमिका रा. ना. चव्हाणांच्या ठायी जी आढळते; ती महर्षींच्या संस्कार नि सहवासाची देणगी आहे. स्वतःचा संसार पायाशी ठेवून समाजाचा संसार कडेवर घेण्याची समर्पणशीलता त्यांना महर्षींनी दिलेली आहे. स्वतःची दुःखे पोटात ठेवून उपेक्षितांची दुःखे वेशीवर टांगण्याची अन् त्यांचे निराकरण करण्याची वृत्ती रा. नां.च्या ठिकाणी महर्षींमुळेच निर्माण झाली. जनातल्या क्रांतीपेक्षा मनात झालेली क्रांती श्रेष्ठ असते अन् ती टिकावू असते; यासाठी कृती आणि उक्ती, लेखणी आणि वाणी यांचा निष्ठेने वापर करण्याचा संस्कार महर्षींना त्यांनी दिला. देहाला अन्नाची जितकी गरज असते तितकीच मनाला वाचन आणि चिंतनाची गरज असते, हे महर्षींनी स्वतःच्या आचरणाने रा. नां. च्या मनावर कोरले. आपल्या विचारात आणि कार्यात आग्रहीपणा आणि ठामपणा असला पाहिजे. पण त्याला सत्यनिष्ठ पुराव्याचे अधिष्ठान असले पाहिजे. विरोधकांच्या मतामधील सत्य पारखून घेतले पाहिजे. पण भाषा भडक असू नये, भूमिका नम्रतेची असावी. आपल्या व्यक्तित्वाचे तेज आणि वजन आपल्या लेखणीला आलेले असावे. विरोधक आक्रमक होणार नाहीत, ते दुरावले जाणार नाहीत अशी कार्यात व लेखनात महर्षींनी घेतलेली भूमिका रा. नां. च्याही लेखनात आढळते ती प्रामुख्याने महर्षी शिंद्यांनी दिलेली देणगी आहे. मुख्य म्हणजे नाना देवदेवतांनी गजबजलेल्या देव्हाऱ्याकडे पाठ फिरवून प्रार्थनासमाजाच्या एकेश्वरी पंथाची स्वीकारलेली वाट ही शिंद्यांच्या सहवासाचे फलित आहे. श्रद्धापूर्वक, निष्ठापूर्वक, निरपेक्ष भावनेने केलेली प्रार्थना हीच खरी ईश्वराची पूजा होय. या मतानुसार त्यांनी सारे आयुष्य व्यतीत केले ते महर्षींच्या शिकवणुकीचा दृश्य परिणाम होय.

रा. ना. चव्हाणांनी प्रार्थनासमाजाचे मुखपत्र असलेल्या 'सुबोधपत्रिका' मध्ये 'ब्राह्मोधर्म आणि बहुजन' या विषयावर लेख लिहिला. तो गुरुवर्य शिंदे यांना फार आवडला; व तू 'बहुजन समाजाच्या बाजूने लिहित रहा' असा आदेश दिला. "तो मी आयुष्यभर पाळला" असे स्वतः रा. ना. चव्हाण यांनी सांगितले आहे. आणखी एका लेखात रा. ना. म्हणतात, "म. शिंदे पोथीबंदवादी किंवा सांप्रदायिकवादी नव्हते. त्यांच्यात कोणत्याही पक्षाचा अभिमान नव्हता. त्यांचा तटस्थपणा मी घेतला. मी त्यांची ध्येय-

धोरणे शिकलो. त्यांची छाया माझ्या लेखनात पडू लागली. त्यांच्या तौलनिक व समन्वयक व्याख्यानांच्या प्रोत्साहनामुळेच मी मोहित झालो.”

कर्मवीर वि. रा. शिंदे यांची (आणि अर्थात् रा. ना. चव्हाण यांनीही) अशी भूमिका होती की, विशुद्ध धर्माचा प्राणभूत घटक समाजजीवनाशी जोडला जावा; समाजजीवनातले दैनंदिन व्यवहार नीतिमूल्यांशी जोडले जावेत; काळाला पराभूत करणारी नीतिमूल्ये माणसाच्या जगण्याशी जोडली जावीत; माणसाचं जगणं निराकार असलेल्या ईश्वराशी जोडले जावे; ईश्वराची कृपा सश्रद्ध प्रार्थनेशी जोडली जावी आणि ही प्रार्थना स्वकल्याणापेक्षा विश्वकल्याणाशी जोडली जावी; तरच माणसातल्या ‘देवत्वा’चा प्रत्येकाला साक्षात्कार होऊ शकेल. या स्वप्नाचा ध्यास घेणारी ही दोन्ही व्यक्तिमत्वे होती, यात शंका नाही.

रा. ना. चव्हाणांच्या जडणघडणीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचाही सहयोग जाणवतो. निरर्थक परंपरांचा चिखल आणि सकामकर्मकांडाचे नासके पाणी यांच्या दलदलीत सूर्याकडे झुकून तेजाची प्रार्थना करणारे सूर्यकमळ म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अवघा ब्रह्मवृंद त्यांचा द्वेष करी, मत्सर करी, तर अवघा बहुजन समाज त्यांचा शब्द काळजाच्या कुपीत साठवून ठेवी. ‘प्रकांड’ हा शब्दही ज्यांच्या बाबतीत थिटा पडावा, असे त्यांचे पांडित्य होते. भूतकाळाच्या गच्च अंधारामुळे लोप पावलेल्या धर्मतत्त्वाचा ‘आतला’ प्रकाश त्यांनी प्रकट केला. वेद, उपनिषदे, स्मृतिश्रुती आणि याच्याशी निगडित असलेल्या साऱ्या ज्ञानशाखांचा सूक्ष्म आणि सखोल अभ्यास शास्त्रीजींनी केलेला होता. तरीही त्यांची दृष्टी अतिशय प्रागतिक, विचार पुरोगामीः कृती मानवतेची अन् समतेची. अस्पृश्याच्या मुलाला घरात ठेवून जेऊ घालण्यापासून अस्पृश्यांच्या घरात जाऊन जेवण्यापर्यंतची बंडखोर भूमिकाः राजकारण, धर्मकारण, समाजकारण आणि अर्थकारण याविषयींचा अभ्यासही अद्ययावत होता.

तर्कतीर्थ हे वाईमध्येच राहत असल्याने या दोघांचे परस्परांकडे जाणे-येणे सुरू झाले. एक तर ब्राह्मोसमाज मंडळींचा शास्त्रीजींशी पहिल्यापासून संबंध होता. त्यांच्या पुरोगामी वृत्तीमुळे वाईतील सनातन्यांकडून आणि प्रतिगाम्यांकडून त्यांना त्रास होई, मनाई होई. त्यावेळी रा. ना. चव्हाण यांनी पुढाकार घेऊन ब्राह्मोसमाजाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाई. शिवाय रा. ना. हे तर्कतीर्थांच्या चौफेर विद्वत्तेविषयी आदर बाळगीत तर तर्कतीर्थांना रा. नां. च्या समाजप्रबोधन कार्याबद्दल कौतुक वाटत असे. एका लेखात रा. ना. म्हणतात, “’तर्कतीर्थांच्या सान्निध्याने मी बुद्धिवादी बनलो. ते निरीश्वरवादी

म्हणून जाहीर होते. तरी माझा ईश्वरवाद त्यांच्या सहवासाने डळमळला नाही. तो डोळस झाला. ब्राह्मोधर्मावर त्यांची अनेक व्याख्याने मी घडवून आणली. ब्राह्मोसमाजाचे त्यांनी लहानपणी संगोपन केले." म. फुल्यांच्या जीवनकार्यावर जी खालच्या दर्जाची टीका झाली होती. त्याची दुसरी बाजू वाचकांसमोर यावी म्हणून तर्कतीर्थांच्यामागे चिकाटीने लागून त्यांनी 'ज्योती-निबंध' लिहून घेतले. त्यांनी तर्कतीर्थांच्या समवेत 'बहुजन समाजाचा इतिहास' लिहिण्यासाठी अनेक साधने जमवून त्यांची बरेच लेखनही केले होते... त्यांच्या सोबत झालेल्या चर्चेमधून माझे ज्ञान विकास पावले. अशी प्रशस्ती रा. ना. यांनी एका लेखात दिलेली आहेच. काही विषयांबाबत दोघांचे वैचारिक मतभेद असले तरी त्यांची मैत्री अखेरपर्यंत टिकून होती. तर्कतीर्थांच्या सहवासामुळे रा. ना. अधिक चिकित्सक झाले. या दोघांचे हे नाते असल्यामुळेच रा. ना. चव्हाणांच्या षष्ट्यब्दीपूर्ती निमित्ताने १९७४ साली आणि १९८३ शासनाने दलितमित्र पदवी प्रदान केल्याबद्दल जे दोन सत्कार सोहळे झाले, त्याचे अध्यक्षपद तर्कतीर्थांनाच देण्यात आले होते. अशाप्रकारे या दोघांचे संबंध होते. व्यासपीठावरील विचार, प्रबोधपर चळवळीतील सहभाग आणि ब्राह्मोसमाजातील सहभाग याबरोबर दोघांच्या बौद्धिक मैत्रीचा रा. ना. चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वावर निश्चितच परिणाम झालेला आहे आणि त्यांनीही तो मान्य केलेला आहे.

एखादा संवेदनशील आणि चिंतनशील लेखक ज्या काळात वावरत असतो; त्या काळातील महत्त्वाच्या घटनांचा परिणाम सामान्य माणसावर फारसा होत नसला तरी अशा लेखकावर तो होतच असतो. त्या घटनेतील सत्य-असत्य; त्यातील टाकावू-टिकावू, त्या घटनेचे तात्कालिक व चिरकालिन होणारे परिणाम असा लेखक आपल्या प्रज्ञाचक्षूने शांतपणे न्याहाळत असतो व समाजासमोर ठेवत असतो. त्यातही त्याचा काळ जर संक्रमणाचा असेल; नानाविध चळवळींनी गजबजलेला असेल, लढे, आंदोलने, सभा-परिषदा यांनी ढवळून निघालेला असेल. जुन्या-नव्यांच्या वैचारिक युद्धाने दणाणून गेलेला असेल तर त्या काळातले समाजजीवन पार ढवळून जाते. वादळमय होते आणि या साऱ्या वादळ-वाऱ्याचा सखोल परिणाम त्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध व विसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा असा ढवळून निघालेला होता. सन १९१३-१४ पासूनच समाज ढवळून टाकणाऱ्या घटनांना वेग आला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सुरू झालेली राष्ट्रीय सभेची चळवळ, त्यात पडलेले जहाल व मवाळ असे पंथ, म. फुल्यांनी सुरू केलेली सत्यशोधक चळवळ; त्या चळवळीने सुरू केलेले मानवमुक्तीचे उपक्रम, त्याला विरोध करणारे सनातनी मंडळींचे प्रयत्न, त्यासाठी त्यांनी घेतलेल्या निषेध सभा, जहाल भाषेत प्रसिद्ध केलेली पत्रके, ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज

यांनी चालविलेली एकेश्वरी पंथाची चळवळ, अस्पृश्यतेविरुद्धच्या कार्यक्रमांना मिळणारे पाठबळ, त्यासाठी राबविले जाणारे कार्यक्रम, राजर्षी शाहूंनी सुरु केलेल्या क्रांतिकारक सुधारणा; त्यांचे वेदोक्त प्रकरण, त्याबरोबरच बर्वे प्रकरण, यावेळीच प्रखर होत चाललेली ब्राह्मणेतर मंडळींची चळवळ, शेतकरी-उपेक्षितांच्या शोषणविरुद्धचे लढे, कौन्सिलमध्ये राखीव जागा मिळविण्यासाठी चालविलेली आंदोलने, अस्पृश्यतेविरुद्धचा मानवी हक्काआधारे डॉ. आंबेडकरांनी उभा केलेला लढा, चवदार तळ्याचे पाणी पिण्याने निर्माण झालेले वातावरण, स्त्रियांवरील अन्यायकारक बंधनाविरुद्ध पुरोगामी मंडळींनी सुरु केलेले प्रयत्न, शेतकरी कामगार पक्षाची निर्मिती, बहुजन समाजाचा काँग्रेसपक्षात प्रवेश, म. गांधींची अमानुष हत्त्या; त्यानंतर महाराष्ट्रात उसळलेला आगडोंब, प्रतिगामी आणि पुरोगामी विचारसरणीच्या कार्यकर्त्यामधील संघर्ष, बहुजनांच्या शिक्षणासाठी सुरू झालेल्या शिक्षणसंस्था; त्यातून निर्माण झालेले सुशिक्षित तरुणांमधील आत्मभान, या आत्मभानातून शोषणाला झालेला प्रखर विरोध, म. गांधींनी सुरू केलेल्या सामाजिक सुधारणा, त्यांनी यशस्वी केलेले अहिंसक आंदोलन, गिरणी कामगारांचे आपल्या हक्कासाठी वारंवार होणारे संप आणि लढे अशा कितीतरी गोष्टी या कालखंडात घडून गेल्या-घडत होत्या. एकापरीने नव्या युगाकडे सुरू झालेले हे संक्रमण होते. 'मुक्ती' हा एकच शब्द या साऱ्या झंझावातासाठी वापरता येईल. पारतंत्र्यापासून मुक्ती, शोषणापासून मुक्ती, गुलामगिरीपासून मुक्ती, धार्मिक जाचापासून मुक्ती, वर्ण-श्रेष्ठतेच्या भ्रामक दबावापासून मुक्ती; आणि परंपरा-बंधने यापासून मुक्तीः माणसाने माणसाशी माणुसकीच्या नात्याने वागावे-जगावे या समताधिष्ठित मूल्यासाठी हा लढा होता आणि रा. ना. चव्हाणासारखा चिंतनशील लेखक 'पापणी उघडी' ठेवून हे सारे पाहत होता. त्याचा अन्वयार्थ लावत होता. त्याचे आकलन करून घेत होता आणि लेखक, विश्लेषक नि विचारवंत म्हणून नकळत त्यांच्या व्यक्तित्वाची त्यातून जडणघडण होत होती. पहाटेच्या वेळी एखाद्या झाडाचे पान ना पान धुक्यानी दाटलेल्या वातावरणाने ओलेचिंब व्हावे, तसे संवेदनशील मनाला त्या काळातील घडामोडी ओल्याचिंब करीत होत्या त्या आपल्या आयुष्यात घडलेल्या नसल्या तरी. आपल्या घरात निर्माण झालेल्या नसल्यातरी. म्हणून श्री. रा. ना. चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीत वर उल्लेख केलेल्या बाबींचा कमी-अधिक प्रमाणात परिणाम झालेला होता, असे आपणाला ठोसपणे म्हणता येईल. शिवाय ते केवळ या काळाचे साक्षी नव्हते, तर त्यात त्यांचा सक्रिय सहभागही होता.

महाराष्ट्राच्या जडण-घडणीत आणि सर्वांगीण प्रगतीत ज्यांनी ज्यांनी मौलिक योगदान दिले, अशा अनेक थोर विभुतींवर रा. ना. चव्हाण यांनी भरभरून लिहिले आहे. त्यांच्या योगदानाची महत्ता सांगितली आहे. तरीही त्यांनी पाच महापुरुषांवर

वारंवार लेखन केले. भरपूर लेखन केले. छत्रपती शिवाजी महाराज, म. फुले, महर्षी वि. रा. शिंदे, राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर ही त्यांची पाच दैवते होती. हे थोर महापुरुष त्यांचे 'आयकॉन' होते. इतर थोर मंडळींचे कार्य व जीवन गौण होते, असा त्याचा अर्थ नव्हे. त्यांच्या लेखनाचा विषय न झालेलेही अनेक महापुरुष सांगता येतील. पण परम दैवतांचे स्थान या पाच विभुतींना होते. त्यांचे लोकोत्तर जीवन, लोकोत्तर कार्य, लोकोत्तर समर्पण; त्यांची मानवतेवरील श्रद्धा; सामान्य माणसाविषयी त्यांना असलेला जातिवंत कळवळा, त्यांचे द्रष्टेपण, संकटाशी त्यांनी केलेला मुकाबला आणि या पाच दैवतांवरील ग्रंथसंपदा यांचाही खोल ठसा रा. ना. चव्हाणांच्या जीवनावर झालेला नाकारता येणार नाही. शिवछत्रपती तर एक युगकर्ता होतेच; त्यामुळे त्यांच्या जीवनाची तुलना फक्त त्यांच्या जीवनाशीच होऊ शकते. भूमीवरच्या साऱ्या नद्यांना पाणी पुरविण्याचे काम जसा महासागर करीत असतोः तसे मानवी जीवनाला उन्नत करणाऱ्या व श्रीमंत बनवणाऱ्या साऱ्या प्रेरणांचे उगमस्थान शिवछत्रपतींच्या जीवनात आढळते. अनेकांच्या प्रमाणे रा. ना. चव्हाण यांचेही ते दैवत होणे स्वाभाविक आहे. म. फुल्यांच्या क्रांतिकारी जीवनाची थोरवी सांगताना त्यांची लेखणी कधीच थकली नाही. कळत्या वयापासून तो अखेरपर्यंत त्यांच्या श्वासावर म. फुल्यांची नाममुद्रा उमटलेली होती. एका लेखात ते स्वतःच म्हणतात. "चौदा-पंधरा वर्षांपासून जो मी 'फुले-वेडा' झालो; तो कायमचाच. मी आजपर्यंत म. फुले यांच्यावर व सत्यशोधक चळवळीवर लिहित आहे. बोलत आहे आणि यात मला आनंद वाटतो." तीच सश्रद्ध भावना महर्षी शिंदे, राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकरांविषयी जाणवते. त्याचे असाधारण कार्य व त्यांचे ग्रंथ हे त्यांच्या बौद्धिक भुकेला लाभलेला सत्वयुक्त खुराक आहेत. म्हणून या पाच दैवतांचाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असा परिणाम त्यांच्या जीवनावर झालेला दिसून येतो. या पाच दैवतांबरोबरच राष्ट्रीय चळवळ, सामाजिक चळवळी, धार्मिक चळवळ, अस्पृश्यतेची चळवळ आणि शेतकरी चळवळ या पाच चळवळींचेही ते साक्षीदार होते. या चळवळींचे ध्वनी, प्रतिध्वनी त्यांच्या मनाने टिपून घेतलेले होते. म्हणून या सर्व चळवळी त्यांच्या लेखनाचे विषय झाले. जिव्हाळ्याचे प्रश्न बनलेले होते.

थोडक्यात, जात्याच योग्य आकार घेण्यास अनुकूल असलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वावर या साऱ्या गोष्टींचा स्पष्ट-अस्पष्ट, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असा परिणाम झालेला आहे.

प्रस्तुत ग्रंथामध्ये श्री. चव्हाण यांचे जे लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत ; त्यांची स्थूलपणे चार गटात विभागणी करता येते. त्यांचे काही लेख तौलानिक स्वरूपाचे आहेत. अधिकांश लेख एकेका थोर विभूतीवर आहेत. काही लेख चळवळींशी निगडित आहेत. तर चौथा गट धार्मिक व आध्यात्मिक विषयांवरील लेखांचा म्हणून सांगता येईल. या चार गटातील लेखांचा परिचय आणि त्यांचे वेगळेपण थोडक्यात पाहणे अप्रस्तुत

ठरणार नाही. ते पाहात असताना या प्रस्तावनेच्या प्रास्ताविकात आणि त्यांच्या जडणघडणीवरील विवेचनात त्यांच्या विचारांचे वेगळेपण आणि योगदान यांचाही ऊहापोह झालेला आहे. तो लक्षात घेऊनच या चार गटातील लेखांचा थोडक्यात परामर्श घेणे योग्य वाटते.

**तौलानिक लेखातील विचारदर्शन**

श्री. रा. ना. चव्हाण यांच्या 'छ. शिवाजी आणि म. फुले' या पहिल्या लेखात शीर्षकात नमूद केल्याप्रमाणे केवळ या दोन थोर विभूतींची तुलना नाही. या दोघांच्या तुलनेबरोबरच त्यांनी राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांचीही धर्मविवेचन करताना तुलना केलेली आहे. एक खास विशेष म्हणून सांगण्यासारखी गोष्ट अशी की, श्री. रा. ना. चव्हाणांचा व्यक्तीपर असा लेख असो; वा एखाद्या चळवळीवरील लेख असो; तेवढ्याच मोठ्या व्यक्तीबरोबर तुलना केल्याशिवाय त्यांचा लेख पुरा होत नाही. अशा तुलना करणे ही त्यांच्या लेखनाची 'रा. ना. (स्पेशल) स्टाइलच' म्हणावी लागेल. अशी तुलना करण्याची दोन कारणे असावीत असे वाटते. त्यातले पहिले कारण तुलना केल्याने विचार स्पष्ट होतो. व्यक्तीचे मोठेपण अधिक ठळक होते. त्या थोर पुरुषाच्या कार्याची उंची कळते आणि दुसरे कारण असे असावे की, त्यांनी एखादा लेख लिहावयाला घेतला की, साहचर्य कल्पना जशा आपल्या मनात निर्माण होतात तसे रा. ना. चव्हाणांच्या मनात विस्तृत, चौफेर व सूक्ष्म अभ्यास असल्याने नाना व्यक्तींचे संदर्भ मनात गोळा होत असावेत. ते दाटून येत असावेत अन् ते अनावर होत असावेत अन् मग त्यांना वाट करून दिल्याशिवाय गत्यंतर राहात नसावे. एकोणिसावे आणि विसावे शतकाला आकार देणाऱ्या सर्व क्षेत्रातील सर्व थोरांचा त्यांचा व्यासंग उदंड असल्याने हे सगळे थोर पुरूष त्यांच्या लेखनाच्या टेबलावर फेर धरून नाचत असावेत, असे म्हणावेसे वाटते. याच स्वभाववैशिष्ट्यांमुळे या पहिल्या लेखातही डॉ. आंबेडकर आलेले आहेत. राजर्षी शाहू आलेले आहेत. दयानंद सरस्वती व राजारामशास्त्री यांचेही धावते-ओझरते-उल्लेख आलेले आहेत.

या लेखात रा. ना. चव्हाण यांनी चार-पाच गोष्टीवर विशेष 'प्रकाशझोत' टाकलेला आहे. येथे नव्या दृष्टीने जुन्या घटनांकडे पाहण्याची त्यांची भूमिका पाहावयास मिळते. राजकारण आणि धर्मकारण यांचे संबंध कसे असावेत नि कसे होते यावर प्रकाश टाकलेला आहे. धर्मसत्तेची समाजजीवनावर असलेली हुकमत व त्यामुळे होणारे नुकसान हे जिव्हाळ्याचे विषय या दोन राजांच्या चरित्राच्या आधारे मांडले आहेत. थोडक्यात काय, शिवकालापासून ते आतापर्यंत धर्मसत्ता राजसत्तेवर अधिराज्य गाजवत असते. या सूत्राचा सोदाहरण केलेला विस्तार म्हणजे हा लेख होय.

'जो सत्य शोधतो तो सत्यशोधक' या सूत्राच्या आधारे रा. ना. चव्हाण यांनी शिवाजी महाराजही सत्यशोधक होते. कारण ते गतानुगतिक मार्गाने गेले नव्हते हे सांगून १) त्यांनी मुस्लिमांचा अनुनय करण्याची पद्धत मोडून काढली. (२) त्यांनी स्वातंत्र्याचा पाया घातला. (३) निरर्थक परंपरा बदलून टाकल्या. (४) त्यांनी गुलामगिरीची जाणीव करून दिली आणि (५) जातिभेद-वर्णभेद असतानासुद्धा आक्रमकांच्या विरूद्ध महाराष्ट्र एकजीव केला. म्हणून त्यांना सत्यशोधकाबरोबरच धर्मपुरुषही म्हटलेले आहे. त्यांच्या मते धार्मिकांची सत्ता नाहीशी केल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य येत नाही. म्हणून शिवछत्रपती, म. जोतीराव फुले आणि डॉ. आंबेडकर हे त्यांच्या मते धर्मपुरुष होते.

त्याकाळी व गेल्या शतकापर्यंत धर्मसत्ता राजसत्तेवर आधिराज्य गाजवीत होती. त्यामुळेच छत्रपतींच्या राज्याभिषेकास विरोध झाला. त्यांच्याजवळ सत्ता आणि सैन्य असून सुद्धा त्यांना धर्ममार्तंडाचा विरोध मोडता आला नाही. प्रतापसिंह महाराज, सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांनाही या धर्मसत्तेचा विरोध झाला. धर्मसत्तेने कडवा विरोध केला हा इतिहास आहे. म्हणून सत्यशोधक समाजाला ही हुकुमत मोडाविशी वाटली. शेवटी त्यातून ते संदेश असा देतात की, धार्मिक गुलामगिरीचे निर्मूलन करणे हेच छत्रपती शिवाजी महाराज, म. फुले आणि डॉ. आंबेडकर या महापुरुषांचे जन्मकार्य होते.

'म. फुले, न्यायमुर्ती रानडे आणि डॉ. आंबेडकर' या लेखामध्ये या तिघांच्या भूमिका आणि मते यातील फरकांना अधोरेखित करणारा विचार प्रामुख्याने मांडलेला आहे. हे तिघेही समता, न्याय आणि प्रागतिक विचारांचे पुरस्कर्ते असले तरी जोतीबांनी जातीच्या मर्यादा तोडल्या होत्या; रानड्यांना त्या तोडता आल्या नाहीत. ग्रंथकार संमेलनाच्या निमित्ताने त्यांच्या भूमिका वेगळ्या होत्या. सार्वजनिक सभा आणि सत्यशोधक समाज यांच्यातही फरक होता. शिवाय न्या. रानडे यांना प्रार्थना समाजाचे सभासद सत्यशोधकांच्या कार्यक्रमात सहभागी होतात हे तितकेसे पसंत नव्हते. प्रार्थना समाजाच्या मते ब्राह्मणांना नावे न ठेवता अस्पृश्यांची प्रगती करावी, डॉ. आंबेडकरांनी त्यावर प्रखर टीका केली. सनातनी वृत्तीचा त्रास, फुले, शिंदे, आंबेडकर यांना जितका झाला, तेवढा न्या. रानड्यांना झालेला नव्हता. त्यामुळे यांचा लढा समान मानवी हक्क, अस्पृश्यता निवारण, गुलामगिरीतून मुक्ती यासाठी होता. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाला अग्रक्रम दिला नसल्याने म. फुले व डॉ. बाबासाहेबांनी रानडे आणि लो. टिळक यांना विरोध केला होता. त्यातच आणखी एक गोष्टीची भर पडली. सन १८८५ साली राजे सयाजीराव गायकवाड यांचा पुण्यात जो सत्कार-कार्यक्रम झाला त्यावेळी रानडे यांनी आपल्या भाषणात एक विधान केले. ते म्हणाले "देशाच्या उन्नतीस

समाजातले जातिभेद आडवे येत नाहीत." पण म. फुल्यांना ते मान्य झाले नाही. जातिभेद, वर्णश्रेष्ठत्व व ब्राह्मणीधर्म यामुळेच ब्राह्मणेतरांना विद्या शिकता येत नाही व त्यांचे सर्व प्रकारचे शोषण होते असे म. फुल्यांनी सांगितले. जातीभेद नष्ट करणे व सर्व प्रकारच्या विषमतेवरील उपाय आहे, असेच म. फुल्यांनी पुन्हा पुन्हा सांगितले आहे. या दोन दृष्टिकोनामुळे त्यांच्यात वैचारिक मतभेद होते. शिवाय सन १८७७ आणि १८९५ या साली महाराष्ट्रात फार मोठे दुष्काळ पडले असताना न्या. रानडे यांनी "पूर्वीच्या तीस वर्षापेक्षा शूद्र आणि शेतकऱ्यांची स्थिती आता बरी झाली आहे." असे एक विधान केले. कदाचित ते सत्ताधिशांना खूष करण्यासाठी केले असेल; पण वास्तव तसे नव्हते. उलट शेतकऱ्यांची फार वाईट अवस्था झाली होती. दुष्काळात स्वतः रानडे यांनी बैलगाडीतून शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या होत्या. चिंचेचा पाला खाऊन ते जगत होते हे त्यांनी पाहिलेले होते. त्यांचे हे विधान कुणालाही मान्य होण्यासारखे नव्हते. म्हणून जोतीरावांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे, दैन्याचे; उपासमारीचे आणि सावकारी पाशाचे भेदक वर्णन केले. रा. नां. च्या मते, "न्या. रानड्यांना ते भावणे शक्य नव्हते."

या लेखाच्या अखेरीस लेखकाने स्वतःचे जे चिंतन व्यक्त केले आहे ते तितकेच महत्त्वाचे आहे आणि विचार करण्यास प्रवृत्त करणारे आहे. ते म्हणतात, "धर्माला पारलौकिकाच्या" चौकटीत मर्यादित केल्याने राजकीय व सामाजिक जीवनातील हैदोस थांबणार नाही. धर्माचे समाजाशी असणारे नाते लक्षात घेतले पाहिजे. सांप्रदायिकता हे सर्व समस्यांचे मूलकारण आहे असे समजणे म्हणजे त्याचे अतिसुलभिकरण होय. कोणत्याही एका प्रश्नाचा पृथकपणे विचार न करता त्याची अन्य प्रश्नांशी अडकलेली मुळे शोधण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. किंबहुना सांप्रदायिकतेच्या विरुद्धचा लढा आणि इतर प्रश्नांवरील लढे एकमेकांपासून वेगळे नसतात.... म्हणून सांप्रदायिकतेचा प्रश्न केवळ संकुचित धार्मिक विचारप्रणालिकडे सरकण्यातून सुटणार नाही. समग्र, व्यापक आणि मूलगामी लढ्यातूनच त्याचा निःपात होणार आहे. तो दलित-शोषितांच्या वर्ग लढ्याशीही जोडावा लागेल." या त्यांच्या चिंतनातून आपणास वर्गलढ्याचे अधिष्ठान, लढ्याची दिशा आणि स्वरूप समजून घेण्यास निश्चितच उपयोग होईल. आर्थिक विकासाशिवाय सांप्रदायिकतेचा लढा लढणे शक्य नाही, असेही त्यांनी म्हटलेले आहे.

## श्री. रा. ना. चव्हणांचे व्यक्तिपर लेख

या संपादित ग्रंथांमध्ये रा. ना. चव्हाण यांचे एकूण बारा व्यक्तीपर लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये म. फुल्यांच्या सर्वस्पर्शी व लोकोत्तर कार्याचा आढावा घेणारे तीन लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. शतकानुशतके निर्दयपणे पायदळी

तुडविल्या जाणाऱ्या मानवतावादी मूल्यांना उराशी कवटाळून ज्यांनी एक नवी सृष्टी निर्माण केली; त्या महापुरुषाचे नाव आहे म. जोतीबा फुले! ते जसे महात्मा होते, तसे धर्मात्मा होते. पुण्यात्मा होते. प्राणदाता होते आणि एका नव्या युगाचे उद्‌गाताही होते. त्यांच्या एकूण जीवनकार्यासाठी एकच शब्द वापरावयाचा झाला तर 'लोकोत्तर' एवढा एकच शब्द पुरेसा आहे. त्यांचे आचार आणि विचार लोकोत्तर होते. त्यांचे धाडस लोकोत्तर होते. सेवा लोकोत्तर होती. समर्पण लोकोत्तर होते. शूद्रातिशूद्रांविषयीचा कळवळा लोकोत्तर होता. त्यांची धर्मकल्पना लोकोत्तर होती. त्यांचे संघटनकौशल्य लोकोत्तर होते आणि जगण्याचे तत्वज्ञानही लोकोत्तर होते. त्यामुळेच श्री. रा. ना. चव्हाण यांच्या संपूर्ण आयुष्याला म. फुले व्यापून उरलेले होते. म. फुले हा त्यांच्या चिंतन-लेखनाचा जसा विषय होता; तसाच तो अवघ्या जीवन जगण्याचा विषय झालेला होता. त्यामुळे म. फुल्यांची थोरवी ते प्रत्येक लेखामध्ये मुक्तकंठाने गाताना दिसतात. म. फुल्यांच्या ठायी आपणाला चार वादांचा सुरेख संगम झालेला दिसून येतो. बुद्धिवाद, समतावाद, विवेकवाद आणि मानवतावाद हे ते वाद होत; आणि हाच आदर्श रा. ना. चव्हाण यांनी जीवनासाठी आणि लेखनासाठी स्वीकारलेला होता. मानवी जीवन निकोप, निष्कलंक, निरामय करण्यासाठी ज्या ज्या बाबी आवश्यक असतात; त्या सर्व बाबींना म. फुल्यांनी हात घातलेला होता. आजच्या शतकात कमालीची तीव्र होऊ लागलेला भ्रूणहत्त्यासारखा विषय दीडशे वर्षापूर्वीच म. फुल्यांनी जाणला होता आणि त्याचे एक आदर्श उदाहरणच त्यांनी स्वतःच्या आचरणातून घालून दिले होते. म्हणून रा. ना. चव्हाण त्यांना 'ओरिजिनल' या शब्दाने गौरवितात. 'नव्या मार्गाचे संस्थापक' असे संबोधितात. असे म्हणण्याचे कारण असे की, त्यांच्यात आणि प्रार्थनासमाजात तत्त्वभेद नव्हता. राजकीय भेद नव्हता; उद्दिष्टात भेद नव्हता; तरी ते प्रार्थना समाजात सामील झाले नाहीत. 'ओरिजिनल' म्हणण्याचे आणखी एक कारण असे की, थोर क्रांतीकारक वासुदेव ब. फडके यांच्याशी त्यांची घनिष्ट मैत्री असूनही सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने ते गेले नाहीत. एवढेच नव्हे तर सर्वजण राजकीय स्वातंत्र्यासाठी आंदोलने करीत होते; पण फुल्यांना राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही सामाजिक स्वातंत्र्य महत्त्वाचे वाटत होते. सामाजिक समता महत्त्वाची वाटत होती. म्हणून रा. ना. चव्हाण म्हणतात "इथली इंग्रजी राजवट निघून गेल्यानंतर पुन्हा मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाईल. म्हणून बहुजनांना आधी शिक्षण दिले पाहिजे असे म. फुले, डॉ. आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांना वाटे. त्याला त्यांनी अग्रक्रम दिला होता. नव्हे सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरलेला होता." चार-दोन शहरांपुरता मर्यादित असलेला आणि ईश्वराच्या भक्तीसाठी केवळ प्रार्थनेवर

भर देणाऱ्या प्रार्थनासमाजापेक्षा या मूल्यासह समग्र परिवर्तनासाठी आवश्यक असलेल्या सर्व मूल्यांसाठी सत्यशोधक समाजाची त्यांनी स्वतंत्रपणे स्थापना केली आणि त्याचा विस्तार विदर्भापासून तो कोल्हापूर-बेळगावपर्यंत केला. केवळ विस्तार केला नाही तर ग्रामीण भागातील शेकडो तरुणांना सत्यशोधक समाजाचे सदस्य केले आणि या शेतकऱ्यांच्या पोरांनी हातात 'असूड' घेऊन जुलूम-जबरदस्तीला पायबंद घातला. हात फक्त लाचारीच्या नमस्कारासाठी नसतो, तो उगारण्यासाठी असतो, तो उभारण्यासाठी असतो, तो निवारण्यासाठी असतो, अन् दुःखितांचे अश्रू पुसण्यासाठीही असतो. हे महाराष्ट्राला प्रथमच दाखवून दिले. म्हणून श्री. रा. ना. चव्हाण त्यांना 'खऱ्या अर्थाने मुक्तिदाता' म्हणतात. खरा क्रांतीकारक सुधारक संबोधितात. असे म्हणण्याचे कारण रा. ना. चव्हाणांच्या मते त्या काळी जो थोडाफार शिकला त्याला सुधारक म्हणण्याची प्रथा रुढ होती. असले साक्षर सुधारक म. फुले नव्हते. रा. ना. चव्हाणांच्या मते सर्व प्रकारच्या सामाजिक आणि धार्मिक विकृती दूर करणारी त्यांची चळवळ होती. "गुलामगिरीची जाणीव करून देणे हा त्यांचा विचाराचा कणा होता. वर्तमानातील सत्यासत्य तपासून भविष्याकडे वाटचाल करावी असा त्यांचा संदेश होता." आणि तो जोपासण्यासाठी सत्यशोधक समाजाची घटना तयार केली. त्यात मूल्याधिष्ठित तेहतीस नियम समाविष्ट केले आणि "या चळवळीला नीतिमूल्याचे त्यांनी अधिष्ठान प्राप्त करून दिले." अशा शब्दांत या चळवळीचे वेगळेपण रा. नां. नी दाखवून दिले आहे. भारावलेल्या मनाने शेवटी रा. ना. चव्हाण म्हणतात, "नव्या काळाचा अर्थ जाणणारा दुसरा कोणी दिसत नाही. एका शेतकऱ्याचा मुलगा स्वप्रयत्नाने केवढी मोठी वैचारिक झेप घेतो याचे एकमेव उदाहरण म्हणजे म. जोतिराव फुले होत."

म. फुले यांच्याप्रमाणेच राजर्षी शाहू महाराजांवरील दोन लेखही राजर्षी शाहू महाराजांच्या सर्वांगीण कार्याचा सुंदर परिचय करून देणारे आहेत. त्यांच्या या लेखातून सामान्य वाचकांना ज्ञात नसलेली माहितीही लेखकाने जाता जाता दिलेली आहे. उदा. सयाजी महाराजांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांचा जो पाया घातला होता; तोच आदर्श समोर ठेवून शाहू महाराजांनी त्यावर सुंदर मंदिर उभे केले. तसेच म. गांधींनी गोखल्यांना गुरू मानले, गोखल्यांनी रानड्यांना गुरु मानले आणि राजर्षी शाहूंनी रानडे-गोखले यांना गुरु मानले. याचे कारण रा. नां च्या मते या दोघांनी मराठा समाजाच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले होते. इंग्रज सरकारकडे आग्रह धरला होता. तोच विचार राजर्षी शाहूंनी कृतीत आणला. रानड्यांना अतिशूद्राविषयी विशेष काही करावे असे वाटत होते. ती इच्छा राजर्षीनी पुरी केली. नवा काळ आणि जुना काळ यांचा रानड्यांनी समन्वय साधला होता. तसाच समन्वय महाराजांनी देखील घातला होता. असे

श्री. रा. ना. चव्हाणांनी म्हटलेले आहे. एवढेच नव्हे तर रानड्यांप्रमाणे महाराजही धर्म सुधारणा म्हणजे सर्व सुधारणा नव्हे, तर उद्योगधंदे, कृषी, शिक्षण, जातीनिर्मूलन, स्त्रीमुक्ती, व्यापार, कलांना उत्तेजन, शेतकरी, शेतमजूर इ. साऱ्या बाबींचा विकास म्हणजे सुधारणा मानत होते. समाज सुधारावयाचा असल्यास आधी धर्म सुधारला पाहिजे. त्यात क्रांती झाली पाहिजे. यासाठी राजर्षीनी आर्य समाज, प्रार्थनासमाज यांना पाठिंबा दिला आणि 'क्षात्र जगतगुरू' च्या माध्यमातून पुरोहितशाही कमी करण्याचा प्रयत्न केला.

श्री. रा. ना. चव्हाण यांनी राजर्षींच्या कार्याचा आढावा घेताना प्रामुख्याने तीन गोष्टींवर भर दिलेला आहे. शिक्षण प्रसार, अस्पृश्यता निवारण आणि सत्यशोधक चळवळीला दिलेले प्रोत्साहन. जाता जाता त्यांनी त्यांच्या औदार्याचाही उल्लेख कलेला आहे. खरे तर राजर्षींच्या दानशूरपणाचा विशेष उल्लेख व्हायला हवा. त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला साठ हजारांची पहिली मोठी देणगी दिली होती. फर्ग्युसन कॉलेजच्या विकासासाठी अनेकदा देणग्या दिल्या होत्या. टिळकांच्या रायगड समाधीच्या डागडुजीला भरपूर मदत केली होती. बहुजन समाजातल्या मुलांच्या शिक्षणासाठी मोठा खर्च केला. काहींना परदेशी पाठवून दिले होते. प्रत्येक जातीच्या मुलांसाठी कोल्हापूरात वसतिगृहांसाठी पैसा खर्च केला. गोरगरिबांच्या मुलींच्या विवाहासाठी लागणारा खर्च उचलला. गायक, चित्रकार, पैलवान, कलावंत, लेखक, मुद्रक, पत्रकार यांच्यासाठी लाखो रुपये खर्च केले. शिवछत्रपतींच्या पुण्याच्या स्मारकाला राजर्षी शाहूंनी मोठी देणगी दिली होती. एवढेच नव्हे तर ब्रिटिशांची नाराजी न पत्करता स्वातंत्र्याच्या चळवळीला राजर्षींनी फार मोठी आर्थिक मदत पुरविली होती. म्हणून सत्तेचा सेवेसाठी वापर करणारा, संपत्तीचा दानासाठी व जनासाठी वापर करणारा, प्रजेच्या दुःखात सहभागी होणारा, प्रागतिक आणि बंडखोर विचारांचा हा राजा होता. अस्पृश्यता निवारणासाठीही त्यांनी भरीव कामगिरी केली. मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणापासून तो नोकरीत राखीव जागा ठेवण्याच्या आदेशापर्यंत सर्व पातळीवर त्यांचे कार्य विस्तारले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही महाराजांनी भरपूर सहकार्य केले होते. म्हणून लेखक म्हणतात, "म. गांधी व डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा पाया राजर्षी शाहू महाराजांनीच घातलेला आहे."

सत्यशोधक समाजाचा झंझावत दक्षिण महाराष्ट्रात घोंगावला तो महाराजांनी दिलेल्या सहकार्यामुळे! त्यांनी आपली सत्ता सत्य प्रस्थापनेसाठी वापरली. रा. ना. चव्हाण लिहितात, "महाराजांच्या रूपाने म. फुल्यांना एक पोलादी पुरुष मिळाला. म. फुल्यांच्या नंतर भालेकर, श्री. लोखंडे यांच्याप्रमाणेच जोतीरावांच्या विचारांची ज्योत तेवत ठेवण्याचे काम राजर्षी शाहूंनी केले." ते पुढे असेही म्हणतात की, "शाहू झाले नसते तर म. फुले

महाराष्ट्रामध्ये विस्मृतीस गेले असते.” म्हणून रा. ना. चव्हाणांनी राजर्षी शाहूंच्या कार्याची थोरवी सांगताना समाजभूषण, लोकसेवक, लोकसंग्राहक, दीनबंधू, मोठ्या दिलाचा, गुणग्राहक दृष्टीचा आणि कुलदिपक अशा विशेषणांनी गौरविले आहे. एका लेखात ते असे म्हणतात, “शाहू ही व्यक्ती नव्हती तर विचारसंस्था होती. शाहू महाराज म्हणजे जनतेचे हृदय; लोकगंगेत पावन झालेला हा महापुरुष होता.”

श्री. रा. ना. चव्हाण यांची मागे मी जी पाच दैवते म्हणून सांगितली आहेत. त्यातील एक दैवत म्हणजे महर्षी शिंदे हे! महर्षींच्या जीवनाचा आणि विचारांचा प्रकाशदीप हाती घेऊनच श्री. रा. ना. यांनी आयुष्याची वाटचाल केलेली असल्याने म. फुले यांच्याप्रमाणेच महर्षींच्या जीवनावरही त्यांनी भरपूर लेखन केलेले आहे. किंबहुना त्याला संकीर्तनाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. श्री. चव्हाणांच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण पाहताना आपण श्री. शिंदे यांच्या कार्याची बऱ्यापैकी ओळख करून घेतलेली आहे. या संपादनात त्यांचा एकच लेख घेतलेला असला तरी अन्य लेखांतूनही त्यांच्या कार्याची नोंद श्री. चव्हाणांनी केलेली आहे या लेखात त्यांनी त्यांच्या जीवनाचे मर्म आणि वर्म सांगण्यावर भर दिलेला आहे. ते सांगताना लिहितात, “समाजकारण आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रात म. गांधीच्या अगोदर ते जहालपणे कार्य करीत होते.” त्यांच्या घरात आधीच वारकरी परंपरा असल्याने आपोआपच त्यांचा कल अध्यात्माकडे वळला आणि ते पूर्ण ब्रह्मवादी आणि आस्तिक राहिले. त्यामुळेच अध्यात्म आणि धर्म यांचा प्रचार करणे हे त्यांनी आपले जीवनाचे ध्येय मानले आणि श्री. रा. ना. चव्हाण यांच्या मते “दलित उद्धारासाठीच त्यांनी ब्राह्मो समाजाचा स्वीकार केला. त्यातच आई-वडिलांकडून अस्पृश्यता निवारण्याची प्रेरणा मिळाल्यामुळे ते त्यांनी व्रत मानले. प्रार्थना समाजाच्या प्रसारासाठी साऱ्या भारतभर त्यांनी प्रवास केला. वाईसारख्या गावी त्याची शाखा काढली. या कार्यावर त्यांची अपार निष्ठा असल्याने “ब्राह्मो समाजच भारताची एकात्मता साधेल” यावर त्यांची दृढ श्रद्धा होती. महर्षींच्या जीवनदृष्टीचे वैशिष्ट्य असे होते की, साधी राहणी, अपरिग्रह, सत्यनिष्ठा, ऋषितुल्य आचार-विचार, अभंग धर्मश्रद्धा व वैचारिक मतभेद होताच त्यातून अंग काढून घेणे, कर्मकांडाचा अव्हेर, आचरणाला महत्त्व, म्हणून रा. ना. यांच्या मते “स्वच्छेने स्वीकारलेल्या दारिद्र्याचे प्रतिक म्हणजे महर्षी शिंदे होते.”

त्यांनी केलेल्या अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याची म. गांधीनी नोंद घेतली होती. गौरव केला होता आणि एका पत्रात “माझ्यापेक्षाही आपण थोर आहात.” असे गौरवोद्‌गार काढले होते. आपल्या गुरुवर्याची महती सांगताना शिष्योत्तम चव्हाण

लिहितात "दलितोद्धाराबरोबरच दासी-मुरळी यांच्या उद्धारासाठी प्रयत्न करणारा, प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा मिलाफ असलेला, उत्तम वक्तृत्त्व असलेला, सार्वजनिक जीवनासाठी सारे आयुष्य वाहणारा, स्तुती व निंदेच्या पलीकडे गेलेला आणि संसाराला धर्मसाधनेचे क्रमप्राप्त कर्तव्य मानणारा हा अनासक्त संसारी महर्षी होता." "एकात्मकतेतूनच या देशाची प्रगती होईल" हा त्यांच्या साऱ्या लेखनाचा गाभा होता. असे श्री. रा. ना. चव्हाण यांनी त्यांच्या जीवनाचे मर्म सांगितले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरवरील तीन लेखांमधून श्री. रा. ना. चव्हाणांनी प्रामुख्याने दोन गोष्टीवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. स्वबांधवासाठी त्यांनी केलेले कार्य आणि त्याचे वेगळेपण आणि त्यांनी केलेल्या धर्मांतराची कारणमीमांसाः इतरांपेक्षा डॉ. बाबासाहेबांचे कार्य कसे वेगळे आणि व्यापक होते याचा त्यांनी परिचय करून दिला आहे. अलिकडे डॉ. बाबासाहेबांच्या कार्याची नव्याने मीमांसा होत असल्याने बऱ्यापैकी वाचन असलेल्या वाचकांना या लेखात सांगितलेले विचार पूर्वपरिचित असे वाटण्याची शक्यता आहे. तरीही लेखकाचे काही चिंतनात्मक निष्कर्ष दुर्लक्ष करता येण्यासारखे नाहीत. श्री. रा. ना. चव्हाण यांच्या मते शिवछत्रपती, फुले आणि आंबेडकर यांच्यासमोर अनेक वाटा होत्या. त्यापैकी कोणत्याही मार्गाने न जाता त्यांनी स्वतंत्र मार्ग स्वीकारला व इतरांना आपल्या वाटेवर आणले हे त्यांचे वैशिष्ट्य होय. अस्पृश्यता ही परंपरागत रूढीमुळे टिकून राहिली आहे म्हणून रूढीचा आधार मोडल्याशिवाय परिवर्तनाच्या वाटा मोकळ्या होत नाहीत. यासाठी डॉ. आंबेडकरांनी त्यावर प्रहार केला आणि आपल्या लढ्याला सर्वांगीण चळवळीचे स्वरूप दिले, हे डॉ. आंबेडकरांचे वेगळेपण असे रा. ना. मानतात. पूर्वीच्या सुधारकांनी अस्पृश्यता निवारणाचे केलेले कार्य त्यांना मर्यादित वाटत होते. डॉ. बाबासाहेबांचा आग्रह होता या देशातील नागरिकत्वाचे हक्क अस्पृश्यांना मिळावेत याचा त्यांनी आग्रह धरला व त्यासाठी तो प्रश्न राजकीय व आर्थिक पातळीवर नेला. राखीव जागा व स्वतंत्र मतदारसंघाची त्यांनी कलेली मागणी त्यापोटीच होती. रा. ना. यांच्या मते एकप्रकारे ही क्रांतीच होय. या क्रांतीचा दृश्य परिणाम म्हणजे दलितांमध्ये स्वाभिमान व अस्मिता निर्माण झाली. डॉ. आंबेडकरांचे आणखी एक वेगळेपण सांगताना रा. ना. म्हणतात, "राष्ट्रीय एकात्मता आणि हिंदुत्वाला बाधक ठरेल, असे त्यांनी काही केले नाही." ईश्वराला नकार, अवतारवादाला नकार, विभुतिपूजेला नकार, देवदेवतांचा नकार, मूर्तिपूजेला नकार; वर्णश्रेष्ठतेला नकार यामुळे सारा समाज पार ढवळून निघाला. म्हणून रा. ना. म्हणतात, "एवढा असामान्य नेता यापूर्वी झाला नाही."

डॉ. बाबासाहेबांनी आंधळेपणाने बौद्धधर्म स्वीकारलेला नव्हता. श्री. रा. ना. चव्हाण यांनी त्यामागची अनेक कारणे स्पष्ट केली आहेत. बाबासाहेबांनी बौद्धधर्म स्वीकारला याचे कारण बुद्ध हा पहिला धर्मसुधारक होता. बुद्ध हा पहिला संत होता. अन् नंतरच्या धर्मसुधारणांवर बुद्धक्रांतीची छाप पडलेली होती. बुद्धाने वेदप्रामाण्याचा त्याग केला होता. जडवादाला आणि विज्ञानाला समीप जाणारा तो धर्म होता. शिवाय सर्व जगभर प्रभाव गाजविणारा दुसरा कोणताच धर्म नव्हता. बुद्धधर्मात समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव आढळल्याने बाबासाहेबांनी तो धर्म स्वीकारला, असे लेखकाला वाटते. बुद्धाने भारत देशाला कल्पनावादी धर्माकडून वास्तववादी धर्माकडे नेले ही लेखकाच्या दृष्टीने महत्त्वाची घटना होती. सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचे सामर्थ्य फक्त या धर्मात असल्याने बाबासाहेबांनी बुद्धधर्म स्वीकारला असे लेखकाने म्हटलेले आहे. म्हणून रा. ना. चव्हाण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पंचविसावा बुद्ध असे संबोधितात आणि "गौतमबुद्धानंतर एवढा मोठा बुद्ध झाला नाही." असे गौरवोद्‌गार काढतात.

ब्राह्मणेतर चळवळीला वैचारिक खतपाणी देणारे, आपले पांडित्य, बुद्धिमत्ता बहुजनांच्या जागृतीसाठी खर्ची घालणारे, कृती आणि उक्ती यांचा बंडखोर आविष्कार करणारे थोर आणि व्यासंगी विद्वान म्हणजे राजारामशास्त्री भागवत होत! त्यांनी निर्भयपणे रोटी-बेटी व्यवहार व मांसाहाराचा पुरस्कार केला. त्यांनी कोल्हापूरातील वसतिगृहातल्या मराठ्यांच्या मुलांच्या मुंजी केल्या. मुंबईवरून कोल्हापूरला येऊन विद्यार्थ्यांना गायत्री मंत्र शिकविला. ते मराठ्यांच्या घरी उतरत. मराठ्यांकडेच जेवण घेत. म. फुल्यानंतर एवढा बंडखोर कृती करणारा दुसरा विचारवंत नसावा म्हणूनच शास्त्रींनी म. फुल्यांची सक्रीय तरफदारी केली. त्यांच्या लेखनामुळे सत्यशोधक समाजात नवे नवे उपक्रम सुरू झाले. ते स्वतः ब्राह्मण असले तरी बहुजन समाजाची उन्नती व्हावी यासाठी ते झटले. "आपण इंग्रजांशी जे मागतो, ते ब्राह्मणांनी बहुजनांना दिले पाहिजे." असे आग्रहपूर्वक सांगितले. पौराहित्य करण्याचा अधिकार मराठ्यांना आहे असे त्यांचे मत होते. दुसऱ्या बाजीरावाच्या वागण्यावर टीका करून ते पुढे म्हणतात, "पेशव्यांचा फुटकळ लढायांचे फार कौतुक करू नका." त्यांनी आपले लेखन परंपरेविरुद्ध केल्याने चिपळूणकर, लो. टिळक आणि शि. म. भोळे यांनी त्यांच्यावर प्रखर टीका केली. त्यांचा संस्कृतचा व्यासंगही दांडगा होता. फुले-आगरकर यांच्यापेक्षाही त्यांची लेखणी तिखट होती त्यामुळेच रा. ना. चव्हाण त्यांना "स्वतंत्र विचाराचा आगळा सुधारक" असे संबोधितात. बहुजनांच्या उन्नतीसाठी राबणारा "उपेक्षित विवेकवंत" म्हणून गौरव करतात.

'यशवंतरावांचे समाजकारण' या लेखामध्ये श्री. रा. ना. चव्हाण यांनी यशवंतरावांच्या सामाजिक कार्यातील केवळ चार-पाच बाबींवर प्रकाश टाकलेला आहे. 'राजकारण

म्हणजे निकोप समाजकारण' अशी एक व्याख्या महर्षी शिंदे यांनी केली होती. याचा साक्षात्कार शिवकाळात जसा आपणास झाला; तसा यशवंतरावांच्या कार्यकाळात होतो; असे श्री. रा. ना. चव्हाण यांना वाटते. निकोप समाजकारण न झाल्यामुळे सामाजिक दुरावे आणि विकृती वाढत जातात. त्यामुळे राजकारणाला खोट बसते. हा दुरावा आणि विकृती कमी करण्याचे काम यशवंतरावांनी केले असे लेखकाला वाटते.

श्री. रा. ना. चव्हाणांच्या मते यशवंतरावांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे बहुजनांच्या चळवळीला त्यांनी राष्ट्रीय स्वरूप आणले. त्यासाठी काँग्रेसपासून दूर गेलेले बहुजनांचे नेते त्यांनी स्वपक्षात आणले. त्यांच्या हातात सत्ता दिली. एवढेच नव्हे तर पंचायत राज्याची स्थापना करून बहुजनांच्या ताब्यात सत्ता दिली. त्यामुळे शेकडो ग्रामीण कार्यकर्ते तयार झाले. ते आपापल्या भागात झोकून काम करू लागले. या पाठीमागे यशवंतरावांची सत्तेचा लोकहितार्थ वापर करण्याची भूमिका होती. ते मूळातच जाती-पातीच्या पलिकडे गेलेले असल्याने बहुजन म्हणजे खेड्यापाड्यातील सारा समाज या धारणेनेच त्यांनी समाजकारणाला राजकारणाची जोड दिली.

त्यांनी केलेली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणावर दिलेला भरः सत्तेवर आल्यानंतर यशवंतरावांनी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या ग्रामीण मुलांना फी माफी दिली. त्यामुळे ग्रामीण भागातील मुले शिकु लागली. खेड्यातील पोरांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. प्राथमिक व माध्यमिक शाळा काढण्यास उत्तेजन दिले. कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली. शिक्षणाचा सर्वदूर प्रसार आणि सत्तेचे विकेंद्रिकरण यामुळे ग्रामीण भागातील अनेकांना आत्मविश्वास आला. त्याच्या कर्तृत्वाला क्षेत्र प्राप्त झाले, यशवंतरावांनी या तरुणांना विकास कार्यास जुंपले. याशिवाय त्यांनी महारवतनाचा कायदा पास करून घेतला. नवबौद्धांना सवलती दिल्या. जातीय तेढ कमी करण्याचा प्रयत्न केला. तर्कतीर्थांच्या सहवासामुळे ते मानवतावादाचे पुरस्कर्ते झाले. त्यांच्या या व्यापक सामाजिक दृष्टीमुळे श्री. रा. ना. चव्हाण यशवंतरावांना "निधर्मी लोकशाहीचे प्रवक्ते आणि पुढारी" अशा शब्दांनी गौरवितात.

श्री. रा. ना. चव्हाण यांनी जिवाभावाचे मित्र असलेल्या आणि ज्यांच्या सहवास, संवाद आणि सहकार्यामुळे जीवन समृद्ध झाले, त्या तर्कतीर्थांचा परिचय थोडक्यात पण तितक्याच जिव्हाळ्याने करून दिलेला आहे. केवलानंद, स्वामी प्रज्ञानंद यांच्या विचारप्रवाहाला समृद्ध करणारे पुरोगामी विचाराचे व्यासंगी पंडित म्हणजे तर्कतीर्थ जोशी. स्वातंत्र्यलढ्यात सहभाग, पुरोगामी चळवळींना प्रोत्साहन, जुन्या धर्मग्रंथांचा नव्या दृष्टीने अभ्यास; मानवतावादी विचारांचे अभ्यासक आणि प्रचारक, अस्पृश्यता निवारणाचे मार्गदर्शक,

राजकारणाचे अभ्यासक अशा विविध नात्यांनी तर्कतीर्थांची महाराष्ट्राला ओळख आहे. त्यांचे म. गांधीशी चांगले संबंध होते. अस्पृश्यता मानू नये यासाठी तर्कतीर्थांनी म. गांधींना शास्त्रातील पुरावे दाखविले होते. महात्माजींच्या चिरंजीवांचा आंतरजातीय विवाह तर्कतीर्थांनी लावलेला होता. ते स्वतः वर्णश्रेष्ठतेचा अभिमान बाळगणारे नव्हते. त्यांच्या या पुरोगामी आचार-विचारामुळे वाईच्या सनातनी मंडळींनी शास्त्रीजींचा खूप छळही केला होता. त्यात अधिक भर पडली. गोळवलकरांच्या वर्गवादाचे त्यांनी खंडन केल्यावर त्यांनी रा. ना. चव्हाणांच्या आग्रहामुळे म. फुल्यांवर 'जोति-निबंध' ग्रंथ लिहिला. नव्या दृष्टीने धर्मग्रंथाची चिकित्सा करणारे अनेक लेख प्रसिद्ध केले. शेवटी श्री. रा. ना. चव्हाण असे म्हणतात, "एकांतिक भूमिका टाळणे व जनताभिमुख होणे हे त्यांच्या जीवनाचे मर्म आणि वर्म होते. सर्वधर्मसमभाव, परमतसहिष्णुता, सांप्रदायिकतेचा अभाव, समतोल बुद्धी, सर्वांगीण अभ्यास, पोथीप्रामाण्याचा अभाव आणि तात्त्विक दृष्टी इ. अनेक गुण त्यांच्या ठायी होते. थोडक्यात धर्मग्रंथांचा नव्या दृष्टीने अभ्यास करून त्याआधारे बहुजनांच्या उन्नतीसाठी पुरोगामी आचार-विचारांचा एकनिष्ठ उपासक म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होत."

## सामाजिक चळवळी आणि इतर लेखांतील विचारधन

माणूस नावाच्या प्राण्याने सर्जन, संरक्षण, सहजीवन, सहकार्य आणि मानसिक उन्नयन यासाठी 'समाज' नावाच्या मंदिराची निर्मिती केली. या समाजमंदिरातील ईश्वराची प्रतिमा म्हणजे माणूस. काळाची जसजशी गरज होती, त्या त्या प्रमाणे काही संस्था निर्माण केल्या. काही व्यवस्था निर्माण केल्या. त्यातून या मंदिराला आकार आला आणि बंदिस्तपणाही प्राप्त झाला. पण पाळण्यात खेळणाऱ्या बाळाचे कपडे बारा वर्षांनंतर त्याला घालता येत नाहीत; तशी अवस्था या संस्थांची झाली. काही पूर्णपणे निरूपयोगी झाल्या. काही लक्तरे झालेल वस्त्राप्रमाणे आतल्या माणूस नावाच्या मूर्तीला घट्ट बिलगल्या गेल्या. तात्पुरता उपाय म्हणून नको त्या गोष्टींची बंधने घातली. काही स्वार्थापोटीही घातली. सत्तर वर्षांचा म्हातारा 'तरुण' आधीच्या बायका जिवंत असताना नववे लग्न करतो; पण नऊ वर्षांच्या विधवा मुलीला दुसरा विवाह करता येत नव्हता; हे त्यातले एक उदाहरण होय. त्यामुळे या समाजमंदिराच्या साऱ्या संस्थांना आपोआपच काजळी चढली आणि हे समाजमंदिर त्या काजळीने आणि आतल्या गच्च अंधाराने पार माखून गेले. त्यामुळे त्या मंदिरातील माणूस नावाची प्रतिमा पार लोप पावली. ती दिसेनाशी झाली. माणूस नावाची मूर्तीच दिसत नाही म्हटल्यावर अंधाराने माखलेल्या या जीर्ण मंदिराचीच उपासना सुरू झाली. काहींनी थोडीशी डागडुजीही केली; पण तळाला भोके पडलेल्या मडक्यांच्या राशी रचून मंदिराची शोभा वाढत नसते. न पेटणाऱ्या वातीने मंदिर

व माणूस उजळून निघत नसतो. पदोपदी ठेचा लागणाऱ्या दगडगोट्यांच्या राशीने मंदिराला वैभव प्राप्त होत नसते. रूढी, परंपरा, व्यवस्था, संकेत, धर्माचरण आणि सकाम उपासना या फुटलेल्या मडक्यांसारख्या व निरूपयोगी दगडगोट्यासारख्या असतात. त्यांचा निपटारा केल्याशिवाय समाजमंदिर स्वच्छ आणि शुद्ध होत नाही आणि आतली मूर्ती सतेज व सजीव होत नाही. म्हणून नवा विचार, नवा आचार, नवी व्यवस्था, नवे मापदंड, नवा मंत्र आणि नवी उपासना यांची गरज असते. माणूस नावाच्या मूर्तीला आणि समाज नावाच्या मंदिराला त्याशिवाय पावित्र्य लाभत नाही. प्रवाहित्व येत नाही. शिवछत्रपतींपासून ते फुले-शिंदे-आंबेडकर, जोशी यांच्यापर्यंतच्या साऱ्या समाजसेवकांनी हे समाजमंदिर पवित्र करण्याचा प्रयत्न केला. त्यातली कोळिष्टके काढण्याचा प्रयत्न केला आणि समाजमंदिरासाठी माणूस नाही तर, माणसासाठी मंदिर आहे याची जाणीव करून दिली. त्यासाठी काहींनी शस्त्र हाती घेतले. काहींनी शास्त्र हाती घेतले. काहींनी लेखणीचा शस्त्रासारखा वापर केला आणि काहींनी नव्या संस्थेच्या-नव्या चळवळीच्या माध्यमातून या मंदिराला पावित्र्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांनी या समाजमंदिरावर घणाघाती घाव घातले खरे; पण ते पूर्ण जमीनदोस्त करावे, हा त्यामागील हेतू नव्हता. या साऱ्या थोर पुरुषांनी स्वतःचे वैयक्तिक जीवन समाजजीवनात मिसळून टाकले. वैयक्तिक संसार समाजसंसारात वितळवून टाकला आणि वैयक्तिक सुखाला सामाजिक सुखशांतीच्या ओंजळीत टाकले. म्हणून यातली प्रत्येक विभुती म्हणजे समाजजीवनाला अष्टदिशांनी उजळवून टाकणाऱ्या अक्षय तेजाच्या दीपज्योतीच वाटतात. त्यांच्या विचारांचे विस्मरण म्हणजे गुलामगिरीला पुन्हा दिलेले आमंत्रण ठरेल असे वाटते.

या पार्श्वभूमीवर आपण सामाजिक चळवळीचा थोडक्यात परिचय करून घेणार आहोत. सत्यशोधक चळवळ आणि ब्राह्मणेतर चळवळ म्हणजे एकाच झाडाच्या दोन फांद्या होत. उत्तर पेशवाईमध्ये व नंतरच्या काळात सर्व प्रकारच्या विषमतेने कळस गाठला होता. दुष्काळ, रोगराई, कर्जबाजारीपणा आणि शोषण यांचा अतिरेक झालेला होताच; पण त्याचबरोबर ब्राह्मण पुरोहितांनी या रयतेला सर्व बाजूंनी लुबाडले. याचा जेव्हा अतिरेक झाला तेव्हा बंड आणि उठाव यास जोतीबांचे नेतृत्त्व लाभले आणि साऱ्या शोषणाला पायबंद घालण्यासाठी सन १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. धार्मिक जुलुमाला विरोध करीत असतानाच म. फुल्यांनी या चळवळीला घटनात्मक रूपदिले. चळवळीची उद्दिष्टे विस्तारली. काही कृतीशील उपक्रम राबविले. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव याबरोबर मूर्तिपूजेला नकार, पशुहत्त्येला नकार, स्त्रीबंधनास नकार, अवतारवादाला नकार, विभूतीपूजेला नकार, पुरोहिततास नकार, भेदभावाला नकार, व्यसनाला नकार आणि जातीभेदाला नकार यासारखे ३३ नियम करून आणि शेतकरी,

कामगार, उपेक्षितांना केंद्रस्थानी ठेवून या चळवळीने अवघा महाराष्ट्र दणाणून सोडला. याच्या जोडीला मानवतावाद आणि विज्ञाननिष्ठा या महत्त्वाच्या बाबींना चळवळीने महत्त्वाचे स्थान दिले. दुसऱ्या शब्दांत माणसाने माणसाशी माणूसकीने वागावे, माणसाने माणसाला जोडून घ्यावे आणि माणसाने माणसातले 'माणूसपण' जपावे यावर या चळवळीचा भर होता आणि या साऱ्यासाठी शिक्षणावर भर दिला. शिक्षणाला-अगदी स्त्री आणि अस्पृश्यांच्या शिक्षणाला अग्रक्रम दिला. त्यामुळे प्रारंभी या चळवळीला सामाजिक आणि धार्मिक समतेसाठी जन्माला आलेली शूद्रातिशूद्रांची चळवळ असे स्वरूप प्राप्त झाले. प्रारंभी या चळवळीने पुरोहिताकडील धार्मिक स्वातंत्र्याचे अधिकार मिळविले. जोशी-पुरोहिताना दक्षिणा घेण्याचा हक्क झुगारला. त्यासाठी कायदेशीर लढा दिला.

पुढे १९१५ नंतर या चळवळीला 'ब्राह्मणेतर' ही संज्ञा प्राप्त झाली व शाहू महाराजांवरील वेदोक्त प्रकरणापासून या चळवळीला अधिक वेग आला. शिवाय वेगळी दिशा मिळत गेली. १९२० नंतर या चळवळीला राजकीय स्वरूप प्राप्त झाले आणि ही चळवळ राखीव जागा मिळवून निवडणुकीच्या रिंगणात उतरली. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रशासनात प्रतिनिधीत्व मिळविले. लोकल बोर्डासारख्या संस्था या पक्षाच्या ताब्यात गेल्या आणि बघता बघता हा पक्ष मध्यप्रदेश, नागपूर, विदर्भ, कर्नाटक राज्यात विस्तारला. राजर्षी शाहूंच्या पश्चात जेधे जवळकरांनी या पक्षाचे नेतृत्त्व केले. तिला क्रिया-प्रतिक्रियाचे स्वरूप येत गेले. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद धुमसत राहिला. पुढे म. गांधींच्या राजकारणावेळी ब्राह्मणेतर पक्षाने ठराव करून स्वराज्यविषयक चळवळीत उडी घेतली. त्यामुळे सारा बहुजन समाज काँग्रेस पक्षात आला अन् त्यामुळे १९३५ नंतर ब्राह्मणेतर ही संज्ञाही लोप पावली. थोडक्यात, धार्मिकतेच्या बंडातून सामाजिक प्रबोधनाकडे आणि सामाजिक चळवळीकडून राजकारणाकडे सत्यशोधक समाजाचा झालेला प्रवास म्हणजे या दोन चळवळी होत.

श्री. रा. ना. चव्हाण यांनी आजच्या एकविसाव्या शतकालाही मार्गदर्शक ठरतील असे सर्वस्पर्शी विचार "भारतातील धर्म आणि राजकारण" या लेखामध्ये व्यक्त केलेले आहेत. त्यांच्या मते प्राचीन काळापासून आपला भारत देश अध्यात्म आणि धर्मप्रधान देश म्हणून प्रसिद्ध असला; तरी पुढे अनेक पंथ निघाल्यामुळे धर्मभेदही वाढत गेले. त्यातच पुन्हा जातीभेदांची भर पडली. लेखकाच्या मते परस्परानी एकजीव व्हायला हवे; पण तसे न झाल्याने अल्पसंख्यांकाचे राजकारण जन्माला आले. वास्तविक पाहता धर्म आणि राजकारण वेगळे राहावयास हवे असेल तर जाती-धर्मावर अधिष्ठित असणाऱ्या पक्षावर बंदी घातली पाहिजे. तरच भारत एकदिलाने उभा राहिल. सर्व हिंदूंनी भारतात राहणाऱ्या सर्वांना आपला देशबांधव म्हणून पाहिले पाहिजे. त्यासाठी समान धर्माची

आवश्यकता आहे. पण आपल्या देशात समान धर्म अस्तित्वात नसल्याने समान कायदे करता येत नाहीत. त्यातून घातक समजुती निर्माण होतात. सारांशरूपाने शेवटी रा. ना. लिहितात, "भारताच्या विकासाच्या आड कोणताच धर्म येता कामा नये. धर्म म्हणजे उपासना व ईश्वराकडे जाण्याचा मार्ग असा अर्थ घेतला तर घटनेने ते स्वातंत्र्य दिलेले आहेच. दोन्ही धर्मांत सहकार्य वाढले पाहिजे. त्यासाठी धर्म हा बुद्धिवादावर, सत्यासत्य विवेकावर अधिष्ठित होणे आवश्यक आहे." थोडक्यात, धर्माधिष्ठित राजकारण हे देशाला घातक ठरणार आहे, असा इशारा रा. ना. चव्हाण यांनी दिलेला आहे.

आज समाजाच्या विविध अंगांनी बऱ्यापैकी प्रगती झालेली असली तरी आजही प्रबोधनाचे कार्य संपलेले नाही. आज अनेक नवे प्रश्न निर्माण झालेले आहेत आणि तरीही शहरी व ग्रामीण भागात कसलेच प्रबोधन दिसत नाही. त्यामुळे देश पुन्हा मध्ययुगाकडे चालला आहे असे वाटते. राष्ट्रीय एकात्मता, सीमासंरक्षण, स्त्रीहक्क, आर्थिक शोषण, चंगळवाद, समान नागरी कायदा, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा यासाठी समाजप्रबोधन होत नाही. प्रत्येक प्रश्नात राजकारण घुसले आहे. केलेले कायदे कागदावर राहतात.

सत्तेसाठी राजकारण आणि निवडणुका झाल्याने राजकारणी मंडळीने समाजप्रबोधनाकडे पार दुर्लक्ष केले आहे. पूर्वीच्या काळी राजकारण आणि समाजकारण हातात हात घालून जायचे. आता लोकशाही नसून निवडणुकशाही उरलेली आहे. त्यामुळे आपणाला सध्या राजकीय स्वातंत्र्य मिळाले; पण सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळाले नाही. त्यातही पुन्हा मतदान करताना हे स्वातंत्र्य संकोचून जाते. प्रबोधनासाठी आवश्यक असणारा शिक्षणप्रसार झाला खरा, ही पिढी केवळ साक्षर झाली, सुशिक्षित नाही. वृत्तपत्रे समाजप्रबोधन करू शकतात; पण त्यांचाही राजकारणावर भर असतो. लोककल्याणकारी योजनांसाठी स्वतंत्र खाते असले तरी त्या तळागाळापर्यंत पोचत नाहीत. या प्रबोधनाच्या उपेक्षेला समाजही तितकाच जबाबदार आहे. कारण बुध्दीवाद, विज्ञानदृष्टी, विवेकनिष्ठा आमच्या शिक्षणक्रमात कमी आहे. म्हणून 'समाज प्रबोधनाचा झालेला संकोच' या लेखात श्री. रा. ना. चव्हाण म्हणतात, "देशाला बलवान करणारे दर्जेदार व सर्वस्पर्शी प्रबोधन होणे अतिशय आवश्यक आहे."

### धार्मिक आध्यत्मिक लेखांची मीमांसा

श्री. रा. ना. चव्हाण यांच्या लेखांचा हा चौथा आणि शेवटचा विभागः ज्या विचारांनी त्यांच्या जीवनाची शेवटपर्यंत साथ आणि सोबत केली; ज्या विचारांमुळे त्यांच्या व्यक्तित्त्वाची जडणघडण झाली; ज्या विषयांच्या प्रसारासाठी त्यांनी व्रतस्थपणे कार्य केले. मानवी जीवनाच्या उन्नयनासाठी ज्या विचार आणि तत्त्वाचे अधिष्ठान हवे असे त्यांना वाटते,

त्या धार्मिक व आध्यात्मिक लेखांचा अतिशय सुबोध व सुलभ पद्धतीने त्यांनी या गटात परिचय करून दिला आहे. या परिचयातून धर्मविषयक मते, ईश्वराविषयीची मते, उपासनापद्धतीचे गुणदोष, मूर्तिपूजेच्या मर्यादा यांचे त्यांनी थोडक्यात विवेचन केलेले आहे. प्रार्थनासमाज आणि ब्राह्मोसमाज यांच्या योगदानानिमित्ताने त्यांनी जे काही लेखन केलेले आहे; जे काही विचार मांडलेले आहेत तेच त्यांचे धार्मिक व आध्यात्मिक चिंतन वाटते.

आपले धर्मविषयक चिंतन व्यक्त करताना श्री. रा. ना. चव्हाण म्हणतात की, "शहरातील लोकांना खऱ्या धर्माची जाणीव नसते आणि खेड्यातील लोक भोळ्या समजुतींना धर्म समजतात. अंधश्रद्धा त्यांच्या मानगुटीवर बसलेली असते. त्यामुळे खऱ्या धर्मापासून ते फार दूर गेलेले असतात." मग खर धर्म म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर देताना श्री. रा. ना. चव्हाण म्हणतात, "सारासार विवेक म्हणजे धर्म-धर्म ही श्रद्धेची बाब असली तरी त्याला विवेकाचे वावडे नाही. दया म्हणजे खरा धर्म. भक्ती हे धर्मसाधन. निर्लोभ ही धर्माची खरी कसोटी. संसार हा धर्माचे किंवा परमार्थ साधनेचे प्रमुख अंग आहे. संसाराच्या सोपानावरूनच परमार्थाचे शिखर गाठता येते असा संतांचा उपदेश आहे."

"धर्मनिष्ठ म्हणविले जाणारे पुष्कळ लोक खऱ्या अर्थाने धार्मिक नसतातच" असे रा. ना. चव्हाणांना वाटते. "अशी धर्मनिष्ठ म्हणविली जाणारी माणसे दुसऱ्याचा जीव जाणत नाहीत. तीर्थाच्या ठायी जातिभेद मानतात. देवाच्या-धर्माच्या नवाने पशुहत्त्या करतात व स्वतः मांसाहार करतात. त्यांना खरा धर्म समजलेला नसतो. सूक्ष्म आत्मपरीक्षणाशिवाय परमेश्वराची प्रचिती येत नसते. आळशीपणाने केलेले नामस्मरण म्हणजेही अधर्मच होय."

लेखकाच्या मते धर्माच्या योगे वैचारिक अंधत्व दूर होते आणि विचारचक्षू जागा होतो. सारासार विवेक करण्याची शक्ती लाभते. आजची लोकशाही यशस्वी होण्यासाठी श्रेष्ठ धर्माची मदत होत असते. नैतिक आचरणास मदत करणारा, कर्तव्याची प्रेरणा देणारा, माणुसकीचे हक्क सांगणारा धर्म कुठल्याही दैनंदिन व्यवहारात मदतच करीत असतो. म्हणून धर्म हा सार्वजनिक व राष्ट्रीय जीवनाचा पाया झाला पाहिजे असे श्री. रा. ना. यांना वाटते.

ईश्वराचे स्वरूप आणि त्याविषयीची मते यांचाही त्यांनी विस्तृत परिचय करून दिला आहे. परमेश्वराचे स्वरूप हे प्रेमळ, उपकारी, जीवनदान देणारे आणि योगक्षेम चालविणारे असे असते. त्याचे हे प्रेमस्वरूप सर्वांना ओळखता येत नाही. तो माणसाच्या भल्यासाठीच सारे काही करतो. त्याच्या नावावर बुवाबाजी चालते हा काही ईश्वराचा दोष नाही. तो निराकार आहे याबद्दल वादच नाही. पण अनेकदा आपण दुष्काळ,

उपासमार, रोगराई प्रत्यक्षात पाहतो अन् तो कृपाळू नाही असे वाटते; ते पण चुकीचे आहे असे रा. ना. यांना वाटते. पण दुःखाबरोबर सुखही असते, हे आपण विसरता कामा नये. तो अंतःकरणाने जाणावा लागतो. अंतःचक्षुनी पाहावा लागतो. तसे झाल्यास त्याचा साक्षात्कार वेगवेगळ्या मार्गाने होऊ शकतो. सुखदुःख समान मानणे ही त्याच्या साक्षात्काराचीच प्रचीती आहे. रा. ना. चव्हाण यांच्या मते तिसऱ्या प्रकारे परमेश्वर पाहावयाचा झाल्यास तो विश्वरूप दर्शनाने दिसू शकतो. भौतिक जगाकडे विधायक दृष्टीने पाहून त्यातील चांगला गुण घेणे ही देखील परमेश्वराचीच भेट आहे. स्वतःचे लघुत्व पटून परमेश्वराचे विशालत्व आपणास कळणे म्हणजे साक्षात्कार होय. कारण कोणालाही ईश्वराविषयीप्रमाण दाखवता येत नाही. कारण तो 'चैतन्यरूप' असतो. म्हणून तो सावयव रूप धारण करतो ही धारणा चुकीची आहे. म्हणून रा. ना. चव्हाण म्हणतात, "परमेश्वराला अनन्यभावाने शरण जाणे हेच योग्य होय."

अशा या परमेश्वराची उपासना कशी करायची याचेही मार्गदर्शन या लेखांमध्ये केलेले आहे. ते म्हणतात, "परमेश्वराला शुद्ध अंतःकरणाने शरण जाणे हीच श्रेष्ठ उपासना होय. स्वार्थापोटी अथवा पापाच्या भीतीने त्याची उपासना करणे ही खरी उपासना नव्हे. त्याच्या प्राप्तीसाठी शरीराला कष्ट देणे अयोग्य. प्रांपचिक सुखासाठी कुणी दानधर्म करत असेल तर; अथवा व्रतवैकल्ये करीत असेल तर ती परमेश्वराची सच्ची उपासना नव्हे किंवा देवाच्या नावावर प्रपंचाची अवहेलना करणे म्हणजे उपासना नव्हे. ही सारी साधने मानली पाहिजेत. भक्ती म्हणजे देखावा नव्हे, आत्म्याची उच्च स्थिती म्हणजे भक्ती. अशी भक्ती उपासकाला बळ देत असते. त्यासाठी कृतज्ञतापूर्वक केलेली प्रार्थना पुरेशी असते. मात्र प्रार्थना म्हणजे कवायत नव्हे. कंटाळवाणे चऱ्हाट नव्हे. कृतज्ञता हेच प्राथनेचे ध्येय असले पाहिजे. अशा प्रार्थनेच्या द्वारे आत्मपरीक्षण, सद्भावना, सद्विचार व सदिच्छा प्रकट करता येतात. त्याचा अहंकार गळून जातो." म्हणून मूर्तिपूजेपेक्षा प्रार्थना एवढी एकच गोष्ट उपासना म्हणून स्वीकारणे योग्य असा रा. ना. यांचा आग्रह आहे. त्यांचे हे सारे विचार पाहिल्यानंतर ब्राह्मोसमाज आणि प्रार्थनासमाज यांचे तत्त्वज्ञान व आचारविचार वेगळे आहेत, असे वाटत नाही. त्याचदृष्टीने त्यांनी या विषयाकडे पाहिले आहे.

**समारोप**

आतापर्यंत आपण श्री. रा. ना. चव्हाण यांच्या निवडक लेखांच्या आधारे त्यांच्या सखोल आणि सर्वांगीण विचारांचे दर्शन घेतले. हे दर्शन वाचकांच्या विचारांना खाद्य देणारे होते. वाचकांची दृष्टी निकोप आणि व्यापक करणारे होते. वाचकांना अनुभवसमृद्धी देणारे होते आणि भूतकालीन स्थितिगतीचे सम्यक दर्शन घडविणारे होते. तसेच त्यांच्या

ठायी असलेल्या काही असामान्य गुणांविषयी असणारा आदर द्विगुणीत करणारे होते. एखादी व्यक्ती तब्बल साठ वर्षे खंड न पडता निष्ठेने ज्ञानोपासनेचा यज्ञ सुरू ठेवते आणि त्यासाठी आपल्या आयुष्यातील सारे सुखोपभोग, साऱ्या इच्छा-आकांक्षा; सारी स्वप्ने आणि अभिलाषा यांचे समिधा म्हणून समर्पण करते; ही गोष्ट खरोखर अपवादात्मक म्हणावी लागेल. या समर्पित केलेल्या समिधांमुळे निर्माण झालेला प्रकाश सर्व प्रकारच्या विकृतीने निर्माण झालेल्या अंधाराने गिळून टाकलेल्या बहुजनांच्या ओंजळीत ठेवण्याचे पुण्यकर्म या ज्ञानोपासकाने केलेले आहे. साठ वर्षे हातात जपमाळ घेऊन नामस्मरण करणारी माणसे आपल्या पाहण्यात आहेत; साठ वर्षे हातात छडी घेऊन ऊठ-सूठ लोकांना झोडपणारी माणसेही भरपूर पाहावयास मिळतात; हातात ग्लास घेऊन साठ वर्षे निष्ठेने 'तीर्थप्राशन' करणारे बहाद्दर तर खूपच पाहावयास मिळतात. पण हातात लेखणी घेऊन साठ वर्षे लक्ष्मीकडे पाठ फिरवून विद्येची उपासना करणारे फार कमी पाहावयास मिळतात. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत ज्ञानोपासनेला वाहून घेणारे थोर विचारवंत आणि लेखक आपणास थोडेफार दिसतील; पण आजच्या काळात मात्र अशा ज्ञानोपासनेला वेड्यात काढणारेच खूप निघतील आणि हे सारे कशासाठी होते? नोकरीत बढती मिळण्यासाठी नव्हते. पगारवाढीसाठी नव्हते किंवा आणखी कुठला तर मान-सन्मान मिळविण्यासाठी नव्हते. श्री. रा. ना. चव्हाण यांचे सारे लेखन बहुजन समाजाच्या उन्नयनासाठी होते. 'बहुजन सुखाय बहुजन हिताय' यासाठी होते. त्यांनी आयुष्यभर परिवर्तनाचा ध्यास घेतला आणि परिवर्तनाच्या चळवळीतील सारे महापुरुष त्यांच्या चिंतनाचा विषय झाले. लेखनाचाही विषय झाले. परिवर्तनवादी परंपरेचा इतका सूक्ष्म आणि तौलनिक अभ्यास अलिकडच्या काळात फारसा पाहावयास मिळत नाही.

श्री. रा. ना. चव्हाणांच्या बाबतीत जाणवणारी आणखी एक गोष्ट अशी की, त्यांच्या चिंतनाचा आणि लेखनाचा पैस खूप मोठा होता. गौतमबुद्ध ते यशवंतराव चव्हाण एवढा मोठा तो होता. त्यामध्ये परंपरेला उचलून धरणारे होते आणि परंपरेला विरोध करणारेही होते. वेदांना प्रमाण मानणारे होते आणि वेदांवर प्रहार करणारेही होते. त्यात धर्माचे भांडवल करणारे होते आणि धर्माचा प्राणभूत घटक दाखवून देणारेही होते. त्यामुळेच त्यांच्या विषयी अनेकांनी गौरवोद्‌गार काढताना 'एकोणिसाव्या शतकाचे भाष्यकार' असे म्हटलेले आहे. तर काहींनी एक 'निष्ठावंत सत्यशोधक' असे म्हटलेले आहे. तर अणखी काही विचारवंतांनी 'सामाजिक चळवळीचे बखरकार' अशा शब्दांत त्यांचा गौरव केलेला आहे. हे सारे करीत असताना समाजजीवनाला आधारभूत असलेल्या बऱ्याच ज्ञानशाखांचा अभ्यास हा त्यांच्या लेखनाचा आणखी एक विशेष म्हणून सांगता येईल. धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजकारण, राजकारण, नानाविध

प्रकारच्या चळवळी अशा ज्ञानशाखांत त्यांचा चांगला संचार होता. या बहुआयामी व्यासंगामुळेच आंतरविद्याशाखीय संशोधनाचा नमुना म्हणून त्यांच्या लेखनाकडे पाहता येते. ही अशी तौलनिक चिकित्सा मराठीत फारशी झाली नसावी, असे वाटते.

सत्तेच्या सिंहासनावर बसलेला नेता; धर्मपीठावर बसलेला एखादा धर्मगुरू आणि विचारपीठावर बसलेला विचारवंत यांनी आपल्या मनाची कवाडे नेहमी उघडी ठेवावयाची असतात. त्याशिवाय साऱ्या माणसांचा वावर मुक्तपणे होत नसतो. साऱ्या मतांचा संचार मुक्तपणे होत नाही. हार आणि प्रहार, स्वीकार आणि धिक्कार, स्तुती आणि निंदा या गोष्टी तेवढ्याच आस्थेने स्वीकारावयाच्या असतात. त्याशिवाय वृत्तीमध्ये समधातता येत नसते. लेखनामध्ये समतोल येत नसतो आणि दृष्टीला व्यापकत्व प्राप्त होत नसते. एक विचारवंत म्हणून श्री. रा. ना. चव्हाण यांचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी ही समधातता, समतोलपणा आणि परटीकेतील सत्यता मनापासून स्वीकारली आहे. याचे कारण या मन मोकळे ठेवणाऱ्या भूमिकेत आहे. त्यामुळे त्याचे सारे लेखन अतिशय संयमी, समतोल भूमिकेतून व समन्वयवादी भावनेने झालेले आहे. विरोधकाच्या मतामध्येही सत्य असू शकते यावर त्यांची दृढ श्रद्धा आढळते ते यामुळेच. सकारात्मक विचार करणारे समाजचिंतक असे त्यांना म्हटले जाते त्याचे हे कारण आहे.

समारोप करताना मी असे म्हणेन की, विज्ञान आणि अध्यात्म यांच्या पायावर सामाजिक प्रश्नांचे प्रबोधन करणारे, ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग यांचा एकात्म साक्षात्कार घडविणारे, पैसा, प्रतिष्ठा, पद, पुरस्कार आणि प्रसिद्धी यांची जराही अपेक्षा न बाळगणारे; प्रांजळ आणि प्रामाणिक सत्यसाधकाची भूमिका ढळू न देणारे आणि दारिद्र्य, दु:ख, उपेक्षा लेखनाच्या आड येत नाही, याचा आदर्श समोर ठेवणारे, शांत मितभाषी, नम्र, सौजन्यशील व निगर्वी रा. नां. चे हे लेखन महाराष्ट्राचा आणि मराठी वैचारीक साहित्यातील अमोल ठेवा आहे, यात शंका नाही.

त्यांच्या साऱ्या कुटुंबियांनी स्वखर्चाने सुमारे तीस ग्रंथ प्रसिद्ध करून पितृऋण फेडले नि मराठी वाचकांना ऋणी बनविले. त्याबद्दल त्यांना द्यावे तितके धन्यवाद कमीच आहेत.

**डॉ. द. ता. भोसले (पंढरपूर)**
मो. ९४२२६४६८५५

# १ छ. शिवाजी व म. जोतीबा फुले

छत्रपती शिवाजी महाराज, संतश्रेष्ठ तुकाराम, समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले व पददलितांचे क्रांतिकारक नेते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पुरुषोत्तम धर्म पुरुष म्हणजेच धर्म- समाजसुधारकच होते. ब्राह्मण धर्ममार्तंडांचा मुलाहिजा छत्रपतींनी राखला नाही. धार्मिकांची सत्ता नाहीशी केल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य येत नाही. धार्मिक सत्ता जगात सर्वत्रच स्वातंत्र्याच्या मार्गात आडवी येत होती व आजही येत आहे. या धार्मिक गुलामगिरीचे निर्मूलन करणे हेच वरील महापुरुषांचे जन्मकार्य होते.

१९९०-९१ साली अनुक्रमे म. फुले व डॉ. आंबेडकर यांच्या शताब्द्या चालू राहणार आहेत. अशा प्रसंगाच्या वेळी, त्यांच्या विचारांची व कृतीची चिकित्सा होणे जरुरीचे आहे. तत्कालीन दृष्टीतून शिवाजी महाराजदेखील सत्यशोधक होते. जो सत्य शोधतो तो सत्यशोधक व जो संशोधन करतो तो संशोधक होतो. व्याख्या उघड आहेत. ह्या विषयासंबंधी आज मोठे आकर्षण आढळते.

सत्य असत्याशी । मन केले ग्वाही ।। मानियेले नाहीं । बहुमता ।।

तुकाराम असा जो बाणा कृतीने व्यक्त करतात ते सत्यशोधक होत. प्रवाहाबरोबर जे सामान्यपणे वाहून जात असतात ते सत्यशोधक म्हटले जात नाहीत. लोकसमाजात जे बहुमत असते त्याप्रमाणे चालणे हा सर्वसामान्यांचा धोपट मार्ग असतो. सत्यशोधक या मार्गाने गतानुगतिक होऊन वाहून मुळीच जात नाहीत. त्यांचा मार्ग आगळावेगळा असतो. ह्या लेखात सत्यशोधक समाज या परिभाषेचा अर्थ सत्यशोधक चळवळ (सत्यशोधक) असाही घेतला आहे.

**।। सत्यशोधक शिवाजी ।।**

आधुनिक इतिहासात शिवाजी हे फार मोठे सत्यशोधक ठरतात. मालोजी, शहाजी यांच्या काळात मुस्लीम अनुनय चालवण्याची जी प्रथा होती, रूढी होती, ती मोडून राजकीय स्वातंत्र्याचा पाया शिवाजीने घातला. वाडवडलांची चाल शिवाजीने तपासली व चालत आलेल्या मार्गाने म्हणजे एकपरी परंपरेच्या अंधश्रद्धेने शिवाजी गेले नाहीत. त्यांनी स्वबुद्धीचा वापर केला व नवे स्वराज्य संपादन केले ही क्रांती होती. कोणताही नवा मार्ग प्रस्थापक हा सत्यशोधक असू शकतो. प्रथम तो सत्याचा वेध घेतो. मग त्या नव्या सत्यमार्गाने तो जातो आणि लोकांनाही त्याला अनुसरावे लागते. शिवाजी महाराजांना ‘सत्यशोधक शिवाजी’

म्हटल्यानंतर सांप्रदायिकांना आश्चर्य वाटेल. शिवाजी हे सत्यशोधक होते. म्हणजे १८७३ साली स्थापन झालेल्या सत्यशोधक मंडळाचे ते सभासद होते, असे येथे म्हणावयाचे नाही.

जोतीराव आणि त्यांच्या नंतर १९३५ पर्यंत महाराष्ट्रात जी ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळ होऊन गेली, तिची बीजे त्यांच्यात सर्वथा होती असे संपूर्णतः खरे नव्हे. काळ-वेळ यादृष्टीने शिवाजी, जोतीराव आणि भीमराव विभिन्न काळात होऊन गेले. साम्यापेक्षा ह्या एकमेकांत अंतर, तफावत व फरक फार आढळतो. तरी जनतेला स्वातंत्र्य मिळवून देणे व गुलामगिरीची जाणीव करून देणे, रयत गुलामगिरीतून सुटेल असा काळ आणून देणे ही मूलभूत कार्ये शिवाजी, जोतीराव आणि भीमराव यांनी केली. मात्र फुले-आंबेडकरांनी ज्या स्वातंत्र्याचा पुरस्कार व प्रसार केला ते सामाजिक स्वातंत्र्य होते. सर्वांगीणपणे स्वातंत्र्याचा अर्थ करावयाचा झाल्यास त्यात सामाजिक स्वातंत्र्याचा देखील समावेश होतो. **राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होणे म्हणजे सर्वांगीणपणे स्वातंत्र्य सिध्द होणे होय.** कार्ल मार्क्स हा आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता झाला. एकेका स्वातंत्र्यासाठी थोर पुरुषांना संघर्ष करावा लागतो. बुध्द, तुकाराम, जोतीराव व भीमराव यांनी मुख्यतः धार्मिक-सामाजिक स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला, लढा दिला. सत्यशोधक व प्रार्थना-समाजाच्या पुढील प्रवक्त्यांनी तुकारामाच्या वाणीचा आश्रय मतप्रसारार्थ घेतला कारण तुकाराम सत्यशोधक होता. 'तुका म्हणे' व 'जोती म्हणे' यात खूप फरक आहे हे खरे, प्रसाद, प्रसन्नता व आनंद तुकारामात फार आहे, तरी **ब्रम्ह जाणे तोचि ब्राह्मण। इतराशी माझे नाही नमन ।।** ही व आणखी पुष्कळ बंडखोरी जोतीबासारखी तुकारामात आहे. अंधश्रध्दा दूर करण्याच्या कार्यात तुकाराम फार उपयोगी झाला व होऊ शकतो. सत्यशोधनाचे म्हणजे स्वतंत्रतेच्या नवमार्गाचे क्षेत्र वेगवेगळे असू शकते. तुकारामाने पारमार्थिक (मानसिक) स्वातंत्र्य, समता, समानता (बंधुभाव) यांचा प्रचार अगोदर केल्यामुळे धर्म व परमार्थ त्यांची जी भूक त्या काळात जनतेत होती, ती स्वावलंबनाने भागली गेली हा संतांचा पाया शिवाजीला उपयोगी पडला. शिवाजी, तुकाराम, जोतीराव व भीमराव हे पुरुषोत्तम सर्वजण धर्मपुरुष होते म्हणजे धर्म, समाज सुधारक होते. ब्राह्मण धर्ममार्तंडांचा मुलाहिजा शिवाजीने राखला नाही. धार्मिकांची धर्मसत्ता सर्व जगतात स्वातंत्र्याच्या मार्गात आडवी येत गेली व अजूनही आडवी येत असते. गुलामगिरीचे निर्मूलन करणे हे वरील पुरुषांचे जन्मकार्य होते धर्मसत्ता दूर केल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य सिध्द होत नाही. सर्व धर्मात धर्ममार्तंडांची सत्ता असे व अद्यापही आहे.

स्वातंत्र्य हे मूलतः बुद्धीचे स्वातंत्र्यही असू शकते. बुद्धिप्रामाण्य म्हणजे बुद्धीचे स्वातंत्र्य होय. हे स्वातंत्र्य मिळविल्याखेरीज कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य येऊ शकत नाही. गुलामगिरीतून (मग ती गुलामगिरी कोणत्याही क्षेत्रातील असो) सुटका करून घेण्यापूर्वी बुद्धी स्वातंत्र्याचा पुरस्कार करावा लागतो. विवेक हा महत्त्वाचा आहे. सारासार विचार करणे, सत्यासत्य शोधणे म्हणजे सत्यशोधक होणे होय. येथे सत्यशोधक व सत्यशोधन यांना स्थळकाळाच्या मर्यादा घातल्या नाहीत. धर्माधर्म शोधल्याशिवाय सत्य सापडत नाही. कार्ल मार्क्सने प्रथम यासाठी धर्मचिकित्सा केली. कोणत्याही सत्यशोधकाने वाचक विद्यार्थी राहिले पाहिजे. जोतीराव, भीमराव यांचे वाचन दांडगे होते. दोघांकडेही गृह-ग्रंथालये होती. ग्रंथात खरे काय व खोटे काय याचा शोध घेण्यासाठी होम् लायब्ररीज जास्त उपयोगी पडतात. मरेपर्यंत जोतीराव व भीमराव वाचत होते व नंतर लिहित होते. 'सार्वजनिक सत्यधर्म' (फुले कृत) व 'बुद्ध व त्यांचा धम्म' हे जोतीरावांचे व भीमरावांचे अंतिम विचार होते, शेवटी त्यांना दोघांना मृत्यूने गाठले म्हणून त्यांचा नाईलाज झाला, नाहीतर त्यांचे सत्यशोधन पुढेही चालू राहिले असते. वरील सर्व सत्यशोधक हे सर्वसामान्य जनतेचे सत्यशोधक व कैवारी होते. हे सर्वजण धर्मसंस्थापक झाले. धर्मसंस्थापना ही अधर्म, अन्याय, गुलामगिरी नष्ट करण्यासाठी करावी लागते. येथे धर्मसंस्थापना म्हणजे अन्याय व असत्य (अधर्म) यांचे निवारण होय. विषमतेविरुद्ध लढा द्यावा लागतो.

खरी नीती हाची मानवाचा धर्म । बाकीचे अधर्म जोती म्हणे ।।

बुद्ध, तुकाराम, शिवाजी, फुले, आंबेडकर हे नीतिप्रधान धर्माचे पुरस्कर्ते होते. ह्यापैकी प्रत्येकाच्या काळातील अन्यायाचे, गुलामगिरीचे स्वरूप वेगवेगळे होते. पुढे होणाऱ्या सत्यशोधकाचे सत्यशोधन वेगळे असू शकते. असे कालानुरूप सत्यशोधनाचे स्वरूप एकच राहत नाही. 'सत्यशोधन' हे वर्धमान व विकासक्षम असते. मागे घेतलेले सिद्धान्त नियम पुढे तपासावे लागतात. आणखी नव्या नव्या काळानुसार नवे सिद्धान्त नवे निश्चय (ठराव) करावे लागतात. सत्यशोधक परिषद हे कार्य करत आली; व पुढेही करील. बौद्ध परिषदा बुद्धानंतर वारंवार भरल्या व स्वतंत्र असा धर्मविचार बुद्धानंतर होत आला.

या परिषदा थांबल्यानंतर भारतात बुद्धधर्माचा विकास थांबला. तो खुंटला. धम्माचा धर्म (म्हणजे कर्मकांड) झाले व नागार्जुनाने 'हीनयान पंथ' प्रस्थापित केला, यामुळे बुद्धाच्या महायान मार्गाचे अवमूल्यन झाले. शेवटी बुद्धधर्म परंपरागत हिंदुधर्माने गिळून टाकला. नागार्जुन झाल्यामुळे आद्य शंकराचार्यांचे बुद्धधर्माला गिळंकृत करण्याचे काम सुकर व सोपे झाले. डॉ. आंबेडकरांनी मूळच्या शुद्ध बुद्धधर्माचे स्वरूप पुन्हा प्रगट केले. त्याला भीमयान

म्हणून मी म्हटले. आंबेडकरांचे कार्य अपुरे राहिले. जोतीरावांनाही आयुष्य कमी पडले. असे घडत असते. उदा. शिवाजी महाराजांना तर मागे थोडेच आयुष्य लाभले.

या जगात मनुष्य प्राण्याच्या संसारात अनेक सत्ता आहेत. संसारात स्त्रीवर (बायकोवर) पुरुषाची (नवऱ्याची) सत्ता, सूनेवर सासूची सत्ता. शेती प्रत्यक्ष कसणाऱ्या कुळावर जमीन मालकाची सत्ता. प्रजेवर सरंजामी राजे लोकांची, सम्राटांची सत्ता जहागीरदारावर व संस्थानिकांवर (सत्ता) होती. भारतात क्षत्रिय राजे राज्य करीत. त्यांच्या हातातील सत्तेला 'राजदंड' म्हणत. हा राजदंड घराणेशाहीच्या पद्धतीने वंशपरंपरेने चाले. राजदंड कोणाकडे असावा, साम्राज्य आपल्या हातात असावे, यासाठी राजे व सम्राट आपापसात लढत. मोठमोठी सैन्य बाळगत. पराभवाच्या कारणे करून मोठमोठी सैन्य लढाईत गारद होत. ही जी क्षत्रियांची राजेशाही पद्धतीची राज्ये होती त्या राज्यांच्या राजे लोकांवरदेखील धर्मसत्ता राज्य करी. म्हणजे धर्मसत्तेचा पगडा हा खुद्द राजसत्तेवर होता. धर्माला व धर्मगुरुला क्षत्रियापेक्षा मानठाण, पूज्यता, पावित्र्य फार मोठे समजले जाई. क्षत्रिय राजे धर्मसत्तेला म्हणजे ब्राह्मण सत्तेला शरण जात, त्यांच्या पाया पडत, ब्राह्मणांच्या पायाचेही तीर्थ घेत. ही चाल सत्यशोधक चळवळीमुळे खेड्यापाड्यांत मोडली होती. आता ब्राह्मण-भट पुरोहिताच्या पायाचे तीर्थ घेण्याची फार जुनी चाल पुनः चालू असलेली देखील सापडू शकते. प्रतिक्रांती ही क्रांतीला गिळून टाकते. प्रबोधनाला व परिवर्तनाला पुराणमतवाद गिळून टाकतो, हा इतिहासाचा अनुभव आहे. पुराणातील काल्पनिक कथांचा परिणाम सर्वत्र जास्त आढळतो. काल्पनिक कथा (मिथ् मिथ्या कथा) यांचा प्रभाव भारतावर मोठा आहे. दयानंद व विवेकानंद यांचा वेदांत प्रचार पुराणमतवादाने गिळून टाकला, तेथे बिचाऱ्या प्राकृत जोतीबांची काय पाड ? जगभर धार्मिकांची धर्मसत्ता राजांच्या सत्तेवर व नंतर लोकशाही राज्यसत्तेवर प्रभाव गाजवती झाली व थोडीफार गाजवते. युरोपात अजून पोपचे महत्त्व आहे. या लेखात युरोपमधील धर्मक्रांती व धर्मयुद्धे यांची तपासणी करण्यापेक्षा, आपल्या देशातील परिस्थिती, वास्तव तपासावयाचे आहे. उदा. राजाला (क्षत्रियाला) ब्राह्मण राजगुरु आशीर्वाद देई. ब्राह्मणवर्गाला (म्हणजे ब्राह्मणत्वाच्या गुणांना) इतरेजण (अब्राह्मण) सर्व शिरसावंद्य मानीत. प्रत्येक प्रांतात, भारतात ब्राह्मण संख्येने पहिल्यापासून थोडे होते व आहेत. तरी त्यांचे श्रेष्ठत्व व महत्त्व या लोकी व परलोकीदेखील अतिशय मानले जाई. जोपर्यंत समाजात खरे ब्राह्मण होते, असू शकत असतील तर त्यांचे महत्त्व जनतेच्या हिताच्या आड येत नाही, असाही अनुभव होता (व असू शकतो) दाक्षिण्य श्रद्धेने दिलेली दक्षिणा खरे ब्राह्मण खळखळ न करता स्वीकारतात, पण हा पुढे धंदा झाल्यावर हे श्रेष्ठत्व पतित झाले. दिलेल्या दक्षिणेवर पाणी सोडून यजमानाने तिच्यावर अधिकार (मालकी) पूर्णतः

सोडावयाची असते. काही थोडी संख्या असलेले साडेतीन टक्के ब्राह्मण (पुरोहित) अमाप बहुजनसमाजावर श्रद्धा व गुलामगिरी कशी गाजवू शकतील? ब्राह्मणांच्या हातात राजसत्ता व संपत्ती नसे. तुलनेने गरीब ब्राह्मण-भट यांची बहुजनांवर गुलामगिरी असणे शक्य नाही. असे बदलते मत तर्कतीर्थ जोशी यांनी लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या विवाद्य मुलाखतीत प्रगट केले आहे. ब्राह्मणांची गुलामगिरी इतरांवर नव्हती व असणे अशक्य आहे. ब्राह्मण तर निर्धन होते, अशी नवी वकिली जोशीबुवांनी प्रथम 'लोकसत्ते'त व नंतर 'नवभारत' वाई दि. मे-जून १९८८ मध्ये केली आहे.

जोतीरावांपुढे देखील जास्तीत जास्त लोकांवर वरील हे मूठभर लोक धर्मसत्ता कशी गाजवू शकतात व जास्तीत जास्त लोकसमाज ब्राह्मणसत्ता किंवा ब्रह्मसत्ता शिरसावंद्य का मानता झाला, किंवा यद्यपि ब्राह्मणांचे महत्त्व का टिकून असते, हा प्रश्न होता. गुलाम केलेले लोक स्वतःच गुलामगिरीत धन्यता मानतात. डॉ. आंबेडकर म्हणाले की, Tell him that he is a slave he will revolt अतिशूद्रांवर (त्रैवर्णिकांची) गुलामगिरी असे (असते) ती नाहीशी करण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी फुल्यांनंतर केला. ब्राह्मणांची गुलामगिरी ब्राह्मणेतरांवर होती व यद्यपि कमीअधिक प्रमाणात आहे. ती घालवण्याचा प्रयत्न सत्यशोधक जोतीरावांनी केला. आता हे प्रयत्न कितपत यशस्वी झाले? किंवा नाहीत, हे वेगळे प्रश्न आहेत ब्राह्मणांना विशेष हक्क होते, सहजपणे राखीव जागा होत्या (व आहेत) उदा. शंकराचार्य हा ब्राह्मणातीलच होऊ शकतो. शंकराचार्य म्हणजे एक हाय् प्रिस्ट असे, क्षात्रजगत् गुरू वेगळा करून ही धर्मसत्ता अब्राह्मणांकडे देण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू यांनी केला, हा इतिहास झाला, हा मोठा प्रयत्न होऊन गेला.

आशीर्वाद देण्याचा अधिकार मुख्यतः व प्रधानतः ब्राह्मणाकडे असे. मंत्राधिकार ब्राह्मणांचा व प्राणप्रतिष्ठा करून देवांची स्थापना मंत्रसामर्थ्यांने व मंत्राधिकाराने ब्राह्मण करतात. अजूनही दगडाच्या देवाला परमेश्वर बनवतात. प्राणप्रतिष्ठा तेच करतात. मंत्र हे ब्राह्मणाधीन असतात व मंत्रोक्त पद्धतीने देवाची, मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. 'ब्राह्मणाचे महत्त्व' हे धर्मशास्त्राने मान्य केले व इतरांनी ते शिरसावंद्य केले. शाप देण्याचीही चाल होती. 'मनुस्मृती' वगैरे तत्सम ग्रंथांनी त्यांना देवाधर्माची मान्यता दिली. इतरेजण निरक्षर होते. परंपरागत पद्धतीने ग्रंथाधारे पूज्य व ईश्वरी ठरवलेले ब्राह्मणांचे महत्त्व झिडकारण्याचा प्रयत्न चार्वाक, बुद्ध, तुकाराम, जोतीराव, आंबेडकर या बंडखोर विचारसरणीतून झाला. समाजात पापपुण्याच्या कल्पना होत्या. ब्राह्मणांना दान दिले की पापक्षय होतो. बहुलोकसमाजाने वरील धर्मकल्पना परंपरेने स्वतःच स्वीकारल्या व यद्यपि हा जू बहुतेक सर्व लोक खांद्यावर वाहतात. ब्राह्मण म्हणजे येथे पुरोहितशाही असा अर्थ आहे. पुरोहितगिरी करणारे लिंगायतांत

जंगम, शैव, गुरव व जैनातही आणि बौद्धातही आहेत व त्यांनी ब्राह्मण पुरोहितांची धर्तीच पत्करली. पुढे पुढे वैदिक धर्म व अवैदिक धर्म यात अंतर राहिले नाही. उदा. बुद्धाच्या धम्माचा धर्म झाला. जैन विद्वानांनी ब्राह्मणी धर्माशी मोठमोठ्या बौद्धिक टकरा घेतल्या. आद्य शंकराचार्यांच्या काळापासून पुनः पूर्ववत ब्राह्मणी महत्त्वाचा काळ या ना त्या स्वरूपात चालू आहे. परिवर्तनाला परंपरा गिळतात व वेदोक्ताला पुराणोक्त गिळते. सर्वधर्मेहितासाचा हा अनुभव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की, ब्राह्मणेतरांनाच ब्राह्मणी धर्म हवा असतो. बॅ. सावरकर मोठे जहाल सुधारक, यांनीदेखील ब्राह्मणेतरांना ब्राह्मण पुरोहित लागतो असे म्हटले. जोतीराव फुले यांची चळवळ प्रॉटेस्टंट होती; पण ती बहुजनांना 'ब्राह्मण' प्रिय असल्यामुळे गिळली गेली. भारतीय पुरोहितशाहीचे जे महत्त्व होते व आहे, ते सत्यशोधक चळवळीची चिकित्सा करण्यासाठी ध्यानात घेणे जरुरीचे आहे. युरोपमधील पुरोहितशाहीचा इतिहास व आपल्याकडील इतिहास यात मूलभूत अंतर आहे. पापमुक्तीच्या रूढीविरुद्ध तिकडे बंड झाले. तीर्थस्नान केल्यामुळे व प्रायश्चित्त घेतल्यामुळे पाप नाहीसे होते, असा विश्वास असतो. पापमुक्ततेचा जैनांतही एक विधी प्रकार आहे. सर्व धर्मात पुरोहितशाही व तिच्या वर्चस्वाची पद्धती यात कमी-अधिक फरक व मूलभूत साम्येही आढळतात. आता धर्म जगातच गौण होत आहेत. येथेही मूळचे सोळासंस्कार राहिले नाहीत. साक्षरता वाढत आहे. यापुढेही पुरोहितांचे वर्चस्व (संस्कार लोपामुळे) सर्व जगात गौण, प्रासंगिक व दुय्यम झाले आहे. कायम चालत आलेल्या पुरोहितशाहीविरुद्ध आधुनिक काळात महाराष्ट्रात जोतीरावांनी बंड उभारले व धर्मविधीतून ब्राह्मण पुरोहित नाहीसा करण्याचा फुले व राजर्षी शाहू यांनी मनस्वी मोठा प्रयत्न केला. पण पर्याय व स्वावलंबन टिकले नाही. कोणत्याही बाबतीत पर्याय गुणवत्तेने मोठा ठरल्याशिवाय तो यशस्वी होत नाही. प्रयत्न झाला. वैदिक कर्मकांड व क्षात्रजगत्‌गुरू शाहू महाराजांना हवे होते. पुढे सर्व समाजाला व खुद्द मराठा समाजाला याची गरज वाटली नाही, वाटत नाही. म्हणून पौराणिक काळाची वारंवार मात झाली व पुराणोक्त सर्व अब्राह्मणांनी शिरसावंद्य मानले आहे. डोळस धर्माचा टिकाव लागला नाही.

सत्यशोधक चळवळीची चिकित्सा करताना एक धर्म सुधारणेची आधुनिक चळवळ या दृष्टीने तिची चिकित्सा करताना जय-पराजय सांगावा लागतो. जोशीबिल कायद्याच्या पुस्तकात राहिले व स्वेच्छेने बहुजन समाज महागाईत महागलेले दक्षिणेचे दर व्यवहारात स्वीकारतो. दारू पिणाऱ्यालाच बाटली जरुरीची वाटते. मग बाटलीला काय म्हणून जबाबदार धरावे? आधुनिक शिक्षणप्रसारामुळे धर्मभोळेपणा नाहीसा झाला नाही. पदवीधर स्त्रिया व पुरुष धर्मिष्ठ असतात. आत्मविश्वास वाढला नाही. भोळ्या शरणागतीच्या

सामाजिक चालीमुळे बुवाबाजी व बाबाबाजी वाढली आहे. बाबांनी व बुवांनी परब्रह्म परमेश्वराची जागा घेतली आहे व लोकसमाजाने ती स्वीकारली आहे. बुवा व बाबा महाराज देवऋषी ब्राह्मणेतरांतच जास्त आहेत.

**सकाम साधन**

खुद्द गीतेने दुसऱ्या अध्यायात सकाम साधनाविरुद्ध पवित्रा घेतला आहे. भागवत धर्म ही प्रोटेस्टंट चळवळ आहे असे, न्याय. रानडे म्हणाले हे रानडे वळण खुद्द त्यांच्याच समाजाने घेतले नाही. 'अर्जुना तू मोक्षदायक सकाम व रोचक स्वर्गवादी वेदवाणीच्या नादाला लागू नकोस' असे म्हणून गीतेने वेदप्रामाण्य झिडकारले आहे. विनोबांनी त्यांच्या गीतेवरील व्याख्यानात या मुद्द्यावर मूग गिळले आहेत. लोकमान्यांनी तर गीतेला 'नवा करार' म्हणून मागे संबोधिले, पण वरील दुसऱ्या अध्यायातील सकामवेद अप्रमाण ठरवणाऱ्या भागाविरुद्ध लोकमान्यांनी समर्थन केलेले सापडते. वेदप्रामाण्य हे संरक्षित केले जाते.

'निष्काम कर्म कर' या विवरणाचा संदर्भ गीतेतील वरील वेद निंदेशी व स्वर्गवादी सकाम वेदातील यज्ञयागी कर्मठकर्माशी आहे. पण जनता एवढी अधिकार संपन्न नसल्यामुळे सकाम नवससायास करीत असते. नवस फेडणे व नवस करणे हे सर्वसामान्य (अज्ञान) देवभक्तांचे साधन (धर्माचरण) चालते. नवसाला 'सायास' म्हटले आहे. हा यातायाती धर्म आहे, असेही संत सांगतात. पण जोतीबा यापुढे जाऊन नामस्मरण, नैवेद्य, अर्पण वगैरेंची गरज देवाला मुळीच नाही. असे सार्वजनिक सत्यधर्मातील पहिल्या प्रकरणात स्वच्छपणे सांगतात, देव निरवयव निराकार असल्याने तो बोलत नाही. त्याला ऐकता येत नाही, वगैरे क्रांतिकारक उपदेश सार्वजनिक सत्य धर्मात आहेत.

धर्मभय, धर्मधाक वगैरे तत्सम बाबी जोतीरावांनी नाकारल्या आहेत. धर्माच्या शोषणाविरुद्ध चळवळ करणे हे १९१९ च्या अगोदरच्या सत्यशोधक समाजाचे धर्मसुधारणावादी स्वरूप होते. पहिल्या महायुद्धानंतर राजकारण आले व सत्तेसाठी आपसांत कलह वाढले. जातिभेद मोडण्यासाठी निघालेली सत्यशोधक चळवळ होती.

**राजर्षी शाहू व वेदोक्त**

छत्रपती राजर्षी शाहू महाराज कोल्हापूरकर यांच्या वेळी चालू झालेली मराठ्यांची जी वेदोक्त चळवळ होती, तिला वाईचे भाऊशास्त्री लेले (संपादक धर्म) यांनी जोरदार विरोध केला. सुखासुखी धर्मसत्तादेखील कोणीच सोडत नाहीत. महाराष्ट्रात जोतीरावांच्या काळात 'दीनबंधू', 'दीनमित्र', 'शेतकऱ्यांचा कैवारी' वगैरे नावे मुखपत्रांना होती. दुसऱ्या युद्धात मराठ्यांनी मर्दुमकी गाजवली म्हणून इंग्रज सरकार हे काही अंशी ऋण व्यक्त करते झाले. जोतीरावांच्या काळापासून राजकारण वर्ज्य म्हणजे साम्राज्यसरकार विरोध टाळण्याचा

या सर्व मराठा तत्समच्या चळवळीचा प्रथमचा पवित्रा होता. संस्थानिकांना संस्थान टिकवण्यासाठी राजनिष्ठेची जरुरी होती व संस्थानिकांच्या आर्थिक साहाय्याने चाललेली ब्राह्मणेतर चळवळ प्रमुखतः म. गांधी येईपर्यंत साम्राज्य सरकार निष्ठा ठरावाने व प्रत्यक्षात व्यावहारिक कृतीने राहिली. नेमस्त-मवाळ राजकारण करणाऱ्या रानडे-गोखले वगैरेंनी हिला पाठिंबा दिला. सक्ती शिक्षणाच्या मागणीसाठी ना. गोखले यांनी फार परिश्रम घेतले. अर्थात लो. टिळक यांच्या पक्षाने विरोधी पवित्रा घेतला, पुढे टिळकांच्या स्वराज्याविषयक प्रयत्नांना ब्राह्मणेतरांचा तीव्र विरोध झाला. मरणापूर्वी या विरोधाचा अर्थ व अनर्थ टिळकांनी 'केसरी'त लेख लिहून व्यक्त केला. लो. टिळकांना व केसरीला जोतीबांच्या चळवळीचे व पुढील शाहू काळातील सर्वच चळवळीचे स्वरूप स्वराज्यद्रोही वाटले! मवाळांच्या, नेमस्तांच्या प्रागतिक सहकारवादी चळवळीला व त्यांच्या सामाजिक सुधारणांना लोकमान्यांनी जसा तीव्र विरोध केला; तसाच सहकारवादी ब्राह्मणेतर व सत्यशोधक चळवळीला लो. टिळक यांनी सडकून विरोध केला. यावेळी केसरी-टिळक यांचे समर्थन करण्यास काही पंडित व विद्वान पुढे आले. पण बडोदे येथील वेदोक्ताला केसरी पक्षाने अगोदरच विरोध केला होता, त्याचे मंडन करण्यास कोणी तितके फारसे पुढे आलेले दिसले नाहीत. वेदोक्त प्रकरणे गाजली.

कोल्हापूर हे महाराष्ट्रात आहे व बडोदे हे लांबदूर गुजरातमध्ये असल्यामुळे स्थानिक परिस्थितीमध्ये मोठा भेद व फरक आहे. शाहू महाराज हे कडवे पुरुष होते. सयाजीराव हे नेमस्त, मवाळ आणि प्रागतिक शाहू क्रांतिकारक होते, त्यांनी वेगळे मराठे क्षात्रजगत्‌गुरूपीठ निर्माण केले. त्या काळात ही क्रांती होती. ख्रिस्ती मिशनरींचा 'बायबल' व मुस्लिमांचे 'कुराण' जगाला खुले होते व असते म्हणून त्यांच्या धर्माचा प्रभाव व प्रचार झाला. वेद व 'सार्वजनिक सत्यधर्म' या प्रकणात वेदबंदीविषयी महात्मा फुले यांनी लोकविलक्षण ऊहापोह केला आहे. 'असूडा'च्या निबंधाच्या शेवटी जोडलेल्या परिशिष्टांमध्ये नं. २ (पान नं. २६९ ते २७३ पाहा) गायकवाड इ. मराठे संस्थानिकांच्याजवळ पैसा असून ते इतरांना वेद व संस्कृत शिकवत नाहीत, करू नये ते करतात अशी टीका आली आहे. (महात्मा फुले समग्र वाङ्मय, १ ली आवृत्ती, पृष्ठावरील सर्व पाहा) स्वतः मोक्षमुल्लर जोन्स, विल्सन यांच्या ग्रंथावरून म. फुले यांना वेदांची काही कल्पना आली होती आणि संस्कृत भाषेशी त्यांचा थोडा ओझरता परिचय असावा.

## क्षत्रिय व त्यांचे अस्तित्व

जोतीरावांच्या मरणानंतर महाराष्ट्रातील शैक्षणिक मराठ्यांची जागृती व स्वावलंबी उन्नतीची स्वतंत्र चळवळ चालू झाली, यात मराठा तत्समही होते. कै. राजारामशास्त्री भागवत यांनी या चळवळीस खतपाणी घातले. जोतीरावांच्या काळात फक्त प्राकृत लग्नविधी

ब्राह्मणाशिवाय करण्याचा हक्क मिळवण्यात आला. पण बडोदे व कोल्हापूर येथील वेदोक्त प्रकरणानंतर वेदोक्त श्रावणी व दरसाल नवे जानवे परिधान करण्याचा सार्वजनिक कार्यक्रमही होऊ लागला. सत्यशोधक चळवळ फारशी सैध्दान्तिक नव्हती, पण समान हक्क व समता (सोशल व रिलीजिअस् स्टेटस्) मिळवण्याची वेदोक्त चळवळ झाली. बेळगावचे सुपुत्र कै. वासुदेवराव लिंगोजी बिरजे यांनी 'क्षत्रिय व त्यांचे अस्तित्व' नामक एक चांगला ग्रंथ मराठीत लिहिला; 'मराठे कोण होते?' हाही संशोधनीय इंग्रजी ग्रंथ लिहिला. नंदति क्षत्रिय कुलम् हे वचन खोटे ठरवले व मराठ्यांचे क्षत्रियत्व सिद्ध केले. शिक्षण परिषदांना क्षत्रिय माळी, क्षत्रिय धनगर वगैरे जातीजातींच्या परिषदांनी आपल्या नावापुढे मागे 'क्षत्रिय' हे उपपद जोडले. पुढे ही डॉ. आंबेडकरांनी 'शूद्र हे क्षत्रिय होते', या नावाचा इंग्रजी ग्रंथ लिहिला. ब्राह्मणेतर व दलित चळवळीची नदी अशी एकसारखी वाहत आली आहे. सयाजीराव व शाहू महाराज यांच्या काळात संस्थानिकांच्या साहाय्याने चाललेली सत्यशोधक चळवळ पुढे (ब्राह्मणेतरांची) स्त्रीशूद्रातिशूद्र या जोतीबांच्या परिभाषेचा त्याग करून चालली, जातीजातींच्या सभा, परिषदा सत्यशोधकांनीच काढल्या व मागासलेपण जाण्यासाठी शिक्षण प्रसारार्थ स्वावलंबी फंडस् चालू केले. स. शो. समाजाला विद्याप्रसारक क्षेत्रात बरेच यश आले. तरी पण निरनिराळी वळणे घेत चळवळ पुढे गेली. आज वरीलप्रमाणे जातीसाठी माती कोणी खात नाही, पण चालू काळात स्व-स्वार्थामुळे जातीसाठी खावी माती, ही ज्ञानपद म्हण अनुभवातून गेली व 'मातीसाठी खावी जाती' असा उलटा वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा अनुभव स्वातंत्र्यात नव्या जातिवादातून प्राप्त होऊ लागला आहे. 'आपला समाज पुढे यावा' ही जी सामुदायिक ईर्षा मागे पारतंत्र्यात होती, ती सामाजिक महत्त्वाकांक्षादेखील मागे पडली.

क्षत्रिय म्हणवून घेण्याची व वेदोक्त कर्मकांड करण्याची क्षात्रण्याची चळवळ लोपली. क्षात्रजगत्‌गुरूपीठ बुडाले. म. फुले व शाहू महाराज आणि सतराव्या शतकातील शिवाजीचा काळ आता मागे पडला. चळवळ कशी व का निर्माण झाली हे जसे सांगितले, तसेच ती मागे का पडली हेही सांगणे भाग आहे. ती ब्राह्मणेतरातील जातिभेदाच्या खडकावर आपटली. सत्तास्पर्धा व फक्त सत्तेच्या मागे जाणे व इंग्रजांची फाजिल निष्ठा वाढली, मूळमुद्दा पाहू.

नवस-सायासांच्या मार्गांचा राजदंडाशी कसलाही संबंध नाही. सकाम-यज्ञ-होम-हवन हे क्षत्रियाची राज्ये निर्माण होण्याच्या पूर्वीच होते. आदिवासींमध्ये अग्निपूजा आढळते. राजदंड (कोणताही) किती प्रमाणात धर्मसत्तेला पाठबळ देतो किंवा नाही, याचा हिशेब पाहिला पाहिजे. क्षत्रियादि व वैश्यवर्ण धर्मसत्तेवर अवलंबून होते. ज्योतिष शकुन, अपशकुन, मुहूर्त वगैरे कल्पना जारी असत.

## शिवराज्याभिषेक व धर्मसत्ता

धर्मसत्ता ही राजसत्तेवर (व लोकशाहीतील राजसत्तेवर) अधिराज्य करीत आली. जगभर हा मामला चालत आला आहे व अद्याप चालतो. शिवराज्याभिषेकाचे उदाहरण आहे. व्यावहारिक चातुर्य व मुत्सद्दीपणा हा कारणेवरून शिवाजीने द्वैत वाढवू न देता गागाभट्टाच्याद्वारे कार्यभाग साधला. वादविवादापासून दूर राहावे व रूढीप्रिय सनातन्यांशी संघर्ष नको म्हणून समर्थस्वामी परळीकर राज्याभिषेक समयाला उपस्थित नसावेत! शकुन-अपशकुन व ज्योतिष यावर छत्रपतींचा विश्वास होता. तो काळ असाच सर्वत्र होता. उत्तर पेशवाईत धर्मनिष्ठता वाढली, पानीपतावर ज्योतिष वगैरे पाहण्यात वेळ गेल्यामुळे लढाई हरली! शिवाजीला धर्मभोळा राजा असे म. फुले यांनी संबोधिले आहे. हे फुल्यांचे मत आधुनिक काळानुसार आहे. राज्याभिषेकानंतर जिजामाता वारल्या वगैरे अनिष्ट प्रकार झाले. याचे संबंध वेदोक्त राज्याभिषेकाशी जोडण्यात आले व एका प्रसिद्ध तांत्रिकाकडून शिवाजीने पुनः पौराणिक राज्याभिषेक केला! ज्या वेळी जो समाज असतो, त्या समाजाच्या रूढ मतांना थोरा-मोठ्यांना शरण जावे लागते. कारण समाजात असामान्य थोरांना राहावे लागते. म्हणून व्यवहारी असामान्य माणसे जनतेच्या व लोकांच्या चालीने वागतात, घरी बायका-माणसे यांच्या ज्या समजुती असतात, त्याप्रमाणे पुरुषांना वागावे लागते! किंवा पुरुष बायका मंडळींना प्रमाण धरून स्वतःची मते बाजूस ठेऊन वागतात. सनातनी लोक परिवर्तनवाद्यांचे विसंगत वर्तन पाहून सुधारकांची (परिवर्तनकर्त्यांची) या विसंगतीबद्दल विरोध व निंदा करतात. जोतीबांनी त्यांच्या दृष्टिकोनातून शिवाजीकडे पाहिले. दानधर्म करणारा गो-ब्राह्मण प्रतिपालक शिवाजी जोतीबांना प्रतिगामी वाटला! जोतीबांचा आधुनिक काळ होता. शिवाजीच्या काळात समाज सुधारणेची दृष्टी नव्हती. डॉ. गांगल यांना काय वाटले! लोकसमाज जोतीराव फुले यांच्या बहु जनोद्धारक कार्याबद्दल कृतज्ञ आहे. जोतीरावांना जनता मनस्वी मानते, हे जोतीरावांचे वजन कमी करण्यासाठी किंवा ते समूळ नाहीसे व्हावे म्हणून तथाकथित हिंदुत्ववादी डॉ. गांगल व त्या अगोदर माननीय ओक वयोवृद्ध महाराज जोतीरावांची निंदा नालस्तीकरते झाले. हिंदुत्व टिकवावयाचे म्हणजे ब्राह्मण्य टिकवायचे असे समीकरण होते. प्रबोधनकार ठाकरे यांचे चिरंजीव व शिवसेनेचे कप्तान बाळासाहेब ठाकरे यांनी डॉ. गांगल यांना राजकारणापायी गोंजारले. अंतर्गत इंटरेस्ट-राजकीय हितसंबंध माणसांना एकत्र आणतात. सांगण्याचा मुद्दा कोणता होता? सत्यशोधक चळवळीला विविध कालखंड (फेजेस) आहेत.

## धर्मसत्तेचा वरचढपणा

शिवाजीच्या हातात राजसत्ता होती. सैन्ये होते. तरी महाराष्ट्रातील ब्राह्मणांचा त्यांच्या वेदोक्त राज्याभिषेकाला जो विरोध झाला तो त्याला शस्त्राधारे मोडण्याची छाती झाली नाही. राजदंड ब्रह्मसत्तेपुढे नमतो. सयाजीराव गायकवाड यांच्या वेळी बडोद्याचे वेदोक्त प्रकरण झाले. केसरी व टिळक यांनी खुद्द गायकवाड सरकारवर शरसंधान केले. पण सयाजीराव व महाराज शिवाजीराजे भोसले सारासार विचार शक्ती वापरत. वरील दोघे राजर्षी शाहूं एवढे हट्टी नव्हते. राजर्षी शाहू वेदोक्त प्रकरणी प्राणपणाने लढले. साताऱ्याच्या प्रतापसिंहाला तर राज्यावरून जावे लागण्यास त्याच्या कारकिर्दीतील वेदोक्त प्रकरण हे मुख्यतः कारण झाले. शिवाजी, सयाजीराव, प्रतापसिंह व शाहू यांच्या वेळी जी वेदोक्त प्रकरणे झाली त्याचा काळ, स्थळ व स्वरूप एक सारखे नव्हते. शाहू कालखंडात कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणाला महाराष्ट्रात सत्यशोधकांनी पाठिंबा दिला. वेदोक्त बंदी-वेदबंदी मोडण्याचा मोठा प्रयत्न झाला. वेदोक्त प्रकरणे सत्यशोधक समाजाशी निगडित झाली. आता तो मागचा कठीण काळ राहिला नाही.

सत्यशोधक चळवळ जास्तीत जास्तपणे वरीलप्रमाणे प्रतिक्रियास्वरूपी झाली. ब्राह्मणांचा विशेषतः कोकणस्थ ब्राह्मणांचा तिला मोठा विरोध झाला. महाराष्ट्रात ब्राह्मणी संस्थाने होती. कोकणस्थानी पेशवाईच्या स्वरूपात मराठी राज्य मिळवले होते. त्यातून मोठेमोठे पटवर्धन, भोरकर, औंधकर वगैरे सारखे कडवे कोकणस्थ व देशस्थ संस्थानिक इंग्रजी राज्यातही महत्त्वाचे होते. प्रतापसिंहाच्या कारकिर्दीत संस्थानी राज्ये होती. त्यातील संस्थानिकांवर सत्ता इंग्रजांची की छत्रपतींची हा वाद राजकीय क्षेत्रात होता. कोल्हापूरच्या बाबतीतही पटवर्धनी संस्थाने व शाहू महाराज यांच्यामध्ये त्याबद्दल अधिक वाद होता. धार्मिक व राजकीय सत्ता आपल्या हातून निसटली व इंग्रजी राज्य आले, एवढेच ब्राह्मण समाजाचे दुखणे मुख्य होते. त्यांनी इंग्रजविरुद्ध चळवळ प्रमुख मानली. शूद्रातिशूद्र समाजावर जातीय बंधने होती; वर्चस्व होते. विषमतेची शिडी इंग्रजी राजकीय राज्य झाले तरी शाबूत होती. व कायस्थ, प्रभू, शेणवी वगैरेंसह सर्व मराठे लोकांना विषमता बोचत होती. वेद, संस्कृत व एकूण विद्या इतरांना खुली नव्हती. ह्या सर्व सामाजिक गुलामगिरीतून सुटका करून घेण्यासाठी महाराष्ट्रात उठाव झाला, तो उठाव म्हणजे सत्यशोधक चळवळ होय. अर्थात ही मीमांसा भूतकालीन झालेल्या प्रकरणांची आहे.

## शिवाजी, वेद आणि दयानंद

होऊन गेलेल्या समाजप्रबोधनामागे मुख्यतः शिवाजी व वेद ही तत्त्वमूल्ये होती. शिवाजीने राजकीय स्वातंत्र्याविषयी नव्या काळातही प्रेरणा दिल्या. श्री. स्वामी दयानंद

सरस्वती यांनी वेद व संस्कृत सर्वांना खुले केले. दयानंदांच्या मिरवणुकीत जोतीराव व त्यांचे शूद्र अनुयायी हजर होते. मराठ्यांच्या शिक्षण प्रसाराचे कै. गंगारामभाऊ म्हस्के हे पहिले पुढारी होऊन गेले. त्यांनी तर दयानंदांचा सन्मान-सत्कार व गौरव करण्यास आघाडीवरील भाग घेतला. जोतीरावांनी दयानंदांची व्याख्याने ऐकली असावीत, स्वागतात ते उपस्थित असावेत (होते). वेद बंदीचा मोठा उपहास व निषेध जोतीरावांमध्ये आढळतो. वेदांचा उपहासच त्यांनी केला. जोतीरावांवर बायबलचा एक बाजूस तरुण वयात परिणाम मोठा होता. बायबलचे शिक्षण विद्वान रेव्ह. मरे मिचेल यांच्याजवळ झाले होते. प्रथम 'कुराण' मुनशी जवळ त्यांनी ऐकले. संस्कृतचा परिणाम अर्थात नव्हता, दुसऱ्या बाजूने परमहंससभेचा त्यांच्यावर परिणाम होता. एकेश्वरवाद व त्याचा प्रसार समतेसाठी करणे हा एकोणिसाव्या शतकातील समाज प्रबोधनातील अग्रेसर मुद्दा होता. बायबल, कुराण व वेद अगर कोणत्याही धर्मग्रंथात सर्वथा सत्य व समता नाही, प्रत्येक धर्मातील काही भाग आचरणीय नाही. न पटणारा वेदातील भाग सोडण्यासाठी रानडे, टिळक, जोतीबा वगैरे महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी आर्यसमाजाचे वेद प्रामाण्य स्वीकारले नाही. दयानंद व्याख्याने देऊन गेले तरी त्यांचा महाराष्ट्रावर थोडाफार परिणाम राहिला. रानड्यांनी वेदशास्त्रोत्तेजक सभा स्थापली. बडोदे व कोल्हापूर येथे पुढे विसाव्या शतकातही वेदोक्त प्रकरणे झाली, त्यामागे दयानंद व आर्यसमाज यांनी केलेली वेदोक्त व वेद यासंबंधीची नवी जागृती प्रत्यक्षाप्रत्यक्ष कारणीभूत झाली. राजस्थान व गुजरात या भागातही आर्यसमाजाचे कार्य चालू होते. बडोदे तिकडेच जवळच होते. नवयुग समाजात म्हणजे प्रार्थनासमाज, आर्यसमाज व सत्यशोधक समाज यांच्यात तात्त्विक साम्य आहे.

जोतीरावांचा शूद्र शब्दांचा अर्थ शूद्र म्हणजे शेवटचा वर्ण केवळ नव्हे. 'शूद्र' म्हणजे शुद्ध मूळचा नेटिव्ह असाही अर्थ आहे. सरसकट मागे संतांनी हा वर्णवाचक शब्द वापरला होता. जोतीबांच्या वापराला वर्गीय आशय जास्त आहे. शूद्रातिशूद्र म्हणजे तळागाळातील जनसमाज असाही अर्थ होता. मूळचे 'नेटिव्ह' लोक म्हणजे शूद्र शुद्ध असा आशय आहे. आर्य म्हणजे आर्य ब्राह्मण-भट असाही आर्य शब्दांचा रोख आहे. सत्यशोधक चळवळीला ब्राह्मणेतरवादाचे व राजकीय पक्षाचे जे स्वरूप पुढे १९१६ नंतर प्राप्त होत गेले, त्याचे जानकत्व व मूळ प्रत्यतः प्रत्यक्षामार्गे जोतीरावांकडे जाते. जोतीरावांनी अतिशूद्राचा म्हणजे पूर्वास्पृश्यांचाही प्रश्न प्रत्यक्ष हाताळला होता. आजकालच्या दलित चळवळीचे जोतीबा जनक आहेत. म्हणूनही डॉ. आंबेडकर यांनी त्यांना गुरू मानले. यामुळे जोतीरावांना हयातीपेक्षा मरणोत्तर जास्त कीर्ती, महत्त्व व व्यापकता प्राप्त झाली. एकूण सत्यशोधक, व महाराष्ट्रीय चळवळीतूनच निघालेल्या दलित स्वातंत्र्य चळवळीला अखिल भारतीय स्वरूप

प्राप्त आहे, हे मान्य केले पाहिजे. योगायोगाने म. फुले यांची निर्वाण शताब्दी व डॉ. आंबेडकरांची जन्मशताब्दी या दोन्ही जोडून आल्या आहेत. या संबंधाचे हे सर्व लेखन आहे. पण 'राष्ट्रवीर'चा हा अंक खास 'शिवजयंती अंक' असल्यामुळे श्री शिवाजी स्मरणाचे विस्मरण होऊ नये.

### सेक्युलॅरिझमचा उदय व सत्यशोधक चळवळ

युरोपमध्ये धर्मसत्ता व राजसत्ता (राजसत्ता लोकशाहीमधील) यांच्यात तीव्र संघर्ष झाला व त्यातून आधुनिक सेक्युलॅरिझमचा उदय झाला. शिवाजी महाराज यांना निधर्मीराज्य व्यवस्थेचे उदाहरण घालून देणारे मुत्सद्दी म्हणून म्हटले जाते. शिवाजीच्या काळात जातिसंस्था, ग्रामपंचायती, अस्पृश्यता, धर्मवर्णभेद होते, पण आक्रमणाच्या निवारणार्थ महाराष्ट्र एकजीव झाला होता. भेदाभेद व उच्चनीच भाव दुय्यम गणला जाई. आक्रमणाचे व शिवाजीच्या पराक्रमाचे स्वरूप कसे होते, ते वर्णन शिवाजीच्या पोवाड्यात जोतीरावांनी सांगितले आहे. राजारामाच्या कारकिर्दीतदेखील मराठे लोकांत विलक्षण ऐक्य दिसले; पण उत्तर पेशवाईत धार्मिकांच्या हातात सत्ता गेली व राज्याचे जे काही सेक्युलर स्वरूप होते ते लोपले. प्रजा निरक्षर असल्यामुळे सर्वच मराठे संस्थानातून व राज्यातून साक्षर व त्या काळानुसार विद्वान-पंडित असलेल्या ब्राह्मणांचे प्रत्यक्षात राज्य असे. त्यांचे कारकुनी फड होते. धार्मिकांची या मार्गानेही राजकीय सत्ता मराठी राज्यात होतीच. धर्मसत्तेला ह्या राज्यसत्तेचा पाठिंबा मिळाला. म्हणून विशेषतः उत्तर पेशवाईत धर्ममार्तंड बलदंड झाले. क्षत्रियांपेक्षा ते स्वतःला श्रेष्ठ मानू लागले व त्यांनी त्यांची धर्मसत्ता वेदबंदी रक्षण करून शिवकाळापासून टिकवली. शिवाजीच्या निधर्मी धोरणाचा लोप झाला. प्रतापसिंह शेवटचे छत्रपती यांच्या वेळेस झालेल्या वेदोक्त प्रकरणामुळे तर मराठेशाही बुडण्यास एक धार्मिक कारण ठरले. इंग्रजी राज्य आल्यावर ब्राह्मणांची प्रायः नोकरशाही झाली. युरोपियन अंमलदार ब्राह्मण धर्ममार्तंडाच्या मताप्रमाणे वागू लागले. अव्वल इंग्रजीतही नानाप्रकारे धर्ममार्तंडांचे वर्चस्व होते. त्याचे वर्णन जोतीराव कृत 'गुलामगिरी' पुस्तकात भरपूर आहे. अव्वल इंग्रजी राज्यात जी पेशवाई स्वरूपाची राज्यव्यवस्था तयार झाली तिची प्रतिक्रिया म्हणजे सत्यशोधक समाज व म. फुले यांचे विचार व कृती होय, आंग्लाईत पेशवाई होती, याचे उदाहरण म्हणजे बडोदे व नंतर कोल्हापूरचे वेदोक्त प्रकरण होय. या दोन प्रकरणांमुळे विरोधात व प्रतिक्रियेत भर पडली. एकपरी सत्यशोधक चळवळीच्या पाठिंब्यावर वेदोक्त प्रकरणे गाजली. बडोदे व कोल्हापूर येथील दोन महत्त्वाच्या वेदोक्त प्रकरणांत सयाजीराव व नंतर शाहू का पडले, याची कारणे तपासली पाहिजेत. शाहू यांनी आर्य समाजाला कोल्हापुरात स्थान देऊन साहाय्य का केले? कारण त्यांना धार्मिकाची शिरजोरी व मक्तेदारी नको होती. याचे प्रथम

स्थानिक व नंतर शाहू ह्या संस्थानिकांचे लक्ष सत्यशोधक समाजाच्या मूळ चळवळीकडे ओढले म्हणून वेदोक्त प्रकरणे व चळवळ ही दोन संपूर्ण भिन्न आहेत, असे म्हणता यावयाचे नाही. तत्त्वतः भिन्न आहेत, कारण वेद हे सत्यशोधकांनी व त्याच्या मूळ आद्य सत्यसमाजाने ईश्वरी व सर्वप्रमाण मानिले नाहीत किंवा आर्य समाजाप्रमाणे सत्यशोधक समाज वेदाधिष्ठित नाही.

प्रार्थनासमाज व ब्राह्मोसमाज यांनी त्याच्या पूर्वीचे वेदप्रामाण्य झिडकारले होते. वेदप्रामाण्य जे टाकतात त्या सर्व चळवळी अब्राह्मणी चळवळी होत. शूद्रातिशूद्र लोक अत्यंत मागास आहेत. त्याच्यावर धर्मसत्तेचे व तिच्या राज्यसत्तेचे दडपण आहे. याचा साक्षात्कार (ज्ञान) म. फुले यांना झाला. शूद्र समाजाला ब्राह्मणेतर समाजाला पुढे आणण्यासाठी १८७३ साली जोतीरावांनी सत्यशोधक समाजाची प्रस्थापना केली. ब्राह्मणांचे महत्त्व कमी करण्यासाठी व त्यांचा रोख धर्मविधी जो प्रभावी होता तो नाहीसा व्हावा म्हणून ब्राह्मण-भट जोशी यांवर बहिष्कार टाकण्याचा व धर्माच्याबाबतीत स्वतंत्र होण्याचा स्वावलंबी उपक्रम म. फुले यांनी चालू केला. ब्राह्मण समाज इतरांना नीच-कमी-क्षुल्लक समजत असे. त्याला अहंकार व गर्व (ताठा) याची बाधा धार्मिक व राजकीय सत्तेमुळे प्राप्त झाली होती. ती नाहीशी करून ब्राह्मणेतर समाज विद्येद्वारे पुढे आणणे हा सत्यशोधक समाजाचा व चळवळीचा सेक्युलर अर्थ होता. शूद्रच मागास आहेत, तर अतिशूद्रांना (पूर्वास्पृश्यांना) पुढे आणण्याचा त्यांच्यापुढे प्रथम प्रश्न होता. महर्षी विठ्ठल रामजी यांच्या अगोदर त्यांनी १८५३/५४ पूर्वी अतिशूद्रांसाठी पुण्यात शाळा चालवून सोडवावयास घेतला होता. तो त्यांच्या उत्तर आयुष्यात दुय्यम व गौण ठरला, स्वतःच मागास असलेल्यांना अतिमागासलेल्यांना पुढे आणता येणे अशक्य आहे. अजून खेड्यापाड्यांतला ब्राह्मणेतर शेतकरी समाज मागास आहे म्हणून तेथे हरिजन वर्ग अद्याप अलग व वेगळा आहे. हिंदुधर्मातील वा धर्मसत्तेतून निर्माण झालेली ही कोडी सुटत नाहीत. म्हणूनही अतिशूद्रांची चळवळ वेगळी व स्वतंत्र झाली हा एक विग्रह होय, विद्रोह ठरतो. न्या. रानाड्यांशी म. फुले यांनी विग्रह घेतला, विद्रोह केला. तसेच ब्राह्मणेतर सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्ष यांच्यापासून डॉ. आंबेडकरांनी पुढे विग्रह घेतला. एकूण समाज अजूनही निधर्मी झाला नाही. याचा हा पुरावा ठरतो. म. फुले, आंबेडकर यांचा काळ इंग्रजीच्या साम्राज्याच्या वेळचा प्रायः होता. स्वातंत्र्य आले आहे. शिवाजी, दुसरे बाजीराव, प्रतापसिंह छत्रपती शेवटचे व राजर्षी शाहू महाराज यांच्या वेळचा मागील काळ आता उरला नाही. स्वातंत्र्य आले, तरीपण धार्मिकतेची नवी मोठी लाट देशात आली आहे. निधर्मी घटनेला अवघड आव्हाने दिली जात आहेत. सर्वच समाजात ही लाट व तिचा परिणाम दिसून येतो. ब्राह्मण्य टिकावे म्हणून सनातनी हिंदू धर्म टिकवण्याचा

प्रयत्न देशभर चालू आहे. हिंदू धर्मात ज्या उणिवा आहेत, जी कोडी पूर्णपणे (रिडल्स) सुटावयास पाहिजे आहेत, ती डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या इंग्रजी ग्रंथात स्वातंत्र्य पूर्व काळात लिहिली होती, ती म. फुले यांच्या पुस्तकात अगोदर कमी-अधिक प्रमाणात चर्चिली गेली होती. म. फुले, आंबेडकर यांनी मांडलेली कोडी आता सुटली आहेत, म्हणजे आंबेडकर (व फुले) यांचे कार्य संपले आहे, असा अर्थ सूचित करणारी तर्कतीर्थांना दिलेली मुलाखत 'लोकसत्ता' व त्या पूर्वी 'नवभारत' (वाई) माहे मे-जून १९८८ मध्ये प्रसिद्ध झाली होती. पण भारतीय खेड्यापाड्यांची प्रत्यक्ष पाहणी केल्यास सामाजिक धार्मिक जुनाट कोडी सुटलेली नाहीत असे समजून येईल. धर्मसत्ता व धर्मभय, देवाचा धाक यांचा कब्जा सार्वजनिक मनाने घेतला आहे. मने ही कधी सुधारणार? सांप्रदायिकता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रबोधनकार ठाकरे यांच्या सुपुत्रानेच त्याच्या वडिलांचे प्रबोधन पुसून टाकण्याचा प्रयत्न चालवला आहे. हे मोठे दुर्दैव होय! शिवाजी (व फुले) यांचे स्वतःला सोयीस्कर असे अर्थ घेतले जातात.

## श्रीशिवाजी महाराजांची पुरोगामी प्रवृत्ती

रणरागिणी ताराबाई, शेवटचे प्रतापसिंह व त्यांचे चि. शहाजी महाराज उर्फ जंगली महाराज यांनी सामाजिक पुढारपणदेखील केले. सकवारबाई यांच्याप्रमाणे ताराबाई सती गेल्या नाहीत. जिवंत राहून औरंगजेबाच्या स्वारीचा निःपात केला. ताराबाई व पेशवे यांचे कधीच पटले नाही! म्हणजे हा सर्व संघर्ष जुनाट आहे. एका प्रश्नाला दोन बाजू असतात. त्या पाहिल्या जात नाहीत. कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणात लोखंडे, फुले यांनी घेतलेला भाग हा शिवाजी महाराजांच्या अभिमानातून घेतला होता. डोंगरी किल्ल्यातील एकशे एक दिवसांची शिक्षा भोगून लो. टिळक, आगरकर यांची सुटका झाली, तेव्हा त्यांचे मुंबई, पुणे येथे स्वागत करण्यात वरील ब्राह्मणेतर पुढारी ब्राह्मणांच्याही पुढे होते, असे कै. केळकर यांनी लो. टिळक चरित्रात (खंड पहिला) नमूद केले आहे. म. फुले यांना शिवाजीचा अपूर्व अभिमान होता, हे डॉ. गांगल सोयीस्करपणे विसरतात. 'लोकसत्ता' व 'सोबत' यांचे असले उद्योग मधूनमधून चालतात हे महाराष्ट्राचे दुर्दैव होय. स्वराज्य संस्थापक शिवाजी व धार्मिक सामाजिक स्वातंत्र्याचे प्रवक्ते म. फुले (व आंबेडकर) यांचे कार्य परस्परांना पूरक आहे. सर्वांगीण स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य होय. निधर्मी घटना कशी शाबूत राहील, हा आजचा प्रश्न आहे.

(राष्ट्रवीर, शिवजयंती खास अंक, बेळगाव १९९०)

******

# २ महात्मा जोतीबा फुले यांचे सामाजिक-राजकीय विचार व कार्य

अद्याप आपल्या देशात धार्मिक व सामाजिक विचार व कार्य यांची फारकत करता येत नाही. धर्म हा समाजाच्या आतील व बाहेरील अंगाशी एवढ्या अविभाज्य प्रमाणात एकरस होऊन गेला आहे, की तो आणि सामाजिक विचार-आचार विभिन्न व पृथक् आजही करता येत नाहीत. म्हणून धर्मचिकित्सा ही सर्वांगीण सुधारणेची व प्रगतीची जननी ठरते, हा मार्क्सचा विचार भारतात तरी शिरोधार्य मानणे अटळ होते, कारण देशाचा पिंडच धार्मिक आहे.

फुले यांच्यासंबंधी विचार करताना त्यांच्यापासून आपण विचाराला सुरुवात करतो. पण आधुनिक सामाजिक-धार्मिक सुधारणेला बंगाल्यात अगोदरच म्हणजे पाचपन्नास वर्षे आधी सुरुवात झाली होती. या देशातील प्रबोधनाचे स्वरूप खऱ्याअर्थी जाणून घ्यावयाचे झाल्यास राजा राममोहन रॉय व केशवचंद्र यांचे विचार-आचार प्रथम समजावून घेतले पाहिजेत. कारण ब्राह्मोसमाज, परमहंस सभा, प्रार्थना समाज, आर्य समाज व सत्यशोधक समाज एकाच शतकातील नव्या काळाचा परिपाक आहे. भारतीय संस्कृतीची व पाश्चात्त्य संस्कृतीची प्रथम गाठ पडली व नव्या तुलनेला, आत्मपरीक्षणाला नवी सुरुवात झाली. राजा राममोहन रॉय यांच्याद्वारे भारत मध्ययुगातून नव्या आधुनिक युगात प्रवेश करता झाला व इंग्रजी नव्या शिक्षणाला प्रारंभ झाला. बंगालमधील वरील सर्व सुधारक इंग्रजी शिकलेले होते. जोतीबांना त्यांच्या काळानुसार चांगले इंग्रजी येत होते व त्यांनी अधिकाधिक इंग्रजी ग्रंथ जास्त वाचले. सर्वच सामाजिक, धार्मिक सुधारकांना बायबलाचे ज्ञान मिशनऱ्यांच्याद्वारे प्राप्त होणे अटळ होते. वरील सर्व नवयुग समाजाच्या विचारांचा पाया 'एकेश्वरवाद' हाच एकमेव होता. जोतीबांचा निर्मिक निरवयव-निराकार, सर्वांचा पिता आणि सर्व मनुष्ये त्याची लेकरे अशा तत्त्वांचा बोध करणारा ठरतो. मानवी समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, समान संधी, त्याग, स्त्री-पुरुष समता, निरक्षरता व अस्पृश्यता निवारण, जातिभेद निवारण, पुनर्विवाह वगैरे सर्व आधुनिक समाजसुधारकांना वरील ब्राह्मोसमाजादी सर्व नवयुगसमाजांनी जन्म दिला. एवढेच नव्हे तर सर्वांगीण आधुनिक प्रबोधनाचे जनकत्व वरील नवयुगधर्मप्रतिपादक नवसमाजांकडे जाते. हिंदी राष्ट्रीय सभेचे जनकत्व तर ब्राह्मोसमाजाकडे अधिकाधिकपणे जाते. राजकीय-आर्थिक वगैरे कोणतीही सुधारणा राजा राममोहन रॉय व न्यायमूर्ती रानडे यांच्या कार्यकर्तृत्वात

सामावली नव्हती, असे नाही. वरील प्रबोधनाने हिंदी सनदशीर राजकीय जागृतीला जन्म दिला. राजकारणातून अर्थकारण वेगळे करता येत नाही. **तसेच निकोप समाजकारण व नीतिअधिष्ठित निरोगी समाजव्यवस्था असल्याखेरीज राजकीय अगर कोणतीही उन्नती (विकास) होणार नाही**, असे रानड्यांचे निक्षून मूलभूत मत व ध्येयधोरण होते. हे आजही जरुरीचे आहे. **भ्रष्टाचारातून अंधारच येतो हा आजचा अनुभव होय.**

जोतीबांच्या विचारांची व कार्याची वरील सर्व प्रस्तावना म्हणजे पार्श्वभूमी व धर्ती आणि ध्येयधोरणही होते, परंतु स्वतः जोतीरावांनी वरील पार्श्वभूमीशी प्रत्यक्ष निदान तात्त्विक संबंधही कोठेही मान्य केला नाही. ख्रिस्ती व पाश्चात्त्यांचे अनुकरण म्हणून विरोध केला. जोतीबांमध्ये एकूण समाजाचे निरीक्षण व परीक्षण मूलभूतपणे फार आढळते.

### जोतीबांचा स्वतंत्रपणा

जोतीबा हे फार फार करून स्वतंत्र (ओरिजिनल) होते, म्हणून जास्तकरून त्यांच्या चरित्राला त्यांच्यापासून सुरुवात केली जाते व वरील माझी प्रस्तावना साहजिकच दृष्टिआड होते. महाराष्ट्रात उत्तरपेशवाईत शूद्रातिशूद्रांवर जुलूम झाला व इंग्रजी राज्य आल्यावर प्रायः ब्राह्मणी अशी लोकांना पिळणारी नोकरशाही निर्माण झाली. वारंवार दुष्काळ पडून शेतकरी वर्ग धुळीस मिळाला. जमिनी ब्राह्मण-मारवाडी-गुजर यांच्या घशात गेल्या. गाव कामगार कुलकर्णी हा ब्रह्मराक्षस झाला. महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे दंगे झाले व शेतकऱ्यांचा प्रश्न ज्वलंतपणे पुढे आला. शूद्रातिशूद्र बहुसंख्य समाजाला साक्षरता ठाऊकही नव्हती. पंक्ती प्रपंच-सोवळेओवळे यांचे बंड आंग्लाईतही राहिले. उत्पादक शेतकरी मराठ्यांना शूद्र समजण्याची चाल जारी होती.

पेशवाईत प्रभू-कायस्थ व सोनार, वैश्य व तत्सम लोकांना अशीच खालची वागणूक मिळे व ती आंग्लाईतदेखील कायम राहिली. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी या सर्वांतून मुक्त व स्वतंत्र होण्यासाठी १८४० साली परमहंस सभा स्थापन केली. तिचा उद्देश 'जातिभेद मोडणे' हा होता. जोतीबांच्या उपाशीतापाशी, अर्धपोटी अफाट समाजाचे प्रश्न ज्वलंत होते. जोतीरावांना आपला शूद्र समाज फारच मागे पडला आहे, असा सार्वजनिक साक्षात्कार झाला व या समाजाला सर्वांगीणपणे पुढे आणण्यासाठी १८७३ साली त्यांनी त्यांच्या सूज्ञ व साक्षर शूद्र मित्रांच्या सल्ल्याने व साहाय्याने समष्टीप्रधान प्रयत्न करण्यासाठी 'सत्यशोधक समाज' चालू केला. यात जोतीबांची अपूर्वाई दिसली. सत्यशोधक समाज स्थापन करून त्याचा १८९० पर्यंत जोतीबा प्रचार करीत राहिले. त्यांनी शूद्र समाज जागा केल्यामुळे लगतचा अतिशूद्र समाजही जागा झाला. पुढे डॉ. आंबेडकरांच्याद्वारे स्वतंत्र दलित चळवळ चालू झाली.

जोतीरावांना डॉ. आंबेडकरांनी एक गुरू मानले. यामुळे सर्व दलितांचेही जोतीराव गुरू ठरले. त्यांचे महत्त्व आता भूमिती श्रेणीने वर्धमान होत आहे व होईल म्हणून हा विषय अत्यंत महत्त्वाचा. जोतीरावांमुळे ग्रामीण व पुढे दलित साहित्याला प्रारंभ झाला.

## जोतीराव नवमार्ग संस्थापक

जोतीरावांनी त्या काळानुसार मराठी व इंग्रजी शिक्षण घेऊनही समकालीन इंग्रजांची किंवा संस्थानिकांची इतर समाजसुधारकांप्रमाणे नोकरी केली नाही. त्यांच्या घरीदारी वारकरी संप्रदाय नव्हता. सावता माळी यांच्यामुळे बरेच माळी वारकरी पंथीय असत. पण संतांचा हा भक्तिमार्ग जोतीबांनी मुळीच पत्करला नाही किंवा प्रार्थना समाजाप्रमाणे शरणागती वा संतमार्गधर्म मुळीच स्वीकारला नाही. वासुदेव बळवंत फडके व त्यांनी जमा केलेले रामोशी यांच्याशी मैत्रीचे जवळचे संबंध असूनही सशस्त्र क्रांतीचा मार्ग धरला नाही. पुण्या-मुंबईच्या समाजसुधारकांशी जवळून मैत्री असूनही प्रार्थना समाजात त्यांचे जवळचे अनेक मित्र व साहाय्यक होते. पूर्वीच्या परमहंस सभेतील कर्ती मंडळी त्यांच्याभोवती होती. तरी जोतीबा तत्त्वभेद नसूनही प्रार्थनासमाजात सामील झाले नाहीत. त्यात येत जात होते, पण जोतीबांनी त्यांचा असा स्वतंत्र सत्यशोधक समाज खास शूद्रोन्नतीसाठी काढला. १८७६ च्या सुमारास सत्यशोधक समाजात दर रविवारी प्रार्थना होत. पण त्याचे हे आध्यात्मिक स्वरूप वाढले नाही. उलटपक्षी त्याची इहवादी चळवळ झाली. शूद्रांसाठी सत्यशोधक समाज काढला, त्या वेळी ब्राह्मणेतर-मराठा तत्सम ही परिभाषा नव्हती. १९१९ नंतर सत्यशोधक समाजातून राजकीय ब्राह्मणेतर पक्ष स्वतंत्र निघाला व तो १९३५ पर्यंत हयात होता. 'शूद्र' या त्यांच्या संज्ञेचा अर्थ ब्राह्मणेतर (मराठा तत्सम) हा होता. जोतीबांना (डॉ. आंबेडकरांप्रमाणे) त्यांच्या अनुयायांनी सर्वथैव प्रमाण कधीच मानले नाही. जेवढे पाहिजे तेवढे उपयोगी त्यांच्यामधून घेतले जाते व घेतले गेले. १९११ पासून अ. भा. सत्यशोधक परिषद सालोसाल भरू लागली, व अनुयायांनी कालानुसार व्यवहार्य असे ठराव केले. ही परिषद अद्याप भरते. १९२९ नंतर जोतीराव व शाहू यांच्या काळातील इंग्रजनिष्ठेचे मागचे सहकारी धोरण सोडून देऊन, महर्षी शिंदे यांच्या सल्ल्यानुसार सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ काँग्रेसमध्ये स्वातंत्र्यप्राप्तीसाठी घुसली व तिने काँग्रेस महाराष्ट्रात तरी आजपर्यंत कबज्यात ठेवली आहे. सर्व क्षेत्रात ब्राह्मणेतरीकरण म्हणजे लोकशाही विकेंद्रीकरण ही जोतीबांची शिकवण व मुख्य विचार होता. मूठभर वर्गाच्या हातात जी सर्व क्षेत्रातील सत्ता एकवटली होती, ती विकेंद्रीत करून ब्राह्मणेतरांचे राज्य करणे, हा जोतीरावांचा एक राजकीय आक्रमक कार्यक्रम होता. याबाबतीत आतापर्यंत स्वातंत्र्यातही बरीच वाटचाल झालेली दिसते. भरपूर प्रमाणात

ब्राह्मणेतर प्रतिनिधी विधिसभेत आता निवडून येतात. राखीव जागांची पूर्वीप्रमाणे गरज लागत नाही. मात्र नोकरशाहीत आता अब्राह्मणांचा भरणा बराच वाढत चालला आहे. दलितांचाही प्रवेश वाढत आहे.

वासुदेव बळवंत फडके, टिळक, चिपळूणकर वगैरे जहालांना स्वराज्य मिळावे असे वाटत होते. पण स्वराज्य मिळाले तर ते मूठभर वर्गात जाईल व प्रथम शिक्षण प्रसार मोठ्याप्रमाणात झाल्याखेरीज आपल्या हातात सत्ता राहणार नाही व सुशिक्षित प्रशासक व लोकप्रतिनिधी असल्याखेरीज हे शक्य होणार नाही म्हणून फुले-शाहू व भाऊराव पाटील यांनी शिक्षणप्रसारावर प्रथम भर दिला. इंग्रज येण्यापूर्वी देशी अनेक राज्ये होती व त्यांच्यात यादवी व बंडाळी आणि युद्धे चालत. स्वकीयांची राज्ये म्हणजे सुराज्य असा अनुभव नव्हता. इंग्रजी राज्य सर्वत्र झाल्यावर व्हिक्टोरिया राणीच्या कारकिर्दीत सर्वच ब्रिटिश साम्राज्यात तुलनेने जनता सुखी व समाधानी होती. राणी सरकारचा गौरव फक्त जोतीबातच आढळतो असेच नव्हे, तर 'केसरी' वगैरे सर्वच जहाल नियतकालिकांमधूनही तो खास आढळतो. चिपळूणकर, टिळक यांनीदेखील इंग्रजी राज्याचे फायदे सांगितले आहेत.

१८७० साली सार्वजनिक सभा निघाली व १८८५ साली हिंदी अखिल भारतीय राष्ट्रीय सभा स्थापन होऊन दरवर्षी अधिवेशने भरू लागली. या सभात पास होणारे ठराव व चर्चा शूद्रातिशूद्रांच्या प्रत्यक्ष फायद्याची नाही, असा प्रथम जोतीबांना शोध लागला. या दोन्हीही सभांवर ते कडक टीका करू लागले व शेतकरी प्रश्नांकडे त्यांचे लक्ष वेधू लागले. सर्वसामान्य रयतेच्या हिताचा कार्यक्रम या दोन्ही सभांच्या पुढे नव्हता, म्हणून या सभेपासून जोतीबा लांबच राहिले. जे ब्राह्मणेतर पुढारी या सभेत भाग घेत, त्यांच्यासाठी जोतीबा वरील कारणावरून टीकेची झोड उठवत. म. गांधी-नेहरू यांच्या वेळेस काँग्रेस ग्रामाभिमुख-लोकाभिमुख झाली व विशेषतः म. गांधी यांच्यावर विश्वास ठेवून जोतीरावांचे अनुयायी काँग्रेसमध्ये गेले व स्वराज्यार्थ प्राणपणाने लढले. उलट म. फुले व शाहू यांना इंग्रजनिष्ठ म्हणणारा केसरी-टिळक पक्ष म. गांधींपासून दूर राहिला. १८८५ साली मराठी ग्रंथकार परिषद भरली, तिच्याही कार्यक्रमात शूद्रातिशूद्रांच्या साहित्याचा व उन्नतीचा कार्यक्रम नव्हता म्हणून तिच्यापासून कारणे देऊन म. जोतीबा दूर राहिले. वरील सर्व बाबतीत दूर राहण्याची जी जोतीराव फुलेकालीन कारणे होती, ती आज बोथट झाली आहेत. एकूण समाज थोडाफार पुढे आला आहे. जोतीरावांच्या वेळचे सामाजिक वास्तव व आजचे वास्तव यात फरक पडला आहे. **एकविसाव्या शतकाकडे आपण सर्वजण चाललो आहोत. वर्तमान व भविष्यकाळाच्या दृष्टिकोनातून विचार तपासले पाहिजेत.**

आजचे पुणे, महाराष्ट्र व सारेच भारतखंड खूप प्रकारे नवे आहे. जुन्या सनातनी प्रश्नांत नवे प्रश्न भर पावले आहेत. तथापि धर्मांधतेची नवी लाट सर्वत्र व सर्वच धर्मातून येत आहे. अंधश्रद्धा बळावत आहेत. डोळस श्रद्धा व विवेकाचा पत्ताच लागत नाही. ही आजची अवस्था. तथापि जोतीरावांच्या वेळचे पुणे कसे होते, ते पाहिले पाहिजे. त्या वेळच्या पुण्यात प्रार्थना समाज, वसंत व्याख्यानमाला वगैरे अनेक देशोन्नतीचे प्रयत्न चालू होते. टिळक-चिपळूणकरांचा प्रवाह चालू होता. **पण समकालीन सर्व प्रवाहांतून जोतीबा स्वतंत्र व स्वावलंबी राहिले.** कारण, विद्येत मागासलेला असा विराट समाज अंधःकारात लोळत पडला होता. त्याला जागे करून, गुलामगिरीची जाणीव करून देऊन विद्येद्वारे त्याला पुढे आणण्यासाठी समकालीन कोणत्याही वरील प्रवाहाशी एकरूप न होता गावागावांतील शूद्रांच्या उन्नतिप्रीत्यर्थ म. फुले यांनी १८७३ साली सत्यशोधक समाज स्वतंत्रपणे व स्वावलंबाने अनेक मित्रांच्या साहाय्याने चालू केला, हे जोतीरावांच्या सामाजिक व राजकीय अनेकविध कार्यावरील शिखर होय. त्याकरिता समकालीन राजकारणापासून सत्यशोधक समाज अलिप्त ठेवण्यात आला होता. कारण सर्वच जातींत व एकूण समाजात सनातन्यांची व परंपरावाद्यांची संख्या विपुल होती. जे काही सहकार्य मिळणे शक्य होते ते परकिय सरकारकडून व मिशनऱ्यांकडून प्रत्यक्ष व्यवहारात शक्य होते व व्यावहारिकदृष्ट्या अनेक समकालीन सुधारकांकडूनही जोतीरावांना शेवटपर्यंत असेच जास्त सहकार्य मिळाले. फडके-चाफेकर-टिळक-चिपळूणकर यांच्या सरकारविरोधी राजकारणाशी जोतीरावांचा प्रत्यक्ष भाग नव्हता किंवा या राजकीय जहाल प्रवाहात सामील होण्यास एकूण शेतकरी वर्गाला जोतीराव उद्युक्त करीत नव्हते. याचे कारण पुनः ब्राह्मणी राज्य झाल्यास सामाजिक-धार्मिक गुलामगिरी लोकांच्या मानगुटीवर बसेल. इंग्रजी राज्यातच या गुलामगिरीपासून मुक्त होण्याची संधी फक्त त्या वेळच्या इंग्रजी राज्यात उपलब्ध आहे. अशी बालंबाल खात्री जोतीबांना अनुभवाने झाली होती. शिवाय अव्वल इंग्रजीत ब्रिटिश साम्राज्यशाहीची पिळवणूक पुढे चालू झाली तशी त्या वेळी प्रथम नव्हती. ब्रिटिश राजवट तुलनेने चांगली व प्रगतिकारक आहे असे मत न्या. रानडे, मंडलीक वगैरे अनेक प्रांतोप्रातीच्या विवेकावंत पुढाऱ्यांचे होते. खुद्द राष्ट्रीय सभेचेदेखील होते. जोतीरावांचे मत आधी सामाजिक सुधारणेकडे होते. डॉ. आंबेडकर यांचेप्रमाणे राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याचे मोल अधिक समजत. सुधारकाग्रणी आगरकर आदिकरून पुष्कळ जबाबदार देशसेवकांचे हेच मुद्दे होते. एकूण सर्व प्रबोधनाचा हा परिणाम आहे.

'शिवाजीचा पोवाडा', 'ब्राह्मणांचे कसब' व 'गुलामगिरी' या पुस्तकांतून नव्याने स्थापावयाच्या सत्यशोधक समाजाचे सामाजिक, धार्मिक व एकूण सर्वांगीण स्वरूप कसे असावे याची पूर्ण कल्पना जोतीरावांनी दिलेली आढळते. या स्वरूपाची कल्पना 'गुलामगिरी' पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणावरून येऊ शकते.

**सत्यशोधक समाजाचे नियम :**

१) मी आपल्या उत्पन्नकर्त्यावाचून दुसऱ्या कोणालाच त्याचा मान देणार नाही.

२) जे लोक आपल्या एकतर्फी ग्रंथातील मताभिमानाच्या दांडगाव्याने कोणासही (म्हणजे नीच मानणाऱ्यास व नीच मानून घेणाऱ्यास) तसे आचरण करण्याची सवड देऊन, मी आपल्या उत्पन्नकर्त्याने निर्माण केलेल्या पवित्र अधिकारास बट्टा लावणार नाही.

३) मी माझ्याकडून जितकी पशुहिंसा व मद्यपान बंद करता येईल तितकी बंद करीन.

४) मी सत्याचा अभिमान मनी दृढ धरून प्रथम आपल्या समाजातील वृद्ध, पंगूस व पोरक्या मुलास साहाय्य देऊन एकंदर सर्व मुली-मुलास त्यांचे अधिकार समजण्यापुरती विद्या देण्यास झटेन.

('दीनबंधू', दि. २२ व २९ एप्रिल १८९४ मधून उद्‌धृत.)

**समाजाला प्रतिज्ञा व घटना होती**

जोतीरावांच्या काळात जातिसंस्था तुलनेने दृढ होती; पण वरच्या जाती खालच्या जातींना नीच-हलके-शूद्र मानीत. याविरूद्ध बहुजनांनी बंड केले ती म्हणजे सत्यशोधक चळवळ होय. आज वरील नीच व स्वतःस श्रेष्ठ मानण्याची प्रथा बहुतेक संपुष्टात आल्यासारखी दिसते. याचे श्रेय सत्यशोधक चळवळीला व पर्यायाने तिचे जनक म. फुले यांना देणे जरुरीचे आहे. अहंकाराची नांगी मोडून टाकून समता निर्माण करणे समाजाचे कार्य होते 'वर्ग' ही आधुनिक परिभाषा जोतीरावांना ठाऊक नव्हती तरी येथील चारीवर्णांना वर्गीय आशय होता. चौथा-शूद्र वर्ग फार गरीब असे. 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातील 'सत्यवर्णन' ह्या प्रकरणात पुढे एकूण सत्यवर्तनासंबंधी ३३ नियम दिले आहेत. त्यात वरील चार नियम पुनः समाविष्ट केले होतेच. हे सर्वधर्मविवेचन अखिल मानवासाठी होते व आहे. हे शिखर ठरते. तरीपण मुख्यत्वे करून आपल्या शूद्र वर्गाची उत्तरोत्तर निकृष्ट स्थिती होत चालली आहे. त्यांच्यामध्ये सत्यविचार कोणते असत्य विचार कोणते, या जगात मनुष्याचे वास्तविक अधिकार कोणते, त्यांची कर्तव्ये कोणती आणि हल्ली त्यास जी निकृष्टावस्था प्राप्त झाली, ती सुधारण्यासाठी सर्वांगीण कोणते उपाय योजले पाहिजेत, अशा सद्‌विचारांविषयी लोकांचे अगदी दुर्लक्ष झाले, हे पाहून हा समाज स्थापन केला आहे. आजही याच धोरणाने समाजाचे कार्य चालणे जरूर वाटते. असत्याचा अव्हेर व सत्याचा स्वीकार हे समाजाचे ध्येयधोरण व कार्य साहजिकच ठरते. जोतीराव प्रमुख संस्थापक-प्रेरक होते म्हणून **सत्यशोधक समाजाची रचना व त्यामागील त्यांचे नीतिप्रधान विचार व कार्य हे त्यांच्या जीवनाचे शिखर होय.** यामुळेच ते अमर झाले आहेत. 'गुलामगिरी' पुस्तकाची इंग्रजी व मराठी प्रस्तावना हा आद्य

सत्यशोधक समाजाचा 'मॅनिफेस्टो' ठरतो. पण बऱ्याच मुद्यांची कार्यवाही होऊन गेली आहे. आता यापुढे नवा विचार हवा.

### जोतीबांच्या जीवनाचा हिशेब

जोतीराव यांना एकूण त्रेसष्ठ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांच्या वाडवडलांच्या व आजोबांच्या काळात महाराष्ट्रातील सामाजिक वाद स्पष्ट स्वरूपात व उघडा नव्हता. निरक्षर लोक रूढी व त्यांचे परिणाम सोसत होते. शास्त्राधारावर समाज चाले. ग्रंथ हे ईश्वरनिर्मित आहेत म्हणून ते अबाधित व सर्वथा प्रमाण आणि पूर्ण आहेत ही कल्पना धर्ममार्तंडांनी निरक्षर बहुलोकांच्या मनात ठसवली होती. लोकांनीही ती पिढ्यान् पिढ्या मानली. इंग्रजी राज्य आल्यावर मिशनरी आले व त्यांनी हिंदू धर्मातील विसंगती व असंभाव्य गोष्टी चव्हाट्यावर मांडल्या. जोतीबांना ह्या टीका वाचावयास मिळाल्या. तसेच ते स्वावलंबी व चिकित्सक असल्यामुळे बायबलातही (व कुराणातही) सर्वच खरे नाही, असे त्यांनी वाचनाअंती ज्ञान करून घेतले. कोणताही ग्रंथ ईश्वरकृत नाही, माणसाने धर्मग्रंथ लिहिले आहेत, म्हणून मनुष्य स्वभावानुसार ग्रंथातून चुका व पक्षपात आहे, हे जाणून जोतीबांनी बुद्धिप्रामाण्यावर त्यांच्या समाजाची व एकूण चळवळीची उभारणी केली. मुलींच्या शाळेत सपत्निक शिक्षक असताना जोतीरावांची व त्यांच्या शाळेतील इतर ब्राह्मण शिक्षकांची वादावादी जुंपे, वादविवाद वाढे, वितुष्ट येऊन जोतीरावांनी शाळासंबंध सोडला. ग्रंथ वाचनात ते त्यांचा वेळ घालवू लागले. याच वाचन-चिंतनातून त्यांची एकापाठीमागे एक अशी अनेक पुस्तके निघाली. त्यांच्या आवृत्त्या निघाल्या व निघतील. हे एक जोतीरावांच्या आयुष्यातील महत्त्वाचे परिवर्तन होय. फुले आजन्म विद्यार्थी होते.

रेव्ह. मरे मिचेल या विद्वान मिशनऱ्याचा ग्रंथसंग्रह जोतीबांना वाचावयास प्राप्त झाला होता. पण १८५७ सालच्या बंडात त्या युरोपियनांचा जोतीरावांशी संबंध सुटला. धर्मांतरापेक्षा स्वधर्मसुधारणा सर्वात चांगली, असा जोतीरावांना स्वानुभव तयार झाला. 'बायबल' किंवा 'कुराण' वाचण्यासाठी व त्यातील चांगले विचार ग्रहण करण्यासाठी धर्मांतर करून परधर्म पत्करण्याचे कारण नाही, असाही निष्कर्ष जोतीबांना प्राप्त झाला. यामुळे धर्मांतराची गरज संपली व सर्वधर्मसमभाव नांदू शकला.

सत्यशोधक समाजाची ही व्यापक दृष्टी होती. पुढे भाऊराव पाटील यांनीदेखील 'शिक्षणकारण' केले व हे ध्येयधोरण बरेच यशस्वी झाले. शिक्षणप्रसार शूद्रांत करणे हा सत्यशोधक समाजाचा प्राणभूत मुद्दा होता. वक्ते, लेखक, संपादक, मुद्रक वगैरे जाणणारी मंडळी पुढे यावीत व मुलामुलींनी विद्या शिकावी यासाठी बक्षिसे व विद्यावेतने द्यावीत, असे

प्रयत्न सत्यशोधक समाजामार्फत प्रथम झाले. पुढेतर फक्त शिक्षणप्रसारावर जोर दिला गेला. या कार्यात जोतीबा व त्यांचा समाज बराच यशस्वी झाला. वसतिगृहाची चळवळ व विद्यावेतन देणाऱ्या संस्था विद्येत मागासलेल्या वर्गात निघाल्या. सत्यशोधक समाजाचे कार्य वाढत असताना १८७७ साली मोठा दुष्काळ पडला. जोतीरावांच्या जन्मापूर्वीपासून ते मरणोत्तर १८९६ अखेरपर्यंत महाराष्ट्रात दुष्काळ व रोगराई होती. यामध्ये प्रजा हैराण होई. १८७७ सालात मोठा दुष्काळ पडला. यामुळे जोतीरावांचे लक्ष शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे अधिकाधिक वळले. आसूडाचे निबंध यामुळेच लिहिले गेले. जोतीराव केवळ इतिहासचिंतक व अभ्यासक नव्हते तर वर्तमान प्रश्नांवर त्यांच्या कृतीचा प्रत्यक्ष भर असे. शेतकऱ्यांनी १८७७ साली महाराष्ट्रात दंगे केले. या सर्वांचा मोठा परिणाम म्हणून १८८८ साली पहिला डेक्कन ॲग्रीकल्चरचा कायदा प्रसार झाला. याप्रमाणे शेतकऱ्यांचे राजकारण जोतीबा करत असत. आसुडाच्या निबंधातून शेतकऱ्यांच्या आत्मपरीक्षणावर व आत्मदोष निरसनावर जास्त भर आहे. सामाजिक, राजकीय दुःखाला फक्त ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म कारण नसून स्वतः शेतकरी प्रजादेखील स्व-दुःखाला कारणीभूत आहे. असे आत्मटीकापूर्ण निरीक्षण जोतीबांनी परखड लिहिले आहे. गुलामगिरी लादून घेणारा व घेणारे गुलामगिरी लादणाऱ्याऐवढे दोषी असतात, असे परखड विचार जोतीबात आहेत. जास्तीत जास्त लोकांवर मूठभर शिकलेले लोक सर्वांगीण गुलामगिरी लादतात. ती लादून युगानयुगे घेतली जाते, याबद्दलचे आश्चर्यदेखील जोतीरावात सापडते.

### सारांश

### जोतीरावांचे सामाजिक व राजकीय विचार

हा विषय येथे आहे. इंग्रजी साम्राज्य स्थिर होऊन त्यामध्ये व्हिक्टोरिया राणीची शांतता व दीर्घ प्रगतिशील कारकीर्द त्या वेळी चालू होती. काठीला सोने बांधून रामेश्वर ते काशीपर्यंत सुखाने प्रवास करावा, असा बंदोबस्त भारतात चोहोकडे निर्माण झाला. शिक्षण सार्वजनिकपणे सर्वांना खुले झाले. सिव्हिल प्रोसिजर कोड व क्रिमिनल प्रोसिजर कोड सर्वांना लागू झाले. पूर्वी ब्राह्मणालादेखील खून माफ होता, तो आता मात्र इंग्रजी राज्यात माफ करण्याचे बंद झाले. सामाजिक समता व न्याय आला. पेंढारी वगैरे लोक दंगे व लूट करीत, त्यांची अरेरावी बंद झाली. भिल्ल व रामोशी यांचे बंड मोडले गेले. १८५७ चा उठाव पूर्ण पराभूत झाला. पोस्ट, रेल्वे, पोलीस खाते, न्यायसंस्था वगैरे प्रकारे राज्याची नवी घडी बसली. राणीच्या काळात-देशी राज्यांच्या मानाने इंग्रजी राज्य चांगले आहे, अशी जास्तीत जास्त

लोकांची देशात धारणा होती. शेतकरी लोकांना शिकून पुढे येण्याचा हाच अपूर्व काळ आहे व उठाउठी करून शूद्रातिशूद्रांनी शिकून पुढे यावे, असा जोतीबांनी व्यवहार्य आवाज उठवला व तो लोकांनी शिरसावंद्य मानला. आज जी काही थोडी प्रगती दिसते तिचे पहिले श्रेय जोतीरावांकडे जाते. 'इंग्रज आज आहे उद्या नाही. तो आपल्या जन्मास पुरणार नाही' हे आता खरे झालेले सत्य सांगून जोतीबांनी लोकांना शिक्षणाभिमुख केले. स्वतः जोतीरावांचे क्रांतिकारकांशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध असलेले काही पुरावे आता प्रत्यक्ष मिळतात. पण हा क्रांतिवादी हिंसक कार्यक्रम त्यांनी त्यांच्या अनुयायांना मुळीच सांगितला नाही. ज्या वासुदेव बळवंतांशी जोतीरावांची तरुणपणी सलगी होती, त्या क्रांतिकारक फडके यांना जोतीरावांनी वृद्धपणी धारेवर धरले आहे.

रानडे-भांडारकर यांच्याप्रमाणे जोतीराव सनदशीर, प्रागतिक, मवाळ आणि नेमस्त राजकारणाचे सक्रीय पुरस्कर्ते होते. त्यांना राजकीय हक्क पाहिजे होते, पण ते संख्येच्या प्रमाणात शूद्रातिशूद्रांच्या पदरात पडले पाहिजेत, असा त्यांचा पवित्रा होता. हा खरा प्रातिनिधिक लोकशाही विचार आजही चिंत्य व जरुरीचा आहे. पूर्वी 'शास्त्राधारावर' सर्व समाज चाले व धर्ममार्तंड त्यांना पाहिजे तो सोईचा शास्त्राधार देत. निरक्षर जनता धर्म, कर्म व व्यवहार याबाबतीत फसवली जाई.

## जोतीरावांचे राजकीय विचार व कृती

जोतीरावांनी परकीय इंग्रजाला व काळ्यागोऱ्या नोकरशाहीला तीव्रपणे धारेवर धरले. ते कोणाचे शरमिंधे नव्हते. ताकाला जाऊन भांडे लपवायचे अशी त्यांची धूर्त पद्धत नव्हती.

जोतीरावांचा मुख्य राजकीय 'डाव' हा होता की आर्यब्राह्मण हे परकीय-परदेशातून येथे आले व त्यांनी तेथील मूळच्या रहिवाश्यांना दास केले व स्वाऱ्या करून जिंकले. आर्यब्राह्मणांनी नानाविध मतलबी ग्रंथ तयार केले. ते ईश्वरकृत म्हणून अपरिवर्तनीय आहेत असा विचार जारी करून असंख्य मूळ रहिवाशांवर धार्मिक गुलामगिरी आज हजारो वर्षे लादली आहे व लोकांनी ती मान्य केली आहे. **गुलामगिरीची जाणीव करून देणे हा जोतीबांच्या विचारांचा कणा ठरतो.** या आधारे त्यांनी ब्राह्मणांना उपरे व परकीय ठरवले. यामुळे या दोघांत अंतर पडले. विग्रह झाला. दुसऱ्यांना नीच-शूद्र समजणाऱ्या ब्राह्मणांवर बहिःष्कार टाकण्याची सामाजिक पद्धत जोतीबांनी स्वतः शोधून काढली. हजारो वर्षांपासून लग्नादी गृहसंस्कारांमध्ये ब्राह्मण पुरोहितांचे वर्चस्व होते, ते दूर करण्यासाठी त्यांनी खूप

प्रयत्न केले. या दृष्टीने जोतीबा राजकीय ब्राह्मणेतर चळवळीचे व पक्षाचे मूळ संस्थापक ठरतात. ब्राह्मणांवर बहिःष्कार घालणे, त्यांना वगळणे, त्यांच्याशी सहकार्य न करणे, जे करतील त्यांना जोतीरावांनी धारेवर धरले. 'भटाळणे' हा शब्द पुढे आला त्याचे निर्मिक जोतीराव ठरतात. ब्राह्मणांना निवडणुकीत निवडून न देणे, त्यांना मते न देणे, ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणेतर प्रतिनिधींनाच फक्त निवडून देणे, अशी ब्राह्मणेतर चळवळ शाहू काळात व नंतर १९३५ पर्यंत झाली. तिचे राजकीय नेतृत्व म. फुल्यांच्या मागील विचारांच्या उपलब्धतेमुळे झाले. महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक ब्राह्मण-अब्राह्मणवादाचे जनकत्व म. फुले यांच्याकडे जाते. 'फोडा आणि झोडा' ही कुटील नीती चालवणाऱ्या परकीय इंग्रजांनी ह्या ब्राह्मणेतर वादाचा थोडाफार राजकीय फायदा घेतला. मात्र म. फुले, शाहू यांच्या ब्राह्मणेतरवादाला प्रमाण न धरता १९१७ सालापासून महर्षी शिंदे यांच्या राजकीय सल्ल्यानुसार ब्राह्मणेतरपक्ष म. गांधी-नेहरू यांच्या चळवळीत स्वराज्य संपादनार्थ सामुदायिकपणे गेला. या पक्षाने काँग्रेस ताब्यात घेतली. हे मोठे राजकीय परिवर्तन होय. म. फुले यांना सर्वथा प्रमाण न मानता वेळोवेळी स्वतंत्र विचार केला जाई व जातो.

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील काँग्रेसवर जी घट्ट पकड राखली, तिचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष श्रेय फुले-शाहू यांच्या राजकीय चळवळीकडे जाते. आतासुद्धा बहु-जनतेकडे जास्त सत्ता येत आहे, हा म. फुले व शाहू यांचा जय आहे. मात्र यासंबंधी अद्याप अनेक क्षेत्रात पुष्कळ वाटचाल करावयाची आहे. शिक्षणकारणात बहुलोकसमाजाचा मोठा शिरकाव आता झाला असला तरी वृत्तपत्रसृष्टी-साहित्य वगैरेंवर त्यांचा ताबा सिद्ध झाल्याशिवाय, तो पुढे आला असे म्हणता यावयाचे नाही. मागासलेपणाची जाणीव दलितांसह सर्व शेतकरी समाजाला करून देण्याची आजही गरज आहेच. सांस्कृतिक क्षेत्रात अद्यापि बहुजन समाज मागे आहे.

परंपरागत पुरोहितांवर कायम बहिष्कार टाकून सत्यसमाजाने स्वतःचे पुरोहित तयार करणे, ही एक धर्मक्रांतिकारक चळवळ झाली. ती स्वातंत्र्योत्तर काळात इतिहासजमा झाली. कारण भिक्षुकी धंद्याला व्यवसायात्मक लोभी परंपरेचे स्वरूप असल्यामुळे त्याला खुद्द ब्राह्मणात व अब्राह्मणात एरव्ही प्रतिष्ठा व मानसन्मान राहिला नाही. ब्राह्मणातही भिक्षुकी करणाऱ्यांना गृहस्थाएवढा मान नसतो. पूर्ववत चालू ब्राह्मण भिक्षुकी ब्राह्मणतेरांना शूद्र-शूद्र समजत नाहीत. रोटी व्यवहारही करतात. यामुळे यांची जरुरी लग्नकार्यात केवळ प्रासंगिक असते. जोतीबांच्या भिक्षुकशाहीविरोधी चळवळीमुळे तिचे महत्त्व संपले. ख्रिस्ती व मुसलमान धर्मातील पुरोहितशाही धर्मप्रसार करते, धर्मांतरे घडवून आणते. त्याप्रमाणे ब्राह्मणी व

भिक्षुकशाही ही याअर्थी कधीच उपयोगी नव्हती. 'यजमान व भिक्षुक' असा गृह्य व कौटुंबिक संबंध असे. आताही यापुरती सर्वच समाजांना भिक्षुकाची गरज लागते व ही मंडळी पौराणिक विधी करतात. ईश्वराकडे नवस, प्रार्थना करतात व आत्मविश्वास हरवून येतात. विशाल दृष्टिकोन रोखला जातो. अर्थाविना पाठांतर सांगणाऱ्यांचा निषेध तुकारामातही होता. जोतीबांच्या धार्मिक-सामाजिक चळवळींची कालांतराने जी दुर्दैवी गत झाली ती अभ्यासण्यासारखी आहे. आजतागायत गुरू हेदेखील 'हायप्रिस्ट' होते. पण त्यांची गरज समाजाला वाटत नाही. हिंदू कर्मकांडरूढी म्हणून समाधानासाठी चालू राहिले आहे. धर्म व समाज सुधारणेसाठी कर्मकांडात व तत्सम रूढींमध्ये जे तत्त्वनिष्ठ परिवर्तन हवे होते, त्या गेल्या शतकातील सर्वच धर्म सुधारणापर चळवळी आता स्वातंत्र्यात निमाल्या. धर्मच गौण व दुय्यम झाला. जोतीरावांच्या वेळचा काळ व आताचा नवा काळ यात महदंतर पडले आहे, म्हणून जोतीबांच्या सामाजिक व राजकीय मतांची नव्याने नवीन चिकित्सा करणे प्राप्त आहे. यजमान व भिक्षुक यांना संसारात पुरोहितशाही जरुरीची वाटते म्हणून टिकून आहे.

जोतीबांची (व शाहूंची देखील) चळवळ महाराष्ट्रापुरती प्रांतिक होती. आता हिचा अभ्यास चालू आहे. थिटेपण जागवले पाहिजे. ब्राह्मणेतर पक्षदेखील मूलतः म. फुले प्रणित होता व तो फक्त मुंबई इलाक्यातील व दक्षिण हिंदुस्थानातील होता. ज्या चळवळी अखिल भारतीय नसतात त्यांना मर्यादा पडतात व त्यांची वर्धमानतादेखील खुजी ठरते. तशी प्रातांतील स्थानिक प्रश्न प्रांताकडून गौण मानण्यात तोटाच असतो. लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय सत्तेत भागीदारी वाटा प्राप्त होणे, हे न्यायाचे होय. म. जोतीरावांचे राजकारण यावर उभे होते. पण आता त्यांचा विचार आपापसांतील भाऊबंदकी व राजकीय स्पर्धात्मक यादवी यामुळे धोक्यात आला आहे.

कालांतर झपाट्याने होत असते. स्वजातीचा प्रतिनिधी निवडून आला तर तो समाजाचे (स्वजातीचे) हितच करतो, असा प्रत्यक्ष सार्वजनिक अनुभव नाही. ही बाब दलितांसह सर्वांनी लक्षात ठेवावी. विकासातील प्रश्न सार्वजनिक व सार्वत्रिक, राष्ट्रीय असतात. काळ पुढे चालला आहे व पुनः जशीच्या तशी पेशवाई येईल, ही भीती निराधार आहे. स्वजातीचा अधिकारी स्वजातीकडून लाच घेत नाही असा अनुभव प्राप्त झाला नाही.

जोतीरावांच्या 'सामाजिक-राजकीय' विचारांत शेतकरी-मजूर-कामगार व श्रमिक (तळागाळातील) लोकांचे प्रश्न सामावले होते. ते शेती-शेतकरी-मजूर यांचे प्रश्न शास्त्रीय दृष्टीने सोडवणे हा यापुढचा प्रश्न आहे. श्रमाला व श्रमिकाला प्रतिष्ठा प्राप्त होण्याची

गरज आहे. सार्वजनिक सत्यधर्माच्या विचारांची येथे स्वतंत्र विचार करण्याची कक्षा नव्हती. तरी धर्म म्हणजे कायदा असा एक अर्थ जोतीबांना अभिप्रेत होता. त्या दृष्टीने समान नागरिक कायदा हवाच आहे. **अंधश्रद्धा निर्मूलन सामाजिक-धार्मिक क्षेत्रात होण्यासाठी पार्थिव जडपूजा-अवतारवाद-ग्रंथप्रमाण्य-जातिभेद वगैरे ज्या बाबी जोतीबा सोडावयास सांगतात, त्या ठेवून निकोप बुद्धिप्रामाण्यवादी लोकशाही राजकारण कधीच निर्माण होणे नाही.**

(अप्रसिद्ध शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ,
राज्यशास्त्र विभाग परिषद, १९८३-८४)

******

# ३ म. फुले : काळ, कार्य आणि विचार यांचे नवदर्शन

म. फुले यांचा काळ पेशवाई-मराठी राज्य गेल्यानंतरचा होता. याला अव्वल इंग्रजीचा काळ म्हणून म्हटले गेले. हा काळ सम्राज्ञी व्हिक्टोरिया राणीचा, भारतभर ब्रिटिशांचा अंमल भक्कमपणे बसला होता व ब्रिटिश साम्राज्यात शांतता होती. म्हणून हा कालविभाग प्रगतीचा ठरला. उदार धर्माचे सर्वत्र नवे वारे वाहत होते. पण पेशवाई गेली होती तरी तिची सावली पुण्यात विशेषतः होतीच. इंग्रजी राज्य आले होते तेव्हा विद्येची परंपरा असलेला, पण संख्येने अल्प असलेला समाज नवे शिक्षण घेता झाला. इंग्रजी विद्येला राज्यकर्त्यांची भाषा म्हणून कारभारात संस्कृतपेक्षा मोठे स्थान प्राप्त झाले. इंग्रजी भाषेत आधुनिक ज्ञान व विज्ञान असल्यामुळे इंग्रजी शिकलेली पहिली पिढी मोठी चौकस व चिकित्सक अशी सुधारक बनली. म्हणजे जे इंग्रजी शिकले त्यांना सुधारक म्हणून संबोधिले जाऊ लागले. समाजसुधारकांचा नवा वर्ग येथे निर्माण झाला. जोतीबा फुल्यांना क्रांतिकारक सुधारक म्हणतात, याचे कारण त्यांनी आगरकरांप्रमाणेच कौटुंबिक सुधारणेचा त्यांच्या अगोदर क्रियाशील उपक्रम प्रत्यक्ष केला. एवढेच नव्हेतर त्याही पुढे जाऊन सामाजिक प्रकारे विद्येत मागासलेले व अतिमागासलेले शूद्रातिशूद्रांच्या उन्नतीसाठी खास प्रयत्न करण्याचा नवा व आधुनिक पायंडा पाडला. तळा-गाळातील व अस्पृश्य मानलेल्या हीन-दीन-तिरस्कृत-बहिष्कृत अशा लोकांना जवळ घेऊन, त्यांना शिक्षण देण्याचाही पहिला उपक्रम केला लोकहितवादींनी समाजाच्या पृष्ठथराला जागे करून, त्यांना नव्या इंग्रजी शिक्षणाची महती पटविली. हा पृष्ठथर इंग्रजी शिक्षण घेता झाल्यामुळे इंग्रजी राज्य चालविण्यासाठी ब्रिटीशांनी जी नवी पण देशी स्थानिक नोकरशाहीची चौकट निर्मिली होती ती साहजिकपणे प्रायः या वरिष्ठ थराचीच बनली. गोरी नोकरशाही प्रमुख वरच्या महत्त्वाच्या जागी होती हे खरे पण देशी नोकरशाहील महत्त्व देऊन त्यांच्या कलाने किंबहुना मर्जीने विदेशी गोरी नोकरशाही राज्य करीत होती. पेशवाई गेली तरी या शहरी पांढरपेशा नोकरशाहीचे अधिराज्य झाले होते. बाकीचा अफाट निरक्षर बहुलोक समाज, अज्ञानांधकारात लोळत होता. विद्या देणे व घेणे हा आपला परंपरागत धर्म नाही व आपल्या वर्णजातीनुसार हे आपले काम नाही. यावाचून काही औत-नांगर अडत नाही अशी शूद्रातिशूद्र लोकांची घट्ट व मठ्ठ धार्मिक समजूत होती. यामुळे विद्यावंचित सर्वजण अंगठे बहाद्दर राहिले. जोतीबांनी प्रथम 'आरोळी' ठोकली. त्याप्रमाणेच पृष्ठथराने "विद्या बंदी केली"

असेच एककल्लीपणाने शूद्रातिशूद्रानी पिढ्यान्‌पिढ्या स्वतःला निरक्षर ठेवून घेतले होते. परंतु इंग्रजी राज्य आल्यावर सर्व 'जातीमात्र विद्यापात्र' झाले व ठरवले गेले. अशा नव्या काळात जोतीराव मराठी व इंग्रजी शिकले व इतरांनी विद्या शिकावी म्हणून पहिले पुढारी व नेते होऊन विद्याप्रसाराची त्यांनी चळवळच चालू केली. यासाठी नवसमाज स्थापला. त्यांचे शिक्षण मिशनरी इंग्रजी शाळेत झाले. अगोदर गावठी मराठी प्राथमिक शाळेत शिकले. त्यांना विद्याजागृती करणारे, बरेच प्राकृत अनुयायी उत्तरोत्तर भेटत गेले व त्यातून मराठी शिकलेली कार्यकर्ती पुढारी मंडळी तयार होत गेली. पण जोतीबांच्या समकालात त्यांच्याएवढे इंग्रजी शिकलेले व वाघिणीचे दूध प्यायलेले दुसरे कोणी जाणते व चिकित्सक नेते त्यांच्यात नव्हते. नव्या काळाचा अर्थ जाणणारे व देणारे पहिले जोतीबा ठरतात. योगायोगाने त्यांना शिक्षण प्राप्त झाले. आपण नव्या काळात विद्यामृत प्याले हे खरे, पण दुसऱ्या सर्वांना ज्ञानामृत देण्याची नवी बुद्धी निर्माण करणारे, ते पहिले म्हणून पुढे आले. हा वरील सर्व चमत्कार वाटतो. विद्याक्रांतीची 'तुतारी' वाटते. मराठे-माळी-कुणबी-महार-चांभार वगैरे विद्याविहीन लोकवर्गाकडे सरस्वती आता थोडीबहुत गेलेली दिसते, याचे पहिले श्रेय जोतीबांकडे जाते. ते याप्रमाणे नैसर्गिक 'महात्मा' : सर्वसामान्यांच्या परिभाषेत एक युगपुरुष ठरल्यास नवल वाटण्याचे कारण नसावे. ते डॉन ब्रेकरच होते. मध्ययुगाचा पडदा फाडून नवयुगाची नवी जाणीव करून देणारा व शिक्षणाची मुळीच आवड व परंपरा ज्यांच्यामध्ये नाही, त्यांना सक्तीचे शिक्षण द्यावे, ह्यासाठी आकाशपाताळ एक करणारा हा महापुरुष ठरला. पुढे ना. गोखले सक्तीच्या शिक्षणासाठी खपले. स्त्री शिक्षणासाठी कर्वे खपले. अस्पृश्योद्धारासाठी शिंदे-गांधी व आंबेडकर खपले. विद्याप्रसारार्थ सयाजीराव-शाहू-भाऊराव-पंजाबराव वगैरे अनेक 'कर्मवीर' विद्योत्तेजक चळवळी करणारे पुढे आले व खपले. ही सर्व अपूर्व परंपरा नव्याने ज्यांना लाभली ते नवमार्गदर्शक, नवपंथ संस्थापक (पायोनिअर) म्हणून मानाचे पान प्रथम जोतीबांना देण्याचे अटळ कर्तव्य आहे. यातच जोतीरावांची थोरवी प्रमुखतः सामावते. ही केवळ शब्दफुलांनी बांधलेली त्यांची पूजा नव्हे. केवळ औपचारिक असा त्यांचा सत्कार-गौरव नव्हे, तर वस्तुस्थिती ठरते. 'तृतीय नेत्र' विद्येचा 'तिसरा डोळा' प्रत्येक माणसाला प्राप्त व्हावा, म्हणून सक्रीय तळमळणारे व पुढील नवशिक्षणप्रसाराचे उद्‌गाते म्हणून जनतेला नव्या काळानुसार 'शिक्षणमंत्र' देणारे जोतीबा व त्यांचे कार्य धन्यता पावते. केवळ 'रामकृष्ण हरी' एवढाच मंत्र नव्या लोकशाहीच्या आगामी काळात पुरा पडणार नाहीच तोच फक्त चालणार नाही अशी इहवादी जाणीव त्यांना दिली. 'स्वर्ग' ही कल्पना आहे. मुक्ती-मोक्ष (स्वातंत्र्य) विद्यासंपादनात आहे. असा क्रांतिकारक नवसामाजिक धर्म सांगणारे जोतीबा. स्त्री-शूद्रातिशूद्रांना राज्यकर्ते व्हावयाचे असेल तर नवशिक्षणाचा एकच मार्ग म्हणजे विद्या घेणे होय, असे हे

सर्व आता जोतीबांच्या नंतर शंभर वर्षानी सिद्ध झाले आहे. त्यांची शताब्दी आहे. त्यांना तळागाळातील स्त्री-पुरुष सर्व समाज का मानतो ?

विधवा विवाह, भ्रूणहत्याबंदी, बालविवाहबंदी वगैरेत तत्कालीन सामाजिक सुधारणा प्रत्यक्षात आणण्याचा त्यांनी सक्रीय प्रयत्न केला. स्त्री-शूद्रातिशूद्रांसाठी शाळा घातल्या व यामुळे पुण्यातील आधुनिक काळातील एक सुधारक पुरुष म्हणून ठरवले गेले, हे तर खरेच पण या सर्वाला आणखी एक पार्श्वभूमी होती, ती म्हणजे अब्राहम लिंकनप्रमाणे गुलामगिरी विनाश करण्याच्या प्रयत्नांची. जॉर्ज वॉशिंग्टनचे चरित्र त्यांनी वाचले. शिवाजीवरील ग्रंथ वाचले.

जोतीबांच्या आजोबांचा शनिवारवाड्यात जाऊन फुले पुरवण्याचा व्यवसाय असल्याने त्यांना परंपरेने पेशवाईचे, त्यातल्या त्यात बाजीरावी उत्तर पेशवाईचे समक्ष ज्ञान होणे शक्य झाले. मराठी राज्य गेल्याने तलवारी गेल्या. शस्त्रबंदी कायद्याने कायम झाली व फक्त नांगर राहिला. शेतकरी सालोसालचे दुष्काळ, साथीचे रोग, कर्जबाजारीपणा यामुळे जेरीस आला. इंग्रजांनी नवी कोर्टे वसवली व सावकारांची कर्जे हुकूमनामा बजावून कायद्याने वसुली करून देण्याची एक नवी चौकट तयार केली. सावकारी हा धंदा पेशवाईपासून चालत आला होता, पण अव्वल इंग्रजीत त्याला न्याय व अंमलबजावणी खात्याचा आधार मिळाला. यामुळे शेतकऱ्यांची शेती बिनकसणाऱ्यांकडे जाऊ लागली. पूर्वीच्या इनामदारशाहीत भर पडली. शेतकरी हे ‘कुळे’ झाले. फक्त कुणबी बनले. खोत बलवत्तर झाले. कुलकर्णी-पाटील गावचे राजे होते. महसूल-शेतसारा व लोकल फंड इंग्रज सरकारला, जप्त्या करून वसूल करून देऊ लागले. सावकारांचे चक्रवाढ व्याज वाढू लागले. परंपरेने व पिढ्यान्‌पिढ्या शेतकरी कर्जबाजारी झाला. उघडा तो बंब । लंगोट्या बहाद्दर ।। असे जोतीबांनी शेतकऱ्यांचे स्वतःच वर्णन केले आहे. जुनी सामाजिक व धार्मिक गुलामगिरी होतीच. त्यात नव्या आर्थिक गुलामगिरीची अव्वल इंग्रजीत मोठी भर पडली. परिणामी महाराष्ट्रात सातारा, पुणे, अहमदनगर या टापूत शेतकऱ्यांचे ‘दख्खनचे दंगे’ इ. स. १८७५ साली झाले. हे Deccan Riots म्हणून प्रसिद्ध झाले. जोतीबांच्या चळवळीला देशावर शेतकरी चळवळीचे स्वरूप आले. या चळवळीचे पहिले मुखपत्र मुळी ‘दीनबंधु’ (Friend of the Poor) या समर्पक नावाने १८७७ पासून चालू झाले. पुढे ‘शेतकऱ्यांचा कैवारी’ निघाला. वर्तमानपत्रांची नावेदेखील ध्येय सूचित करणारी होती.

## शेतकऱ्यांचे प्रश्न

विद्येच्याद्वारे शूद्रातिशूद्रांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे हा एक जोतीरावांनी १८७३ सालात स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचा उद्देश होता. सत्यासत्य ओळखून

असत्याचा त्याग करून सत्यवर्तन करणे यासाठी शिक्षणप्रसार हाही दुसरा उद्देश होता. यासंबंधाने ह्या लेखाच्या प्रास्ताविकात मी बराच ऊहापोह केला आहे. जोतीबांनी मागची व त्यांच्या वेळची समाज परिस्थिती स्वतःच लिहिली आहे व भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

१८७० नंतर जोतीबांच्या चळवळीला शेतकरी रयतेची चळवळ-उठाव असे स्वरूप येऊ लागले. विद्याप्रसार थोडाथोडा सरकारीरीत्या वाढत होता. तरी लोकल फंड शूद्रादि-शेतकरी-रयतेकडून-प्रजेकडून वसूल केला जाई, पण लोकल फंड जास्तीतजास्त उच्च शिक्षणार्थ खर्च होई. ही इंग्रजांनी अमलात आणलेली विषमता व पक्षपात 'गुलामगिरी' (१८७३) या पुस्तकाच्या आधारे सत्यशोधक समाज स्थापनेपूर्वीच उघडकीस आणली होती. अन्याय मग तो कोणाचाही का असेना त्यांनी तो चव्हाट्यावर नग्न स्वरूपात बेधडक मांडला. ते शूर वक्ते व लेखक होते.

## सत्यशोधक समाजाच्या संस्थापनेकडे

'शिवाजीचा पोवाडा (१८६९)' कसब (१८७३) ह्या दोन पुस्तकांच्याद्वारे सामाजिक-धार्मिक गुलामगिरीचे नग्न स्वरूप धारदार भाषेत जोतीबांनी अगोदर साहित्याद्वारे व्यक्त केले होते. जेव्हा मुद्दे केवळ व्यक्तिवाचक नसतात, फक्त कौटुंबिक नसतात, तेव्हा त्यांच्यासाठी संघर्ष करणारी सार्वजनिक चळवळ उभी राहते. परमहंस सभेप्रमाणे असलेले सत्यशोधक समाजाचे जे पहिले स्वरूप होते, त्यात नवी भर पडून शेतकरी-कष्टकरी जनतेच्या लढ्याचे स्वरूप येत गेले. टिळकांच्या 'केसरीने', नेमस्तांच्या 'इंदुप्रकाशनाने' पुढे मागे शेतकरी प्रश्नावर नंतर लिहिले. पण १८५७ च्या उठावानंतर जोतीबांनी लहान लहान प्रसिद्ध व काही अनुपलब्ध पुस्तिकांद्वारे सामाजिक-धार्मिक पिळवणुकीचे स्वरूप मांडताना तिच्यातून जी आर्थिक पिळवणूक चालली होती तीही विशद करण्याचा सपाटा चालवला होता. फक्त पुरोहितशास्त्री यांच्या विरुद्ध लढा नव्हता.

## आर्थिक आशय

जोतीबांच्या साहित्याकडे केवळ स्वतःस श्रेष्ठ परंपरागत मानणाऱ्या वर्णवर्चस्ववादींच्या विरुद्ध बंड व विलक्षण शाब्दिक मारा एवढेच बाह्यदृष्टीने पाहू नये. नारळाच्या आत खोबरे असते, करवंटी म्हणजे नारळ नव्हे. फणसाच्या आवरणाला काटे असतात, पण आत फणसाचे गरे असतात. ज्यांना सार्वजनिकपणे जास्तीत जास्त सर्वांचे हित व्हावे, असे वाटत असेल, त्यांनी जोतीबांच्या तीक्ष्ण शब्दामागचा आशय (नेमका उद्देश) शोधला पाहिजे.

शिवाजीच्या पोवाड्यात शिवाजीला जोतीरावांनी 'कुळवाडीभूषण' असा अनन्यसाधारण किताब दिला आहे. शिवाजीला शेती आणि शेतकरी यांचे संरक्षण व संवर्धन करावयाचे होतेच, तो गोरगरिबांचा कैवारी होता. त्याला सर्वसामान्यांचे रक्षण करावयाचे होते. सामान्याला पुढे आणावयाचे होते. या दृष्टीने त्याने महसूल खात्यात अनेक सुधारणा केल्या. लष्कराला शेतीस त्रास न देण्याचे हुकूम केले. शिवाजीची ही आर्थिक अशी रयतेसंबंधीची दृष्टी शिवाजीचा जोतीकृत पोवाडा सुचित करतो.

भिक्षुकशाहीचे ब्राह्मणी 'कसब' या पुस्तकात देवाधर्माच्या नावावर व भांडवलावर रयतेच्या जन्मापासून ते मरेपर्यंत कशी आर्थिक लुबाडणूक होते ते स्वच्छ सांगितले आहे. पण जोशी, पुरोहित, बुवा, बाबा यांची जरुरी सर्व समाज पाळतो. म्हणून ह्या बाबी हयात राहतात. विविधपणे पिळवणूक होत असते हे सांगितले आहे. देवधर्माच्या नावावर चालवलेल्या आर्थिक पिळवणुकीचे दर्शन दिले आहे. पिळवणूक करून घेणारेदेखील दोषी धरले पाहिजेत. आजही तीर्थक्षेत्रातून, जत्रायात्रांतून काय चालते ?

गुलामगिरी पुस्तकाच्या उत्तरार्धात नव्या इंग्रजी राज्यातील काळ्या-गोऱ्या नोकरशाहीकडून होणारी पिळवणूक व फसवणूक मांडली आहे. 'गुलामगिरी' पुस्तकाच्या शेवटी जोडलेल्या कविता-अभंग व विशेषतः पोवाडे यामध्येदेखील आर्थिक व राजकीय आशय आहे. 'भरती होळकरी पोती' नोकरशाहीत सर्व जाती-धर्माच्या लोकांची भरती होत नाही. इंजिनिअर खात्याच्या पोवाड्यात मिस्त्री-ओव्हरसिअर वगैरेकडून निरक्षर मजुरांची कशी फसवणूक होते, हे दाखवले आहे. परिस्थितीचा वास्तविक फोटो म्हणजे जोतीरावांचे दाहक असे जळते साहित्य होय! निखाऱ्याप्रमाणेच जोतीबांची पुस्तके अग्नीरूप असून भाजणारी आहेत. आता वास्तव बदलले आहे. नोकरशाहीत दलितांसह सर्वत्र अब्राह्मण थोडेफार आहेत. कुलकर्ण्याऐवजी तलाठी-ग्रामसेवक आले आहेत. मामलतदार सर्व ब्राह्मण होते तो जोतीबांचा काळ आता नाही. त्यांच्या पलिकडे जाऊन नवे वास्तव पाहिले पाहिजे. आजची विविध जाती-जमातींची नोकरशाही (श्रेष्ठ व कनिष्ठ) लाच घेते. कुंपणच शेत खाते. सरपंचदेखील पिळतो. सहकारी, सावकारी बँका वगैरेंद्वारे स्वाहाकार चालतो. विधी मंडळात व राज्यसभेत ग्रामीण भागातील प्रतिनिधी पुष्कळ निवडून येतात. पण ते त्यांचे व त्यांच्या सग्यासोयऱ्यांचे जास्त करून हित पाहतात, वर्णी लावतात. दलितांमधूनही जे नोकरशाहीत वरिष्ठ जागांवर अंमलदार झाले आहेत, तेही दलितांसह सर्वांकडून लाच घेत नाहीत असे नाही. समाजातील वरील थरातील पंतोजीमास्तर वर्णाभिमानाने आता कोणास शूद्रातिशूद्र समजून नीच मानत नाहीत. परिवर्तन जोतीबांच्या मागणीप्रमाणे किती झाले, किती व्हायचे आहे याचा आढावा शताब्दीनिमित्त दिला घेतला पाहिजे. प्राथमिक शिक्षण थरापासून ते थेट उच्च महाविद्यालयापर्यंत आता अब्राह्मण

शिक्षक अध्यापक-प्राध्यापक व प्राचार्य पुष्कळ झाले आहेत. जोतीबांप्रमाणे ते कळकळीने किती शिकवतात? शिक्षणात व सहकारी क्षेत्रात राजकारण धुडगूस घालत आहे. जोतीबांचा शेतकरी बळीराजा सुखी झाला आहे काय? असे आत्म दोषाविष्करण व्हावे. आत्मपरीक्षण व्हावे. केवळ जोतीबांच्या दशावतार विवरण, पौराणिक व ऐतिहासिक चिरफाड, राम व कृष्णादिदेवादिकांच्या चरित्रातील कोडी व कूट प्रश्न यांच्यावरच उलटसुलट वितंडवाद करण्यात एकूण समाजाचे सर्ववर्तमानहित व समाजकल्याण अडकून पडले आहे काय?।। तुटे वाद संवाद तो, हितकारी।। वादंग आता या पुढे माजवण्यात अर्थ नाही. आसूडाच्या निबंधात शेतकऱ्यांचे 'आत्मपरीक्षण' आहे. शेवटी असलेल्या परिशिष्टांमधून मराठ्यांमध्ये असलेला उच्चनीच भाव ह्यावर म्हणजे खासे व खर्ची यावर सडेतोड घाव घातले आहेत. जोतीबा निर्भय व निर्भीड आहेत. ताकाला जाऊन भांडे लपवत नाहीत. बतावणी, शब्दच्छल, शाब्दिक कसरत व भाडोत्री साहित्य जोतीबात नाहीत. आज एक व उद्या दुसरे असला परिवर्तन वाद (?) जोतीबात नाही. पोटासाठी त्यांनी केवळ साहित्याचा धंदा केला नाही. मराठे संस्थानिक मुबलक पैसा असून संस्कृत शिकत नाहीत; शिकण्यावर खर्च करत नाहीत. केवळ दौलतजादा वगैरे गमतीवर व छंदावर खर्च करतात. सामाजिक आत्मपरीक्षणही सडेतोड आहे. हे आज अभ्यासनीय आहे. जोतीबांचा हल्ला वेदावर आहे, नाही असे नाही. पण वेदांत सर्वच पूर्णतया असत्य आहे, असे नव्हे. अथर्ववेदातील समतादर्शक एक श्लोक त्यांनी सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकात घेतला आहे.
(म. फुले समग्र वाङ्मय, पृ. १८३, आवृत्ती १ ली)

## सार्वजनिक सत्यधर्मसार

ह्यात गुलामगिरी-आसूडाचे निबंध यातील कित्येक विचार पुन्हा आले आहेत. ठरावीक विचारसरणी फैलावून तिचा पुरस्कार व प्रचार करण्याचे 'मिशन' (जीवन ध्येय) ज्यांनी पत्करले असता पुनरुक्ती अटळ होते. मात्र उक्ती व कृती यामध्ये अंतर नसलेल्या या महात्म्याचे साहित्य-लेखन हे एक मूर्तिमंत कार्यच आहे. काळ व कार्य आणि आत्मोद्धार यांचे प्रतिबिंब त्यात पडले आहे. फार मोठा त्याग, समर्पित बुद्धी व जास्तीत जास्त लोकांच्या उद्धाराची क्रियावंत कळकळ यामुळे पुष्कळांना (विद्वानांना व कित्येक पंडित परंपरावाद्यांना) त्यात दोषच पुष्कळ दिसले व दिसतात. ह्यांचा पराभव करून जोतीरावांचे लेखन मुक्तिदाते म्हणून दलितांनी-श्रमिकांनी ते हृदयाजवळ ठेवले आहे. त्यांच्या पश्चात 'ब्राह्मणेतर' नावाखाली होऊन गेलेली चळवळ, दलित चळवळ व ग्रामीण आणि दलित वाङ्मयाचे उद्घाटक, प्रेरक, स्फूर्तीचे जनक जोतीबा ठरले. डॉ. आंबेडकरांनी यांना गुरू मानले. 'बुद्ध, जोतीबा व आंबेडकर' यांची विचार सूत्रे एकच होत.

सार्वजनिक सत्यधर्मात विषम धर्म म्हणजे आपमतलबी स्वार्थी धर्म व सर्वांना सारखा असा सार्वजनिक सत्यधर्म अशी निवड करून जोतीरावांनी समधर्म मांडला आहे. ही विश्वधर्माची नवमांडणी म्हणजे नवा अगर जुना संप्रदाय अगर पंथ नाही. समान नागरी कायदा हवा असे आपण म्हणतो; त्याप्रमाणे समान-समतावादी धर्म जो जोतीबांना जीवनाच्या शेवटी शोधून त्यांना सापडला त्याचे विवरण सार्वजनिक सत्यधर्मात आहे. भारतीय नवघटनेच्या 'प्रिअंबलम्'मध्ये आपण सार्वजनिक ध्येयदृष्टी स्वीकारली आहे. आधुनिक दृष्टीला सार्वजनिक सत्यधर्म जवळचा आहे. विभूतिपूजा, अवतारपूजा, ग्रंथपूजा यांचा त्याग सांगितला आहे. डॉ. भांडारकर व जोतीबाची या कर्त्या सुधारकांची धर्म सुधारण्याची तत्त्वे, सूत्र एकच आहेत. सार्वजनिक सत्यधर्मात विश्वकुटुंबवादी मानवधर्म आहे. परमहंसवृत्ती म्हणजे हंसक्षीरन्याय आहे. धर्म विवेचन, धर्ममीमांसा व समीक्षा आहे. जोतीरावांच्या काळाच्या मर्यादा, त्यांना प्राप्त झालेले शिक्षण त्यांची सर्वसामान्य परिस्थिती यांचा सारासार विचार केला तर त्यांच्या सामर्थ्याबाहेर त्यांनी कार्य केले व विवेकाची विलक्षण झेप घेतली. सत्य, समता व स्वातंत्र्य यासाठी संग्राम केला. विग्रही व विद्रोही विचार मांडले. ह्याला आता शंभर वर्षे झाली तरी फुले विस्मृत होत नाहीत. मधूनमधून प्रकट होणारे थोडे उपहास करणारे छिद्रान्वेषक संशोधक (?) सोडले तर फुले आता सर्वमान्य झाले आहेत. त्यांच्याबरोबर त्यांच्या कार्यात पुण्यातील त्या सनातनी काळात सहभागी होणाऱ्या सावित्रीबाई यांचेही स्मरण केले पाहिजे. विशेषतः स्त्रिया व दलित, पीडित जनता यांना जोतीराव जवळचे वाटतात व वाटतील. कारण त्यांच्यासाठी केलेले खास कार्य होय. त्यांच्याबद्दल आजच्या पिढीत आकर्षण का आहे? सार्वजनिक धर्मातील सत्यवर्तनासंबंधी त्यांनी दिलेले तेहतीस नियम हे त्यांच्या अखंड (अभंग) वाङ्मयाचे सत्सार ठरते. सार घेऊन असार टाकणे हा सत्यान्वेषकाचा धर्म ठरतो. उत्कट व भव्य घ्यावे. त्यांच्या कृतीविषयी व कर्मयोगत्वाविषयी वादच नाही. म. फुले यांचे सर्वच्या सर्व प्रतिपादन व संशोधन बिनचूक असणे हा आग्रह नसावा. असा ते स्वतः धरत नाहीत. मनुष्य हा सांत आहे असे त्यांचेही मत आहे. माणसाने त्याची बुद्धी व विचारदेखील तपासले पाहिजेत. बुद्धी व सद् व असद् अशी दोन प्रकारची असते, असू शकते. म्हणून कोणत्याही प्रामाण्याचे सर्व प्रामाण्यत्व मानणे धोक्याचे आहे असा निष्कर्ष काढल्यामुळे ते विश्वमानवी धर्माकडे वळले. हे त्यांचे वैचारिक शिखर होय. एका शेतकऱ्याचा मुलगा स्व-प्रयत्ने जीवनाच्या शेवटी केवढी मोठी वैचारिक झेप घेतो. जोतीबांनी कोणी आकशातीलच पिता व त्यांचा एकच पुत्र व ठरावीक पैगंबर प्रेषित सर्वप्रमाण मानला नाही. एकच प्रमाण ग्रंथ व एकच संस्थापक जे बेलगामी हट्ट धरून सर्व प्रमाण मानतात ते निधर्मी (सर्वधर्मी) दृष्टीकडे जाऊ शकत नाहीत. धर्मांध राहतात असा विवेक त्यांच्या ग्रंथविषयक विवेचनातून व

दृष्टिकोनातून काढता येतो. व्यक्त व व्यक्ती(असामान्यदेखील) मर्यादित असते. म्हणून सत्यासत्याचा विवेक करून सत्य तेवढेच घेऊन सत्यवर्तन करणे हा बुद्धिमान व विवेकी माणसाचा मार्ग होऊ शकतो. अशा जाणत्या व्यक्तींचे जे मंडळ (समूह) त्यालाच सत्यशोधक समाज म्हणता येते. या दृष्टीने जोतीबांना यश आणून द्यावयाचे राहिले आहे.

जोतीबांना जे (इंग्रजी) ग्रंथ वाचावयास मिळाले ते बहुतेक पाश्चात्त्य विद्वानांचे होते. त्यांची नावे व पृष्ठे आसूडाच्या निबंधात व इतरत्रदेखील त्यांनी दिली आहेत. त्यांना जर राममोहन व दयानंद यांच्याप्रमाणे संस्कृतचा लाभ झाला असता तर त्यांचे स्वरूप वेगळे झाले असते. पण पाश्चात्त्यांचे ग्रंथ व संशोधन हे ते विद्वान केवळ पाश्चात्त्य म्हणून सर्वथा त्याज्य व निरर्थक मानणे ही दुसरी चूक (नव्हे खिळा) ठरेल.

अतिप्राचीन काळापासून ते इंग्रज बहाद्दरांच्या काळापर्यंतच्या त्यांच्या स्वतःच्या काळापर्यंत जो आढावा त्यांनी घेतला आहे तो सर्वच्या सर्व निरर्थक नाही. त्यातील सत्यासत्य पाहण्याचे स्वातंत्र्य कोणत्याही सत्यान्वेषकाला आहेच. असा एक प्रयास येथे केला आहे.

आपण मानवाने वर्तमानकाळातील घडामोडीतील सत्यासत्य तपासून भविष्य काळाकडे वाटचाल करावी. हा संदेश काढता येतो व संशोधन सतत प्रवाही ठेवावे लागते याची जाणीव ठेवावी. भूतकाळातच रुतून राहू नये.

स्वातंत्र्य आल्यावर आपले स्वदेशी व भारतीय वास्तव स्वावलंबनाने पाहण्यास आपण आता मुक्त आहोत. पाश्चात्त्य धर्म, संस्कृती व भाषा यांचे अवास्तविक दडपण मानण्याची जरुरी नाही. जोतीबांच्या वेळचे तसे वास्तव्य आता नाही. मात्र धर्मभय, धर्मधाक व धर्मवेड या बाबी सर्वधर्मात आहेत. त्या धर्मातून ज्यांनी त्यांनी घालाव्यात. हिंदुधर्मातील दोष घालवण्याचा प्रयत्न जोतीरावांनी केला.

सतत वाचन, वर्धमान मनन व लेखन आणि सदा बोलण्यासारखे चालणे हे सद्‌गुण महात्मा फुल्यांच्यापासून आपण सर्वांनी घ्यावेत, ही शेवटी प्रार्थना.

('जीवन शिक्षण' - म. फुले विशेषांक-१९९०)

******

# ४ म. फुले, न्या. रानडे आणि डॉ. आंबेडकर

फुले व रानडे यांच्यामध्ये साम्य आहे. तुलना करणे अयोग्य असले तरी रानडे शताब्दीच्या प्रसंगी डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या विद्वत्तापूर्ण भाषणात दोघांमधील साम्य प्रथम दिग्दर्शित केले आहे. अभ्यासाचा एक तौलनिक प्रकार असतो व अशा पंडितांना साम्ये दिसतात. (हिंदू) धर्मसुधारणेची तत्त्वे व समाजसुधारणा-विषयक दृष्टिकोन लोककल्याण व उन्नती या संबंधात फुले-रानडे या दोघांत साम्य होती हे खरेच; पण या दोघांत मतभेद झाले ते येथे थोडक्यात विचारात घेण्याचा संकल्प आहे. असा अभ्यास प्रगट केल्याने जोतीराव जास्त ज्ञात होऊ शकतात अशी आशा आहे.

लेखी झालेले मतभेद प्रथम 'मराठी ग्रंथकारसभेस पत्र' (म. फुले समग्र वाङ्मय, आ.१ली पृ. ३०७) यापासून दृग्गोचर होतात. रानड्यांशी जोतीरावांचा विग्रह का होता? व का झाला? याला व्यक्तिमूलक कारणे नव्हती. या दोन महत्त्वाच्या नेत्यांमध्ये त्यांच्या काळात फार मोठी सामाजिक दरी होती. या दरीमुळे दोघात व दोघांना अनुसरणारातही अंतर पडणे शक्य झाले. जोतीबांचा लढा मानवी समान हक्काविषयी होता. हे हक्क देण्याच्या मार्गात जोतीबाप्रमाणे उघडपणे रानडे पूर्ण पुढे आले नव्हते. त्यांच्या समाजाच्या त्यांना मर्यादादेखील पडल्या. जोतीबांनी त्यांच्या माळी समाजाच्या मर्यादा व बंधने झुगारली होती. ही बंधने उच्चस्तरीय पुढाऱ्यांनी त्या काळात नव्याने काढलेल्या सभांनाही पडत होती. उच्चभ्रूंच्याकडून जी पुस्तके निघत होती, त्यांचा व जोतीबा आदिकरून शूद्रातिशूद्र यांच्यासाठी झटणाऱ्यांचा मेळ (साम्य) पडत नव्हता. "आम्हां शूद्रादि अतिशूद्रास काय काय विपत्ती व त्रास सोसावे लागतात, हे त्यांच्यातील आगंतुक भाषण करणारासे कोठून कळणार?" "जोतीबांच्या उद्‌गारात व लिहिण्यात त्यांचा स्वानुभव प्रामुख्याने दिसतो. वरील विधानांना त्यांनी सार्वजनिक सभेच्या उत्पादकाच्या घरच्या-दारच्या विसंगत वर्तनाचे उदाहरण दिले. न्या. रानडे यांच्याप्रमाणे सार्वजनिक सभेचे संस्थापक जोतीरावांच्या पूर्ण परिचयाचे होते. जोतीराव व त्यांच्या शूद्रातिशूद्र समाजावर ज्यांनी दास्यत्व लादले होते. त्याबद्दल पांढरपेशा समाजातील लेखकांना 'ब्र' काढण्याची गरज वाटली नाही. जे सुधारक म्हणून वावरत होते त्यांना घरची व त्यांच्या समाजाची बंधने पडत होती. खुद्द रानड्यांना ती पडली, उदा. चहाग्रामण्य प्रकरण फार गाजले. जोतीरावांच्या काळात सुधारकांच्या घरातच विटाळ सोवळे-ओवळे मानण्याचे प्रकार फार होते. आज फार फरक पडला आहे. वास्तव बदलले आहे याचे भान ठेवून या विषयाचा प्रपंच करावा लागतो. "सर्व आर्य ब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नती (काय) करणार ! ..." असा

जोतीबापुढे त्यांच्या काळात प्रश्न पडला होता. सार्वजनिक सभा व ग्रंथकारसभा यांच्यात भाग घेऊन जोतीबांना इष्ट वाटणारा क्रांतिकारक फरक तो त्या काळात पडणे अशक्य होते. जोतीबांचा नाईलाज होता. (आज साहित्य परिषद व तत्सम संमेलने यांत भाग घेतला किंवा त्यांचे अध्यक्षपद जोतीबांच्या प्रवाहातील शूद्रातिशूद्रांतील कोणी भूषवले, तर ते निषेधपर वाटण्याचे कारण नाही. परिस्थिती बरीच पालटली आहे.) जोतीबांच्या काळात सार्वजनिक सभा व ग्रंथकार सभा यांच्यापुढे सर्वसामान्य जनतेचे व रयतेचे कल्याण करणारे विषयदेखील आले नव्हते व १८८५ सालात निघालेल्या राष्ट्रीय सभेपुढे स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या उन्नतीचे केवळ प्रश्न म. गांधींच्या काळात म्हणजे १९१७ च्या पुढे येऊ लागले. यावरून जोतीरावांच्या तक्रारीत अर्थ होता, हे सिद्ध होते. उभय समाजातील दरी कशी बूजेल व कोणत्या मार्गाने ऐक्य होईल ? याचे विधायक व रचनात्मक उत्तरही म. फुल्यांच्या लेखनात सापडते. मात्र हे उत्तर व हा उपाय जोतीबांच्या खण्डणाच्या विस्तारात दिसून येणे दुरापास्त होते व त्याचे विधेयक खंडणातील उत्कटतेने दोष हुडकताना आढळतात. पिळणारे व पिळले जाणारे यांचे ऐक्य कसे अशक्य आहे, हे जोतीराव व मराठी ग्रंथकारांच्या सभेच्या आमंत्रणास उत्तर पाठवताना लिहितात. जोतीरावांना समान संधी, समान हक्क पाहिजे होते. ते जास्तीत जास्त लोकांसाठी मागत होते. केवळ त्यांच्यासाठी किंवा त्यांच्या (माळी) जाती समाजासाठी फुल्यांचा संघर्ष नव्हता. हे सर्वच जातीजमातवाद्यांनी लक्षात घ्यावे.

"जर सर्वांची एकी करणे असेल तर त्यांनी एकंदर सर्व मानवी प्राण्यात परस्पर अक्षय बंधुप्रीती काय केल्याने वाढेल, त्याचे बीज शोधून काढावे व ते पुस्तकाद्वारे प्रसिद्ध करावे... (म. फुले समग्र वाङ्मय पृ. ३०८) अशाप्रकारचे पुस्तक लिहावे व छापावे असा उद्देश अर्थात ग्रंथकारांच्या पहिल्या अधिवेशनापुढे मुळीच नव्हता. म्हणून त्यांच्या परिषदेत जोतीरावांनी मुळीच रस घेतला नाही. बंधुप्रीती निर्माण होईल असे मार्गदर्शन करणारे 'सार्वजनिक सत्य धर्म' पुस्तक जोतीरावांनी स्वतः लिहिले. हे काम करण्याची निकड दुसऱ्या कोणास भासलीदेखील नाही. असुडाच्या निबंधात (सन १८८३) 'ऐक्य का अशक्य आहे व ऐक्य शक्य कसे होईल' याचा जोतीरावांनी विस्ताराने ऊहापोह केला आहे. (म. फुले : समग्र वाङ्मय, १ ली आ. पृ. १८३ ते २७२).

### ।। ग्रंथकार सभेस पाठवलेल्या पत्राचे पुढे काय झाले ?।।

न्या. रानडे तुलनेने पुष्कळ उदार होते. प्रत्यक्ष व्यवहारात जोतीबा व रानडे ह्या दोन व्यक्ती परस्परांना जाणून होत्या. पण पुढील दत्तो वामन पोतदार यांच्या पिढीतील तथाकथित साहित्यिकांना फुले समजले नाहीत. मराठी वाङ्मयाचा इतिहास उपलब्ध करण्यात आला.

त्यात हे पत्र छापण्यात आले नाही. न्या. रानडे यांचे दुसरे मित्र साताऱ्याचे प्रतापसिंह छत्रपती यांचे दत्तक पुत्र शहाजी ऊर्फ जंगली महाराज यांचे पत्र इतिहासात छापले आहे. दत्तो वामन प्रभृतींना जोतीरावांचे पत्र दखलपात्र वाटले नाही. वरील दोघांची पत्रे आली एवढेच नमूद केलेले आढळते. निदान रानड्यांच्या उदारतेमुळे जोतीरावांना व शहाजी भोसले यांना ग्रंथकार सभेची निदान आमंत्रणे गेली! न्या. रानडे यांच्या वाचनात या दोघांचे लेखन आले असावे.

दत्तो वामन पोतदार वाईस राहत होते. त्यांच्याशी मी बातचीत केली. त्या वेळी त्यांच्यात जोतीरावांबद्दल आदराचा अंशही आढळला नाही. या पत्राची प्रत 'ज्ञानोदया'कडे जोतीरावांनी पाठवली व ती त्यांनी ११ जून १८८५ च्या अंकात प्रसिद्ध केली म्हणून आज अभ्यासकांना म. फुल्यांचे वरील पत्र उपलब्ध आहे. नाही तरी त्या पत्रात फक्त ब्रह्मद्वेष व ब्रह्मविरोधच मागील साहित्यिकांनी पाहिला. जंगली महाराज ब्राह्मो समाजी होते. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज हे त्या काळानुसार पुरोगामी होते. त्या काळात त्यांनी भवानी पेठेत ब्राह्मो समाज चालवला होता. त्यांची व्याख्याने पुणे प्रार्थना समाजातही होत. शहाजी महाराज, रानडे प्रभृतींच्या जास्ती जवळचे होते. त्यांचे पत्र साहित्य संमेलनाच्या इतिहासात छापणे परवडले. कारण ते पत्र पूर्ण आध्यात्मिक व केवळ धर्मपर आहे. जोतीरावांना फक्त आध्यात्मिक सुधारणांची निकड नव्हती, प्रत्यक्ष समाजरचना पालटली पाहिजे, हा त्यांचा कटाक्ष होता. शहाजीमहाराज फुल्यांप्रमाणे कडवट बंडखोर नव्हते. तरी त्यांनी त्यांच्या ब्रह्मधर्म पुस्तकात 'धर्ममार्तंडांनी हिंदुशास्त्रात घालघुसड केली' असे विधान छापले आहे. कर्मवीर शिंद्यांच्या अगोदर जंगलीमहाराज भोसले, उत्तरेतील अनेक धर्मसुधारकांशी परिचित झाले होते. ते सुविद्य होते. ते पुण्यास आल्यावर जोतीरावांच्या घरीही राहिले होते. सांगण्याचा मुद्दा हा की एकूण हितसंबंध टिकवून धरण्याच्या दृष्टिकोनातून जोतीराव व त्यांचे विचार धर्ममार्तंड भूदेवांना प्रत्यक्ष व्यवहारात महाभयंकर वाटले. यामुळे जोतीराव कमी लोकांना ज्ञात होते. सनातनी वृत्तपत्रे त्यांचे लिखाण प्रसिद्ध करीत नसत.

'ज्ञानोदयां'चे ऋण आजही मानणे जरूर आहे. 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर' असा विचार फुले-रानडे लोकहितवादींच्या पिढीत पुढे आला नव्हता. ज्ञानोदयाचे सूचीखंड, साहित्य संस्कृती मंडळाच्या साहाय्याने, आता उपलब्ध झाले आहेत. जोतीरावांच्या शाळांचे उल्लेख त्यात संक्षिप्त प्रकारे आढळतात. मुलीमुलांच्या शाळेशी जोतीरावांनी विग्रह का घेतला हे त्यांनी 'गुलामगिरी' पुस्तकात स्वतःच सांगितले आहे.

वरील शाळेशी संबंध सोडून जोतीराव स्वस्थ बसले होते, असे कै. जोशीकृत 'पुणे वर्णन' पुस्तकात विधान आढळते. पण 'ज्ञानोदया'च्या सूचीखंडात जोतीराव हे आजारी होते, असा उल्लेख आता उपलब्ध झाला आहे. पुढे काय करावे या विचाराने त्यांना घेरले गेले होते, हेही खरे.

'ज्ञानोदय' व 'सत्यदीपिका' या पत्रांशी जोतीरावांना संबंध ठेवणे का अटळ होते, हे आज तरी विवाद्य मानण्याचे कारण नाही. लोकहितवादी यांनीही 'ज्ञानोदया'त त्यांचे एक पत्र प्रसिद्ध केले आहे.

'ज्ञानोदय' व 'सत्यदीपिका'कर्ते बाबा पद्मनजी समाजसुधारणेला प्रतिकूल नव्हते. समाजसुधारणेच्या इतिहासाचे महत्त्वाचे धागेदोरे व संदर्भ 'ज्ञानोदया'मुळे आज उपलब्ध होतात. पुढे जाताना एवढे नमूद करावेसे वाटते की, फुले-आंबेडकर स्वतंत्र होते. न्या. रानडे हे म. फुले यांच्या मानाने खूप नेमस्त-मवाळ होते. न्या. रानडे टीका झेलीत, त्यांना पर्याय नसे. फुले-आंबेडकर यांनी इंग्रजांवर व त्यांच्या ध्येयधोरणावर उघड टीका केली आहे. एक अधिकारी म्हणून न्या. रानड्यांना सेवकाच्या मर्यादा पडल्या.

## फुले-रानडे खटका

१८८५ सालच्या पावसाळ्यात बडोद्याचे गायकवाड सयाजीराव यांनी पुण्यास मुक्काम केला होता. त्यांचा सन्मान करण्याचे सर्व पुणेकरांनी ठरवले. अनेकांच्या पान-सुपाऱ्या झाल्या. मराठे लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करावा म्हणून पुण्यास पहिला प्रयत्न करणारे गंगाराम भाऊ म्हस्के यांनी मराठे (मराठा व तत्सम) यांच्या मार्फत सयाजीरावांचा गौरव स्वतंत्रपणे केला. त्यांच्या मिरवणुकीत अनेक बैलगाड्या वापरल्या गेल्या वगैरे उल्लेख आढळतो. मानपत्रही दिले. स्वागतात न्या. रानडे प्रमुख होते. पुण्यातील न्यायाधीश व प्रतिष्ठित पुढारी म्हणून म्हस्के व त्यांचे मित्र रानड्यांकडे पाहत होते. म्हस्के हे एक पहिले मराठा वकील म्हणून पुणे न्यायालयात प्रतिष्ठित होते. 'रानडे व म्हस्के' यांची युती जमली. जातवारीने सयाजीरावांचा गौरव करू नये, असे डॉ. भांडारकर यांचे मत होते, ते मागे पडले.

"जातिभेद असला म्हणून आपल्या इष्ट हेतूस (तो) जातिभेद बिलकुल (या देशाचे उन्नत्तीस) आडवा येत नाही" असे वाक्य 'इशारा' निबंधातील उपोद्घातात न्या. रानड्यांनी सयाजीरावांच्या उपस्थितीत उच्चारलेले स्वतः फुले यांनी दिले आहे. (म. फुले समग्र वाङ्मय, पृ. ३११, पहिली आवृत्ती) या समारंभानंतर दि. १ सप्टेंबर, १८८५ रोजीच्या 'ज्ञानप्रकाशा'त जोतीरावांवर एककल्लीपणाचा आरोप करण्यात आला. सदरहू 'ज्ञानप्रकाशा'मधील मजकूर

मिळवून कोणी प्रकाश टाकलेला नाही. 'इशारा' निबंधात रानड्यांच्या विधानाचे खंडण केलेले उपलब्ध आहे. चारी वर्ण पद्धतीवर व जातिभेद मोडण्यावर जोतीबांचा पहिल्यापासून मोठा कटाक्ष होता. रानड्यांचे खंडण करण्यासाठी 'गुलामगिरी'तील कित्येक विचार पुनः मांडून त्यात प्रासंगिक भर घातली आहे. जोतीरावांचा रोख चार वर्ण व ब्रह्मदेवाने त्याच्या मुखापासून ब्राह्मण निर्माण केले व त्यांची सेवा चाकरी करण्यासाठी पायापासून शूद्र निर्माण केले ही जी कल्पना तयार करण्यात आली तिने विषमतेला जन्म दिला याकडे होता. जातिभेदाचा जन्म ह्या चार जातींच्या कल्पनेतून झाला. फक्त पुढे ब्राह्मण त्यांच्या वर्णानुसार विद्या शिकू लागले व इतरेजन अक्षरशत्रू राहिले. अक्षरशत्रू लोकांचे अव्वल इंग्रजीतील पहिले पुढारी जोतीबा होते, म्हणून रानड्यांची 'जातिभेद आडवा येत नाही' ही कल्पना जोतीरावांना मान्य झाली नाही. जातिभेद मोडल्यावर समता निर्माण होईल व इतर विद्या शिकू लागतील, व ब्राह्मणीधर्म व ब्राह्मण यांचे महत्त्व मानणार नाहीत. असे 'इशारा' निबंधाच्या आरंभी जोतीरावांनी त्यांची बाजू मांडून रानड्यांचे खंडण केले आहे. कुठूनही जा जातिभेदाचा राक्षस आडवा येतोच. हे बाबासाहेबांचे म्हणणे पुढे प्रत्ययास आले.

रानड्यांचा ह्याच काळात फुले व इतर अब्राह्मण लोकांत 'ब्रह्मद्वेष' दिसला. याच काळात पुण्यास 'महाराष्ट्र व मराठे' ह्या विषयावर रानड्यांनी ब्रह्मद्वेष कमी व्हावा यासाठी हे व्याख्यान दिले. ते रानडे चरित्रकर्ते कै. न. र. फाटकांनाही पूर्ण उपलब्ध झाले नव्हते. पण व्याख्यानाचा उद्देश मात्र फाटकांनी दिला आहे. शिक्षणाच्या आड दारिद्र्य येते असा रानड्यांचा विवेक असावा. मराठे विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप्स् देणारी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, पुणे ही संस्था उभी करण्यात व सयाजीरावांची मदत मिळवण्यात न्या. रानडे यांचा सिंहाचा वाटा होता. महाराष्ट्रातील ब्रह्मद्वेष व विरोध पुढील पन्नास वर्षात वाढतच गेला. मात्र मराठ्यांची मुले शिकू लागली. विद्यावेतने देण्याची सुरुवात १८७३ पासून सत्यशोधक समाजाने केली होती, असे १८७६ च्या त्यांच्या अहवालावरून दिसते. (म. फुले समग्र वाङ्मय, पृ. १५१ ते १६४ आवृत्ती १ ली) पण ती पुढे थांबली व 'रानडे आणि म्हस्के' यांनी चालू केलेली फक्त स्कॉलरशिप देणारी शिक्षणविषयक संस्था पुढे काढली. संस्था वाढली हिचा फंड वाढला. नंतर जातीजातीचे असले प्रयत्न चालू झाले. मात्र सत्यशोधक समाज हा कधीच आर्थिकदृष्ट्या मजबूत झाला नाही.

## हिंदू (ब्राह्मणी) धर्मातील कोडी

प्रथम म. फुले व नंतर उत्कटतेने डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मातील कोडी मांडली. यामुळे दोघांवरही ब्राह्मणीधर्माचे विरोधक म्हणून शिक्का बसला. इतरही लेखन व कार्य कारण झालेच. रानडे व प्रार्थना समाज यांना विषमतामूलक धर्म मान्य होता असे नव्हे. रानड्यांना मर्यादा पडल्या व त्यांना सत्यशोधक समाजाचा ब्राह्मणी धर्मावरील हल्ला अनाठायी व बिनगरजेचा वाटला; प्रार्थना समाजात पुष्कळ ब्राह्मण सभासद होते म्हणून त्याला ब्राह्मणेतर चळवळ वावडी वाटली. सर व्यंकट नायडू व कर्मवीर शिंदे यांनी ब्राह्मणेतर चळवळीत भाग घेतला म्हणून ब्राह्मो, प्रार्थना समाजाने त्यांना या बाबतीत नापसंती दाखवली. रानड्यांचा जो दृष्टिकोन मी दिला आहे, तो सर चंदावरकर डिप्रेस्ड क्लास मिशनचे पहिले अध्यक्ष यांचाही होता. त्यातून सर चंदावरकर व शिंदे यांच्यातही अंतर वाढले. अस्पृश्यांची उन्नती ब्राह्मण व त्यांचा धर्म यांना नावे न ठेवता करावी असा नेमस्त व मवाळ विचार प्रार्थना समाज व डिप्रेस्ड क्लास मिशनमध्ये आढळतो. फुले व आंबेडकर यांना हा मार्ग पसंत पडणे अशक्य झाले. आंबेडकरांची दलित चळवळ फक्त ब्राह्मणी धर्मावरच टीका करीत राहिली नाही तर तिने विषम धर्मातून सुटका होण्यासाठी बौद्धधर्म स्वीकारला. फुल्यांच्या नंतरची पुढची पायरी म्हणून ती संबोधिली पाहिजे. फुले प्रार्थना समाजात का गेले नाहीत व डिप्रेस्ड क्लास मिशनचा पवित्रा डॉ. आंबेडकरांना का आवडला नाही याचे एक कारण देता येते. त्याचे विवरण वरीलप्रमाणे येथे केले आहे.

फुले-आंबेडकरांनी राष्ट्रीय सभेची कास का धरली नाही ? कारण ती धरली असती तर शूद्रातिशूद्र समाज आज मागे राहिला असता. सामाजिक स्वातंत्र्याला राजकीय स्वातंत्र्यापेक्षा आद्य स्थान जोतीरावांनी दिले म्हणून डॉ. आंबेडकर, यांनी त्यांना गुरू मानले. आज फुल्यांचा कीर्तीदुदुंभी सर्वत्र ऐकू येत आहे, याचे हे एक प्रमुख कारण आहे. हे कोणी विसरू नये.

जी विषम समाजव्यवस्था होती (व अद्यापि आहे.) तिचे चटके विठ्ठल रामजींनाही बसले. भारत इतिहास संशोधन मंडळाचे अनेक इतिहासज्ञ सत्यापलाप करीत आहेत, हे इतिहासप्रेमी विठ्ठल रामजींच्या लक्षात १९१७ सालाच्या पूर्वी आले. त्यांनी स्वतंत्र असे 'मराठा इतिहास संशोधन मंडळ' काढले होते. लोकमान्यांच्या सनातनीपणाचा वीट आल्यामुळे पुढे विठ्ठल रामजींनी टिळकांची राजकीय संगत सोडली. फुले-आंबेडकर यांच्यामधील कडवटपणा स्वतःमध्ये येऊ नये अशी मनस्वी काळजी ना. कै. यशवंतराव चव्हाण घेत असत. ब्राह्मणी विषमतेचे चटके यशवंतरावांनाही बसले. यासंबंधी काही चुटके त्यांच्या

'कृष्णाकाठ' आत्मचरित्रात वाचावयास मिळतात. या पार्श्वभूमीवर फुल्यांचा पुण्यातील काळ पेशवाईनंतरचा होता हे लक्षात घ्यावे.

'जातिभेद मोडणे' हाच धार्मिक-सामाजिक अन्याय व विषमतेवर उपाय आहे, असे मागे जोतीबा म्हणाले ते बरोबर आहे, हे आजची ताजी उदाहरणे देऊन सांगता येते. जोतीबांचे पूर्वज पुण्याच्या शनिवारवाड्यात नोकरीस होते. ते अनुभवी जोतीरावांना ज्ञात होणे पूर्ण शक्य होते. भारताच्या राजकारणात आजही जातिभेद आडवा येत आहे. आर.एस.एस. देखील सामाजिक समरसता व जातिभेदनिवारण यांचा पुरस्कार करू लागली आहे. अस्पृश्यता ही आजही कित्येक ठिकाणी पाळतात. स्पृश्यास्पृश्य भाव जातिभेदावर आधारित आहेत व होता. यावरून जोतीबांनी रानड्यांचे उद्‌गार 'इशारा' निबंधात खंडित केले ही एक कटु सामाजिक कामगिरी केली. जोतीबांपेक्षा ऐहिकदृष्टीने रानडे मोठे होते. दर्जा-विद्वता मोठी होती. जोतीबांचे बौद्धिक धाडस मोठे ठरले. डॉ. आंबेडकर यांनी म. गांधी यांना विरोध केला, त्यांची विधाने त्यांना पटली नाहीत ती त्यांनी गांधी युगात त्यांच्या हयातीत खंडित केली होती. फुले-आंबेडकरांना विभूतिपूजा अमान्य होती. न्या. रानडे ही त्यांच्या काळात वंद्य विभुती होती. प्रस्तुत लेखकाला कोणाचेही येथे अवमूल्यन करावयाचे नाही. उलट रानडे प्रवाहाशी महर्षी शिंदे यांच्या सहवासामुळे माझी फार जवळीक झाली आहे. व्यक्तीशः रानड्यांना जोतीरावांचा विरोध नव्हता. त्यांची कित्येक कृत्ये जोतीबांनी जाहीर प्रशंसिलेली आढळतात. उदा. रा. ब. रानडे यांनी त्यांच्या पत्नीस शिकवले ही बाब जोतीबांना फार आवडली. रानडे-म्हस्के यांनी पुण्यात काढलेल्या दयानंदांच्या मिरवणुकीला जोतीबांचा अनुयायांसह पाठिंबा होता. वरील सर्व सुधारक पक्षाचे होते. म्हणजे सनातनी धर्ममार्तंड नव्हते.

हा लेख लिहिण्याचे कारण असे की, जोतीरावांवर अखंड चिंतन चालू असताना रानड्यांचे खालील उद्‌गार आजही खटकतात. 'पूर्वीचे तीस वर्षांपेक्षा (शूद्र) शेतकऱ्यांची हल्ली स्थिती बरी झाली आहे.' हे उद्‌गार किती केविलवाणे होते, हे दाखवावे लागते. यासाठी ह्या लेखाची मुख्यतः निर्मिती केली आहे. फुले-आंबेडकर हे नवमार्गदर्शक ठरतात तर न्या. रानडे राजा राममोहन राय यांच्या मार्गातील होते. 'फुले-आंबेडकर' यांचा आवाज हा तळागाळांतील लोकांसाठी होता.

## शेतकऱ्यांची दुर्धर अवस्था

रानडे (ज. १८३१ व मृ. १९०१) व जोतीबा (ज. १८२७ व मृ. १८९०) हे समकालीन होते. दोघेही पुणेकर होते. यांच्या जन्मापूर्वी १८३१ साली महाराष्ट्रात मोठा

दुष्काळ पडला. १८५७ चे बंड झाल्यानंतर इंग्रजांची सत्ता स्थिरस्थावर होते न होते तो १८७७ चा दारुण व भयंकर दुष्काळ पडला. शेतकऱ्यांचे दंगे झाले. (डेक्कन दखनमधील दंगे म्हणून प्रसिद्ध आहेत. स्वतः रानडे रिलीफ म्हणून काम पाहत होते. खेड्यापाड्यांत बैलगाडीत जाऊनही त्यांनी शेतीची-शेतकऱ्यांची स्थिती पाहिली. पुढे डेक्कन ॲग्रीकल्चर रिलीफ ॲक्ट १८८० पास करावा लागला. रानडे यांचा ह्या खात्याशी व कार्याशी जवळचा संबंध होता. हे न. र. फाटक प्रभृती चरित्रकार नमूद करतात. पुढे १८८५ साल एकदोन वर्षातच आले. ह्या वेळी गेल्या तीस वर्षांपेक्षा शेतकरी रयतेची स्थिती (तुलनेने) बरी आहे, असे विधान करण्यास रानडे कसे काय धजले ? याचे आश्चर्य वाटते. रानड्यांच्या देखत म. फुले वारल्यावर १८९६ साली पुनः दुष्काळ व प्लेग यांसारख्या आपत्ती जास्तीत जास्तपणे शेतकऱ्यांवर जास्ती परिणामकारी ठरल्या. पटकी, कॉलरा वगैरे साथी सालोसाल येत व खेड्यापाड्यांत गोरगरीब शेतकरी लोक मोठ्याप्रमाणात बळी पडत. चिंचेचा व झाडांचा पाला खावा लागला. वगैरे दुष्काळांची वर्णने आजही येतात. निरक्षरता तर प्रचंड होती.)

दादाभाई नवरोजी यांनी हिंदुस्थानातील दारिद्र्याविषयी नंतर बरेच लिहिले. उघडा तो बंब लंगोट्या बहाद्दर ।। असे वर्णन १८७३ पासून किंबहुना त्या अगोदरपासून जोतीराव करीत आले. त्यांचे 'इशारा व असुडाचे निबंध' हे शेतकऱ्यांची त्या वेळची दुःस्थिती दाखवतात. अडाणी, निरक्षर, अंगठेबहाद्दर यावर होणारा ब्राह्मणी सावकारकीचा जुलूम व इतर सर्वांगीण त्रास जोतीबांनी त्याच शब्दात व्यक्त केला आहे. ही शब्दचित्रे त्या वेळच्या कालपरिस्थितीची चित्रे ठरतात. जोतीराव यांच्या ठायी विलक्षण निरीक्षण सापडते. रानड्यांच्या विधानाविषयी मोठे नवल वाटून जोतीबा त्यांचे खंडण करतात. वन्यस्थितीत ज्या वेळी शेतकरी होता त्यापेक्षा फुले-रानड्यांच्या काळात तो सुधारला असे रानड्यांच्या विधानांचा अर्थ झाला. व आजही तो दुर्दैवाने होतो. जोतीबांची शब्दचित्रे शेतकऱ्यांविषयी कळवळा दाखवतात. आश्चर्य हे की आर्यब्राह्मणापासून झालेल्या त्रासाचे वर्णन करताना त्यांनी आक्रमक मुसलमानांचाही कठोर समाचार घेतला. हा हिंदुत्ववाद्यांनी अभ्यासावा. पेशवाईत व मुसलमानी आमदानीत फार मोठी शिक्षेची क्रुरता होती. जोतीबांनी हिंदू-मुस्लिम राज्यापेक्षा अव्वल इंग्रजी राजवट शांततेची व प्रगतीची म्हणून समाधानकारक वाटली याची कारणे होती. नवीन रस्ते व कॅनॉल वगैरे प्रजेच्या सोयी होऊ लागल्या. शेतकऱ्यांच्या दारुण दारिद्र्याचे वर्णन जोतीराव यांनी थरारणाऱ्या भाषेत जेवढे यथातथ्य केले तेवढे रानड्यांना भावणे व अनुभवणे अशक्य होते. हिंदु-मुस्लीम देशी कर वसूल करण्यासाठी अघोरी उपाय करीत. पेशवाईत केवढा दारुण जुलुम होता हे दृष्टिआड करून नव्या इंग्रजी राज्यापेक्षा देशी राज्यात प्रजा तुलनेने सुखी समाधानी होती, असे जात्यभिमानातून व नव्या विरोधी देशाभिमानातून

प्रतिपादिले जाई. निजामशाहीत कॅनॉल वगैरे पुष्कळ असल्यामुळे तिकडील शेतकरी तुलनेने बरा आहे असे जोतीबा लिहितात. पेशवाई गेल्यामुळे कोणासच वाईट वाटले नाही, असे केळकरांनी नमूद केले आहे. राणीसरकारच्या राज्यात हिंदुस्थानची प्रगती झाली, हे पुष्कळांनी मान्य केले आहे. राष्ट्रीय सभेतही राजनिष्ठेचा ठराव पास होई. इंग्रजास मान्य असणारे राष्ट्रगीत गाईले जाई. जोतीराव वाचून आजही असे म्हणावेसे वाटते की, आजच्या भारताची विपरीत स्थिती व संकटग्रस्त भारत पाहून प्रारंभी इंग्रजी राज्यात तुलनेने प्रजा सुखी होती. एवढी हिंसा नित्याची नव्हती. १८८५ साली निघालेल्या राष्ट्रीय सभेपुढे कित्येक वर्षे शेतकऱ्यांचे, स्त्रियांचे व अस्पृश्यांचे प्रश्नही आले नव्हते. अशा काळात जोतीबांनी शूद्रातिशूद्र प्रजेची व रयतेची दुःखे मांडली. हे आश्चर्य होय व येथे त्यांचा खरा देशाभिमान दिसतो. रानड्यांप्रमाणे त्यांना रावबहादूर पदवीदेखील मिळाली नव्हती. रानडे व फुले यांच्यातील द्वैत-अद्वैत पाहताना पुढे डॉ. आंबेडकर व रानडे हा विषय जवळ का व कसा आला हे जाणण्याची गरज येथे मध्यंतरीच वाटते म्हणजे विषय जास्ती विशद होतो.

## रानडे व डॉ. आंबेडकर

डॉ. आंबेडकर यांनी पुण्यास रानडे यांची योग्य ती प्रशस्ती केलेली आजही उपलब्ध आहे. रानडे १९०१ साली वारले. त्या अगोदर आजारी असताना साताऱ्यास आले होते. बरोबर डॉ. भांडारकर होते. साताऱ्यास १८८९ पासून चालू असलेल्या प्रार्थना समाजाचा वार्षिक उत्सव होता. महार बटालिअन त्यावेळी सातार लष्कर कँपमध्ये होती. त्यांचे भजनी मंडळ असे. सातारा प्रार्थना समाजात कै. सीताराम पंत जव्हेरी, रा. ब. कै. काळे आदी करून समाजसुधारक मंडळी अस्पृश्यता निवारक कार्य करत. रामजी आंबेडकर व रानडे यांची ओळखपाळख झाली. रामजीबाबा यांनी रानड्यांकडून महार पलटणी बंद केल्याबद्दलचा अर्ज लिहून घेऊन, इंग्रज सरकारात पाठवला. त्याचा संदर्भ वरील साताऱ्यातील अस्पृश्यता निवारक मंडळीच्या प्रयत्नाशी असावा. खुद्द आंबेडकर यांना सातारा हायस्कूलला रानडे यांच्या निधनानिमित्त सुट्टी मिळाली व रानड्यांनी लिहून दिलेल्या अर्जाचे अवशेष त्यांना त्यांच्या घरी मिळाले, अशी माहिती पुढे प्राप्त झाली. रा. ब. कै. काळे वकील (सातारा) व न्या. रानडे यांच्याबद्दल आदराचे उद्‌गार डॉ. आंबेडकरांच्या लेखनात आढळतात.

मोठ्या (Great Man) माणसाचे कस काय असू शकतात हे डॉ. आंबेडकरांनी निवेदले व प्रशस्ती केली. रानडे स्कूल (रानडी वळण) तत्कालीन महाराष्ट्रात महत्त्वाचे होते.

लोकमान्यांच्या जहाल प्रभावाने रानडे प्रभाव मागे पडला. रानड्यांकडे सुशिक्षितांनी पाठ केली. १९२५ साली आर.एस.एस. निघाल्यावर वरील उच्चभ्रू पांढरपेशांची पिढी संघवासी झाली. अशा काळात रानडे जन्मशताब्दीनिमित्त इ.स. १९३१ साली डॉ. आंबेडकरांनी एक उत्कृष्ट व चिंतनीय भाषण केले. जोतीराव, भीमराव प्रत्यक्ष रानडे प्रवाहात भाग घेते झाले नाहीत. प्रार्थना समाजाचे कार्य चांगले ठाऊक असूनही जोतीराव व भीमराव त्यांच्यात दाखल झाले नाहीत याची कारणे सामाजिक व आर्थिक होती. जोतीरावांनी शूद्रांची अस्मिता स्वतंत्रपणे जागी केली. याचा परिणाम महाराष्ट्रावर मोठा झाला. अतिशूद्रांची खास 'अस्मिता' बाबासाहेबांनी नंतर निर्माण केली. दोन्ही घटना संपूर्ण अलग नाहीत. सयाजीरावांचे लक्ष जनतेच्या प्रश्नाकडे जोतीरावांनी वळवले मग राजर्षी शाहू यांनी वरील दोन्ही क्षेत्रात एकाच वेळी कार्य केले.

जिस तन लागे वहि तन जाने । बीजा क्या जानें गव्हारा रे ।।

जोतीराव प्रत्यक्ष शेतकरी समाजातून पुढारी म्हणून पुढे आले होते. त्यांना जो स्वानुभव होता तो त्या काळातील सुस्थितीतील रानड्यांना असणे शक्य नव्हते. एरव्ही रानडे हे फुल्यांचे मित्रच होते. मतभेद सार्वजनिक प्रश्नांवर होते.

डॉ. आंबेडकरांना दलितांच्या प्रश्नाची जेवढी आच वेदना जाणवत होत्या तेवढ्या प्रमाणात शिंदे व गांधी यांना वेदना होणे व त्या जाणवणे अशक्य झाले एवढे मान्य व्हावे. म्हणजे फुले-आंबेडकर संयुक्त विचार व कृती समजू शकते. फुले-आंबेडकरांचा लढा सकारण होता. हिंदु धर्मातील कोडी अद्याप सजीव आहेत.

### शिंदे, टिळक व डॉ. आंबेडकर

मोठमोठ्या पुढारी व्यक्तींमध्ये अंतर कसे व का पडले हे तपासण्यासारखे आहे. हा लेख एक अभ्यास आहे, फुले-आंबेडकर यांचे विचार परस्परांच्या जास्तीत जास्त जवळचे ठरतात. माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा येण्याचा काळ होता. साऊथ बरो कमीशनचे मतदार संघ कसे असावेत यासंबंधाने साक्षी घेतल्या. बाबासाहेबांनी त्यावेळी पुढील विचार प्रदर्शित केले. फुल्यांप्रमाणेच बाबासाहेबांना उच्चभ्रू शहरी लोकांच्या राष्ट्रीय सभेत अगर त्यांनी भरवलेल्या अस्पृश्यता निवारक अधिवेशनात रस नव्हता "A farce of a conference for the removal of untouchablity was enacted in March 1918 in Bombay... Kurtakoti the shankaracharya though promissed to attend left for Northern India. Mr. Tilak is eradited with a short speech at the conference

which has for the good luck of Mr. Tilak remained unreported, But this was lip Sympathy" याचे कारण अस्पृश्यता निवारक जाहीरनाम्यावर टिळकांनी नंतर सही केली नाही.

रानड्यांना विरोध दर्शवणे हा भाग फुल्यांच्या वाटेस आला. तसाच टिळकांना विरोध करणे व एकूण नापसंती व्यक्त करणे बाबासाहेबांना भाग झाले ! फुले-आंबेडकर व्यक्ती अगर विभूतिपूजक नव्हते. फ्रँचाईज रिफॉर्म कमिटीपुढे टिळकांनी केलेल्या त्या वेळचा लखनौ करार, हा कसा घातक आहे हे त्यावेळीच सांगितलेले आढळते. डी. सी. मिशनचे शिंदे व टिळक यांच्यावर टीका आंबेडकरांच्या साक्षीत झाली होती, ती अटळ होती. फुले-आंबेडकरांत अतुल असे धैर्य व निर्भीडता होती. मुसलमानांचा अनुनय करून व अस्पृश्यांना डावलून मुस्लिमांना झुकते माप दिले, ह्याचा निषेध आंबेडकरात आढळतो. जोतीबा राष्ट्रीय सभा सार्वजनिक सर्वांची नाही. तिला शूद्रांच्या प्रश्नांची प्रचीती नाही असे स्वच्छ म्हणत. बाबासाहेबांनी पुढे काँग्रेसला "non national anti National" म्हणून संबोधले आहे. हिंदू धर्मग्रंथावर जोतीबांनी टीका करण्यास चांगलीच सुरुवात केली होती. बाबासाहेब स्कॉलर होते. त्यांनी विद्वत्तापूर्ण अशी भर घातली व फुले-आंबेडकर हा एक समास झाला. देशी / विदेशी / ख्रिस्ती मिशनरी व विल्सन जोन्ससारखे युरोपिअन पंडित हिंदू-धर्मावर टीका करताना त्यांचा धर्म श्रेष्ठ आहे, असे ध्वनित करण्याचा हेतू होता. फुले-आंबेडकर यांचा उद्देश स्वतंत्र होता. म्हणजे त्यांना विषमता दूर करावयाची होती. हा फरक ध्यानात घेणे, जरुरीचे आहे. धर्मांतरे का झाली व होतात याची कारणे फुले-आंबेडकरांनी सांगितली आहेत. जोतीबा आमरण वेद व मनुस्मृती यावर घाव घालत राहिले, याची कारणे तपासली पाहिजेत. वेदस्मृतीचे ईश्वरदत्तपण व सर्वप्रमाण्य धर्मक्रांतीसाठी सोडावे लागते.

।। रणांगणी आर्य धूर्तांनी दस्यू जिंकुनी गणिले दासात।
तुम्ही नव्हता तुमचा दास, पुसा वेदास ओढा चौघांत ।।
बुद्धांनी खोड मोडिली, कीर्ती जोडली, सर्व जगात।
मनुस्मृति आहे पाखांडाची मुळी ।।

विस्तार भयासाठी फुले-आंबेडकर यांच्या विचारातील अधिकाधिक साम्ये (एकता) उद्धृत करणे येथे शक्य नाही. आंबेडकरांना फुले सर्वांपेक्षा जवळचे का वाटले, याचा शोध व बोध तौलनिक व समन्वयक अभ्यासपद्धतीने घेण्यासारखा आहे. जितके खोल जावे व

व्यापक व्हावे तितके ज्ञान वाढते. हिंदू-धर्म समर्थ कसा होईल? याची मीमांसा फुले-आंबेडकरात सापडते. चिपळूणकर-टिळक, आगरकरांना फुले समजले नाहीत. पण बॅ. सावरकर व आता नंतर देवरस यांना फुले-आंबेडकरांचे उद्देश समजू लागले.

### म. फुले न्या. रानडे दलितोद्धार

अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न फुल्यांनी हाती घेतला होता, पण शूद्रांसाठीच त्यांना सत्यशोधक समाज काढणे भाग झाल्याने या प्रश्नाकडे मध्यंतरी दुर्लक्ष झाले. स्पृश्य व त्रैवर्णिकांमधील समाजसुधारकांनी अस्पृश्यता निवारण्याचे प्रयत्न केले. यामुळे निदान शहरी पांढरपेशांनी अस्पृश्यतेची रूढी सोडली. बंगाल्यातील केशवचंद्र सेन हे धर्मसुधारक १८६७ साली पुनः मुंबईस आले. विलायतेची सफर करून आलेल्या केशवचंद्रांना दलितांच्या प्रश्नांची निकड वाटली व मुंबईमधील धर्मसुधारकांना अस्पृश्यता निवारणाकडे लक्ष पुरवण्यास सांगितले. अस्पृश्य कामगारवर्गाच्या वस्तीत रात्रीच्या शाळा काढण्यात आल्या. पुढे यासाठी स्वतंत्र मिशनच असावे असे शिंदे यांना वाटले. डी. सी. मिशनच्या शाखा भारतात अनेक ठिकाणी निघाल्या. खुद्द रानड्यांना या प्रश्नाची निकड होती. "इंग्रज तुम्हास गुलाम म्हणून वागवतात, पण तुम्ही अस्पृश्यांना त्यापेक्षा वाईटरीतीने वागवता" असे रानड्यांचे उत्तर होते. निग्रो प्रश्नाची सोडवणूक करणाऱ्यांनी आपल्याकडील अस्पृश्यतेचा प्रश्न सोडवावा, असा रानड्यांचा अभिप्राय होता. रानड्यांच्या निधनानंतर ना. गोखले-परांजपे आदी करून पुष्कळांनी अपयशी झालेल्या रानड्यांची इच्छा पुरी करण्याचा प्रयत्न केला. जोतीबांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाकडून असा शिस्तशिर, संस्थापक व प्रचारात्मक अखिल भारतीय प्रयत्न झाला नाही. प्रार्थनासमाजाने अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले' असे उद्‌गार डॉ. आंबेडकर यांच्या एका लेखात सापडतात. रानडे यांच्याबद्दल आंबेडकरांना जिव्हाळा वाटला, कारण वरील कार्य करण्याची परंपरा होय. मागे 'फुले-रानडे' खटका उडाला असला तरी प्रार्थनासमाज व शिंदे यांनी या उभयतांच्या अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यात मध्यंतरी भर घातली हेही खरे. डी. सी. मिशनच्या कार्याला मर्यादा पडल्या व व्हावे तितके कार्य होऊ शकले नाही. असे शिवराम जानबा कांबळे वगैरेंना वाटले. डॉ. आंबेडकरांचेही समाधान झाले नाही व त्यांचे 'स्वोद्धाराचे' स्वतंत्र नवे पर्व सुरू झाले. 'स्वोद्धार' हा फुल्यांचाही अब्राह्मणांसाठी पवित्रा होता. यासाठी त्यांना रानडे व त्यांच्या संप्रदायापासून विग्रह घ्यावा लागला. तसा आंबेडकरांना अनेक स्पृश्य-अस्पृश्योद्धारकापासून विग्रह घ्यावा लागला. समास व समन्वय यापेक्षा विग्रहाने जास्त प्रगती होऊ शकते किंवा काय? कोणत्याही प्रश्नाला दोन बाजू असतात. म्हणून तटस्थेने विवेक करावा लागतो.

राष्ट्रवादी विचारप्रणालीला ‘जमातवादी विचारप्रणालीचा प्रतिबंध करणारी शक्ती’ असे समजणे ठीक होते, पण समकालीन सांप्रदायिकतेचा इलाज राष्ट्रवादात शोधणे मात्र योग्य होणार नाही. सांप्रदायिकता प्रतिगामी आणि राष्ट्रवाद पुरोगामी; सांप्रदायिकता धर्मपिसाट आणि राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष ही समीकरणेही आताच्या संदर्भात अचूक म्हणता येणार नाहीत. उलट असे वारंवार प्रत्ययास येते की सांप्रदायिकतेइतकाच राष्ट्रवादी वंशवादी, पक्षपाती व फॅसिस्ट असू शकतो. स्वातंत्र्योत्तर भारतात तर राज्यकर्त्यांच्या सर्व चुकांवर अचूकतेचा मुलामा देण्यासाठीच बहुदा राष्ट्रवादाचा वापर झाला आहे. भांडवलदारी विकासाचे दुष्परिणाम लपवण्याचा मुखवटा म्हणून जसा तो राज्यकर्त्यांना उपयोगी ठरला, त्याचप्रमाणे जनहितरक्षक विरोधकांना राष्ट्रदोही ठरवून दडपण्याचे हत्यार म्हणूनही त्यांचा वापर राज्यकर्त्यांनी पुनःपुन्हा केला आहे. राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता, राष्ट्रबांधणी वगैरेंचा प्रचार करूनच राजीव गांधी सत्तेवर आले व टिकले होते हा ताजा इतिहास आहे. ‘फुटीरतेचे संकट’ हा धोशा लावून कष्टकऱ्यांचे व अल्पसंख्याकांच्या रास्त मागण्यांवर उभे राहिलेले लढे दडपण्याची तर अनेक उदाहरणे सांगता येतील. एका बाजूने हिंदू सांप्रदायिकतेचा अनुनय आणि दुसऱ्या बाजूने राष्ट्रवादाच्या पोकळ भूलथापा हा राजीव शैलीचा खास स्थायिभाव झाला होता. या देशात आज राज्यकर्त्या वर्गाचे राष्ट्र आणि श्रमिक वंचित कष्टकरी दलितांचे राष्ट्र एकच आहे, असे विधान डोळे उघडे ठेवून करणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे राष्ट्रवाद ही वर्गनिरपेक्ष संकल्पना म्हणताच येणार नाही आणि ते जमातवादाचे संकट निस्तरण्याचे साधनही ठरू शकणार नाही.

धर्माला पारलौकिकाच्या चौकटीत मर्यादित केल्यास सामाजिक-राजकीय जीवनात त्याने माजवलेला हैदोस थांबेल, असे बुद्धिप्रामाण्यवादी-धर्मनिरपेक्षतावादी विचारवंतांना वाटते. लोकांच्या मनात आधीच पक्के पाय रोवून बसलेल्या धर्मश्रद्धा दैनंदिन व्यवहारातून वाढणाऱ्या अगतिकतेपोटी अधिकाधिक बळावत चालल्या आहेत हे नाकारता येणार नाही. व्यावहारिक धकाधकीच्या मुकाबल्यात टिकून राहणाऱ्या झुंजारपणाच्या अभावी येणारा हताशपणा, दुबळेपणा, पराभूतवृत्ती व न्यूनगंड हेच बव्हंशी समाजात द्रुतगतीने वाढणाऱ्या धार्मिकतेचे मूलस्त्रोत्र असतात. मंदिरासमोर शिक्षित तरुणतरुणींच्या दररोज लांबत चाललेल्या रांगा सामाजिक ध्येयवादाच्या अभावी निर्माण झालेल्या पोकळीची जशी साक्ष देतात; तद्वतच दिशाहीन भवितव्यातून निष्पन्न होणाऱ्या अस्वस्थतेची पावती देतात. स्वकर्तृत्वापेक्षा दैवी अनुग्रहावर भिस्त ठेवण्याच्या मनोवृत्तीला आणि वर्तनापेक्षा अतिदूरच्या भूतकाळाला चिकटून राहण्याच्या प्रवृत्तीला आळा घालणे नक्कीच आवश्यक आहे; कारण यांचा लाभ जमातवादी शक्तीं ना होतो. धर्माच्या नैतिक अंगाशी किंवा सामाजिक मानसिक प्रयोजनाशी व उपयुक्ततेशी

त्यांना मुळीच कर्तव्य नसते. फक्त संघटनेचे साधन म्हणून त्यांना धर्म वापरून घ्यायचा असतो. एरव्ही ते खरे तर धर्मविरोधीच असतात.

त्यामुळे धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करणारे विचारवंत पुनरुज्जीवनवादाची व जमातवादाची चिकित्सा करताना धर्म या संस्थेवर टीकास्त्र सोडतात ते अगदीच अनाठायी नसते. पण धर्माच्या भूमिकेचे अपुरे आकलन मात्र त्यामागे जाणवते. कोणत्याही समाजात प्रचलित असलेली धर्मसंकल्पना ही तिथे अस्तित्वात असलेल्या मानवी विश्वाची व्युत्क्रमित (इव्हर्टेड) जाणीवमात्र असते असे मार्क्सने म्हटले आहे. याचा अर्थ असा की, धर्माच्या विरोधात करायचा लढा हा अप्रत्यक्षात धर्म ज्या विश्वाचा केवळ आध्यात्मिक परिमल असतो त्या जगाच्याच विरोधात असतो. खऱ्या सुखाची मागणी करूनच धर्मरूपी भ्रामक सुखाच्या उच्चाटनाची मागणी पूर्ण होऊ शकते. लोकांनी भ्रम सोडावेत असे म्हणताना ज्या परिस्थितीतून भ्रम निपजतात ती बदलणेच अभिप्रेत असते. थोडक्यात धर्मचिकित्सा ही जर वास्तव चिकित्सा नसेल तर कधीच प्रभावी ठरणार नाही. जमातवादात किंवा भौतिक संकटे विसरण्यासाठी पळवाटा म्हणून धार्मिक अस्मिता गोंजारण्याच्या प्रवृत्तीवर प्रहार करायचा तर ज्या समाजव्यवस्थेतून त्यांची निष्पत्ती होते तिच्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. धर्माचे समाजव्यवस्थेशी असलेले हे अभिन्न नाते लक्ष न देता सरसकट धर्मविरोधी भूमिका घेणे किंवा त्या दोहोत यांत्रिक वेगळेपणात आणू पाहणे अडाणीपणाचेच लक्षण ठरेल. उलट कल्पकतेने वापर केल्यास मुक्तिदायी परिवर्तन प्रक्रियेचे साधन म्हणूनही धर्माचा वापर करणे शक्य असते, हे इतिहासात अनेकदा घडले.

सांप्रदायिकतेच्या कारणांचे अतिसुलभीकरण जेव्हा घडते तेव्हा त्या प्रश्नाची अतिसोपी उत्तरे शोधली जाणे अपरिहार्यच होऊन बसते. सांप्रदायिकता हे 'भांडवलशाहीचे अपत्य आहे, राजकारण्यांचे ते मतलबी कारस्थान आहे, देशाला भेडसावणाऱ्या सर्व समस्यांचे ते मूलकारण आहे' अशा एकांगी व उथळ विधानांमधून हे अतिसुलभीकरण स्पष्ट दिसते. वस्तुतः सांप्रदायिकतेचा प्रश्न या देशात विविध कारणांनी उद्‌भवलेल्या सामाजिक-आर्थिक-राजकीय पेचप्रसंगाशी निगडित आहे. समाजातील गटागटांच्या ठिकाणी भूत भविष्यलक्षी आधारांवर (म्हणजेच वर्तनविन्मुखतेवर) अहंगंडाची केलेली उभारणी करून सर्व अरिष्टांचे खापर त्यांच्या डोक्यावर फोडण्याची प्रवृत्ती आणि त्या शत्रूचे समूळ शारीरिक उच्चाटन हाच रामबाण असल्याची श्रद्धाही अनुस्यूत असते. विवेकाशी तर सांप्रदायिकतेचे हाडवैरच असते, आणि हिंसेचे तिला वावडे नसते (उलटपक्षी काहीसे आकर्षण व अतिरक्त विश्वासच असतो) लोकशाही तिला मुळीच स्पृश्य वाटत नाही. ज्यू, दलित किंवा मुस्लिम वगैरेंचा छळ, विरोधकांचा द्वेष आणि जमल्यास वंशविच्छेद गुन्हेगारांची राजकारणात भरती,

नागरी समाजाचे लष्करीकरण, खुनी सशस्त्र दलाची उभारणी व प्रशिक्षण इत्यादी लक्षणे सांप्रदायिकतेच्या ठिकाणी सदासर्वत्र आढळतात. सामाजिक सुधारणेतून ज्यांचे हितसंबंध धोक्यात येतात ते सांप्रदायिकतेचा आधार घेतात. बेकारी-महागाई वगैरे आर्थिक अरिष्टांनी त्रस्त झालेले वर्ग योग्य मार्गदर्शनाअभावी सांप्रदायिकतेच्या चुकीच्या मार्गाचा अवलंब करतात. बेकार, हताश युवाशक्तीच्या असंतोषाला सांप्रदायिक वळण देणे शहरी वरिष्ठ वर्गाला नेहमीच सोयीचे असते. सत्तेचे जुने आधार गमावलेला राज्यकर्तावर्ग मतांचा मतलब साधण्यासाठी जमातवादी आवाहने करू लागतो आणि वाढत्या आर्थिक दूरावस्थेतून तीव्र झालेला जन-असंतोष राक्षसी कायद्याच्या दहशतीखाली दडपू लागतो. तर सत्तास्पर्धा मागे पडलेले त्याच वर्गाचे दुसरे श्रेष्ठी पाकिस्तानने इस्लामीकरण चालवले असल्याचा बहाणा करून हिंदू जमातवाद भडकावण्याचा खटाटोप करतोय. अशाप्रकारे सांप्रदायिकतेत अनेकांचे अनेकानेक हितसंबंध गुंतलेले असतात आणि त्यामुळेच व्यापक सर्वंकष लढ्याखेरीज तिचा मुकाबला करताच येणार नाही.

विषम आर्थिक विकासापायी लाखोंची दुरावस्था आणि मूठभरांची सुबत्ता ही जी फलश्रुती पुढे आली, ती विचारात घेतल्याखेरीज सांप्रदायिकतेशी दोन हात करणे केवळ अशक्य आहे. आणि इथेच सत्यशोधक चळवळ, आंबेडकरी आंदोलन आणि मे दिन लढा यांना अभिप्रेत असलेल्या समग्र संघर्षाचे आदर्श आपल्यासाठी प्रस्तुत ठरतात. कोणत्याही विशिष्ठ प्रश्नाचा पृथकपणे विचार न करता त्याची अन्य प्रश्नात अडकलेली मुळे शोधण्याचा प्रयत्न झालाच पाहिजे. सांप्रदायिकतेचा प्रश्न आधी सगळे मिळून सोडवू आणि नंतर वर्गीय प्रश्नांचे बघू असे करता येणार नाही. किंबहुना सांप्रदायिकता विरोधी लढा आणि समाज-वादासाठी करावयाचा लढा हे एकमेकांपासून वेगळे, एकमेकांपेक्षा कमी वा अधिक तातडीचे असलेले, किंवा एकमेकांचे पर्यायवाची व पृथक असे लढे नाहीतच.

किंबहुना आर्थिक शोषण, विषमता, बेकारी, छळ, निराशा वगैरेंमधून अटळपणे येणारा सामाजिक भौतिक पेच हाच सांप्रदायिकतेची निपज करतो. धार्मिकता पुनरूज्जीवनावर मूलतत्त्ववाद-जमातवाद या सर्व प्रकारांना टिकवून धरतो व बळकटी आणतो. विशेषतः त्या सर्वांचा प्रतिवाद, प्रतिबंध करणाऱ्या लोकशाही व समाजवादी संस्कृतीचा जिथे अभाव असतो तिथे तेव्हा धार्मिक मूलतत्त्ववादाचे आवाहन अधिकच प्रभावी ठरते. त्यामुळे सांप्रदायिकता विरोधी लढा दलित शोषितांच्या वर्ग लढ्याशीच जोडावा लागेल. आज वर्ग लढ्याचे नेतृत्त्व सदोष असेल तर ते बदलता येईल, त्यांचे अग्रक्रम व कार्यक्रम बदलता येतील, आणि पायाही विस्तारता येईल, पण वर्गीयतेच्या राजकारणाला सोडचिठ्ठी देऊन मात्र काहीच साधणार नाही. वंचित श्रमिकांना विभक्त करण्याचे सांप्रदायिकतेचे अगाध सामर्थ्य ध्यानात घेतल्यास वर्गलढे चालवणारांनाही तिच्याकडे कानाडोळा करून अजिबात चालणार नाही.

थोडक्यात, सांप्रदायिकतेचा प्रश्न हा केवळ संकुचित धार्मिक विचारप्रणालीपलीकडे सरकण्यातून सुटणारा नाही, तर फुले-आंबेडकरांच्या चिंतनात प्रतिबिंबित झालेल्या खऱ्या 'राष्ट्र' ला भ्रष्टराज्यकर्त्या वर्गाच्या कचाट्यातून सोडवल्यानंतरच तो सुटू शकेल. विद्यमान सामाजिक, आर्थिक व्यवस्थेच्या विरोधात आणि समाजवादाच्या ध्येयासाठी आर्थिक, राजकीय विचारप्रणालीच्या आघाड्यावर करावयाच्या समग्र, व्यापक व मूलगामी लढ्यातूनच सांप्रदायिकतेचा निःपात होणार आहे. इतर सर्व लढे हे त्या लढ्याचे पूरक भाग मानले जाणे अगत्याचे आहे. आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही 'पृथ्वीच्या पृष्ठभागावरील कोणत्याही धर्मपुस्तकात आरंभापासून शेवटपर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नसल्याचा' निर्वाळा देणारे म. फुले (म. फुले समग्र वाङ्मय, पृ. ३६९) त्याच ग्रंथात पवित्र कुराणात 'सार्वजनिक सत्य' असल्याचे (म. फुले समग्र वाङ्मय पृ. ४०२) सांगू लागतात; तेव्हा मुसलमान धर्माबद्दल त्यांची धारणा व अभ्यास हिंदू धर्माच्या तुलनेत डोळस नव्हता असे म्हणणे भाग आहे. शिवाजी महाराजांनी मुसलमानांचा पाठलाग केला तो रामदासाच्या फसवणुकीमुळे, असाही निष्कर्ष फुल्यांनी नोंदला आहे. शिवाजी व रामदास यांच्या प्रत्यक्ष भेटीबद्दल ऐतिहासिक सत्य पुरेसे स्पष्ट झालेले नाहीत. याबद्दल फुल्यांना दोष देण्याचे कारणच नाही. कारण म. फुले हे इतिहास संशोधक म्हणून श्रेष्ठ असल्याचा कुणाचाच दावा नाही. हिंदवी स्वराज्याची स्थापना हाच शिवाजीराजांचा हेतू असून त्याच्या आड येणारा ब्राह्मण, मराठा असो की मुसलमान असो, त्याचा पाडाव शिवाजीने केला. तेव्हा 'मुसलमानांचा पाठलाग' रामदासांच्या सांगण्यावरून शिवाजीने केला या म्हणण्यात तथ्यांश नाही. अफजलखानाच्या कुलकर्णी वकिलाचा शिरच्छेद करणारा आणि धार्मिक असूनही धार्मिक औदार्य, सत्य, न्याय मूल्यावर राज्य चालवणारा राजा शिवाजी, रामदासाकडून कसा फसवून घेईल ही शंकाच फुल्यांच्या मनाला स्पर्श करत नाही. कदाचित ऐतिहासिक साधनेच तेव्हा उपलब्ध नसतील.

मुसलमान धर्मातही अस्पृश्यता नसली तरी जाती असल्याची वास्तवता १९ व्या शतकातील भारतीय समाजात होतीच. तरीही म. फुल्यांच्या मुस्लिम वा ख्रिश्चन प्रेमावरून त्यांना 'मुस्लिम धार्जिणे' किंवा 'ख्रिश्चन धार्जिणे' ठरवणे अन्यायाचे आहे. कारण म. फुले यांनी खरोखरच मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्माकडे बुद्धी गहाण ठेवली असती तर सार्वजनिक सत्यधर्माची स्थापनाच त्यांनी केली नसती. या धर्मातील उदात्त मूल्यव्यवस्था आणि मुख्यतः जातिव्यवस्थाविरोधी समतातत्त्व यांनी म. फुल्यांना आकर्षित केले होते. हिंदू धर्माच्या तुलनेत फुल्यांना मुस्लिम-ख्रिश्चन धर्माचे महत्त्व जाणवले पण त्यांचे निर्णायक निर्दोषत्व त्यांना मान्य नव्हते, म्हणूनच 'सार्वजनिक सत्यधर्मा' ची गरज त्यांना वाटली.

मु. फुल्यांच्या महात्मेपणाच्या प्रेरणेचे श्रेय काही विद्वान ख्रिश्चन धर्मास देतात, तर य. दि. फडके भारतीय परंपरतेतील कबीर व 'वज्रसूची' ग्रंथास देतात.

भारतीय महात्म्याच्या श्रेष्ठत्वाचे श्रेय पाश्चात्यांकडे न जाऊ देता भारतीय परंपरेतीलच समांतर व्यक्ती व ग्रंथाला देण्यात परंपरागत मानसिकतेला समाधान वाटते, म्हणूनच हरि नरकेंसारखा अलिकडील तरुण अभ्यासकसुद्धा हिंदू धर्माच्या चिकित्सेची प्रेरणा म. फुल्यांनी संत कबीरापासून घेतल्याचे सांगतो. (म. फुले बदनामी : एक सत्यशोधन, पृ. २६) चिकित्सेची आणि उदात्त कृतिशीलतेची प्रेरणा देण्यात ख्रिश्चन, इस्लाम, कबीर, वज्रसूची, थॉमस पेन हे सर्व आणि इतरही घटक जे खुद्द फुल्यांनाही माहीत नसावेत; ते सर्व कारण ठरू शकतात. एकांगी विचारातून एकच प्रेरणा, म. फुल्यांना मिळाल्याचे दाखवून परंपरागतेची सोय झाली तरी ते संपूर्ण सत्य नसते. 'सत्यशोधकांना कबीर व वज्रसूचीच प्रेरक ठरली' हा डॉ. य. दि. फडके यांचा निष्कर्ष म्हणूनच वस्तुस्थितीला धरून नाही. (व्यक्ती आणि विचार पृ. ४३) खुद्द म. फुल्यांनी लहानपणी, मुसलमान खेळगड्यामुळे जातिभेदाच्या खोटेपणासंबंधी खरे विचार आल्याचेही नोंद केली आहे. (म. फुले समग्र वाङमय, पृ. ६४, ६५) याशिवाय ख्रिश्चन धर्माचा आणि थॉमस पेन यांच्या विचारांचा प्रभावसुद्धा त्यांच्यावर पडला होता. या संदर्भात गं. बा. सरदार यांचा म. फुले गौरव ग्रंथातील 'महात्मा फुले : जडणघडण' हा लेख जिज्ञासूंनी जरूर अभ्यासावा.

म. फुल्यांचा सार्वजनिक सत्यधर्म हा सामाजिक धर्म असला तरी आणि त्याचे स्वरूप प्रामुख्याने लौकिक असले तरी तो मूळ धर्मसंकल्पनेला आणि धार्मिक कल्पनांना खऱ्या अर्थाने आव्हान ठरणे शक्यच नव्हते. कारण कोणताही धर्म नव्या धर्माने मरत नाही, हाच जगातील धर्माचा इतिहास आहे. ज्या हिंदू धर्माविरूद्ध म. फुले आयुष्यभर समग्र विद्रोह करीत राहिले तो धर्म जिवंत राहिला, पण भौतिकतेला प्राधान्य देणारा फुल्यांचा लौकिक असा 'सार्वजनिक सत्यधर्म' मात्र व्यवहारात संपुष्टात आल्याचा ताजा इतिहास आहे. अर्थात त्यांचा धर्म संपला असला तरी त्यांची मूल्यात्मक सृष्टी जिवंत असून समतेचा प्रवाह सर्व पदर एकत्रित करून समृध्द करण्यात म. फुल्यांची विचारधारा आजही महत्त्वाचे योगदान देत आहे. आणि याच दिशेने समाजपरिवर्तननाची कोंडी फुटून मानवाची मुक्ती होणार आहे हा आशावाद ठेवायला जागा आहे, यात वाद नाही. या पार्श्वभूमीवर रा. ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे म. फुल्यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्माला' युटोपिया म्हणता येणार नाही. (म. फुले गौरवग्रंथ, पृ. ६१) कारण या धर्माची मूल्यधारा काल व आजही मोठ्याप्रमाणावर समाजात रुजल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्या मूल्याच्या अधिष्ठानावरच 'आंबेडकरी पर्व' आकारले

आणि परिवर्तनाची चळवळही पुढच्या टप्प्यावर पोहचली. काही मर्यादा असल्या तरी म. फुल्यांची निर्णायक थोरवी यातच आहे म्हणून ते डॉ. आंबेडकरांसह वंदनीय व अनुकरणीय आहेत.

प्रसूतिगृह सुरू केले. या सर्व स्त्रिया त्या काळात मध्यमवर्गीय समाजातीलच होत्या. महात्मा फुले यांनी आपल्या कामामध्ये कधीही संकुचित असा जाती-जमातींचा विचार येऊ दिला नाही. दुःखी-कष्टी अशा व्यक्तींच्या डोळ्यांतील अश्रू पुसणे हेच एक जीवनातील उदात्त कार्य त्यांनी आपल्या डोळ्यांसमोर ठेवले होते. याच उदात्त प्रेरणेने ते जन्मभर कार्य करीत होते. करुणा हीच त्यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची प्रेरणा होती.

महात्मा फुले खऱ्या अर्थाने या देशातले मानवी मुक्तीचे थोर प्रणेते होते. महात्मा फुले यांनी आपले ‘गुलामगिरी’ हे पुस्तक अमेरिकेतील गुलामगिरी नाहीशी करणाऱ्या थोर पुरुषांना अर्पण केले आहे. त्यांची या पुस्तकाची अर्पणपत्रिकादेखील अतिशय अर्थपूर्ण आणि मोलाची आहे. त्यांच्या डोळ्यांसमोरील मानवी मुक्तीचे क्षितिज किती विस्तीर्ण होते, याची जाणीव त्यांच्या या अर्पणपत्रिकेवरून दिसून येते. आपल्या या अर्पणपत्रिकेत ते म्हणतात,

युनैटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांनी
गुलामांसह दास्यत्वापासून मुक्त,
करण्याच्या कामांत औदार्य,
निरपेक्षता व परोपकार
बुध्दी दाखविली यास्तव त्यांच्या
सन्मानार्थ हें लहानसें पुस्तक त्यांस
परम प्रीतिनें नजर करितो.

महात्मा फुले हे व्यापक अशा मानवी मुक्तीचेच प्रवक्ते होते, याचा प्रत्यय त्यांच्या सर्वच जीवनकार्यातून येतो. परंतु त्याहीपेक्षा याची स्पष्ट जाणीव त्यांच्या ‘सार्वजनिक सत्यधर्म’ पुस्तक या पुस्तकातून येते. त्यांनी या ग्रंथामध्ये शेवटी ग्रंथकर्त्यांची प्रार्थना म्हणून काही अखंड दिले आहेत. या प्रार्थनामधून म. फुले हे सर्वच जातीजमाती-धर्म, भावना यांच्या सीमारेषा ओलांडून पलिकडे गेले आहेत असे दिसते. इतकेच नव्हे तर देशाच्या सीमा ओलांडूनदेखील सर्व मानवी समाजाचा व्यापक असा ते विचार करीत आहेत याची स्पष्ट जाणीव होते. याबाबतचा विचार मांडताना ते म्हणतात,

**अखंड**

सर्वांचा निर्मिक आहे एक धनी।। त्याचें भय मनीं।। धरा सर्व।। न्यायानें वस्तूचा उपभोग घ्यावा।। आनंद करावा।। भांडू नये।।२।। धर्म राज्य भेद मानवा नसावें।। सत्यानें वर्तावें।। ईशासाठी।।३।। सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों।। मनुजा सांगतों।। जोती म्हणे।।४।। स.।।

महात्मा फुले यांच्या आचार-विचारांचा एकत्रित विचार केल्यास प्रेम आणि दुःखी कष्टी माणसाबद्दल, दीनदुबळ्यांबद्दल अथांग प्रेम याच त्यांच्या जीवनातल्या दोन सर्वात प्रभावी प्रेरणा होत्या असे दिसून येईल. त्यामुळेच आयुष्यातल्या अनेक संकाटांना सामोरे जाऊन एखाद्या योद्ध्याप्रमाणे ते जन्मभर झुंजत राहिले. त्यांच्या या पुण्य-शताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांना विनम्रभावाने अभिवादन!

(अस्मितादर्श, औरंगाबाद, दिवाळी १९९०)

******

# ५ राजर्षी शाहूंची सामाजिक विचारसरणी

१८१८ साली पेशवाई बुडाल्यामुळे सुशिक्षित व सर्वसामान्य लोकांना काडीचेही दुःख झाले नाही. सन १८५७ चे बंड उत्तरेत झाले. खुद्द कोल्हापूर प्रांतात बंडाचा मागमूस नव्हता. साताऱ्याची गादी १८४८ साली बुडाली व छत्रपती शिवाजीची मुख्य गादी नाहीशी झाली, याबद्दलची खंत त्या काळी लोकांत फार होती. बडोदे-इंदूर-ग्वाल्हेर वगैरेंनी इंग्रजांशी स्नेह केल्यामुळे ही राज्ये टिकली. या राजघराण्यांशी पुढे कोल्हापूरकरांना जास्त संबंध राखता आला. शाहू महाराजांच्या व्यापक मनोवृत्तीतून तो वर्धमान झाला. मल्हारराव गायकवाडानंतर प्रसिद्ध दत्तक सुपुत्र सयाजीराव गादीवर आले व त्यांची प्रगमनशील कारकीर्द ही शाहू महाराजांच्या पुढे आदर्श म्हणून होती. फार काय, सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक, धार्मिक सुधारणेचा जो पाया घातला, तोच उपयोगात आणून राजर्षी शाहू महाराजांनी त्यावर दक्षिणेत सुंदर मंदिर उभारले! पुण्यात १८४८ साली जी सामाजिक व धार्मिक अवस्था होती, त्याचे वास्तविक चित्र लोकहितवादींच्या शतपत्रांत उमटले. नव्या पद्धतीचे इंग्रजी शिक्षण देऊन जी शिरस्तेदारांची नोकरशाही झाली, ती लोकांना पिळत असे. लोकहितवादींनंतर म. फुले यांनी याविरुद्ध आवाज उठवला. कोल्हापूरमध्येही कुलकर्णी-मामलेदार-शिरस्तेदार वगैरे वरिष्ठवर्गीयच शाहूपूर्व काळात होते. सन १८३९ साली पुण्यास ख्रिस्ती मिशनरी आले. तसेच ते सातारा व कोल्हापूर याही ठिकाणी आले. धर्मप्रसाराच्या मिषाने त्यांनी शिक्षणप्रसार, दवाखाने व अनाथालये वगैरे समाज कल्याणपर कार्ये चालू केली. एलफिन्स्टन-टेंपल वगैरे अनेक युरोपियन अधिकारी व रेव्ह. मरे-मिचेलसारखे स्कॉटिश मिशनरी यांच्या मनात ब्रह्मद्वेष असे. कारण त्यांना वरिष्ठांकडून विरोध, उपसर्ग व त्रास पोहोचत असे. जोतीरावांपासून सुरू झालेली ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळ लो. टिळक सार्वजनिक कार्यात पडण्यापूर्वीची होती. त्याचप्रमाणे राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूरच्या गादीवर येण्याच्या आगोदरची होती.

### संस्थानिक आश्रयदाते

सामाजिक सुधारणांची नवी चळवळ लोकहितवादी, फुले आणि त्यावेळच्या पिढीने चालवली होती. सन १८७५ नंतर केवळ सामाजिक चळवळीने राष्ट्राचे पुढे पाऊल पडेल, अशी खातरजमा लो. टिळक वगैरेंना बाळगता येईनाशी झाली. रोटीव्यवहारबंदी व विलायतेहून आल्यावर प्रायश्चित्त घेणे वगैरे जुन्या चालीरीती टिळक वगैरेंनाही नडत असत. परदेशगमन

हे पापाचे व धर्मबाह्य समजत. सातारचे शेवटचे कर्तबगार राजे छ. प्रतापसिंह यांना रेसिडेंट ग्रँड डफ् विलायत पाहण्यासाठी बोलावत होते. पण देवधर्म, जातिप्रतिबंधामुळे ह्या नव्या विचारांचे छत्रपतींना स्वागत करता आले नाही. त्यांच्याच राजवंशातील राजर्षी शाहू महाराज वेदोक्त प्रकरण चालू झाल्यावर विलायतेस गेले. त्यांनी हा प्रतिबंध पाळला नाही. शाहू-टिळक राजकीय क्षितिजावर येण्यापूर्वीच अव्वल इंग्रजीतील पहिल्या दोन पिढ्या झाल्या होत्या. ब्रिटिश साम्राज्यातील हिंदुस्थानचा दर्जा व लोकांच्या मागण्या यासंबंधीचे स्फुट विचार उदय पावत होते. शाहू महाराज गादीवर येण्यापूर्वी १८८५ साली राष्ट्रीय सभा स्थापन झाली. त्या अगोदर १८७६-७७ साली व पुढेही काही काळ महाराष्ट्रात सर्वत्र मोठा दुष्काळ पडला. तलवार जाऊन फक्त नांगरच राहिल्यामुळे महाराष्ट्रातील मुलुखगिरी करणारा सैनिक-शेतकरी या काळात अत्यंत दुर्दशेत सापडला. सरकारी फाळा व लोकलफंड भरण्याचीही त्याला कुवत नव्हती. 'शेतकऱ्यांची दैना' म. फुले व त्यांचे अनुयायी सरकार व राष्ट्रसभेपुढे मांडत होते. दुसऱ्या बाजूने म. फुल्यांचे मित्र वासुदेव बळवंत फडके यांना शेतकरी लोकांची दैना व दारिद्र्य पाहवले नाही, म्हणून त्यांनी क्रांतीचा मार्ग धरला. पण टिळक-आगरकरांना किंवा रानड्यांनाही तो नापसंत होता. लो. टिळक व शाहू या दोघांचाही काळ तुलनेने नेमस्तपणाच्या राजकारणाचा व सहकारवादाचा ठरतो. पुणे येथे सार्वजनिक सभा सन १८७० साली स्थापन झाली. तिच्यामध्ये सरदार-इनामदार व पुढे काही संस्थानिकही भाग घेऊ लागले. सार्वजनिक सभा संस्थानी राजकारणावरही मत प्रदर्शित करू लागली. केसरी पत्रातील आरंभीचे पुष्कळ लेख संस्थानी प्रश्नांसंबंधीचे होते. कारण जे त्यागाने नव्या स्वदेशी चळवळी व शाळा कॉलेजे काढू लागले; त्यांना संस्थानिकांचाच आश्रय घ्यावा लागे व तो मिळे. त्या काळात संस्थाने ही विद्वानांची आश्रयस्थाने होती. पुढारीसुद्धा संस्थानिकांवर अवलंबून असत.

### बर्वे प्रकरण

राजर्षी शाहू महाराजांचे दत्तक वडील शिवाजीमहाराज यांना वेड लागण्यास व त्यांचा छळ होण्यास कोल्हापूरचे दिवाण बर्वे कारणीभूत आहेत, असा खराखोटा संशय व्यक्त होऊ लागला. "कोणत्याही कारणाने छत्रपतींच्या जिवास अपाय झाला तर त्याचा कलंक बादशाही राणीच्या आणि तिच्या प्रतिनिधींच्या कपाळी आल्याखेरीज राहणार नाही!" १८८१ मध्ये 'केसरीत' असा मजकूर आला. नंतर लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे यासंबंधी जाहीर सभाही झाली. नंतरही 'केसरी' ने बर्वे यांच्याविरुद्ध बरेच लिहिले. टिळक-आगरकरांना त्यातूनच पहिली शिक्षा झाली. टिळक-आगरकरांना जामीन मिळवून देण्यात व १०१ दिवसांची सजा भोगून झाल्यानंतर त्यांचे पुणे-मुंबई येथे जाहीर स्वागत

करण्यात महात्मा फुले व त्यांचे अनुयायी व 'दीनबंधू' पत्र पुढे होते. म्हणजे शाहू पूर्वकाळी ब्राह्मणेतर पुढारी फार प्रसंगावधानी व विवेकी होते. महात्मा फुल्यांचा हा विवेक राजर्षी शाहू महाराजांनीदेखील सारासार बुद्धीने व देशहित दृष्टीने पुढे चालवला. अशाप्रकारच्या सारासार विवेकाची गरज आजही महाराष्ट्राला मोठ्याप्रमाणात आहे. बर्वे प्रकरणात शाहू महाराजांचे वडील शिवाजी महाराज यांचा अत्यंत वाईट प्रकारे इंग्रजांनी अंत घडवून आणला. कागल संस्थानचे अधिपती श्रीमान आबासाहेब घाटगे हेदेखील टिळक-आगरकरांची बाजू घेऊन पुरावा देण्यास तयार होते. पण शक्य झाले नाही. शिवाजी महाराजांच्या वंशजांसंबंधी व आद्य छत्रपतींविषयी म. फुले, टिळक, रानडे, गोखले वगैरेंना फार आदर होता. म. फुले यांनी १८६५ साली शिवाजीमहाराजांचे शौर्य वर्णन करणारा एक चांगला पोवाडा तयार करून प्रसिद्ध केला. रायगडावरही जाऊन आले. पुढे रायगडावरील श्री. शिवाजीमहाराजांच्या समाधीची डागडुजी व जीर्णोद्धार करण्याची चळवळ स्वतः लोकमान्यांनी शिरावर घेतली. यावेळीही म. फुले व कोल्हापूरकर छत्रपती यांनी रायगड फंडाला मुक्त हस्ते मदत केली. पुणे व कोल्हापूर यांचे सहकार्य व प्रेमसंबंध असे उल्लेखनीय आहेत. याला प्रेरणा देणारी पहिली महत्त्वाची उदार व उमदी व्यक्ती म्हणजे तरुण राजपुरुष व अल्पायुषी झालेले कर्तबगार जयसिंगराव घाटगे.

## जयसिंगराव घाटगे

पुणे व कोल्हापूर यांचे अद्वैत वर्धिष्णू करण्यात कै. जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचा मोठा वाटा होता. १८७८ साली कागल संस्थानची त्यांना मुखत्यारी मिळाली व सन १८८२ साली ते कोल्हापूरचे रीजंट झाले. टिळक-आगरकर-चिपळणूकर यांच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे ते व्हाइस प्रेसिडेंट होते. राजर्षी शाहू महाराजांचे हे जनक वडील होत. आबासाहेब लोकप्रिय व सुशिक्षित होते. रीजंट या नात्याने त्यांचा कारभार प्रजेला सुखावह झाला. आबासाहेब यांचे चिरंजीव राजर्षी शाहू महाराज ता. १७ मार्च १८८४ रोजी दत्तविधान होऊन गादीवर बसले. पुणे सार्वजनिक सभेसह सर्व महाराष्ट्राला आनंद झाला. कोल्हापूर प्रकरणी टिळक-आगरकरांनी जी तसदी घेतली तिची भरपाई झाली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीला दरबारी खजिन्यातून बरीच रक्कम दिली! कोल्हापूरकरांच्या उदाहरणामुळे इतर संस्थानिकांनी देणग्या दिल्या. सर जेम्स फर्ग्युसन यांच्या नावे पहिले स्वदेशी कॉलेज उभे राहिले! १८९५ साली शाहू महाराजांच्याच हस्ते ह्या नव्या कॉलेजने स्वतःच्या इमारतीत प्रवेश केला. शाहू महाराजांची ही कामगिरी अत्यंत मोलाची ठरते. फर्ग्युसन कॉलेजमधून अनेक कर्ते पुरुष व स्त्रिया शिकल्या. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व

गुरुवर्य बाबूराव जगताप हे दोघे फर्ग्युसनचेच ग्रॅज्युएट. टिळक-आगरकर यांनी छत्रपती घराण्यासाठी केलेला त्याग म. फुले व तत्कालीन लोखंडे-यंदे-हरी रावजी चिपळूणकर वगैरे ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या लक्षात आला होता.

## रानडे-गोखले गुरू

टिळकांना गुरू न समजता, म. गांधींनी गोखल्यांना गुरू मानले. गोखले यांची थोरवी त्यांनी रानड्यांना गुरू केल्यामुळे प्राप्त झाली होती, म्हणजे म. गांधी हे रानडे-गोखल्यांचे शिष्य होते. रानडे हे राजा राममोहन रॉय यांच्या परंपरेतील होते. म. गांधीप्रमाणेच शाहू महाराज रानडे-गोखले यांना गुरू मानत. त्या अर्थाने राजा राममोहन रॉय यांनी उद्घाटित केलेल्या नव्या समाजप्रबोधनात ते मोडतात. राजर्षी शाहू-फुले-लोकहितवादी-आगरकर पुरस्कारित सर्व सुधारणांचे सक्रीय पुरस्कर्ते झाले. राजर्षी शाहू यांनी रानडे-गोखले यांचा गुरू म्हणून स्पष्ट उल्लेख केला आहे. राजर्षी म्हणतात, "मागासलेल्या लोकांच्या उन्नतीकरता माझे कैलासवासी मित्र न्यायमूर्ती रानडे व गोपाळराव गोखले यांनी पुष्कळ श्रम केले. मागासलेल्या लोकांत विद्येचा प्रसार होण्याकरता विशेष प्रयत्न केले पाहिजेत, ही मूळ कल्पना मला त्यांच्यापासूनच आली." (राजर्षी शाहू छ. यांची भाषणे, पृष्ठ १६) रानडे यांना शाहू महाराजांनी गुरू केले; याचे कारण रानडे मराठा व तत्सम विद्यार्थ्यांना शिक्षणार्थ उत्तेजन द्यावे या मताचे होते. "बहुजनसमाज सुधारल्याशिवाय लहानशी ब्राह्मण जात काय करू शकेल ?" असा विचार व्यक्त करून गंगाराम भाऊ म्हस्के वकिलांच्या नेतृत्वाखाली न्या. रानडे यांनी ता. ८ जानेवारी १८८३ रोजी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन (पुणे), ही पहिली स्थिर अशी मोठी संस्था स्थापन केली व सयाजीराव गायकवाड यांचे साहाय्य मिळवून दिले व स्वतःही पुष्कळ द्रव्यसाहाय्य केले. सयाजीराव हे ह्या काळात मराठ्यांच्या हीनावस्थेबाबत फार काळजी करत असत. ही काळजी राजर्षींनी स्वसामर्थ्याने मोठ्याप्रमाणात दूर केली. म. फुले यांनी १८७३ सालात सत्यशोधक समाज स्थापला होता व मुख्यतः विद्याप्रसारक पवित्रा घेतला होता. तरी सत्यशोधक समाजाची स्थिर संस्था झाली नव्हती. दीर्घायुषी व स्थिर अशी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन हीच पहिली महत्त्वाची संस्था आहे. शिकलेली पहिली पिढी या संस्थेची आर्थिक मदत घेऊन पुढे आली. या संस्थेची तिसरी सर्वसाधारण सभा आल्बर्ट एडवर्ड इन्स्टिट्यूट, पुणे, येथे शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली झाली. महाराजांचे भाषण झाले व आभार मानण्याचे काम

गोपाळ कृष्ण गोखले यांनी केले. न्या. रानडे या संस्थेचे ट्रस्टी होते. रानड्यांचे मित्र डॉ. भांडारकर, लोकहितवादी वगैरे संस्थेचे साहाय्यक व हितचिंतक होते. शाहू महाराज १८८४ साली गादीवर आले, नंतर सार्वजनिक कार्यात पुण्यास येऊन भाग घेण्याचा हा पहिला महत्त्वाचा प्रसंग होता. मराठा विद्यार्थ्यांच्या उन्नतिप्रीत्यर्थ रानडे-गोखले यांनी जो महत्त्वाचा भाग घेतला, तोच भाग पुढे राजर्षी शाहू महाराज यांनी वर्धिष्णू केला. 'रानडे-गोखले' यांची जनता शिक्षणविषयक सक्रीय कळकळ अनुभवल्यामुळे त्यांना राजर्षींनी गुरू मानले. विद्येत मागासलेल्या बहुजन समाजासाठी जातिशः शैक्षणिक संघ काढून उन्नती घडवावी, अशा मताचे रानडे-गोखले होते.

## सामाजिक विचार-आचार

संस्थानाबाहेरील व प्रांताबाहेरील परिषदांची अध्यक्षस्थाने महाराजांनी भूषवली व लोकांनी स्वतः होऊनच ती त्यांना दिली. शाहू महाराज लंगोटबंद होऊन संग्रामाला व परिणामाला खडे होत. त्यांच्या विचारा-आचारात लटपट नसे. निश्चय, निर्धार व धडक देण्याची कुवत त्यांच्या ठायी मोठी होती. महाराजांची भाषणे अभ्यासल्यावर म. फुले व शाहू महाराज यांच्यातील वैचारिक दुवा कळतो. राजर्षी शाहू झाले नसते, तर फुले जोतीबा विस्मृत झाले असते! सन १८९० ते १९१६ अखेर त्यांच्या पश्चात त्यांची सनदशीर जागृतीची व शिक्षणप्रसाराची चळवळ मंद गतीने चालू होती. शाहू काळातच ती विविध प्रकारे व विविध बाजूंनी झंझावाती व वादळी झाली. समाजाचे स्वाभिमानी जिवंतपण याच काळात भासमान झाले. **स्वातंत्र्यानंतरही सामाजिक विचार व धार्मिक सुधारणा या क्षेत्रांत मराठा समाज निद्रिस्तच आहे. म्हणूनही राजर्षी शाहूंची सामाजिक विचारसरणी लोकांपुढे ठेवणे जरूर आहे.** मराठा शिक्षण परिषदांची अधिवेशने म्हणजे मराठ्यांची सामाजिक संमेलनेच होत. सन १९०१ साली महाराजांनी कोल्हापूरला मराठा विद्यार्थी वसतिगृह स्थापन केले. महाराज पंचकुळी, सप्तकुळी व शहाण्णवकुळी असे भेद करत नसत. कुणबी व मराठा हा भेदही त्यांच्यापुढे नव्हता. जैन-मुसलमान वगैरे लोकांसाठीदेखील त्यांनी वसतिगृहे काढली. कारण त्यांना ठाऊक होते की, आपले प्रजाजन म्हणजे फक्त पाटील-देशमुखच नव्हेत. मराठा बोर्डिंगमधून प्रथम सर्वसामान्य शेतकरी-कुणबी लोकांची गरीब व असाहाय्य मुले शिकली. त्यांचे दातृत्व सर्वत्र फैलावले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीला त्यांनी साठ हजार रुपयांची पहिली मोठी देणगी दिली. तेवढी देणगी त्यांनी त्यांच्या समाजातील नवीन निघालेल्या संस्थांनाही दिली नाही.

**रानडे-शाहू**

बहुजन समाज विद्येत मागासलेला आहे, तो पुढे आणण्यासाठी रानड्यांनी उपक्रम चालू केला. तोच राजर्षींनी विस्तारीत केला. राजर्षी शाहू हे ब्राह्मणांनाही मराठे-मराठा-मराठी समजत होते. न्या. रानडे व लो. टिळकही स्वतःला मराठा समजत होते. त्यांच्या संस्थेचे नाव 'केसरी-मराठा संस्था' आहे. ह्या सर्वांचे स्फूर्तिकेंद्र छत्रपती श्रीशिवाजीमहाराज हेच होते. रानड्यांना अतिशूद्रासंबंधी विशेष असा प्रयत्न करावा, असे उत्कटतेने वाटत होते. ही रानड्यांची इच्छा जास्तीत जास्त प्रकारे राजर्षी शाहू महाराज यांनी व कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुरी केली. न्या. रानडे हे जुना काळ व नवा काळ यांचा सांधा समाजसुधारणा व धर्मसुधारणा यांच्याद्वारे एकमेकांना जोडत असत. राजर्षींनीदेखील मागील काळाशी पूर्ण विग्रह घेतला नाही. पुढे १९०६ साली त्यांनी मराठा जैन बोर्डिंग उघडताना जैन धर्माचे अतिप्राचीनत्व व त्यांची मनुष्य व मनुष्येतर सर्व प्राण्यांसंबंधीची व्यापक अहिंसा बुद्धी ही दर्शनास आणली.

म. गांधी यांनी शाहू महाराज-जोतीराव फुले व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या व्यापक कार्याची महानता जाणली व जेधे-जवळकर वगैरेंचे स्वातंत्र्यलढ्यात स्वागत केले. **समाज, राष्ट्र सुधारावयाचे झाल्यास त्यातील व्यक्ती, सर्व जाती, समाज सारखे सुधारले गेले पाहिजेत व त्यांनी व्यापार उदीम व औद्योगिक क्षेत्रांद्वारे विकास केला पाहिजे, ही राजर्षींची न्या. रानड्यांप्रमाणे व्यापक व सर्वांगीण समाजसुधारणेची धारणा होती. फक्त धर्मसुधारणा म्हणजे सर्व सुधारणा असे ते मानत नसत. शेतकरी व शिपाई यांनाही चांगल्या शिक्षणाची जरुरी आहे, असे राजर्षींचे मत होते त्यातूनच सर्वच मागासलेल्यांची एकच फळी राजर्षींनी निर्माण केली.**

डॉ. आंबेडकरांना ब्राह्मणेतर पक्षाचे धुरीणत्व, राजर्षी शाहू महाराज यांच्या इच्छेप्रमाणे घेता आले नाही; पण बुद्ध व शाहू यांचाच धर्म व पक्ष त्यांना जवळचा होता. गुणज्ञ शाहू महाराजांनी गुणी माणसे हेरून काढली. ना. सर शंकरन् नायर, ना. सर रहिमतुल्ला, डॉ. नायर, रा. ब. चेट्टी, वा. रा. कोठारी, व्होरा, लट्ठे, मुकुंदराव पाटील ही समान तत्त्वाची व समान मतांची कर्ती मित्रमंडळी राजर्षींना भेटली. भास्करराव जाधव, राजारामशास्त्री भागवत, डोंगरे, ठाकरे वगैरे विद्वान पंडितांना राजर्षींनी जवळ केले. राजर्षी शाहू यांच्या ब्राह्मणेतर पक्षाची सुरुवात व पूर्वीच्या सत्यशोधक समाजाची संस्थापना व विकास करणाऱ्यांत मराठेतरच पुढे होते. राखीव जागा, फ्रीशिप्स, जोशी बिल वगैरे अनेक कामे शाहू पक्षाने केली. डॉ. आंबेडकर, न. चिं. केळकर, श्री. म. माटे, कर्मवीर शिंदे ही ब्राह्मणेतर पक्षीय मंडळी नव्हती, तरी त्यांना शाहू प्रशंसा करावीशी वाटली. शाहू यांच्या सामाजिक क्रांतीचे पवाडेही गावे लागले.

## जातिनिर्मूलनाचा पवित्रा

म. फुले यांच्याप्रमाणे डॉ. आंबेडकर यांच्यासाठी राजर्षींनी मजबूत पाया तयार केला. माणगाव येथे अस्पृश्यवर्गाच्या परिषदेच्या वेळी बलुतेदार-रयत समाजाची बाजू राजर्षींनी डॉ. आंबेडकर अध्यक्ष असतानाच स्पष्ट मांडली. अस्पृश्यतेचा प्रश्न हा मराठ्यांच्या घरचा-बाहेरचा-गावचा किंवा महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही, तो अखिल भारतीय आहे. स्वतःच्या संस्थानात व स्वतःच्या घरात-राजवाड्यात राजर्षींनी अस्पृश्यतानिवारण केले. शाहूराय बोलके नव्हते, ते कर्ते सुधारक होते. कर्मवीर शिंद्यांच्या अस्पृश्यतानिवारक कार्याला राजर्षींनी मोठ्याप्रमाणात साहाय्य केले. अस्पृश्यतानिवारण कार्याच्या इतिहासात राजर्षी शाहू यांच्या ह्या कार्याला महर्षी शिंदे यांनी महत्त्वाचे स्थान दिले. म. गांधी यांच्यासाठीसुद्धा राजर्षी शाहू यांनी पाया तयार केला. कारण वेळ येताच सर्व जागृत सत्यशोधक सत्याग्रही झाले; व तुरूंगवास भोगणारे स्वातंत्र्यवीर झाले. दलित म्हणवून घेणारे व स्वतःस अल्पसंख्य समजणारे, एक होऊन, नवी आव्हाने देत आहेत. अशा स्थितीत सत्तावंतांना व सत्यशोधकांना राजर्षी शाहू यांचे व्यापक सामाजिक विचार व कार्य बोधपर व मार्गदर्शक आहेत. शाहू महाराजांना मराठ्यांतील पोटभेद, ब्राह्मणेतरांतील पोटभेद व मराठा-मराठेतरपणा व अस्पृश्यांतील जातिभेद हे नको होते. काही मतलबी धूर्त विद्वान सांगतात की, जातिभेद व अस्पृश्यता या दोहोंचे एकाच वेळी निर्दालन करू नका. प्रथम अस्पृश्यता जाऊ द्यात. पण शाहू महाराज जातिभेद-जातिमत्सर व अस्पृश्यता यांचे एकाच वेळी निर्दालन करू इच्छीत होते. कारण त्यांना ठाऊक होते की, जातीवरून स्पृश्यास्पृश्यता ठरते. जात ही अस्पृश्यतेची जननी आहे. म्हणून 'जातिनिर्मूलन' हाच राजर्षींचा पवित्रा होता!

समाज सुधारावयाचा झाल्यास प्रथम त्याची धारणा करतो, तो प्रचलित धर्म सुधारला पाहिजे, त्यात क्रांती झाली पाहिजे, यासाठी प्रामुख्याने आर्यसमाज व सत्यशोधक समाज यांना त्यांनी पाठिंबा दिला. सामाजिक सुधारणांचे विविध कायदे करून, दलितांना नोकऱ्या वगैरेंबाबत सवलती दिल्या. अब्राह्मण पुरोहित निर्माण करणे हा सत्यशोधक समाजाचा एक उद्देश होता. हे क्षात्रजगतगुरु शंकराचार्यांप्रमाणे अस्पृश्यता, वर्णभेद, जातिभेद पाळीत नाही. वेदाधिकार सर्वांना देतात. स्वयंपुरोहित चळवळीचाच क्षात्रजगत्गुरुपीठ हा एक भाग होता. शाहू महाराजांनी जे धर्मनिर्णय घेतले होते, तसेच परिवर्तनवादी, तत्त्वनिष्ठ पंडितांनी पुढे घेतले व सर्व नव्या सामाजिक सुधारणांना शास्त्राधार दाखवले. धर्मनिर्णय मंडळाचा अभ्यास केला व त्यांचे निर्णय वाचले, तर त्यांनी शाहूपक्षाने पूर्वी घेतलेल्या अनेक निर्णयांसारखे निर्णय घेतल्याचे दिसून येईल. वेदबंदी उठवली. जातिभेद व अस्पृश्यता अमान्य केली. सर्व जातीतील

सूज्ञ मानवांना पौरोहित्य खुले केले. शंकराचार्यांचे हक्क व अधिकार धुडकावले. याप्रमाणे प्रत्यक्षाप्रत्यक्ष हा शाहू सत्यशोधक पक्षाचा विजयच होय. स्वतः म. जोतीबा फुले व सत्यशोधक व ब्राह्मणेतर अशा दोन्ही चळवळींचे प्रस्थापक होते. म्हणून पुढेही या दोन्ही चळवळींचे प्रवाह एकत्र वाहिले.

शाहू महाराजांनी अब्राह्मण संपादक, प्रकाशक, मुद्रक, कवी, शाहीर, लेखक, लोकनाट्यकर्ते, वगैरे वगैरे साहित्य निर्माण करणाऱ्या सर्वसामान्य व नवोदित समाजाभिमुख ज्ञानपर साहित्य निर्मात्यांना सहकार्य दिले.

'क्षात्रजगतगुरू' योजनेसंबंधी पुष्कळ मतमतांतरे झाली. भास्करराव जाधव, कर्मवीर शिंदे वगैरे तत्त्वनिष्ठांना ही योजना मान्य नव्हती. तात्त्विक दृष्टीने त्यांचे म्हणणे खरे होते. पण ऐतिहासिक दृष्टीने व अनुभवाने राजर्षींचे म्हणणे ही काळाची गरज होती. आज शंकराचार्यपीठे व क्षात्रजगतगुरूपीठ ही निर्माल्यवत झाली आहेत. त्यांची आज गरज दिसत नाही. राजर्षी शाहू महाराजांनी सत्ता ही सत्यप्रस्थापनेसाठी वापरली. दलित-गरिबांसाठी वापरली. सत्तेचा उपयोग तळातील व बहुजनतेसाठी कसा करावा, हे चालू व भावी कार्यकर्त्यांनी शाहू महाराजांपासून शिकावे. सत्ता तर घेतलीच पाहिजे. बहुजनांना वगळून अगर त्यांनी सत्तासंन्यास घेऊन राष्ट्रगाडा कसा चालेल?

(साधना साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९७४)

******

# ६ धर्मसुधारक-अस्पृश्योद्धारक राजर्षी शाहू महाराज

**आणिक निर्दळण कंटकांचे।**

–तुकाराम

माणूस व धर्म यांचा परस्परसंबंध, मनुष्य जातीच्या सुरुवातीपासूनचा आहे. हल्ली देखील धर्माचा पगडा सर्वसामान्य माणसावर, कमीजास्त स्वरूपात असतोच. रशियन जीवनात हा परिणाम विद्यमान आहेच. धर्म धारणा करतो. धर्म म्हणजे कर्तव्य. **धर्म म्हणजे आत्मा व परमात्मा यांच्या ऐक्याचे मंदिर दाखवणारी वाट;** असे परमोच्च धर्माचे स्वरूप असू शकते. पण धर्म म्हणजे ठरावीक आचारकांड, विधी, सकामयज्ञादि कर्मकांडे, पौराणिक विभुतींच्या मूर्तिपूजा अशा प्रत्यक्षात व्याख्या होतात. पुरोहितशाहीचा, ऐहिक जीवनाचा; आचारप्रधान धर्म हा एक मार्ग बनतो. पुरोहित नाना जातींचे व सर्व धर्मांचे असतात. म्हणून हा विशिष्ट जातिबोधक शब्द नव्हे. बुवा व बुवाबाजी करणारे सर्व जातीजमातींतून आढळतात, तसा हा मानसिक-सामाजिक-धार्मिक रोग असून तो जागतिक आहे. म्हणूनच मुख्यतः कार्ल मार्क्स आदिकरून बुद्धिवंतांनी, त्यास 'अफू' म्हटले. या अफूचा अंमल दूर व्हावा, म्हणून गौतमादी पुरुष राजर्षी व धर्मसुधारक झाले; महावीर झाले. त्यांच्याच थोर परंपरेतले आपले शाहू महाराजही महत्त्वाचे आहेत.

**विद्याप्रसार**

म. जोतीरावांनी सर्वसामान्य समाजाचे निरीक्षण केले. पाहणी केली. संशोधन चालवले. त्यांचा विचारचक्षू फार तीव्र व प्रखर होता. **संपूर्ण बुवाबाजी भस्मसात करण्याचे सामर्थ्य जोतीरावांच्या विचारांत आहे**. पण सर्वच कार्याचा सारा भार एकच थोर असामान्य व्यक्ती उचलू शकत नाही. महात्मा जोतीराव यांच्या देहावसानानंतर कर्मवीर भाऊराव पाटील, लोखंडे-भालेकर, महामुनी वगैरेंनी ती ज्योत जिवंत ठेवली. ह्या जोतीला प्रत्यक्ष राजर्षी शाहू महाराज प्राप्त होताच साऱ्या दख्खनेत ती प्रखरपणे प्रज्वलित झाली. म. फुले यांनी सामाजिक रोगाचे निदान अचूक केले. त्यांची नाडी परीक्षा चुकली नाही. बहुजन समाजात विद्येचा अभाव आहे, निरक्षरता आहे, हे त्यांनी जाणले व राजकीय स्वातंत्र्यापेक्षा त्यांना विद्याप्रसार प्रथमतः महत्त्वाचा वाटला व तो झाल्यावरच स्वातंत्र्य येते व टिकते असे त्यांना वाटले. म्हणूनच सत्यशोधक समाजाचे स्वरूप विद्याप्रसारक होते.

## सर्वांगीण प्रगती हे मुख्य ध्येय

श्री शाहू महाराजांचे पाठबळ सुरू होताच, सत्यशोधक समाजाची शक्ती अमर्याद झाली. भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, मुकुंदराव पाटील, जेधे-जवळकर-मोरे वगैरे असंख्य लहान मोठ्या कर्मवीरांना शाहू सूर्याने प्रकाश दिला. असंख्य कार्यकर्ते झिजले. हे जागृतिरूपी मंदिराच्या खाली सुप्त लौकिकाने आहेत. 'शाहू प्रभा' सत्यशोधक समाजाच्या इतिहासात अलौकिक, असामान्य व अमूल्य ठरली. म. जोतीराव महाभाग्यवान ठरले. कारण त्यांना अत्यंत पोलादी असा शिष्य प्राप्त झाला. सत्यशोधक समाजाच्या धार्मिक मतांसंबंधी मतमतांतरे असतील, होतील; पण विद्याप्रसार, विद्याजागृती, शैक्षणिक नवी लालसा निर्माण करणे व त्याद्वारे सर्वांगीण प्रगती साधणे, हा जो सत्यशोधक समाजाचा प्राणभूत भाग त्यासंबंधी दोन मते व भिन्न पक्ष होण्याचे कारण नव्हते व नाही.

## लोकगंगेत पावन झालेला महापुरुष

महाराजांचे नाव सुवर्णाक्षराने लिहावे लागते. **शाहू महाराज म्हणजे जनतेचे हृदय!** डॉ. आंबेडकरादी अनेक कर्मवीरांना त्यांचा वरदहस्त प्राप्त झाला. वास्तविक पाहता त्यांचे संस्थानिक जीवन हे लोककार्यात विलीन झाले होते. म्हणून जनतेच्या सामान्य जीवनाचे ते पुरस्कर्ते होते. लोकनायक, लोकसंग्राहक, लोकसेवक, दीनबंधू, विद्येचा प्रसारक, धर्माचा सुधारक ह्या दृष्टिकोनातून कोणीही आता यापुढे शाहू चरित्राचे मूल्यमापन करील. साऱ्या बहुजन समाजाचे व ग्रामीण जनतेचे अवघे जीवन ज्यांनी बदलून टाकले. त्यांना आता संस्थानिक राजा म्हणून वर्णन करण्यात फारच थोडा अर्थ उरला. **लोकोद्धारार्थ लोकगंगेत पावन झालेला हा महापुरुष होय.**

विद्या सुधारली-ज्ञान वाढले की, धर्मही सुधारतो. भोळाभाव राहत नाही, बुद्धी जागृत होते. ही विद्या क्रांती मुख्यतः शाहुराजाने केली. त्यांनी अनेक संस्था जोपासल्या. शाहू महाराजांच्या उपलब्ध कामगिरीमुळे सर्वश्री यशवंतराव चव्हाण-बाळासाहेब देसाई यांना त्यांच्याच पायावर उभे राहता-चालता आले. त्या काळी सगळा समाज लंगडा होता. अज्ञानापायी अंध होता. पुरोहितशाहीच्या कबज्यात होता. ही धर्मबेडी शाहुराजाने तोडली. सत्यशोधक समाज आर्यसमाज यांना जवळ केले, वाढवले, प्रचाराची व प्रचारकांची सोय केली. वृत्तपत्रे काढली. कौन्सिलांत प्रतिनिधी जावेत असा प्रयत्न केला. धर्मसुधारणेच्या बाबतची आद्य छत्रपतींची इच्छा व शेवटच्या छत्रपतींची (प्रतापसिंह महाराजांची) मनीषा पूर्णत्वास नेली. वैदिक प्रकरण गाजवले म्हणून सत्यशोधक समाज पुनः जागृत होऊन सर्वांच्या नजरेत भरला. नाहीतर त्याची स्मृती पुसली गेली असती. शाहु महाराजांनी त्याला

अमरत्व दिले व राजकीय ब्राह्मणेतर पक्षालाही यशस्वी केले. म्हणून बहुजन समाजाच्या इतिहासात शाहू महाराजांना अग्रेसरत्वाचे स्थान द्यावे लागते. शाहू महाराज हे बहुजन समाजाचे एक उदार अंतःकरण होते. अस्पृश्योद्धारक राजर्षी म्हणून त्यांची ख्याती आहे. हा भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न म. गांधींच्या अगोदर त्यांनी हाताळून मराठा हृदयाचे विशालत्व सिद्ध केले. मराठ्यांना चांगला नेता मिळाला की-ते पुढे येतात. ते नेतृत्व शाहू महाराजांनी मराठा बहुजन समाजास पुरवले.

## शाहू महाराजांचा वारसा

शाहू महाराजांना अकाली मरण प्राप्त झाले. तरी त्यांनी त्यांच्या गुणाधिक्यामुळे फार मोठा वारसा पुढील पिढीसाठी ठेवला आहे. त्यांच्या पश्चात् शिक्षणकार्ये, परिषदा, इत्यादींची काही वाढ झाली. **पण म. जोतीराव व श्री. शाहुराय यांच्या पश्चात् सत्यशोधक समाजाची जोपासना व तात्त्विक वाढ व्हावी तशी झाली नाही.** शाहूराय राजकारणी होते. राजकारण म्हणजेच उद्धाराचा कोणताही प्रश्न असो, त्याला ते साहाय्य करीत. धर्माच्या बाबतीत त्यांच्या पश्चात् डॉ. आंबेडकर यांनी राजर्षी व बुद्ध यांचा नीतिप्रधान धर्म पत्करून बरीच धर्मक्रांती केली. **त्या मानाने सत्यशोधक समाज आज उपेक्षित आहे. नव्या युगाच्या दृष्टीने, नवी मांडणी करून, त्या संबंधीचे कर्तव्ये पार पाडण्याची मनीषा आज आढळत नाही. धार्मिक स्वावलंबन व स्वयंपुरोहित ही शाहू महाराजांनी पुरस्कारलेली कार्ये आज उपेक्षित आहेत.** या कार्यांना पुनः चालना मिळावी म्हणून श्री शाहूरायांचे स्मरण करणे जरूर आहे. स्वतःचा उद्धार स्वतः करावा या प्रयत्नास जातीय म्हणता यावयाचे नाही. त्या दृष्टीने ठिकठिकाणचे विद्याप्रसारक समाज आज मागे पडले आहेत. काँग्रेसच्याचद्वारे सर्व सुधारणा होऊ शकतील असा गंड तयार झाला आहे. श्री शाहू महाराजांच्या संदर्भात विचार केल्यास काही क्षेत्रांत प्रगती आढळते. समाजासंबंधी त्याग करणे, व्यक्तिहित व स्वार्थ दुय्यम समजणे म्हणजे समाजवाद. **ही समाजवादी मनोवृत्ती शाहू चरित्रात आढळते. धर्मासंबंधीची गुलामगिरी, बुवाबाजी, खोटे ज्योतिष, क्षुद्र देवतांची पूजा, अंगात आणणे, देव घालणे वगैरे देवधर्माच्या नावाखाली चालणारा गोंधळ आज खेड्यापाड्यांत दबा धरून आहे.**

आजही शाहूरायांचे कार्य अपुरे आहे. सुधारलेले (वैदिक) संस्कारदेखील प्रसार पावले नाहीत. **विज्ञानात्मक दृष्टिकोन तयार झाला पाहिजे.** अस्पृश्योद्धाराचा प्रश्न सर्वथैव पूर्णपणे सुटला नाही. बुद्ध धर्मासंबंधी सहिष्णुता बहुसंख्याक समाजातून निर्माण झाली नाही. ही आपुलकी निर्माण झाल्याशिवाय अस्पृश्यतेचा प्रश्न सुटला असे म्हणता यावयाचे नाही. बहुजन समाजावर मोठी सामाजिक जबाबदारी आहे.

## कुलदीपक व समाजभूषण

शिवाजी महाराजांनंतर भोसले कुळाच्या कीर्तीत श्री शाहू महाराजांनी कळस चढवला. मराठा म्हणजे आकुंचित जाती किंवा धंदावाचक संज्ञा नव्हे; किंवा वर्ण नव्हे अथवा ठरावीक धर्मसंप्रदाय नव्हे. जो गुलाम न राहता स्वराज्य चालवतो व जो सर्वसंग्राहकपणे विशाल मनोवृत्तीने नेतृत्व करतो, तो मराठा. 'विशाल मराठा' म्हणून श्री शाहूनृप आदर्श होत. त्यांची कामगिरी व दृष्टी सार्वजनिक होती. शाहू ही एक विचारसंस्था झाली. केवळ ती व्यक्ती नव्हे. देहात्मक बुद्धीने त्यांचे स्वरुप समजणार नाही. सर्वांच्या संबंधीचे अद्वैत, कळवळा, दया, लोकोपकार इत्यादी गुणांनी मंडित असे शाहूराय झाले. धर्मरक्षण, धर्मबुद्धी, ज्ञानाचा प्रसार करणारा हा महात्मा प्रगटला. ज्याचे हृदय महान व ज्यांचे कार्य व्यापक तो महान आत्मा होय. जो सार्वजनिक महान प्रश्न सोडवू शकतो तो महात्मा. संसारातील सुखदुःखे यांचे तडाखे छत्रपती शाहू महाराज यांनाही बसले. शेवटी ते विरागी झाले. म्हणजे संन्यासी नव्हे. राज्य व्यवहार प्रपंच यांच्यामधील मन काढून त्यानी लोकोपकारांसाठी देहधारणा धरली. व्यक्ती, नेते, मुत्सद्दी या तिन्हीही दृष्टींनी त्यांचे चरित्र अधिकाधिक अभ्यासनीय आहे. कुलाभिमानाच्या परंपरागत कल्पना व त्यांचे बंध त्यांनी सक्रियपणे तोडून टाकले.

## शाहू प्रकाशन व स्मृती

शाहू प्रकाशन संस्थेमार्फत निघणारे 'राष्ट्रवीर' श्री शाहू महाराज यांचे एक सक्रिय स्मारक होय. संस्थानात व संस्थानाबाहेर श्री शाहू महाराज यांच्या दातृत्वाने निर्माण झालेल्या व त्यांच्याशी संबंधित असलेल्या अनेकविध संस्था आहेत. त्या त्यांच्या थोरवीची साक्ष देतात. त्यांचे कार्यक्षेत्र सर्वांगीण व विशाल होते.

**महात्मा जोतीराव फुले-राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून निर्माण झालेले नवचैतन्य व नवीन जागृती यांची जोपासना करणे, हे तरुण पिढीचे काम व कर्तव्य आहे. कृतज्ञतेतून सामाजिक उत्कर्ष होत असतो; म्हणून श्री शाहू महाराज यांच्या कार्यात यथाशक्ती भर घालण्याचे सामर्थ्य सर्व नव्या कार्यकर्त्यांना प्राप्त होवो, अशी शेवटी प्रार्थना.**

(दै. राष्ट्रवीर, १२-७-१९६७)

******

# ७ कर्मवीर शिंदे यांच्या जीवनाचे मर्म व वर्म

महर्षी शिंदे हे सर्वसाधारणतः उपेक्षित महापुरुष म्हणून गणले गेले, तथापि कर्मवीर शिंदे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त गेल्या वर्षी मराठीत थोडाफार विचार झाला. विविध नियतकालिकांतून लेखही येऊन गेले. कर्मवीर शिंदे किंवा अन्य महापुरुष यांची शताब्दी वर्षातच तेवढी आठवण करावी, असेच केवळ योग्य नव्हे. आण्णासाहेब शिंदे यांच्याशी सन १९३३ ते त्यांच्या जीवनाच्या अखेरपर्यंत म्हणजे सन १९४४ पर्यंत, त्यांच्याशी माझा दृढ संबंध आला. या संबंधातून त्यांच्या जीवनचरित्राचे आगळेच वर्म व मर्म अनुभवास आले.

गांधीयुगाच्या आधी जे समाज सुधारक होते, ते राजकारणात मवाळ होते; व जे राजकारणात जहाल होते, ते समाजसुधारणेच्या क्षेत्रात सनातनी व मवाळ होते. पण कर्मवीर शिंदे म. गांधींच्याही अगोदर, या दोन्हीही क्षेत्रात जहाल होते. म्हणून लो. टिळकांची व जहालांची शिंद्यांवर टीका झाली नाही. लो. टिळक व म. गांधी शिंद्यांना चाहत होते.

**गंभीर, वैचारिक वाचनाकडे कल**

महर्षी शिंदे यांनी जी जीवनपद्धती स्वीकारली होती, त्या जीवनपद्धतीला योग्य असे शिक्षण सन १९०१ ते १९०३ पर्यंत त्यांनी विलायतेस जाऊन घेतले होते, व त्या अगोदर ते बी. ए. व एलएल. बी. चे पहिले वर्षदेखील उत्तीर्ण झाले होते. कानडी ही तर त्यांची जमखिंडीकडील मातृभाषा. पुण्यास आल्यावर त्यांनी मराठीचा व्यासंग वाढवला. विश्वविद्यालयीन शिक्षणातून इंग्रजी व संस्कृत यांचे अध्ययन त्या काळात झाले होते. त्यांच्या घराण्यात वारकरी-भागवतधर्मीय पंढरीची परंपरा असल्यामुळे, त्यांचा पिंड जात्याच आध्यात्मिक, भक्तिधर्मशील व श्रद्धा आणि भावसंपन्न होता. पुढे पुणे येथे आल्यावर त्यांचा प्रार्थनासमाजाशी संयोग जडला. हे तात्त्विक अद्वैत व हा संयोग आमरण राहिला, कारण त्यांची अध्यात्मावर दृढ श्रद्धा व धर्माला प्रधान व पायाभूत मानण्याची त्यांची प्रखर वृत्ती यांचा उगम त्यांचे आजोबा, वडील व आई यांच्या धार्मिकवृत्तीत आढळतो. जडवादाचे वाचन होऊनही व प्राचार्य आगरकर यांच्याशी विद्यार्थी नात्याने फर्ग्युसन कॉलेजमध्ये संबंध येऊनही, त्यांनी अध्यात्म व धर्म यांचा व्यासंग व प्रचार हे जीवन ध्येय सोडले नाही. तसेच आगरकर यांच्यासारख्या बुद्धिवादी सुधारकांसंबंधी अप्रेम व तिरस्कारदेखील बाळगला नाही. उलट ते कृतज्ञता व्यक्त करीत. ते जन्मतः व संस्कारात आस्तिक होते, पुनः नास्तिक साहित्याच्या परिशीलनाने नास्तिक होऊनही नंतर आमरण पूर्ववत आस्तिक ब्रह्मवादी राहिले. त्यांचे उपास्य व त्यांच्या

निरूपणाचा विषय व स्वरूप 'ब्रह्म' हे होते. मॅक्समुल्लर यांच्या साहित्याचा महर्षी शिंदे यांच्यावर फार परिणाम झाला. अर्थात शालेय पुस्तकांखेरीज इतर भारदस्त व प्राज्ञवाङ्मय वाचण्याकडे शिंदे यांचा फार मोठा कल सतत होता. आपल्यापेक्षा श्रेष्ठांच्या संगतीत जाणे, व वैचारिक ग्रंथ वाचणे, हा तर त्यांचा स्वभाव होता.

**दलितोद्धारासाठीच ब्राह्मसमाजाचा स्वीकार**

कर्मवीर शिंदे हे त्यांच्या घराण्यात, आप्तइष्टांत व समाजातही एकटेच विद्वान व पंडित होते. कुटुंबियांना व मराठे समाजातील सुशिक्षित तत्कालीन मंडळींना त्यांची विद्वत्ता व पांडित्य यांची जाणीव होती. पण त्यांच्या काही समान व्हावे, असा प्रयत्न जवळजवळ फारसा आजवर कोणीच केली नाही. जमखिंडीकरांच्या इच्छेप्रमाणे शिंदे यांना गुरांचे डॉक्टर न होता माणसांचे व्हावयाचे होते. यासाठी त्यांनी सत्संग व त्यांच्यापेक्षा वरिष्ठ व ज्ञानी मंडळींची सोबत धरली. त्यांना ती मिळालीही हे त्यांचे पहिले भाग्य ठरते. करंदीकर-कानिटकर वगैरे वर्गमित्र लाभले. पुण्यास १८९५ च्याही अगोदर जमखिंडी सोडून आल्यावर, शिक्षण घेत असताना आगरकर-टिळक-रानडे-भांडारकर वगैरे नामवंत विद्वानांचा व त्यांचा समक्ष परिचय घडला. पुण्याच्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनातच विद्यार्थी असताना, ते काँग्रेसमध्ये जाऊन स्वयंसेवक झाले. राष्ट्रवादाची जी छटा त्यांच्यावर विद्यार्थीपणात पडली ती फार घट्ट होती. देशाभिमान व राष्ट्रीय एकता यांच्या कसावर कोणतीही समकालीन चळवळ किंवा सामाजिक आणि राजकीय उपक्रम घासून पाहून, त्याचा ते स्वीकार व पुरस्कार करीत. या उलट कोणतीही सार्वजनिक चळवळ व पक्ष असला तर त्याचा ते धैर्याने धिक्कार व अव्हेर करीत. यातच त्यांच्या जीवनाचे मर्म सापडते. मात्र अस्पृश्योद्धाराची पहिली प्रेरणा संतांच्या समानतेच्या शिकवणुकीतून व त्यांच्या मातापित्याच्या वर्तनातून त्यांना मिळाली. हे कार्य म्हणजे एक धर्मकार्य म्हणूनच त्यांनी त्यांच्या सार्वजनिक व खाजगी विचारा आचाराशी निगडित केले. त्यांचा ब्राह्मोसमाजाचा प्रचार व स्वीकारही अस्पृश्योद्धारार्थ होता. म्हणजे दलितोद्धारांच्या पाठीमागे ब्राह्मोसमाजाचा मानवतावादी विश्वधर्म होता; मानवी समतेचा दृष्टिकोन होता.

प्रार्थना समाजाच्या प्रचारार्थ एकदा वाहून घेतल्यावर, त्यांनी त्यांची समर्पित बुद्धी, अनन्यभाव, दृढनिश्चय व श्रद्धा कोणतेही तुरट-कटु प्रसंग प्राप्त होऊनही विचलित झाली नाही. 'कृतघ्नता' हा शब्द त्यांच्या कोशात व मनात नव्हताच. श्रीमंत सयाजीराव-शाहू महाराज, रानडे-भांडारकर-चंदावरकर, गोखले-कर्वे-परांजपे-आगरकर यांच्याशी मतभेद होऊनही, त्यांनी या सर्व विद्वान व कर्तबगार पुढाऱ्यांविषयी जन्मभर पूज्यभाव बाळगला.

लो. टिळक व म. गांधी यांच्याशी त्यांचा इतर बहुजन पुढाऱ्यांपेक्षा सर्वात अगोदरचा परिचय होता. पण यांच्या हाताखाली व बरोबर विविध कार्य करूनही त्यांना पूर्ण प्रमाण व निर्दोष मानले नाही. स्वतः स्वावलंबी व अनुभवी विचार मांडत गेले. त्यांचा कार्यानुभव व स्वानुभव मोठा होता. पण फारच थोड्यांनी त्यांचा फायदा घेतला. ते उपेक्षित राहिले, कारण, सत्य हे सर्वमान्य व लोकमान्य नसले, तरी त्याची साधना त्यांनी सोडली नाही. सत्यासाठी ते एकाकी (अलग-अस्पृश्य) देखील होत. त्यांची चिंतनक्षमता अव्याहत चाले. अंतर्मुखता हा त्यांचा बाणा होता. फार चिकित्सक, सूक्ष्म व दूर व विशाल विचारी असत. त्यामुळे भावनावशता त्यांच्या ठायी सहज लवकर निर्माण होत नसे. ते मित्र सहकारी-सवंगडी पारखून घेत. एखाद्या सामान्य कार्यकर्त्याने असामान्य कार्य केले तर त्याचा गौरव करत व त्याला प्रोत्साहन देण्यासाठी त्याची जाहीर सभेत स्तुती करीत; पाठ थोपटत. अण्णासाहेबांकडून म्हणजे एका अधिकारी कर्मवीराकडून गौरवलेले व निर्देशिलेले कार्यकर्ते अर्थात महत्त्वाचेच झाले. फुकाफुकी गुरुवर्य शिंदे कोणाची स्तुती करीत नसत, अगर निष्कारण टीका किंवा खंडणही करीत नसत. १९३२-३३ सालानंतर त्यांची प्रकृती तुरुंगात बिघडली. मधुमेह व कंपवायूने ते आजारी झाले; म्हणून मृत्यूपर्यंत घरी बिछान्यावर ते पडूनच राहिले. या विश्रांत व निवृत्त काळातच माझा व त्यांचा, वाई ब्राम्होसमाजाच्या कार्यामुळे परिचय झाला. एकपरी वैफल्य वाट्यास आले असतानाही, यशापयश-मानसन्मान व अपमान हे सर्व सारखे मानून ते आपल्या मनाचा तोल सांभाळत होते. धर्मो रक्षति रक्षितः । या न्यायाने धर्माने त्यांचे रक्षण केले. कोणीही भेटावयास येवो सतत दार उघडे होते. त्यांच्याजवळ लहान-मोठे, गरीब-श्रीमंत जात, गोत्र, पक्ष वगैरे भेदभाव अर्थात नव्हता. अजा-दुजाभाव नव्हता. ब्राम्होसमाजाच्या पाठीमागे जो सामाजिक धर्म आहे तोच राष्ट्रीय 'विश्वधर्म' भारताची एकात्मकता व समानता साधू शकेल, ही त्यांची खात्री होती. ह्या तत्त्वज्ञानातून व उपासनेतून त्यांनी कोणत्याही विषयावर विचार व आचार केला. हे त्यांच्या जीवनाचे सूत्र म्हणजे वर्म व मर्म म्हणजे इंगित होते. इप्सित हेच होते. आध्यात्मिकता धर्म व प्रार्थनाशीलता यांचा विचार वगळून त्यांचे चारित्र्य सांगणे म्हणजे त्यांचे केवळ जडप्रधान वर्णन होय व ते केवळ जड (मटेरिआलिस्टिक) नव्हते. तरीही विज्ञानवादाचे व लोकशाही समाजवादाचे चाहते होते. अस्पृश्यता निवारण म्हणजे शिंदे व शिंदे म्हणजे अस्पृश्यता निवारण; असे समीकरण बनले होते, तरी ह्या अस्पृश्योद्धारक कार्याची उभारणी व आखणी विश्वधर्मावर अधिष्ठित होती. विठ्ठल रामजी यांच्यातून धर्म उणे करता येत नाही. विठ्ठल रामजी म्हणजे उपासना व विठ्ठल रामजी म्हणजे ब्राह्मसमाज व त्याचा प्रचार व विशेषतः तो प्रचार बहिष्कृतात, बहुजनात व स्त्रियांत करणे, हा त्यांचा विशेष होता. त्यांचा ब्राह्मोसमाज म्हणजे कौटुंबिक प्राधान्ये करून अस्पृश्योद्धारक

स्वरूपाचा होता. जास्त इहवादी म्हणजे ऐहिक समाज समन्वयाचा हा प्रयत्न होता. प्रयत्न व प्रयोग सामाजिक होता. म्हणजे मोक्ष मिळवून देण्याचा, मुक्ती साधण्याचा तो वैयक्तिक प्रयत्न नव्हता. केवळ तो ज्ञानयोग नव्हता. कर्मकांडाला तर त्यात स्थान नव्हते. कर्माला म्हणजे आचरणाला महत्त्व मोठे होते. आचरणाचे निश्चित कस ठरले होते. तत्त्वज्ञान व त्यानुसार कार्यक्रम होता. स्वतः शिंदे गृहस्थ होते. स्वामी नव्हते. प्रपंच संसार म्हणजे माया नव्हे. संसार म्हणजे धर्मसाधन करण्याचे अटळ व क्रमप्राप्त कर्तव्य होय. या दृष्टीतून शरीर गलितगात्र झाले होते तरी त्यांनी 'कौटुंबिक उपासना मंडळ, पुणे' व वाई ब्राह्मोसमाज (वाई, जि. सातारा) या दोन समाज मंडळामार्फत एकात्मतेचे व प्रपंचातील आध्यात्मिक जीवनाच्या वाढीचे अखंड कार्य केले.

### म्हणजे मतभेद ! अण्णासाहेब

अण्णासाहेब व्यवहारी-नफावादी वाणी-उदमी नव्हते. अर्थात भक्त व साधुशील होते. भागवत धर्मीय सर्व संतांप्रमाणे ते गृहस्थधर्मीय होते. गृहस्थाश्रम हा ते महत्त्वाचा मानीत. संसार म्हणजे परमार्थ साधनाचे एक माध्यम व साधन ही त्यांची कर्मयोगी पण ज्ञानपर समन्वयक दृष्टी होती. हेच ब्राह्मोसमाजाचे तत्त्वज्ञान होय. राजकारण-समाजकारण वगैरे जीवनाच्या हरएक क्षेत्रातील कोणत्याही प्रश्नासंबंधीचा विचार ब्राह्मोसमाजाच्या व्यापक दृष्टीशी सुसंवादित व सुसंबंधित आहे किंवा नाही, हे पारखून त्यांनी त्यांचे जीवन व्यतीत केले. या दृष्टीतून पाहत असताना व चालत असताना त्यांचे समकालीन प्रवाह (चळवळी) व त्यांचे मुख्य पुढारी यांच्याशी मतभेद झाले. या मतभेदातूनच त्यांचे चरित्र घडले. वेळोवेळी त्यांना जे विग्रह घ्यावे लागले व विग्रह घेण्याच्या मागे ज्यांची जी मौलिक दृष्टी व स्वतंत्र वागणूक झाली, हीच खरी महत्त्वाची ठरते. यामुळेच त्यांचे समकालीनातील असामान्यत्व व असाधारणत्व स्पष्ट होते. त्यागप्रधान जीवनाचा तो आदर्श होता.

सत्यशोधक समाजाची नीट घडी बसावी, असे त्यांना वाटे, ही चळवळ सुधारावी म्हणून तिच्यातील गंभीर दोष त्यांनी दाखवले. भागवतधर्मप्रधान प्रार्थना समाजाचा पुरस्कार व प्रचार करण्याचे कार्य त्यांनी पत्करले होते. त्यांनी युरोपभर प्रवास केला होता. भारतात अनेक वेळा संचार केला. त्यांची दृष्टी अखिल भारतीय होती. म्हणून मराठा व तत्सम समाजाचे पुढारीपण त्यांनी जाणूनबुजून घेतले नाही. प्रांतिक-जातीयवादी भूमिकेपासून त्यांनी स्वतःला नेहमी अलिप्त राखले. तरी या वरील चळवळीतील सर्व कर्ती पुढारी मंडळी अण्णासाहेबांचा सल्ला घेत असत. शाहू-सयाजी महाराजांसकट इतर लहान-थोर कार्यकर्त्यांना अण्णासाहेब ज्येष्ठ व अनुभवी वाटत. म्हणूनच त्यांचा सल्ला अपेक्षिला जाई.

## महर्षी शिंदे व राजर्षी शाहू

वेदोक्त प्रकरणी शिंद्यांचा शाहू महाराजांना विरोध होता. तरीही विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भारतीय निराश्रित साह्यकारी संस्थेस राजर्षी शाहू छत्रपती यांनी आर्थिक साहाय्य केले होते. शिंदे यांनी एक अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषदेचे अधिवेशन राजर्षी शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली भरवले होते व डॉ. भांडारकरांनी पुण्यास प्रार्थना समाजाचे हरिमंदिर बांधिले, त्यावेळीही राजर्षी शाहू महाराजांनी या मंदिरासाठी वर्गणी दिली. कोल्हापुरास काही वर्षे प्रार्थनासमाजाची शाखाही चालू होती. त्या वेळी विठ्ठल रामजी शिंदे यांना राजर्षी शाहू महाराजांनी प्रचारार्थ आर्थिक साहाय्य केले होते. शिंद्यांनी कृतज्ञतापूर्वक हा उल्लेख स्वतःच केलेला आढळतो. निकटचा व जवळचा संबंध असला व देणगी वगैरे दिली असली, तरी कोणत्याही दात्याचे मत सार्वजनिकदृष्ट्या अयोग्य असेल व ते तत्त्वांच्या चौकटीत बसत नसेल तर ते धैर्याने धिक्कारीत असत. असे प्रसंग शिंद्यांवर दुर्दैवाने वारंवार येत गेले. त्यांनी त्यांचे विचार व आचारस्वातंत्र्य कोणसच विकले नाही. उपेक्षा पत्करली, पण कोणाचा अनुनय केला नाही.

'सत्य असत्याशी। मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमतां।।' ही तुकोक्ती त्यांनी जीवनात आचरून दाखवली व उपेक्षित मानकरी राहिले. त्यांची त्यागी वृत्ती ही निर्ढावलेली होती. लहानपणापासून दारिद्र्याला ते तोंड देत होते. असे आध्यात्मिक बळ त्यांच्या ठायी असल्याने ते वित्तास बळी कधीच पडले नाही. जरुरीपुरती जीवनसाधने-साधे अन्न व खादीचे कपडे असा त्यांचा संसार सुखी असे. अस्पृश्यता निवारणाचे कार्य १९०६ ते १९२५-२६ पर्यंत केल्यानंतर लोक त्यांना कर्मवीर म्हणू लागले, प्रार्थना व ब्राह्मोसमाजाचा अवघड व दुर्घट प्रचार पत्करला असल्यामुळे त्यांना 'महर्षी' असे लोक म्हणू लागले. गुरुवर्य आगरकरांचा त्याग व बाणा व आगरकरांनी पत्करलेली 'व्हॉलंटरी पॉव्हर्टी' यांचे साक्षांत दर्शन अण्णासाहेबांमध्ये मिळते. टिळकांची तडफ व प्रतिपक्षाशी सरळ निर्भिडपणा शिंद्यांत होता. भीड नव्हती.

## मतभेदाचा प्रवाह पुढे चालूच ?

महात्मा गांधी यांच्याही अगोदर सन १९०३ पासून अस्पृश्यता निवारण्याच्या उपेक्षित अशा जटिल प्रश्नाला सर्वप्रथम महर्षि शिंद्यांनी ह्या यक्ष प्रश्नाकडे राष्ट्रीय माध्यमातून लक्ष ओढले. वास्तविक काँग्रेस ही राजकीय सुधारणांसाठी अखिल भारतीय सार्वजनिक राष्ट्रसभा होती व अस्पृश्यतेचा प्रश्न हा त्या काळात धार्मिक व प्रधानतः सामाजिक होता. जहाल काँग्रेसवादी सामाजिक परिषदेचे विरोधक होते; व म्हणत होते की, हे सर्व प्रश्न स्वराज्य

मिळाल्यावर पाहू. काहींचे असे मत होते की, समाज अपोआप परिवर्तन करील. असा जहाल विचारवंतांचाही विवेक असताना कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनात विठ्ठल रामजींनी अस्पृश्यता निवारण्याचा ठराव आणून हा कार्यक्रम हिंदी राष्ट्रीय राजकीय परिषदेचा म्हणून जाहीर करवला. विशेषतः म. गांधी व ॲनि बेझंट वगैरे राष्ट्रीय पुढाऱ्यांनी गु. शिंदे यांच्या विचारांस ठराव स्वरूपाने मान्यता दिली. स्पृश्य लोकांचे व तत्कालीन मोठमोठ्या पुढाऱ्यांचे मत अस्पृश्यता निवारणाला अनुकूल करण्याच्या कामी तरी विठ्ठल रामजी यांना व्यापक यश आले. म. गांधी यांनी खादी, हिंदु-मुसलमान ऐक्य, अस्पृश्यता निवारण असा तीन कलमी कार्यक्रम देशापुढे मांडला. शिंद्यांनाही तो कळवला. पण ता. २५ नोव्हेंबर, १९२४ रोजी म. गांधी यांना आण्णासाहेबांनी कळवले की, या कार्यक्रमात अस्पृश्यता निवारणाला महत्त्व व प्रथम स्थान पाहिजे. म. गांधींना आणखी नम्र व विनयपणे कळवले की– त्यांचा म्हणजे म. गांधीचा क्रम चुकला. म. गांधींनी यावर उत्तर देऊन कळवले की, "तुम्ही ह्या एकाच (म्हणजे अस्पृश्यता निवारणाच्याच) कार्याला वाहून घेतले आहे. म्हणून तुमचे (म्हणजे शिंद्यांचे) स्थान माझ्याहीपेक्षा वरचे आहे." डॉ. आंबेडकरांनी शिंद्यांच्यानंतर दलितोद्धाराची चळवळ स्वतःच पुढारी होऊन त्वेषाने व वेगाने पुढे रेटली.

**म. गांधी यांचा प्रभाव**

म. गांधी अगदी आरंभी अहमदाबाद प्रार्थनासमाजाचे सभासद झाले होते व गुजरातेतील अनेक सामाजिक व आद्य धार्मिक सुधारकांचे कार्य म. गांधी जाणत होते. विठ्ठल रामजी शिंदे यांनी वाई येथे स्थापन केलेल्या ब्राह्मोसमाजास म. गांधी यांनी १९४४ साली पाचगणीहून मुद्दाम येऊन भेटही दिली. खुद्द विठ्ठल राजमी शिंदे यांना म. गांधी यांच्यासंबंधी प्रारंभापासून फार आदर होता. म. गांधी व विठ्ठल रामजी यांच्यात राष्ट्रीय ऐक्यासंबंधी व जहाल राजकारणासंबंधी व खादी वगैरे संबंधी मतभेद नव्हते. विठ्ठल राजमी यांच्यावर म. गांधी यांचा जितका परिणाम आढळला, तितका कोणत्याही महाराष्ट्रीय समकालीन व पूर्वकालीन पुढाऱ्याचा आढळला नाही.

त्यांनी पुरस्कारलेला ब्राह्मोसमाजाचा समतावादी लोकशाही धर्म हा भारताचा राष्ट्रीय विश्वधर्म ठरतो. उपासना प्रकार व तत्संबंधीचा कोणाचा मतभेद सोडला तर ब्राह्मोसमाजाच्या मागे जी भारतीय सर्व जातिधर्मांच्या ऐक्याची प्रेरणा व स्फूर्ती आहे, तीच म. गांधी यांनी सर्वधर्मसमभाव ह्या तत्त्वज्ञानात मांडली. सर्वांचे बंधुत्व, सर्वांना सारखा दर्जा-हक्क आणि सर्वांना सारखी संधी असावी हा ब्राह्मोसमाजचा संदेश होय.

शिंदे काँग्रेसवादी होते तर काँग्रेसपक्षाचे जे चांगले रास्त योग्य असेल तेवढ्या पुरताच, मी त्यांचा सभासद आहे, असे म्हणत. शिंदे ब्राह्मणेतर पक्षाचे नव्हते तरी केवळ काँग्रेसमध्ये जाऊनच ब्राह्मणेतरांचा-म्हणजे बहुजनांचा स्वोद्धार होईल व काँग्रेसच सर्व जनतेचे प्रश्न सोडवील, असे त्यांना वाटत नव्हते. सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या बाबतीत स्वतः प्रयत्न केले पाहिजेत. संस्थानिक व ब्रिटिश सरकार याचा यासंबंधी सर्वथैव उपयोग होणार नाही, असा शिंद्यांचा स्वानुभव होता. शिंदे कोणत्याही बाबतीत टोक गाठीत नसत. एकंदर 'गोल्डन् मीन्' सारासार विवेक हा त्यांचा मार्ग होता. ते राजा राममोहन राय यांना गुरू मानीत व ह्या परंपरेचे शिंदे हे एक पाईक व प्रचारक होते. हीच त्यांची मुख्य जीवनपद्धती व हाच त्यांचा जीवनवेद होता. अस्पृश्यता निवारण आणि स्त्रीउद्धार (मुरळ्या दासी वगैरेंचा) हा जो कार्यक्रम त्यांनी पत्करला होता, तो विश्वमानवी धर्म प्रत्यक्षात व व्यवहारात आणून दाखवण्यासाठी होता. अंतःकरणातून जर अस्पृश्यता व जातीयता गेली तरच ती व्यवहारातून राजकारणांतून जाऊ शकेल. म्हणून मानसिक शुद्धी प्रथम झाली पाहिजे, हा शिंद्यांचा विचार मूलगामी ठरतो व हेच त्यांचे मर्म व वर्म ठरते.

## एकात्मतेतून प्रगती हाच विचाराचा गाभा

शिंद्यांनी जी एकात्मतेतून प्रगती करण्याची पद्धती स्वीकारली होती ती समन्वयवादी पद्धत आजही स्वराज्यात तितकीच उपयोगी आहे. म्हणूनच शिंद्यांचे समकालीन पुढाऱ्यांशी व प्रवाहांशी जे मतभेद झाले ते अभ्यासनीय व चिंतनीय आहेत. बोधपर आहेत.

मतभेदाची तपासणी व ताणाताणी होऊ लागल्यावर शिंदे स्वतः होऊन वेगळे होत. मागे प्रार्थनासमाजापासून स्वतःच राजीनामा (प्रचारकीय कामाचा, सभासदत्वाचा नव्हे) देऊन ते त्याच्यापासून अलग झाले. डॉ. आंबेडकरांचा उदय होताच अस्पृश्यांची चळवळ त्यांच्या हवाली करून डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कामातून ते मोकळे झाले. ही जी वारंवार सुटका-मुक्ती त्यांना जिवंतपणी मिळाली हेच त्यांचे परम भाग्य होय. त्यानंतर त्यांनी ब्राह्मोसमाजाच्या म्हणजे त्यांच्या मूळ प्रचारकीय कार्याचा पुनःअवलंब केला. अहिल्याश्रमातील (नाना पेठ, पुणे) जागा सोडून देऊन, ते शुक्रवार पेठजवळील सणसांच्या माडीवर वेताळ पेठेत येऊन राहिले. या वेळी मी त्यांच्याकडे वारंवार जात असे. शिंद्यांची अनेक प्रवचने मी ऐकली. माझ्यावरदेखील त्या वेळी सत्यशोधक जहाल व कडवट अशा चळवळीचा परिणाम झाला होता. शिंद्यांच्या सहवासात व राष्ट्रीय दृष्टीतून हा पूर्व परिणाम मावळला. विवेक करावयाचा मार्ग मला त्यांच्या चिकित्सक, सारग्रही व मूलग्राही विचारसरणीत सापडला.

डॉ. आंबेडकर व विठ्ठल रामजी यांच्या आणखी एक महत्त्वाच्या मुद्यांवर मतभेद झाला. तो सांस्कृतिकदृष्ट्या फार महत्त्वाचा होय. डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्यतेपासून मुक्ती मिळणे झाल्यास 'धर्मांतरा'चा नवा मार्ग स्वीकारला. शेवटी सर्व धर्म संशोधन केल्यावर बुद्धधर्माचा मार्ग पत्करला. विठ्ठल रामजी शिंदे यांचा ह्या बुद्ध धर्माचा, अभ्यास जवळजवळ १९०३ पासूनचा होता व त्यांनी बुद्धही म्हणून घेतलेले आढळते. ब्रम्हदेशात जाऊन शिंदे जागतिक बुद्धधर्म परिषदेलाही जाऊन आले होते. पूर्वास्पृश्य हे बुद्ध होते वगैरे पुष्कळ संशोधन असलेले एक महनीय 'पुस्तक' भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या शीर्षकाखाली त्यांनी सन १९३३ साली प्रसिद्ध केले. त्यांची संशोधनेदेखील असामान्य-अपूर्व व तटस्थ आहेत. गु. शिंदे यांना अस्पृश्यतेपासून मुक्ती मिळवण्यासाठी सार्वजनिक बुद्धधर्म प्रवेशाचा मार्ग पसंत नव्हता.

पुणे येथे नानांच्या पेठेत (भोकरवाडी) येथे त्यांनी वर्गण्या जमवून अंत्यज वर्गाच्या उन्नत्तीसाठी अहिल्याश्रम बांधला व तेथेच ते सहकुटुंब राहिले. पुण्यातील व बाहेरील सर्व नामवंत पुढाऱ्यांनी त्यांचे कार्य समक्ष पाहिले. भोकरवाडीतील त्या वेळची वस्ती अत्यंत गलिच्छ होती. लो. टिळक, डॉ. भांडारकर, न्या. रानडे, प्रि. जोग, कोठारी, कै. तात्यासाहेब केळकर, ना. गोखले, ना. चंदावरकर, कर्वे वगैरे वगैरे महान् समकालीन सर्व पुढाऱ्यांनी गु. शिंद्यांची योग्यता जाणली होती. त्याग व सेवा यासंबंधी तर प्रश्नच नव्हता.

शिंदे कवी, कीर्तनकारदेखील होते. शिंद्यांनी अनेक लेख व पुस्तके ('अन्टचेबल इंडिया' व डिस्टिक्टरी थीईस्टीक्) इंग्रजीत लिहिली आहेत. कानडी व मराठी यांचा संबंध यांनी दाखवला आहे. शिंदे यांचे दप्तर व काही कागदपत्रे मी त्यांच्यानंतर वाचली. त्यांच्या घरच्या कागदपत्रातील टिपणावरून असे आढळले, की- भारतीय संस्कृती ही सर्वच वेदोद्‌भव नव्हे. "वेदापासूनच भारतीय इतिहासाला सुरुवात करणाऱ्यांनो थांबा, वेदाअगोदर प्राकृत (Original) संस्कृती येथे होत्या." अशा टिपणाचा कागद मी वाचला. हे टिपण सन १९१८ च्या अगोदरचे असावे. शिंदे हे रागीट (अन्याय व असत्य यांच्या संदर्भात) होते, पण ते इतर सर्वसामान्य वेळी प्रेममूर्ती व प्रसंगविशेषी विनोदी होते. व्यक्तिपर व एखाद्या समाजाला उद्देशून ते फारसे लिहीत बोलत नसत. त्यांना गाण्याचे अंग होते. तुकारामाची पदे व साधुसंतांचे अभंग ते प्रेमळपणे गात. त्यांच्या प्रवचनात पुनरुक्ती नसे म्हणून त्यांना श्रोतृवर्गाचा तुटवडा पडत नसे. सामान्य निरक्षर बाया-बापड्या व साधारण लोकांना समजेल व पेलेल अशाप्रकारे ते विषय मांडत असत. विद्वानांच्या व साहित्यसंशोधनाच्या कार्यक्रमातून त्यांना आवर्जून बोलावत असत. शिंदे यांनी त्यांच्या भर तारुण्यात केलेली भाषणे-लेख-उपदेश यांचे मोठे पहिले पुस्तक १९१२ च्या सुमारास शिंदे यांनी उपलब्ध केले. या महत्त्वाच्या पुस्तकात

त्यांची प्रतिभा व प्राज्ञ विचारसरणी यांचे दर्शन होऊ शकते. शिंदे यांना निसर्गतःच असामान्य मन व आकर्षक व्यक्तित्व लाभले होते. ह्या पुस्तकाची देखील दुसरी आवृत्ती निघेल तर पुष्कळपणे शिंदे सर्वांना समग्र होतील.

शुभ्र दाढी व रवींद्रांच्यासारखा केशसंभार, खादीचा अंगरखा, उपरणे, साधा आहार, अशा काटकसरी संसाराचे दर्शन सर्व महाराष्ट्रालादेखील झाले. शिंद्यांची उपेक्षा झाली तशी त्यांची वाहवादेखील पुष्कळ झाली. त्यांच्या हयातीत त्यांना दलितांनी व इतरांनीही मानपत्रे दिली. सन १९३४ साली जून महिन्यात मुंबईतील अनेक संस्थांमार्फत त्यांचा गौरव होऊन त्यांना मानपत्र अर्पण करण्यात आले. शनिवारवाड्यापुढील अनेक मोठमोठ्या राजकीय व वादग्रस्त जाहीर सभांच्या अध्यक्षस्थानावर त्यांची योजना होई. प्रभावी वक्ते, तटस्थ आणि न्यायी अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक सभा जिंकल्या, यशस्वीपणे पार पाडल्या. पक्षातीत बुद्धी, तौलनिक व समन्वयक अभ्यास चिंतन-मनन यामुळे त्यांची छाप सर्व पक्ष व सर्व समकालीन प्रवाहावर एकसारखी पडली.

## सावरकारांशी भेट

बॅ. सावरकरांचा व्यापक हिंदुत्ववाद त्यांना अमान्य होता असे नव्हे. रत्नागिरी येथे बॅ. सावरकरांनी त्यांना स्थानबद्ध असताना बोलावले होते. शिंदे रत्नागिरीला गेले. अस्पृश्योद्धारक कार्य करण्यास माझेदेखील राहिलेले आयुष्य सावरकरांना प्राप्त होवो, अशी प्रार्थना (सदिच्छा) त्यांनी तेथे व्यक्त केली.

चातुर्वर्ण्य धर्म म्हणजे चार जन्मजात व जन्मप्राप्त जाती असे ब्राह्मोसमाज जाणत नाही. अर्थात अण्णासाहेब शिंदे असा जातिभेद मानत नव्हते. विनोदाने ते म्हणत की- ‘आश्रमधर्म गेला पण फक्त वर्ण राहिले’ म्हणजे जन्मप्राप्त वर्ण मानण्यास सोपा आहे, पण आश्रमधर्म व्यवहारात आणणे अवघड असते. परंतु डिप्रेस्ड क्लासेस मिशन संस्थेसाठी दीड-दोन तपे खपल्यानंतर ती संस्था त्यांच्या म्हणजे दलित बांधवांच्या ताब्यात देऊन अण्णासाहेब मोकळे झाले. कशाबद्दलही आसक्ती त्यांच्यात नव्हती. अनासक्तीयोग त्यांच्यात मला घरी दारी दिसला. कर्मत्याग म्हणजे पलायनवृत्ती त्यांच्यात नव्हती. कारण स्वतः काढलेली व वाढवलेली संस्था सोडली, पण भारतीय अस्पृश्यता निवारण्याच्या प्रश्नावरील चिंतन व कार्य त्यांनी सोडले नाही. शेवटी करवेल तोपर्यंत केले प्रकृतीने त्यांचा नाइलाज झाला. आज शिंदे सर्वमान्य आहेत. त्यांचे विचार-आचार खुद्द बहुसंख्यांक मराठा समाजाला प्रत्यक्ष ग्रामीण भागात व्यवहारात झेपले पाहिजेत व मराठवाडा-महारवाडा एक जेव्हा होईल तेव्हा शिंदे यांचे कार्य संपेल! यासाठी अनेक समाजसेवकांनी त्यांच्या प्रमाणे खपले पाहिजे. त्यांनी कविता

केल्या आहेत. 'सार्वजनिक सत्यधर्म' हे फुलेकृत पुस्तक त्यांना फार आवडे. ब्राह्मणेतर पक्षाने काँग्रेस व्यापून ती कब्जात घ्यावी, हा विचार मूळ शिंद्यांचा ठरतो व तसे झाले. वेळ लागला पण त्यांच्या देखत हे घडले.

शिंद्यांना रावबहादुर-रावसाहेब जे. पी. सारख्या पदव्या नको होत्या. परकीय इंग्रजांची पदवी अगर नोकरी शिंदे विषासमान मानत होते. ख्रिस्तधर्माचा त्यांनी चांगला अभ्यास केला होता, तरी धर्मांतर त्यांना अमान्य होते. इंग्रजांची खुशामत करणारे वरील रावबहादूर जे. पी. वगैरेंशी शिंद्यांचे सूत जमत नसे. शिंदे सुसंस्कृतज्ञ व प्राज्ञ असल्यामुळे तथाकथित सत्यशोधकांचे व ब्राह्मणेतरांचे प्रतिक्रियात्मक लिहिणे व बोलणे-गाणे, हे त्यांना सद्भिरुसंपन्न किंवा भारदस्त व तात्त्विक वाटले नाही. मात्र ते स्वतः सत्यशोधक समाज व म. फुले ह्या तत्कालिन विवाद्य विषयावर लिहीत व बोलत, त्यावेळी या दोन्हीही विषयांना तात्त्विक उंच पातळी व बैठक मिळे. एवढा अभ्यास सत्यशोधकांनी किंवा तत्कालीन आणि आजकालच्या दलितांनी केला नव्हता व करत नाहीत. मूळ समग्र ग्रंथ फारच थोडे वाचतात. संस्कृत त्यांना येत नाही. त्यामुळे शिंदे व वरील मागासलेल्यांचे व अतिमागासलेल्यांचे पक्ष व त्यांचे अर्धकच्चे पुढारी यांच्यात तफावत व वैचारिक फरक राही. पुण्याचे गु. बाबुराव जगताप किंवा वाईचे ती. स्व. कै. नारायणराव चव्हाण हे अस्पृश्यता निवारणाला पाठिंबा देणारे, राष्ट्रीय वृत्तीचे असहकारवादी होते. म्हणून गु. शिंदे यांचे व या दोघा पुढाऱ्यांचे अखेरपर्यंत जमले. राजर्षी सयाजीराव मोठे जाणते, समजूतदार म्हणून ते शिंद्यांचे व्यापक व राष्ट्रीय उद्देश आणि व्यापक हेतू आणि ध्येय जाणत होते. त्यामुळे शिंद्यांच्या मताला व धोरणाला तेही दूरदृष्टीने शेवटी मान्यता देत. म्हणून मतभेदाचा प्रसंग आला तरी एकमत झाले, विग्रह शेवटपर्यंत झाला नाही. शिंदे सांगत असत की- "त्यांना एकदा सयाजीरावांनी शेवटी हजार दीड हजारांची देणगी दिली, पुढे मात्र मिळाली नाही." पण रुपये आणे पै ह्यावर शिंद्यांचा भर नव्हताच. सयाजीराव शिंद्यांच्या प्रमाणे सुविद्य, परदेशातून अनेकवार जाऊन आलेले, जग पाहिलेले नामवंत व्यापक विचारशील असल्यामुळे त्यांचा व शिंद्यांचा समास (अद्वैतच) राहिला. सयाजीराव तसे हट्टी नव्हते. सांगण्याचा मुद्दा असा की, शिंद्यांचा स्वभाव स्वतःला जे पटेल तेच करणारा, व बुद्धिबळातील उंटाप्रमाणे वेगळ्याच असामान्य चालीचा व पद्धतीचा होता. त्यामुळे त्यांचा व पुष्कळांचा विशेषाने मतभेदच झाला, व तो चिंत्य आहे.

(लोकराज्य, मुंबई, जाने. १९७५)

******

# ८ डॉ. आंबेडकर : प्रभाव व परिणाम

कोणत्याही थोर व्यक्तीचे दर्शन घेताना व इतरांना ते करून देताना, त्या महत्त्वाच्या व्यक्तीचे तिच्या हयातीत व नंतर तिचा प्रत्यक्ष केवढा मोठा प्रभाव पडला, याचे निरीक्षण करणे, हे अधिक बरे. समाज पालटल्याची व तो पुढे गेल्याचा पडताळा, मागे तो समाज कसा होता व आता कितपत प्रगत झाला आहे, हे त्याच्या अवस्थेवरून नीट जाणता येते. भारतीय दलितांच्या प्रश्नांची आजवर किती व कशी वाटचाल झाली, त्या प्रश्नाचे वर्तमान स्वरूप प्रत्यक्ष कोणते, व भावी निश्चित विधायक व रचनात्मक मार्गाचे स्वरूप कोणते असावे, एवढ्या मोठ्या परिघाचा हा विषय आहे. पण बाबासाहेबांचा प्रभाव व परिणामाचा मुख्यतः येथे लक्षात घेण्याचा संकल्प आहे.

शिवाजी, फुले व आंबेडकर हे तिघे घेतले तरी त्यांच्यापुढे विविध वाटा होत्या. परंतु ते कोणत्याही उपलब्ध मार्गाने गेले नाहीत, तर त्यांनी स्वतःचा स्वतंत्र व स्वावलंबी मार्ग नव्याने काढला. म्हणून त्यांना नवपथ शोधणारे व त्या नवीन वाटेने इतरांना जाण्यास भाग पाडणारे 'न्यू पाथ फाईंडर' म्हणून संबोधिता येते. फुल्यांना समजून आले की त्यांचा ज्या विराट बहुजन समाजात जन्म झाला होता. तो समाज निरक्षरतेच्या निद्रेत आहे, म्हणून मागास राहिला आहे. ह्याला पुढे आणण्यासाठी फुले यांनी सत्यशोधण्याचा नवा-मार्ग दाखवला. ईश्वरदत्त व ईश्वर लिखित धर्मग्रंथ आहेत, म्हणून ते अपरिवर्तनीय असून सर्वथा-सर्वांशी प्रमाण मानलेच पाहिजेत, असा परंपरेने हट्ट होता. ग्रंथ मानव लिखितच मनुष्यकृत आहेत, हा सिद्धान्त फुल्यांनी मांडला व वाढवला. फुले-आंबेडकरांनी धर्मग्रंथातील व पोथ्या-पुराणातील विषमतेला पाठिंबा देणाऱ्या भागावर घणाघात घातले. हे खंडन अपरिहार्य व अटळ होते. ज्या रूढी होत्या व अजूनही आहेत त्या अनिष्ट रूढींना धर्मग्रंथांचा पाठिंबा आहे व आधार आहे. हा आधार मोडून तोडून टाकल्यास परिवर्तनाचा मार्ग मोकळा होतो. विषमता दर्शक जो भाग धार्मिक ग्रंथांमध्ये आहे, तो नव्या काळात लोकशाहीच्या आड येतो, असे जाणून अस्पृश्यता ही मनुष्यकृत रूढीमुळे टिकून राहिली. ती गेली पाहिजे यासाठी गेल्या शतकात झालेल्या प्रबोधनात, अस्पृश्यतानिवारण्याच्या इतिहासाचा मोठा भाग आहे. हा प्रश्न महाराष्ट्रापुरता नव्हता तर अखिल भारतीय होता. शंभर वर्षांनंतर बिन-सरकारी प्रयत्नामुळे शिवताशिवत-सोवळेओवळे-विटाळ-चांडाळ मानण्याची, फार जुनी प्रथा शिक्षण-दळणवळण वगैरे आधुनिक

कारणाने पुष्कळच मोडली आहे. हे खरे, पण ती अद्याप खेड्यापाड्यांत दबा धरून आहे. कित्येकांच्या मनात लपलेली आढळते. पण अस्पृश्यता फार मोठा भूतकाळ असला, तरी तिला आता भविष्यकाळ मात्र राहिला नाही. फुले-शिंदे-गांधी-सावरकर-शाहू-माटे वगैरे स्पृश्यांतील अनेक अस्पृश्यता निवारक झाले. सर चंदावरकर व सयाजीराव आणि अनेक लहान व मोठमोठे झाले. आंबेडकरपूर्व काळातही पूर्वास्पृश्यात थोडीफार जागृती होत होती. आजच्या दलित चळवळीचा अस्पष्ट उगमही झाला होता. बाबा वलंगकर (दापोली) हे 'विटाळ विध्वंसन' हे वृत्तपत्र काढत. त्यांनी म. फुले व 'दीनबंधू' यांच्याशी संपर्क साधला होता. पण केवळ शिवताशिवत संपली, म्हणजे दलितोद्धार संपला काय? यापुढे जाऊन आंबेडकरांनी सर्वांगीण व सर्वंकष चळवळीचे स्वरूप आधुनिकदृष्ट्या लोकशाहीच्या तत्त्वांना शोभेसे असे नव्याने मांडले. संघर्षाचा अभूतपूर्व पवित्रा घेतला. विद्रोह व विग्रह या पैलूंची जोड दिली. संघर्षवादी आंबेडकर उमटून दिसू लागले, सर्व अस्पृश्यता निवारक पूर्वसुरींपेक्षा आंबेडकरांचा प्रभाव अपूर्वपणे पडू लागला. परिणामतः पूर्वास्पृश्य खडबडून जागे झाले. नव्या दलित चळवळीला त्यांनी जन्म दिला. स्वतंत्र राजकारण करण्यासाठी स्वतंत्र 'मजूरपक्ष' चालू केला. अस्पृश्यांचे पृथक राजकारण स्वावलंबनाने चालू झाले. परमभाग्याने अस्पृश्यतेचे चटके अनुभवणारा व खुद्द दलितांतीलच असामान्य असा दलित पुढारी दलितांना लाभला. नाहीतर बंगालमध्ये केशवचंद्र सेन व त्यांचा ब्राह्मोसमाज, शशिपाद बॅनर्जी, आपल्याकडे रानडे-आगरकर-रॅ. परांजपे- ना. गोखले वगैरे लहानमोठे उदारमतवादी नेमस्तपक्षीय मंडळी अस्पृश्योद्धाराच्या क्षेत्रात मानवतावादी दृष्टिकोनातून काम करीत होती. १८५२ पासून 'महारमांग' वगैरे लोकांना विद्या शिकवणारी मंडळी स्थापून फुल्यांनी एकपरी दलित चळवळीला सुरुवात केली होती. गोवंडे-वाळवेकर वगैरेंचे साह्य होते. पण ही केवळ पहाट होती. तांबडे फुटले होते. हेच कार्य कर्मवीर शिंद्यांनी १९०६ पासून 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' स्थापून अखिल भारतीय स्तरावरून जागृती व कार्यकृती या पायावर वाढवले. डिप्रेस्ड ह्या शब्दातूनच आजचा 'दलित' शब्द निर्माण झाला. 'बहिष्कृत भारत' हा शब्ददेखील शिंद्यांचाच होता. पण वरील सर्व स्पृश्यांतील सुधारकांच्या दीर्घ प्रयत्नामुळे प्रज्ञासूर्य आंबेडकर यांचे मुळीच समाधान झाले नाही. असंतुष्टता, असमाधान व स्वयं महात्वाकांक्षा यातून आंबेडकरी नवा व स्वतंत्र चळवळीचा मार्ग निघाला. हे प्रथम पहिले पाहिजे. जी वर पार्श्वभूमी वर्णिली आहे तिने फार तर अस्पृश्यांमध्ये परिवर्तन केले. हजारो वर्षे दूर असलेल्या अस्पृश्य बंधूंना जवळ केले. राष्ट्रीय सभेत कर्मवीर विठ्ठलराव शिंदे यांनी चिकाटीचा प्रयत्न करून अस्पृश्यता निवारण्याचा ठराव पास करून घेतला. १९१७ पासून म. गांधींचे लक्ष या प्रश्नाकडे वळले व शेवटपर्यंत होते. एकपरी उपकार, कल्याणात्मक बुद्धी, समाजसेवा, विद्याप्रसार, वसतिगृह

वगैरे तत्सम प्राथमिक चाललेल्या अस्पृश्योद्धारक चळवळींमुळे अर्थात बाबासाहेब समाधानी झाले नाहीत. हा प्रश्न सुटावा म्हणून बाबासाहेबांनी अत्यंत कडवा, जहाल व संग्रामवादी नवा व अपूर्व पवित्रा घेतला. हिचेच नाव पुढे दलित चळवळ व दलित साहित्य या नव्या स्वोद्धारक स्वावलंबी चळवळीला प्राप्त झाले. म्हणून प्रथम आंबेडकरांचे 'स्टेशन' अभ्यासले पाहिजे. कारण ते 'न भूतो न भविष्यति' असे होते. व्याप्त व्याखा

(22).... The exact description of the treatment cannot be attempted. The word untouchable is an epitome of their ills and sufferings. Not only has untouchability arrested the growth of their personality but also it comes in the way of their material well being...... the untouchable is not even a citizen.....

**नागरिकांचे हक्क**

या देशाच्या नागरिकत्वाचे हक्कही पूर्वास्पृश्यांना नव्हते. पुढील हक्क त्यांच्यासाठी मिळावेत म्हणून बाबासाहेबांनी वेगळाच व्यापक मुद्दा मांडला. (१) व्यक्ती स्वातंत्र्य, (२) व्यक्तीच्या जीवनाची सुरक्षितता (३) खासगी मालमत्ता असण्याचा हक्क, (४) कायद्यातील समानता, (५) सदसद्विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य, (६) मताबद्दलचे व भाषणासंबंधीचे स्वातंत्र्य, (७) सभा भरवण्याचा हक्क, (८) देशाच्या राज्यकारभारात प्रतिनिधित्वाचा हक्क, (९) प्रशासकीय संधी व तत्संबंधीचे हक्क.

आतापर्यंतच्या स्पृश्यांकडून होणाऱ्या अस्पृश्यता निवारक चळवळीत पूर्वी हा भाग नव्हता. मानवी समान हक्काचा ऊहापोह म. फुले यांच्यात आढळतो, पण प्रत्यक्ष व्यवहारात हे हक्क मिळाले नव्हते. राजकारणात भाग व पूर्वास्पृश्यांना राज्यकर्ते करण्याची महत्त्वाकांक्षा हा मुद्दा बाबासाहेबात प्रथम आढळतो. अस्पृश्यांचे 'इंटरेस्ट' कसे वेगळे आहे, हे त्यांनी प्रथम प्रतिपादिले. अस्पृश्यांचे प्रतिनिधी स्वतः अस्पृश्यांनीच निवडावेत ही मागणी पहिली बाबासाहेबांची. अस्पृश्यांची दुःखे फक्त त्यांची त्यांनाच जाणवणार व त्याला तेच वाचा फोडण्यास लायक आहेत असा अभिनव पवित्रा बाबासाहेबांनी घेतला. त्यांची साऊथबरो कमिशन पुढील साक्ष (सन १९१९) लेखी व तोंडी ही अस्पृश्यांची एका खुद्द अस्पृश्य पदवीधराने मांडलेली पहिली राजकीय कैफियत ठरते. यातील कित्येक मुद्दे आजही सजीव  व अभ्यासनीय आहेत. आर्थिक प्रश्न पूर्वी विचारात घेतले नव्हते.

"माझ्या लोकांसाठी नव्या पृथ्वीचा उदय होवो, जन्म होवो नव्या जगाचा, रक्तबंबाळ.. शांतता आकाशावर कायमची कोरली जावो. पुढील पिढी अनंत प्रश्नांना हिंमतीने सामोरी होऊ दे... माणूस प्रेमी स्वातंत्र्याची वाढ होऊ दे!"

मार्गारिट वाकर यांच्या ह्या शब्दात बाबासाहेबांचे मन व त्यातील विचार व्यक्त करता येतात. बाबासाहेब प्रखर होते. त्यांनी नव्या कालखंडास जन्म दिला.

**मागील अवस्था**

हिंदू स्पृश्य व प्रस्थापित असे जे धर्मसुधारक व समाजसुधारक होते, त्यांच्यापैकी काहींना अशी जाणीव झाली की - ख्रिस्ती मिशनरी स्पृश्यांना ख्रिस्ती करतात, हे हिंदू धर्माच्या दृष्टीने वाईट व घातक आहे. दुसरे त्यांना असे जाणवले असेल की - ईस्ट इंडिया कंपनीने महार पलटणींद्वारे महाराष्ट्र जिंकून घेतला व आता यापुढे आपणास पुनः स्वातंत्र्य मिळवावयाचे असेल तर प्रथम जातिभेद व अस्पृश्यता दूर केली पाहिजे. हा सामाजिक साक्षात्कार स्पृश्य समाजसुधारकांना असणे शक्य होते. समाजसुधारकांनी आरंभलेल्या नव जागृतीमुळे दलितांतील काही कार्यकर्ते यथाशक्ती स्वोन्नती करू लागले होते.

**बाबासाहेबांचा सामाजिक साक्षात्कार**

लोकसंख्येच्या प्रमाणात बाबासाहेबांनी राखीव जागा मागितल्या, स्वतंत्र मतदार संघही सूचित केला. मुसलमानांच्या लोकसंख्येपेक्षा पूर्वास्पृश्यांची लोकसंख्या जास्त आहे. लखनौ कराराला बाबासाहेबांनी पाठिंबा दिला नाही. राष्ट्रीय सभेने अस्पृश्यता निवारणाचा ठराव केला, पण एवढ्यावरून त्यांचे समाधान झाले नाही. पूर्वीच्या स्पृश्य सुधारकांनी अस्पृश्यांचे हितसंबंध व त्यांना राजकीय हक्क देण्याची गरज ह्यासंबंधी फारसा सक्रीय विचार व आचार केला नाही. चळवळ होती ती फक्त सामाजिक शहरी व पांढरपेशी होती. अस्पृश्यता निवारक जे होते ते अस्पृश्यता नाहीशी व्हावी म्हणून परंपरागत धर्माला समतेचे अधिष्ठान देण्याचा नवा प्रयत्न करीत होते. सनातनी-परंपरावादी होते. धर्मशास्त्रात अस्पृश्यता निवारणाला धर्मवचनांचा व मनुस्मृतीचा आधार नाही असे म्हणत. म. गांधींनी देखील येरवडा येथे जुने व नवे पंडित बोलावून आणले व शास्त्राधार आहे किंवा नाही याची चर्चा घडवून आणली होती. पण आंबेडकरांना ह्यात रस नव्हता. अस्पृश्यता हा खुद्द सामाजिक न्याय नव्हे, ही एक 'गुलामगिरी' आहे अशी खात्री आंबेडकरांची होती.

" Tell him that he is a slave he will Revolt"

हा क्रांतिकारक मार्ग पत्करला. मंदिर प्रवेश वगैरेवर त्यांनी मागे झगडा केला. पण यापुढे धर्मांतराशिवाय गत्यंतर नाही, असा त्यांना 'साक्षात्कार' झाला म्हणजे अनेक वर्षांच्या अनुभवातून व कार्यातून मनाने पक्के झाले. जीवनाच्या शेवटी त्यांनी सामुदायिक धर्मांतर केले म्हणजे 'दीक्षा' घेतली. धर्म व समाज सुधारकांचे हिंदू धर्म सुधारणेचे प्रयत्न चालवले होते. पण रूढी व परंपरा यांच्या घट्टपणामुळे परिवर्तनवादी चळचळी अपयशी ठरतात याची साक्ष इतिहासातदेखील मिळत होती. म्हणून त्यांनी 'क्रांतिवादी संघर्षाचा' मार्ग पत्करला. गोलमेज परिषदेपुढे विभक्त मतदार संघाची मागणी केली. पुणे करारास मान्यता देऊन म. गांधीचे प्राण वाचवले. मागे चवदार तळ्याचा सत्याग्रह व काळाराम मंदिरप्रवेश यासारख्या अनेक संघर्षप्रधान घटना बाबासाहेबांच्या जीवनात झाल्या. यामुळे भारतभर जागृती झाली. चळवळीस तोंड लागले. अस्पृश्यांचा प्रश्न बाबासाहेबांनी राजकीय व आर्थिक पातळीवर नेला. ही ह्या चळवळीच्या इतिहासातील क्रांती होती. धर्मांतराच्या उलटसुलट खूप चर्चा झाल्या. एका चढ एक अशा संघर्षाच्या घटना व प्रसंग निर्माण केल्यामुळे बाबासाहेब वादळी पुरुष ठरले. ते कोणाच्याही पक्षात गेले नाहीत, अगर समकालीन कोणाचेही अनुयायी झाले नाहीत. स्वतः गुणवत्तेने पुढे आले. विद्वत्ता व गाढा अभ्यास यात ते अपुरे पडले नाहीत. त्यांच्या एवढा संघर्षशील पुरुषोत्तम दलितात झाला नव्हता व आताही नाही. त्यांना अनुयायी कमी पडले नाहीत. वारंवार ते वादग्रस्त होत. पण युक्तिवाद मांडून त्यांच्या बाजूची मजबुती सांगत, कायदे निष्णात असल्यामुळे बुद्धीची चमक दाखवून दावे जिंकत. त्यांचे संघर्षप्रधान चळवळीने व्यापलेले चरित्र घडले. त्यामुळे त्यांचे चरित्र व कार्य गाजले. केवळ हृदय परिवर्तनाचा दीर्घ मार्ग व पद्धत त्यांनी अनुसरली नाही. 'हिंदू धर्मात राहून हिंदू म्हणून मरणार नाही!' ही त्यांची घोषणा फार मोठी वादळी ठरली. जातपातीच्या मर्यादा पडल्या! सर्वच महारांशिवाय इतर दलित जाती-जमाती हिंदूच राहिल्या! यावेळी बाबासाहेब निराश झाले नाहीत.

## बौद्धिक संघर्ष व सामर्थ्य

संघटन करा, शिक्षण घ्या, गुलामगिरीचे जू फेकून द्या, वगैरे त्यांचे आदेश खेड्यापाड्यांत जाऊन पोहोचले, गावकुसाबाहेरचे लोक जागृत झाले. मुले-मुली शाळेत जाऊ लागल्या. पूर्वी स्पृश्य समाजातील सुधारकामार्फत अस्पृश्योद्धाराचे प्रयत्न चालले होते. पण ते शहरातच जास्तीत जास्त राहिले होते. म. गांधींच्या हरिजन चळवळीने मात्र खेड्यापाड्यांत प्रवेश

केला होता. त्याच्या अगोदर महर्षी शिंद्यांच 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' कार्य करत होते. पण अस्पृश्यांचा समर्थ नेता स्वावलंबनाने पुढे नेणारा उपलब्ध होताच. बहुतेक कार्यकर्ते त्यांच्या पुढारीपणाला अनुसरले. हे अपरिहार्य झाले. बाबासाहेबांचे ग्रंथ बहुतेक इंग्रजीतच असल्यामुळे इतर प्रांतातील फार काय भारताबाहेरही त्यांचे विचार जाऊ शकले. दलितांच्या उद्धाराच्या दृष्टीने सायमन कमिशन, लोदियन कमेटी व स्टार्ट कमेटीपुढे त्यांनी विचारपरिप्लुत कैफियती दिल्या. त्या काळात परकीय इंग्रज सरकार होते, अर्थात त्यांनी त्यांच्या सर्व मागण्या पुऱ्या केल्या नाहीत, हे खरे. पण पूर्वीच्या अनेक देशी राज्यापेक्षा इंग्रजी राज्यात दलितोद्धारासाठी प्रारंभ झाला. स्वराज्य-राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यामुळेच सर्व कार्यभाग संपेल व सर्व सामाजिक प्रश्न सुटतील असे मत जहालवाद्यांचे होते. अशा काळात बाबासाहेबांनी सामाजिक-धार्मिक स्वतंत्र्याला सर्वश्रेष्ठ व सर्वाअगोदरचे स्थान दिले. जोतीरावांना या त्यांच्या दृष्टिकोनामुळेच गुरुत्व दिले. दोघांवरही विरोधकांचे एकासारखे आक्षेप आहेत. कृतिशीलतेमुळे दोघांनीही विरोधकांवर मात केली. पुस्तके लिहूनही संघर्ष केला. आमरण विद्यार्थी व लोकशिक्षक राहिले. त्यांच्या मरणोत्तरही प्रज्ञासूर्य बाबासाहेब यांचे वाङ्मय प्रेरणादायी होत आहे. स्वतः बाबासाहेब एक विद्यापीठ आहेत. त्यांच्या हयातीत व आता मागाहूनही त्यांचे वाङ्मय स्फूर्तिजनक व अभ्यासनीय ठरले आहे. त्यांचे यश, कीर्ती व ज्ञान आणि कार्य हे त्यांच्यानंतर सजीव आहे. स्वतः ते गतिमान होते व त्यांनी त्यांच्या आणि मागास समाजाला गती दिली. स्वाभिमान व अस्मिता निर्माण करून नवे चैतन्य निर्माण केले. गौतमानंतर एवढा मोठा बुद्ध झाला नाही. दलितच त्याचे वारसदार आहेत, असे नव्हे तर त्यांचे ज्ञानधन भारताचा राष्ट्रीय ठेवा आहे. एवढेच नव्हे तर जगाचेच ज्ञानभाण्डार आहे.

'रिडल्स' या पुस्तकाने त्यांच्या पश्चात मोठे वादळ निर्माण केले. बाबासाहेब कीर्तिवंत आहेत; म्हणजे असे हयात आहेत. म. फुले परमभाग्यवान ठरतात की त्यांना एवढा जागतिक कीर्तीचा शिष्य मिळाला. 'भारतरत्न' या पदवीने आता भूषणभूत झाले. बाबासाहेब कार्य व विचारधन या स्वरूपात हयात आहेत. अमर आहेत.

बाबासाहेबांना केवळ करुणा व कोणाचे उपकार नको होते. ते पराक्रमी होते. येवला परिषद धर्मांतराच्या घोषणेने फार गाजली. बाबासाहेब हे मजूर-श्रमिक कामगार यांच्या बाजूचे होते. पण प्रत्यक्ष मार्क्सवादी पक्ष कोणताच त्यांनी स्वीकारला नव्हता. स्वकीय अनुयायांच्या पाठिंब्यावर त्यांनी संघर्ष केले.

१९१८ नंतर सार्वजनिक कार्यात बाबासाहेब विद्याविभूषित होऊन उतरले. स्वतः होऊन पुढे आले. नोकरी वगैरे पुढे न करता भारतीय प्रश्नाला समर्पित झाले. समर्पण महत्त्वाचे असते. लो. टिळक १९२० साली अकाली निधन पावले. पण या अगोदर हिंदी राजकारणावर टिळकांचा प्रभाव होता. टिळकांनी शिद्यांच्या अस्पृश्यता निवारक जाहीरनाम्यावर केवळ सही केली नाही, म्हणून ते अस्पृश्यता निवारणाला विरोध करतात, असा झालेला गैरसमज अस्थायी होता. टिळक शिद्यांच्या कार्याला साह्यभूत होत असत व शेवटी सही देखील करणार होते. पण अकाली वारले, असे खुद्द कर्मवीर शिंदे यांनी नमूद केले आहे. म. गांधी यांनी राष्ट्रीय सभेत अस्पृश्यता निवारणाचा ठराव पास व्हावा अशा दृष्टीने पाठिंबा दिला होता. पण १९२० सालापासून त्यांचे लक्ष असहकार व बहिष्कार या इंग्रज विरोधी चळवळींकडे जास्त लागले. शिंदे त्यांना व सर्वांना द्रष्टेपणाने बजावत होते की, बहिष्कृत दलितांचा प्रश्न जटील असून, तो अवघड आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष होईल, तर तो कायमचा 'कांटा' होईल ! पुणे करार होण्यासाठी पुढे म. गांधी यांना प्राणांतिक उपोषण करावे लागले. बजेटावर सत्ता नसल्याने राष्ट्रीय सभा दलितोद्धारासंबंधी स्वातंत्र्यपूर्व काळात फारच मर्यादित कार्य करू शकली. १९४७ नंतर दलित प्रश्नावर बजेटात लक्षात घेण्यासारख्या काही तरतुदी झाल्या. समाजकल्याण खाते विकास पावत आहे. पण बाबासाहेबांच्या तरुण काळात नेमस्तपक्ष व ब्राह्मणेतर पक्ष असे सहकारवादी दोन पक्ष मुंबई इलाख्यात होते व बाबासाहेब मुंबई कौन्सिलातही अनेक वर्षे होते. पण स्वातंत्र्यपूर्व काळात ते मुंबई इलाख्यात मंत्री झाले नाहीत. मराठा तत्समांचा विचार व आचार त्यांनी पुढे यावे म्हणून त्यांच्यापुरता मर्यादित असे. तथापि समकालीन सर्व प्रवाहावर त्यांचा प्रभाव पडे व परिणाम होई.

सहकारवादी नेमस्त पक्ष खेड्यापाड्यांत नव्हताच. अशा काळात बाबासाहेबांचा उत्तरोत्तर उदय होत गेला. इंग्रजांपुढे अनेक वेळा बाबासाहेबांनी दलितांच्या खास मागण्या ठेवल्या होत्या. कारण बाबासाहेब सहकारवादी होते; तरी अनेक विषयासंबंधाने बाबासाहेबांची परकीय इंग्रजांवर टीका होई. लोकोद्धारक अनेक बिले मुंबई कौन्सिलात त्यांनी मांडली होती. १९३५ नंतरही आणि पुढे मध्यवर्ती असेंब्लीत व स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय पार्लमेंटात त्यांनी मांडली. जय-पराजय न मानता ते वाटचाल करीत. ज्याची प्रथम उपेक्षा झाली ते 'हिंदुकोड बिल' होय. पण त्यातील भाग वारंवार पुढे पास झाले. पंडित नेहरूबरोबरही

बाबासाहेबांचे मतभेद झाले. झालेले अटळ मतभेद अभ्यासनीय आहेत. ते खासगी नव्हते. वैयक्तिक नव्हते. एम. एन. रॉय व डॉ. आंबेडकर यांची मते व अभिप्राय बरेच मिळते जुळते असत, तरी बाबासाहेब रॉयवादी झाले नाहीत. परिणामी, दोघांनीही गांधी व काँग्रेस यांना विरोध केला.

बाबासाहेब विलायतेहून (अमेरिकेतून) पदवीधर होऊन आले तेव्हाच महर्षी शिंदे नंतर शाहू महाराज व शेवटी म. गांधी यांनी त्यांची भावी थोरवी ओळखली होती. बाबासाहेब झाले नसते तर दलित चळवळ संथ व नेमस्त असती. तिच्या लाटा आदळल्या नसत्या. बाबासाहेबांमुळे दलितेतरांचा दलितांसाठीचा प्रयत्न व दलितांची त्यांच्या पूर्वीची प्रारंभिक चळवळ हा सर्व नेमस्त इतिहास पुढे झाकलेला झाला. प्रज्ञासूर्य बाबासाहेब एकटेच क्षितिजावर राहून प्रकाश देत आहेत. वास्तव पालटले आहे व बदल घडतो आहे हे खरे. काळानुसार अटळ परिवर्तन खरे विचारवंत करतात. उदा. स्वातंत्र्यपूर्व काळातील बाबासाहेब हे स्वातंत्र्य आल्यावर सर्वाचे झाले. इंग्रजांनी त्यांना 'सर' वगैरे पदव्या दिल्या नव्हत्या. अत्यंत हलाखीतून व अस्पृश्यतेचे चटके सोसत सोसत ते महान विद्वान झाले. आमरण विद्यार्थी राहिले. उदंड वाचन व ग्रंथप्रेम वगैरे त्यांची व्यापक गुणसंपदा आज सर्वांना मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे. मी-मी म्हणणारे काळाच्या उदरात गडप झाले. पण काळावर मात करून, परिस्थितीवर जय मिळवत मिळवत ते असामान्य ठरले. त्यांच्यापुढे काळ धावत आहे. सार्वजनिक चळवळीला विकास असतो. आंबेडकरांना सर्वप्रमाण मानणे, म्हणजे विकास वाढवणे नव्हे. नवी नवी चिकित्सा व्हावी हे खरे, त्यांची जन्मशताब्दी देशभर खेड्यापाड्यांतदेखील पाळली जात आहे. विस्मृतींच्या गर्तेत ते यापुढेही जाणार नाहीत. शताब्दी झाली म्हणजे सर्व उत्सव व उत्साह संपला असे होऊ नये. म्हणून त्यांची इथे सगुणोपासना करण्यात लेखणी धन्यता पावत आहे. हा आनंद आहे. म. फुले व आंबेडकर हा परस्परपूरक असा व्यापक विषय आहे. कोणताही असामान्य महापुरुष व त्याला शिरसावंद्य मानणारे त्यांचे सामान्य अनुयायी यात फरक व तफावत पडतेच. हे अंतर अशक्य नाही. एवढीच विसंगती दाखवत बसण्यातही शौर्य नाही. त्यांचा परिणाम सर्वांवर होत आहेच. भारतीय घटनेच्या मागे भारतास कोणी नेऊ नये, निधर्मी घटनेत राहूनच कोणत्याही प्रांताने-राज्याने व हरएक समाजाने आपला विकास साधावा, हेच त्यांचे अखिल भारतीय स्मारक आहे. दलित त्यांना विसरणार नाहीत. पण सर्वच त्यांना ध्यानात धरतील. रिपब्लिकन पक्षाची अवस्था दलितांमध्ये बेकीमुळे ठीक नाही. पण त्यांचा शेवटचा पक्ष सर्वांसाठी खुला होता व आहे. त्याचप्रमाणे

बुद्धिप्रामाण्यवादी व पार्लमेंटरी लोकशाहीचे पुरस्कर्ते बाबासाहेब यांचा सुधारलेला बुद्धधर्म सर्वांसाठी उघडा आहे. राष्ट्रीय एकात्मतेला व एकपरी हिंदुत्वाला बाधक ठरेल असे काही त्यांनी केलेच नाही. आत्मपरीक्षण करून सर्व समाजाने सामाजिक दोषांचे निर्दालन केले पाहिजे. त्यांच्याप्रमाणे निव्यर्सनी राहून, देशाची सेवा करावी. बाबासाहेब प्रेषित-अवतार म्हणून स्वतःस समजत नव्हते. त्यांची केवळ मूर्तिपूजा न करता समर्पितबुद्धीने यथाशक्ती कार्य करत राहणे म्हणजे त्यांना अनुसरणे होय. असा प्रभाव व परिणाम सर्वांवर व्हावा, ही शेवटी सर्वांना नम्र प्रार्थना.

(लोकराज्य : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी विशेषांक, १९९१)

******

# ९ डॉ. आंबेडकरांचे अद्धितीयत्व

म. फुले, डॉ. आंबेडकरांच्या संबंधाने लिहिणे हा क्रम अनुसरताना पुष्कळ वाटचाल केल्यासारखे आता वाटत असले, तरी वादळी व असामान्य नेत्यांच्या संबंधी चिंतन-मनन, वाचन चालूच राहिल्यामुळे कित्येक नवे मुद्दे ध्यानी येतात व साधनेही प्राप्त होतात. म्हणून नवा परामर्श घेणे भाग पडते. असा हा प्रयत्न म्हणजे वाचकांना नवे वाटेल असे त्यांच्यापुढे ठेवण्याचा संकल्प आहे.

**लोकहितवादी व आंबेडकर**

१९९२ सालात लोकहितवादींची जन्मशताब्दी होती आणि म. फुले यांच्याबद्दल आंबेडकरांना जिव्हाळा होता. तसेच त्यांना लोकहितवादी यांच्याबद्दल परमादर होता. उदा. बाबासाहेबांनी पुढील गौरवोद्‌गार काढलेले उपलब्ध आहेत.

'लोकहितवादींची परंपरा महाराष्ट्रात चालली असती तर आपले सामाजिक प्रश्न आजच्या इतके सोडवण्याला कठीण होऊन बसले नसते. लोकहितवादींनी शतपत्रांत लिहून ठेवलेले विचार आजच्या परिस्थितीतही उपयुक्त असेच आहेत.'

कित्येक शतपत्रांचे त्यांनी पुनः 'बहिष्कृत भारतात' मुद्रण केले. दुर्दैव असे की... लोकहितवादींच्या शताब्दीकडे महाराष्ट्राचे जेवढे लक्ष जावयास पाहिजे होते, तेवढे गेलेले दिसत नाही. झगडा असतो तो परंपरावादी व परिवर्तनवादी यांच्यामध्ये. सर्व काळात व सर्व देशांत हा होत असतो. कोणत्याही धर्माचा इतिहास घेतला तर त्यामध्ये सनातनी व सुधारक यांच्यात संघर्ष होत आला. न भूतो न भविष्यति! असा संग्राम करणारे बाबासाहेबच ठरतात. पूर्वसुरींबद्दल त्यांना आदर होता. उदा. राजाराम रामकृष्ण भागवत हे एक महत्त्वाचे समाजसुधारक झाले. रानड्यांच्या विचारप्रवाहाला ते 'रानडे वळण' असे म्हणतात. रानड्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुण्यास डॉ. आंबेडकरांनी महत्त्वाचे व्याख्यान दिले. न्यायमूर्ती रानडे यांच्या नेमस्त प्रवाहाशी आंबेडकर समीप होते. बाबासाहेबांच्या समकालात व आधुनिक काळी राममोहनपासून अनेक नामवंत सुधारक झाले. सर्व सनातनी म. गांधी यांना सुधारकच समजत होते. म्हणून त्यांची गणना पूर्ण सनातन्यांत करता येत नाही. समाजसुधारणेच्या व धर्मसुधारणेच्या आधुनिक इतिहासाची एकपरी पार्श्वभूमी उपलब्ध होती, तरी धर्मक्रांतिकारक गौतमाला शेवटी त्यांनी शिरोधार्य मानले. गौतम संत व साधू म्हणून श्रेष्ठ होता. गौतम हा बुद्धिवादी होता व आंबेडकरदेखील बुद्धिवादी होते. म्हणून बुद्धमार्ग बाबासाहेबांना जवळचा

वाटला. एखादा मतप्रवाह स्वीकारताना किंवा त्यांचा एखाद्या विषयावरील (प्रश्नावरील) पक्ष मांडताना ते त्यांची संपूर्ण स्पष्टता करत. त्याचे विश्लेषण देत. यासाठी त्यांनी सरळ गद्याचा सोपा मार्ग पत्करला होता.

**वैचारिक पद्धत**

आंबेडकरी साहित्य हे वैचारिक साहित्य आहे. मग ते इंग्रजीत असो अगर मराठीत असो. ललित साहित्याला दलित साहित्यात आज मोठे स्थान आहे. वैचारिक साहित्य वाढवण्यासाठी मोठे बौद्धिक सामर्थ्य लागते. वाचन-चिंतन लागते. **वैचारिक साहित्य बुद्धीला विवेक करावयास लावते.** यांच्या पूर्वी विशेषतः परखड लिहिणारे आगरकर झाले. पण त्यांचे विचारविश्व पांढरपेशा शहरी समाजापुरते मर्यादित होते. दलितांचे विश्व स्वानुभवातून मांडण्याची वैचारिक सडेतोड कामगिरी आंबेडकरांच्या अगोदरच्या वैचारिक साहित्यिकांकडून एवढी महत्त्वाची मुळीच झाली नाही. साहित्यसेवक म्हणून संबोधून घ्यावे, साहित्याची सेवा करावी म्हणून बाबासाहेबांनी लेखणी झिजवली नाही. स्वावलंबनाने त्यांना दलितांची बाजू मांडावयाची होती. ते महापंडित होते तरी पंडितांमध्ये आढळणारे काठिण्य, गूढता, अनेक अर्थ होण्याचा संभव, परस्पर अंतर्गत विरोध वगैरे दोष आंबेडकरांच्या लेखनात नाहीत. आत्मविश्वास दांडगा होता, तरी पंडितांमध्ये आढळणारा अहंकार त्यांच्यात नव्हता. तुकारामाने पंडितांचे अनेक दोष दाखवले आहेत. तुकारामाने व एकनाथानेही वेदाला ‘कानडा’ म्हणून संबोधलेले आढळते. हा क्लिष्टपणा आंबेडकरी साहित्यात नाही. उदा. ‘शूद्र पूर्वी कोण होते?’ हे प्रस्थापित करताना कोर्टात केस मांडावी व युक्तिवाद करावा, ही पद्धती आढळते. स्वातंत्र्यपूर्व काळात, महाड सत्याग्रहाच्या काळाच्या पुढेमागे, ते उपेक्षित होते. पण त्यांचे कार्य ते दलित समाजात मिळून मिसळून करत होते. हा काळ म्हणजे त्यांच्या सार्वजनिक जीवनाची पहाट होती. मग उत्तरोउत्तर विकास होत गेला. पुढे अखिल भारतीय नेतृत्वात त्याची परिणती झाली. आपली बाजू मांडण्यासाठी त्यांनी सरळ गद्याचा व सोप्या भाषेचा वापर केला. धर्म, तत्त्वज्ञान, चिंतन, चिकित्सा, मीमांसा मांडण्याच्या दृष्टीने वैचारिक वाङ्मय प्रकारच अवलंबावा लागतो. त्यांना दलितांचे मनोरंजन करावयाचे नव्हते; तर समाज हक्कांसाठी त्यांना लढण्यास तयार करावयाचे होते. यासाठी आंबेडकरी साहित्य प्रायः वैचारिक आहे. त्यात भर टाकण्याचे सामर्थ्य ज्यांच्यात आहे अशी विचारवंत, विद्वान मंडळी दलितातूनच पुढे येण्याची नवी गरज आहे. वैचारिक साहित्याचा दर्जा कसा वर्धमान करता येईल ही महत्त्वाकांक्षा त्यांना मानणाऱ्यांत विकास पावली पाहिजे. त्यांच्या मानाने आपण किती खुळे आहोत याची तर जाणीव व्हावी. त्यांनी कोणाचाही केवळ गौरव व स्तुती करण्यासाठी लिहिले नाही. ते सरकारी अगर पाळीव पंडित नव्हते. निर्भीडपणा त्यांना आवडे. लोकहितवादी

यांच्याप्रमाणे राजारामशास्त्री भागवत यांचीही प्रशंसा त्यांनी केली होती. त्यांचा वाचन व व्यासंग केवढा दांडगा होता याची कल्पना येण्याची नव्या पिढीत नितांत गरज आहे. **केवळ पुतळे उभारूनच ह्या गरजेचा विकास होईल, असे म्हणवत नाही.** क्षमस्व. आत्मपरीक्षण सर्वांनाच हवे आहे. दलितेतरांनीही आत्मपरीक्षण करावे, असे आव्हान आंबेडकरांतही उत्कटतेने आढळते.

आंबेडकरी साहित्य काय नाकारते व ते का वर्ज्य ठरवते ? ह्याचा शोध व बोध प्रथम घेतला पाहिजे. पथ्य व अपथ्य असे दोन भाग असतात. डॉ. भांडारकर यांनी मर्म व्यक्त करताना नकार महत्त्वाचे गणले होते. काय स्वीकारावयाचे याच्या एवढेच काय नाकारावयाचे हेही महत्त्वाचे असते. नकारातही ध्येयवाद व विधायकता आढळते.

**ईश्वरावर विसंबून राहू नका. आत्मविश्वासाने प्रयत्न करा, अवतारवाद हा प्रज्ञाहत करतो.** विभूती पूजा-मूर्तिपूजा बाबासाहेबांनी नाकारली म्हणजे हिंदूंच्या देव-देवता-अवतार नाकारले. म्हणून प्रेरणा देणे, जागृती करणे, ऊर्जा निर्माण करणे, हे कार्य बाबासाहेबांच्या पाश्चातही त्यांचे साहित्य करते. व्यक्तिस्तोम, माणसाला देव बनवणे, हे त्यांना सर्वथैव नामंजूर होते. लोकशाहीला वरील बाबी घातक व बाधक आहेत. म्हणून त्या त्यांनी नाकारल्या. नकारामधील रचनात्मक व विधायक बाजू पाहावी लागते. नकार जमीन नांगरतो. मगच त्या जमिनीतून विधायक असे पीक काढता येते. स्तुती करणाऱ्याला व करून घेणाऱ्याला बाधक होते, अशी एक इंग्रजी म्हण आहे. बुद्धाला व बाबासाहेबांना त्यांच्यावर अवलंबून राहणे, अनिष्ट वाटत होते. आंबेडकरी वाङ्मयाचा महत्त्वाचा एक दृष्टिकोन म्हणून वरील मुद्दे सांगता येतात. आंबेडकरी साहित्य म्हणजे खुद्द आंबेडकरांचे साहित्य अशी व्याख्या मी करीत आहे. ती मला येथे अभिप्रेत आहे. कारण आंबेडकरी साहित्य म्हणजे त्यांच्यानंतर निर्माण झालेले दलित साहित्य. हे आंबेडकरांच्या विचारा-आचारांस तंतोतंत मिळूण पूर्णपणे सहमत होईलच असे नव्हे ! कारण त्यांच्यानंतर वेगळा काळ आला आहे व भावी काळदेखील विभिन्न येणारच. माझी व्याख्या माझी आहे. ती इतरांवर लादू इच्छित नाही. अवतारवाद विभूती पूजा, ग्रंथांचे ईश्वर-प्राणित्व म्हणून सर्वप्रामाण्य मूर्तिपूजा, जातिवर्णपंथ यापलीकडची दृष्टी, स्वतंत्र संशोधन, द्रष्टेपण, अधिकार व अनेक समकालीन सामाजिक-धार्मिक व राजकीय विषयांवर मत व्यक्त करण्याची योग्यता, ही योग्यता आपल्यात आहे, असा दावा आपणास बिलकूल करता येणार नाही. फुल्यांप्रमाणे इतरांस तसे लिहिता येणार नाही. बाबासाहेबांच्या उंचीचे व मौलिक साहित्य दुसऱ्यांना निर्माण करता येणार नाही. फुल्यांनंतर दुसरे तसेच फुले झाले नाहीत. त्यांच्याप्रमाणे डॉ. आंबेडकर अद्वितीय आहेत. (फुल्यांप्रमाणे लेखन व कृती दुसरी कोणी केली? व करत आहे? व करील?

आंबेडकरांच्या बाबतीत हेच प्रश्न सर्व संभवतात) म्हणून हे दोघे असामान्य झाले. इतरजन व त्यांच्यात अंतर पडले.

असामान्य माणसांचे व्यवहार जेवढे प्रपंचात उपयोगी पडतात; तेवढेच सर्वसामान्य लोक अनुसरतात. मग तो थोर पुरूष कोणत्याही देशातला असो. कोणत्याही धर्मातील असो. कोणत्याही काळातील असो.

तुलनेने भारतात परंपरावाद फार लोकप्रिय आहे. धर्मपरिवर्तनवाद जास्तीत जास्त लोकांना नको असतो. वाडवडलांच्या रूढ्या प्रिय असतात व धर्मशास्त्रापेक्षा त्या बळकट असतात. धर्मक्रांतीला प्रतिक्रांती गिळून टाकते. हे इतिहासाचे सार आहे. हा अनुभव आहे. म्हणून निराश न होता सतत प्रयत्न करत राहणे एवढेच कर्तव्य आपले ठरते.

वाडवडलांची री ओढू नका. असे त्यांचे सांगणे होते. **आंबेडकर रॅशनल होते.** म्हणून ते परंपरावादी नव्हते. भीमराव महाभाग्यवान की - त्यांना भारतीय बुद्धाचा मार्ग उपलब्ध होता. हा विश्वधर्म आहे. तो सत्य व अहिंसा ह्या दोन शब्दात व्यक्त होतो. आंबेडकर संशोधक होते, व त्यांचे संशोधन बुद्ध धर्मापुरते किंवा आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते. 'शूद्र पूर्वी कोण होते?' हा ग्रंथ पूर्वास्पृश्यासंबंधीचाच नव्हे. क्षत्रियांचे शूद्रीकरण कसे व का झाले, याची ही मीमांसा हा ग्रंथ करतो.

**संस्कारात् द्विज उच्चते!**

आंबेडकरी साहित्य व नंतरच्या दलितांचे साहित्य यामध्ये फरक आहे, फरक पडतो. आंबेडकरांचे साहित्य म्हणजे 'आंबेडकरी साहित्य' अशी मर्यादित व्याख्या मी या लेखात केली आहे. याला पुरावे मिळतात. 'शूद्र कोण होते?' यात ऊहापोह करताना पुढील आंबेडकरनिष्ठ दलित लेखकांना आंबेडकरांचा सिद्धान्त हाती लागला नाही. 'शूद्र' म्हणजे अस्पृश्य नव्हे. जोतीबा फुले हे 'शूद्रातिशूद्र' असे सर्व दलितांसह ब्राह्मणेतरांना संबोधित; त्यातील अतिशूद्र हे नामाभिधान पूर्वास्पृश्यांसाठी त्यांनी योजले होते. शूद्रांना पूर्वी उपनयनाचे अधिकार होते. शूद्र अस्पृश्य नव्हते. पूर्वास्पृश्यांचे पूर्वज 'ब्रोकन मेन' होते. ह्या आंबेडकरांच्या संशोधनाचा विपर्यास दीनबंधू शेगावकर यांनी त्यांच्या खास लेखात 'अस्मितादर्श' (वर्ष २५ अंक २) मध्येच वाचावयास मिळाला. मी मी म्हणणारे लेखक कसे चुकतात व त्यांनाही आंबेडकर समजणे मुश्किल झाले, हे वरील अंकात विचारले गेले, यामुळे निष्कर्ष असा प्राप्त झाला की, खुद्द आंबेडकरांचे साहित्य यात अधिकारपरत्वे फरक पडू शकतो. विपर्यास होऊ शकतो.

त्रैवर्णिकांना द्विज म्हणतात. द्विज शब्दाचा अर्थ twice born. संस्कारामुळे शूद्रांचे पुर्वज क्षत्रिय होते. कलियुग जे म्हणतात, त्यात संस्कार लोप झाला व क्षत्रियांचे शूद्रीकरण झाले. पुनः क्षत्रियकरण करण्यासाठी शिवाजी महाराजांची लग्नोत्तर मुंज झाली. वेदोक्त प्रकरणात पुनः मराठे लोक श्रावण्या करू लागले. राजारामशास्त्री भागवत यांनी क्षात्रण्याच्या चळवळीस पाठिंबा दिला. संस्कारात् द्विज उच्चते! हा एक सिद्धान्त होता. हा सिद्धान्त आंबेडकरांच्या संशोधनाला पाठिंबा देतो.

'शूद्र' हा शब्द शुद्ध शब्दापासून निघाला अशी व्युत्पत्ती केल्याचेही आढळते. शूद्रातिशूद्र हे मूळचे रहिवाशी व आर्य नंतर आले असे सांगण्याचा प्रयत्न ज्योतीबात आढळतो शिवाय फुले-शिंदे-आंबेडकर यांच्या संशोधनात फरक, आहेच.

**बुद्धेने वर्तते इति बुद्धाः**

यादृष्टीने बुद्धतत्त्वे, धर्म रहस्य, धम्म म्हणजे नीती यावर त्यांनी भर दिला. पण आयुष्य कमी पडले. **कर्मकांडापेक्षा ज्ञानकांड त्यांना हवे होते.** ते मीमांसक व समीक्षक होते. येथे त्यांच्या या साऱ्या गुणांची उपासना करावयाची आहे. उपासना म्हणजे जवळ बसणे. त्यांच्या पश्चात त्यांच्या गुणांची उपसना करणे शक्य आहे. गुणांच्या जवळ जवळ जाण्याचा प्रयत्न करणे (यथाशक्ती) शक्य आहे. असा हा नम्र प्रयत्न आहे, बुद्धिवान समाज अल्पसंख्याक असले तरी पुढे जातात. वर्चस्व ठेवतात.

**। बुद्धीर्यस्य बलं तस्य।**

ज्याला बुद्धी आहे, तो बलवान-सामर्थ्यवान होऊ शकतो. स्वप्रयत्ने गुणवत्तेच्या जोरावर आंबेडकर उत्तरोत्तर उदयाला आले. प्रथम विलायतेस शिकून ज्या वेळी आले, त्याच्या अगोदर व नंतरही कर्मवीर शिंदे यांना त्यांच्याबद्दल मोठी आशा वाटली. हा काळ १९१७ चा होता. राजर्षी शाहू यांनी नंतर त्यांची योग्यता व सामर्थ्य ओळखले. ब्राह्मणेतर पक्षाचे धुरीणत्वदेखील त्यांच्याकडे द्यावे, असे त्यांना मनोमन वाटले. हे तिघेही द्रष्टे होते. शिंदे तर आंबेडकरांना त्यांच्या विद्यार्थी दशेतच परिचित होते. ओळखत होते. मतभेद कालांतराने बोथट होतात.

गुणनिधी आंबेडकरांच्या संबंधी ऊहापोह करताना 'सुबोधपत्रिके'चे संपादक कै. द्वा. गो. वैद्य यांनी दिनांक ९ एप्रिल, १९२५ च्या अंकात पुढील उद्‌गार काढले होते. वैद्य हे आंबेडकरांना मित्र म्हणून संबोधित. त्यांना चांगले ओळखत. 'सुबोधपत्रिका' मधून बाबासाहेबांच्या वाचनात येत असे.

'रा. आंबेडकर हे स्वतः विद्वान व चौकस गृहस्थ आहेत. त्यांनी ग्रंथ तयार करताना बिन आधार विधान केलेले आमच्या अवलोकनात नाही....'

धर्मांतराची घोषणा येवले परिषदेत झाली असे मानण्यात येते. पण बारामती येथे १९२५ साली झालेल्या सभेत आंबेडकरांनी धर्मांतराचा उल्लेखिलेला उपाय वरील अंकात सापडला. अस्पृश्यांनी खेडी सोडावीत अशा प्रकारचाही विचार त्यांनी व्यक्त केला. स्थलांतराचाही मार्ग त्यांनी सुचवला.

अमरावती येथील सरकारी हायस्कूलमध्ये महार मुलीला प्रवेश दिला नाही. याचा मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतातील महार परिषदेत निषेध व्यक्त करण्यात आला. (सुबोधपत्रिका, दिनांक एप्रिल, १९१७)

**प्रारंभीचा काळ व कार्य**

गोंदियाचे कॉन्ट्रॅक्टर कालीचरण गणूजी हे वरील परिषदेचे अध्यक्ष होते. 'सुबोध-पत्रिके'तील असली अनेक वृत्ते मला उपलब्ध झाली. त्यातील निवडक आधारार्थ घेता आली.

१९१८ साली अस्पृश्यत्व विनाशक परिषद महाराज सयाजीराव यांच्या अध्यक्षतेखाली झाली. डॉ. आंबेडकरांना या परिषदेत जाण्याची इच्छा होती, असे बडोद्याच्या 'जागृति' पत्रात नमूद झाल्याचे आढळते. कै. सरदेसाईकृत सयाजीराव चरित्रातदेखील हे आलेले आहे.

करवीर विद्यापीठाचे स्वामी पूर्वी अनुकूल होते, मात्र परिषदेस ते उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी पगडी फिरवली. (२४ मार्च, १९१८, 'सुबोधपत्रिका' मुंबई)

अस्पृश्य मानलेल्या वर्गाची परिषद कै. गणेश आकाजी गवई यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीस झाली (सु. प. २६-२-१९२२).

डॉ. आंबेडकरांचे सार्वजनिक जीवन वरील काळात चालू झाले. त्यांच्या विद्वत्तेची जाणीव मुंबई विद्यापीठाला होती. त्यांना बी. ए. चे परीक्षक म्हणून नियुक्त केले होते. एम. ए. च्या विद्यार्थ्यांचा निबंधही त्यांना तपासण्यास दिला होता. कारण ते एक अस्पृश्य वर्गातील म्हणून नव्हे, तर त्यांनी त्यांच्या ग्रंथाद्वारे त्यांची योग्यता सिद्ध केली होती. म्हणून 'सुबोधपत्रिका' म्हणते की ते केवळ जातीच्या आधारावर पुढे आले नाहीत.

महारांच्या पंक्तीतून मांगाना उठवून लावले. स्पृश्य भाव अस्पृश्य समाजातही होता. वरील माहिती 'सुबोधपत्रिके'च्या १ ऑगस्ट, १९२६ च्या अंकातून प्राप्त झाली. ब्राह्मणेतर पक्षाचे जे मुखपत्र ते 'विजयी मराठा' (पुणे) हे उत्तम प्रकारे चालले होते. त्या काळात,

त्यानेही डॉ. आंबेडकरांच्या विद्वतेची जाणीव व्यक्त केली होती. परंतु ब्राह्मणी पत्रे (माला इ.) विशेषतः पुण्याची नाखूष असत. ते राजर्षी शाहू नंतर डॉ. आंबेडकरांना विरोध करीत.

गांधीजींनी राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक सभासदावर अस्पृश्यता न पाळण्याचा नियम केला नाही. याबद्दल बाबासाहेबांनी म. गांधी यांना दोष दिला होता. त्या वेळी म. गांधी वर्णव्यवस्था मानीत. हिंदू-मुसलमान ऐक्य करण्याचा प्रयत्न करीत. परंतु दोघांमधील हितसंबंध भिन्न आहेत, याची जाणीव ते दूर ठेवत. सामाजिक चळवळीचा राजकारणात त्यांनी अंतर्भाव केला होता हे आंबेडकरांना आवडले होते. (सु. प. दिनांक १९ एप्रिल, १९२५)

विसाव्या शतकाच्या दोन चार दशकांतही दलितांचे ख्रिस्ती व मुस्लिम धर्मात धर्मांतर होण्याची प्रक्रिया चालू होती. त्याची हिंदुधर्माच्या आस्थेवाईकांना जाणीव होऊ लागली होती व त्यांचेही प्रयत्न चालू होते. दलित चळवळीच्या इतिहासाला आंबेडकरांच्या पूर्व काळात सुरुवात झाली होती. तत्पूर्वी अनेक दलितांत झालेल्या संतांनी त्यांच्या वेदना प्रकट केल्या होत्या. **पण संघर्ष, संग्राम व हक्कांसाठी लढा संघटितपणे करण्याचा पायंडा आंबेडकरांनी चालू केला.**

### महाड सत्याग्रह

१९२६/२७ हे साल महाडच्या सत्याग्रहामुळे फार गाजले. या सत्याग्रहाच्या दिवशी तर्कतीर्थ जोशी महाडला गेले होते. त्यांचा व आंबेडकरांचा पुढील संवाद तेथे झाला. तर्कतीर्थ आले आहेत असे कळल्यावर त्यांना त्यांनी बोलावून घेतले.

'काय करीत होतात?' आंबेडकर.

'तुम्ही मनुस्मृती जाळलीत, तिच्या राखेत काही राहिलंय का ते पाहत होतो.' तर्कतीर्थ.

'मग काय सापडलं?'

'सुख-दुःखांच्या व्याख्या?'

'कोणत्या व्याख्या?'

'जे परवश ते दुःख; जे आत्मवश ते सुख!' तर्कतीर्थ.

वरील संवाद 'साहित्यातील हिरा आणि मोती' (१९८४) या पुस्तकात तर्कतीर्थांची माधव गडकरी यांनी घेतलेल्या मुलाखतीत उपलब्ध आहे. आंबेडकर व शास्त्रीजी यांच्या दरम्यान झालेल्या वरील संवादाच्या शेवटी तर्कतीर्थांनी 'काय छान आहे' असे डॉ. आंबेडकर म्हणाल्याचे शास्त्रीजी सांगतात. पण मुलाखात घेणाऱ्या माधवराव गडकरी यांनाच शंका

आली! गडकरी स्वतःपुढे लिहितात. 'परंतु ते शब्द तसे नसावेत कारण' 'काय छान आहे' हे शब्द तर्कतीर्थांचे आवडते. (पृ. ५ पहा)

गडकऱ्यांना तर्कतीर्थांच्या आठवणीमधील 'कृत्रिमता' जाणवली. पण एका महाविद्वानाचे उद्‌गार आजच्या पिढीपुढे ठेवावेसे वाटतात. ते मोठे बुद्धिप्रामाण्यवादी म्हणवतात.

डॉ. आंबेडकरांमध्ये गूढ व अतर्क्य काही मुळीच नसे. त्यांचे एक महापंडित या नात्याने असामान्यत्व दर्शवण्यासाठी हे सर्व लिहिले आहे. अनुयायांना समजेल अशा भाषेत आंबेडकर बोलत व लिहीत. माधव गडकरी यांनी ८२ वर्षांच्या तर्कतीर्थांचा व आंबेडकर यांचा वरील संवाद उपलब्ध केला आहे. त्याचा अर्थ आज काय होतो? महाडच्या सत्याग्रहावर व मनुस्मृती जाळली ह्या क्रांतिकारक कार्यावरील संवाद कोणता प्रकाश टाकतो? ते गूढ वाटते! कारण तर्कतीर्थांना काय म्हणावयाचे होते, त्याचा थांगपत्ता लागत नाही व ते त्यांची मते वारंवार पालटतात!

महाड सत्याग्रहामुळे चवदार तळ्याचे पाणी विटाळले म्हणून भिक्षुकांनी गोमूत्र तळ्यात टाकून त्याची शुद्धी केली, जे अपवित्र झाले होते. ते पुनः पवित्र केले.

त्या काळी डॉ. आंबेडकरांवर झालेल्या टीका विविध होत्या. काळाराम सत्याग्रह (नासिक), पर्वती सत्याग्रह (पुणे), राऊंड टेबल परिषदेतील गांधी-आंबेडकर मतभेद, गांधीचा येरवडा येथील प्राणांतिक उपवास, पुणे-करार, धर्मांतराची घोषणा, मुस्लिम व ख्रिस्ती धर्मांत दलित का जातात? यांची आंबेडकरप्रणित मीमांसा, वगैरे अनेक विषयांवरील ऊहापोह 'सुबोधपत्रिके'च्या जुन्या अंकातून मिळतो. हे सर्वांचे दिग्दर्शन एकाच लेखात येथे करून देणे, अशक्य आहे. काही ओझरते विषय वाचकांपुढे मांडता येणे शक्य आहे. उदा. आंबेडकरांनी अस्पृश्यांमधील अस्पृश्यता मांडली आहे. हे स्फुट त्यांचे स्वतःचे आहे. 'मूकनायका'चे संपादक कै. ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांनी मुंबई कौन्सिलमध्ये चांगले कार्य केले. आंबेडकर व घोलप यांचे द्वैत, महर्षी शिंदे यांची उपेक्षा डि. सि. मिशनच्या कार्याचे मूल्यमापन, विरोध वगैरे अनेक विषय 'सुबोधपत्रिके'च्या फाईलीत मला दिसले. ते आंबेडकरांची मते, त्यांचे मतभेद, कार्य व काळ ही निःपक्षपातीपणे व तटस्थवृत्तीने 'सुबोधपत्रिका' मांडित असे. पुण्यास सरकारने पूर्वास्पृश्यांसाठी बोर्डिंग चालू केले होते. त्यात दलितांतील भिन्न जातींमधील विद्यार्थी होते. हे आपसात पंक्ती प्रपंच व भेद पाळू लागले. आंबेडकरांनी याला विरोध केला. साऊथबरो कमिशनच्या साक्षीपासून ते थेट १९३९ पर्यंत आंबेडकरांच्या कार्यावर व जीवनावर आणि त्यांच्या स्वतंत्र मतावर 'सुबोध पत्रिके'मधून मला त्यांचे दर्शन घडले. आंबेडकर दुसऱ्या कोणाचेही अनुयायी होण्यास जन्म पावले नव्हते.

रे. जे. एफ्. एडवर्डस् हे 'ज्ञानोदया'च्या इंग्रजी बाजूचे संपादक होते. अधूनमधून अगदी थोडक्यात डॉ. आंबेडकरांच्या कार्यावर व मतावर ते टिपणी लिहित. पण हे सर्व ख्रिस्ती चष्म्यातून होई. त्यातील विचार आता आठवत नाहीत.

समकालीन वृत्तपत्रसृष्टीवर आंबेडकरांचा थोडाफार परिणाम होई. पण दलित व त्यांची चळवळ त्या काळात एकूण उपेक्षितच होती. मंदिरप्रवेशाच्या प्रश्नावरून गाजावाजा होई. तसेच लोकशाहीवादी आंबेडकर दुसऱ्यांच्या प्रतिक्रिया अभ्यासत. खरा प्रभाव मात्र, परिणाम धर्मांतराच्या घोषणेवरून झाला. गांधी, शिंदे, माटे, सावरकर, डांगे, तर्कतीर्थ वगैरे वगैरे भल्या भल्या मोठ्यांनी त्यांची मते व्यक्त केली. १९२५ साली दलितांनी हिंदू धर्म सोडून मुसलमान व्हावे असे मत व्यक्त झाल्यामुळे मोठा हादरा बसला. हिंदू म्हणून जन्मलो पण हिंदू म्हणून मरणार नाही. ही प्रतिज्ञा जीवनाच्या शेवटी व्यक्त स्वरूपात आली व प्रथम भारतीय घटना तयार करण्याचे राष्ट्रीय कार्य पुरे केले. स्वातंत्र्य आल्यावर धर्मांतराचा प्रश्न आंबेडकरांनी बाजूस ठेवला किंवा काय अशी बरीच वर्षे गेली; पण मनात निश्चय कायम होता. आजारीपणामुळे त्यांच्या कर्तबगारीला मर्यादा पडल्या. पण शेवटी बौद्ध होऊन दीक्षा घेतली. सामुदायिक दीक्षादेखील पार पाडली व प्रतिज्ञा पूर्ण झाली.

**अंते मतिः सः गतिः ।**

गुरू म्हणजे मार्गदर्शक. आंबेडकरांना कोणी एकच गुरु नव्हता. म. फुले यांचे चरित्र लिहावयाचे असे त्यांचे उत्कट मानस होते. प्रबोधनकार ठाकरे यांनी डॉ. आंबेडकरांसाठी या प्रीत्यर्थ साधने पाठवा, असे निवेदन वृत्तपत्रातून प्रसिद्धही केले होते. साऱ्याच इच्छा पुऱ्या करण्यास त्यांना आयुरारोग्य उपलब्ध झाले नाही. त्यांनी जोतीरावांचे चरित्र लिहिले असते तर ते जास्त भारदस्त झाले असते'. इंग्रजीत लिहिले असते तर उत्कृष्ट इंग्रजीत ते झाले असते. एवढेच आता म्हणता येते.

कबीराविषयीदेखील त्यांना थोडेही लिहिण्यास वेळ मिळाला नाही. बुद्धाविषयी त्यांनी जास्ती लिहिले-बोलले आहे. जीवनाच्या शेवटी प्रकृती स्वास्थ्य नसताना त्यांनी दीक्षा घेतली. हा कळस होय. बुद्ध त्यांचा अंतिम तत्त्वभूत मार्गदर्शक ठरला. म. फुले व कबीर त्यांना शेवटी दुय्यम झाले. बुद्ध हा त्यांचा प्राण व श्वास ठरला. ही त्यांची शेवटची मती (बुद्धी) म्हणून हीच अंतिम गती मानावी लागते, त्यांच्या गतिमान आयुष्याचा हा शेवटचा निर्णय होय. इतर सर्व त्यांनी गौणच ठरवले व सर्वोत्तम धर्म असा त्यांना बुद्धांचा धम्म वाटला. या खात्रीनंतर तो स्वीकारला. त्यानंतर देहावसान झाले ते बौद्ध म्हणूनच. ही शेवटची अंतिम गती ठरते.

आंबेडकरी साहित्य म्हणजे आंबेडकराचे साहित्य अशी मी व्याख्या केली, कारण त्यांचा एवढा व्यापक अभ्यास मागाहून दलित साहित्य व्यक्त करणारांचा आहे, असे म्हणता येत नाही. संशोधन शक्तीदेखील पुढील लेखकांची थिटी बनते. ग्रंथात खरे काय आहे व खोटे कोणते ते शोधण्याची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा फुल्यात होती. त्यांच्या ठायी कमी पडलेले पांडित्य-विद्वत्ता व इंग्रजीवरील प्रभुत्व यायोगे **आंबेडकरांनी फुल्यांच्या पडत्या बाजू भरून काढल्या.** संशोधन थांबता उपयोगी नाही. ऋषीचे कूळ व नदीचे मूळ शोधू नये अशी एक म्हण आहे. जन्मप्राप्त अस्पृश्यता जी शतकानुशतके रूढ झाली तिला एकमेव कारण नाही. तिच्या विषयीचा तिरस्कार अद्याप खेड्यापाड्यांत दिसून येतो. शहरात हे सर्व काही मनात लपले असते.

**यः क्रियावान् सः पंडितः ।**

आंबेडकर त्यांच्या तरुणपणापासूनच सार्वजनिक कार्यात भाग घेऊ लागले. त्यावेळी डिप्रेस्ड क्लासेस मिशन कार्य करत असे. दलित वर्गातूनही कार्यकर्ते व पुढारी पुढे येऊ लागले होते. बडोद्याच्या नोकरीत असतानाच त्यांचे वडील रामजीबाबा वारले. मुंबईस आल्यावर त्यांच्या स्मरणार्थ डि. सी. मिशनच्या भायखळा येथील बोर्डिंगमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना जेवण दिले. अस्पृश्यांच्या उद्धाराचे प्रयत्न चालू होते. उच्च जाती पूर्वास्पृश्यांना नीच मानीत. त्यांना कोणती संज्ञा द्यावी हादेखील त्यांच्यापुढे प्रश्न होता. 'निराश्रित' हीदेखील संज्ञा वापरीत. १९ मार्च, १८८१ रोजी सोमवंशीय मंडळी तर्फे एक जाहीरसभा झाल्याचा उल्लेख मिळतो. सर चंदावरकर व विठ्ठल रामजींचे अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे म. गांधींच्या अगोदर सक्रीय लक्ष होते. शिवराम जानबा कांबळे दलितांना नोकऱ्यात प्रवेश असावा असा प्रयत्न करत. गवई यांचे थूगाव येथे प्रयत्न चालले होते. अस्पृश्यांना धर्माची गरज आहेच. ते कोणत्या धर्माचे हे काही काही ठिकाणच्या पाहणीवरून प्रश्न पडे. देशात त्यांची संख्या केवढी मोठी आहे. वगैरे वगैरे संशोधन विठ्ठल रामजींनी पुढे आणले होते. भीमराव रामजी व विठ्ठल रामजी यांच्यापुढे 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' होता म्हणून दोघांच्याही पुढे समान उपाय, समान कार्यक्रम, वगैरे समान होते. ब्राह्योसमाज, प्रार्थनासमाज यांचे व आर्यसमाज यांचे प्रयत्न चालू होते. कळकळ नव्हती असे नव्हे. देशात आंबेडकरांच्या अगोदर अस्पृश्योद्धाराचे प्रयत्न करणारी देशभर अनेक स्पृश्य मंडळी होती. यांच्या प्रयत्नामुळे स्पृश्यात, अस्पृश्यता-निवारणाबद्दल अनुकूल मत होत गेले. आंबेडकर उदयाचली आल्यानंतर पूर्वास्पृश्यांना त्यांचा नेता प्राप्त झाला. एवढा असामान्य नेता पूर्वी नव्हता. आंबेडकरांनी स्वतः उत्तरोत्तर पुढारीपण घेऊन एक एक उपक्रम प्रत्यक्ष ते हाती घेत गेले. शेवटपर्यंत घेत होते.

ते केवळ लेखक, पत्रकार, ग्रंथकार नव्हते. भाषण देणे एवढेच काम ते करत नव्हते. सत्याग्रहाचा मार्ग महाडच्या चवदार तळ्याच्या ठिकाणी सत्याग्रह करून त्यांनी पुढे ठेवला. स्वतंत्र मजूर पक्ष काढला. 'मूकनायक' बंद पडल्यावर 'जनता', 'बहिष्कृत भारत' ही पत्रे काढली. सायमन कमिशनपुढे साक्ष दिली. राऊंड टेबलपुढे स्वतंत्र मतदार संघ मागितला. भारतभर संचार केला. मुंबई व दिल्ली येथील कायदे मंडळात कार्य केले. अनेक परिषदांचे अध्यक्ष म्हणून विद्वत्ताप्रचुर भाषणे केली. ते केवळ महापंडित नव्हते तर क्रियावान होते. संघटक होते. ते पक्षबांधणी करीत. त्यांच्या अगोदर १९०६ सालापासून अस्पृश्योद्धाराचे कार्य करत असलेले विठ्ठल रामजी शेवटी म्हणू लागले की ज्यांचा त्यांचा उद्धार ज्यांनी त्यांनी केला पाहिजे. आंबेडकर प्राणपणास लावत होते व त्यांची अनुयायी मंडळी अभूतपूर्व संघटित झाली. ती त्यांच्यासाठी प्राण देण्यास तयार होती हे त्यांना उमजले व यापुढे मिशनसारख्या बाहेरच्या प्रयत्नांची गरज राहिली नाही असे ते प्रतिपादू लागले. एवढेच नव्हे तर त्यांनी पोटच्या पोराप्रमाणे सांभाळलेले मिशन दलितांमधील शिवराम जानबा, सुभेदार घाटगे आदीकरून कार्यकर्त्यांच्या ताब्यात देऊन १९२३ नंतर ते मोकळे झाले. ही जी एक प्रक्रिया झाली ती आंबेडकर उदयाचली आले नसते तर झाली नसती. म्हणजे दलित चळवळ उत्तरोत्तर स्वतः दलितांच्या स्वावलंबनाच्या पायावर उभी राहण्यास आणखी बराच वेळ लागला असता. ह्या घडामोडी झाल्या त्या उत्तरोत्तर अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या.

डॉ. आंबेडकरांनी स्वतःला सरकारी नोकरीमधून मुक्त करून घेऊन केवळ दलितांसाठी पुढील सर्व आयुष्य वेचले. समर्पणाला महत्त्व असते. मागे भारतीय अनेक (हिंदु) स्वदेशी राज्ये-स्वराज्ये होती, पण त्यांच्या काळात दलितांना त्यांच्या प्रश्नांची जाण आली नव्हती. फार काय दलितेतरांनाही आली नव्हती. इंग्रजी राज्य झाल्यावर तुलनेने मिशनरी निर्भय झाले व धर्मातरांना त्यांनी वेग आणला. धर्म व समाजसुधारक जागे झाले. मानवतावादावर त्यांनी जे प्रयत्न केले, ते सर्वथा निरूपयोगी झाले असे म्हणता येणे मुश्किल आहे. पण स्वतंत्र प्रयत्न डॉ. आंबेडकरांमुळे चालू झाला. दलित साहित्याचा प्रवाह स्वतंत्र प्रकारे वाढू लागला.

आंबेडकरांचे कार्य प्रथम मुंबई इलाख्यातील महाराष्ट्रात चालू झाले. नंतर उत्तरोत्तर ते अखिल भारतीय असे व्यापक झाले. आंबेडकरांनी परावलंबन सोडले. पुणे कराराच्या काळात पुढे 'हरिजन सेवक संघ' निघाला. डि. सी. मिशनसारखाच तो स्पृश्यात प्रायः होता. म. गांधी व ह. से. संघ यावर डॉ. आंबेडकर अवलंबून राहिले नाहीत. त्यांनी 'हरिजन'

शब्ददेखील अव्हेरला. स्वातंत्र्यपूर्ण काळातील आंबेडकर असे क्रियावान पंडित होते. म. गांधी व काँग्रेस यांच्या विरोधात राहून दलितांचा पक्ष रेटणे हे कार्य सोपे नव्हते. हे केल्यामुळे आजचे दलित थोडे फार प्रगतीपथावर आलेले दिसतात. नाही तर त्यांची युगानुयुगे अंधारात गेली. राष्ट्रीय प्रवाहापासून म्हणजे काँग्रेसपासून ते अलग का राहिले ? असा एक प्रश्न यशवंतराव चव्हाणांपुढे असे. चव्हाणांना आंबेडकर चरित्र लिहिण्याची इच्छा होती. आंबेडकर १९१९ साली सार्वजनिक क्षेत्रात उतरले. तेव्हा दलितांत मराठी चौथी देखील झालेले थोडे असत. मराठी सातवी पास झालेले तर अगदीच थोडे. अशा मागास लोकांचे नेतृत्व आंबेडकर या विद्वान पदवीधराने स्वीकारले.

सत्यशोधक ब्राह्मणतेर लेखन व भाषणे करणारे कडवट भाषेत बोलत व लिहित. त्यात शिवराळपणादेखील असे. पण आंबेडकरात हे दोष नव्हते. ते भारदस्त भाषेत साधार खंडण करीत.

छ. राजाराम महाराज कोल्हापूरकर यांनी आंबेडकरांना ब्राह्मणेतर पक्षात निर्माण झालेल्या मराठा-मराठेतर वाद संपुष्टात आणण्यासाठी नियुक्त केले होते. प्रथम आठ-दहा वर्षे त्यांनी ब्राह्मणेतर पक्षाबरोबर कार्य केले. १९३५ साली शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी त्यावेळच्या कौन्सिलातील शेतकऱ्यांचा कैवार घेणारा एक संच होता. त्यांच्या सभेत आंबेडकर उपस्थित राहिले होते. मुंबईशी त्यांचा १९४७ पर्यंत अधिक संबंध राहिला. मित्र व हितचिंतक म्हणून अनेक सभात व संस्थेत त्यांनी भाग घेतला. तेच लोकांना हवे-हवेसे वाटत ते अद्वितीय होते म्हणजे त्यांच्यासारखे तेच.

शेवटचा काळ दिल्लीत गेला. लॉ मिनिस्ट्रीत आंबेडकर यांनी कार्य केले. त्यावेळी त्यांचे सेक्रेटरी म्हणून रि. जज्ज कै. का. य. भांडारकर होते. त्याचप्रमाणे कै. रि. जज्ज लोकूर हेदेखील असत. १९४८ साली म. गांधी यांचा निर्घृण खून दिल्लीत झाला. तेव्हा डॉ. आंबेडकर यांनी दु:खप्रदर्शक संदेश व्यक्त केला.

आंबेडकरांनी आश्चर्यकारक क्रांती केली. सातारा येथील सरकारी हायस्कूलच्या रेकॉर्डवर भीमा रामजी आंबेडकर अशी त्यांची मोडी सही आहे. सातारा कँप हायस्कूल मधून त्यांनी प्रा. शिक्षण पुरे केले. ७ नोव्हेंबर, १९०० साली इंग्रजी शाळेत नाव घातले. नोव्हेंबर सन १९०४ साली हायस्कूल सोडले. तेव्हा ते इंग्रजी पाचवीत होते. त्यांचे असामान्यत्व अभ्यासण्यात मोठा आनंद वाटतो.

(अस्मितादर्श, दिवाळी अंक, १९९२)

******

# १० डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराची एक नम्र चिकित्सा

डॉ. आंबेडकर याचा सामुदायिक बुद्धधर्मप्रवेश ही त्यांच्या आयुष्यातील अंतिम घटना होय. हे शिखर ठरते. स्वतः आंबेडकरांनी या धर्मक्रांतीला धर्मांतर म्हणून संबोधले आहे. तत्त्वतः पाहता ही 'दीक्षा' ठरते. 'दीक्षा' ही संज्ञा व परिभाषा बाबासाहेबांनी देखील वापरलेली आढळते.

'कन्व्हर्शन' या इंग्रजी शब्दाचा अर्थ जास्तीत जास्तपणे धर्मांतर असा केला जातो. म्हणूनही सर्वांनाच 'धर्मांतर' या शब्दाचा वापर करणे भाग पडले. स्वतः आंबेडकरांचा 'दीक्षा' या संज्ञेला विरोध नव्हता.

'कन्व्हर्शन' म्हणजे पालट-बदल होय. असन्मार्ग सोडून सन्मार्ग पत्करणे हा मूलार्थ होय. ख्रिस्ती व तत्पूर्वी मुसलमान यांचे भारतात आगमन होण्यापूर्वी 'धर्मांतर' या संज्ञेची गरजच वाटली नाही. जैनमत व बौद्धमत स्वीकारणाऱ्यांना धर्मांतरीत म्हटले जात नसे, फार तर याला 'मतांतर' म्हणून संबोधले जाई.

खरा झगडा वैदिक व अवैदिकांत असे. वेदप्रमाण्य नाकारणारे व वेद ईश्वरकृत म्हणून सर्वांशी प्रमाण (खरे) असे परंपरेने मानणारे, यांच्यात संघर्ष झाला. वास्तविक वैदिकांच्या पूर्वी येथे अवैदिक होते. अधिक जुना जो ऋग्वेद, त्यापूर्वीही भारतात धर्म, प्राकृत भाषा, संस्कृती व राज्ये-राजकारण वगैरे सर्वांगीण जीवन होते, हे नाकारता येत नाही. जैनमत वेदांच्याही पूर्वीचे असा पक्ष मांडणारे असे विद्वान झाले व आहेत. सांख्य मतासंबंधीही असे म्हणता येते ज्याला वैदिक 'पाखंडी' म्हणतात ती अवैदिक पाखंडी मते (दृष्टी) वेदांपूर्वीच अस्तित्वात होती. शेती, शास्त्रे, जातीसमाज, गोपालन वगैरे धंदे वेदपूर्व चालू होतेच. वेदांच्या पूर्वी विचार-आचार या देशात होते, भारतभूमी व देश व संस्कृती होतीच. परंपरेने कित्येक तत्कालीन धंदे करणाऱ्या जातींचा उल्लेख/ऋग्वेदात प्राप्त होऊ शकतो. वेदपूर्व काळात येथे धर्म, संस्कृती व भारतीयांचे जीवन होते. शहरे व खेडी होती.

चार वर्ण-कल्पना ही नंतर उद्‌भवली व अस्तित्वात आली. प्रथम उलटा क्रम जो लावला जातो तो सुलटा करणे येथे भाग होते. बुद्ध व आंबेडकर यांना धार्मिक, सामाजिक गुलामगिरी नाहीशी करण्याच्या गरजेच्या कार्याला अग्रेसरत्व द्यावे लागले व यासाठी पूर्वी-देखील अनेक पंथ 'आम्ही हिंदू राहणार नाही' असे ठरवून बाहेर पडले. मुस्लिम व ख्रिस्ती

धर्मात असंख्य गेले. ही प्रक्रिया अजून चालू आहे. सरते शेवटी डॉ. आंबेडकरांना बुद्ध कवटाळावा लागला. बुद्धाच्या काळापेक्षा डॉ. आंबेडकरांचा काळ आधुनिक होता. मधले अनेक महाभाग ओलांडून आंबेडकर मागे का गेले ? बुद्ध हा पहिला मोठा धर्मसुधारक झाला व पुढील सर्व अनेक धर्म सुधारणापर प्रयत्नांवर बुद्ध धर्मक्रांतीची छाया व परिणाम आढळतो. बुद्ध हा पहिला मोठा संत होय.

**गुलामगिरीचा उद्‌भव व तिच्या विनाशाचा एकमेव मार्ग :**

तात्त्विक अर्थाने येथील धर्माचे नाव 'ब्राह्मण धर्म' असे होते. हा धर्माचार वैदिक यज्ञ-याग या कर्मकांडावर अधिष्ठित झाला होता व त्याला इहपर सकाम फलप्राप्तीचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्या सकाम साधनांचा निषेध उपनिषदांनी प्रथम केला. यज्ञ यागामध्ये पशू-घोडे, गाई, वासरे यांना बळी देत. यामुळे हिंसा वाढली. बौद्ध काळात भारतीय कृषी बरीच प्रगत झाली. तिला गोधनाची गरज होती. जनावरांचे बळी देणे हे शेती व शेतकरी यांच्या दृष्टीने अयोग्य होते. जैनांना व बुद्धांना यामुळे अहिंसा धर्माचा पुरस्कार करावा लागला. हिंसेचा विनाश घडवून आणण्यासाठी वैदिक धर्माचा व वेदप्रामाण्याचा त्याग करणे भाग झाले. वेदप्रामाण्याचा त्याग हे येथील धर्मसुधारणेचे आजपर्यंतचे समान सूत्र ठरते. वेदाभिमानी व वेदविरोधी असे दोन विचार प्रवाह येथे निर्माण झाले. त्यांचा संघर्ष ज्या ज्या काळात धर्मसुधारणेची गरज पडते, त्या त्या काळात अटळ होतो. भारतात धर्म परिवर्तन होत आले व होत असते. पण धर्मक्रांतीचा पहिला मोठा प्रयत्न बुद्धाने केला.

बौद्ध व त्याचा धर्म ही फक्त धर्मसुधारणा किंवा धर्मपरिवर्तन नव्हते. ती 'धर्मक्रांती' होती (व आहे). ईश्वर-ब्रह्म-स्वर्ग वगैरेंच्या आधारावर जो अध्यात्मप्रधान ब्राह्मणीधर्म होता, त्याचा जो कणा अध्यात्मवाद हा बुद्धाने नाकारला. जडवादाला व विज्ञानाला समीप असे बुद्धाचे एकमेव तत्त्वज्ञान आहे. असे सर्व धर्मांच्या अभ्यासांती बाबासाहेबांना समजले. ही त्यांची अंतिम ज्ञानप्राप्ती होय. सत्यशोधनाचे फलित ठरते. मुस्लिम होणे किंवा ख्रिस्ती धर्मासारखा विदेशी धर्म स्वीकारणे हे केवळ धर्मांतरच नव्हे, तर ते समाजांतरदेखील ठरते. बुद्धधर्म हा पूर्ण स्वदेशी होय.

बुद्धानंतर भारतात महानुभाव, भागवत व अलिकडील काळात ब्राह्मोसमाज हे धर्मसुधारणेचे महत्त्वाचे प्रयत्न होते. पण ते संपूर्ण वेदप्रामाण्य टाकीत नाहीत व ईश्वराला शिरोधार्यच मानतात. म्हणून यांना क्रांतिकारक म्हणणे अशक्य होय. बुद्धधर्माएवढा क्रांतिकारक व सर्व जगभर प्रभाव गाजवणारा दुसरा कोणताच धर्म अर्थात डॉ. आंबेडकरांना गवसणे अशक्य झाले. अर्थात शिख वगैरे इतर काही धर्म त्यांनी चोखाळले होते. पण यामुळे त्यांचे

समाधान झाले नाही. 'धर्मक्रांती' करण्याची एकमेव ताकद बुद्ध धर्मात त्यांना आढळली. शिख धर्माकडे वळण्याचा त्यांचा बेत होता, पण आज असे म्हणता येते की, ते तिकडे वळले नाहीत, हे उत्तम झाले. धार्मिक-सामाजिक गुलामगिरीचे सर्व आधार बुद्ध नाकारतो. ईश्वर, अध्यात्म, ब्रम्हवाद, चारीवर्ण व त्यातील श्रेष्ठकनिष्ठभाव, अस्पृश्यता जातिभेद वगैरे तत्सम धार्मिक बाबी बुद्ध नाकारतो. सत्य, समता, बंधुभाव, स्वातंत्र्य वगैरे आधुनिक लोकशाहीला पूरक असे मुद्दे व दृष्टिकोन बुद्धात बाबासाहेबांना आढळले. बुद्धधर्मच का याचे उत्तर समर्थपणे बाबासाहेबांनी दिले आहे. इतर धर्ममार्ग का स्वीकारता येत नाहीत याची कारणे दिली आहेत. बुद्धाने त्याच्या अनुयायांचे स्वातंत्र्य हिरावले नाही. बुद्ध निर्णयार्थ पंचायत भरवी व या संगत सभातून धर्म चर्चा चाले. खुद्द बुद्धाचा धर्म हा विश्वधर्म होता व बुद्धाला संप्रदाय (पंथ) स्थापायाचा नव्हता.

## बुद्धेन वर्तते इति बुद्ध

बुद्ध हा एकमेव धर्मात्मा झाला की, तो स्वतःला अवतार (साक्षात्कारी) मानीत नव्हता. मनुष्य म्हणजे बुद्धी व बुद्धीने खरे-खोटे शोधून माणसाने स्वावलंबनाने वागावे, असा बुद्धाचा प्रधान संदेश होता. समाजाला धार्मिक-सामाजिक गुलामगिरीतून पूर्णतः मुक्त करण्याचे सामर्थ्य बुद्धाच्या धर्मक्रांतीत आहे. ही खातरजमा बाबासाहेबांची झाली व इतरांनी त्यांच्या स्वतःच्या हितासाठी धर्मचक्र मानावे, बुद्धीला, संघाला व धर्माला म्हणजे नीतीला शरण जावे, म्हणजे त्रिशरण पत्करावे, यासाठी बुद्ध दीक्षा हाच एकमेव मार्ग त्यांनी शोधला. बुद्धाच्या अगोदरचे व नंतरचे प्रयत्न (धर्ममार्ग) कसे गौण आहेत. याची समीक्षा व मीमांसा त्यांनी मांडली आहे. ती मुळातून अवतरणे घेण्याचे विस्तारभयास्तव गौण समजले आहे. राममोहन-फुले-विवेकानंद-गांधी आदिकरून अनेक महत्त्वाच्या विचारवंतांत बुद्ध-प्रशस्ती आढळते. बाबासाहेबात पुढे प्रत्यक्ष कार्यवाही संपन्न झाली.

कल्पनावादी धर्मातून वास्तववादाकडे बुद्धाने भारत नेला. कोणताही ग्रंथ व पुस्तक बुद्धीनेच लिहिले जाते व बुद्धिप्रामाण्य म्हणजे पोथी-पुस्तकातून जे विचार व्यक्त झाले असतात, ते स्वबुद्धीने तपासणे, म्हणजे बुद्धिप्रामाण्य होय. ईश्वराकडून प्रेरणा झाल्या किंवा तो बोलवितो-लिहवितो असा साक्षात्कारी विचार बुद्धात नाही. बुद्ध स्वतःला संदेष्टा म्हणवून घेत नाही. ईश्वराचा पुत्र किंवा पैगंबर म्हणून मुळीच समजत नाही.

बुद्ध स्वतः संत व साधू होता. भिक्षु संघात सर्वच अविवाहित असत. पण प्रत्येक अनुयायाने बुद्ध धर्माच्या निवृत्त (संन्यास) असले पाहिजे, असा त्यांचा दंडक नव्हता. गृहस्थी लोकांची बुद्ध धर्मात मोठी संख्या होती व आजही जगभर आहे. चीन-जपान-ब्रह्मदेश-श्रीलंका

फार काय रशिया वगैरे अनेक पाश्चात्य देशांतदेखील बुद्धधर्म गेला व तेथील स्थानिक धर्माला त्याने पोटात घेतले. विविध राष्ट्रांचा तो राष्ट्रधर्म झाला. यावरून त्याचे व्यापक सामर्थ्य समजते. बुद्धधर्मीय राजे व चक्रवर्ती सम्राट झाले. आजही बुद्धधर्मीय अनेक राष्ट्रे आहेत. **जगात हिंदुधर्मापेक्षा बुद्धधर्मीयांची संख्या फारच मोठी आहे** व एकेकाळी जवळ जवळ सारा भारत बुद्धधर्मीय झाला होता. बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या मागे तत्त्वज्ञान, नवदृष्टी व भविष्यकाळाचा वेध होता. उथळपणा व उतावळीपणा न करता अनेक वर्षांचा अभ्यास व चिंतन केल्यानंतर ठाम निर्णय घेतला गेला. तो चुकला नाही. अचूक ठरला. बाबासाहेबांनी बुद्धधर्माचा निश्चितपणे स्वीकार करण्याचे ठरवल्यावर बौद्धधर्मावर उलट-सुलट टीका होऊ लागली. टीकांकारांत बॅ. सावरकर, तर्कतीर्थ जोशी, माटे वैगेरे असामान्य विद्वान मंडळी होती. धर्मांतराला सर्वच दलितांची देखील मान्यता नव्हती. बाबासाहेबांनी एकट्याने या सर्वांना उत्तरे दिली. बाबासाहेब केवळ बुद्ध नव्हते. ते त्या धर्माचे प्रवक्ते व प्रचारकही झाले. बुद्धधर्माचे श्रेष्ठत्व सांगण्यासाठी त्यांना त्यांचे अतुल बुद्धिवैभव उपयोगी पडले. कोणत्याही धर्मप्रचारकाला त्याचा धर्म इतर धर्मापेक्षा कसा श्रेष्ठ आहे हे प्रतिपादणे भाग होते. मात्र असे करताना त्यांनी त्यांच्यातील पडत्या बाजूचे मंडण केले नाही. याच प्रक्रियेला बुद्धिप्रामाण्य म्हणता येते. स्वधर्माला व स्वपक्षाला बुद्धीचा कस लावण्यात बाबासाहेब मागे पडत नव्हते. म्हणून सांप्रदायिक बुद्ध मोठमोठ्या भिक्षूंना बाबासाहेबांनी संपूर्ण मान्यता दिली नाही. त्यांचा रोषही पत्करला व खुद्द सिद्धार्थाच्या धर्माचा त्यांनी जास्त विवेक केला.

स्वतः बुद्ध व त्यांचा संघ संन्यासी होता तरी सर्व जगाला बुद्धधर्माचे ज्ञान देणे, संदेश देणे हे कर्तव्य करीतच राहिला. संन्यासाचे ध्येय जगाचे दुःख निवारण करणे हा होता. निवृत्ती म्हणजे नैष्कर्मावस्था नव्हती. बुद्धसम्राट अशोक याच्या काळाला भारतातील सुवर्णयुग म्हणतात. प्रत्यक्ष परिणामही पाहावा लागतो. मात्र कालांतराने बुद्धधर्मात अनेक पंथ निघाले व अशुद्धीदेखील झाली. ही बाबासाहेबांना दूर करावयाची होती.

## डॉ. आंबेडकर व धर्मांतर

असा संयुक्त विषय असल्यामुळे दोहोंबाबतही अभ्यास व्यक्त करणे अटळ होते. सवलती गेल्या तरी चालतील, सवलतीपेक्षा बुद्धधर्माचे महत्त्व बाबासाहेबांना जास्त वाटले. खुद्द सवलती कशा व्यंगपुराणात्मक आहेत हेही बाबसाहेबांनी बुद्धीचा कस लावून सांगितले आहे. ‘नवबौद्ध’ ही संज्ञा वापरली जाऊ लागली. बाबासाहेबांनी नव्याने बुद्धधर्म मांडला. या दृष्टीने ती संज्ञा खरी होती. बुद्धधर्माचे शुद्ध स्वरूप पूर्णपणे व्यक्त करण्यास बाबासाहेबांना आयुष्य प्राप्त झाले नाही. **हा मुख्य तोटा झाला.** हे सत्कार्य आता त्यांच्या मागे होणाऱ्या नेतृत्वाकडून घडले जाणे युक्त आहे.

## दोन बाजू

सर्वच जग व्यंगपुराणात्मक-गुणदोषात्मक असल्यामुळे खुद्द बुद्धधर्म हा संपूर्ण निर्दोष आहे. असा दावा बाबासाहेबांनी मांडला नाही. 'भीमभाष्य' हे यादृष्टीने स्वतंत्र व स्वावलंबी आहे. ह्या सर्व प्रक्रियेला 'भीमयान' म्हणता येते.

उदय व अस्त, जय-पराजय स्वीकार व विरोध वगैरे अनेक द्विविध बाजू बुद्धधर्माच्या इतिहासात आहेत. अनेक पंथ आहेत. बुद्धाला व त्याच्या धर्माला जेवढा विरोध, छळ व निंदा झाली व कधी कधी अद्याप होत असते तेवढी अन्य कोणास झाली नसावी.

'हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा करून बाबासाहेब ती पुरी करण्यासाठी बांधले गेले. ही असामान्य जबाबदारी त्यांनी वृद्धपणी व प्रकृती पूर्ववत नसतानाही एकट्यानेच पेलली हे विशेष. त्यांनी त्यांचा प्राण व श्वास बुद्ध धर्माच्या अभ्यासासाठी अर्पण केला होता. ते समर्पित होते. अंते मतिः सः गतिः। या न्यायाने बुद्धधर्माचा स्वीकार व प्रसार हे त्यांच्या जीवनाचे शिखर होय. डॉ. आंबेडकर म्हणजे बुद्धधर्म अशी व्याख्या तयार झाली. आधुनिक काळी नैतिक धर्माच्या प्रस्थापनेचा हा मोठा सामुदायिक प्रयत्न होय. बुद्धाने टोके टाकून धर्माचा विवेक केला. हाच मध्यम मार्ग आपण सर्वांनी स्वीकारावयास हवा आहे. ईश्वर आहे किंवा नाही या वादात बुद्ध पडला नाही. म्हणून तो वास्तववादी ठरला. काल्पनिक व गुढधर्म त्याने स्वीकारला नाही. दुसरी बाजू लक्षात घेतली तर बुद्धाची प्रशस्ती व गौरव जेवढा होतो, तेवढा कोणाचाच होत नाही. प्रच्छन्न बुद्ध जे आद्य शंकराचार्य व दशावतारात दिलेले बुद्धाला स्थान लक्षात घेता, हिंदुधर्माला व हिंदुसमाजाला बुद्ध मान्य करावा लागला. विष्णू सहस्रनामावलीत विष्णूलादेखील बुद्धाला लावलेली संबोधने द्यावी लागली. एवढे सांगावेसे वाटते की भारताला बुद्धधर्माकडे संपूर्ण पाठ करता आली नाही व येत नाही आणि पुढेही येणार नाही. बुद्ध लोकशाहीवादी होता व भारताचा पिंड लोकशाहीवादीच आहे. **लोकशाही ही आपली राष्ट्रीय जीवनप्रणाली होय.**

## भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न आणि पंचविसावे बुद्ध

तथागतापूर्वी तेवीस बुद्ध झाले व बौद्ध गौतम हा चोविसावा झाला. पुढे बुद्ध होणार नाहीत, अशी धार्मिक समजूतदेखील निर्माण झाली. पण धर्माला विकास असतो. त्याची वारंवार शुद्धी करावी लागते. कारण मनुष्य समाजाच्या स्खलनशील स्वभावानुसार विकृती निर्माण होतात. बौद्ध धर्मसुधारणेसाठी ते खुद्द गौतमाप्रत गेले.

बुद्धाच्या मागे व पश्चात् इतिहास घडला व घडेल. त्याप्रमाणेच बाबासाहेबांच्यामागे व पुढे इतिहास होता व आहे व असेलही. फक्त माणसाला चिकित्सक बुद्धी प्राप्त

असल्यामुळे तो मागील इतिहास व वर्तमानाचा अर्थ करून भविष्य काळाकडे जात असतो. माणसाचा इतिहास युद्धे व कलह यांनी व्याप्त झालेला आहे. सर्व जगापुढे आता असा प्रश्न आहे की, जगाला युद्धे नको असतील तर त्याने शांतिब्रह्म सिद्धार्थाला पत्करले पाहिजे. याप्रमाणे अद्ययावत व आधुनिक काळाचे संदर्भ, नवे नवे प्रश्न यांच्याशी बुद्धधर्म मिळता- जुळता होता व आहे.

बाबासाहेबांची पाटी कोरी नव्हती. आधुनिक धर्मसुधारणेचा व समाज सुधारणेचा इतिहास राजा राममोहन रॉय यांच्यापासून चालू होतो. खुद्द राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, स्वामी विवेकानंद, म. गांधी, लो. टिळक, केसरी कर्ते केळकर विनोबा, तर्कतीर्थ जोशी वगैरे अनेक प्रसिद्ध व अप्रसिद्ध थोरामोठ्यांनी बुद्धधर्माची महती मान्य केली आहे. कै. केळुसकर यांच्या बुद्ध चरित्रातून बाबासाहेबांनी प्रेरणा घेतली. श्री. कसबे यांनी धर्मानंद कोसंबी व महर्षी शिंदे यांच्या सहवासातून बाबासाहेबांनी बुद्धधर्माविषयी स्फुर्ती घेतली असे एके ठिकाणी नमूद केले आहे. बाबासाहेब एकमेव ठरतात की ज्यांनी बुद्धधर्माची त्यांच्या अनुयायांसह सार्वजनिकपणे जाहीर दीक्षा घेतली. केवळ प्रशस्ती करून थांबले नाहीत. तर पुरस्कार व प्रचारही केला.

महर्षी शिंदे विलायतेत सर्वधर्मांच्या अध्ययनासाठी गेले असताना बौद्धधर्माचा व पाली भाषेचा विशेष अभ्यास केला. शिंदे संस्कृत पंडित असल्यामुळे पाली त्यांनी लवकर आत्मसात केली. पण त्यांचा कटाक्ष सर्वधर्मरहस्यावर होता. त्यांनी १९१० साली पुण्यास 'बौद्धधर्माचा जीर्णोद्धार' या विषयावर जाहीर व्याख्यान दिले. मी बुद्धीस्ट आहे असे ते म्हणत. बौद्ध जयंतीदेखील पाळीत. पण प्रत्यक्ष बौद्धधर्मात प्रवेश केल्यामुळेच केवळ दलितांचा प्रश्न सुटेल असे त्यांचेही मत नव्हते. या मुद्यावर शिंदे-आंबेडकर यांचे एकमत नव्हते. प्रत्यक्ष बौद्ध धर्माचा स्वीकार महर्षी शिंदे यांच्या मृत्यूनंतर पुढे केला गेला. शिंदे १९४४ साली वारले.

१९२५ च्या सुमारास पुण्यास धर्मानंद कोसंबी यांची बुद्ध धर्मावर व्याख्याने घडवून आणली. फर्ग्युसन कॉलेजमध्ये धर्मानंदांना स्वतःचे वजन खर्ची करून शिंदे यांनी नोकरीस लावले. याप्रकारे बुद्धधर्माची सेवा प्रत्यक्ष व वाङ्मयाद्वारे या देशात इंग्रजी राज्य आल्यानंतर अनेक विद्वानांनी केली. युरोप-अमेरिकेतील अनेक विद्वानांनी बुद्धधर्माचा सखोल अभ्यास केला. मद्रासकडे प्रो. नरसू म्हणून एक कार्यकर्ते होते. त्यांनी बुद्धसंघ काढला होता व त्यात पारिया या समाजातील पूर्वास्पृश्यदेखील सामावून घेतले होते. या सर्व पूर्व प्रयत्नांना फार मोठ्याप्रमाणात धर्मांतराचा अपूर्व सोहळा बाबासाहेबांनी भरवून यश आणून दिले. अनेकांच्या पूर्वी इच्छा होत्या. त्यांना मूर्तस्वरूप फक्त बाबासाहेबांनी दिले.

## महर्षी शिंदे-आंबेडकर व बुद्धधर्म

नम्रता, संयुक्तता, वास्तवता (व्यवहारवादीपणा), सह्यदयता, सहिष्णुता, करुणा, युक्तिवाद वगैरे बुद्धधर्माचे अनेक पैलू महर्षी शिंदे यांनी त्यांच्या व्याख्यानात सोप्या भाषेत सांगितले आहेत. बुद्धाला धर्माच्या क्षेत्रात हटवाद मान्य नव्हता. उतावीळपणाकरून कोणीच स्वतःचा पंथ सोडू नये. उलट उतावीळ करणाऱ्याला बुद्ध सबुरी करण्यास सांगे व त्याच्या पंथातील चांगली बाजूदेखील त्याला बुद्ध सांगे हे आश्चर्य आहे. बुद्धाने त्याच्या काळातील हयात व गत असे सर्वधर्मप्रवाह (मते व मतमतांवरे) अभ्यासले होते. फार काय अनेक मते प्रत्यक्ष अनुभवलीदेखील होती. हाणून मारून दुसऱ्यास मुसलमान करणे, लालूच दाखवून धर्मांतरे करणे-घडवून आणणे हा प्रकार बुद्धधर्माने कधीच केला नाही. बुद्ध धर्म हा विश्वधर्म आहे. प्रागतिकता, सहानुभूती, भूतदया, निश्चित-वादी व्यवहारवाद वगैरे महत्त्वाचे बुद्धधर्मातील दृष्टिकोन शिंदे यांनी अभ्यासून मांडले आहेत. बुद्धाचा मार्ग 'मध्यमा प्रतिप्रत्तीचा' होता म्हणून त्यात अतिरेक व टोकास जाण्याची प्रवृत्ती रोखली गेली आहे. धर्मानंद कोसंबी व महर्षी शिंदे यांच्या साहचर्यातून बुद्ध धर्माविषयी पूर्वजागृती झाली होती. बुद्धधर्माचा जीर्णोद्धार व्हावा म्हणजे काय व्हावे?  यासंबंधी शिंदे म्हणतात, '.....आता जो बुद्धधर्माचा जीर्णोद्धार व्हावा अशी आमची इच्छा आहे, तो हल्ली इतका प्रचलित असलेल्या त्या धर्माच्या विविध वैकल्पांचा टिळा टोपीचा किंवा निर्जीव आचाराचा नव्हे...... आचरणाला अधिक उज्ज्वलता येवो इतकीच इच्छा' ही इच्छा डॉ. आंबेडकरांनी पुरी करण्याचा सन्मार्ग पुनः उपलब्ध केला. कै. राजारामशास्त्री भागवत सुधारकात होते तरी 'बुद्धधर्म म्हणजे अंधार' असे मत त्यांनी व्यक्त केले होते. ज्ञानकोशकार श्रीधरपंत केतकर यांनी देखील बुद्धावर फूत्कार टाकले, यांचे सर्वांचे खंडण शिंदे यांनी केले. बुद्धधर्माच्या येथील ऱ्हासाची कारण मीमांसा शिंदे-आंबेडकरांनी केली आहे. पण जुनी व बोथट कारणे आता व यापुढे संभव नसल्याने त्याचा विचार कालबाह्य वाटतो. शिंदे-आंबेडकर मतभेद देखील कालबाह्य झाला. मतैक्य पाहण्यात आनंद वाटतो व कोणासही वाटावा. यायोगे ज्ञानात भर पडते.

एकूण दलित प्रश्नांचा व बुद्धधर्माचा उलगडा करण्यासाठी शिंदे अभ्यासले जाण्याची नितांत गरज आहे. धर्मानंद कोसंबी यांचेही ग्रंथ अभ्यासावे.

बुद्धधर्माचा म्हणजे येथील मातीत निर्माण झालेल्या धर्माचा स्वीकार येथील बाबासाहेबांनी केला व वरील ध्येय-धोरणात यश आणून दिले.

**बाबासाहेबांना पंचवीसावे बुद्ध म्हणणेच जास्त समर्पक ठरते.** धर्मचक्रास वक्री गती देऊन ते आता भारतात पुनः फिरत आहे. यामुळे समाजांतर-राष्ट्रांतर-संस्कृतीमध्ये बदल वगैरे काही अनिष्ट घडू शकत नाही. हित व कल्याण व्हावे असा यात विधायक व रचनात्मक उद्देश होता. हिंदुत्वाला व भारतीयत्वाला कसलीच बाधा येऊ शकत नाही. अशी आता सर्वांची खात्री झाली आहे. प्रारंभी जो विरोध दिसला तो आता मावळला आहे. कारण काही वाईट झाले नाही. उलट शुभ घडण्याचा मार्ग उपलब्ध झाला.

'बुद्धधर्म व आंबेडकर' हा विषय एकच होतो. अंतर राहत नाही. तसेच डॉ. आंबेडकर व धर्मांतर (विषम धर्मातून समानता निर्माण करण्याचे सामर्थ्य असलेल्या धर्माची दीक्षा घेणे) हादेखील एकच विषय ठरतो. धर्मांतर ही शॉक ट्रीटमेंटच नव्हती. अनेकांना 'शॉक' बसला. पण ही अवस्था मागे होऊन गेली.

गुलामगिरीचे स्वरूप प्रथम गुलामगिरीत असणाऱ्यांना सांगावे लागते, कारण जे गुलामगिरीत असतात त्यांच्या अंगी गुलामगिरी खिळती असते. यामुळे त्यांना अवजुक काही वाटत नाही. Tell him that he is a slave, he will revolt. हे कार्य भारतीय परिस्थितीचा विवेक करून बाबासाहेबांना करावे लागते. अर्थातच खंडनाचा व संघर्षाचा मार्ग त्यांना पत्करावा लागला. विद्रोहाच्या वाटा त्यांना अटळ झाल्या.

धर्मदृष्ट्या बुद्धमार्ग हा सर्व जगात नीतिप्रधान धर्म आहे. व्यक्ती व समाज नैतिक व सदाचरणी व्हावयाचा झाल्यास त्याला नीतिमूल्याची जाणीव सक्रीय होणे, अटळ असते. भ्रष्टाचाराकडून सुष्टाचाराकडे जाण्यास नीतिप्रधान तत्त्वज्ञान व धर्म अधिकाधिक उपयोगी होऊ शकतो. ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग यापेक्षा नीतिमार्ग बुद्ध वरिष्ठ मानतो.

जातिवर्णभेद, ब्राह्मणप्रधानता, स्त्रीपुरुषांतील विषमता, समान हक्कांचा अभाव, धर्मग्रंथातील विषमता व पक्षपात या रूढ व पारंपरिक हिंदुधर्माचा प्रत्यक्षात रोजच्या आचरणातील प्रधान भाग झाला. यासाठी 'याच धर्मात राहून मी मरणार नाही,' अशी बाबासाहेबांना घोषणा करावी लागली. हिंदुधर्मात राहून हिंदुधर्माची सुधारण करणे दुष्कर व अशक्य ठरते. हिंदुधर्मात उत्कट व भव्य जो भाग आहे तो विषमतेने स्पृश्यास्पृश्यतेने-जाती विघटनामुळे गिळून टाकला आहे. यामुळे तत्त्वनिष्ठ परिवर्तनवाददेखील अशक्य होतो व झाला. यासाठी धर्मक्रांती करणाऱ्या बुद्धधर्माचा एकमेव मार्ग जो मागे भारतीय संस्कृतीत उपलब्ध होता, तोच पुनः

स्वीकारणे हा एकमेव तोडगा (उपाय) बाबासाहेबांनी इतर सर्वधर्म चोखाळून नंतर निश्चित केला व मरणापूर्वी उठाउठी करून सामुदायिक दीक्षा समारंभ उरकून घेतला. यामुळे सर्व भारत भाग्यवान ठरला.

बुद्धधर्माची मातृ-पितृ व पवित्र भू भारत होती व आहे. तरी पुढे तो धम्माचा धर्म बनला. विविध राष्ट्रांतील बुद्धधर्म तेथल्या स्थानिक धर्माशी संयोग पावून संयुक्त झाल्यामुळे, त्यात विकृत भाग फार सामावला गेला. ही अशुद्धी त्यांना जाणवत होती. बाबासाहेबांवर जबाबदारी मोठी होती. कारण आगीतून उठून फुफाट्यात जाण्याची ही साधार भीती होती. यासाठी बुद्धधर्माचे शुद्ध व मूळ स्वरूप व्यक्त करणे भाग झाले. या दृष्टीने बाबासाहेबांना गौतमाकडे म्हणजे मूळाकडे जाणे भाग झाले. नागार्जुनामुळे बुद्धधर्म सुकर झाला व हीनयानाच्या स्वीकारामुळे तो वाढला, पण त्याने महायान गिळून टाकले होते.

**भीमयान**

यासाठी भीमयान व भीम भाष्याची नवी गरज होती. 'बुद्ध व त्याचा धम्म' हा ग्रंथ साकार करून व तत्पूर्वी सार्वजनिक धर्मदीक्षा समारंभ उरकून बाबासाहेबांना मृत्यूने स्पर्श केला. ही नियतीची घटना कृतज्ञतेने नमूद करावी लागते तरी दुर्दैवाने हे कार्य पूर्ण झाले नाही. भिक्षूसंघाच्या घटनेत, ध्येयात व ध्येय साधनांच्या मार्गात इष्ट ते फेरफार करण्याची गरज त्यांना होती. अखिल जागतिक बुद्ध सेवा संघ निर्माण करण्याची त्यांना गरज वाटत होती. बाबासाहेबांच्या जीवन मिशनचा अर्धा पण महत्त्वाचा भाग अपूर्णच राहिला. **हा कोण पुरा करणार?**

बुद्धधर्म आंतरराष्ट्रीय व वैश्विक असल्यामुळे काही जागतिक बुद्ध धर्मपरिषदांना बाबासाहेब उपस्थित राहू शकले. काठमांडू येथील धर्मपरिषदेत बुद्ध व मार्क्स असा तुलनात्मक विषय त्यांनी घेतला व बुद्धधर्म हा मार्क्सला समीप आहे. तरी बुद्ध म्हणजे मार्क्स व मार्क्स म्हणजे बुद्ध हे अशक्य आहे. या दोहोंमधून बुद्धच का निवडला याची कारणे बाबासाहेबांनी तेथे व इतरत्र दिली आहेत. यामुळे प्रश्न व शंका कोणासही पडू नये.

भारताचा पिंड धर्मप्रधान आहे. भारतीयांच्या दृष्टीने धर्मविहीनता ही अयोग्य व अशक्य आहे. याची जाणीव असल्यामुळे बाबासाहेबांनी बुद्धाचा पक्ष म्हणजे धर्मसुधारणेचा पक्ष स्वीकारला. तरी बाबासाहेबांनी भारतीय घटना संपूर्ण बुद्धधर्माधिष्ठित व्हावी असा दुराग्रह स्वप्नातही आणला नाही. भारत अनेक धर्मी आहे म्हणून तो अखंड राहावयाचा झाल्यास धर्म व संप्रदाय या बाबतीत शासनाने तटस्थ राहण्यात राष्ट्रीय फायदा आहे, हे बाबासाहेबांना मंजूर होते व हे अटळ आहे.

भारताचा इतिहास पाहता धर्मक्रांतीला फार काय सुधारणांच्या प्रयत्नांना व नेमस्त परिवर्तनालाही प्रतिक्रांती गिळून टाकते. यासाठी पुनःपुनः क्रांतीचा मार्ग चोखाळावा लागतो. परंपरा, चालीरीती, रूढी, रिवाज, वहिवाटी व चाकोऱ्या एवढ्या घट्ट व मठ्ठ आहेत की, **बाबासाहेबांचे 'भीमयान' देखील कालांतराने गिळून टाकील किंवा काय?** याची जाणीव करून देणे, हा या निबंधाचा प्रमुख उद्देश आहे. कारण एकदा बुद्ध धर्मास परंपरेने गिळून टाकले होते. पचवले होते. नागार्जुनाने बुद्धधर्म सर्व सामान्यांच्या कह्यात येईल अशी त्यांची सुधारणा केली खरी; पण पुढे तो आद्य शंकराचार्यांना गिळणे सोपे झाले. बुद्धधर्माच्या समाप्तीची जबाबदारी म. फुले व पुढे महर्षी शिंदे यांनी आद्य शंकराचार्यांवर टाकली आहे. बुद्धधर्म नाहीसा झाला म्हणजे काय झाले?

नागार्जुन व आद्य शंकराचार्य यांच्या नंतर हिंदू व बौद्ध यांच्यातील भारतातील अंतर संपूर्ण संपले. ही जी प्रत्यक्षात अदृष्यता प्राप्त झाली तिचे स्वरूप सांगावे लागते. भूतकाळावरच वर्तमान व भविष्यकाळ उभा होतो. उदा. भगवतगीतेत बौद्ध व जैन धर्म आहे. गीतेचे चिकित्सक अभ्यासक डॉ. खैर यांनीही प्रतिपादिले आहे. सांख्य व चार्वाक यांचा परिणाम कमी-अधिक स्वरूपात गौतम व त्याच्या धर्मावर होता.

जैन हा धर्म आचरण्यास अवघड व अहिंसेचा अतिरेकी विचार-आचार करणारा म्हणून शिंदे व आंबेडकर या दोघाही पंडितांनी म्हटले आहे. महावीर व गौतम यांच्या शिकवणुकीत बरेच साम्य आहे. म्हणूनही जैन व बुद्धात संघर्ष झाला नाही. बुद्धधर्म नाहीसा झाला तरी जैन येथे बराच टिकून राहिला. आज जैनांची संख्या नगण्य नाही.

उपनिषदांनी म्हणजे वेदान्ताने वेदांचे महत्त्व कमी केले, यामुळेही गौतमाला यज्ञयागी व कर्मकांडी ब्राह्मणी वैदिक धर्मावर हल्ला करून जय मिळवणे सोपे गेले. उपनिषदांनी पंचमहाभूतांच्या प्रार्थनांच्या पुढे झेप घेऊन ब्रह्म ही अनंत, सूक्ष्म व विराट निर्गुण सर्वव्यापक, शून्यस्वरूप, महान ज्ञानाची कल्पना (जाणीव) व्यक्त केली. या अनंतत्वाच्या पलीकडील विचार मानवाला प्राप्त झाला नाही.

बुद्धधर्म व हिंदुधर्म एकच सर्वथैव नसला तरी भारतीय संस्कृतीतून व धर्मविकासातून तो निर्माण झाला, म्हणजे पुढे विकसित आणखी झाला. तत्त्वतः व व्यवहारतः हिंदुधर्म व बुद्धधर्म एकच असता तर बाबासाहेबांना दीक्षेची गरजच पडली नसती. असा प्रत्येक प्रश्नावर द्विविध विवेक करून पुढे जावे लागते.

(बुद्धधर्माच्या प्रभाव अस्तित्वात जे पृथकपणे होते, ते तो धर्म हिंदुधर्माच्या शरीरात व विचारात मिळून जाऊन अंतरच राहिले नाही.) चालू हिंदुधर्माची व्याख्या करणे झाल्यास

ब्राह्मणी वैदिक धर्म व बुद्ध आणि जैन यांचे संमिश्रण होऊन बनलेला धर्म होय. गीतेच्या दुसऱ्या अध्यायावर बुद्धधर्माची छाया आढळते.

उपनिषदांच्या नंतर पुढे गीतेने दुसऱ्या अध्यायात स्वर्गसुखासाठी व येथील ऐश्वर्यासाठी चालू असलेल्या सकाम यज्ञीय कर्मकांडाचा निषेध अधिक कडकपणे केला. त्यातूनच अहिंसेचा पुरस्कार करणारा भागवतधर्म पुढे आला. वारकरी साधुसंतांच्या धर्मावर बौद्धांच्या अहिंसाची छाया दिसते. बुद्धोत्तर काळात बुद्ध व त्याचा धर्म याचा प्रभाव प्रत्यक्ष पुढील सर्व जुन्या व नव्या संप्रदायावर, साधुसंतांवर व त्यापूर्वीच्या आचार्यांवर टिकून राहिला. या दृष्टीने बुद्ध व त्याचा धर्म संपूर्ण पराभूत झाला हे खरे नाही. बुद्ध धर्माचे उद्‌गान व्हावे, असाही मनोदय व्यक्त झाल्याचे आढळते. उदा. शिंदे यांना बौद्ध धर्माबद्दल आस्था वाटत होती. महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रचार करण्याचा धर्मानंदाचा विचार त्यास पसंत होता. एवढेच नव्हे, तर त्यांनी या कार्यात धर्मानंदांना बरीच मदत केली. हे सर्व पूर्व प्रयत्न पाहता शिंद्यांनी बाबासाहेबांच्या सार्वजनिक दीक्षा योजनेचे स्वागत केलेही असते. निदान विरोध तरी व्यक्त केला नसता. सर्व धर्मांचे 'रहस्य' म्हणजे सदाचरण व नीती या दृष्टीने नैतिकतेला महत्त्व देणारा **बुद्धधर्म मानवीधर्म ठरतो.** 'खरी नीती हाची। मानवांचा धर्म।।' असा म. फुल्यांचाही निर्णय आहे.

धर्मांतरामुळे हिंदुसमाज व नवबौद्ध यांच्यात पृथकता वाढली, एवढेच नव्हे तर महारेतर दलितांनी (पूर्वास्पृश्यांनी) बौद्धधर्म पत्करला नाही. म्हणून हिंदू पूर्वास्पृश्य व नवबौद्ध (महार) यांच्यातही अंतर पडले. असा एक धर्मांतराची इष्टानिष्टता विचारात घेता प्रत्यक्ष प्रश्न पडतो. पण प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहिल्यास वरील सर्व जातींमध्ये आपसात मागेही दुरावा व पृथकपणा होताच व अजूनही आहे. धर्मांतरानेच दुरावा वाढला हे संपूर्ण खरे नाही. जन्मप्राप्त जातिवर्ण भेद हे कोणत्याही संघटनेचे शत्रू आहेत. म्हणूनही बाबासाहेबांना ते नको होते. बुद्धालाही नको होते.

डॉ. आंबेडकर धर्मपुरुष होते. केवळ राजकीय व आर्थिक समतेमुळेच दलितांचा स्वोद्धार होणार नाही. त्यांची वैयक्तिक व सामाजिक-धार्मिक स्वोन्नती होण्यासाठी त्यांना धर्म दिला पाहिजे. दुसरा अन्य तरणोपाय त्यांनी तेवढ्या महत्त्वाचा गणला नाही. स्पृश्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या प्रयत्नामुळे शिवता-शिवत उत्तरोत्तर कमी होत गेली. पण मानसिक संपूर्ण क्रांती अद्यापही विशेषतः खेड्यापाड्यांत झाली नाही. याचे कारण 'धर्मांतर' हे फक्त नसून दुसरी अनेक कारणे आहेत. भारतीय दलितांचा प्रश्न स्वातंत्र्यात जास्त बिकट झाला आहे. **बाबासाहेब लोकशाहीवादी होते.** लोकशाहीला, पंचायत पद्धतीला व विकेंद्रीकरणाला बुद्ध

जवळचा ठरतो. बुद्ध हा बुद्धी वापरावयास लावून डोळस करतो. बुद्धिवाद हा लोकशाहीचा रचनात्मक व विधायक पाया आहे.

बौद्धधर्म आधुनिक सर्व सामाजिक सुधारणांना पूरक होतो. उदा. ब्राह्मोसमाजात राजा राममोहन रॉय-केशवचंद्र सेन वगैरे विचारवंत झाले. त्यांचे अलिकडील नव्या काळात बुद्धधर्माकडे लक्ष प्रथम गेले. मूर्तिपूजा, (अवतारवाद, धर्म-ग्रंथ) ईश्वरप्रणित म्हणून ते सर्वांशी प्रमाण मानणे, विभूतिपूजा, साक्षात्कार व चमत्कार वगैरे प्रतिगामी बाबी ब्राह्मोसमाज नाकारतो व त्या बाबी बुद्धानेही नाकारल्या आहेत. म्हणून ब्राह्मोसमाजी महर्षी शिंदे यांना बुद्ध व त्याचा धर्म जवळचा वाटला. साम्ये फार आहेत.

समाधी व तत्सम साधनांचा बुद्ध उपयोग करी म्हणून तो आंतरिक, मानसिक म्हणजे आध्यात्मिक जीवन मानणारा होतो. त्याचे अध्यात्म त्याच्या मनात होते. स्वर्गात किंवा बाहेर कोठेही नव्हते. या दृष्टीने बुद्ध संपूर्ण जडवादी ठरत नाही.

मार्क्स की बुद्ध? संपूर्ण जडवादी मार्क्सला बाबासाहेबांनी मुळीच पत्करले नाही. कम्युनिझमचा मार्ग त्यांनी किंवा त्यांच्या अनुयायांनी पत्करावा असे त्यांना मुळीच वाटत नव्हते. तरी मार्क्स हा बुद्धाला जवळचा व बुद्ध मार्क्सला कोणकोणत्या बाबतीत निकटचा याचे विश्लेषण त्यांनी केले आहे. 'मध्यमा प्रतिपत्तीचा' बुद्ध मार्ग यांनी स्वीकारला होता. या दृष्टीने त्यांनी मार्क्सचे काही दृष्टिकोन स्वीकारले आहेत. उदा. डिप्रेस्ड् क्लासेस यांचे रूपांतर करून स्वतंत्र मजूर पक्ष हे नामाभिधान घेतले. संपूर्णपणे मार्क्सवाद निरर्थक व त्याज्य असे मानणारे बाबासाहेब अर्थात नव्हते. डॉ. आंबेडकर कोण होते व कोण नव्हते हे जाणल्यानंतर त्यांच्या धर्मांतराचे कारण व उद्देश समजू शकतो. **हिंसा बाबासाहेबांना नको होती.**

धर्मांतराची फलश्रुतीदेखील सुपरिणामी ठरली आहे. इतर सर्व धर्मांची चिकित्सा करण्याकडे प्रवृत्ती बळावत आहे. बुद्ध वाङ्मयाचा व पाली भाषेचा अभ्यास वाढत आहे. बुद्ध परिषदही भरत असतात. धर्मचिकित्सा ही इतर सर्व क्षेत्रातील चिकित्सेची जननी होय. हा मार्क्सचा एक विचार कालबाह्य झालेला नाही. बुद्धधर्माच्या स्वीकारामुळे तो भारतात वर्धमान राहिला आहे व राहील.

मनुष्य सर्वथा पूर्ण व निर्भय नसतो, तो सांत आहे, म्हणून त्याचा स्वभाव अनंताकडे झेप घेणारा बनतो. बुद्ध व महावीर यांना ईश्वरत्व बहाल करून नवी मूर्तिपूजा चालू झाली व चालू असते. समाज व्यवहारात व सर्वसामान्यांच्या दृष्टीनेच असे होणे अटळ असले तरी हा एक तत्त्वतः धोकाच ठरतो.

भिक्कू संघात बिघाड झाल्यामुळेही बुद्धधर्माचा विनाश ओढवला, असे म्हटले जाते. म्हणून नवी पुरोहितशाही तयार होणे हे फार धोक्याचे आहे. **भिक्षुकशाही, पुरोहितशाही कोणाचीही असो ती विज्ञानात्मक दृष्टिकोन रोखते.** धर्मांतराला नवी-जुनी आव्हाने असू शकतात. धर्मांतर म्हणजे बुद्धधर्म प्रवेश यशस्वी व्हावयाचा झाल्यास 'धोके' जाणून टाळण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. खरा धोका आतून असू शकतो.

बुद्ध परिषदा सातत्याने भरवून आत्मपरीक्षणाने पुढे गेले पाहिजे. बुद्ध धर्मजागृती, टिकवली तर पाहिजेच; पण ती वर्धमान ठेवणे ही पुढीलांची जबाबदारी आहे. प्रत्यक्ष व्यवहारात चालू काळ जास्तीत जास्तपणे इहवादी आहे. धर्मसंस्थापनेचा हा काळ नाही. अर्थप्रधानता वाढत आहे व माणसामाणसाचा संबंध आर्थिक उत्तरोत्तर होत आहे.

आद्य शंकराचार्यांनी प्रच्छन्न बुद्ध बनून बौद्धधर्म गिळला. त्यांनी गौतमाची प्रशस्ती केली. बुद्धाला अवतारात स्थान दिले गेले. वैशाखी पौर्णिमेला बौद्ध पौर्णिमा म्हणतात. राष्ट्रीय ध्वजावर अशोक चक्र घेतले गेले. इत्यादी प्रत्यक्षाप्रत्यक्ष बुद्धाच्या सार्वजनिक चिन्हांचा स्वीकार झाला. पण एवढे अपुरे आहे. पुतळ्यांची वाढ हीदेखील क्रांती टिकवून धरण्यास पुष्कळपणे अपुरी आहे. म्हणून बाबासाहेबांच्या समाजावर मोठी जबाबदारी आहे. काळ नवा नवा येत आहे व येईल. म्हणून बाबासाहेबांच्या पलीकडे जाऊनही विवेक करणे भाग होईल. खुद्द बाबासाहेबांनी व गौतमाने संपूर्णतेचा दावा केला नव्हता. स्वतः बुद्धाला अनेक अंतर्गत व बहिर्गत धोक्याची जाणीव होती. धर्मांतर म्लान होणार नाही याबद्दलची जागरूकता व दक्षता यांची नवी गरज आहेच. ज्यांनी धर्मांतर केले तो खेड्यापाड्यांतला दलितांमधील समाज पुढारलेला व ज्ञाता, प्राज्ञ झाला आहे असे नव्हे. उलट राजकीय कारणामुळे दुफळ्या वाढल्या आहेत. राजकारण म्हणजे सत्तास्पर्धा ही विघटन निर्माण करू शकते. निरपेक्ष व त्यागी अशा स्वयंसेवकांची नवी गरज हवी आहे. 'बुद्ध व त्याचा धर्म' यावर सर्व भारतीयांनीच विवेक करावा असेच नव्हे तर पंचशील व विश्वशांती व प्रगती यासाठी बुद्धाची जागतिक गरज आहे.

सर्वच दलित व सर्वच भारतीय बुद्ध होतील, हे नव्या काळात असंभवनीय वाटते. पण सर्वात सहानुभूतीदार (हितचिंतक) वाढू शकतील व ज्यांना आस्था आहे, अशा सर्वांनी बुद्धाचा संदेश प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करावा. पाली भाषा आता बहुतेक विद्यापीठाने अभ्यासक्रमात घेतली आहे. याचा फायदा घेता येईल. खेड्यापाड्यांतला बहुजन समाज अद्याप सूज्ञ व समजूतदार झाला नाही. तो शिक्षण क्रमाच्या द्वारे जाणता होण्याची अधिकाधिक गरज आहे. खऱ्या अर्थाने दलित प्रश्न यांच्या अज्ञान व धार्मिक अंधश्रद्धेमुळे खोळंबून राहतो.

बाबासाहेबांचे अनुयायी व त्यांना मानणारे हल्ली बुद्धधर्म वर्धमान राहावा म्हणून कार्यरत आहेतच. पण तीस-बत्तीस वर्षांनंतर धर्मांतरावर धर्मांधता निवारक चळवळी निघाल्या आहेत. पार्थिवपूजा, विभूती व अवतारवाद, धर्मग्रंथांचे ईश्वरप्रणितत्व व सर्वप्रामाण्य, सांप्रदायिक बुद्धी नाहीशी करण्यामुळे समाजातील धर्मांधता नाहीशी होईल. या दृष्टीने धर्मांधता निवारण कार्य करण्यास बुद्धधर्माच्या तत्त्वाचे साह्य होऊ शकेल. कारण बुद्धधर्म हे नैतिक तत्त्वज्ञान आहे. दृष्टी आहे. आधुनिक काळात भारतात धर्मविचार लोपला नाही. वर्धमान आहे. हे सर्व बाबासाहेबांनी गतिमान व वर्धमान केले.

बाबासाहेबांनी धर्मप्रवेश व धर्म दीक्षा घेताना जे बावीस-तेवीस नियम केले आहेत. ते महात्मा फुले यांना मानणाऱ्या सत्यशोधकांनी आपल्या कार्यक्रमात व उद्देशपत्रिकेत सामावून घ्यावेत. कारण धर्मांधता नाहीशी करणे, हे म. फुले व सत्यशोधक समाज यांचे कार्य असते. कोणीच नव्याने पुनः भिक्षूकशाही निर्माण करू नये. बुद्ध-फुले-आंबेडकर असा समन्वय व आचारविचार वाढवावा. उत्कट व भव्य घ्यावे. अहितकारक म्हणून जे त्याज्य ते टाकावे.

हिंदुधर्मातील कोडी सुटली नाहीत, सुटणे अशक्य आहे म्हणून बाबासाहेब हिंदुधर्माच्या बाहेर पडले. धर्मांधतेची नवी लाट येत आहे. ही थोपवून धरण्याचे सामर्थ्य बुद्धिप्रधान ‘धम्म’ देऊ शकतो. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांनी बाबासाहेबांनी स्वीकारार्ह म्हणून कोणते स्वीकारले व कोणते-का नाकारले याचा अभ्यास करावा. जगात युद्धे नको असतील तर बुद्ध स्वीकारला पाहिजे, म्हणजे जगात नैतिकतेची वाढ होण्याची चालू युगात मोठी गरज आहे. धम्म म्हणजे नीतिप्रधान मनुष्यधर्मात सर्वात जास्त महत्त्व देण्याची जरुरी आहेच.

निधर्मीवादाला बुद्ध हा जवळचा आहे. कारण जे पोथिप्रामाण्य मानतात, ईश्वरीदूत-अवतार मानतात व धर्मग्रंथ ईश्वरप्रणित मानतात, धर्मगुरूच्या स्वाधीन आपली बुद्धी देतात ते निधर्मी-सेक्युलर होऊ शकत नाहीत. विज्ञान विरोधी राहतात व सेक्युलॅरिझमला विरोध करतात. जे बुद्ध व आंबेडकरांना मानतात, त्यांचा पवित्रा सेक्युलर लोकशाहीला पूरक असू शकतो व ते दुःख व द्रारिद्र्य यांचा विनाश करण्यास प्रवृत्त होतात. सत्य-समता-स्वातंत्र्य व बंधुभाव आणि अहिंसा या बाबी बुद्धाच्या उपदेशात आहेतच. जगाने जर ह्या तत्त्वांकडे पाठ केली तर विनाशाकडे जाईल व ही तत्त्वे अंगिकारली तर सर्वच मानवांचे कल्याण होईल.

(अप्रसिद्ध निबंध, २० ऑगस्ट १९९१)

******

# ११ सत्यशोधक समाज

## समाजस्थापनेची पार्श्वभूमी

अगोदरच जातीविघटित असलेल्या महाराष्ट्र समाजात उत्तर पेशवाईत विषमतेची मनस्वी भर पडली. विशेषतः अंतर्गत यादवीमुळे मराठी राज्य गेले. सर्वत्र इंग्रजी राज्य होऊन मिशनऱ्यांचे हिंदू धर्मावर आक्रमण चालू झाले. परंपरेने पुढारलेल्या ब्राह्मणांनी नवीन इंग्रजी शिक्षण घेतले व इंग्रजी राजवटीतदेखील त्यांच्याच हातात सत्ता गेली. शेतकऱ्यांच्या हातातील तलवार जाऊन फक्त नांगर राहिला. वारंवार पडणारे दुष्काळ व रोगराई यामुळे सर्व शूद्रातिशूद्र रयत मेटाकुटीला आली. शहरी पांढरपेशा सावकार-इनामदारांच्या कर्जापायी शेतकऱ्यांच्या जमिनी हस्तांतरित होऊ लागल्या. वतनी कुलकर्णी, ग्रामजोशी व एकूण भिक्षूक यांची पिळवणूक वाढत्या दारिद्र्यात शेतकऱ्यांना असह्य होऊ लागली. या मूठभर शोषक उच्चभ्रू समाजाविरुद्ध शोषित बहुसंख्य समाजाचे वर्गविग्रही स्वरूपाचे बंड, मुख्यतः प्रथम पुणे येथे व नंतर सर्व महाराष्ट्रात उभे राहिले. त्या प्रतिक्रियाप्रधान बंडाचे प्राथमिक स्वरूप धार्मिक व सामाजिक होते. ब्राह्मण पुरोहिताचा गृह्य संस्कारात असलेला कायदेशीर हक्क व दक्षिणा-दान घेण्याची वहिवाटच नाहीशी करण्यासाठी ब्राह्मण भिक्षुकांवर बहिष्कार टाकून स्वसमाजातील पुरोहितांकडून लग्नादी धर्मकर्मे करण्याचा क्रांतिकारक संघर्ष निर्माण झाला. त्या उठावाचे वैचारिक नेतृत्व कृतिशीलपणे महात्मा जोतीराव फुले यांनी केले.

## महात्मा जोतीरावांचे विचारसूत्र

महात्मा जोतीराव फुले यांचे शिक्षण स्कॉटिश मिशनच्या मराठी व इंग्रजी शाळेत झाले. त्या वेळचे पुण्यातील प्रसिद्ध मिशनरी रेव्ह. मरे मिचेल या अभ्यासू विद्वानाचा सहवास जोतीबांना दीर्घकाळ प्राप्त झाला. प्रो. विल्सन्, प्रो. जोन्स् यांच्यासारख्या हिंदू धर्मावर टीका करणाऱ्या पाश्चात्य विद्वानांचे ग्रंथ व थॉमस पेनचा 'एज ऑफ रिझन' इत्यादी ग्रंथ जोतीबांनी वाचले. यातील विचार जोतीबांनी चळवळीस आधारभूत म्हणून घेत त्यांचा प्रचार केला. 'आर्यांनी (ब्राह्मण) परदेशातून येऊन आर्येतर अब्राह्मणांना जिंकले, गुलाम केले.' जरुरीनुसार सामाजिक वर्गविग्रहात्मक लढा उभा राहावा म्हणून 'कुळवाड्यांचा नेता' शिवाजी चा पोवाडा (इ. स. १८६९), ब्राह्मणांचे कसब (१८६९) व ब्राह्मणांची गुलामगिरी (१८७३) ही पुस्तके लिहून प्रसिद्ध केली. आर्यकाळापासून इंग्रज बहादुरांच्या अव्वल

काळापर्यंतचा गुलाम व दास करण्यास कारणीभूत होणारा इतिहास, शूद्रातिशूद्रांवर धर्मग्रंथाद्वारे होणारा सामाजिक अन्याय अत्यंत कडवट भाषेत जोतीबांनी व्यक्त केला. निग्रो लोकांना अमेरिकन लोकांनी मुक्त केले. त्याचे उदाहरण जोतीबांनी आदर्श म्हणून उपयोगात आणले.

## सत्यशोधक समाजाची स्थापना

इंग्रजी राज्यात सर्व जातींना शिक्षण खुले झाले होते. म्हणून जोतीरावांप्रमाणेच शिकलेली सुज्ञ शूद्र पुढारी मंडळी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात जोतीरावांकडे जमली. परमविचारांती, **धर्म, कर्म, व्यवहार यात शूद्र नाडले जाऊ नयेत म्हणून सत्यशोधक समाजाची स्थापना त्यांनी जाहीरपणे केली.** त्याच्या अगोदर इ. स. १८६७ मध्ये मुंबईला व इ. स. १८७० मध्ये पुण्याला प्रार्थना समाज स्थापन केला होता. साधारणतः त्याच धर्तीवर पण शूद्रांच्या खास उद्धारार्थ सत्यशोधक समाजाची स्वतंत्र संघटना करण्यात आली. हा समाज स्थापन झाल्यावर सभासदांसाठी पुढील प्रमुख नियम संमत करण्यात आले व घटना केली गेली-

१. मी निर्मिकाशिवाय इतर कशाचीही पूजा करणार नाही.

२. मी निर्मिकाने दिलेल्या शुद्ध मानवी अधिकारांना धक्का लावणार नाही. दुसरे आपल्यापेक्षा नीच आहेत असे ज्या ग्रंथातून नमूद केले आहे, अशा धर्मग्रंथांना मानणार नाही व जे धर्मग्रंथाधारे दुसऱ्यांना नीच समजतात त्यांना मी सन्माननीय समजणार नाही.

३. जनावरांना मारण्यात मी सहभागी होणार नाही. दारूच्या व्यसनापासून अलिप्त राहण्याचा यशस्वी प्रयत्न करीन.

४. सत्याला निश्चयाने मान देईन, वृद्ध, लंगडे व समाजातील बालके यांना मदत करीन; मनुष्याचे अधिकार समजावेत म्हणून मुलामुलींना पुरेसे शिक्षण देईन.

५. समाजाचा खर्च चालावा म्हणून मी माझ्या उत्पन्नातून वर्गणी देईन.

६. समाजाचा कारभार चालण्यासाठी लोकशाही पद्धतीचे कार्यकारी मंडळ निवडण्यात येईल. बहुमताने निर्णय घेण्यात येतील. वर्षातून चार वेळा सर्वसाधारण सभा भरेल. (१८७५ मधील रिपोर्टाच्या आधारे)

## सभासदांची कर्तव्ये

सभासदांनी सत्याचा प्रसार व सद्‌विचार लोकांमध्ये वाढवावेत. मानवी हक्क व कर्तव्ये यांचा प्रचार वृत्तपत्रे व व्याख्याने यांच्याद्वारे करावा. विद्याप्रसाराद्वारे हे सर्व साधावयाचे ठरवले. दुर्गुण व अनिष्ट चालीरिती नाहीशा कराव्यात. तुकाराम तात्या पडवळ यांचे

जातिभेद खंडणपर 'जातिभेद विवेकसार' व परमहंस सभेचे दादोबा पांडुरंगकृत 'धर्मदर्शक' आणि खुद्द जोतीराव फुले यांची पुस्तके मार्गदर्शक व्हावीत म्हणून त्यांचा प्रसार करण्यात आला. सुधारलेली शेतीपद्धत स्वीकारावी म्हणूनही उद्देशात एक कलम आढळते.

इ. स. १८७५-७६ पासून दर रविवारी प्रार्थना सभा व पंधरा दिवसांतून एक व्याख्यान करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. गरीब विद्यार्थ्यांना विद्यावेतने, गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे, निबंधांना प्रोत्साहन, वक्तृत्ववृद्धी वगैरे ज्ञानवृद्धीकारक उपायांचा उवलंब करण्यात आला. पुण्यात येऊन राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याजेवणाची सोय व्हावी म्हणून पुढे कै. कृष्णराव पां. भालेकर यांनी 'सुशिक्षणगृह' काढले. इ. स. १८७७ मध्ये 'दीनबंधू' नामक वृत्तपत्र सुरू केले. पुढे इ. स. १८८१ ते १८९७ पर्यंत कै. नारायणराव लोखंडे यांनी अत्यंत तडफेने व अनेक कर्तबगार समाजबंधूंच्या साहाय्याने 'दीनबंधू'चे संपादन केले. पुढे कामगारांचे मुखपत्र म्हणून रूपांतर होऊन या पत्राने गिरणी मजुरांची स्थिती सुधारण्याचा पहिला प्रयत्न केला. लोखंडे यांनी 'मिलहँड असोसिएशन' स्थापिली व फॅक्टरी कमिशनपुढे कामगारांची बाजू मांडून त्यांना प्राथमिक सवलती मिळवून दिल्या. शेतकऱ्यांना जंगल अधिकाऱ्यांपासून उपद्रव होत असे, तो दूर केला. विद्येत मागासलेल्या विद्यार्थ्यांकरिता सवलती मिळवून दिल्या. दुष्काळाने व कर्जामुळे हैराण झालेल्या शेतकऱ्यांची दुःखे सरकारपुढे मांडण्यासाठी जोतीरावांनी 'दीनबंधू' पत्रातून 'आसूडाचे निबंध' प्रसिद्ध केले. विद्येत मागासलेल्या विद्यार्थ्यांकरिता सवलती मिळवून दिल्या. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून 'डेक्कन ॲग्रीकल्चर रिलीफ ॲक्ट' करण्यात आला. सक्तीचे शिक्षण व्हावे म्हणून चळवळ चालू केली. या संबंधाने स्वतः जोतीरावांनी हंटर कमिशनपुढे महत्त्वाचे निवेदन सादर केले. कै. भालेकर यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी म्हणून 'दीनबंधू सार्वजनिक सभा' निर्माण केली.

मूळ सत्यशोधक समाजाने राजकारण वर्ज्य मानले होते, तरी पुढे इंग्रज सरकारशी सहकार्य करूनच आपला उद्धार होईल, अशा भावनेने विद्येत मागासलेल्यांच्या सभा-परिषदांतून राजनिष्ठेचा ठराव केला जाई. प्रथम नेमस्त समाजसुधारकांनीही या चळवळींना पाठिंबा दिला.

## सार्वजनिक सत्यधर्माचे नियम

सत्यशोधक समाजाच्या शाखा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी चालू झाल्या व मनुष्यबळही मोठे उभे राहिले. प्रारंभी पुणे सत्यशोधक समाज ही एक विद्याप्रसारक मंडळी होती. पण उत्तरोत्तर त्याचे चळवळीत रूपांतर झाले. इ. स. १८७३ ते १९३० पर्यंत या चळवळींचा इंग्रजी आमदानीत घडलेला इतिहास हा विस्तृत आहे. यातून फक्त सत्यशोधक मूलभूत

विचारसरणीचे येथे दर्शन द्यावयाचे आहे. हे दर्शन महात्मा फुले यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकातून मिळू शकते. सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे, यासंबंधी ३३ नियम सांगितले आहेत. ते शाश्वत आहेत.

मूळ सत्यशोधक समाज निर्मिक, एक धर्म, एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला. सर्वच धर्माच्या धर्मग्रंथातून सर्वांशी प्रमाण मानण्याजोगा भाग नसल्याने सत्यशोधक समाज ग्रंथाचे प्रामाण्य मानीत नाही. अवतारवाद, विभूतिपूजा व मूर्तिपूजा त्याला मान्य नाही. नामस्मरणाचा भक्तिमार्ग त्याला पसंत नाही. भागवतधर्म व त्याचे शुद्ध स्वरूप पत्करणाऱ्या प्रार्थना समाजाप्रमाणे तो परमार्थवादी राहिला नाही. परलोक व ईश्वराची साक्षात भेटही त्याला मंजूर नाही. त्याचे स्वरूप जास्तीत जास्त इहवादी, सामाजिक आहे. स्त्री-पुरुष, मुलगा-मुलगी यात पक्षपात करू नये; एवढेच नव्हे तर पुरुषापेक्षा स्त्री श्रेष्ठ, असे जोतीरावांनी प्रतिपादन केले. सर्वांना सारखा धर्म व कायदा आणि नीती असावी. मनुष्येतर जीवांना माणसाएवढी बुद्धी नाही. मनुष्याने या प्राप्तबुद्धीच्या आधारे सदसद्विवेक करून सदाचाराने वागावे. स्वर्ग व दैववाद खरा नाही. आकाशातील ग्रहांची पीडा होते हे खरे नाही. धर्म व राज्यभेद मनुष्यात नसावेत, असा मानवतावाद जोतीरावांनी सर्व मनुष्यजातीच्या हितास्तव मांडला. त्यांना वेगळा धर्म किंवा आणखी एक नवा संप्रदाय, पंथ स्थापन करावया नव्हता. त्यांचा रोख धर्मग्रंथातील विषमतेवर व पक्षपातावर होता. **म्हणून सत्य काय आहे व असत्य ते कोणते हे शोधण्यासाठी 'सत्यशोधक' हे व्यापक नाव पत्कारले. त्याने भोळाभाव नाहीसा करून विज्ञानात्मक दृष्टिकोन स्वीकारावा, हे ध्येय होते.** इ. स. १९०० पर्यंत समाजाचे अध्यक्ष विश्राम रामजी घोले होते. मध्यंतरी आठ-दहा वर्षे  कृष्णराव भालेकर प्रभृती अनेकांनी प्रचारकार्य चालू ठेवले. दुसऱ्या पिढीत भास्करराव जाधव,  प्रो. डोंगरे, अ. बा. लट्ठे या विद्वान पदवीधर मंडळींनी समाजाची धुरा वाहिली.  मुकुंदराव पाटील यांच्या 'दीनमित्र' साप्ताहिकाने उत्तम कामगिरी बजावली.

### सत्यशोधक समाजाचे नवे धोरण

मोर्ले-मिंटो राजकीय सुधारणांचा पहिला हप्ता मिळण्याच्या समयाला विद्येत मागासलेल्या बहुजन समाजात पुनः जागृती निर्माण झाली. यावेळी इ. स. १९११, मध्ये विस्कळीत झालेला सत्यशोधक समाज संघटित करण्याच्या दृष्टीने मुंबई येथील सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष कै. रामय्या अय्यावारु यांच्या अध्यक्षेतेखाली त्या वेळचे कार्यकारी सत्यशोधक नेते रा. ब. भास्करराव जाधव व त्यांच्या मित्रांनी पुण्याला सत्यशोधक परिषदेचे पहिले अधिवेशन भरवले. परिषदेत पुढीलप्रमाणे तत्त्वे, प्रतिज्ञा व ध्येय धोरण निश्चित करण्यात आले -

(१) सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत; व देव त्यांचा आईबाप आहे.

(२) आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थांची जरुरी नसते, त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित अगर गुरू यांची जरुरी नाही.

(३) वरील तत्त्व कबूल असल्यास कोणासही सभासद होता येते. प्रतिज्ञेत 'मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन. मी नेहमी राजनिष्ठेने वागेन', अशी वाक्ये घातली गेली. जोतीरावप्रणित 'गुलामगिरी' या पुस्तकाची प्रस्तावना म्हणजे पहिला मॅनिफेस्टो (जाहीरनामा) होता. जोतीबा फुले यांच्या इ. स. १८७३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'गुलामगिरी' पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढण्याची गरज भासली, तरी जोतीरावांची सर्व विधाने खरीच आहेत असा मिथ्याग्रह धरण्यात आला नाही. काळानुरूप पुढील अनेक सत्यशोधक परिषदांच्या अधिवेशनातून स्वतंत्र विचार घेण्यात आले. उदाहरणार्थ, इ. स. १९१६ नंतर 'जागरूक' या पत्राचे संपादक व सर्वत्र हिरीरीने प्रचार करणारे कै. वा. रा. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली इ. स. १९१८ मध्ये सत्यशोधक परिषद झाली. या परिषदेत मान्य झालेली तत्त्वे पुढीलप्रमाणे होती :

१. देव आणि भक्त यांच्या दरम्यान मध्यस्थानी जरुरी नाही. देवापर्यंत स्वंतत्रपणे पोहोचण्याचा प्रत्येक भक्ताला, मग तो कोणत्याही जातीचा असो - हक्क आहे. २. मनुष्याची योग्यता त्याच्या गुणावरून ठरवावी. जन्माशी त्या योग्यतेचा संबंध असता कामा नये. केवळ जन्मामुळे काहींना अस्पृश्य समजण्याची रूढी सत्यशोधकांना मान्य नाही. ३. सर्व प्रकारची विद्या संपादन करण्याचा सर्वांना हक्क आहे आणि ती सर्वांनी संपादन केली पाहिजे. त्याशिवाय सामाजिक विषमता नाहीशी होणार नाही. पुढे कै. विचारे गुरुजी यांनी 'सत्यशोधक विद्यार्थी संघ' चालवून अभ्यासू कार्यकर्ते तयार केले.

इ. स. १९१९ ते १९३० पर्यंत सत्यशोधक समाजाची चळवळ सर्वत्र गाजली. तिला विरोधही झाला. 'धर्मांतर न करता स्वधर्मात राहूनच धर्म व समाजसुधारणा करावी व ख्रिस्ती मिशनरीप्रमाणे शिक्षणातही समाजकल्याणात्मक कार्ये स्वावलंबनाने करावीत' हा निर्णय जोतीबा, त्यांचे मित्र वाळवेकर मोरोबा, यशवंत परांजपे वगैरेंनी घेतला होता. परंतु (आर्य समाजाप्रमाणे) त्याला मोठे यश आले नाही. दृढ संस्था व स्थिर शाखा स्थिरावल्या नाहीत. सत्यशोधक समाजाची चळवळ व ब्राह्मणेतर चळवळ यात विग्रह करून लिहिणे व बोलणे अत्यंत कठीण बाब ठरते. नंतरच्या काळात या दोन्हींची सरमिसळ होऊन अंतर्गत भिन्न प्रवाह वाहू लागले.

**चळवळीला राजकीय पक्षाचे स्वरूप**

पहिल्या महायुद्धानंतर मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा जाहीर झाल्या. त्याबरोबर सत्यशोधक चळवळीला ब्राह्मणेतर राजकीय पक्षाचे नवे स्वरूप मुंबई, मध्यप्रांत वऱ्हाड व मद्रास या इलाख्यातून येऊ लागले. या ब्राह्मणेतर पक्षाचे धुरिणत्व कोल्हापूरच्या शाहूमहाराजांनी केले. मुंबई कौन्सिलमध्ये सात जागा राखीव मिळवल्या. ब्राह्मण उमेदवारांना मते न देता ब्राह्मणेतर उमेदवारांना मते द्यावीत असा प्रचार व मोठा आग्रह सत्यशोधकांनी केला. इ. स. १९३० नंतर ब्राह्मणेतर पक्ष स्वातंत्र्य संपादनार्थ कॉंग्रेसमध्ये घुसला. पण लायक ब्राह्मणांनाही मते द्यावयाची नाहीत ही सत्यशोधक विचारांची जातीय छाप सर्वसामान्य मतदारांवर कायम राहिली. सत्यशोधक समाजाचे मूळ स्वरूप लोपून जाती-जातींच्या शिक्षण परिषदा व शिक्षण प्रसारक फंड, तसेच वसतिगृहे निघाली. त्यामुळे शिक्षणप्रसार वाढला. पण सत्यशोधक समाजाची तात्त्विक वाढ लोपली. सत्तासंपादन व नोकऱ्यातील प्रमाण वाढले. मागे पेशवाईत व अव्वल इंग्रजीत ब्राह्मणांचे जे महत्त्व होते ते राजकारणात राहिले नाही. भोळाभाव टाकणे, दारू वगैरे व्यसनापासून निवृत्ती, लग्नादी कार्यात कमी खर्च करणे वगैरे आत्मोद्धारक भाग मागे पडला व सर्वच चळवळीत ब्रह्मद्वेष व ब्राह्मणांना वगळण्याची प्रवृत्ती वाढली. पुढे स्वातंत्र्यानंतर ही वृत्ती भूमिगत होऊन मनात लपली. पण ती प्रत्यक्ष कार्यप्रवण राहिली आहे. **सत्तावाद बळावल्यामुळे जोतीरावांचा व्यापक ध्येयवाद उपेक्षित राहिला.** जातिभेद मोडणे, दलितोद्धार वगैरे मूलभूत धर्म सुधारणा व समाज सुधारणा पाठीमागे पडल्या. जास्तीत जास्त लोक धर्मभोळेच राहिले. इ. स. १९१८ मध्ये काले (जि. सातारा) येथे कै. केशवराव बागडे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक परिषद भरली व हिच्यातून कर्मवीर भाऊरावांची ‘रयत शिक्षण संस्था’ स्थापन होऊन पुढे वाढली. खेड्यापाड्यांपर्यंत जाऊन पोहोचली सत्यशोधक समाजाची ही पहिली चळवळ. तिला शिक्षण प्रसाराच्या क्षेत्रात लक्षात येण्याजोगे मोठे यश आले.

शूद्रातिशूद्रांची चळवळ म्हणून जोतीरावांनी सत्यशोधक चळवळीला संबोधले होते. पण त्या चळवळीतील सत्य, समता, समान हक्क, समान कायदा व धर्म  एकेश्वरवाद, स्वावलंबन, समानसंधी, बुद्धिवाद, सामाजिक न्याय वगैरे मानवी मूल्ये पुढे टिकून उत्कटतेने रुजली नाहीत. तसेच, अतिशूद्रांच्या दृष्टीने दलितोद्धार हा सत्यशोधक चळवळीने संघटनेचा आपला प्रमुख कार्यक्रम केला नाही. म्हणून डॉ. आंबेडकर यांनी अतिशूद्रांची चळवळ पुढे स्वतंत्र करून विग्रह घेतला. **फक्त महात्मा फुले यांना त्यांनी गुरू केल्याने जोतीरावांचे महत्त्व दलित जनता मानते इतकेच.**

## मूल्यमापन

जोतीरावांनी अस्पृश्योद्धारक चळवळीला जन्म दिला. पण ते स्वतः व पुढील सत्यशोधक समाजाची चळवळ यात अंतर पडत गेले. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्राह्मणेतर, बहुजनसमाज या नावाखाली चाललेल्या इंग्रजधार्जिण्या वृत्तीच्या चळवळीचा, स्वराज्यार्थ चाललेल्या चळवळी रोखण्याच्या कामी परकीय सरकारने उपयोग करून घेतला. त्या काळात सत्यशोधक जलशांद्वारे फार प्रचार झाला व चळवळ दृश्य झाली. कित्येक अनिष्ट प्रकारही घडले. सर्व चळवळच व्यंगपुराणात्मक होती. प्रौढ व चांगल्या, प्रसन्न वाङ्मयाची या चळवळीला जोड मिळाली नाही. त्यागी व पात्र नेतृत्वही  फारसे लाभले नाही. आता सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ व तिच्यातील 'राव भट' चळवळ वेदोक्त प्रकरणे, क्षात्रजगत्गुरू पीठ, वगैरे सारे प्रवाह इतिहासभूत झाले आहेत. बहुजनसमाज स्वतः मात्र परंपरावादी स्वभावाचा राहिल्यामुळे प्रबोधन व परिवर्तन हे रूढीप्रियतेमुळे पराभूत झाले.

(भारतीय समाजविज्ञान कोश, पुणे खंड-४, पाने ४५० ते ५३)

******

# १२ ब्राह्मणेतर चळवळ

## चळवळीची सामाजिक पार्श्वभूमी

आधुनिक ब्राह्मणेतर चळवळीचा उगम म. जोतीराव फुले व त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून झाला. उत्तर पेशवाईत 'शूद्रातिशूद्र' समाजावरील निर्बंध वाढले. कायस्थ प्रभू व मराठे यांना 'वेदोक्त' नाकारले गेले. अव्वल इंग्रजीत ब्राह्मणेतरांना सामाजिक स्वातंत्र्याचा व सार्वजनिक शिक्षणाचा लाभ प्रथमच झाला. अस्मिता जागृत झाली. स्वाभिमान निर्माण झाला व ब्राह्मणेतर वर्गाने ब्राह्मणांच्या सर्वांगीण वर्चस्वाविरुद्ध उठाव, बंड केले. हे अटळ होते.

निरक्षर मोठा असलेला शेतकरी समाज दुष्काळ, रोगराई व अवजड शेतसारा यामुळे जेरीस आला होता. शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जापायी सावकारांच्या घशात जाऊ लागल्या. शेतकऱ्यांनी सावकाराविरुद्ध चळवळ उभारून इ. स. १८७५ मध्ये दंगे केले. याचा परिणाम म्हणून 'डेक्कन ॲग्रीकल्चरल रिलिफ ॲक्ट' पुढे इ. स. १८८४ मध्ये मंजूर करावा लागला. जोतीरावांच्या आसूडाच्या निबंधामुळे मनस्वी जागृती झाली.

इंग्रज सरकारशी सहकार्याने वागून आपली सामाजिक प्रगती करता येईल, असा विश्वास ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी इ. स. १९३० पर्यंत बाळगला होता. 'सार्वजनिक सभा' व पुढील 'राष्ट्रीय सभा' वगैरे उच्चभ्रूंच्या उपक्रमांपासून दूर राहून ब्राह्मणेतर चळवळ चालू राहिली. सत्यशोधक समाज व पुढील 'ब्राह्मणेतर' या संज्ञेखाली झालेल्या विविध चळवळी सर्वथा भिन्न मानणे कठीण आहे. संस्थापक महात्मा फुले व संवर्धक शाहू महाराज यांच्या कार्याचे स्वरूप पाहता हे समजून येते. इतर जे ब्राह्मणेतर नेते व पुढारी होते ते सत्यशोधक समाजाशी संबंधित असत. प्रथमतः ही चळवळ सामाजिक व धार्मिक समानता व स्वातंत्र्य तसेच समान हक्क व संधी प्राप्त करून घेण्यासाठी निर्माण झाली. जोशी वगैरे मध्यस्थ यांची गरज न ठेवता स्वकीय पुरोहितांकडून गृह्यविधी करण्याचे स्वातंत्र्य या चळवळीने पादाक्रांत केले. जोशी मंडळींना दक्षिणा वगैरे घेण्याचा कायदेशीर अधिकार नाही, असा निवाडा इ. स. १८९० मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या अपिलात म. फुले व सत्यशोधक समाज यांनी मिळवला. पुढे इ. स. १९२६ मध्ये 'जोशी बिल' मुंबई कौन्सिलमध्ये मंजूर झाले व दक्षिणेचा कायदेशीर हक्काचा शेवट झाला.

इ. स. १८७७ मध्ये विद्येत मागासलेल्या वर्गाच्या मागण्या, उणिवा व स्वतंत्र्य जाणिवा व्यक्त करण्यासाठी 'दीनबंधू' नामक साप्ताहिक निघाले. कृष्णराव भालेकर यांनी शेतकऱ्यांची बाजू आमरण मांडली. नारायणराव लोखंडे यांनी वरील साप्ताहिकाद्वारे मुंबईमधील कामगारांची बाजू मांडली व स्वतंत्र कामगार चळवळीचा जन्म झाला. त्यांना काही प्राथमिक महत्त्वाच्या सवलती मिळवून दिल्या. सरकारी राखीव जंगलात गुरे चरण्यासाठी शेतकऱ्यांना परवानगी मिळून दिली. मराठा व तत्सम विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळवून दिल्या. सी. के. बोले वगैरेंनी ही कामगार चळवळ मुंबईतही चालू ठेवली होती. त्यांनी कामगारांच्या एका मोठ्या सभेत शाहू महाराजांचे व्याख्यान इ. स. १९१८ मध्ये आयोजित केले होते. कामगारांची बाजू शाहू महाराजांनी हिरीरीने मांडली व भांडवलशाहीचे दुष्परिणाम सांगितले. दिनकरराव जवळकर यांनी इ. स. १९२७ नंतर मुंबईला कामगारांसाठी 'कैवारी' पत्र चालवले. पण याही चळवळीचा पवित्रा आरंभी इंग्रज सरकारशी 'राजनिष्ठ' राहण्याचा होता.

तथापि, ब्राह्मणेतर चळवळ सर्वांगीण मार्गाने चालली होती. भालेकर यांनी 'दीनबंधू सार्वजनिक सभा' (इ. स. १८८४) स्थापन केली. तिच्यामार्फत शेतकऱ्यांच्या मागण्या व दुःखे सरकारपुढे व राष्ट्रीय सभेपुढे देखील मांडण्यात आली. सत्यशोधक समाजाप्रमाणे ही सभा धर्मप्रकरणी विचार करीत नसे. या चळवळीला 'ब्राह्मणेतर' ही संज्ञा इ. स. १९१५ नंतर प्राप्त झाली. इ. स. १८८० नंतर 'मराठा' हा शब्द हरिजन व ब्राह्मण यांना सोडून जो त्या काळातील विद्येत मागासलेला वर्ग होता, त्या वर्गाला वापरला जाऊ लागला. जोतीबांनी 'शूद्रातिशूद्र' ही दलितांसह ब्राह्मणेतरांसाठी योजलेली संज्ञा मागे पडली. चळवळीला उत्तरोत्तर विद्याप्रसारक स्वरूप येऊ लागले. पुण्याला 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन' व मुंबईला 'मराठा एकेच्छू सभा' स्थापन होऊन गरीब मराठा व तत्सम विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याचा उपक्रम सुरू झाला. यानंतर इतर तत्सम जाति-जमातींनी त्यांच्या शिक्षण परिषदा भरवण्यास सुरुवात केली.

### वेदोक्त प्रकरणाचा परिणाम

आपण शूद्र नाही, क्षत्रिय आहोत अशी जागृती मराठा व तत्सम लोकांमध्ये होऊ लागली. क्षत्रियत्व सिद्ध व्हावे म्हणून वेदोक्त पद्धतीचे प्रकरण झाले. नंतर कोल्हापूरला शाहू महाराजांच्या काळातील 'वेदोक्त प्रकरण' (इ. स. १९०१ ते १९०६) फार गाजले. दोन्ही पक्ष हट्टाला पेटले व शाहू महाराजांनी राजोपाध्यांची इनामे जप्त केली.

मध्यंतरी इ. स. १९०२ मध्ये शाहू महाराज विलायतेला जाऊन आले. उत्तरोत्तर लो. टिळक व शाहू महाराज यांच्यातील अंतर वाढू लागले. या काळात सारा महाराष्ट्र ढवळून निघाला. पुष्कळांच्या मते, या वेदोक्त प्रकरणामुळे शाहू महाराजांचे लक्ष मागे पडलेल्या सत्यशोधक चळवळीकडे वेधले गेले.

## शाहू महाराजांचे नेतृत्व

इ. स. १९१० मध्ये मोर्ले मिंटो सुधारणा झाल्या व राजकीय जागृती वाढू लागली. इ. स. १९११ मध्ये पुण्याला सत्यशोधक समाज परिषदेचे पहिले मोठे अधिवेशन झाले. या अधिवेशनात ब्राह्मणांवर बहिष्कार टाकण्याचा ठराव झाला. ही चळवळ ब्राह्मणेतरांना हवी होती म्हणून होऊन गेली. ब्राह्मणेतरांनी ब्राह्मण उमेदवाराला मत देऊ नये, अशा राजकीय प्रचाराला प्रारंभ झाला. हा प्रभाव अजूनही कायम आहे. प्रतिवर्षी सत्यशोधक समाजाची अधिवेशने महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी होऊ लागली. या अगोदर इ. स. १९०६ मध्ये अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद स्थापन होऊन तिची मोठमोठी अधिवेशने भरू लागली. शाहू महाराज हे ब्राह्मणेतरांच्या शैक्षणिक व राजकीय एवढेच नव्हे, तर सामाजिक, धार्मिक चळवळीचे प्रमुख आश्रयदाते (पेट्रन) होऊ लागले. सत्ता व मत्ता वगैरे सर्व मूठभर ब्राह्मणांच्या हाती कोल्हापूर संस्थानात व इतर सर्व खालसा मुलखात आहे, असे त्यांना प्रत्यक्ष आढळून आले. स्वराज्य मिळाले, तर पुन्हा पेशवाई येईल अशी भीती त्यांना व ब्राह्मणेतरांना वाटू लागली. पहिल्या महायुद्धानंतर मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा दुसरा हप्ता देण्याची वेळ आली. या काळात ब्राह्मणेतर समाजातील जागृती भूमिती श्रेणीने वाढू लागली. त्याचे जास्तीत जास्त श्रेय शाहू महाराजांकडे जाते. शाहू महाराजांचे उदाहरण पाहून इतर मराठा संस्थानिकांनी मराठा व तत्सम वर्गाच्या शिक्षण प्रसाराच्या कामी सक्रिय लक्ष घातले. सयाजीराव गायकवाड त्यात अगोदरपासूनच सहभागी होते.

शाहू महाराजांच्या नेतृत्वामुळे इंग्रज सरकारला पहिल्या महायुद्धात मराठा समाजाने विशेष साहाय्य केले. मराठा पलटणीने पराक्रम गाजवले. यामुळे इंग्रजांची सहानुभूती प्राप्त झाली. याचा फायदा मुत्सद्दी शाहू महाराजांनी घेण्याचे ठरवले. इ. स. १९१७ मध्ये 'ऑल इंडिया मराठा लीग' स्थापन करण्यात आली. भा. वि. जाधव यांना या लीगची मांडणी मांडण्यासाठी विलायतेला पाठवण्यात आले, मराठा व तत्सम जातींसाठी सात राखीव जागा मिळवण्यात यश मिळाले. स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मात्र अमान्य करण्यात आली.

शाहू महाराजांनी या काळात ब्राह्मणेतरांमधील सुशिक्षितांना जवळ केले. पूर्वी सर्वसामान्य अर्धशिक्षित असे कार्यकर्ते थोडीफार चळवळ करीत. जाधवराव, लठ्ठे, डोंगरे, कोठारी वगैरे पदवीधरांद्वारे शाहू महाराजांनी आमरण ब्राह्मणेतर चळवळीचे यशस्वीपणे नेतृत्व केले. केसरी

वगैरे ‘राष्ट्रवीर’, ‘जागरूक’, ‘दीनमित्र’, ‘जागृती’ यांसारखी सात वृत्तपत्रे शाहू महाराजांच्या दातृत्वाखाली सुरू झाली.

**ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना**

सत्तेवर येण्यासाठी इ. स. १९२० नंतर ‘ब्राह्मणेतर पक्ष’ मुंबई इलाख्यात स्थापन झाला. हा पक्ष इ. स. १९३५ पर्यंत कार्यरत होता. कमीत कमी पंधरा जागा तरी हा पक्ष पटकावत असे. इ. स. १९२३ पासून ना. जाधवराव, ना. एस. टी. कांबळी आदी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना दिवाणगिरीदेखील मिळाली. रावसाहेब, रावबहाद्दूर वगैरे सरकारी किताब मिळाले. जिल्हा लोकल बोर्डस् ब्राह्मणेतरांच्या ताब्यात गेली. जाधव, लठ्ठे बागडे वगैरे वरिष्ठ कौन्सिलमध्ये निवडून आले. पूर्वी ब्राह्मणेतरांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रातिनिधिक संस्थांमध्ये स्थान नव्हते, ते मिळवले गेले. तथापि राष्ट्रीय पक्षाप्रमाणे ब्राह्मणेतरांना सरकारी बिलांना विरोध करणे कठीण होते. मुलामुलींना सक्तीचे शिक्षण व्हावे म्हणून या पक्षाचे कौन्सिलमध्ये व बाहेरही चळवळ केली. सरकारची आर्थिक क्षमता नसल्याने सक्तीचे शिक्षण झाले नाही. ब्राह्मणेतरांचा नोकरीत प्रवेश व्हावा, या उद्देशाला उत्तरोत्तर यश मिळत गेले व प्रमाणही ठरवण्यात आले. सार्वजनिक शाळा, विहिरी, पाणवठे येथे अस्पृश्यता पाळली जाऊ नये, असा निर्णय मुंबई कौन्सिलमध्ये घेण्यात आला. प्राथमिक शिक्षणाचा ताबा नगरपालिका व स्कूल ऑफ बोर्डस् यांच्याकडे देण्यात आल्यावर खेड्यापाड्यांतून निवडून आलेल्या प्रतिनिधींना ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण वाढवता आले. संमतीवयाचे बिल, बालविवाह प्रतिबंधक कायदा यांना ब्राह्मणेतरांनी पाठिंबा दिला.

विशेषतः मुंबई इलाख्यात चाललेली चळवळ मध्य प्रांत व वऱ्हाड, नागपूर व कर्नाटकातही पसरली. मद्रास इलाख्यात इ. स. १९१७ नंतर ‘जस्टीस पार्टी’ या नावाने ही चळवळ जोमाने पसरली. वृत्तपत्रे तामीळ, तेलगू व इंग्रजी भाषेत निघू लागली. डॉ. टी. एम. नायर, सर त्यागराज चेट्टी, रामस्वामी मुदलियार वगैरे नामवंत ब्राह्मणेतर मद्राशी पुढाऱ्यांशी शाहू महाराजांची व लठ्ठे-जाधवराव आदी मुंबई प्रांतिक पुढाऱ्यांची परस्परांची जानपहचान होती. शाहू महाराजांनी सिडनहॅम व नंतर लॉर्ड विलिंग्डन या गव्हर्नरांशी मैत्री संपादन करून त्यांचा उपयोग करून घेतला. शाहू महाराजांप्रमाणे मद्रासच्या ब्राह्मणेतर चळवळीला पानगलच्या संस्थानिकांचे नेतृत्व लाभले. जस्टीस पार्टीमधून द्रविड कळघम् द्रविड मुनित्र कळघम् व अण्णा द्रविड मुनित्र कळघम् अशा वंशभेद व भाषाभेदावर आधारित चळवळी सुरू झाल्या आहेत. अण्णा दुराई, रामस्वामी नायकर, करुणानिधी, एम्. जी. रामचंदन् वगैरे नेते त्यांना लाभले.

## इंग्रजांनी उपयोग केला

शाहू महाराजांच्या पश्चात् 'जेधे-जवळकर' यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मणेतर चळवळ क्रिया-प्रतिक्रियेच्या स्वरूपात आठ-दहा वर्षे चालू राहिली. अर्थात ही चळवळ अखिल भारतीय नव्हती. जस्टीस पार्टीची परिणती द्रविडीस्थान मागण्यापर्यंत झाली, तशी महाराष्ट्रातील सत्यशोधकी ब्राह्मणेतर चळवळीची परिणती मुळीच झाली नाही. मध्य प्रांतात पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी व डॉ. पंजाबराव देशमुख वगैरे ब्राह्मणेतरांनी चळवळ चालवली. निजामशाहीतही तिने प्रवेश केल्याचे उल्लेख मिळतात. स्वराज्यविषयक चळवळी रोखण्याच्या कामी इंग्रजांनी या चळवळीचा उपयोग करून घेतला.

पुढे स्वराज्याचे दोन हप्ते मिळाले. ते अपुरे आहेत व जनतेसाठी फारसे काही करता येत नाही. असा ब्राह्मणेतरांनादेखील अनुभव येऊ लागला इ. स. १९२८ मध्ये सायमन कमिशन आले. त्या वेळी त्यावर बहिष्कार टाकावा, असे मत ब्राह्मणेतरांतील राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांनी व्यक्त केले. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व भाऊराव पाटील वगैरे बहिष्काराच्या बाजूचे होते. कर्मवीर शिंदे तर पहिल्यापासूनच राष्ट्रीय वृत्तीचे होते. खुद्द डॉ. आंबेडकरांनी इ. स. १९२३ पर्यंत या पक्षाबरोबर काम केले. पण नंतर त्यांचे राजकारण स्वतंत्र झाले.

## स्वराज्य चळवळीत भाग

इ. स. १९२२ मध्ये शाहू महाराज वारले आणि १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. या दोन समकालीन शक्तींमध्ये दुर्दैवाने अंतर पडत गेल्याने ब्राह्मण-अब्राह्मण वाद धुमसत राहिला. इ. स. १९२९-३० नंतर म. गांधीजींचे असहकारी लढे सुरू झाले. अस्पृश्योद्धार इत्यादींबाबत गांधीजी पुरोगामी होते. गांधीजींनी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांना विश्वासात घेतले. असा प्रयत्न पूर्वी झाला नव्हता. ब्राह्मणेतर पक्षाने ठराव करून स्वराज्यविषयक चळवळीत उडी घेण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला. महर्षी शिंदे, जेधे, मोरे, बागडे, बागल वगैरे पुढारी सत्याग्रहात सामील होऊन तुरुंगातही गेले. खेड्यापाड्यांतील शेतकरी ग्रामीण समाजाने त्यांना मोठ्याप्रमाणावर साथ दिली.

ब्राह्मणेतर पक्ष म्हणजे स्वराज्यविरोधी सरकार सामील असा आक्षेप 'केसरी' घेत असे. नंतर या आक्षेपाचा अंत झाला. काँग्रेसमध्ये बहुजनसमाज घुसला व त्याने क्राँग्रेस व्यापली. हे घडल्यानंतर केसरी व तत्सम पक्ष काँग्रेसबाहेर पडला. इ. स. १९३५ नंतर 'ब्राह्मणेतर' ही संज्ञादेखील मागे पडली. या पक्षाचा उदय व विकास झाला. तशी अस्ताला जाण्यास कारणीभूत होणारी कारणेही घडली. मराठा समाजाचे पुढारी त्यांच्या समाजापुरते

पाहू लागले. त्यामुळे मराठेतर रुष्ट झाले. ब्राह्मणेतर पक्षाला 'शेतकरी पक्ष' म्हणावे अशा काही सूचना हा पक्ष वाचवण्याच्या दृष्टीनं आल्या. पण ब्राह्मणेतर पक्षाचे महाराष्ट्रातील प्रयोजनच संपल्यामुळे तो अस्ताला गेला. तरी शाहू महाराज व त्यांच्या ब्राह्मणेतर पक्षाने काले (जि. सातारा) येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेतून भाऊराव पाटील यांची 'रयत शिक्षण संस्था' उदयाला आली. तिने व इतर अनेक शिक्षण प्रसारक ब्राह्मणेतरांनी स्वावलंबनाने फार मोठ्याप्रमाणात शिक्षण प्रसार करण्यात यश मिळवले. स्वातंत्र्य मिळाल्यावर अर्थसाहाय्य उपलब्ध झाल्यामुळे वरील प्रयत्नात भूमिती श्रेणीने भर पडली. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात गुणदोष त्याबरोबर वाढले ती गोष्ट वेगळी.

शाहू महाराजांनंतर यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा समन्वयशील संघटक नेता बहुजन समाजाला मिळाला. पूर्वीप्रमाणे कटुता न वाढवता महाराष्ट्राची राजकीय सत्ता बहुजन समाजाच्या कब्जात गेली. सहकारी चळवळीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. जिल्हा परिषदांमुळे ग्रामीण नेतृत्व शाहू महाराजांच्या काळापेक्षा प्रभावी ठरत आहे.

(भारतीय समाज विज्ञान कोश, पुणे, खंड-३, पाने ३६८ ते ७१)

******

# १३ भारतातील धर्म व राजकारण

भारत हा देश प्राचीन काळापासून अध्यात्म आणि धर्मप्रधान म्हणून जगभर प्रसिद्ध आहे. एवढेच नव्हे तर येथील समाज रचनादेखील धर्माधिष्ठित आहे. जीवनाच्या अंगोपांगांशी धर्म निगडित होता व अद्याप आहे. धर्म म्हणजे धारणा करणारा असा मुलार्थ आहे; परंतु धर्माची व्याख्या एकच नसते. मोक्ष, अध्यात्म, उपासना-भक्ती व कर्मकांड वगैरे अनेक बाबींचा धर्मात समावेश होतो.

धर्माला तत्त्वज्ञानाचा आधार असतो व भारतात अतिप्राचीन काळापासून तत्त्वज्ञानावर मर्यादित व अमर्यादित असा विचार भारतात होत आला. एवढा मोठा व सूक्ष्म विचार इतर कोणत्याही देशात झाला नाही. वेद-वेदांत, सहाशास्त्रे ही मुख्यतः धर्माचा आधार म्हणून गणली जातात. सहा शास्त्रांपैकी चार शास्त्रे जडवादी आहेत. विज्ञानाचा विचार जो वाढत होता, त्याला अध्यात्मवादी धर्माने पुढे रोखले. जैन धर्म हा वेदपूर्व धर्म मानला जातो. तो ईश्वर-कर्ता मानत नाही. तरी आत्मा व पूर्वजन्म मानतो. सुबत्तेच्या काळात तत्त्वज्ञान व धर्म यांचा सतत विचार व संघर्ष होत असे. अर्थात तत्त्वज्ञानात अनेक पंथ निघाल्यामुळे पुढे धर्मभेदही वाढत गेले. ईश्वर व मनुष्य यांचा संबंध सांगणारी अद्वैत, द्वैत, विशिष्टा द्वैत वगैरे तत्त्वज्ञाने प्रतिपादणारे अनेक आचार्य झाले. पूर्वी मंत्रदृष्टे ऋषी अनेक झाले. भारताएवढा तत्त्वज्ञानाच्या वाढीविषयींचा व त्याच्यावर आधारलेला पंथोपंथांचा धर्मेतिहास दुसऱ्या कोणत्याही देशात नसावा.

प्रथमतः राजकारणाचा धर्माशी संबंध नव्हता. राजेशाही होती व राजधर्म म्हणून स्वतंत्र दर्शन होते. राजाची कर्तव्ये, प्रजेची कर्तव्ये (प्रजाधर्म, मातृपितृ कर्तव्ये, पत्नीधर्म वगैरे संबंधी आचार धर्म सांगितले आहेत. पतीधर्म, सेवकधर्म वगैरे वगैरेची कर्तव्ये विशद केली आहेत.) येथे धर्म म्हणजे कर्तव्य असा अर्थ घेतला आहे. यालाही ओलांडून जीव-जगत् व जगदीश ह्यावर विचार झाला व होत असतो.

जैनमत, बुद्धमत, भागवत वगैरे मोठी धर्ममते येथे विकास पावली. लहानसहान अनेक पंथ होते व यद्यपि आहेत. युरोपप्रमाणे येथे धर्म-पंथामधील संघर्ष फार मोठ्या प्रमाणात कधीच पेटला नव्हता. एकाच कुटुंबात अनेक मतांची माणसे एकत्र राहत. उपास्य व उपासना यामध्ये भेद असूनही एकाच गावात विविध पंथाचे लोक राहत. सहिष्णूता हा येथील

जीवनाचा प्राण होता व अजूनही बहुसंख्य हिंदूंचे जीवन सहिष्णुतेवर अवलंबून आहे. विविधतेत एकविधता पाहिली जाते.

**संस्कृतीची जडणघडण :**

आर्य येण्यापूर्वी येथे वेदपूर्व अशी संस्कृती नांदत होती. द्रविड वगैरे आर्येतर संस्कृती येथे होत्या. प्राकृत भाषा होत्या. आर्यांनी बहुसंख्य लोकांची बहुतेकपणे संस्कृती स्वीकारून आर्य त्या वेळच्या आर्येतरात अंतर्धान पावले. पुढे व आता वेगळे राहिलेच नाहीत. येथील संस्कृती बाहेरून येणारे आक्रमक व स्थानिक जनता यांचा मागेपुढे मिलाफ होऊन उत्तरोत्तर विकास पावली. मुस्लीम आक्रमक व ख्रिस्ती आक्रमक यांचा स्थानिक जनतेवर परिणाम होऊन संमिश्र संस्कृतीचा आजचा भारत तयार झाला. जैन-बुद्ध वगैरे इतर धर्म हिंदू धर्माने भारतात पचवले. म्हणजे एकमेकांचा परिणाम होऊन घेवाण-देवाण वृत्तीने येथील धर्म वाढला. उदा. गीतेवर जैनमत व बौद्धमताचा परिणाम सुप्तपणे आढळतोच. जैनांनी ‘रामायण’ तयार केले. महावीर व गौतम यांना परमेश्वर स्वरूप दिले. मुस्लीम व ख्रिस्ती या धार्मियांना स्थानिक हिंदू लोकांस स्वत:मध्ये पचवता आले नाही व अजूनही येत नाही. म्हणून येथील मुसलमानांची व ख्रिस्त्यांची राजकारणे भिन्न झाली व होत असतात. हा समन्वय झाला असता तर येथे एक नवे राष्ट्र निर्माण होऊन धर्माधिष्ठीत पृथक राजकारण निर्माण झाले नसते. शंकराचार्य हे मोठे समन्वयवादी झाले. त्यांनी हिंदूंना बौद्धमत पचावयास लावले. अलिकडील काळात राजा राममोहन राय झाले. त्यांनी भारतातील हिंदू-मुस्लीम-ख्रिस्ती असे तीन मोठे धर्म एकेश्वर धर्माच्या पायावर एक करण्याचा मोठा प्रयत्न केला. केशवचंद्र सेन, गांधी व विनोबा यांनीही पुढे समन्वयाच्या मार्गाने प्रयत्न केले, पण यश आले नाही. म्हणून मुस्लीम व ख्रिस्ती यांची पृथक राजकारणे चाललेली आढळतात. मागे कबीर, अकबर व अनेक साधुसंतांनी देशभर ‘रामरहीम’ एकच आहेत असा संदेश फैलावला, या सर्वश्रेष्ठ विवेकसंपन्न मूल्यांना यश आले नाही, म्हणून ‘आज धर्म व राजकारण’ या विषयावर सर्व प्रपंच देशभर चालू असतो. मुस्लिमांत व ख्रिस्त्यांतही उदार धार्मिक दृष्टिकोन वाढला नाही.

वास्तविक सर्व भारतीय संस्कृती एकच आहे. धर्मांतरित ख्रिस्ती व मुसलमान यांची मातृभू व पितृभू भारतच आहे. हे स्वतः पृथकवादी धर्माधिष्ठित राजकारणामुळे विसरतात. त्यांनी हे ऐक्य व ही एकता विसरू नये असा प्रयत्न शिक्षणातून व लोकशाहीमधून झाला नाही. या सर्वच धर्मातील पुरोहितशाही व धर्ममार्तंड स्वतःच्या स्वार्थासाठी विभक्तता जोपासतात व वाढवतात. यामुळे चालू लोकशाही राजकारणात धर्म आडवा येतो. पाकिस्तान

यामुळेच वेगळा झाला. शिख, तेलगू द्रविड वगैरे पृथक राज्ये मागतात. यामुळे येथे कित्येक धर्म देशाला शापभूत ठरत आहेत. म्हणजे अखंडत्वाला अनेक बाजूने धोका आहे, म्हणूनही 'धर्म व राजकारण' या विषयावर लिहिण्याचे प्रयोजन पडते. सर्वात धर्म ही अतिजुनाट व खोल अशी भावना आहे.

**जन्मप्राप्त धर्माधिष्ठित जातिभेद :**

वेदपूर्वकालापासून जरूर ते व्यवसाय करणारांच्या पुढे जन्मप्राप्त जाती झाल्या. पिढ्यान् पिढ्या जातींचा व्यवसाय करणारांच्या व्यावसायिक जाती झाल्या. अशा जातींमध्ये बेटी व्यवहार स्वजातींमध्येच करणे परवडू लागले व सोईचे वाटले. गलिच्छ व दुर्गंधीयुक्त पदार्थांच्या व्यवसायाशी ज्यांचा संबंध राहिला. त्यांना स्वच्छता व अस्वच्छता या भेदामुळे अस्पृश्य मानले जाऊ लागले. अस्पृश्यांतही अनेक व्यवसाय भेद असल्यामुळे, त्यांची जन्मप्राप्त एकच जाती नाही. फार काय आदिवासी, वन्यजमाती व गिरीजन यांमध्येही जातिभेद आहेत. धर्मांतरीत मुसलमान व धर्मांतरीत ख्रिस्ती या भारतीय (किंवा हिंदी) लोकांतदेखील मूळचे जातिभेद धर्मांतर केल्यामुळे जाऊ शकत नाहीत, आहेतच. बेटी व्यवहार खुला नसतो. गरीब व श्रीमंत भेद असे सर्वात आहेतच. आज भांडवलशाही अर्थव्यवस्था असल्यामुळे सर्वधर्मांत गरीब व दलित यांची संख्या वाढतच आहे. मूळच्या जातिभेदात वर्गभेदाची भर पडत आहे. अजूनही व्यवसाय स्वातंत्र्याच्या नव्या आधुनिक यंत्रयुगाच्या काळात भारतात पुष्कळ व्यवसाय जातीपरत्वे चालू आहेत. खेड्यापाड्यांत हे जास्ती दिसते. कायदे झाले तरी बलूते पद्धत व अस्पृश्यतेची जुनी रूढी खेड्यापाड्यांतून अस्तित्वात असलेली आढळते.

**अल्पसंख्यांकांचे पृथक राजकारण :**

येथील सर्वधर्मीय समाजांचा सामाजिक स्वभाव, जीवन आणि व्यवहार हा वरीलप्रमाणे जन्मप्राप्त जाती-जमातींच्या विघटित समाजरचनेवर अवलंबित असतो. पिढ्यान् पिढ्यांच्या धर्माच्या जाती झाल्या आहेत हे प्रत्यक्ष दिसते. येथील जातिभेद व धर्मभेद तसे पूर्णपणे वेगळे नाहीत. मुस्लीम व ख्रिस्ती भारतीय असूनही धर्मांतरीत झाल्यामुळे त्यांच्या पृथक पृथक जाती झाल्या आहेत. फार काय आंबेडकरांच्या महार समाजाने बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे पूर्वास्पृश्यांत व दलित म्हणवणारात बौद्ध दलित व हिंदू दलित असे नवे भेद पडले आहेत. धर्मांतर हा उपाय ठरला नाही. ख्रिस्ती व मुस्लीम यांच्या धर्मात बरेच साम्य असूनही ते एक होत नाहीत. त्यांच्यात पृथक जाती आहेत. जातवारी हा येथील समाजरचनेचा स्वभाव आहे, स्वभावाः दुरति क्रमः धर्म व जात ही सामाजिक व राजकीय विघटन करते. वरील सर्वांच्या जातिभेदाला

त्या त्या धर्माचा व धर्मग्रंथांचा आधार दिल्यामुळे घट्टपणा वाढला आहे. बायबलला प्रमाण मानणारांची ख्रिस्ती जात होते. कुराणाला मानणारांची मुस्लीम जात होते. याप्रमाणे जात व धर्म भिन्न राहत नाही. शिख जमातीचा धर्म व शिख जाती यात प्रत्यक्ष व्यवहारात अंतर राहत नाही.

जन्मतः काही जातिधर्माचे लोक अल्पसंख्य आहेत व कित्येक बहुसंख्याक आहेत. यावरून अल्पसंख्याक व बहुसंख्याक भेद तयार होतो. अल्पसंख्याकांचे जे राजकारण भारतात होत असते ते याप्रमाणे धर्मजातीशी निगडित राहते व अल्पसंख्य बहुजनांपासून स्वतःला वेगळे समजतात. वास्तविक बहुसंख्याकांमध्ये अल्पसंख्याकानी विलीन होऊन जावयास पाहिजे व बहुसंख्याकानी अल्पसंख्याकांना आपल्या पोटात घेतले पाहिजे. याप्रमाणे मिलाफ होऊ शकत नाही व अल्पसंख्याकाचे राजकारण मागण्या वगैरे स्वतंत्रपणे पुढे येतात. भारतामधील अल्पसंख्य मुसलमानांचे राजकारण फाळणीनंतरही वेगळे चालू असते. मुस्लीम लीग हा पक्ष स्वातंत्र्य आल्यावरही मुस्लीम धर्मियांचा व मुस्लीम जाती-जमातींचा आहे. 'धर्म व राजकारण' भिन्न व स्वतंत्रपणे भारतात का निर्माण होत नाही, याची एक मूलभूत मीमांसा वरीलप्रमाणे देता येते.

'जाती' ही केवळ सामाजिक रचनेचा घटक नाही. तिच्या पाठीमागे कर्मविपाक व धर्म, वाडवडिलार्जित परंपरा, रूढी या कल्पना आहेत. व्यवसाय बदलता, अस्पृश्यता नव्या दळणवळण काळानुसार गेली, तरी जात कायम राहते. जात हा चिवट प्रकार आहे. स्त्रीने मिश्र विवाह केला, तरी पुरुषाची 'जात' ही त्या स्त्रीला व संततीला प्राप्त होते. जात ही कशी जाईल ? व 'जी जाऊ शकते ती जात' अशी नवी व्याख्या प्रत्यक्षात कशी येईल हा भारतापुढील एक प्रधान प्रश्न आहे.

राजकारण व धर्म वेगवेगळा (निधर्मी धोरण यशस्वी व्हावयाचे झाल्यास) असतो. भारतात जात व धर्म यावर अधिष्ठित होणारे राजकीय पक्ष असतो. यांना कायद्याने बंदी असणे जरुरीचे राहील. अशा पक्षांच्या उमेदवाराला जातीय व धर्मिय दृष्टिकोनातून निवडणुकीत उभे राहण्यास बंदी असावी. तरच राजकीय तत्त्वावर व ध्येय धोरणांवर नव्याने भारत एकमुखी उभा राहील. यापुढे तरी राजकारणाचा व अर्थकारणाचा धर्मनिरपेक्ष विचार व आचार होणे क्रमप्राप्त राहिले पाहिजे. वास्तविक पाहता आता नव्या जगात माणसा माणसांचा संबंध जास्त आर्थिक झाला आहे. धर्माच्या प्रश्नापेक्षा गरिबीचा प्रश्न सार्वजनिक आहे. याची जाणीव वाढली पाहिजे.

**कायदा व धर्म :**

प्रत्येक धर्मातील धार्मिक कायद्यांना स्थान होते व आहे. मनुस्मृती - मिताक्षरी यांचा विचार इंग्रजी मुसलमानी राजवटीतदेखील न्यायदान देताना केला जाई. मुसलमानांना कुराणातील

आदेशाप्रमाणे न्याय दिला जाई, यद्यपि दिला जातो. येथील सर्व जातिधर्माचे लोक त्यांच्या त्यांच्या धर्माधिष्ठित कायद्यामध्ये राजकर्त्यांनी हात घातला, तर त्यांच्या कडून विलक्षण विरोध होत आला. अद्याप मुस्लीम बांधवांकडून होत असतो. म्हणून ब्रिटिश काळात धर्मात हात घालणार नाही, ज्याचे त्याचे धर्म-कायदे त्याला त्याला पाळण्याचे स्वातंत्र्य राहिले, असे आश्वासन देण्यात आले. समाजपरिवर्तनीय कायदे करू लागताच त्या त्या धर्मातील धर्मपंडित व धर्म मार्तंड विरोध करू लागतात.

हिंदू धर्मात धर्म व समाज सुधारणावादी चळवळी देशभर झाल्या व सती, पुनर्विवाह, अस्पृश्यता निवारण वगैरे सुधारणेला पोषक असे अनेक नवे नवे कायदे ब्रिटिश काळापासून पास झाले. परंतु मुस्लीम (व ख्रिस्ती) धर्मातून अशा परिवर्तनीय चळवळी झाल्या नाहीत व हिंदू धर्म सुधारक इतर धर्मांना सुधारण्याच्या राष्ट्रीय कार्यात समर्थ ठरले नाहीत. म्हणून धर्मांतरित मुस्लीम प्रतिगामी व पोथिबद्ध राहिले. भारतीय नवी घटना समतेवर आधारित झाली व या दृष्टीने सर्वांना सारखे कायदे करावयाचे झाल्यास येथील मुस्लीम धर्माचा फार अडथळा होत असतो. ख्रिस्तीधर्मीय तुलनेने उदार आहेत. यामुळे समान नागरी कायदा व कुटुंब नियोजन कायदा करता येत नाही. समान नागरी कायदा हा मुस्लीम स्त्रियांना फायदेशीर व हितकारक असूनही त्याची निर्मिती भारत सरकारला करता येणे दुरापास्त होत आहे. पुरोगामी व उदारमतवादी राष्ट्रीय मुस्लीम बांधवांची संख्या जस जशी वाढत जाईल, तस तसा हा विरोध नाहीसा होईल. धर्मांतरीत जनता भारतात आता कमी नाही आणि ती भारतातच राहणार म्हणून त्यांच्याकडे सर्व हिंदू जनांनी आपले देश बांधव म्हणूनच अटळपणे पाहिले पाहिजे.

भारतात 'समान धर्म' अस्तित्वात नाही. त्यामुळे समान कायदे करणे अवघड जाते. प्रत्येक धर्मात 'सम' धर्माची चळवळ जरूर आहे. 'समधर्म' म्हणजे ज्यात विषमता नाही, असा समान धर्म होय. सर्वांमध्येच धर्मश्रद्धा दृढ असल्यामुळे भोळ्या व घातक चालीरीती ज्यांच्या त्यांनी प्रयत्नाने नाहीशी केल्या पाहिजेत. सरकार मग ते कोणत्याही पक्षाचे असो, ते प्रबोधन व परिवर्तन करू शकत नाही. नागरिकांचे व पुरोगामी सामाजिक संस्थांचे हे कार्य ठरते. एकमेकांनी एकमेकांचा धर्म समजावून घेणे व धर्मोदार्य वाढवणे हाच मार्ग ठरतो.

धर्मसमजुती व रूढी घट्ट असल्यामुळे बालविवाह, हुंडाबंदी वगैरे सामाजिक सुधारणेसंबंधी केलेले अनेक कायदे अमलातही येत नाहीत. ते केवळ कायद्यांच्या पुस्तकातच राहतात. असा केवळ हिंदू समाजासंबंधानेही विचार केल्यास आढळते. जास्त संख्येने असलेल्या हिंदूंनी इतरांना नावे न ठेवता स्वतःचे प्रथम आत्मपरीक्षण करावे. ह्या निबंधात वर्ण धर्मामुळे निर्माण

होणारी विषमता व त्याचा राजकारणावर होणारा अनिष्ट परिणाम यांचा पृथक विचार केला नाही. कारण 'वर्णाश्रम धर्म' म्हणून जो सांगितला गेला, त्यातील आश्रम धर्म राहिलाच नाही. 'जात' ह्या कल्पनेने 'वर्ण' ह्या कल्पनेवर मात केली. जातीभान व जातींची अस्मिता मात्र प्रत्यक्ष दिसते. चार वर्ण म्हणजे देखील चार मुख्य जातीच होत.

**उपसंहार :**

भारत देश यापुढे भारतीय घटनेने स्वीकारलेल्या व्यापक समतेच्या व निधर्मी धोरणाच्या पुनः मागे जाणार नाही, यासंबंधाने सक्रीय काळजी सर्वांनीच घेणे, हे एक आता राष्ट्रीय कर्तव्य झाले आहे. कारण घटनेला आव्हाने दिली जातात. भारताच्या विकासाच्या आड कोणत्याच धर्माने येता कामा नये.

धर्म म्हणजे उपासना व ईश्वराकडे जाणारा मार्ग असा अर्थ घेतला तर निधर्मी ध्येय धोरणात घटना मान्य स्वातंत्र्य दिले आहे. जे हिंदू आहेत ते कोणाच्याही उपासना पद्धतीच्या आड येत नाहीत. हिंदुधर्म म्हणजे 'सहिष्णुता' अशी देखील व्याख्या होते. पण याप्रकारची सहिष्णुता इतर जनात कशी निर्माण होईल हा यक्ष प्रश्न आहे. ज्यांचे त्यांनी याप्रकारचे स्वावलंबी प्रयत्न केले पाहिजेत व उभय बाजूने सहकार्य वाढले पाहिजे.

हल्ली विकासाच्या आड धर्म येतात. उदाहरणार्थः रस्ता करावयाचा झाल्यास श्रद्धास्थळे आडवी येतात व त्याची स्थलांतरेदेखील करता येणे अवघड होते. विज्ञानात्मक दृष्टिकोनालाही धर्म रोखतो.

धर्म म्हणजे अध्यात्म. त्याचे पायाभूत तत्त्वज्ञान हे त्यामुळे रूढ धर्मामुळे व कर्मकांडात्मक श्रद्धेमुळे मागे राहते. खरा परमार्थ लोपतो. त्यामुळे धर्मांचा मूलभूत उद्देश नाहीसा होतो. धर्म म्हणजे 'धम्म' पण सकामधर्मामुळे नीती-सदाचार-बंधुत्व, सत्य वगैरे अती उच्च व मनुष्याला मनुष्य करणाऱ्या बाबी दूरच राहतात. हा जो अनुभव हल्ली मोठ्याप्रमाणात येत आहे, तो पालटून जाऊन, धर्म हा बुद्धिवादावर म्हणजे सत्यासत्यविवेक व सारासार विवेक यावर अधिष्ठित होणे हे येथील सर्वधर्मांच्या प्रजेचे कर्तव्य आहे. सर्व लोकांकडून हे प्रत्यक्ष घडेल तरच भारत एक-संघ राहिल. भारत पुनः ब्रिटिशपूर्व काळात किंबहुना मध्ययुगाकडे जाणार की काय ? ही भीती आज उभी आहे.

भारतात विविध धर्माचे अनुयायी राहतात व त्यांचे न्याय्य धर्मस्वातंत्र्य राहून, एक विशाल भारतीय स्टेट व्हावे. म्हणूनच निधर्मी धोरणाचा घटनेने पुरस्कार केला आहे. मात्र दिलेल्या धर्म स्वातंत्र्याचा कोणीच दुरुपयोग करू नये. उदा. धर्मांतरे घडवून आपापल्या धर्माची लोकसंख्या (स्वतंत्र राज्य निर्माण होण्याच्या दृष्टीने) वाढवणे म्हणजे एकपरी घटनेवर

कळत नकळत आक्रमण करणे होय. असे आक्रमण होऊ शकते म्हणून धर्मांतर बंदीचा कायदा व्हावा अशी मागणी पुढे येते. धर्मांतर घडवण्यासाठी बाहेरून जो 'पैसा' येतो तोदेखील प्रथम रोखावा लागेल. निधर्मी राष्ट्र बनवण्यासाठी बऱ्याच तरतुदींची गरज आहे व ती गरज भागवण्याच्या आड येथील सर्व धर्म कमी-जास्ती प्रमाणात आडवे येतात. विविधता, पृथकता ही भारताला यापुढे स्वातंत्र्यात तरी भूषणभूत नाही, उलट एकविधता कशी निर्माण करावयाची हा मोठा प्रश्न आहे. तो सोपा नाही. उदा. एकच राष्ट्रीय भाषा (हिंदी) करणे, एक देवनागरी लिपी असावी, असे जे उपाय सुचवले जातात. ते सर्वच प्रांतातून मान्य होत नाहीत. धर्म भेद-भाषा भेद राजकीय विकासाच्या आड येतातच. सर्वांच्या हृदयाची भाषा एकच असू शकते, हा अनुभव जातवारी, धर्मवारी व भाषावारी विचारामुळे लोपतो. साहित्याला व इतिहास संशोधनाला धार्मिक व जातीय अहंकार आडवा येतो धर्माधिष्ठित राजकारण हे एक घातक टोक आहे हे अनुभवाने भविष्यात पटेलदेखील. पाकिस्तान व बांगलादेश धर्माधिष्ठित राष्ट्रे झाली आहेत, तरी येथील जनतेचे प्रश्न संपले नाहीत. उलट वाढले आहेत. तेथेही धर्म निरपेक्ष लोकशाही राजकारणाची गरज पुढे वाटेलच. भारतातील सर्वच समाजांचा स्वभाव पाहता सर्व लोक संप्रदायातील होतील, हे अशक्य आहे. पण राजकारणात धर्म आडवा येऊ न देता, सर्वांनाच राजकारण करता आले पाहिजे. एवढी वाटचाल व एवढी अपेक्षा भारतातील सर्व लोकांकडून करणे, व्यवहार्य झाली पाहिजे.

हल्ली राजकारणाच्या आड धर्म येतो व जातिभेद तर येतोच. हा सर्वांचा अनुभव आहे व धर्म संस्थेत व सामाजिक संस्थामधून राजकारण घुसते. राजकारण (विशेषतः समतेचे) ज्यात प्रवेश करत नाही, जीवनाचे असे आता एकही अंग राहिले नाही. अंतर्गत शांतता व सुरक्षेचा प्रश्न जातीय व धर्मीय दंगलीमुळे अवघड होत आहे.

धर्मदृष्ट्या भारत हा संन्यास व निवृत्तिप्रधान होता व आजही संसार व जग ही एक माया (मिथ्या) आहे, अशा तत्त्वज्ञानाचा सर्वांवर परिणाम आहेच. वैराग्यपर शिकवणुकीला ज्या देशात उच्च स्थान आहे त्या देशात भ्रष्टाचार शिगेला पोहोचत आहे. ही विसंगती म्हणजे एक मोठी शोकांतिका वाटते. 'रानडे-गोखले व गांधी' यांनी खाजगी जीवन व सार्वजनिक आयुष्य अध्यात्ममय (धर्म्य) झाले पाहिजे. अशी शिकवण दिली होती. पण स्वातंत्र्य आल्यावर उलटे वर्तन जिकडेतिकडे होत आहे. यासाठी येथील लोकांचे धर्मकारण व राजकारण शुद्ध झाले पाहिजे. आज उच्चतम जीवनमूल्यांचा पराभव होत आहे, असे दिसले तरी निराश न होता, त्यांचा पाठपुरावा करणे आता अधिक जरुरीचे आहे, कारण चोहोबाजूने बिकट प्रश्न घोंगावत आहेत. वाढता हिंसाचार लोकशाहीचा शत्रूच ठरेल.

सर्वच धर्मात विभूतिपूजा, अवतारवाद या कल्पना आहेत. यांचा प्रभाव राजकारणावर पडतो. व्यक्तिस्तोम वाढवण्याच्या प्रकारामुळे राजकीय बुवाबाजी वाढते. विभूतिस्तोम हे लोकशाहीला पूरक होत नाही. राजकीय व्यक्तिपूजा ही धार्मिक बुवाबाजीत आणखी भर घालते व लोकशाही मत-स्वातंत्र्याचा लोप होऊ शकतो. धर्मग्रंथ हे ईश्वर प्रणित आहेत, त्यात बदल व फेरफार करू नये तो मनुष्याचा हक्क व कर्तव्य नाही, अशी धार्मिक समजूत असते. त्यामुळे प्रबोधन व परिवर्तन रोखले जाते. याप्रकारचे पोथीप्रामाण्य समान नागरी कायदा व कुटुंब नियोजन वगैरे नव्या नव्या सुधारणांच्या आड येते. बुद्धीचा उपयोग करण्याची प्रवृत्ती सर्वच धर्मात वाढेल तर जुन्या कल्पना मागे पडतील व विशुद्ध राजकरणाचा मार्ग खुला होईल. ईश्वरी अवतार होईल व तो आलेली ग्लानी नाहीशी करील हा धार्मिक विश्वास नव्या जगात अप्रस्तुत पाहिजे. एकविसावे शतक सुरु झाले तरी चालू जगात धर्म हा आंतरराष्ट्रीय व मानवतावादी झाला नाही. मानवतावादी प्रयत्नही मागे पडत आहेत.

राजकारण हे फक्त आता भारतीय मर्यादेपुरते राहिले नाही. भारतीय राजकारणावर जागतिक राजकारणाचा परिणाम होत आहे. म्हणून हा विषय उत्तरोत्तर क्लिष्ट होत आहे. यातूनच ह्यापुढे भारताला सावध राहून मार्ग काढणे जरूर राहील. भारतीय राजकारण कोणावरही आक्रमण करणारे मुळीच नाही. तरी स्वातंत्र्य आल्यावर भारतावर आक्रमणे झाली, हे विसरून चालणार नाही.

(शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ, राज्यशास्त्र विभाग अधिवेशन-५ वे, २९ व ३० मार्च, १९८६, द्वारा राज्यशासन विभाग, किसनवीर महाविद्यालय, वाई)

******

# १४ लोकशाही राजकारणात सामाजिक प्रबोधनाचा झालेला संकोच

हल्ली वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क आहे. निवडणुकीद्वारे लोकप्रतिनिधी निवडून येतात व हल्ली जी भारतात लोकशाही आहे तिचा कारभार बहुमतात आलेल्या पक्षाच्याद्वारे चालतो. असे भारतातील चालू लोकशाहीचे स्वरूप आहे.

आज राजकारण जे चालू आहे, त्याचे स्वरूप असे संसदीय लोकशाही स्वरूप आहे. कोणत्याही राज्यपद्धतीचे स्वरूप व्यंगपुराणात्मक-गुणदोषात्मक असू शकते. मनुष्य चुका करू शकतो. हा त्याचा स्वभाव आहे. म्हणून त्याला निर्दोष लोकशाही निर्माण करता येत नाही. निवडणुकींच्या लढायामधून सर्वच पक्ष प्रदूषणे निर्माण करू शकतात. निवडणूक यंत्रणा अनुभवानुभवाने तिच्यातील दोष कायदे नियम करून रोखत असते. तरी गुप्तपणे पैशांचा व बळांचा वापर करून त्या जिंकण्यासाठी विहित-अविहित मार्ग अवलंबून सर्वच पक्षांचा सहभाग असतो व निवडणुकींच्या लढ्यात सर्वच धर्म्य व नीतियुक्त असते असे मानले जाते. येनकेन प्रकारे निवडणूक जिंकावयाची असते. जसे मतदार तसे सरकार. एकदा मतपेटीत मत टाकून झाले की, मग प्रतिनिधी व मतदार यांचा संबंध तुटतो. लोकप्रतिनिधी अयोग्य वर्तन करीत असतील तर त्यांना रद्द करण्याचा अधिकार मतदारांना नसतो. म्हणजे खुद्द लोकशाहीचा जेथे संकोच होत असतो, तेथे 'लोकशाही राजकारण' सामाजिक प्रबोधनाचा संकोच करू शकते किंवा तो होतो, होत आला, होईल ही वस्तुस्थिती सत्य मानावी लागते. हा अनुभव आहे. मग पर्याय काय ?

भारताचा पिंड व धर्म (स्वभाव) लोकशाहीचा आहे, म्हणून हुकूमशाही किंवा अन्य मर्यादित लोकशाहीचा येथे उपयोग नाही. एकच मार्ग राहतो तो हा की, लोकशाहीचा व तिच्यामुळे होणारा समाजप्रबोधनाचा संकोच होऊ न देणे, असे मार्ग काढणे व उपाय योजित जाणे. प्रबोधनाची गरज सर्वकाळी व सर्वस्थळी असते. कोणत्या ना कोणत्या चालू प्रश्नावर जन-जागरण करावे लागते.

लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्य असते. मते देताना बुद्धी (मति) वापरण्याचा कायद्याने हक्क दिला आहे. हुकूमशाहीत लष्करशाहीत स्वातंत्र्याचा हा हक्क नसतो. लोकशाहीत निवडणूक लांबवण्याचा, पुढे ढकलण्याचा किंवा आणीबाणी लागू करण्याचा हक्क मुख्य केंद्रीय

प्रधानांना असतो. म्हणजे लोकशाहीतदेखील लोकशाहीचा संकोच व लोप होऊ शकतो. कारणे विविध असू शकतात. आणीबाणीत प्रबोधन करण्यासाठी 'निर्भयता' राहत नाही.

**समाजप्रबोधनाचा द्विविध उगम**

गेल्या शतकात भारतातले सामाजिक व राजकीय प्रबोधन साधारणतः एकाच काळात निर्माण झाले. राजाराम मोहन राय यांनी सामाजिक प्रबोधनाला जन्म दिला व ते सर्वांगीण सुधारणावादी होते म्हणून हिंदुस्थानच्या राजकीय मागण्यादेखील विलायतेत जाऊन व येथेही वृत्तपत्रांद्वारे राष्ट्रीय सभेपूर्वी त्यांना व्यक्त केल्या. नंतर न्या. रानडे यांनीदेखील सर्वांगीण सुधारणेचा सक्रीय पुरस्कार केला. हे दोन्ही प्रवाह सुरत काँग्रेसपर्यंत एकत्र राहिले. जहाल नेते राजकारणात जहाल होत गेले व मवाळ फक्त सामाजिक सुधारणावादी राहिले व राजकारणात नेमस्त झाले. खरे पाहता लोकहितवादी-आगरकर-दादोबा पांडुरंग वगैरे पांढरपेशे सुधारक रानड्यांप्रमाणेच राजकारणात नेमस्त होते. टिळकांनी नेमस्त राजकारणावर म्हणजे अर्ज विनंत्यांच्या राजकारणावर नंतर मात केली. येथपासून समाजप्रबोधन दुय्यम व गौण ठरू लागले. लो. टिळकांचा सामाजिक सुधारकांना विरोध होता, याचे एक कारण म्हणजे समाज सुधारक राजकारणात मवाळ होते. ब्राह्मणेतर पक्षाचे धोरणदेखील नेमस्त होते. सत्यशोधक व ब्राह्मणेतर परिषदेत पहिला ठराव राजनिष्ठेचा (म्हणजे इंग्रज निष्ठेचा) पास होत असे. पुढे शिक्षण प्रसारासाठी जाती जमातींच्या वेगवेगळ्या परिषदा भरू लागल्या. त्यातूनही इंग्रज सरकार व इंग्लंडची राणी व हिंदुस्थानची महाराणी व पुढे बादशहा यांच्यावरील निष्ठा सभेच्या आरंभी ठराव करून जाहीर केली जाई. टिळकांच्या दृष्टीने, हे अयोग्य होते. म्हणून नेमस्त-प्रागतिक-मवाळ धोरणाच्या सर्व सभा व त्यांची प्रागतिक विधायक कार्ये यांना टिळकांचा विरोध होता. अर्थात टिळकानुयायी यांनी टिळक भक्तीने अंध होऊन टिळकांना अनुसरले. यात पांढरपेशे-शहरीच जास्त होते. टिळकांना तेल्या-तांबोळ्याचे पुढारी म्हटले गेले. पण तेल्या-तांबोळ्यांचा उपयोग राजकारणासाठीच फक्त व्हावा, याच पावित्र्याने टिळक वागले. इंग्रजांना घालवून देणे हा त्यांचा उद्देश नव्हता. आर्यलँडसारखे स्वराज्य हा त्यांचा उद्देश होता. स्वराज्य म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य असा अर्थ नव्हता. राष्ट्रीय सभेचा पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पुढे जवाहरलाल नेहरू यांच्या काळात झाला म्हणजे या काळाच्या दृष्टीने टिळक नेमस्त व मवाळच होते. पण त्यांच्या राजकीय असंतोषाच्या चळवळीमुळे समाजकारण मागे पडले. सामाजिक परिषद भरत होती ती जहालांनी मोडून टाकली. स्वराज्याला पात्र व्हावयाचे असेल तर आपली समाजरचना निकोप असली पाहिजे; व औद्योगिक आणि शेतीविषयक देखील नवा विचार व नवा आचार झाला पाहिजे. हा रानड्यांचा व्यापक पवित्रा लोपला. फक्त राजकीय स्वातंत्र्य-स्वराज्य मिळाले की-आपोआप

सर्व ठीकठाक होईल, असा विचार व आचार बळावला. हा लोकप्रिय व लोकमान्य झाला. कारण यात आत्मपरीक्षणाचा व स्वतःच्या सामाजिक-धार्मिक परिवर्तनाचा विवेक नव्हता. नुकतेच पुढे येत असलेले सामाजिक प्रबोधन रोखले गेले-वाढले नाही. **राजकारण समाज प्रबोधन गिळते; कारण राजकारण लवकर प्रभावी होते.**

वरील कारणामुळेच सामाजिक प्रबोधन फक्त अविकसित राहिले ते खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचले नाही, एवढेच नव्हे. सामाजिक-धार्मिक (Socio Religious) प्रबोधन पाश्चात्यांकडून परिवर्तित होत आहे. यामध्ये ख्रिस्ती धर्माचे व पाश्चात्य सुधारणांचे अनुकरण आहे, यात देशाभिमान नाही. स्वधर्म (हिंदूधर्म) व स्वभाषा आणि स्वदेश यांच्याविरुद्ध ते आहे. असा विचार निबंधमालाकर्ते चिपळूणकर यांनी फैलाविला. पाश्चात्यांचे सर्वच वाईट, आपलाच धर्म-पूर्व परंपरा खऱ्या, चार वर्ण टिकले पाहिजेत, असा विचार बळावण्यात आला. वास्तविक हा विचार विवेकी नव्हता, एका टोकाला जाणारा होता. कारण पुढे आपण लोकशाहीसारखे पार्लमेंटरी पद्धतीचे कित्येक विचार इंग्लंड व अमेरिकेकडून घेतले. घटना करताना पाश्चात्यांचे हे विचार घ्यावे लागले. स्वातंत्र्यातही आपण फक्त टिळक-चिपळूणकरांनाच घेऊन बसलो असतो तर भागलेच नसते. आपली संस्कृतीच मुळी 'जेते व जित' यांच्या संस्कृतींच्या संमिश्रणातून तयार होत आली. कारण मागील सर्वकाळ राजेशाहीचा व आपापसांतील लढायांचा होता.

इंग्रजी राज्यात लॉर्ड रिपनच्या कारकीर्दीत नगरपालिका, लोकल बोर्ड व प्रांतवार विधीमंडळे स्थापन होऊन लोकशाही कारभाराला सुरुवात झाली. देशी (ब्रिटिश काळापूर्वी) विविध राज्यांतून प्राथमिक लोकशाही संस्थादेखील नव्हत्या. खुद्द लो. टिळक कौन्सिलात काही काळ होते.

अ. भा. राष्ट्रीय सभा ही लोकशाही पद्धतीने सर्व जातीधर्मियांसाठी स्थापन झाली. अशाप्रकारची लोकशाही सभा (काँग्रेस) पूर्वी कधीच नव्हती. ह्यूम ॲगट्या ह्यूगन वगैरे अनेक युरोपियन मित्रांनी राष्ट्रीय सभेस सुरुवात केली व टिळकापूर्वीदेखील तिचे संवर्धन केले. टिळकांना ती पायाभूत ठरली. वास्तविक पाहता पहिल्या धर्मसुधारक व सामाजिक सुधारकांनी काँग्रेसच्या जडणघडणीत तिच्या बाल्यावस्थेत मोठा भाग घेतला होता. त्याहीपूर्वी राममोहन रॉय व केशवचंद्र सेन यांनी विलायतेस जाऊन भारताची बाजू मांडली होती. गोखल्यांनी यात मोठी भर घातली. अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाकडे प्रथम न्या. रानडे यांनी म. गांधी यांचे लक्ष वेधले व नंतर कर्मवीर शिंदे यांनी म. गांधी व ॲनी बेझंट यांचे लक्ष वेधून राजकीय अ. भा. काँग्रेसमध्ये अस्पृश्यता निवारणाचा ठराव कष्टपूर्वक प्रसृत करून घेतला. जहाल राजकीय प्रवाह व समाजप्रबोधनाचा प्रवाह यात काँग्रेस काळापूर्वीपासूनच संघर्ष करीत होते. तो टिळक-आगरकर यांच्या संघर्षामुळे सर्वत्र जाहीर झाला. लोकशाही राजकारणात

समाजप्रबोधनाचा संकोच स्वातंत्र्यपूर्व काळातही होत होता. स्वराज्य मागणे म्हणजेच फक्त लोकशाही-लोकमान्य-राजकारण करणे असा संकुचित अर्थ होता. राजकारण म्हणजे निकोप समाजकारण व निरोगी अर्थकारण असा व्यापक वेध फारसा घेतला नव्हता. राजकारण धर्म्य (नीतियुक्त) असावे हा रानडे-गोखले-म. गांधींचा विचार-आचार उत्तरोत्तर लोपला.

## राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य

भारतात सर्व जाती-धर्मांचे विविध समाज एकसारखे विकसित नव्हते. त्यात सांस्कृतिक समपातळी नव्हती. (व अद्याप नाही) शिक्षणात मागास व अतिमागास असे लहान मोठे समाज होते. यामुळे राष्ट्रीय सभेच्या उच्चभ्रूंच्या मागण्या सर्व देशाचे प्रतिनिधित्व करीत नव्हत्या. सक्तीचे शिक्षण, शूद्रातिशूद्रांना लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळण्याची गरज, उच्चनीच भाव, अस्पृश्यतेची रूढी व अनेक ग्रामीण व श्रमिकांचे प्रश्न प्रथम राष्ट्रीय सभेला भावलेदेखील नव्हते. **हे प्रश्न प्रथमतः म. फुले यांनी सरकार व सार्वजनिक सभा-पुढे राष्ट्रीय सभा यांच्यापुढे मांडले. राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्य जोतीबा मूलभूत मानत होते म्हणून डॉ. आंबेडकर यांनी त्यांना गुरू केले** व शूद्र कोण होते? हे पुस्तक फुले यांना अर्पण केले. परंतु पुढील १८७३ ते १९३० पर्यंत ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळीने अस्पृश्यता निवारण हा समाजाचा व पक्षाचा कार्यक्रम केला नाही. व्यक्तीशः शाहू महाराज-शिंदे-भाऊराव पाटील वगैरेंनी अस्पृश्यता निवारक कार्य केले. महारवतन बिल, महाडचा सत्याग्रह वगैरेंमध्ये ब्राह्मणेतर म्हणवणाऱ्यांमध्येही कुचराई आहे, असा अनुभव आल्यावर डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या समाजाचा राजकीय पक्ष वेगळा केला. ब्राह्मण हे ब्राह्मणेतरांचे हक्क डावलत होते, बहुजन समाज आत्मकेंद्रित होऊन स्वतः सत्तेवर आला. जे हक्क दुसऱ्याकडून (इंग्रजाकडून) मिळावेत अशी चळवळ करणारे, ते हक्क तळागाळापर्यंतच्या सर्वांना विकेंद्रित व्हावेत अशी काळजी घेत नव्हते. डॉ. आंबेडकरांचे दलित प्रबोधन यामुळे स्वतंत्र झाले व हे चालू आहे.

मॉन्टफर्ड सुधारणा पुढील मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा यामुळे लोकशाही मर्यादितपणे वाढत होती. याच काळात म्हणजे आंबेडकर चळवळीच्या काळात सामाजिक स्वातंत्र्य व सामाजिक न्याय यांचा अभाव होता, संकोच होता. मग म. फुल्यांच्या वेळचा पेशवाईनंतरचा अव्वल इंग्रजीचा काळ किती धार्मिक व सामाजिक प्रकारे गुलामगिरीचा होता, याची कल्पनाच करावी. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे मराठवाड्यात प्रबोधनाचा अभाव होता. निजामीचा काळ तर सर्वप्रकारे अस्मितेच्या अभावाचा होता. असे तुलनेने म्हणावे लागते. फुले-आंबेडकरांनी नेमस्त समाज सुधारकांवर विश्वास ठेवला नाही. कारण या सुशिक्षितांचे प्रबोधन फक्त शहरीच होते. ते ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचले नव्हते. यामुळे खुद्द समाजप्रबोधन संकुचित होते, असे म्हणणे अटळ आहे. निरनिराळे प्रवाह व विचार निर्मिती झाल्यामुळे देखील त्यांचे सामर्थ्य कमी पडले.

## कायदा व समाज परिवर्तन

सतीबंदीच्या कायद्यानंतर, पुनर्विवाहाचा कायदा, संमती बिल, बालविवाह प्रतिबंधक कायदा, असे अनेक समाज प्रबोधनास पोषक व संवर्धक कायदे पारतंत्र्यात झाले व हे सर्व हिंदुधर्मातील समाज सुधारणेसाठी होते. तरी याला जास्तीत जास्त हिंदू सनातनी लोकांचा तीव्र विरोध झाला. मुस्लीम व ख्रिस्ती समाजांच्या ह्या कायद्याशी संबंध नव्हता. समान नागरी कायद्याला बिगर हिंदू (म्हणजे अहिंदूधर्मीय) यांचा आज विरोध आहे, याचे कारण कायद्यांच्या मार्फत सुधारणांना जे संरक्षण दिले जात होते, ते हिंदुंधर्माबद्दल प्रायः होते. यामुळे धर्मांतरित मुस्लीम व ख्रिस्ती जनता जशीच्या तशीच राहिली. स्वातंत्र्यात हीच स्थिती वाढत आहे. समान नागरी कायदे अशक्य आहेत. हे समाजप्रबोधनाचे अपयश होय. जास्तीत जास्त धर्म सुधारक व समाज सुधारक हिंदू होते. अ. भा. सामाजिक परिषद देखील हिंदूपुरती मर्यादित राहिली व राष्ट्रीय सभेसारखी टिकली नाही.

## स्वातंत्र्य आल्यानंतर

पूर्वीच्या काळी समाज प्रबोधन मर्यादित होते ते सर्वांपर्यंत पोहोचले नव्हते व ते अर्धेमुर्धे होते. ब्राह्मोसमाज, आर्यसमाज, सत्यशोधक समाज यांच्या मार्फत समाज प्रबोधनाचा जन्म झाला व काही वाटचाल झाली. पण हे समाज स्वातंत्र्य नवयुग आल्यावर मावळले! यांनी सर्वांनी हिंदुधर्माच्या व समाजाच्या दृष्टीने विचार-आचार केले. पण हे प्रयत्न राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला परके वाटले व वाटतात. वास्तविक राममोहन, रानडे, भांडारकर, मोडक, चंदावरकर, शिंदे वगैरे धर्मसुधारकांनी त्यांच्या विचारप्रपंचात हिंदुधर्माचा उल्लेख वारंवार केला होता. हे सारे सुधारक तत्त्वतः व आचारविचारात हिंदू होते. पण हेडगेवार यांच्यापूर्वी हिंदुत्वावर विचारच झाला नाही, अशा थाटात दिमाखात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वावरतो! गांधी व सावरकर आणि विनोबा यांनी हेडगेवार पूर्वी झालेल्या वरील प्रबोधनास मान्यता दिली; त्यात भर घातली. **पण प्रबोधनाचे सर्वधर्मसमन्वयात्मक राष्ट्रीय धोरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ दुय्यम व गौण मानतो.** फक्त मुस्लीम व ख्रिस्ती आक्रमणे करतात, एवढे सांगून तरुणांना आकर्षित केले जाते. आत्मपरीक्षणाचा अभाव स्वातंत्र्यात यामुळे वाढला आहे. धर्मांतरे का झाली व का होतात यांची मूलगामी आर्थिक व राजकीय कारणे शोधली जात नाहीत. दयानंदांची शुद्धीची चळवळ स्वातंत्र्यात वाढली नाही. परदेशाहून मुस्लीम व ख्रिस्ती यांच्या कारवायांना पैसा पुरवला जातो, तो थोपवता येत नाही. यामुळे देशाचा तिरपगडा होत आहे. हेही खरे. खऱ्या अर्थाने आजही जे पुरोगामी समाजप्रबोधक (थोडेच) आहेत.

त्यांच्याजवळ पुरेसे अर्थसाह्य, स्वातंत्र्यही नाही. यामुळेही संकोच होत आहे व **समाजप्रबोधन आणि समाज परिवर्तन पूर्ण मावळलेले दिसते व सध्याचा काळ सत्तेच्या राजकारणाचा आहे.** हा 'संकोच' होण्यास कौटुंबिक कारणे देखील आहेत. जुनीपिढी व नवी पिढी यांच्यात अंतर पडते. राजकारणात राजकीय पक्षांना महत्त्व असते. सामाजिक संस्था व चळवळी केल्यामुळे लोकमतांची इतराजी ओढवून घ्यावी लागते. यासंबंधीची तयारी फारच थोड्यात आढळते. **प्रबोधनाचा व परिवर्तनाचा जो लढा असतो तो स्वकीयांबरोबर असतो.** हा लढा करताना घरातील जुन्या मतांच्या मंडळींचा विरोध होऊ शकतो. विशेषतः बायका परंपरावादी असतात व त्यांच्यापुढे पुरुष मंडळी हार खातात. समाज प्रबोधन स्त्रियात रुजणे आवश्यक असते.

**मतासाठी अनुनय म्हणजे सत्तेसाठी अनुनय**

स्वातंत्र्य आल्यावर लोकशाहीतील निरनिराळ्या संस्थांच्या निवडणुका वाढल्या. पूर्वीही सत्तेसाठी सत्ताधाऱ्यांचा अनुनय होत असे. उदा. मुंबई कॉन्सिलमध्ये दहापंधरा वर्षे ब्राह्मणेतर या नावाचा पक्ष असे. हा सरकारच्या विरुद्ध जात नसे व अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात भाग घेतला, तर सनातनी अस्पृश्यांची मते मिळणार नाहीत. डॉ. आंबेडकर यांनी त्यावेळी आणलेल्या महार वतनबिलाला ब्राह्मणेतरांनी विरोध केला. ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यक्रमात अस्पृश्यता निवारणाचा उल्लेख नसे. हिच स्थिती काँग्रेस व इतर पक्षांची होती. स्वराज्यार्थ चालवलेल्या चळवळीत बहुसंख्य सनातन्यांची मते विरुद्ध होऊ नयेत म्हणूनही लोकमान्य समाज सुधारणा व एकूण प्रबोधन दुय्यम समजत.

आजच्या राज्यकर्त्यांचा समाजप्रबोधनाला व परिवर्तनाला विरोध नाही हे खरे; पण मुस्लिम जनतेची मते मिळावीत म्हणूनही समान नागरी कायद्याला स्वतः पंतप्रधानांनी विरोध केला व त्यांच्यासाठी वेगळेच बिल पास केले. स्वातंत्र्य आल्यावर हिंदुत्ववादी म्हणवणारे पक्ष एकसारखी जास्ती तक्रार करीत असतात की, एक गठ्ठा मते पदरात पडावीत म्हणून काँग्रेसपक्ष व त्यांचे सरकार मुस्लिम अल्पसंख्याकांचा अनुनय करीत असते. ही तक्रार खोटी नाही. या तक्रारीत अर्थ आहे. समान नागरी कायदा झाला नाही, हे याची साक्ष आहे. पुरावा आहे. अल्पसंख्याकांची मते निश्चित करून काँग्रेस सरकार सत्तेवर येत असते व सत्तेवर राहत असते. **जातियता रोखण्याऐवजी ती वाढत आहे.**

निधर्मीवाद व निधर्मी समाजाचे प्रबोधन प्रत्यक्षात येण्यासाठी काही कायदे करणे मागेच जरूर होते. 'निधर्मी' या शब्दाचा अर्थ धर्मस्वातंत्र्य-धर्मप्रचार स्वातंत्र्य वाढवण्याची मोकळीक असा देखील अल्पसंख्य मुस्लीम व ख्रिस्ती मिशनरी करीत असतात. म्हणून धर्मांतराला बंदी घालणारा कायदा पास होऊ शकला नाही. धर्मांतरे करण्यासाठी जो परदेशाहून पैसा येतो, त्याला सरकार बंदी घालू शकेल. पण मुस्लीम-ख्रिस्त्यांची मने दुखावतील म्हणून कित्येक

गोष्टी केल्या जात नाहीत. फार काय प्रत्येक प्रांतातील बहुसंख्याकांना डावलून आपल्याकडे अल्पसंख्याकांची मते खात्रीने मिळवणे, हा पवित्रा इंदिरा सरकारच्या राज्यात अवलंबला गेला. हा पवित्रा यशस्वीदेखील झाला. लोकशाहीत निवडणुकांमधून जी अनुनयवादी धोरणे पत्करली जातात, त्यामुळेदेखील विपरित परिणाम होतात. **हल्ली लोकशाही आहे म्हणण्यापेक्षा निवडणूकशाही आहे असे म्हणणे आधिक बरोबर आहे. मतांचा विक्रय होतो व पुढे लोकप्रतिनिधीदेखील विकत घेतले जातात!** अशा परिस्थितीत समाज प्रबोधन मावळून जावे, यात आश्चर्य नाही. पण भारतात लोकशाहीशिवाय दुसरा पर्याय नाही. देवधर्म न मानणारा कम्युनिझम येथे रुजणार नाही. **जेथे परिवर्तन अशक्य होते, तेथे 'क्रांती' अव्यवहार्य वाटते.** भारताने मिश्र अर्थव्यवस्था पत्करली आहे. तिच्यातील दोष घालवून तिचा निर्दोष विकास करणे हा एकमेव मार्ग वाटतो. मात्र दलितांचे विमोचन व्हावे म्हणून मार्क्सची सूत्रे (मूलभूत तत्त्वे) येथेही मुळीच उपयोगाची नाहीत, असे नव्हे. मार्क्स व बुद्ध याकडे संपूर्ण पाठही करून चालणार नाही. मार्क्सवादी प्रबोधन व समाजवादी प्रबोधन करण्याच्या चळवळी व पक्ष भारतात आहेत. कोणत्याही नव प्रबोधनाचा विचार येथील स्थानिक इतिहास, संस्कृती या दृष्टीने त्याच्या विचार-आचारांचे भारतीयकरण करावे लागेल. म्हणजे सारासार विचार करावा लागेल. मार्क्सला मानणारे व बुद्धाला मानणारे जातिवर्णभेद व अंधश्रद्धा यांच्या निर्मूलनाचा अवघड क्षेत्रात विजयी झाले, तरी पुष्कळ होईल!

### स्वातंत्र्यपूर्व प्रबोधन व स्वातंत्र्योत्तराचे प्रबोधन

अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या सरत्या काळात येथे पाश्चात्यांचे राज्य आल्यापासून नवा 'ज्ञानोदय' होऊ लागला. मध्ययुगाचा पडदा दूर झाला व नवयुग अवतरले. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे आक्रमण थोपवणे व इंग्रजांनी पादाक्रांत केलेला भारत देश त्यांच्या मगरमिठीतून सोडवणे, असा दुहेरी हेतू प्रबोधनापुढे होता. त्याप्रमाणे धार्मिक व राजकीय असे प्रबोधनाचे द्विविध स्वरूपाचे होते. हा काळ समाज व धर्म सुधारणांचा होता. इंग्लंडमध्ये जो पक्ष सत्तेवर असावयाचा त्या पक्षाचा परिणाम येथील राजकारणावर होई. इंग्रज जाईपर्यंत जे 'जनजागरण' झाले, त्याला खूपच मर्यादा पडल्या. तरी मर्यादितपणे घडलेले हे प्रबोधन पेशवाईत किंवा निझामीत अवतरणे अशक्य होते. इंग्रजांची राजवट जरी परकीय होती, तरी त्या पारतंत्र्याला भारतातील मोठमोठे विचारवंत (रानड्यांसारखे) 'ईश्वरी वरदान' असे संबोधित, त्याला देखील काही अर्थ होता. चालू स्वातंत्र्याचा काळ हा पारतंत्र्यात झालेल्या प्रबोधनावर उभा आहे. झालेले प्रबोधन इंग्रजांच्या समाजवादी धोरणाच्या काळात झाले म्हणून त्याला मर्यादा पडल्या. आता तर 'प्रबोधन' शब्दच मावळला आहे.

**आता स्वकीयांचे राज्य झाले आहे म्हणून सुराज्य आले आहे असे नव्हे. सुराज्य करावयाचे आहे.** फक्त राजकीय स्वातंत्र्य आले आहे **आर्थिक समानता व सामाजिक न्याय प्राप्त व्हावयाचा आहे. देशावर कर्जाचा मोठा बोजा वाढत आहे म्हणजे देश आर्थिकदृष्ट्या परतंत्रच आहे. पुरे स्वावलंबन नाही.** इंग्रज गेले तरी त्यांचा व पाश्चात्यांचा व्यापार चालूच आहे. मोठमोठ्या परदेशी कंपन्या आहेतच. **परकीयांचे हात हिंसा घडवत आहेत.** भारताचे माजी सरसेनापती (कै. वैद्य) यांची पुण्यात भरदिवसा हत्या झाली. मुळात सारे जीवनच असुरक्षित झाले! फक्त **स्वातंत्र्य आल्यावर एक महत्‌कार्य झाले ते म्हणजे भारताने त्याची घटना तयार केली** व ह्या घटनेला आधारभूत तत्त्वेही मांडली. म्हणून जुने ग्रंथ व त्यांचा असलेला अधिकार पुष्कळच संपला. मागीलप्रमाणे पुरोहितवर्ग धर्मग्रंथांच्या आधारे दुसऱ्यांना नीच व अस्पृश्य मानीत नाही. अस्पृश्यता निवारक कायदा झाला आहे. म्हणून स्वातंत्र्यापूर्वीच्या प्रबोधनात जे प्रश्न होते ते बोथट झाले आहेत. राममोहन-जोतीबा व आंबेडकर यांचा काळ जशाचा जसा राहिला नाही. काळ या पुरुषांच्या पुढे धावत आहे म्हणून त्यांनाच प्रमाण मानून भूतकाळात राहण्यात सर्वस्व नाही. वर्तमानाचे बिकट प्रश्न नवे आहेत व येणारा भविष्यकाळ वेगळाच येणार आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात व अव्वल इंग्रजीत 'सरकार' चुलीपर्यंत पोहोचले नव्हते. आता नियंत्रण व परमिटे याचा काळ आहे. खुद्द स्वातंत्र्याचाच संकोच झाला आहे. पूर्वी युगानुयुगे 'गावगाडा' स्वावलंबी होता.

### अधःपाताचे नवे पर्व

समाज प्रबोधनाचे कार्य पूर्ण संपले आहे असे नव्हे. उलट हुंडाबळी वाढत आहेत. सतीच्या चालीचे समर्थन करणारेही पुन्हा आढळू लागले आहेत! जोतीबांनी ज्यांना 'स्त्री-शूद्रातिशूद्र' म्हटले त्यांची अवस्था जास्ती जास्ती कठीण होत आहे. म्हणून गेल्या प्रबोधनातील उरलेले प्रश्न व नवीन निर्माण झालेले प्रश्न यांच्या संबंधीचे नवे प्रबोधन हवे आहे. गेल्या शतकातील प्रबोधनावर वाढता विचार होत आहे; हे खरे. पण असे होत असताना त्याचे थिटेपण समजून येते. यात यश व अपयशदेखील जाणते. **परिवर्तनाला परंपरा, रूढी, अंधश्रद्धा वगैरे गिळून टाकीत आहेत व देश मध्ययुगाकडे पुनः चालला आहे,** तो यादवीचा व अशांततेचा काळ पुनः येण्याची भीती वाढत नाही काय? गेल्या प्रबोधनात आर्थिक पुर्नरचनेचा फारसा विचार नव्हता. हल्ली आर्थिक प्रश्न व गुंतागुंत वाढत आहे. फार मोठी प्रजा दारिद्र्य रेषेखाली बहुसंख्येने जात आहे. फुटीरता वाढत आहे. भारताच्या घटनेचीही बूज राखली जात नाही. खुद्द घटना म्हणजे देखील सर्वांनी एक नवे 'प्रबोधन' व परिवर्तन मानावे.

## चालू लोकशाहीची असमर्थता

आज कोणतेच प्रबोधन व परिवर्तन प्रत्यक्ष शहरी व ग्रामीण भागात दिसतच नाही. घटना, कायदे, पुरोगामी विचार कागदावर राहतात! **राष्ट्रीय एकात्मकता व सीमांचे संरक्षण याबाबतीत चिंताजनक अवस्था आली आहे.** मागच्या प्रबोधनामुळे शिक्षणप्रसार वाढला हे खरे; पण शिकले-सवरलेले स्त्री-पुरुष अधिक अंधश्रद्ध होत आहेत. शिक्षणात जरूर जो आशय (राष्ट्रीय एकात्मकतेचा व नैतिक प्रेरणांचा) नसतो म्हणून नव शिक्षणाचा विचार देशभर होत आहे. म्हणजे आतापर्यंत दिल्या गेलेल्या शिक्षणाने व त्याच्या पद्धतीने जे साधावयाचे ते साधले नाही! हे मान्य होत आहे. विद्यार्थी व नवपिढी कोठे भलतीकडे चालली आहे ते समजत नाही! **भ्रष्टाचार-गुंडगिरी-हिंसा-जातीय दंगली यांना उत आला आहे.** पंजाबसारखे व श्रीलंकेसारखे अनेक प्रश्न अवघड म्हणून उभे आहेत. चीन व पाकिस्तानचे आक्रमण तर चालूच असते. चालू लोकशाहीत सत्तेवर आलेल्या सत्ताधारी पक्षाची असमर्थता तर सिद्ध होत नाही काय? देश एकसंघ व एकत्र टिकेल किंवा काय हा प्रश्न आहे! शांतता व संरक्षण यांची हमी व जबाबदारी पारतंत्र्यात इंग्रजांनी उचललेली होती. 'इंग्रजांचेच राज्य बरे होते' असे लोक म्हणताना ऐकू येते! यापेक्षा दुर्भाग्य ते कोणते? अशा दुर्धर परिस्थितीत भारताची चालू परिस्थिती अडकून राहत आहे. मग प्रबोधनाचा व परिवर्तनाचा, आत्मपरीक्षणाचा व स्वोद्धाराचा प्रश्न लांबच राहतो. यावर लोकात जागृती नाही. झालेले प्रबोधन पुसून गेल्यासारखा काळ आला आहे. पूर्वी पारतंत्र्यात प्रबोधनाचा विचार हा पाश्चात्यांकडून प्रेरित होता, असे विरोधक म्हणत. पण स्वातंत्र्य आल्यावर स्वकीयांचे स्वावलंबी व पूर्ण स्वदेशी (या देशाला मानणारे) प्रबोधन तरी कोठे आहे? युरोपप्रमाणे भारतात अनेक राष्ट्रे (देश) निर्माण होण्याची भीती आहे. सीमा प्रश्न भिजत पडले आहेत. सर्वत्र पक्षीय राजकारण घुसत आहे. दैववाद, अंधश्रद्धा वगैरे जुन्या बाबी पुन्हा ऊफाळत आहेत. म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, स्त्री-मुक्ती चळवळ वगैरे पुरोगामी नव्या हालचाली दिसतात. म्हणजे लोकांनी जर प्रबोधन करून स्वावलंबनाने परिवर्तन ते केले तरच समाज सुधारेल. सरकार व लोकशाही याबाबतीत असमर्थ ठरली आहे व यांच्यामुळेच 'संकोच' (प्रबोधनाचा) झाला आहे, असे म्हणावे लागते! **सरकार लोकांची मने पालटू शकत नाही.** इष्टनिष्ट ओळखणे व इष्ट ते करणे, हे लोकांनीच स्वतः करण्याची बाब आहे. सत्ता स्पर्धेच्या निवडणुका व पुन्हा सत्तेवर येण्याची इर्षा या लोकशाही प्रकारातून प्रबोधन व परिवर्तन घडेल, ही आशा फोल ठरली आहे. लोकशाही व स्वातंत्र्यात प्रबोधनाचा संकोचच झाला आहे असेच नव्हे, तर मागील व पुढील संभाव्य प्रबोधन अदृश्य झाले आहे. ह्या निर्णयाप्रत यावे लागते. चालू राजकारणाला लोकशाही राजकारण म्हणणेदेखील कठीण वाटेल.

राममोहन, म. गांधी, सावरकर, जोतीबा फुले वगैरे प्रबोधक पराभूत झालेले दिसतात. खुद्द गांधींच्या गुजरातेत गांधीमार्ग पूर्णपणे लोपला. शाळा, कॉलेजातील शिक्षणक्रमात या सर्व प्रबोधकांची चरित्रे व कार्य शिकवले जाते एवढेच!

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भाष्यकार अभिमानाने सांगतात की-संघ स्थानावर व शिबिरातून जातिभेद व अस्पृश्यता मुळीच नाही. सर्व एक झाले आहेत. पण समाजात व ग्रामीण भागात या दोन बाबी जारी असल्यामुळे संघ स्वयंसेवक घरी गेले म्हणजे घरी-दारी व समाजात जातिभेद त्यांनाही अनिवार्य होतात. खुद्द संघचालकांच्या मनात भेदाभेद व तत्सम परंपरेच्या दृढ बाबी लपलेल्या आढळतात. म्हणून संघच या देशाचे प्रश्न सोडवील ही घोषणा एक दिवास्वप्न तर नव्हे काय? राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही शहरी पण अखिल भारतातील बहुतेक सर्व शहरात असलेली शिस्तबद्ध संघटना प्रबोधन व देशाभिमान यांचा पुरस्कार करीत असते. म्हणून उल्लेख करावा लागतो. ज्यांनी प्रबोधनास जन्म दिला तो ब्राह्मोसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज वगैरे नवयुग प्रवर्तक समाज मागेच लोपले. कालांतराप्रमाणे त्यांनी नवा आशय नवे स्वरूप त्यांनी घेतले नाही म्हणूनही ते गतकालीत झाले. उत्तरेत आर्यसमाज व हिंदुत्ववादी रा. स्व. संघ आहे, पण तो पंजाबमधील हिंदूंचा हल्ला थांबवू शकत नाही. कारण प्रश्न प्रांतिक, राजकीय, भाषिक, आर्थिक, सरहद्दीसंबंधीचा असे गुंतागुंतीचे आहेत. केंद्रीय सरकार व सत्तेवर आलेले अकाली सरकार प्रश्न सोडवू शकत नाही. **भारतातील असल्या अनेक प्रश्नात परकियांचे हात व प्रेरणा आणि साह्य असल्यामुळे सर्वच प्रश्न आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बनले आहेत.** देशात शांतता, निर्भयता, जीवित व वित्त आणि संसारात सुख मिळवून देणाऱ्या मूलभूत बाबी धोक्यात असल्यामुळे समाज प्रबोधनाचा विचार करतो कोण? वृत्तपत्रीय सृष्टीला फक्त राजकारणच लिहावे. इंग्रजी राज्यात तुलनेने शांतता होती. काठीला सोने बांधून काशीला जाता येत होते म्हणूनही अव्वल इंग्रजीत समाज प्रबोधनावर मनस्वी विचार व आचार झाला. विरोधी पक्ष असंघटित व सत्तेवरचा पक्ष प्रचंड बहुमतात असल्यामुळे एकपक्षीय हुकूमशाही चालते. निवडणूक भ्रष्टाचारातून व पैशाच्या बळावर जिंकाव्या लागतात व कित्येक पक्षांना देशाबाहेरून मदत येते. अशा परिस्थितीत अधःपतीत लोकशाहीत प्रबोधनाचा संकोच झाला व प्रबोधकच राहिला नाही तर नवल ते काय? देशाचे चित्र भेसूर दिसत नाही काय? **अतिरेक व हिंसा लोकशाहीला मारक आहे. हे विसरता येत नाही.**

## निराशेतील आशा

सुधारणा व सुधारक हे शब्द हल्ली वापरात नाहीत. कोणी स्वतःला सनातनी-परंपरावादी (जुनाट) म्हणूनच घेत नाही. ही सर्व परिभाषा लोपली व आता 'विकासाचा' काळ

आला. स्वातंत्र्यकाळात भौतिक विकास बराच झाला. पण मने विकसित होत नाहीत. समाजा-समाजामध्ये, धर्मामध्ये परस्पर विश्वास नाही. आपपर-भाव वाढला. बाह्य दळणवळण वाढले. एस्. टी. ने खेड्यापाड्यांपर्यंतची शिवता-शिवत चाल मोडून टाकली.

पूर्वीच्या काळी शिक्षण प्रसारार्थ जाती-जातींनी त्यांच्या त्यांच्या जातींच्या शिक्षण परिषदा, वसतिगृहे, स्कॉलरशिप्स फंड काढून एक परिश्रम विभाग केला. याही माध्यमातून शिक्षण प्रसार वाढला हे खरे, **पण दारूचे व्यसन सोडणे, लग्नकार्यात खर्च कमी करणे, बालविवाह न करणे** वगैरे समाजप्रबोधनातील मुद्दे आपापल्या जातीत, वाढवले नाहीत. आत्मकेंद्रीतपणा वाढल्याने वैयक्तिक स्वार्थ बळावला व जातीसाठी आता कोणीच माती खात नाही. नव्या पिढीचे स्वसमाज उद्धारार्थदेखील लक्ष नाही. सरकारचा दारूबंदी प्रयोग फसला. द्विभार्या बंधक कायदा, जमिनीसंबंधीचा सिलिंग ॲक्ट वगैरे परिवर्तन करणारे कायदे अमाप झाले व पळवाटा वाढल्या. निराशेचे चित्र सविस्तर उभे करण्यात यश येणे सुलभ आहे. पण, आशादायक बाबी थोड्याफार आहेत. त्यांचा परामर्ष शेवटी घेऊ या.

## समाज कल्याण खाते (Social Welfare Department)

स्वातंत्र्य आल्यावर हे सोशल वेलफेअर खाते वाढत आहे. पण त्याला बजेट फार मोठे नाही. 'धर्मांतर' न करता स्वधर्माची सुधारणा (शुद्धी) करून इतर धर्मात जे चांगले असेल ते स्वीकारावयाचे व ख्रिस्ती धर्मातील मिशनरी जी लोकसेवा कल्याणपर शिक्षणादी कार्य करतात, ती स्वावलंबनाने स्वधर्मात राहूनच करावयाची असा 'धर्मनिर्णय' राममोहन, दादोबा पांडुरंग, जोतीबा, दयानंद, म. गांधी यांनी देखील घेतला होता. हे विचार त्या वेळच्या मंथनातून निघाले. भारतातील निधर्मीवादी (नवा राष्ट्रवाद) विजयी व्हावयाचा असेल, तर भारतात धर्मांतरे होता उपयोगी नाहीत, पण ही होतात आणि त्यामुळे राष्ट्रीय अस्मिता धोक्यात येते, म्हणून धर्मांतर म्हणजे समाजांतर, राष्ट्रांतर व भाषांतरदेखील घडते. स्वातंत्र्य आल्यावर दुर्बल घटकांना मदत करणारे स्वतंत्र खाते आहे. यामुळे कमकुवत आदिवासी, भटक्या जातीजमाती पुढे येण्यास तूर्त प्रोत्साहन मिळू लागले आहे. मागील प्रबोधनाचे संवर्धन हे खाते करू शकेल ही आशादायक बाब आहे. लोककल्याणकारी राज्याच्या धोरणात समाजकल्याण खाते विकसित झाले पाहिजे. तथापि केवळ अनुदान घेऊन 'कार्यभाग' होणार नाही. लोकांनी त्याग हा केलाच पाहिजे. सर्वच सरकार करू शकणार नाही. सरकारावर अवलंबून न राहता समाजाचे कल्याण समाजाने केले पाहिजे. सरकारी अनुदाने केवळ आधारभूत आहेत. मात्र योजना तळागाळापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. नोकरशाहीने कोणताच राजकीय पक्ष न पत्करता राजकारण-निरपेक्ष समाज सेवाभावी राहिले पाहिजे.

## लोकशाही राजकारण व पक्षियता

गेल्या शतकातील प्रबोधनाचे मुद्दे आजही वेगळ्या माध्यमातून दृश्य होत आहेत. स्त्री-मुक्ती चळवळ, कामगार चळवळ वगैरे प्रकारे आजचा समाज जागा आहे. धर्मांधता प्रतिबंधक मंडळ, जातियता विरोधी मंडळ-संस्था, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुरोगामी समाज प्रबोधन संस्था वगैरे कार्ये गेल्या शतकातील प्रबोधन जीव धरून आहे, हे दर्शवते. ही कार्ये लोकांतून पुढे येत आहेत. यातून पक्षीयता दूर ठेवली पाहिजे. निवडणुकांचे मतभेदी विघटनात्मक राजकारण दूर ठेवून समाजसेवकांनी कार्य केले पाहिजे. समाज प्रबोधनाचा संकोच होऊ नये म्हणून समाजसेवकांनी पथ्ये पाळली पाहिजेत. यामुळे होणारा संकोच टळेल व चालू लोकशाही राजकारणाचे अनिष्ट परिणाम दूर करता येतील. आशादायक बाब अशी आहे की पूर्वी पेशवाईत समाजपरिवर्तन सरकारीरीत्या रोखले जात असे. मोगलाईतही असे होई. पण आजची सरकारे प्रतिगामी राहू शकत नाहीत. **एकविसावे शतक आले आहे. नवा विचार नवी माध्यमे आणि नवी पद्धत समाज प्रबोधनाचा संकोच होणार नाही. अशी ती लोकांनी अवलंबिली पाहिजे.** समाज परिवर्तनाला म्हणजे समाजसुधारणेला पूरक असे कायदे आता मुबलक आहेत. सरकार स्वतः यांची अंमलबजावणी करू शकत नाही म्हणून बालविवाह, हुंडा, जठरविवाह, द्विभार्याप्रतिबंधक कायदा वगैरे समाज प्रबोधक कायदे जे मोडतील त्यांवर लोकांनीच दावे गुदरले पाहिजेत. हे कार्य सांघिकप्रकारे (संस्थेच्याद्वारे) शक्य होईल. पुढारी म्हणवणारांची संख्या वाढत आहे. पण एकएका कार्यास वाहून घेतलेले सच्चे-कार्यकर्ते अपुरे पडत आहेत.

## मंथनाचा शेवट

प्रबोधनाचा संकोच आकाशवाणी व दूरदर्शनदेखील करीत असते. दूरदर्शनवर व आकाशवाणीवर संतांची पुरोगामी पदे व अभंग फारसे म्हटले जात नाहीत संतांचे पुष्कळ अभंग, पुरोगामी आहेत की जे धर्म व समाजप्रबोधन करू शकतील. दूरदर्शन लोकांच्या मागणीनंतर म. फुले यांचा एक अखंड गायिलेला ऐकला. तोही चळवळ झाल्यावर! रोज आकाशवाणीवर चिंतनाचे विषय लागतात, त्यातही प्रबोधक जे होऊन गेले, त्यांच्या विचारांचा समावेश करता येण्यासारखा नाही काय? पण ही दोन्ही साधने पुरोगामी प्रबोधन टिकवण्यास व अंधश्रध्दा घालवण्याच्या कामी सरकार वापराव्या तितक्या मर्यादित प्रकारे का होईना, वापरत नाही. ही दोन्ही साधने आता खेड्यापाड्यांपर्यंत व झोपडपट्ट्यापर्यंत पोहोचली आहेत. शहरी उच्चभ्रूंच्या कार्यक्रमाला जास्तीत जास्त स्थान दिले जाते. पांढरपेशे व शहरी यांचा फायदा उठवतात. ग्रामीण भाग व ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब क्वचित आढळते.

शिक्षणक्रमदेखील प्रबोधनास पूरक असावा तसा नाही. शिक्षणाच्या माध्यमातून भारताचा स्वातंत्र्य आल्यावर जेवढा पालट व्हावयास पाहिजे तेवढा होत नाही. लोकशाहीत (पक्षीय) राजकारण करून सरकार सत्तेवर येते. पण सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यक्रमात व जाहिरनाम्यात समाज प्रबोधनाच्या मुद्यावर भर नसतो. राजकारणाला व आर्थिक प्रश्नांना सर्वोच्च स्थान प्राप्त झाले. आता 'धर्म' गौण व प्रासंगिक झाला. 'रेनॉसन्स'चा हा काळ नव्हे. तथापि समाज स्वतः प्रबोधनशील व परिवर्तनशील असतो. तो काळानुरूप बदलतो एवढेच. पण समाजाची परिवर्तनशील गती ही गजगती आहे. संकोच होण्यास येथील समाजदेखील जबाबदार आहे. फक्त लोकशाहीतील सत्तास्पर्धेचे राजकारणच जबाबदार धरता येत नाही. संकोचाची कारणे विविध आहेत. महाजन-जास्तीत जास्त लोक ज्या गतानुगतिक मार्गाने जात असतात, त्या मार्गाने सर्वसामान्य लोक जातात.

सत्य असत्याशी। मन केले ग्वाही।

मानियेले नाही बहुमता।

या व्रताचे पालन करणारे फारच थोडे आढळू लागले आहेत. राष्ट्रपिता म. गांधी यांच्या प्रबोधनाचे व परिवर्तन पुष्कळ मुद्दे होते. राजकीय प्रबोधनाबरोबर सामाजिक प्रबोधनाला तितकेच त्यांनी स्थान दिले. **पण म. गांधींकडे चालू लोकशाही राजकारणाचेच दुर्लक्ष झाले आहे.** स्वातंत्र्य लढ्यास स्त्रियांनी देशभर मोठा भाग घेतला होता. आता तेवढी जागृती स्त्रियांत राहिली नाही. फारच थोड्या स्त्रिया लोकशाही राजकारणामध्ये हल्ली दिसतात.

।। हा तो नव्हे काही। निराशेचा ठाव।।

आज उच्चतम मूल्ये मागे पडत आहेत. प्रबोधनात आता नैतिक प्रबोधनाला मोठे स्थान हवे आहे. संत व आधुनिक धर्म-सुधारक प्रबोधक होते. लोकशाही राजकारणात प्रबोधनाचा उत्तरोत्तर संकोच होत आहे. तरी पुरोगाम्यांनी निराश न होता प्रबोधन हे टिकवून वाढवले पाहिजे. **जयपराजयाचा-यशापयशाचा विचार न करता उच्चतम मूल्ये जोपासण्याची पूर्वी नव्हती, एवढी आता व यापुढे गरज आहे.** यासाठी सर्व राजकीय पक्षांनी देखील समाज परिवर्तनाचा आचारविचार करता येईल तेवढा करावा. ह्यांनी धार्मिक बुवाबाजीबरोबर राजकीय बुवाबाजीविरुद्धही लढावे.

**देशात खेड्यापाड्यांपर्यंत बुद्धिवाद व बुद्धिप्रामाण्य आणि विज्ञानात्मक दृष्टी वाढवण्याची मोठी गरज आहे.** कोणतेही प्रबोधन बुद्धीच्या वापरामुळे वाढते किंवा निर्माण होते. वाढती महागाई यांसारख्या नव्या नव्या अडचणी व बेकारी यामुळे पारिवारिकताच ओलांडणारांना फार कठीण जाते. उत्तरोत्तर लोक आत्मकेंद्रीत होत आहेत. श्रीमंत जादा श्रीमंत होत आहेत व गरिबांची संख्या वाढत आहे. पुढारलेले जास्त पुढारत आहेत.

दुसऱ्या महायुद्धामुळे इंग्रज देशाचा राजकीय ताबा सोडून अपेक्षेपेक्षा लवकर गेला. आधी राजकीय स्वातंत्र्य या मुद्याला यश आले. हेच खरे. पण यामुळे बजेटावर ताबा आला. हरितक्रांती वगैरे दृष्टीने विकास होत आहे. परंतु जरूर त्या प्रकारे माणसाच्या मनाचा प्रबोधनाद्वारे विकास वाढत नाही. परंपरागत धर्म लोकांत नैतिक प्रेरणा निर्माण करू शकत नाहीत. भ्रष्टाचार रोखणे हे सरकारला शक्य झाले पाहिजे. स्वातंत्र्य आल्यावर व विशेषतः सन १९५० नंतर झपाट्याने काळ बदलत आहे व स्वातंत्र्य पूर्व काळाशी स्वातंत्र्योत्तर काळाचा उत्तरोत्तर संबंधही कमी कमी होईल. लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याचा मुद्दा प्रमुख असतो. पण खेड्यापाड्यांत निवडणूक काळात दहशत निर्माण केली जाते. पक्षांच्या कचेऱ्या व त्यांचे कार्यकर्ते यांचे अस्तित्व फक्त निवडणूक काळात दिसते. पुढे लोकप्रतिनिधी व मतदार आणि पक्षांच्या कचेऱ्या यांचा संबंध तुटतो. **लोकशाही राजकारण हेच मुळी निकोप नाही. मग त्यात नवे प्रबोधन निर्माण होत नाही व मागील प्रबोधन निर्माल्यवत होत आहे, यात नवल नाही,** राजकारणदेखील स्वदेशापुरते मर्यादित राहिले नाही; ते जागतिक राजकारणावर अवलंबून असते. गेल्या शतकात सर्वच युरोप-अमेरिका देशांत व अशिया खंडात प्रबोधन निर्माण झाले होते. यांचाच दूरपरिणाम भारतावर होऊन ब्राह्मोसमाज-प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज निर्माण झाले. त्या काळात 'एकेश्वरवाद' व धार्मिक उदारमतवाद हा मुद्दा होता. मूर्तिपूजक अशा आपल्या देशात या नवयुग समाजाची डाळ शिजली नाही. हे नवल नव्हे! सर्वांचीच संस्कृती परंपरेने जाती विघटित व जाती अधिष्ठित आहे. जात मनात लपून राहते.

राष्ट्रीय एकात्मता-निधर्मीवाद यासारखे नवे मुद्दे पुढे आले आहेत हे खरे; ते लोकशाही मार्गाने नव्या पिढीला शिकवले पाहिजेत. **जातीयतावादी-सांप्रदायिक पक्षाचा पक्ष म्हणून निवडणुकीत उभे राहण्याची बंदी केली पाहिजे.** जास्तीत जास्त शिखांना खलिस्तान नको आहे, हे जर खरे असेल तर हिंसाचारी अतिरेक्यांबरोबर बोलणी करण्यात हशील नाही. **कोणत्याही सरकारची ध्येयधोरणे राष्ट्रीय एकात्मतेच्याविरूद्ध असता कामा नयेत. भारतीयांचे जे काही हित व्हावयाचे आहे, ते सत्तेच्या सदुपयोगामुळेच होणार आहे. म्हणून राजकीय प्रबोधन व धार्मिक-सामाजिक प्रबोधन भिन्न समजणे यापुढे अवघड आहे. प्रबोधनाचे स्वरूप पुढे सर्वांगीण राहील. वेगळा नवा धर्म स्थापण्याची गरज संपली आहे. जुने धर्मच देशहिताच्या**

**आड येणार नाहीत, याची काळजी घेण्याची नवी गरज आहे. राजदंड म्हणजे केंद्रीय सत्ता ढिली असणे, हेच देशाचे दुर्दैव होय. लोकशाही राजकारण (सर्वच पक्षांचे) निकोप निरोगी होईल तर स्वातंत्र्यातील समाजप्रबोधन (नव्या प्रश्नासाठी नवे) साकार होऊन त्याद्वारे देखील भारताचा जरूर तो कायापालट होईल.**

(समाज विज्ञान प्रबोधिनीचे 'युगकर्ता' मासिक, नोव्हेंबर १९८६, औरंगाबाद, संपादक प्रा. बा. ह. कल्याणकर)

******

# १५ प्रख्यात चिकित्सक सुधारक- ‘दीनबंधू’ राजारामशास्त्री भागवत

## उपेक्षित, स्वतंत्र व आगळा सुधारक

गरिबांनी संघटित होऊन त्यांच्या उत्थानासाठी व दास्यविमोचनार्थ चालू केलेल्या चळवळी इतिहासात फारच थोड्या आढळतात. बहुसंख्य गरिबांच्या चळवळीचा, योग्य तो अर्थ जाणणारे व तिला धैर्याने खतपाणी घालणारेदेखील क्वचितच भेटतात. अशा दुर्मिळ, थोर, धैर्यवंत व्यक्तींपैकी राजारामशास्त्री भागवत होऊन गेले. अर्थात ते उपेक्षितच राहिले. ज्यांच्या उत्थानासाठी त्यांनी लढा दिला; त्यांच्या वंशजांना म्हणजे आजच्या नव्या पिढीला, त्यांची फारशी माहिती नाही; ते विस्मृत आहेत. पहिल्या युद्धानंतर येथे कार्ल मार्क्सचे विचार आले. तत्पूर्वी जी धार्मिक, सामाजिक आंदोलने चालू होती. त्यांना समाजप्रबोधनाच्या चळवळी म्हणून संबोधले जाते व समाजप्रबोधकांना समाजसुधारक म्हणून संबोधितात. Religious criticism is the begining of all criticism ह्या कार्ल मार्क्सच्या मताप्रमाणे म. फुले, लोकहितवादी व परमहंस सभेचे संस्थापक दादोबा पांडुरंग या तिघांनी गेल्या शतकात धर्मसमीक्षेला सुरुवात केली. जोतीबांची समीक्षा जास्तीत जास्त ऐहिक (सेक्युलर) व वर्गीय आशय असणारी अशी सामाजिक होती. तथापि फक्त एकेश्वरवादाच्या दृष्टीने हे तिघेही राममोहन राय यांच्या परंपरेतीलच म्हणावेसे वाटतात. दादोबा पांडुरंगांचे ‘धर्मविवेचन’ (सन १८६८) पुस्तक व जोतीरावांचे ‘सार्वजनिकसत्यधर्म’ पुस्तक (सन १८९०) यामध्ये तत्त्वतः साम्य आढळते. **पण राजारामशास्त्री भागवत हे एक स्वतंत्र व आगळे सुधारक झाले.** ह्यांनी म. फुले विचार प्रवाहाची सक्रिय तरफदारी केली. न्या. रानडे यांच्या हर एक कार्याशी राजारामशास्त्री यांचा संबंध आला. रानडे प्रार्थना समाजाचे पुरस्कर्ते व श्रेष्ठ पुढारी होते. राजारामशास्त्री यांचे चुलते भास्कर हरी भागवत (ज. १८३७-मृ. १८९४) हे प्रार्थना समाजाच्या संस्थापकांपैकी एक होते. ह्यांच्यामुळे राजारामशास्त्री व रानडे यांचा फार जवळचा संबंध आला. तरी राजारामशास्त्री प्रार्थनासमाजाशी सर्वथैव एकरूप झाले नाहीत. चिपळूणकर-टिळक यांच्याप्रमाणे राजारामशास्त्री समाज व धर्मसुधारकांचे विरोधक मात्र नव्हते. मात्र टिळक-चिपळूणकर संप्रदायात राजारामशास्त्री मोडत नाहीत. आगरकरांप्रमाणे ते अज्ञेयवादी नव्हते. महाराष्ट्रातील विद्येत मागासलेल्या लोकांची विद्याप्रसारक चळवळ यांचा रानड्यांचा

संबंध आला. राजारामशास्त्री यांनी रानड्यांच्या मृत्यूनंतरही हा संबंध सतत वर्धिष्णु ठेवला. राजारामशास्त्री यांचा कल सत्यशोधक समाजाकडे फार होता. एवढेच नव्हे, **तर ते एक ब्राह्मणेतर चळवळीला वैचारिक व कृतीच्याही दृष्टीने खतपाणी घालणारे प्रख्यात विवेकवंत झाले.** यासाठी त्यांनी स्वजनांचा विरोध व टीकाही सहन केली. जोतीबांच्या काळात 'ब्राह्मणेतर' असा शब्दप्रयोग होत नसे, पण राजारामशास्त्री यांच्या लेखनामुळे हा नवा शब्दप्रयोग शाहू काळात होऊ लागला. **राजारामशास्त्री यांनी त्यांचे पांडित्य, विद्वत्ता व स्वतंत्र प्रज्ञा आणि चिकित्सक बुद्धी बहुजनसमाजाच्या जागृतीसाठी खर्ची घातली.** राजारामशास्त्री यांचे ह्या चळवळीशी जे संबंध आले, त्यांचे येथे एकत्रित दर्शन घडवावयाचे आहे. राजारामशास्त्री हयात असतानाच त्यांच्या "मऱ्हाठ्यांसंबंधी चार उद्‌गार" ह्या गाजलेल्या पुस्तकावर 'नेटिव्ह ओपिनियन'मध्ये परीक्षण देणाऱ्या एका संस्कृत पंडिताने जोतीबा फुले, 'दीनबंधू' व भागवत यांची गणना एकाच माळेत केली होती. राजारामशास्त्री ब्राह्मणतेरांचे प्रवक्ते होते यात संशय नाही. पण ही सर्व चळवळ त्यांना सर्वथा मंजूर नव्हती; तात्त्विक भेद नव्हते, म्हणून ते एक महत्त्वाचे समर्थक होते. पण राजारामशास्त्री यांनी ह्या चळवळीतील अतिरेकी विचार-आचारदेखील दर्शवले आहेत. त्यांचेही दिग्दर्शन नंतर येथे करावयाचे आहे. कोणत्याही समाजाची सेवा करण्यासाठी त्याच समाजात जन्म व्हावयास पाहिजे असे नव्हे.

मोठमोठ्यांना स्वजातीच्या मर्यादा पडल्या. यामुळे त्यांच्या लेखनाला व इतिहास संशोधनालाही लघुत्व आले. ह्याच काळात राजारामशास्त्री यांनी मराठे व तत्सम समाज व त्यांचा इतिहास यांची बाजू घेऊन लेखन केले. ब्राह्मण्य दूर ठेवून हरिजन वगैरे सर्वात मिसळले. त्यांनी फक्त लेखनच केले, एवढेच नव्हे तर कृतीदेखील केली; व म्हणून त्यांचे प्रत्यक्ष कार्य महत्त्वाचे वाटते. सर्व समाजात मिसळण्याच्या कामी त्यांचे जन्मजातीचे अल्पसंख्यत्व आड आले नाही. उलट बहुसंख्यांकांचे म्हणजे बहुजनांचे ते पुढारी म्हणून मानले गेले; गौरवले गेले.

### मऱ्हाठ्यासंबंधी चार उद्‌गार

राजारामशास्त्री व बहुजनसमाज यांचा संयोग होण्यास त्यांनी स्वतंत्रपणे लिहिलेले 'मऱ्हाठ्यासंबंधी चार उद्‌गार' (सन १८८७) हे त्यांचे सडेतोड पुस्तक कारणीभूत झाले. या पुस्तकातील विचार निरनिराळ्या नियतकालिकांमधून, त्यांनी लिहिलेल्या लेखनातूनही व्यक्त होण्याची प्रक्रिया अगोदरच चालू होती. राजारामशास्त्री व जोतीबा फुले समकालीन होते. जोतीबा पुण्यात राहत असत व राजारामशास्त्री यांच्या आयुष्याचा बहुतेक भाग मुंबईस गेला. राजारामशास्त्रींचे घराणे मूळचे कोकणातील कशेळी गावचे. पूर्वज भिक्षुकी करीत असत. राजारामशास्त्री यांचे वडील मुंबईस नोकरीनिमित्त आले. यामुळे राजारामशास्त्री यांना आधुनिक

इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाला. ते मुंबईसारख्या 'कॉस्मॉपॉलिटन' शहरात राहू लागल्यावर त्यांची दृष्टी व्यापक व उदार होत गेली. तो काळ प्रायः सामाजिक चळवळींचा होता; आजकालचे राजकारणी व सत्ताभिलाषी नव्हता. राजारामशास्त्री प्रथम जुन्या मतांचे व वळणाचे होते. चुलते भास्कर हरि प्रार्थनासमाजी होते. यामुळे व रानड्यांच्या समकालीन अनेक समाजसुधारकांबरोबर राजारामशास्त्री यांचा घनिष्ट संबंध आला. म्हणूनही राजारामशास्त्री यांची जुनी मते पालटून ते एक प्रख्यात चिकित्सक सुधारक म्हणून प्रसिद्धीस पावले. रानडे वगैरे सुधारकांशी राजारामशास्त्री यांचा जो घरोब्याचा संबंध आला, तो अखेरपर्यंत कायम राहिला. रानड्यांना ते गुरूच समजत. तरी रानड्यांचा नेमस्त स्वभाव व एकूण 'रानडी वळण' आणि भागवतांची धर्ती यात फरक होता.

**भागवत सत्यशोधक होते.**

राजारामशास्त्री भागवत (ज. १८५१ मृ. १९०८) व जोतीबा फुले (ज. १८२७ मृ. १८९०) ह्या दोघांची गाठ भेट होऊन, परोक्ष व अपरोक्ष संबंध आल्याचे कोठे नमूद झालेले आढळले नाही. 'निबंधमाला' मात्र भागवतांच्या वाचनात आली असावी. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी राजारामशास्त्री यांचा 'भट्ट प्रोफेसर' म्हणून जोतीरावांवरील टीकेत उल्लेख केलेला आहे. प्रतिपादण्याचा मुद्दा हा की राजारामशास्त्री यांनी म. फुल्यांपासून स्फूर्ती घेतली नव्हती. फुल्यांचे प्रयत्न त्यांना पुढे मागे ज्ञात असावेत; मात्र कोणत्याही समकालीन पक्षप्रवाहासंबंधी राजारामशास्त्री यांचे विचार-आचार स्वतंत्र वाटतात. आगरकरांच्या 'सुधारका'त व आगरकरांच्या पश्चात राजारामशास्त्री लिहू लागले. फुल्यांप्रमाणे आगरकराशीदेखील त्यांचा प्रत्यक्ष संबंध आलेला नव्हता. बाबा पद्‌मनजी हे फुल्यांचे कनिष्ठ मित्र व सहाय्यक होते, तसेच राजारामशास्त्री व बाबा पद्‌मनजी यांची ओळख होती. राजारामशास्त्री यांनी म. फुले यांच्यावर कोठे टीका केलेली आढळत नाही. लोकहितवादींच्या 'शतपत्रा'बद्दलही नापसंती त्यांनी व्यक्त केली नाही. उलट अधिकच भर घातली असे म्हणावे लागते.

'मऱ्हाठ्यासंबंधी चार उद्‌गार' हे पुस्तक आता दुर्मिळ झाले आहे. ह्या पुस्तकात अनेक विषय होते. राजारामशास्त्री यांचे बहुतेक लेखन त्यांच्या काळाची सामाजिक अवस्था दाखवते. उदा. "जे ब्राह्मण तुम्हास कुळंबट किंवा शूद्र म्हणतील व तुमच्या वित्तदिकांची अभिलाषा करतील. त्यांचे बरोबर तुम्ही खुशाल वाद चालवावा. भटाशिवाय लग्ने लावण्याची चाल पाहून तुम्ही अतिप्राचीन काळच्या आपल्या पूर्वजांचा कित्ता वळविता हे पाहून आम्हास फार संतोष होतो."

राजारामशास्त्री यांच्या वरील उद्‌गारातील कुळंबट किंवा शूद्र तत्कालीन बोलण्या-चालण्यात वापरली जाणारी परिभाषा आता बहुतेकपणे इतिहासजमा झाली आहे. भिक्षुकी करणारे लोक समाजात मिळून मिसळून वागतात. त्या वेळचे कडक सोवळेओवळे राहिले नाही. स्पृश्यास्पृश्यांत म्हणजे सवर्णातही जी अस्पृश्यता पाळण्याची वहिवाट होती, ती राहिली नाही. अस्पृश्यता व जातिभेद हे जाऊ शकतात, हेदेखील समाजसुधारणेचा इतिहास दाखवून देऊ शकतो. जे थोडेफार परिवर्तन झाले ते आकाशातून एकदम पडले नाही. सामाजिक सुधारकांचे प्रयत्न त्यास उपयोगी झालेच. राजारामशास्त्री यांचे वर उद्‌धृत केलेले उद्‌गार सत्यशोधकांचे पूर्वी बंड का होऊन गेले, याची धार्मिक, सामाजिक व आर्थिक कारणे दर्शवतात. राजारामशास्त्री यांना पिळवणूक नको होती. राजारामशास्त्री वाचले की, मागील शतपत्रांची आठवण येते. राजारामशास्त्री यांचे उद्‌गार पुढीलप्रमाणे होते-

“तुमच्या पूर्वजांचा अतिप्राचीन काळी भिक्षुक वर्ग निराळा नव्हता.” ‘जसजसा मराठ्यांच्या इतिहासाचा फैलाव होत जाईल तसतसा ह्या ठळक गोष्टी क्षत्रियांच्या मनात विशेष वागतील.’ आता झाली गोष्ट झाली, हे खरे आहे पण तशी गोष्ट पुनः होऊ न देण्याविषयी आम्हा ब्राह्मणास फार जपले पाहिजे व शाहूस अभिषेक होईपर्यंत मराठ्यांनी केलेल्या महापराक्रमावर झाकण टाकून जात्यभिमानाने पेशव्यास यश आलेल्या शूद्र लढायांच्या फुशारक्या मारण्याचे सोडून दिले पाहिजे. ब्राह्मणाविषयी इतर जातींची पूज्यबुद्धी असते.. इ.”

रावबाजीचे खरे ऐतिहासिक स्वरूप बदलून टाकण्याचे जे प्रयत्न होत होते, त्यासंबंधी राजारामशास्त्री यांनी कडक निषेध केला व पुणेकर पंडितांची व इतिहास संशोधकांची इतराजी ओढवून घेतली. काही काही ठिकाणी राजारामशास्त्री हे फुले, लोकहितवादी व आगरकर यांच्याहीपेक्षा धारदार लेखणीचे होते, असे म्हणणे क्रमप्राप्त होते.

जोतीबा फुले यांच्या देखत व त्यांच्या मरणानंतर शाहू कालखंडाचा नवा उदय होण्यापूर्वी राजारामशास्त्री व सत्यशोधक चळवळ यांचा संबंध आला. यावेळी लोकहितवादी, आगरकर व रानडेदेखील दिवंगत झालेले होते. बहुजन समाजाच्या नवजागृतीस पाठिंबा देण्याचा या तिघांचा पवित्रा राजारामशास्त्री यांच्या तीव्र व निर्भिड स्वभावामुळे वाढवला गेला. मांसाहाराचा क्रियाशील पुरस्कार व मुक्त रोटी व्यवहार यामुळे राजारामशास्त्री हे घरी-दारी लोकांना जवळचे वाटले. हे धोरण व वागणे पुण्याच्या ‘ज्ञानप्रकाश’ वाल्यांना व मुंबईच्या “इंदुप्रकाश” संबंधितानाही जमणारे नव्हते. राजारामशास्त्री फारच आश्चर्यकारक व विस्मयकारक वाटतात.

## राजारामशास्त्री व वेदोक्त प्रकरण

'मऱ्हाठ्यासंबंधी चार उद्‌गार' ह्या पुस्तकामुळे सयाजीराव गायकवाड यांचे देखील लक्ष राजारामशास्त्री यांच्याकडे वेधले असे म्हणणे भाग पडते. बडोदे व राजारामशास्त्री यांचा घनिष्ठ संबंध प्रथम आला. राजारामशास्त्री यांची वैदिक धर्म व उपनिषदे यांच्यावर नितांत श्रद्धा होती. उपनयन, विवाह इत्यादी संस्कार वैदिक मंत्रांनीच यथायोग्य होऊ शकतात, असे त्यांचे मत होते. राजारामशास्त्री यांचा सत्यशोधक समाजाविषयीचा आदर 'स्वयंभू' होता, तशीच वैदिकधर्मावरील त्यांची श्रद्धा दयानंदांपासूनच निर्माण झाली नव्हती ! राजारामशास्त्री आर्यसमाजी नव्हते. क्षत्रियांचे अस्तित्व व वेदोक्त हक्काबद्दलची सर्वांना समान संधी असण्याचे राजारामशास्त्री यांचे धोरण प्रथम सयाजीराव व नंतर शाहूमहाराज यांना अत्यंत जवळचे वाटले. डॉ. भांडारकर यांनी सयाजीराव व शाहू यांच्या मतांना व क्षत्रियत्वाला पुष्टी दिली व आधारही दाखवले. राजारामशास्त्री यांनी पुढे मजल नेऊन कोल्हापूरच्या मराठा बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांच्या मुंजी (उपनयने) वेदोक्त पद्धतीने केल्या. बेळगाव वगैरे ठिकाणी जाऊन श्रावण्या व उपनयने जाहीरपणे केली. वेद व वेदोक्त यांचा कृपणपणा नाहीसा करण्याचा असा प्रयत्न केला. लेख लिहिले असेच नव्हे तर सडेतोड व्याख्याने अनेक केली.

वेदोक्त प्रकरण (१९०१ ते १९०७/८) हे आज सर्वांनाच दुर्दैवी वाटेल. वेदोक्ताचा आग्रह शाहू महाराजांनी फक्त त्यांच्या राजघराण्यापुरताच धरला होता. यासंबंधात श्री. विठ्ठलराव घाटे लिहितातः- "राजारामशास्त्री भागवत काही काळपर्यंत मुंबईहून दरमहा कोल्हापुरास येऊन मराठा विद्यार्थ्यांना गायत्री मंत्र शिकवत होते.. बेळगावास गेले म्हणजे रामतत्त्व प्रेसचे मालक आबाजी रामचंद्र सावंत यांच्याकडे उतरत आणि मराठ्यांच्या मुंजी लावत.. अमक्या अमक्या गाडीने येतो. न्हावी तयार ठेवा.. ('दिवस असे होते' - घाटे यांचे आत्मचरित्र पा. २९४) मराठे क्षत्रिय आहेत, अशी ग्वाही राजारामशास्त्री यांनी दिली व वेदोक्त प्रकरण महाराष्ट्रात रंगले. टिळक व शाहू यांच्यामध्ये अंतर वाढले. जे हक्क आपण इंग्रजांपाशी मागतो, तसेच हक्क आपण अब्राह्मणांना दिले पाहिजेत असे मत राजारामशास्त्री यांचे होते. यामुळे जुन्या विचारांचे पंडित विजापूरकर, राजवाडे, वाईचे भाऊशास्त्री लेले (सं. 'धर्म') व खुद्द 'केसरी' ह्यांच्या टीकेचा विषय म्हणून राजारामशास्त्री प्रख्यातीस चढले. राजर्षी शाहू महाराजांनी मुत्सद्दीपणाने त्याना अधिकाधिकपणे जवळ केले. डॉ. कुर्तकोटी जेथे डगमगले तेथे राजारामशास्त्री कणखरपणे उभे राहिले. राजारामशास्त्री वादळी लिहीत व बोलत. स्वतःला 'मऱ्हाठा' म्हणवून घेण्यात भूषण मानीत.

'वेद व शिवाजी' हे दोन मुद्दे गेल्या शतकात व ह्या शतकातील प्रथमार्धात जे समाजप्रबोधन झाले, त्यात स्फूर्तिप्रद होते. वेदोक्त प्रकरणामुळे ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळीला नवे उधान आले. राजारामशास्त्री यांची दृष्टी डोळस होती. मन नि:पक्षपात व नैतिकपणे खंबीर होते. त्याग व कळकळ होती. सर्वांबरोबर ते अन्नोदक घेण्यास उघडपणे तयार असत व घेतही असत. जोतिबांची क्रियाशीलता त्यांच्यात दिसली. बोलघेवड्या सुधारकांची भागवत कानउघाडणी करीत. बडोद्याच्या वेदोक्त प्रकरणात पुण्याच्या 'केसरी' ने सयाजीरावांवर टीकेची झोड उठवली. सयाजीरावांनी ह्याच काळात भिक्षुकांना वाटण्यात येणारी 'खिचडी' बंद केली. पौरोहित्याचा अधिकार अब्राह्मणांना आहे, असे राजारामशास्त्री यांनी प्रतिपादले. राजर्षी शाहू यांनी 'क्षात्रजगद्‌गुरु पीठ' स्वतंत्र स्थापले. याचे कारण म्हणजे राजारामशास्त्री यांचे विचार व आचार प्रभावी ठरल्याचे साक्षात पुरावे होत. राजारामशास्त्री यांनी नेतृत्वदेखील केले. मात्र शाहू महाराजांचे सर्वच त्यांनी मान्य केले नाही. निर्बंध घातल्यामुळे 'कोल्हापूरचा इतिहास' लिहिण्याची शाहू महाराजांची इच्छा त्यांनी निर्भीडपणे अमान्य केली.

## 'दीनबंधू' पत्र व राजारामशास्त्री

राजारामशास्त्री व 'दीनबंधू' साप्ताहिक यांचा 'सुबोधपत्रिके'प्रमाणेच जवळचा संबंध आला आणि तो अखेरपर्यंत टिकला. सन १८७७ सालापासून 'दीनबंधू' साप्ताहिक सत्यशोधक समाजाच्या प्रसारार्थ निघत असे. सन १८८१ ते १८९७ अखेरपर्यंत नारायणराव लोखंडे यांनी कामगारांचा कैवारी म्हणून मुंबईस उत्साहाने 'दीनबंधू' चालवला. याच काळात 'सुबोधपत्रिके'चे संपादन प्रख्यात राजकीय ऋषी मामापरमानंद करत होते. लोखंडे, भागवत व परमानंद यांचा स्नेह असे. लोखंडे यांच्या निधनानंतर सन १९०१ सालापासून कै. भास्करराव जाधव हेच पत्र कोल्हापूरहून काढत असत. "स्मार्त काळातील कित्येक गोष्टी (हप्ता १)" ता. १७-६-१९०२ च्या अंकात राजारामशास्त्री यांनी लिहून प्रसिद्ध केला. पुढील हप्ते याच 'दीनबंधू'मध्ये आले. सन १९०३ ते १९०८ अखेरपर्यंत वा. लि. बिर्जे हे 'दीनबंधू'चे समर्थ असे संपादक झाले. ह्या काळात राजारामशास्त्री यांनी 'दीनबंधू'मधून आमरण लेखणी चालवली. याच लेखातून ब्राह्मणेतरांच्या बाजूची त्यांची अभिव्यक्ती व्यक्त झाली. क्षत्रियांचे अस्तित्व, चित्पावन व कऱ्हाडे, हिंदू व हिंदूधर्म, ब्राह्मण म्हणवणारांचा पिंड, श्रावणी, लग्न व विवाह, महाभारत, वैश्यवर्ण हे त्यांचे लेख 'दीनबंधू'त आले. त्यांचे 'दीनबंधू'मधील सर्वच लेखन उपलब्ध नाही. राजारामशास्त्री यांचेच एक विद्यार्थी वि. मा. नवले ह्यांनी १९०९ ते १९१७ पर्यंत बंद पडलेला 'दीनबंधू' पुनः पुण्यास चालू केला व त्यातून राजारामशास्त्री यांचे काही लेख (ऐतिहासिक गंजिफा नामक) पुनर्मुद्रित केले. राजारामशास्त्री

वारल्यानंतर 'दीनबंधू'ने दि. ११ जानेवारी, १९०८ च्या अंकात श्रद्धांजली वाहिली. "दीनबंधू" मधील लेखामुळे राजारामशास्त्री यांनी ह्या पत्राचे महत्त्व वाढवले.

**'दीनबंधू'ची कानउघाडणी**

'दीनबंधू' मध्ये लिहिणारे पहिले नांगरे लेखक फुले, भालेकर व लोखंडे यांचे लेखन तिखट असे. "वार्ताहर" नामक एका पत्राने 'दीनबंधू'विषयी स्पष्टपणे लिहिले होते की- "ब्राह्मणाची निंदा करण्याकरता 'दीनबंधू'चा अवतार आहे, म्हणून त्या अवताराचा अंमल मोडण्याकरिता 'वार्ताहरा' चा अवतार आहे." दि. १२ जून, १८८७ च्या वार्ताहरातील हे संपादकीय उद्‌गार होते. 'निबंधमाला' (पुणे), 'विविधज्ञानविस्तार' (पुणे) 'सत्यप्रकाश' वगैरे पत्रावरून 'दीनबंधू'चे ब्रह्मद्वेष्टे स्वरूप होते. हे आजही समजू शकते. अशा ब्रह्मद्वेष्ट्या पत्राशी राजारामशास्त्री यांनी एकरूप होऊन सतत संबंध राखला. कारण प्रार्थना समाजाची 'सुबोधपत्रिका', 'केसरी' व 'काळ' यांच्याशी त्यांचे पटले नाही. फक्त "दीनबंधू व सत्यशोधक समाज" यांच्याशी पटले. तरी ह्याची सर्व धोरणे राजारामशास्त्री यांना पसंत नव्हती व त्यांनी त्यांच्या अनेकवार कानपिचक्या घेतलेल्या आढळतात. उदा. "महाराष्ट्रात क्षत्रियांची उन्नती करू पाहणारा 'सत्यशोधक समाज' व 'दीनबंधू' यांच्या संबंधाने दोन शब्द लिहिले पाहिजेत. दोहोंसही आमची हात जोडून सविनय विनंती आहे की, उगीच ब्रह्मद्वेष करणे व ब्राह्मणांच्या विरुद्ध क्षुल्लक व कुत्सित मनाच्या पुरुषांनी लिहिलेल्या कचऱ्याच्या पेटीत टाकण्यासारख्या लेखास एकसारखी सतत जागा देऊन एकमेकांमधील द्वेष माजविणे यात बिलकूल शहाणपण नाही". आजही हा इशारा मार्गदर्शक ठरणारा आहे. जुने धर्मग्रंथ सर्वथैव टाकाऊ नाहीत; त्यातील समाजसुधारणांना जो भाग अनुकूल होता तो राजारामशास्त्री यांनी आधारास घेतला. राजारामशास्त्री यांची मते व लेखन कोणाचा द्वेष वाढवण्यासाठी नव्हते. त्यात हिशेबी व न्याय भाग बराच आहे.

जुन्या 'दीनबंधू' प्रमाणे आज त्या धर्तीचे कोणी लिहित-बोलत नाही. तरी अधोगतीचे कारण म्हणून ब्राह्मणच असे आजही ब्राह्मणेतर समजतात व दलित लेखक उघडपणे लिहितात व बोलतात. राजारामशास्त्री यांना बहुजनसमाजाची उन्नती व अस्पृश्योध्दार मान्य होता. तरी ब्राह्मणवाद व स्पृश्य व स्पृश्येतरवाद अमान्य होता. कर्मवरी शिंदे यांचे नेमके मत राजारामशास्त्री यांच्याप्रमाणे होते. महर्षी शिंदे व राजारामशास्त्री यांचा प्रार्थनासमाजामुळे मुंबईस संबंध आला होता. दोघेही 'सुबोधपत्रिके'चे लेखक होते. पण शिंद्यांनी ओळख असूनही 'दीनबंधू'त कधीच लिहिले नाही. दोघेही अस्पृश्योद्धारक होते. देशहितबुद्धीने शिंदे 'महार' झाले व भागवत 'अब्राह्मण' झाले.

‘दीनबंधू’ला राष्ट्रीयसभा, सार्वजनिक सभा वगैरे वरिष्ठ वर्गियांचे प्रयत्न मान्य नव्हते. अब्राह्मण पुरोहिताकडून चालवलेले विधी-लग्ने वगैरे व विद्येत मागासलेल्या वर्गाच्या सभा-परिषदा व मुंबईतील कामगार वर्गाची दुःखे व उणीव व्यक्त करणे असे ‘दीनबंधू’चे पहिले स्वरूप असे. ब्राह्मणांना जसे जन्मतः ब्राह्मण म्हणवता येते, तसे क्षत्रिय वैश्यांना देखील परंपरेने जन्मतः म्हणवता का येऊ नये हा राजारामशास्त्री यांचा खडा सवाल असे. भागवत प्रभावी लेखक होते. त्यांच्या जनतासंपर्क मोठा होता. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचा परिणाम महाराष्ट्रावर विशेषतः बहुजनसमाजावर  होतच राहिला, त्यातून जागृती वाढली.

### राजारामशास्त्री यांचा प्रभाव

सन १९११ साली पुण्यास पहिली सत्यशोधक परिषद झाली. मोतीराम तुकाराम वानखडे-स्वागताध्यक्ष यांनी राजारामशास्त्री यांच्या ‘मराठ्यांविषयी चार उद्‌गार’ (प्रथमावृत्ती स. १८८७) ह्या पुस्तकाला उतारे घेऊन राजारामशास्त्री यांचा ‘प्रांजळ प्रतिपादक’ असा गौरवपूर्वक  उल्लेख केला. सन १९०६ साली मराठा शिक्षण परिषद व १९११ साली सत्यशोधक समाज परिषद हे नवे उपक्रम चालू होण्यास राजारामशास्त्री यांचे लेखन कारणीभूत झाले. मरणापूर्वी मराठा शिक्षण परिषदेच्या प्रसारार्थ वऱ्हाड वगैरे ठिकाणी त्यांनी दौरा केला. शेतकरी दलित वर्गाची विद्याहीनता, दास्य व गरिबी यांचा त्या काळात राजारामशास्त्री यांच्या ठायी जिवंत कळवळा होता. म्हणून त्यांना ‘दीनबंधू’ म्हणून संबोधिले आहे. **सत्यशोधक चळवळीला ग्रंथाधारसंपन्न असा पाठिंबा राजारामशास्त्री यांनी दिला.** नाहीतर खेड्यापाड्यांतील मराठे-माळी, गवळी, साळी, कोळी, धनगर व सोनार वगैरे मधील प्रथमच लिहू वाचू लागलेल्या पुढाऱ्यांनी ही चळवळ चालवली होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर व प्रो. शि. म. गोळे व तत्सम विवेकवंत ह्या चळवळीतील केवळ विपर्यासाकडेच पाहत होते. पण राजारामशास्त्री यांनी ही चूक सुधारली, छिद्रान्वेषी दृष्टी राजारामशास्त्री यांच्यात नव्हती क्षत्रियांचा वर्णव्यवस्थेतील प्रथम क्रमांक व क्षत्रियांचे ब्रह्मतेज यांचा गौरव राजारामशास्त्री यांनी केला. ब्रह्मविद्या मूळची क्षत्रियांची असेही प्रतिपादिले. मराठी भाषा संस्कृतप्रचुर असण्यापेक्षा ती बाळबोध असावी, हे त्यांचे मत बिर्जे व जाधवराव यांनी ग्राह्य धरिले व सोपे लिहिण्याचा प्रयत्न केला. राजारामशास्त्री असे आधार स्तंभ ठरले. उत्तरोत्तर बहुजनसमाज पुढे येत गेला. म्हणूनही भागवतांच्याबद्‌दल कृतज्ञता व्यक्त करणे, हे एक कर्तव्य वाटते.

राजारामशास्त्री यांची बोचक भाषा पुढे सत्यशोधक वापरू लागले. उदा. ‘सुबोधपत्रिका’ (२७ ऑक्टोबर, १९०१) मध्ये राजारामशास्त्री यांनी लिहिलेले “केसरी विरुद्ध गायकवाड” हे पत्र आढळले. ह्या पत्रात केसरीचे खंडण करताना त्यांनी ‘परशुरामी’ “टिळकी” असे नवे शब्द योजिले आहेत. “रानडी वळण” व “टिळकी वळण” यांतील भेद सांगितला आहे.

विस्तारभयास्तव ह्या लेखातील फक्त आशयच सांगणे भाग आहे. **महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाच्या इतिहासातील राजारामशास्त्री यांचे अष्टपैलू स्थान महत्त्वाचे आहे.** ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळीचा पुरस्कार व प्रसार हा एक पैलू ठरतो. राजारामशास्त्री भागवत कोल्हापूर येथे जाऊन भास्करराव जाधव यांच्या घरी राहिले होते. जाधवरावांनी त्यांच्या संस्कृताच्या पांडित्याचा लाभ घेतला. डॉ. आंबेडकरांसह या सर्वांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. केवळ परोपकार व दया या बुद्धीनेच बहुजनतेच्या व निराश्रितांच्या बाजूने राजारामशास्त्री लढले असे नव्हे, तर समानसंधी व समान हक्क यांच्यासाठी चाललेल्या लढ्यात ते सहभागी झाले. राजारामशास्त्री यांचा काळ, त्या वेळचे प्रश्न व त्यांनी पुरस्कारिलेली वरील चळवळ कालाधीन झाली, तरी त्यांनी ठेवलेले विचारधन म्हणजे एक ज्ञानकोश वाटतो.

(मासिक 'नवभारत', प्राज्ञपाठशाळा, वाई, मार्च १९७८)

******

# १६ यशवंतरावांचे समाजकारण

**(१९ व्या शतकाचे भाष्यकार, थोर विचावंत डॉ. रा. ना. चव्हाण (वाई) यांनी यशवंतरावांच्या 'समाजकारणा'चा वेध घेऊन, राजकारण आणि समाजकारण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत, हे दाखवून देण्याचा प्रयत्न येथे केला आहे." - संपादक 'सुशिपांज')**

यशवंतराव चव्हाणांनी स्वतःसमोर व्यापक समाजकारणाचा महत्त्वाचा आदर्श ठेवला होता, राजकारण म्हणजे निकोप समाजकारण, अशी एक आगळीवेगळी व्याख्या कर्मवीर शिद्यांच्या लेखनात सापडते. समाज निरोगी करणे, त्यामधील विकृती दूर करणे यामुळे समाज प्रगत होतो. उन्नत होतो. शिवाजीमहाराजांच्या वेळचा महाराष्ट्रीय समाज एकसंघ व एकजीवी झालेला आढळला, याचे कारण त्यावेळी मराठी संतांनी महाराष्ट्रीय समाजाची पारमार्थिक पायावर वाढवलेली उंची होय. **हल्ली मात्र निकोप समाजकारण न झाल्यामुळे सामाजिक दुरावे व विकृती सर्वच भारतात वाढत आहेत.** यामुळे राजकारण मार खात आहे. म्हणूनही हा विषय महत्त्वाचा आहे. राजकारणी म्हणून यशवंतराव प्रसिद्ध आहेत. पण त्यांच्या राजकारणाच्या मागे कोणते निकोप समाजकारण होते ते स्पष्ट करण्याचा येथे एक प्रयत्न केला आहे. त्यांचा आदर्श सर्व समाजापुढे ठेवायचा आहे. संरक्षणमंत्री म्हणून केंद्रात गेल्यावर चव्हाण उत्तरोत्तर व्यापक दृष्टीचे झाले.

यशवंतरावांचा जन्म १९१३ मधील होता. साधारणतः सातव्या-आठव्या वर्षापासून सभोवतालची परिस्थिती मोठ्या होणाऱ्या माणसाच्या मनावर परिणाम करीत जाते. १९२० साली लोकमान्य टिळक वारले. १९२२ साली कोल्हापूर राजर्षी शाहू निजधामास गेले. महाराष्ट्रात जे आगेमागे सामाजिक वितंडवादाचे वातावरण होते, ते या दोन महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या अकाली मृत्यूमुळे  पुष्कळसे शमण्यास साह्य झाले.  ज्यांच्या दरम्यान हा शापभूत असलेला सामाजिक वाद चालला होता व ज्या थोर नेत्यांमधील हा वाद चालू होता. तेच पडद्याआड झाल्याने, या वादातील जो जोर होता, तो संपला व म. गांधी यांना सार्वजनिक कार्यात या दोन्ही पुढाऱ्यांच्या अनुयायांना व चाहत्यांना आपलेसे करण्याचा मार्ग मोकळा झाला.

यशवंतरावांची पूर्वायुष्यातील जी सोळा वर्षे होती, त्यावेळी वरील परिस्थिती सार्वजनिक क्षितिजावर स्वच्छपणे होती. यशवंतराव हे जन्मजातपणे चोखंदळ होते. त्यांनी त्यांच्यापुढे होत्या त्या सर्व वाटा चोखळल्या व स्वतःची एक वाट सातारा जिल्ह्यात नंतर काढली. 'कृष्णाकाठ' खंड पहिला हा उपलब्ध आहे. म्हणून तो या लेखातील विवेचनास साक्षी ठरतो. पाया ठरतो.

यशवंतरावांना कळू लागणाऱ्या वयात सातारा जिल्ह्यात सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ चालू होती. त्यांचे बंधूच या चळवळीत एक पुढारी होते. 'कृष्णाकाठा'त या सर्व तत्कालीन प्रभावी चळवळीतील इंगित, उणिवा व जाणिवा यांचे ज्ञान यशवंतरावांना पूर्ववयातच झाले होते. सत्ता हातात आल्यावर या चळवळीच्या पाठीमागचा जो 'शिक्षण' हा प्रमुख मुद्दा होता. तो पकडून यशवंतरावांनी शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली. बहुजनसमाजाच्या चळवळीचे भास्करराव जाधव यांच्याप्रमाणे त्यांनी पुढे जरी नेतृत्व केले नाही, तरी त्यांनी सत्तेवर आल्यावर गनिमी काव्याने योग्य ते पवित्रे घेतले की, ज्यामुळे राजर्षी शाहूंनंतर, महाराष्ट्रातील बहुलोक समाज विशेषतः खेड्यापाड्यांतील ग्रामीण समाज अधिक जागृत व अधिक प्रगत झाला. हा राष्ट्रीय प्रवाहात नव्हता. म. फुले व शाहू यांची धारणा अशी होती की इंग्रजी राज्यात सरकाराशी आपण सहकार्य करू तर शूद्रातिशूद्र यांना सामाजिक स्वातंत्र्य मिळेल. शिक्षणाची व व्यवसायस्वातंत्र्याची दारे सर्वांना प्रथमच खुली झाली आहेत. या दृष्टिकोनातून फुले-शाहूच काय; पण डॉ. आंबेडकर यांचे स्वातंत्र्यपूर्वकाळातील राजकारण नेमस्त-मवाळ व केवळ प्रागतिक स्वरूपाचे होते. संघर्षवादी व विद्रोहवादी नव्हते. ब्रिटिश सरकारवर विश्वास व्यक्त करणे हा यांचा सर्वांचा जाहीर पवित्रा होता. हा टिळकांना पसंत नसे. म्हणून अंतर पडले. कराडात टिळक हायस्कूलमध्ये यशवंतराव शिकले. टिळकांविषयी त्यांना पूज्यभाव शेवटपर्यंत होता. तरी यशवंतराव हे टिळकसंप्रदायी नव्हते. म्हणजे त्यांना समाजसुधारणावादी प्रवाहाला विरोध करावयाचा नव्हता. गांधी यांच्यामध्ये समाजसुधारणा, अस्पृश्यतानिवारण व राजकीय सुधारणा यांचा पुरस्कार व पाठपुरावा एकाच वेळी चालल्यामुळे समाजसुधारणावादी पक्षाची एकपरी सोय होऊन, ते म. गांधींच्या जवळ लवकर जाऊ शकले. गांधींचा शिक्षणप्रसाराला व अस्पृश्यतानिवारणाला विरोध नव्हता. टिळकांचेवेळी महाराष्ट्रातील 'फुले-शाहू' यांचा बहुजन समाज टिळकांच्या मागे तेवढासा नव्हता. काँग्रेसपासून लांब राहण्याची जी कारणे पूर्वी होती, ती गांधीकाळात संपुष्टात आली. गांधी यांची स्त्रीविषयक मतेदेखील समाजसुधारणेला प्रतिकूल नव्हती. यशवंतरावांचे समाजकारण जाणण्यासाठी ही

सर्व ऐतिहासिक, सामाजिक अवस्था चांगली जाणून घेतली पाहिजे. यशवंतरावांनी 'कृष्णाकाठा'त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला 'खाकसार' म्हणून संबोधिले आहे. कर्मवीर शिंदे तर धर्म व समाज सुधारणावादी होते.

## कर्मवीर शिंदे व यशवंतराव

१९१७ सालापासून कै. वि. रा. शिंदे बहुजन समाजाला सांगत होते की, 'तुम्ही काँग्रेसमध्ये जा' राष्ट्रीय प्रवाहापासून दूर राहू नका, शिंदे राजकारणात व समाजकारणातही जहाल होते. म्हणून ते मवाळ व ब्राह्मणेतर पक्षाचे नेते झाले नाहीत. परंतु सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीचे एक सहानुभूतीदार समीक्षक व सल्लागार होते. यशवंतरावदेखील विरोधक नव्हते. पण त्यां दोघांना फक्त ब्रह्मद्वेष आवडत नसे. शिंद्यांनाही केवळ ब्राह्मण विरोध आवडत नसे, या दोघानांही उच्चभ्रूंच्याविषयी वागणुकीचा अनुभव आला होता. 'कृष्णाकाठा'त असे काही कटू अनुभवाचे नमुने यशवंतरावांनी दिले आहेत. पंक्तीप्रपंच यशवंतरावांनीदेखील गिळला होता ! जवळकरांचे कऱ्हाडला झालेले भाषण यशवंतरावांनी ऐकले होते व त्यांच्यात टिळकद्वेषी व ब्रिटिश-धार्जिणे राजकारण यशवंतरावांना दिसले. म्हणून ते जवळकरांच्या चळवळीपासून संपूर्ण दूर राहिले. फार काय साताऱ्याचे भाऊराव पाटील यांचेजवळही ते अगोदर फारशे मुळीच गेले नव्हते. यशवंतराव व भाऊराव एक झाले, त्यावेळचा काळ शे. का. प. संपण्यात जमा होण्याचा जवळ जवळ होता. फार काय शे. का. प. चे अनेक पुढारी यशवंतरावांनी मुत्सद्दीपणाने काँग्रेसमध्ये घेतले. त्यांना मंत्री वगैरे केले. यशवंतरावांनी महाराष्ट्र काँग्रेस देव-देवगिरीकरांच्या कडून स्वतःपूर्णपणे काबीज केली व "काँग्रेस कबज्यात घ्या" व तिच्यामार्फत राष्ट्रीय प्रवाहाद्वारे बहुजनहित साधा" हा जो कर्मवीर शिंद्यांचा सल्ला होता. तो यशवंतरावांनी कार्यवाहीत आणला, ना. खेर व कर्मवीर पाटील यांच्या १९४८ साली गांधीवधोतर जे युद्ध झाले. त्यावेळी खेर यांच्या विरुद्ध उघडपणे यशवंतरावांनी पवित्रा घेतला नव्हता. पण महाराष्ट्र राज्य स्वतंत्रपणे निर्माण झाल्यानंतर व विशेषतः प्रतापगडी शिवाजी पुतळ्याची उभारणी झाल्यानंतर महाराष्ट्र काँग्रेस ही यशवंतरावांच्या पूर्ण कबज्यात गेली. १९६२ पासून त्यांनी पंचायत राज्याचा प्रयोग महाराष्ट्र चालू केला. यामुळेही बहुजनांकडे सत्ता गेली. यशवंतराव हे विठ्ठल रामजीचे, सांप्रदायिक अनुयायी नव्हते शिंदे आध्यात्मिक होते. असे 'कृष्णाकाठा'त त्यांनीच लिहिले होते. पण महाराष्ट्र काँग्रेस कबज्यात घेऊन बहुजनसमाजाचे तिच्याच मार्फत येथे राज्य निर्माण करण्याचे विठ्ठलराव शिंदे यांचे स्वप्न यशवंतरांनी पूर्ण केले. आजही महाराष्ट्रातील सत्ता व जनता काँग्रेसच्या पाठीमागे आहे. १९३० साली स्वतःप्रथम कर्मवीर शिंदे तुरुंगात

गेले. नंतर जेधे-जवळकर-बागल-मोरे वगैरे असंख्य लहान मोठ्यांनी त्यांना अनुसरले. शिंदे १९०६ सालापासून अस्पृश्यतानिवारण्याचे कार्य करत होते. पण त्यांची प्रख्याती व कीर्ती त्यांनी जो सत्याग्रहात भाग घेतला त्यामुळे वर्धमान झाली. शिंदे व जेधे यांचा उल्लेख 'कृष्णाकाठा'त आहेच, अस्पृश्यता-निवारणाच्या गांधी हरिजन चळवळीत यशवंतरावांनी कऱ्हाडला महर्षी शिंदे यांना व्याख्यानास आणले होते. यासंबंधीचे वर्णन दिले आहे. यशवंतराव पुढे उत्तरोत्तर जन्मभर राजकारणात गुंतले होते, हे खरे. पण त्यांच्यावर जो हा अस्पृश्यता-निवारणाचा ठराव शिंद्यांच्याच प्रयत्नाने पास झाला होता. नंतर म. गांधी यांनी काँग्रेसच्या चौदाकलमी कार्यक्रमात अस्पृश्यतानिवारणाला स्थान दिले. याच वेळी स्त्रीसुधारणा व कामगारांचा प्रश्न हेही विषय काँग्रेसमध्ये प्रथम समावेशित झाले. काँग्रेस फक्त राजकीय प्रश्नावर जास्ती चर्चा करी, स्वराज्याची मागणी केली जाई, पण वरील ह्या दोन-तीन ठरावांमुळे काँग्रेसचा समाजसुधारणाविषयक दृष्टिकोन स्पष्ट झाला. चव्हाण यांच्या मनात म. गांधी यांच्याबद्दल लहानपणापासून शेवटपर्यंत आदर होता. १९३२ साली पुणे करार होते वेळी डॉ. आंबेडकर व म. गांधी यांचे मतभेद राउंड टेबल कॉन्फरन्सपुढे विलायतेतदेखील झाले. पुणे कराराच्या वेळी तर गांधींना स्वतंत्र मतदारसंघाची मागणी रद्द व्हावी म्हणून प्राणांतिक प्रायोपवेशन करावे लागले. पुणे करारामुळे डॉ. आंबेडकर व म. गांधी यांचा समझोता होऊन राखीव जागांचे तत्त्व स्वीकारण्यात आले. पुढे १९३५/३६ पर्यंत जवळ जवळ हरिजन चळवळ देशभर चालली, या काळात यशवंतराव विद्यार्थी होते. त्यांच्यावर म. गांधी यांच्या समाजकारणाचा प्रभाव प्रत्यक्षाप्रत्यक्ष झाला असणे अशक्य नव्हते. हरिजन चळवळ ही भारतभर गाजलेली चळवळ होती. चार-पाच वर्षे ती लोकांसमोर होती. १९३९/४० सालात दुसरे महायुध्द चालू झाले व पुढील काळ सर्व राजकारणाचाच जास्त होता. १९४२ सालात सातारा जिल्ह्यात क्रांतिवीर नाना पाटील, यशवंतराव आदिकरून भूमिगतांची चळवळ सुरू झाली व स्वातंत्र्य येईपर्यंत ही दिल्लीपर्यंत फार काय विलायतेतही गाजली. 'यशवंतराव व सामाजिक सुधारणा' हा विषय येथे आहे. महर्षी शिंदे यांना सांप्रदायिक अनुयायी मिळाले नाहीत. ते उपेक्षितच राहिले; पण त्यांचा अस्पृश्यतानिवारणाचा राष्ट्रीय महत्त्वाचा मुद्दा काँग्रेसने घेतला. खुद्द यशवंतरावांनी दलितांचा प्रश्न हा विषय त्यांचा जिव्हाळ्याचा केला. यशवंतराव हिंदुत्ववादाच्या प्रवाहात गेले नाहीत. निधर्मी लोकशाहीचे ते प्रवक्ते व पुढारी होते. सावरकरांपासून यशवंतराव दूरच राहिले.

## रॉयवादी नवमानवतावाद

यशवंतरावांवर सत्यशोधकी ब्राह्मणेतर चळवळ, हरिजन चळवळ यांचा प्रभाव पडला होता व चलेजाव चळवळीतून यशवंतराव उत्तरोत्तर राजकीय क्षेत्रात पुढे येत गेले. 'कृष्णाकाठा'तील कालखंड हा प्रस्तावनाभूत ठरतो. या प्रथम खंडाच्या साहाय्याने यशवंतरावांवरील संस्कार, त्यांची पूर्व घडणजडण यांचा शोध लागतो व सातारा जिल्ह्याचा तत्कालीन इतिहास व त्याचे धागेदोरे समजतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ही सातारा जिल्ह्यातील महत्त्वाची व्यक्ती. १९३२ साली कराड येथे तर्कतीर्थांची अनेक व्याख्याने झाली. पुणे कराराच्या वेळी म. गांधींना येरवडा तुरुंगात अस्पृश्यताविरोधी शास्त्राधार तर्कतीर्थांनी सांगितला होता. तत्त्वज्ञान याअर्थी हिंदुधर्मी अस्पृश्यता मानीत नाही हे सिद्ध केले होते. या काळापासून तर्कतीर्थ परिवर्तनवादी पंडित म्हणून पुढे आले. म. गांधी यांचा मुलगा व राजगोपालाचार्य यांची कन्या यांच्या मिश्र विवाहप्रसंगी तर्कतीर्थांनी पौरोहित्य केले होते. ते स्वतः घरी-दारी अस्पृश्यता मानत नव्हते. त्यांची मते समाजसुधारणेस अनुकूल होती. तर्कतीर्थांनी एम्. एन्. रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रेटिक पक्षाचे प्रवक्तेपण स्वीकारले होते व ते या पक्षाचा दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिरीरीने व प्राणपणाने प्रचार करीत. दोघांची पहिली ओळख होतीच. तर्कतीर्थ, महाजनी शास्त्री, गोवर्धन पारीख वगैरे अनेक विद्वान रॉय यांचा नवमतवाद प्रसृत करीत होती. दुसरे महायुद्ध जर जर्मनी जिंकले तर जगातील लोकशाही संपेल, म्हणून लोकशाहीवादी ब्रिटनचा पक्ष रॅडिकल पार्टीने ग्राह्य धरला होता. तर्कतीर्थ आदीकरून रॉयवादी पंडित दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश सरकारला मदत करीत होते. यावेळी यशवंतराव व नाना पाटील प्रभृतींची 'चलेजाव चळवळ' चालली होती. स्वातंत्र्य आल्यावर रॅडिकल पक्ष बरखास्त करून तर्कतीर्थ काँग्रेसमध्ये पूर्ववत आले. वरील सर्व संदर्भाने नवमतवादाचा बराच संस्कार तर्कतीर्थादी रॅडिकल मित्रांच्या संसर्गाने यशवंतरावांवर होणे शक्य होते. प्रत्यक्ष यशवंतराव रॉयवादी झाले नव्हते. तर्कतीर्थांप्रमाणे काँग्रेस पक्षाला त्यांनी विरोधही केला नाही. मात्र नवमततत्त्ववाद व रॉय यांची मते समाजसुधारणेला अनुकूल होती व शेवटपर्यंत यशवंतराव सतत समाज-सुधारणेच्या बाजूला राहिले. ते परंपरावादी सनातनी नव्हते, परिवर्तनवादी होते. आर्थिक क्षेत्रात यशवंतरावांची मते डावीकडे झुकलेली होती. दिल्लीस गेल्यावर यशवंतरावांचा दृष्टिकोन व्यापक झाला. देवाधर्माबाबत मूर्तिपूजा यासंबंधी त्यांची मते 'कृष्णाकाठा'त सांगितलेली खासगी आहेत. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत त्यांची मते प्रागतिक होती. याबाबतीत त्यांनी टिळकांना अनुसरले नाही. नेहरूंचे ते अनुयायी होते. ते निधर्मी दृष्टीनेच व संप्रदायभेदाच्या पलिकडचे होते. रॉय यांचा क्रांतिकारक समाजसुधारणावाद यशवंतरावांच्या पूर्ण परिचयाचा

होता. तर्कतीर्थदेखील ह्या काळात लोकहितवादी, जोतीबा फुले, आगरकर यांची परंपरा व प्रबोधन हिरीरीने प्रतिपादीत होते. वरील सर्व नवमतवादाने यशवंतरावांच्या मनाचा कबजा घेतला असावा एवढे प्रतिपादून पुढे जाऊ या.

**सत्तेचा लोकहितार्थ वापर**

मुख्यमंत्री झाल्यावर मिळालेल्या सत्तेचा वापर यशवंतरावांनी जनहितार्थ केला. त्यांनी सहकारी चळवळ वाढवली. मागे सत्यशोधक परिषदांतून ग्रामपंचायती असाव्या, सहकारी सोसायट्या काढाव्यात असे ठराव झाले होते. "महाराष्ट्राचे जे प्रश्न तेच मराठ्यांचे प्रश्न व मराठ्यांचे जे प्रश्न तेच महाराष्ट्राचे प्रश्न" असे कर्मवीर शिंदे म्हणत असत. यशवंतराव मोहिते-बाळासाहेब देसाई वगैरेंना घेऊन महाराष्ट्रावर यशवंतरावांनी त्यांचे राज्यच स्थापिले. ना. ग. गोरे व एस्. एम्. यांनाही यशवंतरावांची ही पकड मोठी आश्चर्याची व बिकट वाटे. एस्. एम्. जोशी यांनाही (मनात) ब्राह्मण मुख्यमंत्री कधी होणार याची काळजी वाटे. 'नवशक्ती'ने त्या काळात त्यांच्या इच्छेविरुद्ध खंडणात्मक अग्रलेखही लिहिला होता. फक्त तर्कतीर्थ यांनी यशवंतरावांच्या बाजूचे राजकारण केले. या त्यांच्या पवित्र्याचा त्यांना फायदा झाला. भारतातील लोकशाही टिकवण्याचा आणि वाढवण्याचा हाच एक मार्ग आहे. हा मजबूत झाला पाहिजे हे खरेच. चव्हाणांचे इंग्लंड-अमेरिका वगैरे दौरेदेखील त्यांचे व्यापकपण वाढवते झाले.

ब्रिटिश राज्य झाल्यावर बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांच्याकडे संस्थानी सत्ता गेली. ती त्यांनी शूद्रातिशूद्रांच्या उन्नतीसाठी वापरली. नंतर राजर्षी शाहू यांनी अशीच वापरली. सयाजीराव गायकवाड सामंजस्यवादी होते. त्यांनी फक्त ब्राह्मणविरोधच न करता पुढे जोतीबांच्या विचारांच्या मागे जो शिक्षणप्रसाराचा मुद्दा होता तो पकडला व महाराष्ट्रातील शिक्षणप्रसारकांना मनस्वी साह्य केले. कोल्हापूरच्या शाहू महाराजांप्रमाणे उच्चभ्रू पुणेकरांचा विरोध ओढवून न घेता महाराष्ट्रातील अनेक ब्राह्मण विद्वान पंडित यांचा विश्वास संपादन केला. वेदोक्त प्रकरणानंतर सयाजीरावांनी मुत्सद्दीपणाने पुण्याचा 'केसरी' आपलासा केला. यशवंतरावांनीदेखील हेच यश नंतर मिळवले. हे दोघेही मराठे सुशिक्षित, सुविद्य, साहित्यकलाप्रेमी व गुणग्राहक होते. ते जातीच्या पलीकडे गेले होते. गुणवत्तेचे चाहते होते. शिवाजी-सयाजीराव-यशवंतराव ह्यांच्यात हे सर्वगुण होतेच, पण कोणतीही सांप्रदायिकता नव्हती.

यशवंतरावांच्या घरी वारकरी सांप्रदायिकता नव्हती. सत्यशोधक चळवळीचा प्रभाव होता म्हणून यशवंतरावांना शिक्षण दिले पहिजे असे त्यांच्या घरातील लोकांना वाटले.

महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या चळवळीला राष्ट्रीय स्वरूप आणण्याचे कार्य यशवंतरावांमुळे पुढे शक्य झाले. यशवंतराव हेदेखील आतून जातीयवादी होते असा संशय वरिष्ठ थरातून व्यक्त होतानाही आढळेल. पण यशवंतरावांनी छत्रपती शिवाजीप्रमाणे ब्राह्मणांचा सांभाळ केला. त्यांच्यातील पुष्कळांना नोकऱ्या लावल्या. लो. टिळकांच्या स्मारकाला मोठी मदत केली. यामुळे ब्राह्मणांकडून यशवंतरावांना विरोध होण्याचे प्रसंग आलेच नाहीत. त्यांनी एका शंकराचार्यांना मद्रासमध्ये अटक करून ठेवले, असपृश्यतानिवारणाची बाजू घेतली, तरी त्यांच्याविरुद्ध उठाव झाला नाही. शंकराचार्यांना अटक केली तिची तरफदारी वाईच्या गणपती घाटावरील एका व्याख्यानात तर्कतीर्थांनीदेखील केली. मी एक श्रोता होतो. प्रत्यक्ष ऐकले. पूर्वीचा दुर्दैवी ब्राह्मण-अब्राह्मणवाद उपस्थित न होईल अशी 'दक्षता' यशवंतरावांनी घेतली. मात्र बहुजन समाजातील खेड्यापाड्यांपर्यंतचे कार्यकर्ते एक केले. त्यांना विकासाच्या कार्याला जुंपले. मराठा-मराठेतर असा विकल्प न धरता त्यांनाही मंत्रिमंडळात घेतले. किसन वीर हे तर त्यांचे उजवे हात होते. अशी कैक मराठेतर मंडळी त्यांच्याभोवती पुढे आली. ना. रूपवते यांना तर दलित समाजातून पुढे मंत्रिपदापर्यंत आणले. यशवंतरावांना व्यापक सामाजिक धोरण घेता आले याचे कारण त्यांच्यापुढे शिवाजीमहाराजांचा आदर्श होता. सर्वसामान्य मराठ्यांना उच्चभ्रू मराठ्यांच्या पुढारीपणामुळे वाव नव्हता. गुणवत्तेच्या जोरावर पदवीधर, मोठ्या दारिद्र्याच्या अवस्थेतून सर्वसामान्य मराठा कुटुंबातून ते पुढे आले होते. त्यांच्या गावातील सर्वसामान्यविषयी व बायाबापड्यांविषयी म्हणून त्यांना कळवळा होता. तळागाळातील लोकांसाठी त्यांना करता येईल तेवढे त्यांनी केले. फी माफीचा निर्णय त्यांच्या सत्तेच्या काळातच झाला. सुसंपन्न कुटुंबांतील विद्यार्थ्यांनीदेखील फार फायदा घेतला. पण शिकले सवरले व सावरले एवढे खरे. पण यशवंतरावांचा व्यासंग त्यांनी गिरवला नाही, हे दुर्दैव. पुष्कळ गोरगरीब-दलित व स्पृश्य थरांतील यांनीही आर्थिक मागासलेपणाच्या मुद्द्यावर फी माफीचा फायदा घेतला. फुले-शाहू यांच्या शूद्रातिशूद्र समाजाला द्वेषातून सोडवून शिक्षणादी सोयी त्यांच्या दारापर्यंत नेल्या. अनुदाने व शिक्षकांचे पगार सर्व देण्याचा उपक्रम चालू झाल्यामुळे शिक्षणसंस्था वाढल्या. नव्या निघाल्या. त्यांच्या योगक्षेमाची पूर्ण पूर्तता झाली, म्हणून वाढल्या-वाढत आहेत. म. फुले-शाहू यांचे शूद्रातिशूद्र समाज, रयत, जनता ही आज पुढे आली आहे. खेड्यापाड्यांपर्यंत राज्यकर्ती झाली आहे. ग्रामीण नेतृत्व पुढे आले आहे. याचे श्रेय यशवंतरावांकडे जाते. उत्कट-भव्य तेवढे सांगणे अटळ आहे. बाळासाहेब देसाईंनी मराठ्यांना जेवढ्या नोकऱ्या, चाकऱ्या लावल्या तेवढ्या यशवंतरावांनी लावल्या नाहीत. ते मराठ्यांचे द्वेष्टे होते म्हणजे भटाळले होते, अशी टीका त्यांच्या वेळी व आजही जात्यभिमानी मराठा लोक करताना आढळतात. हे खाजगीत बोलले जाते. मराठ्यांना नोकरीत घेण्याचा

सपाटा बाळासाहेबांनी जो चालवला होता, त्याला यशवंतरावांनी विरोध केला नाही. उलट बाळासाहेबांना सत्तेत शिरकाव करून देण्याचे श्रेय किसनवीर व यशवंतरावांकडे जाते. बाळासाहेब व यशवंतराव यांचे जे सहकार्य झाले ते बहुजन समाजाला वरदान ठरले. नाशिकच्या हिऱ्यांच्यापेक्षा यशवंतरावांची प्रत्यक्ष पात्रता अनुभवून म्हणा, तर्कतीर्थांनी 'यशवंतसत्ता' कशी प्रस्थापित होईल याची सल्लामसलत केली. हा पवित्रा विलक्षण यशस्वी ठरला व त्यांची 'चाणक्य' ही पदवी सार्थ केली. यशवंतराव व तर्कतीर्थदेखील टीका व विरोध पचवीत. १९४८ सालच्या जाळपोळीत ब्राह्मणांची घरे जाळली गेली, त्यांना यशवंतरावांनी आर्थिक मदत दिली.

महार वतन कायदा सुधारून व्यापकपणे तो पास करून घेण्याची यशस्विता चव्हाणांनी पादाक्रांत केली व शिंदे-आंबेडकरांचे स्वप्न पुरे केले. धर्मांतरित बौद्धांच्या सवलती कायम ठेवणारे महाराष्ट्र राज्यच प्रथमचे ठरले. यशवंतरावांनी 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' हा पवित्रा दिल्लीपर्यंत जाऊन तेथे सत्तावंत होऊन खरा केला. यशवंतरावांना 'गुरूवाद' मान्य नव्हता. कारण ते सांप्रदायिक नव्हते. तर्कतीर्थांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसाच्या वेळी तर्कतीर्थ हे माझे मित्र आहेत. हे वाई क्षेत्रात त्यांनीच सांगितले. यशवंतराव लोकशाहीवादी समतावादी होते. सामाजिक विद्वेष दूर करण्यास ते कारणीभूत ठरले. "विश्वकोशाच्या संपादकाच्या जागेवर तर्कतीर्थांना नेमले," ही माझी चूक झाली नाही, ही निवड बरोबर ठरली, असे त्यांनी प्रतिपादिले. डॉ. आंबेडकरांचे चरित्र लिहिण्याचाही त्यांचा मानस होता. दुर्दैवाने हे घडले नाही. तरी दलित प्रश्नाला यशवंतरावांनी दिलेले 'योगदान' अभूतपूर्व असे आहे. शिंदे व यशवंतराव राष्ट्रीय काँग्रेसवादी होते. शिंदे अर्थकारणात डावे होते. यशवंतरावांनाही समाजवादी लोकशाही हवी होती. केंद्रात असताना यशवंतरावांनी राखीव जागांची मुदत वाढवण्यास मान्यता दिली.

नवा महाराष्ट्र घडवण्याच्या कार्यात या सर्वांचे योगदान मोठे ठरते. यशवंतरावांचे व्यापक समाजकारण, विधायकता, रचनात्मकता या सर्व तत्सम बाबी त्यांच्या पुढील महाराष्ट्राने प्रत्यक्ष कार्यवाहीत आणल्या तर 'महाराष्ट्र' हा नावाप्रमाणे महा-मोठा ठरून आदर्श होईल.

('सुशिपांज' ऑक्टोबर-नोव्हेंबर (१९९१), संपादक- डॉ. शिवाजीराव चव्हाण, सातारा)

******

# १७ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
# (एक दर्शन)

तर्कतीर्थ जोशी मूळचे खानदेशी, पण त्यांचे वास्तव्य वाई क्षेत्री अध्ययन व अध्यापनार्थ झाल्यामुळे ते वाई देशी ठरतात. वाई देश हा सातारा जिल्ह्यातीलच असल्यामुळे तर्कतीर्थ सातारी ठरतात. राजकारण हा त्यांचा एक प्रमुख विषय झाल्यामुळे ते सातारी राजकारणाशी व पर्यायाने महाराष्ट्राच्या जानपद राजकारणाशी निगडित झाले. राजकारण हा त्यांचा अभ्यासाचा जसा प्रांत आहे, तसेच निवडणुकीचे राजकारण हादेखील त्यांच्या जीवनाचा विभाग होत असतो. पण ते स्वतः कोणत्याच राजकीय निवडणुकीस उभे राहत नसल्यामुळे ते तसे व्यक्तिशः सत्तास्पर्धेपासून अलग असतात. राजकारणात व व्यवहारात आणि विविध संस्थांमध्ये कार्य करीत असताना निर्माण होणारी कटुता तर्कतीर्थ टाळतात. झाल्या-गेल्या गोष्टी व बाबी विसरून पुढे जातात. तर्कतीर्थांचा मूळ विषय तत्त्वज्ञान हाच आहे व ह्यातूनच त्यांचे खरे दर्शन होऊ शकते. पांडित्याबद्दल तर प्रश्न नव्हताच. विद्यार्थी दशेपासून केवलानंद सरस्वती यांच्या प्राज्ञपाठशाळेत ते येऊन राहिले. त्यांची व्याख्यानार्थ सर्वत्र भ्रमंती चालू असली तरी त्यांच्या वास्तव्याचे घर म्हणजे वाईच होय. सन १९१४ सालापासून ते वाईकर आहेत. त्यांना समजावून घेण्यासाठी सन १९१४ च्या पूर्वी वाई कशी होती ते पाहिले पाहिजे.

सुखवस्तू इनामदार, सावकार व भिक्षुक यांचे हे गाव प्रायः क्षेत्र होते. वाई ही विराट नगरी म्हटले जाते. तरी ऐतिहासिक दृष्टीने या संदर्भाविषयी एकमत नाही. निबंधमालाकारांनी "वाई म्हणजे विराट नगरी हे साफ नाकारले आहे." म्हणूनही वादात जाण्याचे कारण नाही.

वाई हा शब्द 'वायु' ह्या शब्दापासून झाला. वैदिक काळात वायू ही एक देवता होती. पुढील ऐतिहासिक कागदपत्रातून वाईचा उल्लेख "वैराज क्षेत्र" असा आढळतो. खूप वर्षे वाई हे अफजूलखानाचे व नंतरही विजापूरकरांचे एक महत्त्वाचे ठाणे होते. मराठ्यांना ते जिंकून घेण्यासाठी फारच प्रयास पडले. ह्या कामी हंबीरराव मोहिते कामास आले. वाई घेण्यासाठी मराठ्यांना जी लढाई करावी लागली. तो संग्राम अपूर्व व विलक्षण होता.

उत्तर पेशवाईत वाई हे रास्ते सरदारांचे मुख्य ठिकाण झाले व त्यांनी पश्चिम वाई वसवली. ह्या पश्चिम वाईतच प्राज्ञपाठशाळा आहे. हल्ली प्राज्ञपाठशाळा मंडळाद्वारे विविध संशोधनीय व प्रकाशकीय कार्ये चालतात. परंतु तर्कतीर्थ येण्यापूर्वी व सन १९२९/३० पर्यंत

तरी वाई हे सनातनी व जुन्या पंडितांचे ठाणे होते. सन १९१३ सालाच्या अगोदर प्रसिद्ध पंडित कै. भाऊशास्त्री लेले सनातन्यांचे अध्वर्यु होते. लो. टिळकांनी गीतेचा अर्थ कर्मयोगपर लावला ही बाब भाऊशास्त्री लेले वाईकर यांनी नापसंत केली व टिळकांचे प्रमुख प्रतिस्पर्धी म्हणून उभे ठाकले. वेदोक्त प्रकरणातही राजर्षी शाहू महाराजांना विरोध करण्याच्या कामी भाऊशास्त्री अग्रेसर होते. परंतु भाऊशास्त्री राजकारणात जहाल होते. वाईस त्यांच्या काळात विद्वान भिक्षुक ह्यांचा भरणा फार होता; हे सावसावकारकीदेखील करत व त्यातूनच त्यांचा पेशा जमीनदारांचा झाला होता. वाईस जोशीआळी म्हणून स्वतंत्र वस्ती होती. भाऊशास्त्री यांच्यापूर्वी वाई तर फार सनातनी होती. सन १८२८ साली प्रसिद्ध जगन्नाथ शंकरशेट सोनार मुंबईहून वैदिक हव्य-काव्यादी विधीप्रीत्यर्थ वाईस आले होते. पण क्षेत्रस्थानी त्यांना वैदिक संस्कारांचा लाभ होऊ दिला नाही. सातारच्या शेवटच्या प्रतापसिंह छत्रपतींनी स्वतः मध्यस्थी केली, तरी वाईच्या आगमानाबद्दलचे ग्रामण्य वाईकर शास्त्रीपंडितांनी उठवले नाही. खुद्द प्रतापसिंह महाराज यांच्या वेळच्या प्रसिद्ध वेदोक्त प्रकरणात वाईकर पंडितांनी त्यांच्याविरुद्ध पवित्रा घेतला व छत्रपतींना गादीसही बाळाजी नातू करवी मुकावे लागले. हा इतिहास देताना सरदेसाई यांचाही नाईलाज झाला. परंतु वाई प्रांत पुढे राजकीय स्वातंत्र्यासंबंधी जागरूक व क्रियाशील होता. वासुदेव बळवंत फडके वाईस त्यांच्या जवळच्या नातलगाकडे गुप्तपणे येऊन राहिले होते. उमाजी नाईकाच्या समाजाने प्रतापसिंह यांच्याच कारकिर्दीत पांडवगडचा आश्रय घेऊन इंग्रज सेनानींना हैराण केले होते. इंग्रजी राज्य हे फक्त राजकीय व आर्थिक आक्रमण नव्हते ते संस्कृतीवरील देखील आक्रमण होते. म्हणूनच वाईस जुनी विद्या व संस्कृती टिकवून धरण्यासाठी प्राज्ञपाठ शाळा निर्माण केली गेली. यासाठी वाई हे योग्य असे गाव म्हणून गणले गेले. हे क्षेत्र होते, तरी येथे पंढरपूर, नाशिक, माहूर वगैरे ठिकाणासारखी बडवेशाही नव्हती. ह्या आगळेपणा शिवाय येथे दशग्रंथी अभ्यासू वैदिक ब्राह्मण होते. विद्येची परंपरा होती. अव्वल इंग्रजीतील सुखवस्तू काळात येथे मराठी वाङ्मयसेवक अनेक झाले. ‘धर्म’, ‘मोदवृत्त’ व ‘वृत्तसार’ वगैरे पत्रे निघत. सार्वजनिक कामाची हौस असलेले अनेक सद्‌गृहस्थ येथे होते. सर्व दृष्टींनी वाई हे जागृत केंद्र होते. पुणे येथील सार्वजनिक जीवनाचा वाईवर परिणाम प्रथमपासून होत आला.

केवलानंद सरस्वती (कै. नारायण शास्त्री मराठे) यांच्या अगोदर प्रज्ञानंद सरस्वती विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. नारायण शास्त्रींचे हे गुरू व लक्ष्मणशास्त्री हे नारायण शास्त्रींचे शिष्य. दिवेकरशास्त्री, कानडेशास्त्री, वाटवेशास्त्री वगैरे वगैरे वाई येथे प्राज्ञपाठशाळेत अध्यापक होते केवलानंदांनी अनेक शिष्योत्तम तयार केले.

लो. टिळक यांच्यानंतर  मा. गांधी यांच्याद्वारे  वाई येथेही स्वातंत्र्यासंबंधी नवी जागृती झाली व प्राज्ञपाठशाळेतील अनेकांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. बेचाळीसच्या भूमिगतांना तेथे आश्रय मिळे. सत्याग्रहाच्या लढ्यात पंडित लक्ष्मणशास्त्री यांनीही कारागृहवास सोसला ; **तर्कतीर्थ हे एक स्वातंत्र्य सैनिक आहेत. एवढेच नव्हे तर विचारस्वातंत्र्याचे भोक्ते आहेत.** म्हणजे शास्त्रीजी कोणताही ग्रंथ प्रमाण मानत नाहीत.

देशात अशी दुसऱ्या बाजूने धर्मजागृती होत होती. हिंदुसमाजावर आक्रमण होत होते. म्हणजे हिंदु-मुसलमानांचाही प्रश्न असे. प्राज्ञपाठशाळेतील दिवेकरशास्त्री (हिंदुत्वदीपक) ह्यानी हिंदुत्वाला पूरक असे अनेक ग्रंथ लिहिले. हिंदुमहासभेच्या अधिवेशनात ही प्रमुख मंडळी भाग घेत असत. हिंदू समाजात त्या काळी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद व पुढे अस्पृश्यांचा प्रश्न जशा अंतर्गत समस्या पुढे आल्या. ह्यांचाही विचार करणे प्राज्ञ मंडळींना भाग झाले. प्राज्ञपाठशाळा स्थापन होण्याच्या वेळेस जो काळ होता ; तो पहिल्या महायुद्धापूर्वीचा होता. महायुद्धानंतर काळ पालटला. लोकमान्यांचा नंतर मृत्यू घडून आला व म. गांधी राजकीय क्षितिजावर आले. गांधीकाळाचा प्रभाव वाढत चालला. प्राज्ञपाठशाळेने गांधीनिष्ठ माणसेदेखील पुरवली. तर्कतीर्थांच्यावर म. गांधी यांचा फार परिणाम घडला. तारुण्यावस्थेतील महत्त्वाचा काळ त्यांनी गांधी यांच्या स्वातंत्र्य लढ्यात घालवला. म. गांधी-नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या लढ्यामुळे पूर्ण स्वातंत्र्यच आले. भारतामध्ये युगांतर घडले. नवयुग आले.

परंतु भांडवलदारांनी स्वातंत्र्यलढ्यास पाठिंबा दिला. अर्थात स्वातंत्र्यात सत्ता वाढली. पुढे मार्क्सवादी वैज्ञानिक विचार ह्या देशातील विचारवंतांवर प्रभाव गाजवू लागले. तर्कतीर्थांचे पहिले अध्ययन संस्कृत भाषेतील होते. नारायणशास्त्री मराठे ह्यांनी प्राज्ञपाठशाळेत फार मोठा ग्रंथ-संग्रह संग्रहित केला होता. वाचनालयदेखील होते. ह्या ग्रंथसंपत्तीचा तर्कतीर्थांनी लाभ घेतला. वाईमध्ये राहूनच त्यांनी पुढे इंग्रजी भाषा चांगली आत्मसात केली. यामुळे पाश्चात्य ज्ञान व विज्ञान यांचे नवे दालन त्यांना खुले झाले. उत्तरोत्तर ते परंपरावादी राहिले नाहीत. मार्क्सचाही त्यांनी चांगला अभ्यास केला. कारागृहवासात असतानाही त्यांना अनेक नवे व व्यासंगी मित्र भेटले. मार्क्सवादातून त्यांनी हिंदुधर्माची मीमांसा प्रगट केली. गुलामगिरीचे व पिळवणुकशाहीचे स्वरूप त्यांनी सांगितले. त्यामुळे जुने शास्त्री पंडित व नवमतवादी तर्कतीर्थ ह्यांच्यात तफावत पडत गेली. उदा. मागील लोकहितवादी हे आर्यांग्ल पंडित होते. तत्पूर्वीचे राममोहन रायदेखील आर्यांग्ल विद्वान होते. पाश्चात्य विद्या व धर्म आणि संस्कृती ह्यामुळे ह्या दोघांमध्येही अव्वल इंग्रजीत विलक्षण फरक पडला होता. राममोहन प्रथम संस्कृतचे व देशी भाषेतील पंडित होते व नंतर ते प्रौढपणी इंग्रजी शिकले. असाच प्रकार

तर्कतीर्थांच्या जीवन ओघात आढळतो. तर्कतीर्थ राममोहन यांच्या परंपरेत मोडतात. म. गांधीदेखील एका अर्थाने राममोहन यांच्या परंपरेतील झाले.

म. गांधी ह्यांनी सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा ह्यांचा समन्वय केला. पूर्वी ह्यासंबंधी वितंडवाद होता. स्वातंत्र्यलढ्याबरोबर अस्पृश्यता निर्मूलनाचा लढादेखील गांधी ह्यांना करावा लागला. ह्या सामाजिक लढ्यात स्वामी केवलानंद (पूर्वीश्रमीचे नारायण शास्त्री मराठे) व तर्कतीर्थ जोशी ह्यांनी म. गांधींना चांगली साथ दिली. म. गांधी ह्या काळात येरवड्याच्या कारागृहवासात होते. म. गांधींना अस्पृश्यता निवारणाला धर्मशास्त्राचा आधार दाखवण्याची तीव्र गरज होती. सर्वसामान्य जनता व परंपरावादी शास्त्री पंडित यांच्या खातरजमेसाठी हा उपक्रम जरूर होता. तर्कतीर्थांनी हे आधार व शास्त्रातील मूळ ज्ञानाचा अस्पृश्यता निवारणासाठी आधार दाखवून देण्यात चांगलेच यश मिळविले. यामुळे गांधी व तर्कतीर्थ अधिकच जवळ आले. पुढे राजगोपालाचार्य यांची कन्या व म. गांधी यांचा पुत्र देवीदास यांचा मिश्र विवाह जमला. ह्याही विवाहात तर्कतीर्थांनी पौराहित्य केले. यामुळे पंचक्रोशीत व वाईच्या बाहेरील सनातनी गोटातदेखील खळबळ उडाली!

परिवर्तनाला म्हणजे समाज सुधारणेलाही संस्कृतातील पूर्वग्रंथातील म्हणजे श्रुतीस्मृतीतील आधार दाखवण्याची गरज ह्या काळात मोठी होती. कारण 'वचनात् प्रवृत्तिः। वचनात् निवृत्तिः' असे वागणारे पंडित व सनातनी विद्वान पुष्कळ होते. आज ते दिसत नाहीत. लोकहितवादी, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, त्या मागे राममोहन राय ह्यांनी व रानडे, भांडारकर ह्यांनीही मागे धार्मिक, सामाजिक सुधारणांना ऋषी वचन, संतांचे साहित्य, श्रुतिस्मृती ह्यातीलही आधार दाखवले होते. पण राममोहन-रानडे-भांडारकर व दयानंद यांची धर्म व समाज सुधारणा तत्त्वनिष्ठ, परिवर्तनवादी भूमिकेवरून झाली ; तर अधिक हितावह होईल असा विचार विद्वान व काही पंडितांनी पुढे आणला व त्यासाठी धर्मनिर्णय मंडळाची योजना केली. स्वामी केवलानंद (तर्कतीर्थांचे वाई येथील गुरू) ह्या कार्यात प्रमुख होते. धर्मनिर्णय मंडळ व विद्वत् परिषदांमधून तर्कतीर्थांनी भाग घेतला. शंकराचार्यांना धर्मनिर्णय मंडळाने लोकशाही पद्धतीने व अधिकार संपन्नतेतून अनेक समाज सुधारणांना वचनाद्वारे पुरावे दिले. नव्या काळाला अनुसरून असलेली परिवर्तने धर्ममान्य ठरवली. ह्यात अस्पृश्यता निवारणालाही आधार दाखवले. सनातनी पक्षाने तर्कतीर्थांचा बराच छळ केला, तर्कतीर्थांनी तो सोसला. **मार्टिन लूथर यांच्या कार्याशी तर्कतीर्थांची व केवलनंदांची भूमिका मिळतीजुळती वाटते.** ह्यामुळे सनातनी पक्षाचे पूर्ण व साधार निर्दालन झाले व आधुनिकता ही सर्वांनाच अटळ झाली. पश्चिमी विचार हे पश्चिमेकडील म्हणून त्याज्य मानणे ही एक घोडचूक होय असा संदेश गेला.

नंतर मानवेंद्र रॉय यांचे मूलगामी व मानवतावादी विचार ह्या देशातील प्रांतोप्रांतातील विवेकवंतावर प्रभाव गाजवू लागले. ह्याही पुरोगामी मानवतावादी विचारसरणीशी सक्रीय होऊन, तर्कतीर्थांनी असामान्य कार्य केले. ह्याच काळात 'ज्योतिनिबंध जोतिराव फुले' (१९४७) हा एक महत्त्वाचा प्रबंध तर्कतीर्थांनी लिहून प्रसिद्ध केला. ह्या वेळी ह्या कार्याच्या दृष्टीने मी व तर्कतीर्थ फारच समीप आलो होतो. तर्कतीर्थांचा ह्याच काळापूर्वी महर्षी शिंदे यांचेशी परिचय झाला. महर्षी शिंदे ह्यांनी तर्कतीर्थांच्या पुरोगामी भूमिकेला पाठिंबा दिला.

सन १९४७ मध्ये पूर्ण स्वातंत्र्य आले. त्यामुळे नव्या परिवर्तनाची पुनः गरज निर्माण झाली. काळाप्रमाणे बदलत राहणे हे तर्कतीर्थांच्या जिवितसरणीचे मुख्य वैशिष्ट्य ठरते. ते रॉयवादी असताना काँग्रेसला विरोधक असा पवित्रा तर्कतीर्थांचा होता; कारण भांडवलशाही धोरण बदलण्याची मोठी गरज होती. रॉयवादी काळात तर्कतीर्थांना काँग्रेसकडून सडकून विरोध झाला. तोही त्यांनी सोसला. परंतु स्वातंत्र्यात विधायक व रचनात्मक कार्य करून स्वराज्याचे सुराज्य करण्याचे नवे कर्तव्य उभे राहिले. यादृष्टीने तर्कतीर्थांनी स्वपक्ष बरखास्त करून काँग्रेसपक्ष स्वीकारला. यामुळे महाराष्ट्र-काँग्रेसला एका मोठ्या विद्वानाची जोड मिळाली बुद्धीजीवी वर्गातील बुद्धीसंपन्न माणसे R. S. S., जनसंघ किंवा फार तर हिंदुमहासभेत असत. पण ह्यादृष्टीने व एकूण त्यांच्या जवळची आसपासची मंडळी केसरी-तरुण भारत वगैरे पुणेरी जुन्या धोरणाशी बद्ध असत.

तर्कतीर्थांच्या जीवन ओघातून त्यांचे एक दर्शन घडवून देण्याचा हा प्रयत्न आहे. सान्निध्याचा व अनुभवाचा त्याला आधार मिळाला आहे.

आज सामाजिक सुधारणांना सनातनी पक्षांचा व जीर्णमतवाद्यांचा विरोध राहिलाच नाही. म्हणून हा प्रश्न पुष्कळसा फाईल झाला आहे. तरी सर्वातच रूढिग्रस्तता आढळते. म्हणून विज्ञानात्मक दृष्टिकोनाचा परामर्श तर्कतीर्थांकडून वारंवार घेतला गेला. नव्या यंत्रयुगाचा व आधुनिकतेचा सर्वांनीच स्वीकार केला आहे. पाश्चिमात्य विज्ञान सर्वत्र अटळ आहे. सनातन्यांच्या घरीच नवी सुधारक व आधुनिक विचारांशी सहमत असलेली पिढी निर्माण झाल्यामुळे आधी सामाजिक का आधी राजकीय वगैरेंसारखे शुष्क वाद दिसतच नाहीत. एकूण काळ फारच पालटला. तथापि **तर्कतीर्थ निरीश्वरवादी (म्हणजे नास्तिकवादी) मला कधीच भासले नाहीत.** जीवाने जीव ते जाणतातच.

तर्कतीर्थांच्या जीवनात अस्पृश्यतेच्या विनाशनाला फार मोठे स्थान आहे व हा समतावादी मानवी दृष्टिकोन त्यांच्या घरी-दारी, कृतीत येत असतो.

अस्पृश्यांसंबंधीचा म्हणजे दलितांच्या संबंधीचा ज्यांचा दृष्टिकोन उदार असू शकतो, त्यांचा दृष्टिकोन बहुजन समाजाच्या बाबतीतदेखील सनातनी असू शकत नाही. अस्पृश्यांना

दलित ही नवी संज्ञा वापरली जाते. तशीच ब्राम्हणेतर ह्या जुन्या परिभाषेऐवजी बहुजन समाज असे हल्ली म्हटले जाते. बहुजनसमाजाच्या दृष्टीने तर्कतीर्थांचा दृष्टिकोन व प्रतिपादन सहानुभूतीचे व जवळीकेचे होते. म्हणून एकपरी तर्कतीर्थ बहुजनवादी आहेत.

काँग्रेसमध्ये आल्यावर त्यांचा व यशवंतराव चव्हाण यांचा पुनः जवळकीचा संबंध जडला व तो कायम राहिला. ना. यशवंतराव यांचे चुलते वगैरेंचा सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीशी संबंध होता. ना. यशवंतरावांनी कार्य करण्याची पद्धत राष्ट्रीय अशी वर्धमान केली हे चांगलेच झाले. त्यांना म. फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्यासंबंधीची कृतज्ञता सोडता येत नाही. ह्याचप्रमाणे म. फुले व शाहू महाराज यांच्या कार्याचा चांगला अभ्यास तर्कतीर्थांनी केला. ना. यशवंतरावांच्या राजकारणाला पाठिंबा देण्याचा बहुजनसमाजाभिमुखी पवित्रा तर्कतीर्थांनी घेतला. ह्यातच त्यांच्या उत्तरार्धाच्या जीवनाचे मुख्य सूत्र व सार्थकता आढळते. महाराष्ट्रातील बहुजनांना घेऊन व त्यांच्याशी विशेष संबंध राखून, राजकारण करणे हे एकापरी लोकमान्यांनादेखील फारसे जमले नाही.

**बहुजनसमाजाला धरून घेऊन राजकारण करणे हा तर्कतीर्थांचा महत्त्वाचा पैलू आहे,** मुत्सद्दीपण आहे. तर्कतीर्थांनी न. चि. केळकर-भोपटकर यांचा गांधीविरोधी पवित्रा, बॅ. सावरकर यांचा हिंदू महासभावादी म्हणजे काँग्रेसविरोधी पवित्रा घेतला नाही. **गोळवलकर यांचा वर्णवाद त्यांनी खंडन केला व लोकशाही आणि समाजवादी-निधर्मी धोरण पत्करले.** हे पुष्कळांना जमले नाही व खूप वरच्या थरातील लोकांना अवघड जाते. म्हणून ते संघीय व जनसंघीय होऊन राष्ट्रीय जीवनापासून व नव्या धोरणापासून दूरचे ठरतात. ही दूरता व ही अलगता तर्कतीर्थांनी टाळली. सार्वजनिक जीवनात, संस्थासंभारात व राजकरणात निर्माण होणारी **"एकातिकता" टाळणे व जनताभिमुख होणे हे जे तर्कतीर्थांच्या जीवनाचे मर्म व वर्म आहे** तेच अजून संबंधितांच्या व जवळच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आले नाही. उच्चभ्रुंनी, विद्वानांनी जनताभिमुख झाले पाहिजे हा माझा मुद्दा सोदाहरण स्पष्ट करण्यासारखा खास आहे. उदा. कॉम्रेड डांगे हे भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर पहिल्या महायुद्धापासून आहेत. तर्कतीर्थांप्रमाणे डांगे ह्यांच्यात अनेक (परिवर्तन-पालट) आढळत नाहीत हे खरे. मार्क्सवादी डांगे ह्यांनी घेतलेली मार्क्सवादी भूमिका सोडली नाही ते रशियावादी होते. मार्क्सवाद हा जनतेचा वाद म्हणून मानला जातो. महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळ मूलतः शेतकरी-कामकऱ्यांची चळवळ होती. म. फुले व लोखंडे वगैरेंनी शेतकरी व मजूर हा प्रश्न हाताळला होता. ह्यावेळी रशियन साम्यवादी विचार येथे आले नव्हते. ह्या चळवळीने शेतकऱ्यांच्या अडचणी, दु:खे, मागण्या व नव्या जाणिवा जतनेपुढे प्रथम मांडल्या. असे असातानाही कॉ. डांगे ह्यांनी कधीच ह्या चळवळीचा उल्लेख केलेला आढळत नाही. ही चळवळ म्हणजे

विद्याप्रसारक चळवळ होय, एवढेच अपवादात्मक त्यांनी एका भाषणात ओझरते सांगितलेले आढळते. तर्कतीर्थांनी ही चूक होऊन दिली नाही. बहुजन समाजाच्या चळवळीवर व त्यातील थोर थोर कर्मवीरांच्यावर तर्कतीर्थ हे एक अभ्यासक विद्वान गणले जातात. तर्कतीर्थ व माझा विशेष सहवास घडून आला, तो ह्याच कारणामुळे हा तत्कालीन मिलाफ सार्वजनिक ठरला. ह्या लेखात तर्कतीर्थांच्या प्रत्यक्ष संबंधाने काही आगळे मुद्दे मांडले आहेत. तर्कतीर्थ ही फक्त तत्त्वज्ञानी व्यक्तीच नव्हे तर त्यांनी राजकारणात ही भाग घेतला आहे. जाडे विद्वान पुष्कळ वेळा समाजविन्मुख, एकलकोंडे, एककल्ली व कित्येक वेळा खाजगी व सार्वजनिक जीवनात तऱ्हेवाईक वृत्तीचे आढळतात. पण हे दोष तर्कतीर्थांत आढळले नाहीत. **सर्वधर्म-समभाव, परमतसहिष्णुता, सांप्रदायिकतेचा अभाव, व्यापक अशी समजूतदार बुद्धी, सर्वांगीण अभ्यास, पोथी (ग्रंथ) प्रामाण्याचा अभाव, विभूतिपूजेपलीकडील तात्त्विक दृष्टी वगैरे दृष्टीने आधुनिक गुणसंपदा तर्कतीर्थांत आढळते.**

पुष्कळ (इतिहास) संशोधक भूतकाळात साहजिकपणे रुतून बसतात. पण तर्कतीर्थ वर्तमानाचा व भविष्याचा जास्त वेध घेतात. मतभेद झाले व त्यांना कटुता आली तरी तर्कतीर्थ स्थितप्रज्ञावस्थेतच असतात. कार्याचे व मुद्यांचे महत्त्व चटकन ओळखतात. ह्या गतिमानतेमुळे त्यांना सुलभ यश आले. स्वामी केवलानंद व स्वामी प्रज्ञानंद यांच्या विचारप्रवाहाला त्यांनी समृद्धता आणली व त्यांच्याही संस्थेला नवी मजबुती निर्माण केली, जीवनात मतभेद झाले व सर्वत्र मनुष्य स्वभावाने होतात, तरी 'धर्मकोश' व 'विश्वकोश' ही उत्तुंग शिखरे ठरतील. तर्कतीर्थांत प्रज्ञा आढळते. एक आदर्श प्राज्ञ म्हणून त्यांचे ठळक दर्शन सहवासांतून शब्दांकित केले आहे. तर्कतीर्थांच्या सहवासातून हे दर्शन साकार झाले आहे. त्यांच्या समीपतेतून जे लेखन साहित्य प्रकट झाले, त्यापैकी 'ज्योतिनिबंध'-जोतीराव फुले (सन १९४७) ही एक कृती होय. याचे लेखक ते स्वतः आहेत. ह्या निबंधात जोतीराव कृत 'इषारा', 'गुलामगिरी' व 'सार्वजनिक सत्यधर्म' ह्या तीन पुस्तकांचे सार आहे. 'इषारा' हा छोटासा निबंध फार उपयोगी व प्रभावी झाला. जोतीरावांच्या विचारांचा गाभा ह्या पुस्तकात आढळतो. ह्या 'ज्योति-निबंधा'त शेवटी राजकीय भविष्य सांगितले आहे; ते आजही खरे झालेले आहे. काळजीपूर्वक लिहिलेल्या ह्या निबंधाचे इंग्रजी भाषांतरही प्रसिद्ध झाले होते. ह्यानंतर जोतीराव फुले यांचे चरित्र लिहिण्याचा त्यांनी संकल्प केला. मी पुष्कळ साधने प्रस्तुत पुस्तकासाठी जमा केली होती. जोतीरावांच्यावर विचार होत असताना, जोतीरावांचे चरित्र म्हणजे त्यांच्या काळातले भालेकर-लोखंडे-घोले वगैरे, नंतर सयाजीराव, शाहू महाराज, जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव यांची माहिती जमवली

कर्मवीरांचे कार्य म्हणजे जोतीरावांच्या चरित्राचा वाढणारा परीघ होय. जोतीराव, भालेकर, लोखंडे यांची व मुकुंदराव पाटील, शाहू महाराज, भास्करराव जाधव यांची चरित्रे लिहून झाली होती. ज्योती-निबंधामुळे तर दिल्लीच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान शास्त्रीजींना मिळाला, असे त्यांनीच वारंवार सांगितले. पुढे संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न उपस्थित झाला. रॅडिकल पार्टी बरखास्त करून शास्त्रीजी काँग्रेसमध्ये गेले. माननीय यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाशी ते फारच एकरूप पावले. मध्यंतरी अत्रे यांनी 'महात्मा फुले' बोलपट काढण्याची तयारी केली. वरील लेखन तर्कतीर्थांनी अत्रे यांना दिले व त्यांना ही सामुग्री उपयोगी झाली. साहाय्यक म्हणून कृतज्ञतेने बोलपटाच्या अगदी सुरुवातीला तर्कतीर्थांचे नाव पडद्यावर झळकले.

ह्या दोन पुस्तकांमुळे तर्कतीर्थांशी माझा फार संबंध आला. ते मजकूर सांगत व मी लिहीत असे. एकूण दोनशे तास तरी ह्यात खर्ची पडले असावेत. दुसरे पुस्तक अप्रसिद्ध राहिले, तरी ह्या सामाजिक विषयावरील माझेही अध्ययन वाढले व त्यात शिरकाव झाला. जोतीरावांची वाक्ये पल्लेदार व भाषा सोपी असली तरी त्यामागील विचार शोधल्याशिवाय सहजी समजत नाहीत. बहुजन समाजसुधारक चळवळीचा अन्वय अर्थ उत्तरोत्तर कळण्यात वरील लिखाणाच्या सुरुवातीस व नंतर जी चर्चा होत होती ती कारण झाली. मी नंतर माझे अध्ययन-चिंतन सोडले नाही. म. फुले व शाहु महाराज वगैरे तत्सम विषयावर नंतर तर्कतीर्थांना लिहावे-बोलावे लागे ह्याही प्रक्रियेस वरील पहिले प्रयत्न उपयोगी होतात. तर्कतीर्थांचे वाचन व चिंतन वर्धमान होते. वरील लेखनाचा काळ १९४७ ते १९५२ च्या दरम्यानचा होता. मागे १९३३ ते सन १९३६/३७ पर्यंत कर्मवीर शिंदे ब्राह्मोसमाजाच्या कार्यानिमित्त वाईस येत-जात होते. ब्राह्मोसमाजामध्ये मानवतावादी दृष्टी असल्यामुळे तर्कतीर्थ व (वाई) ब्राह्मोसमाज यांचे ह्या कालखंडात व पुढेही बरेच सहकार्य झाले. तर्कतीर्थांत सांप्रदायिकता व अंध पक्षियता नव्हती. मानवेंद्र रॉय यांचा त्यांच्यावर फार परिणाम पडला.

तर्कतीर्थांच्या जीवनात अनेक परिवर्तने झालेली मी पाहिली. बाह्य (पोशाखात) व अंतर्गत बदल पाहिले. तर्कतीर्थांनी ह्या संबंधात एकदा सांगितले की-माझी मते बदलतात तरी सर्वच मते बदलत नाहीत. याची साक्ष म. फुले समग्र वाङ्मयाच्या ग्रंथाला त्यांनी दिलेली प्रस्तावना देते. "गुलामगिरी नव्हतीच असे त्यांना म्हणावयाचे नाही"; उत्तर पेशवाईला तर्कतीर्थांनी जास्तीत जास्त जबाबदार धरले आहे.

पूर्वी झालेल्या चर्चेतून काही आठवणीत राहिलेले त्यांची सूत्रे पुढे देत आहे. खालील ज्ञानकण सर्वांनाच सार्वजनिक उपयोगाचे वाटतील.

"जोतीरावांना मित्र चांगले भेटले. जोतीरावांचे जीवन त्यांच्या घराण्याचा पूर्वेतिहास व त्यांचा स्वानुभव" ह्यातून घडले.

शाहू महाराज झाले नसते तर निबंधमालेच्या टीकेतूनच जोतीरावांचे दर्शन पुढीलांना उपलब्ध झाले असते. शाहू महाराजांचे आर्थिक साह्य सर्वांनाच झाले. वेदोक्त प्रकरणात लो. टिळक चुकले हे त्यांनी वारंवार मागे लिहिले बोलले आहे. ताजे उदाहरण राजर्षी शाहू गौरव ग्रंथ १९७६ (महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाने संपादित केलेला) ह्यातील लेखात "वेदोक्त प्रकरणाचा शास्त्रार्थ" राजर्षी शाहू यांच्या पक्षाचे दृढीकरण करतो.

इंग्रज जाण्यापूर्वी इंग्रज आता राहणार नाही तो जाणे अटळ आहे असे ते सन १९४७ पूर्वीही सांगत. बहुजनसमाजाच्या इतिहासात माननीय ना. चव्हाण यांचेही चरित्र घ्यावे असे मी त्यांना म्हणालो. "अजून ते मोठे व्हावयाचे आहेत" असे ते १९५३ पूर्वी म्हणाले. ना. यशवंतराव उत्तरोत्तर मोठे झालेले आपण आज सर्वच पाहत आहोत. अशी अनेक त्यांची भविष्ये खरी ठरली. त्यांच्या मुद्यातील काही मतांविषयी मतभेद करावासा मला वाटला. त्यांचा त्याला व्यत्यय नसे तथापि, अधिक चिंतनानंतर मला त्यांचे मुद्दे अभ्यसनीय आहेत असे वाटले, एकूण समाज प्रबोधनाच्या गेल्या शतकातील इतिहासावर पुष्कळ विचार मंथन घडले.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचा सहवास मला लाभला. नंतर तर्कतीर्थांचा लाभला. यामुळे शेवटी धन्यता व्यक्त करावीशी वाटते. रयत शिक्षण संस्थेने त्यांचा सत्कार केला. रयत शिक्षण पत्रिकेच्या माध्यमातून तर्कतीर्थांच्या सत्कारार्थ पुनःहा खास लेख होय.

(रयत शिक्षण संस्थेची 'रयत शिक्षण पत्रिका', फेब्रुवारी, १९७७, सातारा, संपादक- प्रा. आर. डी. गायकवाड, सहसंपादक- प्रा. द. ता. भोसले, पंढरपूर)

******

# १८ परमेश्वराचे प्रेमस्वरूप

परमेश्वराने सारे विश्व निर्माण केले. सर्व मानवप्राणी त्याची लेकरे आहेत. उत्पत्ती व लय त्याच्या इच्छेनुसार होत असतात. त्याचे सामर्थ्य ओळखल्यास कोणत्याही विचारी माणसास परमेश्वराची प्रचीती येते व तो लीन होऊन त्याला शरण जातो. त्याची करुणा भाकतो. आपल्या आयुष्याकडे कोणीही नजर फेकल्यास त्यात परमेश्वराने पुष्कळ वेळा उपकृत केले आहे, असे आढळेल. परमेश्वर जीवन देतो व योगक्षेमही चालवतो. एकंदर पाहता त्याचे प्रेमस्वरूप ध्यानात येते.

*तू माउलीहून मायाळ । चंद्राहुनि शीतळ । कल्लोळ प्रेमाचा ।।*

असा अनुभव तुकारामाला आला. परंतु प्रत्येकाला समजण्याजोगते असलेले, परमेश्वराचे प्रेमस्वरूप फारच थोडे जाणत असतात. सभोवती समाजाकडे पाहिल्यास परमेश्वराच्या स्वरूपाविषयी नाना मते आढळतात. ज्याची जशी समजूत, तसा तो वागतो. स्वतःच्या समजुतीप्रमाणे वागल्याने तो समाधान पावतो असे त्याला वाटते.

**भोळा भाव**

मूर्ती म्हणजे परमेश्वर व अनेक मूर्ती पूजण्याची वहिवाट असल्यामुळे परमेश्वर अनेक आहेत अशी समजूत चोहोकडे दिसते. मूर्तिपूजा मान्य असणारे कित्येक मनोभावे मूर्तिपूजा करीत नाहीत. धर्माविषयी उदासीनता वाढल्यामुळे जुन्या धर्माकडे किंवा आचाराकडे एकंदर पाहता लोकांचे लक्ष कमीच आहे. पुरोहितवर्गाचे महत्त्व व वर्चस्व कमी झाल्यामुळे मूर्तिपूजेला प्राधान्य असलेला रूढ धर्म मोडकळीस आला. पण पुरोहितवर्गाचे वर्चस्व मूलतः नष्ट झाले आहे असे मुळीच नाही. धूर्त व चिकट उपाध्यायवर्ग आपले अधिराज्य गाजवण्याची संधी मुळीच गमावत नाही. शहरातील लोक नवीन विचारांच्या सान्निध्यात असतात म्हणून त्यांची भोळ्या भावापासून सुटका झालेली दिसते. भोळ्या भावाचे पीक निरक्षर शेतकरी बहुजनसमाजात अतोनात असते.

शेतकरी सृष्टीसौंदर्याच्या सान्निध्यात असतो. नाना वनस्पतींपासून धान्य कसे निर्माण होते हे तो जाणतो. परंतु धान्य पिकावे म्हणून पाऊस, ऊन इत्यादींची योजना एका परमेश्वराने केली आहे, ही वस्तुस्थिती शेतकरी जाणत नाही. निरक्षरता व पारंपरिक आचारविचार यायोगे शेतकरी धार्मिक बाबतीत पूर्ण भोळा बनला आहे. आणि भोळा भाव सुशिक्षितात व अर्ध शिक्षितातदेखील दिसून येतो !

प्रपंचात वेगवेगळ्या प्रकारची संकटे येतात. याच कारणे 'देव आपल्यावर कोपला आहे. त्याचे देणे दिले नाही. अमूक प्रकारे शांती केली नाही.' ह्या प्रकारे संकटपीडित माणसाची समजूत असते व करून दिली जाते. शेतकरी व इतरेजन देवर्षी मागे लागतात. पुष्कळशा खेड्यात दवाखाने नसतात. रोग्यासाठी देवर्षी करून पुष्कळसा खर्च केल्यावर शेजारच्या शहरातील दवाखान्यात शेवटी रोग्याला नेतात. रोग जुनाट झाल्यामुळे तेथेही रोग्याचा बचाव होत नाही व सर्व यातायात वाया जाते. पेरावे तसे उगवते. सातू पेरले असता गहू उगवत नाहीत. त्याप्रमाणे चांगल्या कृत्त्यांचे चांगले फळ मिळते, वाईट कृत्यांचे वाईट फळ मिळते. योग्य प्रकारे प्रयत्न करणारास ईश्वर साहाय्य देतो. सदाचाराने माणसांनी वागावे अशी त्याची इच्छा असते. परमेश्वराने सर्व जग निर्माण केले. आईप्रमाणे तो सर्वांना रक्षितो. परमेश्वर सर्वांच्या कल्याणासाठी आहे. कित्येकांच्या समजूतीप्रमाणे तो रागावून कोणाच्या अकल्याणाला कारणीभूत होत नाही. माता कापी गळा। तेथे कोण राखी बाळा। याप्रमाणे परमेश्वर जर रागावत असेल तर आतापर्यंत जगाचे पालन कसे झाले व होत आहे? रागावणे हा परमेश्वराचा गुण नाही. दयाळुपणा हा त्याचा गुण आहे. प्रेमाच्या माणसास मृत्यू आला तर अज्ञ माणसे परमेश्वरास दोष देतात. प्रेमाच्या माणसास कोणी जन्मास घातले? व त्याचे मरेपर्यंत रक्षण कोणी केले? परमेश्वरानेच ना? दुष्काळ पडला, रोगराई आली, ज्वालामुखी व भूकंप झाला असता, तुमचा दयाळु परमेश्वर कोठे गेला, असा प्रश्न निरीश्वरवादी करतात. सुकाळा कोण करतो? आरोग्य कोण देतो? समुद्रातील बेटे व पृथ्वीच्या पाठीवरील मोठमोठे भूभाग कोणी निर्मिले? ही सर्व लीला परमेश्वराची आहे. निरीश्वरवाद्यांच्या किंवा सर्व मानवांच्या कृतीला सीमा आहे. पण परमेश्वराची कृती असीम व अतर्क्य आहे. तो जे जे करतो ते ते सर्वांच्या भल्याकरता करतो. म्हणून प्रपंचात वागताना सर्वांनी आत्मनिरीक्षण करून परमेश्वराचे प्रेमस्वरूप ध्यानी घ्यावे.

## धार्मिक भोळेपणा

धार्मिक बाबतीत भोळेपणा मूर्तिपुजेमुळे टिकून राहिला आहे. पुजारी लोक देवादिकांचे भय दाखवून द्रव्यशोषण करतात. खरा धर्म,  खरी भक्ती यांच्यापैकी फारच थोड्यांना ठाऊक असते. मूर्ती ह्या अनेक सत्पुरुषांच्या व थोर लोकांच्या प्रतिमा असतात. ह्याबद्दल एक कवी म्हणतो,

*'श्रीराम जयराम सकल म्हणती। परी ते नेणती राम कैंचा।*

*राम तो कालचा पुत्र दशरथाचा। अनंता कालींचा आत्माराम।।'*

अवतार मानल्यामुळे व मूर्तिपूजेमुळे परमेश्वराच्या श्रेष्ठ स्वरूपास गौणत्व येऊन भोंदूपणा माजतो. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या अंतःकरणाने शुद्धतापूर्वक परमेश्वरास शरण जाणे हीच श्रेष्ठ उपासना होय. मी परमेश्वराचा अवतार आहे असे सांगून कित्येक लोक अज्ञ समाजास लुबाडतात. बुवाबाजी-गुरुबाजी अशीच वाढते. बुवा लोक कोणत्या तरी देवतेचे देव्हारे माजवतात व लोक दुसऱ्यावर विश्वासून बुवांचे देव्हारे माजवतात.

*'दीनवत्सला कृपासिंधु । दीनदयाळा दीनबंधु ।*

*दयाघना । भक्तजनां । पावशी । धांवशी । तारिशी ।*

*भवभय हरिशी घोर चिंता ।।'*

अशा प्रकारे परमेश्वराला आळवल्यावर प. वा. 'दीनबंधू' कृ. पा. भालेकर सर्व बहुजनसमाजाचे कल्याण व्हावे म्हणून इशारा देत आहेत की —

*'खोटा धर्म, खोटा पक्ष, खोटा पंथ जोडू नका ।*
*खोट्या गुरुची खरीच सेवा उगाच तुम्ही करू नका ।'*
*'नाना देव, नाना तीर्थे, नाना व्रते बहकू नका ।'*

ह्या उपदेशाप्रमाणे वागल्यानेच स्त्री-पुरुषांची उन्नती होणार आहे.

प्रस्तुत लेखात परमेश्वरविषयक समजूत कोती असल्यामुळे विशेषतः बहुजनसमाज कसा अवनत मार्गात आहे हे दाखवले आहे.

**ब्राह्मसमाजापुढील कार्य**

परमेश्वराचे खरे प्रेमस्वरूप सर्वांना समजावून सांगणे, हे एक कार्य ब्राह्मसमाजापुढे आहे. भोळा भाव नाहीसा करण्यासाठी सांघिक कार्याची जरुरी आहे. ब्राह्मधर्म-प्रसारानेच ते घडून येणार आहे. प्रार्थनासमाज अथवा ब्राह्मसमाज या खेरीज शुद्धधर्माच्या पायावर हे कर्तव्य दुसरे कोण करणार?

ब्राह्मधर्माची बहुजनसमाजाला गरज आहे. तो निर्भय होऊन धर्मस्वातंत्र्य उपभोगू लागला पाहिजे. परमेश्वराच्या प्रेमस्वरूपाची सर्वांना ओळख पटो व परमेश्वराचा संदेश चोहोकडे पोचवण्याचे सामर्थ्य आम्हास प्राप्त होवो, ही त्या 'दीनबंधू' दयाळाजवळ प्रार्थना आहे.

( सुबोधपत्रिका, १६/४/१९३९)

******

# १९ परमेश्वराचे स्वरूप व साक्षात्कार

परमेश्वराचे स्वरूप जाणणे, त्याचा स्वानुभव पडताळणे व दुसऱ्यास तो वर्णन करून सांगणे सोपे आहे असे नाही. प्रार्थनासमाजासारख्या एकेश्वरी संस्थांना देवाच्या खऱ्या स्वरूपाविषयी लोकांना ज्ञान करून द्यावे लागते. देव म्हणजे मूर्ती असा समज बाह्यतः सर्वत्र असतो ; पण जे कोणी देवाचे स्वरूपाविषयी अधिकाधिक विचार करतात, ते म्हणतात की, देव निर्गुण-निराकार आहे. ही दोन टोके आढळतात. निराकार आहे याबद्दल वादच नाही. परंतु निर्गुण म्हणावे तर तो गुणरहीत आहे असे होईल. नित्य, ज्ञानस्वरूप, अनंत, कल्याणनिधान, आनंदमय, निरवयव, निराकार, एकच, अद्वितीय, सर्वांचा नियंता, सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वशक्ती, कृपानिधी, प्रेमस्वरूप, परमपवित्र व पतितपावन अशा सतरा गुण-विशेषणांनी ज्यांचे वर्णन होऊ शकते असा गुणयुक्त-सगुण परमेश्वर आहे. असे प्रार्थनासमाजाच्या पहिल्या तत्त्वात सांगितले आहे. ह्याप्रकारे सगुण असलेल्या परमेश्वराच्या स्वरूपाचा प्रार्थनासमाज उपासक आहे. वरील सतरा विशेषणात न्यायी, दीनबंधू इत्यादी अनेक तत्सम विशेषणे मिळवता येतील. परंतु त्यासारख्या गुणविशेषणांनी युक्त असा परमेश्वर आहे, असे आपणास दुसऱ्यांना पटवता आले पाहिजे. परमेश्वर, कृपाळू, न्यायी व निःपक्षपाती, सर्वांचा सांभाळ करणारा आहे असे आपण म्हणतो. परमेश्वराचे हे वर्णन बुद्धीच्या व वस्तुस्थितीच्या कसोटीला लावण्याचा प्रयत्न पुष्कळ करतात. असा प्रयत्न कोणी करू नये; भोळी श्रद्धा बाळगावी. भाव धरावा असे ठरावीक साच्याचे उत्तर आजकालच्या जगात देऊन भागणार नाही. जग गुंतागुंतीचे व विविध आहे. युद्धातून हजारो माणसांची चाललेली कत्तल, उपासमार, धान्य-दुर्मिळता, मोठ्याप्रमाणात वाढत असलेली महागाई व पुष्कळ प्रकारची विषमता पाहून परमेश्वर न्यायी, कृपाळू व निःपक्षपाती कसा, अशा शंकेने कोणास घेरले तर नवल नाही. सत्य गेले भोळ्यापरी। असत्याची चाले थोरी।। असा जगात न्याय आढळतो. ज्ञानेश्वर, तुकाराम, गांधी, सॉक्रेटिस, येशू, लिंकन इत्यादी पुरुषांचा अमानुष छळ झाला! मूर्ख व उथळ बुद्धीचे लोक सुखी असल्याचे आपण पाहतो. न्याय व निःपक्षपातीपणा किंवा समता ही फारशी कोठे नसल्याची जाणीव अनुभवास येते. अन्याय, अविचार, हिंसा, रक्तपात, कलह, मृत्यू, जरा, व्याधी इत्यादी प्रकार अवलोकिले तर जग दुःखमय आहे असे वाटते. त्यातूनच 'दुःख सिद्धान्त' बळावतो, निराशा वाटते. आप्त-स्वकीयांचा अपमृत्यू दुर्दैवाने

अनुभवास आला तरीदेखील बुद्धी चलित होते. परमेश्वर प्रेमस्वरूप कसा? जो जो जगातील दुःख, पीडा, अन्याय व जगाची वाईट बाजू पाहत जावे तो तो, पाहण्यास अधिक अवसर सापडतो. बालमृत्यू, अवर्षण, अतिवर्षण, भूकंप व ज्वालामुखी इत्यादी नैसर्गिक प्रकोपाने होणारे नुकसान, गरीब बायाबापड्यांचा व निरपराध लोकांचा छळ इत्यादी बाजू पाहिल्यावर त्याच्यावरचा विश्वास डळमळू लागतो.

माणसास निसर्गाने बुद्धी दिली आहे. त्या बुद्धीचा उपयोग करण्यास तो मुखत्यार आहे. बुद्धिदाता परमेश्वर आहे, परंतु वाईट बुद्धीचा किंवा कल्पनेचा तो प्रेरक नाही. मनुष्याचे बुद्धीस पाशवी स्वरूप येऊन जगात विषमता, अन्याय व क्रौर्य वाढते. स्वतः निसर्गामुळे व त्यातील हालचालींमुळे मानवसमाज नुकसान पावतो. आरोग्याचे नियम मोडल्याने मृत्यू येतो किंवा अकस्मात अपघात होऊन माणसे मरतात. परमेश्वर जर सर्वशक्तिमान आहे ; तर ह्या गोष्टी तो का थांबवू शकत नाही? सौंदर्य, निसर्गशोभा, मनोरम व सुपीक भूप्रदेश, प्रशांत नद्या, उत्कृष्ट हवापाणी, तारुण्य, जन्म, निरनिराळ्या इंद्रियांना सुखावणाऱ्या वस्तू जगात आहेत. अशांती बरोबर शांती, दुःखाबरोबर सुख जगात आहे. केवळ दुःखमयच जग नाही. सर्वत्र विनाशच केवळ नाही. घडण त्याबरोबर आहेच. जगत् म्हणजे हलणारे व न हलणारे, त्यातील चराचराला पालट आहे. एकच स्थिती कायम नाही. सूर्योदयाबरोबर पुढे सूर्यास्त आहे. दिवसामागून रात्र आहे व रात्रीमागून दिवस आहे. हे ब्रह्मचक्र आहे. निर्माण झालेली वस्तू पुढे परिवर्तन पावते. फार काय, निराळ्या स्वरूपात जाते. जगातील व विश्वातील घडामोडी अनंत आहेत. पूर्वेस सूर्य उगवला व पश्चिमेस तो मावळला असे आपण म्हणतो. आकाशातून पाऊस पडतो, असा भाव आपण बाळगतो. पूर्व किंवा पश्चिम दिशेचा किंवा प्रारंभ, काळाची सुरुवात मध्य व शेवट; आकाशाची परिसीमा इत्यादी अनेक गोष्टी आपल्या बुद्धीस श्रमवतात व तिचा पल्ला खुंटतो. पक्षीजीवन, पशूजीवन, शरीराची ठेवण, परमाणूचे स्वरूप व कार्य इत्यादी प्रकारे शोधित भक्ती करणाऱ्या लोकांची बुद्धी कुंठित होते. शोधकांनाच परमेश्वराच्या अपारशक्ती व अगाधचातुर्ये, ह्यांची कल्पना येते. परमेश्वर सर्व व्यापी व सर्वसाक्षी असला तरी तो एकदम दृश्य नाही. त्याचे दर्शन म्हणजे काही एक साकार बाब नव्हे. अंतःकरणाने आत्मचक्षूंना तो जाणावयाचा व पाहावयाचा असतो. जग व्यंगपुराणात्मक आहे. मनुष्य पाप करतो त्याप्रमाणे इच्छा असेल तर पुण्य व सत्कार्यही करू शकतो. मनाची नौका चालवणारा तो आहे. परमेश्वर ज्ञानमय आहे मग जगात अज्ञान का? निःपक्षपात, न्यायी व समतावादी असताना; विरोधी गोष्टी का दिसतात? आनंदमय असताना दुःख का?

तो परमपवित्र व पतित पावन असताना जगात अपावित्र्य व अधःपात का आढळावे? त्या विरोधी घटनांचे कर्तृत्व कोणाकडे जाते? जगातच वरीलप्रमाणे नरक व स्वर्ग आहेत. जगातील विरोधी व उलट चालणाऱ्या गोष्टी पाहून परमेश्वराचे प्रेमस्वरूपाविषयी शंका घेतल्या जातात! हा नरदेह दिला, बुद्धी दिली, इत्यादी अनेक चांगल्या गोष्टी पाहून संत-साधू द्रवतात व म्हणतात की, (तुका म्हणे) तू गा कृपावंत भारी। ऐसे मज हरि कळो आले! निर्वासितांचे हाल इत्यादी वाढते प्रकार पाहून मनुष्यांची बुद्धी विश्वासास पारखी होण्याचा संभव आहे. गांधीजींसारख्या माणसाचा खून हीदेखील घटना सर्वांस अगाध विचित्र वाटली. जग हे असे आहे. शेतात पीक येते त्याबरोबरच पिकांचे सत्त्वशोषण करणारी हरळी किंवा गवत वाढते. बऱ्या वाईटाचे मिश्रण सर्वत्र व सर्व बाबीत आहे. मग मानवाने वाईटच बाजू सतत अवलोकून खिन्नता, नैराश्य व गैरविश्वास पदरी घेऊन काय फायदा? वाईट गोष्टी आहेत म्हणून परमेश्वराचे स्वरूपाविषयी साशंक व्हावयाचे एवढेच माणसाचे काम नाही. तुकोबांच्या अभंगातही मनाची चलबिचल दिसते. एके ठिकाणी तुकोबा म्हणतात की, तू विश्वंभर आहेस मग तुझ्यात व माझ्यात अंतर का? निरीश्वरवाद्यांनाही घटकाभर मागे सारील असा तुकोबांचा देवाशी झगडा आहे. ह्या आंदोलनातच त्यांची जागृति-संशोधकबुद्धी प्रचीतीस येते; व ते भोळसट भक्त नसून बुद्धी चालवणारे साधक होते असे म्हणावेसे वाटते.

आम्ही जी गुण विशेषणे देवाला योजितो, ती अपुरी ठरली किंवा वर्णनास सर्वस्वी पात्र ठरली नाहीत तर त्यात आश्चर्य नाही. कारण ब्रह्मस्वरूप व अनंत ब्रह्मांडातील विविध व्यापारांचे संबंधाने कार्यकारणभाव लावणे सोपे नव्हे. देव पाहिला, भेटला, त्याचे दर्शन झाले, असे म्हणणे सोपे नाही. उलट कळावयास कठीण, बुद्धीच्या पलीकडचा, तो आहे अशी आम्हास कबुली लागते व आमचे वर्णन अपुरे पडते म्हणून तो '**निर्गुण**' गुणांच्याही पलीकडचा असे आम्ही म्हणतो.

परमेश्वराचा साक्षात्कार वेगवेगळ्या मार्गाने होऊ शकतो. कोणास तो अंतःकरणाचे ठायी होतो. तुकाराम साक्षात्काराचे मार्गी लागत लागत पुढे जात असता त्याला विठोबा म्हणजे परमेश्वर त्याच्या अंतःकरणात भेटला व तुकारामाची तळमळ शांत झाली. त्याने जीवनात क्रांती केली व अवघाची संसार सुखाचा केला. तुकारामाचे उदाहरण सर्वांना आदर्श होऊन बसले आहे.

दुसऱ्याप्रकारे परमेश्वराचा साक्षात्कार होऊ शकतो; म्हणजे तो मार्ग सामान्य व्यवहारातीलच आहे. ईश्वराने सर्व जग निर्मिले. ते जग गुण-दोष युक्त आहे. पापपुण्यात्मक व सुखदुःखात्मक

आहे, यात संशयच नाही. आपण साधे उदाहरण मोसंब्याचे घेऊ. मोसंब्याचा रस फार मधुर असतो. पण वरील साल तुरट किंवा बेचव असते. टाकाऊ असते. नारळ, फणस, आंबा इत्यादी अनेक उदाहरणे आहेत, त्या वस्तूंमध्ये उपयोगी व निरुपयोगी भाग आहे. जगाचे हे असे संमिश्र स्वरूप आहे. दोहोंची निर्मिती व योजना परमेश्वराकडूनच होते. सर्व भौतिक जगाकडे विधायक दृष्टीने पाहून त्यातला चांगला गुण घेणे, ही एक भक्ती आहे. परमेश्वराची भेट आहे. बरे-वाईट, सुख-दुःख समान लेखता येणे ही त्याच्या साक्षात्काराची एक प्रचीती आहे. ह्या योगे मनाची समानता राखता येते.

तिसऱ्या प्रकाराने परमेश्वर पाहावयाचा झाल्यास तो विश्वदर्शनाने दिसू शकतो. आपल्या नेहमीच्या बुद्धीच्या आवाक्याबाहेर जाऊन आपण समुद्र, डोंगर, चंद्र, सूर्यादिग्रहोपग्रह, दिशांची व्याप्ती, आकाशाचा अंत, वेळेची सुरुवात व शेवट इत्यादी विश्वातील विराट गोष्टींचा विचार करू लागलो म्हणजे स्वतःचे लघुत्व पटून परमेश्वराचे अनंतत्व, अगाधत्व व विशालस्वरूप आपणास कळते व साक्षात्कार होतो. साक्षात्कार म्हणजे निराळी जादू किंवा किमया नाही. तो छा छू चा प्रकार नाही! कोण्याही विचारी मानवाच्या आवाक्यातील वरील बाबी आहेत. हेच आम्हास मुख्यतः दर्शवावयाचे आहे.

परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल बुद्धिप्रधान-भाव बाळगणे किंवा त्याचे अस्तित्व न मानणे-म्हणजे त्याच्या साक्षात्काराला पराङ्मुख होणे, ही ज्याच्या त्याच्या सारासारविचारांची गोष्ट आहे व परमेश्वराची शक्ती अशी आहे की, तिचा प्रकाश नानारूपाने मानवांना मिळतो व ते कृतज्ञता प्रकट करण्यास उद्युक्त होतात. निसर्गातच ही शक्ती सामावलेली आहे. परमेश्वर व त्याचा धर्म वस्तुतः एकच आहे. व त्यांचा संदेश मानवांच्या मनामध्ये प्रत्येक युगायुगात प्रकाशित होत असतो ; परमेश्वराचे स्वरूप व साक्षात्कार यांची प्रचीती वारंवार येतच असते. मुलाला आई-संबंधीचा ओढा नैसर्गिक असतो. तद्वतच परमेश्वर प्रेम हे साहजिक व नैसर्गिक आहे.

( सुबोधपत्रिका, २०/७/४९, १७/७/४९, २४/७/४९)

******

# (२०) धर्मजागृतीचा मार्ग

जगातील धर्मजागृतीचा इतिहास पाहिल्यास असे आढळून येईल की हे कार्य फक्त साधुसंतांनीच केले आहे. कोणत्याही देशातील व काळातील संतांच्या शिकवणीत एक प्रकारचे साम्य आढळते. ऐहिक संसाराविषयी मनुष्यास एक प्रकारचा मोह असतो, तो मायेत गुरफटलेला असून जग हेच सत्य असे त्यास वाटते त्याचे वैराग्य क्षणिक असल्यामुळे त्यास स्मशान वैराग्य असे म्हणतात. साधुसंतांचा मुख्य कटाक्ष मनुष्याच्या या भ्रममूलक प्रवृत्तीवर आहे. साधुसंतांनी संसाराचे असारत्व वर्णन करूनही संसार केला, त्यांना मुलेबाळे होती ही विसंगती वाटते. पण विचारांती असे कळून येईल की साधुसंतांनी संसार असार आहे असा उपदेश केला. पण असेही प्रतिपादिले की संसार म्हणजे धर्मसाधन. मनुष्य फक्त व्यक्तीपुरताच विचार करून ऐहिक सुखाच्या दृष्टीने संसार करू लागला की, शेवटी संसार असार आहे असे वाटू लागते. पण संसार परमार्थ-साधनाचे एक प्रमुख अंग आहे. त्यात भोगापेक्षा त्यागाला, स्वार्थापेक्षा परमार्थाला, ग्रहणापेक्षा दानाला अधिक महत्त्व आहे. संसाराच्या सोपानावरून परमार्थाचे शिखर गाठता येते असा संतांचा उपदेश आहे. एकनाथादी संत संसारी असूनही परमार्थी होते. संसाराचे मर्म संसार न करूनही रामदासांना नीट कळले होते व म्हणूनच त्यांनी संसाराची महती शिष्यांना पटवली.

संसारी माणसास धर्मकर्मादिकांचा विसर पडू लागला की, त्याचा मोह बळावतो व तो कर्तव्यच्युत होतो. देवधर्म, प्रार्थना, भजनपूजन यातही ऐहिक अहंकार दिसून येतो. धार्मिक कृत्ये मोठेपणाच्या भावनेने, धनपुत्रादी लाभाच्या आशेने, पापाच्या भीतीने केली जातात. त्याचा परिणाम मनुष्याच्या विसंगत वर्तनात दिसून येतो. देवाजवळ दयेची याचना करणारा सेवक व कनिष्ठ यांच्यावर अरेरावी करतो. आपल्या पापाबद्दल देवाजवळ दयेची याचना करणारा अपराध्यास कडक शिक्षा करतो. अशारीतीने देवाची सेवा देवाच्या इच्छेविरुद्ध त्याचे आचरण असते. संताचा उपदेश अशा लोकांकरिता आहे.

भक्ती हे खरे धर्मसाधन, दया हाच खरा धर्ममार्ग, निर्लोभ ही खरी धर्म कसोटी, संत या कसोटीत उतरले त्यामुळे संसारात राहूनही संसाराचे असारत्व त्याना प्रतिपादणे शक्य झाले. त्यांनी धर्म जागृती केली, धर्म जगवला म्हणजेच दीनांचे रक्षण केले, त्यांना दया दाखवली.

संतांचा उपदेश सर्वांनाच आचरता आला नाही. म्हणून त्यांनी केलेली जागृती निष्फळ झाली, असे नाही. 'अवघाचि संसार सुखाचा करीन' हे त्यांचे ध्येय होते. त्यांनी जगाचा संसार मांडला. त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले नाहीत. ते एकंदर भक्तिमार्गाचा प्रसार करण्यास कारणीभूत झाले.

प्रार्थनासमाजाने ही धर्मप्रवृत्ती प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. संसार व परमार्थ, प्रवृत्ती व निवृत्ती यांचा योग्य तो मेळ घालण्याचे कार्य समाजाने केले. या दृष्टीने ब्राह्मसमाज-प्रार्थनासमाज इ. संस्थांनी सुवर्णमध्य साधला आहे. 'जे का रंजले गांजले, त्यांस म्हणे जो आपुले, तोच साधू ओळखावा, देव तेथेंचि जाणावा' या तत्त्वाचा पुरस्कार प्रार्थनासमाजाने केला. हरीचे भक्त निर्भयपणे संसार करून परमार्थ साधू शकतात, कारण त्यांचा धर्म बंधूभावावर अधालेला आहे.

(सुबोधपत्रिका, २०/११/१९४९)

******

# २१ परमेश्वराची प्रचीती

परमेश्वर ही एक अदृश्य व कार्यकारी शक्ती आहे. माणसातील जाणत्यांना, जेव्हा त्यांनी अहंकारत्याग केला तेव्हा विचारांती ह्या शक्तीला शरण जाणे भाग पडले. पुढे हा एक प्रघात पडला. पिढ्यान् पिढ्या आस्तिक्यभाव रूढ झाला. परमेश्वराला शरण जाण्याचे अथवा त्याचे पूजेचे प्रकार नानाविध झाले तरी भक्तिबल ही काही पिढ्यान्पिढ्या चालत येणारी गोष्ट नाही. संतांचे आप्त ही संत किंवा भक्त नेहमीच असू शकत नाहीत. प्रत्येक व्यक्तीने परमेश्वराला स्वतः जाणले पाहिजे. नुसते परंपरागत वृत्तीने परमेश्वराला शरण जाणे हा एक प्रकारचा गतानुगतिकपणा होतो. परमेश्वर ही केवळ गृहीत धरण्याजोगी शक्ती नाही. भक्ताने आपले जीवित आक्रमित असता येणाऱ्या वेगवेगळ्या प्रसंगी अनुभवली पाहिजे. परमेश्वराचा आत्म्याला अनुभव आला पाहिजे व त्यायोगे त्याच्या प्रेमळपणाबद्दल व प्रार्थनेच्या द्वारे त्याच्याकडून मिळालेल्या आदेशाबद्दल भक्ताला कृतज्ञता व धन्यता वाटली पाहिजे. यावरून भक्ती हा देखावा नाही. आत्म्याची ती उच्च स्थिती आहे व उत्कृष्ट भाव आहे, बल आहे.

परमार्थ म्हणजे वरीलप्रमाणे श्रेष्ठ अर्थ साधणे. परंतु धर्मपालन हे मुख्यतः पारलौकिक सुखासाठी आहे असा समज अद्यापि रूढ आहे. ह्या पारलौकिक परमार्थप्रीत्यर्थ नाना लोक नाना मार्ग स्वीकारतात, शरीराला कष्ट देतात. शरीर म्हणजे काही दुय्यम बाब नाही. भक्तीचा आस्वाद घेणारा आत्मा शरीरात रहिवास करतो, म्हणून आत्म्याचे जे निवासस्थान शरीर ते भक्कम पाहिजे. तरच भक्तिसाधन उत्कृष्ट प्रकारे अनुभवता येईल. पारलौकिक सुख कोणी, कसे, केव्हा अनुभवले? निरनिराळ्या प्रकारची दाने व व्रते पारलौकिक सुखाच्या प्राप्तीसाठी आचरली. वास्तविक इहलोकाचे सुखदुःख प्रत्येकाच्या प्रचीतीस येते. प्रश्न असा आहे की, प्रत्यक्ष सृष्टीत असणारे ऐहिक जीवित कसे सुखावह होईल? शरीराची, प्रपंचाची व प्रयत्नांची धर्माच्या नावावर अवहेलना करून सुख लाभेल काय? शरीर-प्रपंच-प्रयत्न ही तर साधने आहेत. ह्यांच्या मदतीशिवाय परमेश्वराची प्रचीती येणार नाही.

भक्ताने परमेश्वराचे थोर गुण लक्षात घेतले पाहिलेत. त्या गुणांसाठी काही योग्यता आपल्याठायी आणण्याचा प्रयत्न सतत केला पाहिजे. नामजप-नामस्मरण प्रयत्नहीन राहून

आळशीपणाने करणे म्हणजे अधर्मच होय. हे ईश्वरास प्रिय नाही. सत्कृत्ये सतत करणे माणसाचे कर्तव्य आहे. पोकळ नामस्मरण ईश्वरास कसे अप्रिय आहे, ह्याबद्दल महात्मा जोतीबा फुले म्हणतात :–

"निर्मिकाने एकंदर सर्व पदार्थ उत्पन्न केले आहेत. त्यापैकी प्रत्येक पदार्थाचा कोणकोणत्या ठिकाणी कसा कसा उपयोग करावा याविषयी रात्रंदिवस खटपट करून ध्यानस्थ होऊन त्याविषयी विचार करीत बसल्याने निर्मिकाची अगाध शक्ती, अगाध चातुर्य व अगाध लीला होणार आहे."

भक्ताने उद्योगी राहून आपल्या प्रयत्नांना ईश्वरी साहाय्य कसे मिळते, सुखदुःखाचे वेळी परमेश्वर मनाची स्थिती कायम ठेवण्याचा कसा साहाय्यभूत होतो हे अनुभवले पाहिजे.

निरीक्षणपूर्वक विचार केला तर आढळते की, पुष्कळ धर्मनिष्ठ म्हणवणारे लोक खरे धार्मिक नसतात. आपल्याप्रमाणे इतर जीवांना आत्मा आहे असे जाणून, ते जीव मारत नाहीत किंवा मांस भक्षण करीत नाहीत. परंतु ह्या प्रकारची मंडळी यात्रेला तीर्थाच्या ठायी जमली म्हणजे तेथे जातिभेद-स्पृश्यास्पृश्य वगैरे उच्चनीच भाव मनात आणून भेदभावांचे प्रदर्शन करतात. धर्माची, समानतेची शिकवण बाजूला राहते. श्वासोच्छ्वासाचे द्वारे सुद्धा जीवजीवाणू मरू नयेत म्हणून फडके वापरणारे लोक सावकारीपाश टाकून जनतेस पिळतात. म्हणून धर्म हा व्यवहारात प्रत्यक्ष आला पाहिजे तरच खरा धार्मिकपणा म्हणता येईल. नाहीतर भक्ती ही फोल आहे व 'परमेश्वराची प्रचीती' ह्या केवळ गप्पा आहेत. तो जगाला भुलवण्याचा उपाय व स्वतःचे दोष झाकून गुणवंत आहोत असे दाखवण्याचा मार्ग होऊन बसतो.!!

धर्मासंबंधी खरीखुरी कळकळ बाळगणाऱ्यांनी धर्म व व्यवहार यांची सुसंगती स्वतःचे वर्तनाने जगाचे निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे व अशा प्रकारचा प्रयत्न करताना तीक्ष्ण आत्मपरीक्षणाचा अवलंब करून परमेश्वराची प्रचीती मिळवली पाहिजे.

पूर्वी प्रपंचाची व त्यात जरूर असणाऱ्या ऐहिक उन्नतीच्या बाबतीत निवृत्तीच्या अतिरेकाने अवहेलना झाली असेल. पण आज प्रपंचातील पूर्वी असलेले धर्माचे स्थान नाहीसे झाले आहे. नियमनही कमी पडले आहे. साहित्यक्षेत्री शृंगार रसाची जोमाने निपज होत आहे. पण शृंगार फार फार तर तरुणपणीच फक्त मोहक वाटेल! भक्तिरस तत्पूर्वीच्या काळी व तद्नंतरच्याही काळी किंबहुना सर्व काळी सारखाच मधुर आहे.

यावरून प्रपंचाची निष्कारण अवहेलना करणे किंवा उलटपक्षी भक्ती विसरून ऐहिक वैभव व सुखे कायमची आहेत अशी भीती बाळगून असणे, हा मार्ग परमेश्वराच्या प्रचीतीस किंवा खऱ्या सुखाला कारणीभूत होणारा नाही. म्हणून बुद्धीची जागृती राखून प्रपंच, धर्म व परमेश्वर ह्यांविषयी स्त्री-पुरुषांनी, आबालवृद्धांनी सारासार विचार केलाच पाहिजे. त्याखेरीज सुटका नाही किंवा उन्नतीचा अन्य तरणोपाय नाही.

(सुबोधपत्रिका, १६/६/४०)

******

# २२ प्रार्थनेचे ध्येय

ईश्वरवादी व जडवादी किंवा निरीश्वरवादी असे दोन स्पष्ट भेद फार पूर्वीपासून तत्त्वज्ञानाच्या इतिहासात आढळून येतात. कित्येक लोक म्हणतात की, हल्ली देव न मानणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे. ही गोष्ट खरी असेलदेखील. देव मानणाऱ्यांनी देव न मानणाऱ्यांचा तिरस्कार (किंवा द्वेष) बाळगण्याचे कारण नाही. व त्यांची ही समजूत चमत्कारिक आहे, असे वाटून घेण्याचे कारण नाही. उलटपक्षी त्यांच्यासंबंधीचा बंधुभाव आपण बाळगणे कर्तव्याचे आहे. कोणाही माणसाचा त्याच्या प्रामाणिक मताबद्दल छळ किंवा तिरस्कार होणे युक्त नाही. मात्र त्याचे मत प्रामाणिक पाहिजे. मग वरील दोन पक्षापैकी कोणत्याही एका पक्षासंबंधाचे का असेना! दांभिकता त्याज्यच होय. संतांनी म्हणूनच भक्तगण म्हणवणाऱ्यांच्या मधील दांभिकतेवर सणसणीत कोरडे ओढले आहेत! त्यांनी स्वपक्षाची फुकटची तरफदारी केली नाही. तुकारामासारखे संत ईश्वरावरदेखील रागावलेले आढळतात. कारण ते जागृत-बुद्धीचे व जबाबदार लोकनायक होते.

कोणाही माणसास ईश्वराविषयी प्रत्यक्ष प्रमाण दाखवता यावयाचे नाही. कारण '**चैतन्य**' हा पदार्थ नाही. आध्यात्मिक वस्तू ज्याची त्यानेच अनुभवावयाची असते. पदार्थाच्या दर्शनासारखे आध्यात्मिक वस्तूचे साकार व चर्मचक्षूस साक्षात् दृश्य असे दर्शन व्हावयाचे नाही. साक्षात्काराचा असा लौकिक अर्थ मानतात; पण हे स्वप्न होय! चिंत्य मूर्तीचे स्वप्नात साहजिक-दर्शन म्हणजे साक्षात्कार नव्हे! परमेश्वरज्ञान किंवा परमानंद इतका सोपा नव्हे! आपण ज्या समजुती बाळगून असतो, त्या बुद्धीवर घासून पाहणे जरूर असते. नाहीतर भ्रमालाच ज्ञान समजून प्रवाहाबरोबर वाहत जाण्याचा प्रसंग प्राप्त होतो.

माणसाला बुद्धी व वाचा आहे. 'देव नाहीं' असे त्याचा बुद्धीने ठरवले की तो तसे बोलू शकतो. देवाविषयी व त्याच्या गुणांविषयी माणूस शंका घेऊ शकतो. पण माणसाने स्वतःविषयी अधिक विचार केला तर त्याच्याही ठायी 'कर्तुमकर्तुम्' शक्ती नाही. तो पूर्ण किंवा सर्व शक्तिमान् नाही. त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करून घेणे त्यास अशक्य आहे. परिस्थितीचा तो पुष्कळ प्रकारे दास असतो. माणूस आपल्या ज्ञानात भर घालत आला आहे, त्याने अनेक शोध लावून पदार्थावर आपला कबजा मिळवला आहे, हे खरे! स्वसुखात भर घालण्यासाठी आणखीही हे विज्ञान तो वाढवू शकेल. विज्ञानाची व्याप्ती ज्ञानाप्रमाणे अनंत आहे. माणसाची थोरवी विज्ञानाचा किंवा ज्ञानाचा तो कसा उपयोग

करून घेतो यावर राहते. तरी भौतिक ज्ञानाच्या वाढीने तो पूर्ण सुखी किंवा समाधानी नाही. जगामध्ये माणसाखेरीज इतर अनेक प्राणी व जीव वास्तव्य करतात. जसे पशू आहेत तसे पक्ष्यादी आहेत. ह्या सर्वांना माणसासारखी बुद्धी व वाचा नाही. माणसांतील युद्धप्रियता, परस्परविद्वेष, अहंकार व वासना इत्यादी विकार पाहिल्यास मनुष्येतर जीव बरे असे म्हणावेसे वाटेल.

बुद्धीने माणसाने स्वतःचे ब्रह्मांडातील स्थान व शक्ती अजमावली तर त्यास स्वशक्तीची अल्पता कळून येते. ईश्वरशक्ती जाणण्यास भावनाच पाहिजे असे म्हटले जाते. पण बुद्धीचा वापर करून मग भाव बाळगणे हाच मार्ग सर्वोत्तम होय. कारण बुद्धीचे वैशिष्ट्य ते काय राहिले? परमेश्वर निराकार आहे, मनुष्य कितीही श्रेष्ठत्वास चढला तरी तो परमेश्वर होऊ शकणार नाही, एकच ग्रंथ ( किंवा व्यक्ती ) सर्व पूर्ण व अबाधित असू शकत नाही. कोणी एखादाच माणूस देवाचा अवतार असू शकत नाही. ही प्रमेये त्याने बुद्धीचाच वापर करून ठरवली. भावनेवर चालणारे, भावनेच्या जोरावर, वरील प्रमेयांना पाखंड समजतात, म्हणून भावनेची व बुद्धीची फारकत होता उपयोगी नाही.

अनंत विश्वाची व्याप्ती, स्वतःचे लघुत्व व अशाश्वतता पाहून विचारी माणूस साहजिक परम शक्तीकडे वळतो. त्याचा अहंकार गळतो! तो आत्मपरीक्षण करू लागतो. त्याची बुद्धी कृतज्ञता व्यक्त करू लागते. तो नम्र होऊन शरणागत होतो. प्रार्थनेची वाट त्याला दिसू लागते. मुख्यतः कृतज्ञता हेच प्रार्थनेचे ध्येय होय! व हे प्रत्येकास बुध्दिगम्य आहे.

प्रार्थना जर केवळ भावनेवर आधारण्याचा परिपाठ पडला की, त्या प्रकारात भोळाभाव व भोळसट विधाने यांचे मिश्रण होते. शक्याशक्यतेचा विचार राहत नाही. कृतज्ञता ही काही देखाव्याची बाब नाही. किंवा कृतज्ञता हा काही भोळेपणा नव्हे. श्रद्धा व भावना आपण जर बुद्धीने तपासून घेऊन चालू लागलो तर धर्माचा बोज अधिक राहील. प्रार्थना ही कवायत किंवा एकप्रकारचे कंटाळवाणे चऱ्हाट वाटणार नाही.

प्रार्थनेच्या द्वारे कृतज्ञता, आत्मपरीक्षण, सद्‌भावना, सद्‌विचार, व सदिच्छा माणसास प्रगट करता येतात. ह्यामुळे व्यक्तिशः व संघशः त्यास सुधारणा साधता येते. यावरून प्रार्थनेचा उद्देश सामान्य नाही.

(सुबोधपत्रिका, २२/१/१९५०)

*******

# २३ ब्राह्मधर्म आणि बहुजन समाज

बहुजनसमाज खेड्यापाड्यांचा रहिवासी असून, तो बहुतांश अज्ञानी व धर्मभोळा आहे. शहरातील शिक्षितांना खऱ्या धर्माची जाणीव नसते. खेड्यातील लोक आपल्या परंपरागत भोळ्या समजुतींना धर्म समजून अंधश्रद्धेने वागत असतात. शहरातील शिक्षितांनी धर्मभोळेपणा टाकला. पण त्याऐवजी  खऱ्या व उदार धर्माचे अनुयायित्व त्यांनी स्वीकारावयास पाहिजे होते. धर्मच नको ही भावना त्यांच्यात बळावत चालली आहे. ह्याप्रमाणे खेडी व शहरे उदारधर्मापासून फार दूर जात आहेत.

खेड्यातून वारकरीपंथाविषयी बरीच आस्था दिसून येते. पण साधूसंतांनी दाखवलेल्या धर्ममार्गाला खेड्यापाड्यांतील शेतकरी-बहुजनसमाज पूर्ण पारखा झाला आहे. मूर्तिपूजा, देवापुढे बळी देणे, आजारी माणसाला औषधीउपायांचे साह्य न देता, देव-देवर्षी यांचे निष्कारण देव्हारे माजवणे इत्यादी अनिष्ट प्रकार खेड्यातून चालू असतात. हे सर्व प्रकार बंद होण्यासाठी 'देव एक आहे व मनुष्ये त्याची लेकरे आहेत' ही ब्राह्मधर्माची उच्चतम शिकवण खेड्यापाड्यांत पसरली पाहिजे. पुष्कळशा खेड्यांत भजनी मंडळे असतात. दहा पाच शिकलेले लोकही आढळू लागले आहेत. अशा भजनीमंडळांमध्ये सुलभ भजनसंग्रहाच्याद्वारे ब्राह्मउपासना रूढ करणे सोपे आहे. एकदा प्रार्थनेचा सुलभमार्ग खेड्यांना चांगला उमजला म्हणजे मग धर्मभोळेपण नष्ट होऊन त्याजागी ब्राह्मधर्मप्रेम नांदू लागेल.

सत्यशोधक समाजाच्या चळवळीमुळे पुष्कळशी खेडी जागृत झाली. परंतु सत्यशोधकसमाजाचे वास्तविक स्वरूप जनतेला समजले नाही असे म्हणणे प्राप्त आहे. ब्राह्मसमाजाप्रमाणे सत्यशोधकसमाज 'एकेश्वरी' आहे. आरंभी आरंभी सत्यशोधकसमाजात देखील पुणे येथे साप्ताहिक ईश्वरोपासना होत असत. याची जाणीव पुढे उरली नाही. व्यक्तिस्वार्थ व जातिनिष्ठा यांचे प्राबल्य वाढले व बहुजनसमाज खऱ्याधर्ममार्गापासून दूरच राहिला. शैक्षणिक व आर्थिक उन्नतीबरोबर धार्मिक उन्नतीही झाली पाहिजे. तरच बहुजनसमाजाची सर्वांगीण सुधारणा झाली असे म्हणता येईल. कसलाही आपमतलब न साधता खेड्यात कार्य झाले पाहिजे.

**महाराष्ट्रात ब्राह्मधर्मप्रसार**

बहुजनसमाजात अध्यात्मिक जागृती व्हावी या उद्देशाने ब्राह्मधर्मतत्त्वानुसार इ.स. १९३३ साली वाई येथे प्रार्थनासंघाची स्थापना झाली. आरंभी आरंभी भजनीमंडळाप्रमाणे अभंग म्हणणे व फार तर त्यांचा अर्थ सांगणे असाच प्रकार चाले. नंतर वाईच्या मंडळींना

कर्मवीर विठ्ठलराव शिंदे यांनी ब्राह्म-उपासना पद्धती शिकवली; व ब्राह्मधर्म बहुजनसमाजाचा धर्म होण्यास कसा सर्वतोपरी पात्र आहे हे त्यांनी सिद्ध केले. केंजळ, गुळुंब आणि असवली या वाईच्या आसपासच्या खेड्यांत कर्मवीर शिंदे यांनी ब्राह्मधर्मावर अधिकारयुक्त व स्त्रीपुरुष शेतकऱ्यांना समजेल अशा सुबोध भाषेत व्याख्याने दिली. त्यामुळे ही खेडी जागृत झाली आहेत. प्रार्थनासंघाच्या देखरेखीखाली चालू असलेल्या युवकसंघाने नुकतेच केंजळ गावी जागृतीचे कार्य केले. थोड्याच वर्षात केंजळ गावी उपासना होण्यास आरंभ होईल अशी आशादायक परिस्थिती निर्माण होत चालली आहे. असवली व गुळुंब ही गावे केंजळचे अनुकरण करतील. वाईजवळच पसरणी म्हणून गाव आहे. तेथे गेल्या ऑक्टोबर महिन्यात 'सेवा संघ' स्थापन झाला आहे. या सेवासंघाचे एक संस्थापक श्री. बाबूराव गोविंदराव शिर्के यांनी जर पुण्या-मुंबईहून प्रार्थनासमाजाचे पुढारी आले तर त्यांना आम्ही व्याख्यानास आनंदाने आमच्या गावी नेऊ असे आश्वासन दिले आहे. ह्याप्रमाणे बहुजनसमाजात ब्राह्म व प्रार्थनासमाजाविषयी आतुरता निर्माण झाली आहे. वर उल्लेखिलेल्या खेडेगावात ब्राह्म किंवा प्रार्थनासमाज मतांचे बीज कायमपणे रुजण्यात वाई हे केंद्र प्रथम चांगले बळकट झाले पाहिजे. नंतर वाईप्रांती झालेल्या ब्राह्मधर्मप्रसाराचा परिणाम सगळ्या महाराष्ट्रावर झाल्याशिवाय राहणार नाही. हे कार्य तडीस नेण्यास ईश्वर कार्यकर्त्यांना सामर्थ्य देवो, अशी त्यांजवळ प्रार्थना आहे.

(सुबोधपत्रिका, २०/१२/३६)

*******

# २४ अवतारवाद व ब्राह्मसमाजाची शिकवणूक

परमेश्वर सावयव रूपाने अवतार घेतो, ही कल्पना आज पिढ्यान्‌पिढ्या रूढ असून, जुन्या वळणाच्या ग्रंथात व पोथ्यापुराणांत आढळून आल्याशिवाय राहत नाही. थोर पुरुषांच्या प्रतिमा करणे व त्यांना अवतारात गणणे हा एक पायंडाच पडून गेला आहे. थोर माणसास देवावतारात घालणे व सामान्य जनापासून त्यांना अलग लेखणे हा प्रघात पडला आहे. अजूनही गतानुगतिकाला त्यात वावगे दिसत नाही!

## जयंती

जगावर उपकार करणारांच्या मूर्ती करणे, अवतारात त्यांना दाखल करणे, त्याचप्रमाणे त्यांची जयंती किंवा मयंती पाळणे ही फार जुनी चाल आहे. उपकाराचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने किंवा वर्षातून एकदा थोर पुरुषाची कामगिरी व शिकवण जगापुढे मांडणे, हे कर्तव्य समाहित दृष्टीने योग्य आहे. परंतु रामनवमी, कृष्णाष्टमी, हनुमानजयंती इत्यादी उत्सव खेड्यापाड्यांतसुद्धा सर्वत्र होतात. ह्या दिवशी कथाकीर्तन होते.

## देवजन्मा आले

देवळात पाळणा बांधून देवाचा जन्मकाळ झाला असे जाहीर करतात. राम, कृष्ण इत्यादीकांनी जी कृत्ये केली याचे कारण ते देवावतारी होते, त्यांना देवाचे साह्य होते. सामान्य लोकांकडून त्यांच्यासारखी कृत्ये होणे अशक्य आहे. त्यांच्यासारखे चमत्कार किंवा अद्‌भुत गोष्टी घडवणे तुम्हा-आम्हाला शक्य नाही. यासाठी परमेश्वराने अवतार घेतलाच पाहिजे, असा उपदेश होतो व मूर्तीला नमस्कार करून लोक घरोघरी जातात. आपल्याला काय शिकण्यासारखे आहे हे त्यांना काही समजत नाही. मग आचरणीय काय आहे ते कसे कळणार? संतांच्या पुण्यतिथी, विशेषतः ज्या जातीत संत झाले, त्या त्या जाती साजऱ्या करतात. उदाहरणार्थ, संत सावतामाळी यांची पुण्यतिथी माळी लोक फार करून करतात. नामदेवाची विशेषतः शिंपीसमाज करतो. इतर समाजांना त्या पवित्र दिवशी काही कर्तव्य आहे असे वाटत नाही. वास्तविक संतांची शिकवण सार्वत्रिक असते; व त्यांच्या स्मृतिदिनाच्या वेळी त्यांच्या चरित्राचे कोणीही परिशीलन केले तरी त्याला फायदा झाल्याखेरीज राहत नाही. जात्यभिमान हा संतांच्या शिकवणुकीच्या प्रसारालाही आडवा येता.

Lives of great men all remind us

We can make our lives sublime.

— H. W. Longfellow.

थोरांचे चरित्र व जीवनक्रम इतरांना अनुसरण्यासाठी असतो. कोणतीही मोठी गोष्ट घडवून आणण्यासाठी देवाने अवतार घेतला पाहिजे. अशी कल्पना रूढ असल्याने मोठमोठ्यांच्या चरित्रापासून प्रत्येकजण शिकण्यासारख्या गोष्टी काय आहेत त्या पाहत नाही. प्रयत्न करून आपणास थोर पुरुषांप्रमाणे होता येईल; अशी महत्त्वाकांक्षा अवतारवादामुळे वाढीस लागत नाही, प्रयत्नांची खच्ची होते, नशीबवाद बळावतो. व्यक्ती व समाज ह्यांचा कल प्रयत्नापणाकडे सतत असला पाहिजे. प्रयत्नवादाच्या मार्गात अवतारवाद ही मोठी धोंड आहे.

**अवतारवादाचा खोटेपणा**

साधुसंतांच्या चरित्रातून अद्‌भुत गोष्टी दिलेल्या असतात. पौराणिक थोर पुरुषांच्या चरित्रात तर त्याहीपेक्षा चमत्कारिक व अशक्य असे प्रकार वर्णिलेले असतात. आजकालच्या बुद्धिवादाच्या काळात अशक्य व प्रचीतीस न येणाऱ्या गोष्टींवर व कथाभागावर कोणीच विश्वास ठेवणार नाही. साधुसंतांच्या उद्‌गारातही परस्परविरोधी व विसंगती दर्शवणारे उद्‌गार असतात. मूर्तींची संख्या ज्याप्रमाणे अमर्याद वाढली; त्याप्रमाणे दहा अवतारांऐवजी आता असंख्य अवतार झाले. शिवाजी, गांधीजी ह्यांनाही अवतारी करून टाकले! थोर पुरुषांना दैवी अवतारात गणल्यामुळे सामान्य जनता दीपून जाऊन दिङ्‌मूढ बनते. थोर व्यक्तींना अवतारात न गणता, थोर व्यक्ती ह्या सर्वांप्रमाणे एका परमेश्वराची लेकरे आहेत. त्यांनी अनेक संकटे झेलून, छळ सोसून प्रयत्न यशस्वी केले. निरनिराळ्या देशातील थोर पुरुषांप्रमाणे व साधुसंतांप्रमाणे लोकांना थोर होण्याचा प्रयत्न करावा. असा उपदेश केल्याने जनसमाजाचा अभ्युदय होणार आहे. अवतार ही कल्पना समाजप्रगतीस विद्‌ध्वंसक आहे. तुकारामबोवासाक्षात् भगवंताचे अवतार होते, असे म्हटले जाते! मग त्यांना इतका छळ सोसून परमेश्वरभक्ती का करावी लागली? सामान्य जनतेप्रमाणे काम क्रोधादि षड्‌रिपु त्यांच्या साधनमार्गात का आडवे आले?

**ब्राह्मसमाजाची शिकवणूक**

धर्मामध्ये व जनसमाजामध्ये घातक गोष्टी शिरल्या. त्यांचे उच्चाटन करण्याचे कार्य ब्राह्मसमाजाने धिटाईने पत्करून शुद्ध व सत्य धर्म जगापुढे निश्चित प्रकारे आणला. बुद्धीला

न पटणारा, व्यवहाराला न जुळणारा, परमेश्वराच्या श्रेष्ठ स्वरूपास व्यर्थ गौणत्व आणणारा जो अवतारवाद तो खोटा आहे अशी शिकवणूक ब्राह्मसमाज आज कित्येक वर्षे देत आहे. हिंदुस्थानच्या इतिहासात ब्राह्मसमाजाच्या कार्याला महत्त्वाचे स्थान आहे. प्रो. ओतुरकर कृत 'हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास' ह्या प्रौढ विद्यार्थ्यांसाठी कित्येक शाळातून चालू असलेल्या पुस्तकात शेवटी 'धार्मिक जागृती' या विभागात उदार धर्मविषयक चळवळीविषयी थोडक्यात मननीय माहिती दिली आहे. "मूर्तिपूजा करावयाची नाही, एका निर्गुण, निराकार, परमेश्वराची प्रार्थना करावयाची, दुसऱ्याच्या धर्माची निंदा करावयाची नाही, ही ब्राह्मसमाजाची मुख्य तत्त्वे आहेत." असे ब्राह्मसमाज ह्या परिच्छेदात प्रो. ओतुरकर लिहितात. पुढे त्यांनी 'समाज सुधारणा' ह्या विभागातही चिंतनीय मजकूर दिला आहे.

## निर्गुण परमेश्वर

परंतु ब्राह्म व प्रार्थनासमाज परमेश्वर निर्गुण, गुणरहित आहे तसे सांगत नाही.

*सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म । आनंदरुपममृतं यद्विभाति*
*शांतं शिवमद्वैतम् । शुद्धमपापविद्धम्*

ह्या प्रमाणे सद्‌गुणसंपन्न परमेश्वराला शरण जाणे, हा ब्राह्म व प्रार्थनासमाजाचा धर्म आहे. परमेश्वराला निर्गुण समजणे म्हणजे तो नाही असे म्हणणे होय. अद्वैतवाद व 'अहं ब्रह्म' ही मते प्रार्थनासमाजास अमान्य आहेत.

"कुतर्क भरित तत्त्वज्ञानाच्या (मदतीने) वेदांती बनून आपणा सर्वांच्या निर्मिकास निकामी करून त्याची उचलबांगडी केली. आणि ते आपणच स्वतः अहं ब्रह्म होऊन पराजित केलेल्या अज्ञानी लोकांचे भूदेव बनले. यावरून अर्थात् एकंदर सर्व जगातील सूज्ञ पुरुष त्यांस नास्तिक म्हणू लागले." असे उद्‌गार 'अहं ब्रह्म' म्हणणाराबद्दल जोतीबा फुले ह्यांनी काढले आहेत.

## परमेश्वराकडे जाण्याचा सरळ रस्ता

ब्राह्म व प्रार्थना समाजाने परमेश्वराकडे जाण्याचा भक्तिमार्ग शुद्ध केला आहे. गेली कित्येक वर्षे मूर्तिपूजा, अवतारवाद, ग्रंथप्रामाण्य आणि मध्यस्थ यांचे योगे भक्तिमार्ग काट्याकुट्यांचा बनला होता. सर्वव्यापी परमेश्वराला शुद्ध अंतःकरणाने, प्रार्थनापूर्वक शरण गेले असता त्याचेकडे जाण्याची सरळ वाट सापडल्याशिवाय राहत नाही.

## सर्वव्यापी परमेश्वर

परमेश्वर म्हणजे अवतारी म्हणून गणला गेलेला पुरुष नव्हे किंवा दगडाची मूर्ती नव्हे. अखिल ब्रह्मांडामध्ये त्याची सर्व शक्ती अनुभवास येत आहे. सर्व विश्वात परमेश्वराचे प्रेमस्वरूप प्रतिबिंबित झाले आहे.

ह्या लेखात, अवतारवाद हा मनुष्याला प्रयत्नवादास बाधक आहे, भक्तिमार्गातील ती एक अडगळ आहे, हे मुख्यतः दर्शवले आहे. परमेश्वराचे स्तवन केल्याने अंतःकरण उल्हसित होते व कर्तव्याचा मार्ग स्पष्ट दिसतो व ते करण्यास परमेश्वराकडून सामर्थ्य प्राप्त होते; तशी एखाद्या अल्पशक्ती मानवाची स्तुती करून काय मिळणार? तुकाराम, पैगंबर महंमद, जीझस वगैरे धर्मस्थापक पुरुष ज्या जगन्नियंत्याला अनन्यभावे शरण गेले, त्यालाच सर्वांनी वंदन केले पाहिजे.

(सुबोधपत्रिका, ६/८/३९)

******

# २५ महात्मा जोतीराव फुले यांचे धर्मपर विचार

*तुका म्हणे काय सलपटाशीं काज ।*
*फणसांतील बीज काढुनि घ्यावें ।।*

नोव्हेंबर महिन्यात २७ व्या तारखेस महाराष्ट्रात ठिकठिकाणी व कित्येक खेड्यापाड्यांतही जोतीरावांची पुण्यतिथी साजरी करण्यात येते. परंतु त्यांच्या मूलभूत शिकवणुकीविषयी व्हावा तसा सक्रिय विचार होत नाही. **सुबोधपत्रिकेच्या** ता. ३०-११-१८९० च्या अंकात जोतीरावांचे निधनानिमित्त मृत्युलेख आला होता. 'आमचे परम मित्र' अशी जिव्हाळ्याची शब्दयोजना पत्रिकेच्या तत्कालीन संपादकांनी केलेली आढळते. ह्याचे कारण जोतीराव शिक्षणप्रसारक, समाजसुधारक व कट्टे एकेश्वरी होते. विद्याद्वारे लोकांना मानवी समान हक्क समजावेत म्हणून त्यांनी १८७३, साली सत्यशोधकसमाज स्थापला. पुणे प्रार्थनासमाजाचे अध्वर्यु प. वा. विनायक बाबाजी भांडारकर, सुबोधपत्रिकेचे वाळवेकर व परमहंस सभेची अनेक एकेश्वरी मंडळी जोतीरावांची मित्र व साह्यकारी होती.

'अभिरूची' नामक मासिकाच्या सप्टेंबर १९४८ च्या अंकात, "असे का झाले व पुढे काय?" ह्या लेखात प्रा. गोवर्धन पारीख म्हणतात, "जोतीबा फुल्यांच्या शिकवणुकीचा परिणाम म्हणजे महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, हे म्हणणेही विपर्यासात्मक आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, येथील वैचारिक भूमीच इतकी दुर्लक्ष केली गेलेली आहे की, कोणताही महत्त्वाचा चांगला विचार तिच्यात मूळ धरूच शकत नाही.... जोतीबांनी सार्वजनिक सत्याचा शोध करावयाचा आदेश दिला, पण फक्त भटाची निर्भर्त्सनाच शिल्लक राहिली. हे असे का होते? याचा बुद्धिवादी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात विचार होणे अवश्य आहे."

कोणत्याही चळवळीतील, चांगला भाग-किंवा सलपट टाकून शुद्ध व उपयोगी बीज काढून घेणे हे ब्राह्मधर्माचे एक कार्य आहे. या दृष्टीने जोतीरावांनी सांगितलेली 'सार्वजनिक सत्ये' (universal Truths) ह्या लेखात संग्रहित केली आहेत. ती सत्ये पुढीलप्रमाणे होत - फुले म्हणतात "सत्य वर्तन केल्याशिवाय मानवप्राणी जगात सुखी होणार नाही.।। सत्य सर्वांचे आदी घर ।। सर्व धर्मांचे माहेर ।। सत्य सुखाला आधार ।। बाकी सर्व अंधःकार ।।

सत्यास स्मरून एकंदर सर्व सार्वजनिक सत्य मग ते क्षुल्लक का असेना, पण त्याचे आचरण केल्याने कोणताही मानवप्राणी दु:खी होणार नाही."

"या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी धर्मपुस्तके केली आहेत, त्यापैकी एकाही ग्रंथात आरंभापासून शेवटपर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नाही. कारण प्रत्येक धर्मपुस्तकामध्ये काही एक व्यक्तींनी त्या वेळच्या प्रसंगास अनुसरून हेकडपणा केल्यामुळे ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यास सारखे हितकारक न होता सहजच त्यामध्ये अनेक फळ्या होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करू लागतात. दुसरे असे की, निर्माणकर्ता जर आपणा सर्व मानवांचा निर्मिक आहे, तर एकंदर सर्व मानवी प्राण्यापैकी प्रत्येक व्यक्तीस त्याने कृपाळू होऊन एकंदर सर्व उत्पन्न केलेल्या मानवी अधिकारांचा यथायोग्य उपयोग करून यावा. असे घडून येत नसल्यामुळे त्यास अनेकप्रकारच्या दु:सह अडचणी सोसाव्या लागतात. सारांश, आपल्या या सर्व सूर्यमंडळासह, आपण वस्ती करणाऱ्या पृथ्वीचा निर्माणकर्ता जर एक आहे; तर तिजवरील अनेक देशातील लोकांचा एकमेकाशी वैरभाव माजून प्रत्येकामध्ये देशाभिमान व धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ का माजले आहे? या पृथ्वीच्या पृष्ठभागावर एकंदर सर्व मानवी प्राणी अवयवाने व बुद्धिकौशल्याने एकसारखे असून, त्यापैकी काही लोक पिढीजाद पवित्र बनून श्रेष्ठ कसे होऊ शकतील? सर्वांसारखे त्यास जन्ममरण असून ते सर्वांप्रमाणे सद्‌गुणांत व दुर्गुणात निपुण नाहीत काय? त्याचप्रमाणे या पृथ्वीवरील अनेक देशातील सर्व नद्या महासागरास मिळत असता, त्यापैकी एका देशातील नदी पवित्र कशी होऊ शकेल?

"दहा दिशांपैकी एकही दिशेचा आम्ही शोध करू लागल्यास आम्हाला थांग लागणार नाही. एकंदर सर्व पोकळीची लांबी, रुंदी, उंची व खोली याचा आम्हास थांग लागणार नाही; ती अनंत आहेत." फुले ह्यांनी साधार असे सांगितले आहे की "निर्मिकाचे साकार -दर्शन कोणासच होणार नाही. कोणी असा प्रयत्न करू नये. निर्माणकर्त्याचे साकार - दर्शन झाले असे म्हणणारे ढोंगी व दुसऱ्यास लुबाडण्याची इच्छा करणारे असतात. आपण सर्व कामात अपुर्ते पंगू, ज्ञानहीन व सर्व दुर्गुणात निपुण असून आपला घटकेचा भरवंसा नाही, यास्तव लाचार होऊन त्या आपल्या दयानिधी निर्माणकर्त्यास आपण येथूनच अनन्यभावे शरण जाऊन साष्टांग प्रणिपात करू या" 'साकार पूजा' फुल्यांना बिलकूल मान्य नव्हती.

"सर्व पदार्थ जर निर्माण कर्त्याने दया दृष्टीने आपल्या मानवाच्या उपभोगासाठी उत्पन्न केले आहेत तर त्यापैकी कोणता पदार्थ उलटा निर्मिकावर वाहून त्याची पूजा करावी".

पोकळ नामस्मरणही वरील साकार पूजेप्रमाणे त्यांना अमान्य होते. फुले म्हणतात की, "उद्योग न करिता गलेलट्ठ पडून निरर्थक निर्मिकाचे नामस्मरण करितात ते निश्चयेकरून विचारवान् पुरुषांच्या उपहासास पात्र होतात." नामस्मरण हा गारुड्यासारखा खेळ होता उपयोगी नाही किंवा निर्वाहाचे साधन होता कामा नये. मानवांनी कृतज्ञपूर्वक व मनःपूर्वक निर्मिकाचे नाव घेतले पाहिजे. एखाद्या मुलाला आईबापांची सेवा करावयाची असेल किंवा त्यांना संतोष द्यावयाचा असेल तर, "माझी माता माझा पिता" असे केवळ पोकळ भजन म्हणून चालावयाचे नाही तर स्वकष्टपूर्वक बहीणभावंडांचे व मातापित्यांचे पालनपोषण केले पाहिजे. एखादा माणूस गैरहजर असला तर त्याची मूर्ती करून त्यावर पुष्पे वाहिली तर त्या माणसास काय उपयोग? फुले अगदी निकराने म्हणतात की, धर्म हा धंदा  होता उपयोगी नाही व देव-धर्म-कर्म ह्यांच्या नावावर जनतेला लुबाडता उपयोगी नाही.

त्यांचे या बाबतीत पुढील प्रमाणे बोल आहेत. "निर्मिकाचे नावाचे सदासर्वकाळ भय बाळगून त्याच्या नावाची आठवण मनी दृढ धरून त्याने निर्माण केलेल्या एकंदर सर्व मानवांबरोबर छक्केपंजे न करता सरळ सात्त्विक आचरण केल्याने निर्मिकाच्या पवित्र नावास सन्मान दिल्यासारखे होईल. त्याचा सतत व्यर्थ  नामघोष करून त्याला संतोष होणार नाही. माणसे जर दुसऱ्यास न ठकवता स्वपरिश्रमाने-स्वकष्टाने जगू लागली, निरर्थक कहल न करता बहीणभावंडांसारखी परस्पर वागू लागली तर निर्मिकांचे राज्य साक्षात् होईल."

"आळशांना-निरुपयोगी लोकांना सहस्त्र भोजने, दक्षिणा किंवा दानधर्म देऊ नये. प्रत्येकाने जगण्याचा कल्पित असा आडमार्ग न काढता स्वश्रमाने जगावे ह्यावर फुल्यांचा फार भर आहे. दगडाच्या देवाला नैवेद्य न वाहता वृद्ध झालेल्या खऱ्या समाजसेवकांना, पंगूंना व पोरक्या मुलांना निर्मिकाच्या नावाने स्वशक्त्यनुरूप मदत करावी म्हणजे निर्मिकास नैवेद्य अर्पण केल्याचे श्रेय होईल."

समाजसेवकांनी देखील स्वकुटुंबियांचा काळजीपूर्वक निर्वाह करून समाजसेवा करावी. समाजावर व्यर्थ भार घालू नये. समाजाने आपण होऊन अशा माणसांना साह्य करावे. यामुळे साह्याचे सार्थक होऊन निर्मिकांस संतोष होतो.

परमेश्वराविषयी फुल्यांची बुद्धी पूज्य होती. ते म्हणतात की, "खऱ्या प्रकारे निर्मिकास संतोष होईल असे करा, कारण 'एकंदर सर्व मानवी प्राण्यांचा निर्माणकर्ता साक्षात् तोच आहे.' व्यर्थ अनुष्ठाने व जप ह्यापासून निर्मिकास संतोष होणार नाही. निर्मिकाचे नावावर व्यर्थ बहुरूपी धूर्तपणा किंवा कृत्रिम सोंगे करू नयेत. निर्मिकाने उत्पन्न केलेल्या प्रत्येक पदार्थाचा कोणकोणत्या ठिकाणी कसा उपयोग करावा याविषयी रात्रंदिवस खटपट करून त्याविषयी

सूक्ष्म विचार करावा म्हणजे निर्मिकाची अगाधशक्ती, अगाधलीला ह्याचा परिचय येईल. एरव्ही इतर भोळ्या मार्गाने येणार नाही.”

संसाराविषयी फुल्यांचा दृष्टिकोन अर्थातच आशावादी होता. कष्टपूर्वक चालणाऱ्या गृहस्थाश्रमाला ते फार मान देतात. कौटुंबिक जीवनाची व समाजाची खरी प्रगती परिश्रमाची वाढ होऊनच होणार आहे. कष्टाने जगण्याची ज्यांना धमक नाही, असे लोक संन्यासी व भिक्षुक होतात व प्रपंच खरा नाही, व्यर्थ आहे असा भ्रम प्रपंचातील लोकांच्या बुद्धीत उत्पन्न करतात. असे करण्यात त्यांचा आळशी-धूर्तपणच असतो. संसार व्यर्थ आहे असे यजमानांच्या मनात भरवल्यामुळे गृहस्थाश्रमी लोक दानधर्म करण्यास प्रवृत्त होतात व आळशी धूर्तांचे जीवन सुखी होते. संसार व जग पवित्र आहे. त्याविषयी व्यर्थ वीट भरवणे खरे नाही. फुल्यांची धर्मदृष्टी कार्यकारण भाव व सत्यासत्यविवेक ह्यांवर आधारली होती. परंपरा किंवा अंधश्रद्धा ह्यांचा आश्रय त्यांनी केला नाही. त्यांना भक्ती आवडे पण भक्तीचे स्तोम नापसंत होते. निर्मिकाला त्याची जरुरीच नाही, असे फुले म्हणतात. निर्मिक सर्वशक्तिमान व पूर्ण आहे. अपूर्ण मानवांच्या दातृत्वाची व कृपेची परमेश्वरास गरज नाही.

फुल्यांना मंदिरसंस्था, उपाध्यायसंस्था, भिक्षुकसंस्था ह्या निरनिराळ्या धर्मांत आढळतात; त्या परोपजीवी म्हणून व श्रमजीवी अज्ञान जनतेला नाडवणाऱ्या म्हणून, नापसंत आहेत. स्वर्गाची कल्पना निरनिराळ्या धर्मपुस्तकात आढळते, परंतु हीदेखील बागुलबोवाप्रमाणे निरर्थक व खोटी आहे. स्वर्ग म्हणून निराळे ठिकाण खास नाही. माणसाने स्वश्रमाने पृथ्वीचा स्वर्ग केला पाहिजे; परस्परांशी सत्यवर्तन करून देवाचे साम्राज्य स्थापले पाहिजे, फुल्यांना गतानुगतिक व सांप्रदायिक धर्मकल्पना मान्य नव्हत्या. अज्ञान व थोतांड निरसनार्थ शुद्ध ज्ञानमार्गाचा त्यांनी अवलंब केला. अहंकार टाकण्यासाठी लोकांना त्यांनी विनवले. ज्योती प्रार्थी सर्व लोकां।। व्यर्थ डंभा पेटूं नका।। (डंभा-दंभा) धर्मविषयक विचारांचा फुल्यांचा पाया, मानव्य व मानवी समान अधिकार ह्यावर आधारलेला होता. पक्षपाती धर्म त्यांना मान्य नव्हता. आकुंचित न्याय व कायदा त्यांना खपत नसे, सत्य हे सार्वजनिक असले पाहिजे, व धर्मही जातिबद्ध किंवा संप्रदायबद्ध असता कामा नये. तो सार्वजनिक सत्यावर आधारला जाणे युक्त होय. ह्या प्रकारचे त्यांचे विचार ब्राह्मधर्माला अत्यंत पोषक आहेत. म्हणूनच प. वा. मामा परमानंद प. वा. वा. बा. नवरंगे फुल्यांचे मित्र व साहाय्यक होते. फुलेकृत 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकातील पहिल्या आठ प्रकरणांतील सार्वजनिक धर्मोपदेश आम्ही संग्रहित केला आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' प. वा. मोरोपंत वाळवेकर ह्यांनी स्वतः छापून प्रकाशित केला.

फुले-जीवनाचे ध्येय प. वा. डॉ. विश्राम घोले पुढीलप्रमाणे प्रस्तावनेत देतात-"फुल्यांनी धर्मप्रकरणी सत्यासत्य व कार्यकारण भाव यांचा शोध लावण्यासाठी लोकास सवयी लावल्या. अमुक चाली बऱ्या किंवा वाईट यांचा न्याय त्यापुढे मांडला. मूर्तिपूजेचे खंडण केले, **एकेश्वरी धर्माचे** मंडळ केले. धर्म, कर्म व व्यवहार यात लोक नाडले जाऊ नयेत म्हणून त्यांच्या समजुती पाडल्या." परोपकारी डॉ. विश्राम रामजी घोले सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते. त्यांनी फुल्यांच्या साहित्याचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे दिला आहे-"फुल्यांच्या लिहिण्याचा मुद्दा असा आहे की, एका ईश्वरास भजावे, सद्वर्तनाने वागावे, सर्वांनी बहीणभावंडांप्रमाणे वर्तावे, सर्व मनुष्यांना सारखेच हक्क असावेत, जातिभेद नसावा, स्त्रियांना व पुरुषांना सारखेच हक्क असावे व हल्लीच्या अनेक वाईट चाली ज्यांचा संबंध धर्माशी लावला आहे त्या सोडाव्या."

"ज्याचा मूळ मुद्दा सर्वांचा निर्मिक।। सत्य आहे एक नसे दुजा।। असा सार्वजनिक सत्यधर्माचा मूळ इत्यर्थ स्वतः फुल्यांनीच घोषित केला आहे. शेवटी येथे आम्ही प्रार्थना करतो की, वरीलप्रमाणे ज्यांचे धर्मपर विचार होते त्या फुल्यांचे विधायक दर्शन सर्वांना होवो व अनेक शुष्क वादविवाद मिटोत; व मानव धर्माचे सर्वांकडून परिपालन होवो व जोतीरावांचा 'एकेश्वरीसमाजवाद' सर्वांच्या ध्यानी येवो.

(सुबोधपत्रिका, २१/११/१९४८,२८/११/१९४८,५/१२/१९४८)

******

# २६ महात्मा फुले व ब्राह्मधर्म

महात्मा फुले हे कोणत्याही ब्राह्म व प्रार्थनासमाजाचे सभासद नव्हते. मात्र तत्कालीन बऱ्याच उदार धर्माच्या पुढाऱ्यांशी महात्मा फुलेंचा मैत्रीचा संबंध होता. असे जरी होते तरी, त्यांनी सत्यशोधक समाज नामक वेगळी संस्था प्रस्थापिली. कित्येक प्रार्थनासमाजानुयायी सत्यशोधक समाजाचे त्यावेळी सभासद व हितचिंतक होते. सत्यशोधक चळवळीत कालपरत्वे बरे-वाईट स्वरूप प्राप्त जरी झालेले आढळते, तरी आद्य सत्यशोधक समाज ही एक उदार धर्मप्रसारक संस्था होती. विशेषतः मागासलेल्या वर्गात सामाजिक व धार्मिक सुधारणांचा प्रचार सक्रीय रीतीने प्रस्तुत संस्थेने व तिच्या त्या काली चालू असलेल्या शाखांनी यशस्वी प्रकारे केला. महाराष्ट्रातील उदारधर्मविषयक चळवळीचे ऐतिहासिक सिंहावलोकन करताना, महात्मा फुले व त्यांचा सत्यशोधक समाज यांचा उल्लेख करणे, ही गोष्ट कर्तव्याची आहे. महात्मा फुल्यांच्या लिखाणात रसरशीत ब्राह्मणद्वेष आढळतो, ही गोष्ट खरी. पण तो अपरिहार्य होता. धर्माच्या उदार स्वरूपाला कोठलीही भिक्षुकशाही ग्लानी आणते. ही ग्लानी नाहीशी व्हावी असा त्यांचा हेतू होता. ब्राह्मण-अब्राह्मण जनतेने आपसांत झगडत राहावे, असा प्रतिगामी संदेश देण्यासाठी म. फुले यांचे जीवन खास नव्हते. त्यांचे कार्यक्षेत्र व्यापक सर्वस्पर्शी होते. धार्मिक, सामाजिक सुधारणांचा अवलंब व प्रसार करताना त्यांनी श्रमजीवी वर्गाची आर्थिकविषमता जनतेच्या निदर्शनास आणली. शिक्षणाच्या प्रश्नाला त्यांनी प्राधान्य दिलेच तेथे त्यांची उदार धर्मसेवा स्पष्ट करावयाची आहे. त्यांची महती गावी म्हणून हा खटाटोप नाही.

अवतारवाद लटका आहे, अवतारांच्या कल्पना किती भ्रामक आहेत, पुराणांतरी किती विसंगत गोष्टी आहेत व त्यामुळे एका परमेश्वराच्या भक्तीच्या मार्गात अडथळे आले आहेत, ही गोष्ट त्यांचा गुलामगिरी ग्रंथ उघडपणे सांगतो. अवतारवादावर त्यांनी आपल्या वाङ्मयात इतरत्र दुर्मिळ असा जोराचा हल्ला चढवला. महात्मा फुल्यांना जातिभेद उघडपणे अमान्य होता. मूर्तिपूजा बिलकूल मान्य नव्हती. त्यांचे ह्यासंबंधी सडेतोड उद्गार आहेत. समाजाचे सभासद त्या काळी दर रविवारी उपासनेस जमत असत व प्रार्थनसभेत स्त्रियांचाही अंतर्भाव असे. महात्मा फुल्यांनी लिहिलेले 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक त्यांचे कित्येक परिपक्व विचार आजही जनतेपुढे मांडण्यास समर्थ आहे. सद्धर्मबोधक अशी त्यांची कितीतरी वचने आहेत. सत्यशोधक समाजाचे आद्य अध्यक्ष डॉ. विश्राम रामजी घोले यांचे मूर्तिपूजाखंडनपर निर्भीड उद्गार मननीय आहेत. येथे ती अवतरणे देणे स्थलाभावी अशक्य आहे.

स्वतः महात्मा फुले यांचे 'अनुष्ठान' अत्यंत प्रखर होते. कोणत्याही प्रसंगी, कसल्याही सबबीवर, त्यांनी माघार घेतली नाही. प्रायश्चित्त किंवा शरणागतावस्था त्यांना शिवली नाही. त्यांनी व त्यांच्या त्यावेळच्या अनुयायांनी मूर्तिपूजा, जातिभेद ह्यांचे खंडन केले. त्या सर्वांची पुस्तके, लेख, व त्रोटक काव्ये याची ग्वाही देतात. उदार धर्माच्या वाढीला त्या पुढाऱ्यांनी खेड्यापर्यंत विस्तृत क्षेत्र निर्मिले.

"सर्व मनुष्यामध्ये समता व बंधुभाव जन्मजात आहे, म्हणून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र इत्यादी वर्ण व आजचे जातिभेद सत्यशोधक समाजास मान्य नाहीत. माणसाच्या किंवा पशुपक्षी, वृक्ष वनस्पती वगैरेच्या रूपाने ईश्वर अवतार घेत नाही. त्याची मूर्तीही कल्पिता येत नाहीत व घडविणे अशक्य आहे. म्हणून आज हिंदुधर्मात रूढ असलेली मूर्तिपूजा सत्यशोधक समाजास मान्य नाही."

वास्तविक मूलतःच सत्यशोधक समाज वरील तत्त्वावर अधिष्ठित झाला आहे. परंतु ह्या तत्त्वाप्रमाणे वर्तन व प्रसार करणारांचा अभाव आहे. ब्राह्म अथवा प्रार्थना समाजाची तत्त्वे वरील घोषित केलेल्या धोरणाप्रमाणेच आहेत. ब्राह्मसमाजाचे व प्रार्थनासमाजाचे वाङ्मय सत्यशोधकांना त्यांच्या ध्येयाची जास्ती कल्पना आणून देईल. कारण ब्राह्मधर्म किंवा सत्यधर्म हा केव्हाही एकच असणार. ज्याप्रमाणे देव एकच आहे; त्याप्रमाणेच धर्मही एकच आहे. सार्वजनिक सत्ये (universal truths) चोहोकडे सारखीच राहणार आणि ह्या तत्त्वांचा प्रसार मानवांच्या उन्नतिप्रीत्यर्थ करण्यास एकापेक्षा अधिक समाज जर सज्ज होतील तरच कार्यभाग उरकेल. नामभिन्नता असली तरी ध्येयात ऐक्यच आहे.

आता ब्राह्मणद्वेषाची अगदीच गरज नाही. मूर्ती ही एक आत्मा व परमात्मा त्यांचेमध्ये मध्यस्थच आहे. बहुजन समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने चालू काळ आत्मपरीक्षणाचा व आत्मोन्नतीचा काळ आहे. महात्मा फुल्यांना वंदनीय मानणाऱ्या खेड्यापाड्यांपर्यंत पसरलेल्या समाजसेवकांवर त्यांच्या एकेश्वरी ध्येयांचा प्रसार करण्याची जबाबदारी आहे. मूर्तिपूजा खरी नाही असे प्रतिपादताना स्वकीयांचा, किंबहुना आप्तेष्टांचा विरोध होतो. परंतु भोळा भाव नाहीसा करावयाचा झाल्यास मूर्तिपूजा समूळ सोडली पाहिजे. एकेश्वरी संस्कार-आचार-विचार व भक्ती यांचा अवलंब करणे, म्हणजे विधायक कार्य होय. मागासलेपणाचे मूळ भोळ्या भावात आहे. म्हणून कोणत्याही जनसमाजाने धर्माच्या नावावर अधर्माचे पीक वाढू न देता सद्धर्माचा प्रसार करीत राहिले पाहिजे.

(सुबोधपत्रिका, २१/७/४०)

******

# २७ तरुण व धर्म

**धर्म ही एक श्रद्धेची बाब आहे; अशी फार जुनी समजूत आहे.** पण ही समजूत आहे म्हणजे पूर्ण सत्य नाही. विवेक धर्मास वावडा नाही. सारासार विचार म्हणजेच धर्म असे म्हणता येईल. विचाराने व विचारशक्तीच्या प्राप्तीने मनुष्य इतर प्राणिमात्रापेक्षा श्रेष्ठ व विशेष ठरला आहे. धर्म म्हणजे केवळ श्रद्धा-भक्ती नव्हे. भक्तिमार्गाने धर्माचा बराच भाग व्यापला आहे, हे खरे. दान, दया, अहिंसा, सत्य, कर्तव्य, समाज-धारणा व प्रगती इत्यादी अनेकविध कार्ये व कर्तव्ये धर्माच्या व्याख्येखाली येतात.

**धर्माविषयी दुसरी गैरसमजूत म्हणजे धर्म दुबळ्यांचा म्हाताऱ्यांचा आहे.** पुराणे, धर्मसभा, उपासनास्थाने, कीर्तने इत्यादी ठिकाणी व प्रसंगी प्रायः वृद्ध माणसे हजर असतात. म्हाताऱ्या स्त्रिया देवळांतून जमलेल्या आढळतात. हिंदूंच्या देवळात तरी हा प्रकार आढळतो. उपासतापास, व्रते, वैकल्ये करणे इत्यादी बाबीतही तरुण मागे असलेले आढळतात. आचारधर्मास आता जीवनात फारच अल्प स्थान उरले आहे. शहरात तरी हा अनुभव येतोच. संस्कारधर्म नानाविध कारणामुळे मोडकळीस आला आहे. त्याची शुद्धी व सार्वत्रिक पुनर्घटना झालीच नाही व होणे सोपे काम नाही. शहरात धर्माविषयी उदासीनता व खेड्यात धर्मभोळेपणा व धर्मभ्रम आढळतो. धर्म म्हणजे नीती; पण नैतिक आचरणास पूरक असे वातावरण आढळणे कठीण झाले आहे. खून, मारामाऱ्या, आत्महत्या, अपघात, जाळपोळ, नाशक कृत्ये, इत्यादी तत्सम बाबीच्या बातम्यांनी दैनंदिन वर्तमानपत्रांचे रकाने अडवलेले उत्तरोत्तर मोठ्याप्रमाणात आढळतात. युद्धाची भीती कमी झालेली नाही. मानवांची प्रगती होत आहे असे म्हणता येणे मुश्किल आहे. मानवी ज्ञानात विलक्षण भर पडली आहे. पण मानव अधिक सुखी झाला आहे असे नाही. धर्माने भोळेपणा येतो असे विवेकवादी म्हणताना आढळतात. पण विज्ञानानेदेखील मानवांचे तारण झाले नाही. विज्ञान हे कार्यकारण भावावर आधारलेले शास्त्र (Science) आहे. धर्मशास्त्राचा असा प्रकार नाही. या धर्म व विज्ञानासंबंधी झालेल्या विडंबनाचे कारण दोहोंचा सदुपयोग माणसाने केला नाही हे आहे. विज्ञानाचा उपयोग हिंसक ॲटम बॉम्बस तयार करण्यात होतो; व धर्माचा उपयोग मानसिक, वैचारिक व सामाजिक गुलामगिरी निर्माण करण्यात होत आला. सामाजिक गुलामगिरी मजबूत करण्यास धर्म, शास्त्रे व स्मृती उपयोगात आणल्या गेल्या. विचारांना अडथळा करण्यात आला. ह्याप्रमाणे प्रकार सर्वच धर्मात जगभर झाले. म्हणून **धर्मशुद्धीच्या चळवळी निघाल्या; व निघत असतात. धर्म शुद्धीच्या चळवळींना धर्म सार्वत्रिक केला.**

**मानवी बंधुत्व प्रस्थापित केले.** भागवत धर्माने तर स्त्रिया, शूद्र एवढेच नव्हे तर चांडाळही, महाचांडाळ आणि पतित यांना धर्म व परमेश्वर पावन करतो असे जाहीर केले. महापाप्यांना धर्म व परमेश्वर उद्धरून नेतो ह्या अनुभवाची ग्वाही देणारी संतचरित्रे अनेक आहेत.

प्रतिपादनाचे सार हे आहे की, **धर्म ही सार्वजनिक हिताची बाब आहे.** जात, वय, लिंग, रंग, देश, प्रांत, धर्म-भेद इत्यादी गोष्टी विश्वधर्माच्या पालनाला आड येऊ शकत नाहीत. हवा, पाणी, भूमी इत्यादी बाबी मानवी जीवनाला जरूर व सार्वत्रिक आहेत त्याप्रमाणेच धर्म ही बाब आहे. धर्मावर सर्वांची सारखी सत्ता आहे. तो सर्वांचा सखा आहे. लहानापासून तो थेट वयोवृद्धापर्यंत सर्वांना धर्म सारखा उपयोगी आहे. तरुणास किंवा लहानास तो अपथ्यकर किंवा आचरण्यास कठीण आहे, असे नाही. म्हणून धर्म व धर्माचरण उतार वयात करण्याची गोष्ट; ही समजूत चुकीची आहे. त्याचप्रमाणे ईश्वर चिंतनही सर्वांना चित्तशुद्धी इत्यादी लाभ देते. मग माणूस कोणत्याही वयाचा असो. म्हातारपणी परलोकात उत्तम गती मिळावी म्हणूनच धर्माची कास धरावी असे नाही. इहपर अशी दोन्ही सुखे व स्वास्थ्य देणारा धर्म आहे.

**माणसास कोणतेही सत्कृत्य करावयाचे झाल्यास त्याच्या ठिकाणी तारुण्यावस्थेतच जास्त बल असते.** त्याचे शरीर, इंद्रिये ह्या काळात बळकट असतात व तो कोणताही पराक्रम याच काळात करू शकतो. संसारातील देखील महत् कृत्ये किंवा उद्योग व्यापारादी बाबी धाडसाने करण्यास त्यास ह्याच वयात ताकद असते. नेत्र चांगले असल्याने तो याच वयात सद्ग्रंथ वाचन जास्त करू शकेल. निरनिराळी धर्म-स्थळे पाहू शकेल. म्हणून म्हातारपणी काशीस जाऊन पाप धुवून येणे इत्यादी धर्म कल्पना कोत्या आहेत. धर्म मोहादी विकारांना आळा घालतो व हे मोहादी विकार तारुण्यावस्थेत फारच बलवान असू शकतात. म्हणून धर्माच्या साह्याने ते यावेळी आवरता येतात. स्वतः धर्माला लहान, तरुण, वृद्ध ह्या सारख्या अवस्था नाहीत किंवा जन्म, मृत्यू, जरा-व्याधी इत्यादी अवस्था नाहीत. **सर्व काळात, सर्व स्थळी, कोणासही धर्म, ईश्वरचिंतन व सत्कृत्ये सुफलदायक आहेत. गौतम, ज्ञानेश्वर, तुकाराम वगैरे धर्म-स्थापक पुरुष तारुण्यावस्थेतच धर्मसाधनेस सुसज्ज झाले.**

' नर देही साधा भक्ति ' असा संतांचा आदेश आहे. नरदेह अमूल्य लाभ आहे. क्वचित मिळणारी बाब आहे. ती मिळाली आहे तर तिचे सार्थक करा. मानवेतर प्राण्यात जन्म घेऊन धर्म व ईशचिंतन करता येत नाही म्हणून नरदेहच वारंवार दे, ह्या संसारातच घाल, अशी प्रार्थना तुकोबा त्यांच्या अभंगातून करताना आढळतात. नरदेह नश्वर व क्षणभंगुर आहे, असे संतांनी सांगितले आहे. त्याचप्रमाणे नरदेहाचा अमूल्य महिमाही गायला आहे.

हरिनाम घेण्याच्या कामात दिरंगाई करू नका, कारण देहाचा भरवसा नाही. देहाचा अंत केव्हा व कधी अनपेक्षितपणे ओढवेल ह्याबद्दल भरवसा नाही असे बजावून संत लोकांची मने ईश्वर व धर्म ह्याकडे ओढताना आढळतात. आत्म्याच्या ठायी धर्म-जागृती करण्यासाठी संतांनी हा मार्ग वापरला आहे. म्हातारपणापर्यंत धर्माचा विषय व सत्कृत्ये पुढे ढकलणे अव्यवहार्य आहे. धर्म काही फक्त पेन्शनरांचा नाही. तरुणपण फक्त कादंबरी-वाचन व ऐहिक चैन यासाठीच नाही. धर्म, संतवाङ्मय व तत्त्वज्ञान यांचा विचार तरुणास वावडा वाटण्याचे कारण नाही. ईश्वरदेखील सर्वांचा सखा आहे. तो वयादी तत्सम बाबी पाहत नाही. कोणत्याही काळात, कुठल्याही ठिकाणी व कोणीही वरील चांगल्या बाबींच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केले तर ते पथ्यकरच आहेत. आधुनिक तरुणांनी धर्म पराङ्मुखता दर्शवण्याची गरज नाही. कारण धर्म ही जागतिक कल्याणाची बाब आहे.

सांप्रदायिक व आचारात्मक एवढ्याच धर्माच्या मर्यादा नाहीत. चित्ताची समानता, संकट काळी धैर्य व साह्य, नैराश्यावस्थेत आशेचे किरण, योग्य संयम, बंधुभाव इत्यादी उच्चतम बाबींचा लाभ धर्म करून देतो. धर्म म्हणजे फक्त ऐतिहासिक व प्रस्थापित धर्मसंप्रदाय किंवा पंथ नव्हेत. तरुणांनी धर्माकडे लक्ष पुरवावे म्हणजे परंपरागत आचार विचार व भोळसट श्रद्धा धरावी असे सांगण्याचा इत्यर्थ नसतो. विवेकग्राह्य व जरूर तेवढाच आचारधर्मातील भाग पाळणे श्रेयस्कर होय. चिकित्सा, समीक्षा व सत्यासत्य, सारासार विचार व शोध हे धर्मास हानीकारक नाहीत. शाश्वत धर्मास हे बाधक होऊ शकत नाहीत. धर्मासंबंधीच्या कोत्या समजुतीचे पटल दूर करून, धर्माचा विशाल अर्थ ध्यानी घेऊन, त्याचे पालन कोणीही केल्यास त्याचे व पर्यायाने मानव समाजाचे कल्याणच आहे. धर्माचे विवेकबद्ध निरूपण होणे आज जरूर आहे. त्याच्या व्यवहार्य बाबींचाही साक्षात्कार तरुण पिढीस झाला पाहिजे. केवळ तरुणांचे धर्माकडे लक्ष नाही, ही तक्रार निषेधात्मक पद्धतीने मांडण्यात फायदा नाही.

**धर्माच्या योगेकरून वैचारिक अंधत्व जाऊन, विचारचक्षू जागा होऊ शकतो व सारासार विचार करण्याची माणसाची पात्रता वाढते**; ह्या सारासार विचारांच्या योगाने समन्वय सहकार्य यांची वृद्धी होऊ शकते, अशी खातरजमा होणे युक्त आहे. ज्या धर्माने अशी खारतजमा होते, त्या धर्मास कोणी '**अफू**' समजणार नाही. किंवा तरुण ह्या धर्माचा नंतर अव्हेर करणार नाहीत. धर्मछळ, धर्मयुध्दे ह्या सारख्या मध्ययुगीन कल्पनापासून तरुणांची सोडवणूक होईल व त्यांची चित्ते भडकणार नाहीत. हिंसेकडे त्यांची प्रवृत्ती होणार नाही. **सूडाच्या कल्पनापासून तरुणांना 'शाश्वत-धर्म' सोडवील.** धर्मांधतेमुळे कोणाचे

कल्याण झाले आहे, असे आजवरचा इतिहास सांगत नाही. सर्व प्रकारचा ऐतिहासिक पूर्वानुभव तपासून तरुणांनी आपले धर्मसंबंधी धोरण ठरवावे. तरुण भावनाप्रधान असतात. धर्मदेखील प्रायः भावाचाच विषय होऊ शकतो. जातीय व धर्मविषयक संघटना तयार करणारे तरुणाच्या भावना चेतवतात! प्रक्षोभ निर्मिला जातो. यासाठी जातीय संघटनांचे हेतू पारखून तरुणांनी योग्य तो धर्माभिमान बाळगावा. उच्चतम धर्म तरुणांना भलतीकडे न नेता, त्यांचे आत्मिक व सामुदायिक कल्याण करील. आजच्या लोकशाहीच्या काळात लोकशाही विजयी होण्यास श्रेष्ठधर्म मदत करील. धर्मांधतेवर लोकशाही आधारू शकत नाही. नैतिक आचरण वाढवण्यास मदत करणारा, कर्तव्य तत्परतेस प्रोत्साहन देणारा, माणुसकीचे समान हक्क प्रतिपादणारा धर्म कोठल्याही राष्ट्रात दैनंदिन व्यवहार, राजकारण व अर्थकारण यांच्या प्रगतीस साह्यभूत होतो. कारण धर्म, वरील बाबींपासून अगदी भिन्न व फार दूर राहणार नाही. त्याचा श्रेष्ठ व व्यापक अर्थ जाणून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न झाला तर अनेक प्रकारची दुःखे नष्ट होतील, **धर्म (नैतिक आचरण) हा राजकीय इत्यादी सर्व प्रकारच्या जीवनाचा पाया झाला पाहिजे असे न्या. रानडे-गोखले म्हणत असत व ह्या पायाचा आज सर्वत्र अभाव दिसून येतो.** म्हणूनच सर्व प्रकारच्या जीवनात अवनती आढळते. ह्या कटु अनुभवावरून तरी जरूर तो सर्वांगीण सुधारणेचा मार्ग आपणा सर्वांना दिसेल, अशी सुबुद्धी प्राप्त होवो.

(सुबोधपत्रिका, १६/१२/१९५१, २३/१२/१९५१, ३०/१२/१९५१)

******

# २८ परमेश्वराची सार्वत्रिक कृपा व एकेश्वरी धर्माचा समतावादी संदेश

निर्मिकाने जर एक पृथ्वी केली ।।
  वाही भार भली ।। सर्वत्रांचा ।।१ ।।
तृणवृक्ष भार पाळी आम्हांसाठी ।।
  फळे ती गोमटी छायेसह ।।२ ।।
सुखसोईसाठीं गरगर फेरे ।।
  रात्रंदीन सारे ।। तीच करी ।।३ ।।
मानवांचे धर्म नसावे अनेक ।।
  निर्मीक तो एक ।। जोती म्हणे ।।४ ।।

निर्माणकर्ता एक आहे, असा अनुभव प्राप्त झाल्यावर, त्या निर्माणकर्त्याची सार्वत्रिक कृपा ध्यानात येते. किंबहुना, सर्व मानव प्राणी व इतर जीवजिवाणू यांच्या योगक्षेमसाठी, या सुखसोई जगात निर्माण करून ठेवल्या आहेत, त्यांचे सार्वत्रिक स्वरूप पाहून निर्माणकर्ता 'एकच' असा स्वानुभव कोणाच्याही मनात उत्पन्न होतो व तो परमेश्वराची सार्वत्रिक कृपा गाऊ लागतो. मग निर्माणकर्त्यास मान्य होणारा किंवा त्याचा धर्महीं एकच असणे युक्त आहे, अशी खातरजमा होऊ लागते. ह्या सार्वजनिक धर्माला राजा राममोहन रॉय ह्यांनी 'ब्राह्मधर्म' म्हणून संबोधले. इकडे मराठी प्रांतात म. फुले ह्यांनी त्याच धर्माला 'सार्वजनिक सत्यधर्म' म्हटले. धर्माधर्मातील बजबजपुरी पाहून म. जोतीबा फुले साहजिकपणे पुढे सवाल करतात-

प्राणीमात्रा सोई सुख करण्यास ।। निर्मी पर्जन्यास ।। नद्यांसह ।।१ ।।
त्यांचे सर्व जल वेगाने वाहती ।। पाणी पुरवीती ।। सर्व प्राण्यां ।।२ ।।
सागराचे योगें व्यापार करीती ।। सुख देती घेती ।। एकमेकां ।।३ ।।
मानवांचेसाठीं बहुधर्म कसे ।। झाला कांही पीसे ।। जोती म्हणे ।।४ ।।

अखिल मानवासाठी जर निर्मिकाने एवढी मोठी सार्वत्रिक सुखसोय केली, तो इतका दयाळू आहे, म्हणून त्याला मान्य होणारा असा सार्वत्रिक विश्वधर्म एकच असला पाहिजे. हे विचारांती पटणारे सत्य असताना, नानाधर्मांचा व संप्रदायांचा पसारा मांडून मानवांनो तुम्ही

वेगवेगळ्या प्रकाराने वेडे का झाला? म्हणून ह्या भ्रमनिरसनार्थ म. फुले विनंती करतात की-

एक सूर्य सर्वां प्रकाशास देतो।। उद्योगा लावितो प्राणीमात्रा।।१ ।।
मानवासहीत प्राण्यांचे जीवन।। सर्वांचे पोषण।। तोच करी।।२ ।।
सर्वां सुख देई जनकाच्या परी।। नच धरी दुरी।। कोणी एका।।३ ।।
मानवांचा धर्म एकच असावा।। सत्यानें वर्तावा ।। जोती म्हणें ।।४ ।।

(२) एक चंद्र नित्य भ्रमण करितो।। सर्वां सुख देतो।। निशींदीनीं।।१ ।।
भरती, ओहटी समुद्रास देतो।। जल हलवितो।। क्षारांसह।।२ ।।
पाणी तेंच गोड मेघयोगें होतें।। संतोषीं करीतें।। सर्व प्राण्यां।।३ ।।
मानवांचे साठीं बहूधर्म कसे।। झालां कांहो पीसें ।। जोती म्हणे।।४ ।।

परमेश्वराने चंद्र-सूर्य हे उपयुक्त गोल आकाशी योजून मानवावर फार उपकार केले. त्यामुळे पृथ्वीवर जीवन शक्य होऊन दुसरे अगणित फायदे होतात. ह्या सार्वत्रिक सुखसोईत पृथ्वीवरील मानवात परमेश्वर आवडनिवड करीत नाही. बहुधर्मयोगे पिसे होण्यापेक्षा, मानवांचा एक धर्म, तो सत्याने वर्तता येतो. हा संदेश विविध ईश्वरीकृपा पाहून मानवांचे अंतःकरणात स्फुरला पाहिजे. म. फुले ह्यांच्या हृदयात हा नैसर्गिक धर्म स्फुरला व ते आणखी म्हणतात-

सर्वांसाठीं एक वायु केला खास।। होती श्वासोच्छ्वास।। प्राणीमात्र।।१ ।।
वृक्षवल्लीसह सर्वांचे जीवन।। करी तो पालन जगामाजी।।२ ।।
वायूच्या योगानें हवा शुद्ध होती।। प्राण्यां सुख देती निशींदीनीं।।३ ।।
मानवांनो तुम्ही सत्यधर्मी व्हावें।। ईशगूण गावे जोती म्हणे।।४ ।।

एक देव-एक धर्म ह्या जागतिक धर्माच्या स्वरूपाविषयी खात्री होऊन परमेश्वराचे कृपेविषयी कृतज्ञ राहण्यासाठीं त्याचेच गुण गा व फक्त त्याचे भय धरा असे म. फुले सांगतात. तरी ते अद्याप उपेक्षित एकेश्वरी पुढारी ह्या सदरातच आहेत!

प्राणीमात्रा नेत्रें निर्मिकानें दिलीं।। पाहूं लागलीं एकमेकां ।।१ ।।
ज्ञान सर्वां दिलें सत्य शोधण्याला।। मार्गी लावण्याला अज्ञानास।।२ ।।
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक।। भांडणे अनेक।। कशासाठीं ।।३ ।।
मानवांनो तुम्हीं ईशा नित्य भ्यावें ।। सर्व सुखी व्हावें ।। जोती म्हणे ।।४ ।।

परमेश्वराची सार्वत्रिक कृपा जाणून कृतज्ञतापूर्वक मनुष्य आपल्या ज्ञानाचा योग्य उपयोग करू लागतो. इतर बांधवांसही तो असे वर्तण्यास साहजिक विनवतो. एकेश्वरी धर्म

प्रपंचात कसा प्रत्यक्ष वागणुकीत आणावा याबद्दल म. जोतीराव पुढीलप्रमाणे मार्गदर्शन करतात.

स्त्रीपुरुषें सर्व कष्टकरी व्हावें।। कुटुंबा पोसावें आनंदाने ।।१।।
सार्वभौम सत्य स्वतः आचरावें ।। सुखें वागवावें ।। पंगू लोकां ।।२।।
अशा वर्तनानें सर्वां सुख द्याल ।। स्वतः सुखी व्हाल ।। जोती म्हणे ।।३।।

ह्याप्रकारे प्रपंच करीत असताना खालीलप्रमाणे वागावे-

. न्यायानें वस्तूंचा उपभोग घ्यावा ।। आनंद करावा ।। भांडूं नये ।।
धर्म, राज्य भेद मानवा नसावें ।। सत्यानें वर्तावे ईशासाठीं ।।
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों ।।
मनुजा सांगतों ।। जोती म्हणे ।।

दुसऱ्यावर राजकीय, धार्मिक व सामाजिक वर्चस्व व गुलामी लादणाऱ्यांना उद्देशून म. फुले म्हणतात :

आपल्यावरून जग ओळखावें ।। सर्वां निववावें ।। जोती म्हणें ।।
सर्वांचा निर्मिक आहे एक धनी ।। त्याचें भय मनीं ।। धरा सर्व ।।
त्यानें निर्मियले मानव हे सारे ।। त्याचींच लेकरें ।। तोच रक्षी ।।

असा एकेश्वरी धर्माचा वरीलप्रमाणे समतावादी संदेश आहे. "सूर्यमंडळाची करितां गणना ।। तर्क तो चालेना ।। कल्पनेचा ।। त्यांच्या भोवताली उपग्रह किती ।। प्राणी जगताती असंख्यात।।" परमेश्वराचे अगाध चातुर्य व अतर्क्य लीला सर्व विश्वात व्यापून राहिलेली व निसर्गात ओतप्रोत भरलेली कोणीही अवलोकील तर परमेश्वराबद्दल व त्याच्या धर्माबद्दल साहजिक वास्तविक कल्पना कोणासही म. फुले यांच्याप्रमाणे येऊ शकेल. महाराष्ट्रातील तत्कालीन जाती-वर्णभेदाची कणखर तीव्रता इ. अनेक कारणांमुळे म. फुले प्रार्थनासमाजात प्रत्यक्ष समाविष्ट होऊ शकले नाहीत! त्यांनी आपले संशोधन, संस्था व विचारचालन स्वतंत्र ठेवले तरी त्यांनी प्रस्थापित केलेल्या सार्वजनिक सत्यधर्माचा हेतू स्वतः म. फुले पुढीलप्रमाणे देतात. निसर्गतः त्यांचे मृदु अंतःकरणात ब्राह्मधर्म प्रकटला.

ज्याचा मूळ मुद्दा सर्वांचा निर्मीक।। सत्य आहे एक।। नसे दुजा।।
आपसुखासाठी त्यानें केलें सर्व।। वाहूं नको गर्व।। पूजेमध्यें।।
स्त्रीपुरुषांमध्यें निवड नसावी।। गुणें आदरावी।। सर्वकाळ।।

म. फुले ह्यांची स्वतंत्र व निर्भीड विचारसरणी पाहता त्यांनी एकेश्वरी धर्माची सेवा केलेली दिसून येते व प्रत्यक्ष ब्राह्मधर्मपरिचय घडला नसतानादेखील मानवांचे उद्धारार्थ त्यांनी स्वतंत्रपणे तत्सम 'सार्वजनिक सत्यधर्म' सांगितला. मराठी वाचकांसमोर नम्रभावे, म. फुले

यांच्या शब्दात परमेश्वराचे स्वरूप, कृपा व त्यांनी निवेदिलेला एकेश्वरी धर्माचा समतावादी संदेश प्रस्तुत लेखाचे द्वारे मांडला आहे. महाराष्ट्राच्या एका आद्य सुधारकाचा हा एकेश्वरी संदेश सर्वांचे ध्यानी येईल अशी आशा वाटते. शिक्षण, अस्पृश्यतानिवारण इ. अनेक समाजसुधारणेचे बहुतेक सर्व विषय म. फुले ह्यांनी जनतेसमोर सक्रीय मांडले. 'एकेश्वरी धर्म' देखील त्यांनी सुबोध मराठीत प्रतिपादन केलेला आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' नामक त्यांचे पुस्तक हा एकेश्वरी धर्म प्रतिपादन करणारा मराठीतील छोटा ग्रंथ आहे. मूर्तिपूजा, ग्रंथप्रामाण्य, अवतारवाद, व्यक्तिप्रामाण्य, जातिभेद इ. सर्व अडथळे दूर करण्याचा प्रयत्न म. फुले यांनी केला आहे. बहुजनसमाजाने कानावर, त्यांचे निवडक एकेश्वरी अनेक विचार जातील तर ब्राम्हधर्मप्रसारात मोठे साहाय्य होणार आहे.

(सुबोधपत्रिका, ११/११/४५)

******

# २९ मी ब्राह्मधर्मीय कसा झालो व ब्राह्मधर्मीय का आहे?

'सुबोधपत्रिके' च्या संपादकांनी आत्मनिवेदनपर सुंदर लेखमाला पत्रिकेच्या वाचकांच्या पुढे मांडण्याचा जो स्त्युत्य उपक्रम सुरू केलेला आहे, तो खास कौतुकास्पद व वाचनीय वाटणारा आहे. आतापर्यंत निरनिराळ्या व्यक्तींनी आपापली निवेदने पत्रिकेतून मांडलीच आहेत. माझे निवेदन आता थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

लहानपणी मी मूर्तिपूजक होतो. सर्व हिंदू सगुण प्रकारे (व मूर्तीच्या द्वारे) बहुतेक ईश्वरोपासना व भक्ती करतात. मूर्तिपूजा हा प्रत्यक्ष हिंदुधर्माचा प्राण आहे. साधुसंतांनी मूर्तिपूजेचा निषेध केल्याचे आढळते. पण त्यांनी प्रत्यक्ष मूर्तिपूजेचे उच्चाटन करण्याचा उपक्रम केलेला नाही. फक्त ब्राह्मधर्मच असा उपक्रम करण्याचा प्रयत्न करत असतो. ख्रिस्ती व मुसलमान धर्म मूर्तिपूजा मानीत नाहीत, तरी अन्य रूपाने त्यांच्यातही पूजाप्रकार आढळतात. बुद्धधर्मातही हाच प्रकार आहे. एकूण जगाचे आध्यात्मिक पूजेकडे प्रत्यक्ष लक्ष कमी वेधलेले आढळते. आध्यात्मिक पूजा हा ईश्वरोपासनेचा मार्ग अवघड वाटला, तरी फारच सोपा व सुलभ आहे. प्रथम तुकारामांची गाथा वाचून माझ्या विचारांचा चक्षू जागा झाला. क्षुद्र देवता, वेताळे, फेताळे, नवस सायास, गुरुबाजी व धर्माचा आश्रय घेऊन होणारा काळा बाजार व चाललेली फसगत यावर तुकारामांनी कोरडे ओढले आहेत. वरपंग त्यांना नको, परब्रम्ह जे "विठ्ठल" त्यासच भजा, असा त्यांचा संदेश आहे. जारबाई, जोखाई, मरिआई, मरायाराणी, गधडे-शाक्तपूजेचे प्रकार यांवर तुकारामांनी चांगली चाल केल्याचे मला आढळले; व सुंदर सोपा भक्तिमार्ग मला तुकारामात आढळला. मी तुकोक्तीचे नित्य सेवन करू लागलो; नाना देवता, चांदीचे टांक, शाळीग्रामादी भिन्न देवता यांनी भरून गेलेला असा माझ्या आजोबा-पणजोबांचा देव्हारा असूनही त्याची मी पूजा सोडली. गाथेने माझ्यात एकोपासनेची आवड वाढवली. तुकारामाचा 'विठ्ठल' मला निराकार व सर्व विश्वामध्ये उभा असलेला कळू लागला. त्या अगोदर शालेय पुस्तकातील तुकारामाचे अभंग माझे चित्त लोहचुंबकाप्रमाणे ओढून घेत व तादात्म्य करत असत. सर्वच गाथेच्या दर्शनाने 'तुकाराम' कवी मला जिवंत व भक्तिमार्गाचे महान प्रचारक वाटले, व वाटतात. 'सेविता हा रस वाटितो आणीका।' असे सांगून प्रत्येक भक्ताला ते प्रचारक बनवतात व प्रत्येक जण धर्म प्रचारक या दृष्टीने असावयास पाहिजे. तुकाराम हा प्रार्थनासमाज मतांकडे नेणारा एक 'सेतू' आहे. या सेतूवरून मी प्रार्थना समाजाकडे आलो.

वाई येथे ब्राह्मसमाज १९३३ साली निघताच प्रथम पासूनच मी त्यात सामील झालो. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे अध्यक्षतेखाली वाई येथे एक अस्पृश्यता निवारक तालुका परिषद ता. १५-१-१९३३ साली भरली होती. तो काळ म. गांधी यांच्या स्वराज्य चळवळींचा व हरिजन सुधारणेचा होता. असे असूनही वाई येथे समाज सुधारणेला फार विरोध होता. वाई गाव म्हणजे जुना व देवाब्राह्मणांचा गाव! देवळांची संख्या विपुल, सोवळेओवळे योचे बंड मोठे! वरील अस्पृश्यतानिवारक परिषदेत म. जोतीबा फुले व त्यांचा सत्यशोधक समाज यांच्या नामाचा उच्चार होताच सनातन्यांनी गडबड आरंभली. सभा मोडणार, पण सभेचे अध्यक्षस्थान ब्राह्मधर्माचे खंदे प्रचारक शिंदे यांनी मंडित केले होते. त्यांचे व्यक्तित्व चोहोकडे तेज व प्रकाश पुरवत होते; तरी शिंदे विचारात पडले! त्यांनी सर्व सभा (तीन हजारांचा स्त्री-पुरुषांचा मेळावा होता) उभी केली! गायत्री मंत्र म्हटला व प्रार्थना केली. या गंभीर प्रकारामुळे व ब्रह्मोपासनेमुळे तप्त वातावरण शांत झाले. ठराव, चर्चा, भाषणे पार पाडली. नंतर सामुदायिक मंदिरप्रवेशही शांतपणे घडून आला. सभेबरोबर शिंदे महागणपतीच्या महामंदिरात गेले व तेथेही त्यांनी स्तब्धपणे "**ब्रह्मचिंतन**" केले. शिंदे यांच्या वरील बहादुरीमुळे व पराक्रमामुळे ब्रह्मोपासनेचे महत्त्व आम्हा तरुणांस समजले व १९३३ जुलै ४ तारखेस वाई येथे '**प्रार्थना समाज संघ**' या नावाच्या मंडळाने ईश्वरोपासनेची मुहूर्तमेढ रोवली. या सनातन्यांच्या वाई गावातील खुद्द **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** यांनी देवीदास गांधी यांचा विवाह लावला म्हणून त्यांचा फार छळ व निंदा झाली. पण त्यांनीही न जुमानता आमच्याबरोबर येऊन ब्राह्मसमाजाचे लहानपणी पालनपोषण केले. त्यावेळी सनातन्यांकडून व प्रतिगाम्यांकडून तर्कतीर्थ जोशी यांचे व्यासपीठ बंद होई, त्यावेळी ब्राह्मधर्मीय वाईकरांच्या व्यासपीठावरून मूलगामी मते त्यांना सांगता आली. तर्कतीर्थांच्या सान्निध्याने मी बुद्धिवादी बनलो. ते निरिश्वरवादी म्हणून प्रसिद्ध होते, तरी माझा ईश्वरवाद त्यांच्या सहवासाने डळमळला नाही. **तो डोळस झाला.** ब्राह्मधर्मावर त्यांची अनेक व्याख्याने मी घडवून आणली. मानवतावाद ब्राह्मधर्मात आहे व हा मानवतावाद बुद्धिवाद्यांचे व तर्कतीर्थांचे लक्ष वेधू शकतो. मोठमोठे ब्राह्य पुढारी व त्यांचे वाङ्मय सुशिक्षितांचा खुराकच आहे. नवभारताची सर्व प्रकारे घडण प्रथम ब्राह्यसमाजाने चालू केली. भारतीय संस्कृतीचा मुख्य भाग ब्राह्मधर्मातच प्रथम एकत्त्वाने केंद्रित झालेला आढळतो. धर्मसमन्वय, तौलनिक दृष्टी सर्व धर्म किंवा मताविषयी समभाव व सहिष्णुता आणि उदारता यामुळे मी व ब्राह्मधर्म एकरूप पावलो. मला शंका उरली नाही.

आणखी एका मतप्रवाहाचा परिणाम माझ्यावर झाला होता, तो असा. कलकत्त्याकडील उदारधर्म विषयक चळवळीचा परिणाम महाराष्ट्रावर झाला. प्रथम येथे '**परमहंस**' सभा निघाली. (१८४८ किंवा १८५२) चे सुमारास.

परमहंस सभेत नाना जातीचे लोक सामील झाले होते; पण सुधारणा प्रत्यक्ष अमलात आणण्याची कुवत लोकांमध्ये नव्हती. महाराष्ट्रावर उत्तर पेशवाईचे जातिभेदाचे व विषमतेचे परिणाम कायम होते. महाराष्ट्र एकजिनशी नव्हता. (व आताही नाही). सातार्‍याचे छत्रपती जंगली महाराज यांनीही याच सुमारास पुण्यास ब्राह्मोसमाज स्थापला होता. पण या चळवळीने मूळ धरले नाही. बंगाल्यात 'आदी ब्राह्मोसमाज' निघाल्यावर जहाल सुधारकांचा श्री ब्रह्मानंद केशवांच्या नेतृत्वाखाली भारतीय ब्राह्मसमाज निर्माण झाला. महाराष्ट्रातही हीच परिस्थिती तीव्रतेने होती. म. जोतीबा फुले यांनी 'मी कोणाचेही अन्न ग्रहण करीन' अशी घोषणा केली. त्यांनी स्त्रियांसाठी, शूद्रांसाठी, अतिशूद्रांसाठी पहिल्या शाळा उघडल्या (सन १८५२). अस्पृश्यांसाठी स्वतःचा हौद खुला केला. अनाथ बालिकाश्रम व विधवाश्रम उघडला. जोतीबांची सुधारणा प्रत्यक्ष अंमलात आणण्याची अपूर्व शक्ती पाहून प्रार्थनासमाजी व परमहंस सभेचे कित्येक सभासद फुल्यांचे मित्रच असल्याने त्यांच्या हरएक कार्यात मदतीसाठी पुढे असत. सदाशिवराव गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, यशवंत सखाराम परांजपे, पुणे प्रार्थना समाजाचे विनायकराव भांडारकर व गोखले; गणपत भास्करजी कोटकर, इत्यादी मंडळी फुल्यांनी १८७३ साली सत्यशोधक समाज स्थापला; तेव्हा साह्य करण्यास आनंदाने पुढे आली. हा सत्यशोधक समाज एकेश्वरी मतावर उभारला गेला होता. परमहंस सभेचे राम बाळकृष्ण, तुकाराम तात्या पडवळ, बाबा पद्मनजी (पुढे हे ख्रिस्ती झाले) इत्यादी अनेक एकेश्वरी सुधारकांचे जोतीबा फुल्यांना साह्य होते. पुढे यात रानडे व भांडारकरही समावेशित झाले. '**परमहंस**' या नावाला समानार्थक असलेले 'सत्यशोधक' हे नाव ह्या समाजाने घेतले. चिपळूणकर-टिळक व या परंपरेतील अनेक विद्वान आणि तज्ज्ञ यांनी रानडे-भांडारकर यांच्या संदेशाचे महत्त्व ओळखण्याची पात्रता असताना देखील, त्यांनी हा मतप्रवाह उपेक्षित ठेवला आहे. किंबहुना त्यास विरोध दर्शवला. याप्रकारे तौलनिकदृष्ट्या पाहता म. फुले व नंतरचा सत्यशोधक समाज यांच्यात पुष्कळ दोष असले तरी त्यांनी **प्रार्थना-समाज, परमहंस सभा** आणि **ब्राह्मोसमाज** यांनी पुरस्कारलेला **एकेश्वरी धर्म** पत्करलेला आढळतो; एकेश्वरी कार्याच्या दृष्टीने सत्यशोधक समाजाची वाढ झाली नसली तरी त्याची उभारणी '**एकेश्वर**' या तत्त्वावरच आहे. सांगण्याचा मुख्य इत्यर्थ हा की, महाराष्ट्रातही परमहंस सभेच्या दोन शाखा झाल्या, दोन प्रवाह झाले, यास कारण येथील सामाजिक धार्मिक व आर्थिक विषमता व भिन्न हितसंबंधीचे वर्ग हेच होय. रानडे व भांडारकर इत्यादींच्या व्याख्यानांचा परिणाम महाराष्ट्रावर झालेला आहे व पुढेही होईल. प्रार्थना समाजात रानडे व भांडारकर यांच्या व्याख्यानाने प्राण व चैतन्य निर्माण झाले. 'दीनबंधू'चे संपादक लोखंडे (गिरणी कामगारांचा पहिला संघ

काढणारे) यांनीही प्रार्थना समाजाचे सभासदत्व स्वीकारले होते. प्रार्थना समाजातील प्रवचने ऐकून माझ्या विचारांचा डोळा जागा झाला असे उद्‌गार भास्करराव जाधव यांनी सत्यशोधक समाजाचे इतिहासात लिहून ठेवले आहेत. **संतुजी रामजी लाड**, **जयराम नाना वैद्य**, **गणपतराव कदम** (कोल्हापूर) इत्यादी अनेक सत्यशोधक मंडळी प्रार्थनासमाजाचे सभासद होती. रानडे, भांडारकर, चंदावरकर, मोडक, शिंदे इत्यादींच्या व्याख्यानांचा परिणाम मराठी मनावर झालेला आहे.

वाईस वरील सत्यशोधक समाजाची शाखा १९२० साली निघाली. व नंतर शिक्षण जागृती इत्यादी कामे या समाजाने वाई प्रांतात केली. मूर्तिपूजा नष्ट झाल्याशिवाय पुरोहितशाहीचा बिमोड होणार नाही व केवळ विध्वंसक कार्याने प्रगती साधणार नाही. विधायक पायावर ही चळवळ मूलगामी स्वरुपात उभी असली पाहिजे असे कार्यकर्त्यांच्या ध्यानी आले. म्हणून वाई सत्यशोधक समाजाचे १९३३ साली ब्राह्मो समाजात रूपांतर करण्यात आले. ब्राह्मसमाजाचे प्रसारामुळे म. जोतीबा फुले व सत्यशोधक समाज यांचे ध्येय जास्त जवळ येऊ शकते, असा विधायक अनुभव वाईस आला. हे जे रूपांतर घडले, त्यामुळे मी सत्यशोधक असूनही ब्राह्मो होण्यास तयार झालो. कारण मूळ तत्त्वे सारखीच आहेत; ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची गरज राहिली नाही व पुढेही राहणार नाही. यासाठी 'ब्राह्मसमाज' हीच चळवळ जास्त उपयोगी होईल.

म. जोतीबा फुले यांचा मुख्य मुद्दा असा होता की परमेश्वर एक आहे व सर्वजण त्याची लेकरे आहेत, तर मग सर्वांना समान हक्क, सामाजिक दर्जा, मानवी अधिकार व समान संधी, समता, शिक्षण, आर्थिक साम्य इत्यादी बाबीवर सर्व मानवांचा सारखा हक्क आहे. परमेश्वराने सर्वांना बुद्धी दिली आहे व सारासार विचार शक्तीही दिलेली आहे. बुद्धी स्वातंत्र्य व विचार स्वातंत्र्य सर्वांना आहे. परमेश्वर जर पिता व सर्वसाक्षी आहे. तर मग कोणही मध्यस्थाखेरीज त्याच्याकडे जाण्यास सर्वांना समान हक्क आहे, मानवांना अन्न, वस्त्र व आच्छादन मिळावयास पाहिजे. थोडक्यात 'कम्युनिझम व धर्म' यांचा संदेश म. फुले यांच्या शिकवणुकीत एकवटला आहे. महात्मा फुल्यांचा वरील कम्युनिझम हा ईश्वरवादावर अधिष्ठान पावला आहे. विषमतेत धर्माचा बोज राहत नाही. विषमता म्हणजे बंधुभाव नव्हे. कोणत्याही प्रकाराची विषमता, पक्षपात व अहंकार या बाबी धर्माविरुद्ध आहेत. म. फुल्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ जाणल्यास त्यांनी ब्राह्मधर्माचे अधिक स्पष्टीकरण केल्याचे आढळून येते. **राममोहन, केशव** इत्यादी प्रमाणे म. फुले ब्राह्मधर्माचे एक प्रवक्ते व धाडसी आणि निर्भीड प्रचारक झाले.

महात्मा फुल्यांकडे एक ब्राह्मो त्यांनी ब्राह्मसमाजी व्हावे म्हणून गेला होता. या ब्राह्मोबरोबर म. फुल्यांचा संवाद झाला. हा संवाद '**सत्सार**' भागमध्ये उपलब्ध आहे.

ब्राह्मसमाजात एकेश्वरी असूनही समाविष्ट न होण्याची कारणे यात दिली आहेत. इतर एक दोन ठिकाणी त्यांनी प्रार्थनासमाजाचा उल्लेख केलेला आढळतो. पण पृथक राहून वेगळी चळवळ व विषमतेविरुद्ध झगडा देण्याचा काळ आता राहिला नाही, पुढेही राहणार नाही. म्हणून आता उदारधर्मात वेगवेगळे पंथ नकोत. वेगवेगळे प्रवाह नकोत. केशव आणि महर्षी दयानंद व केशव, इकडे फुले-रानडे काही एका परिस्थितीत व तपशिलामुळे विभक्त झाले म्हणून पुढील पिढीला विभक्त होण्याचे कारण नाही. सत्यशोधक समाजात प्रथम साप्ताहिक प्रार्थना चालत. पण ही संस्था या दृष्टीने मूळ धरू शकली नाही. तथापि फुल्यांचे अनुयायित्व पत्करणे म्हणजे **'एकेश्वरी धर्माचा पुरस्कार'** करणे होय ह्या सारासार विचाराने मी ब्राह्मसमाजी झालो. सुबोधपत्रिकेचे संपादक **भाऊसाहेब वैद्य** यांचे जोतीबा फुले यांचेवरील सुबोध लेख वरील कारणासाठी, मी पुन्हा छापून पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. महात्मा फुले यांच्या कम्युनिझमकडे त्यांच्या अनुयायांचे फार लक्ष असते. पण फुल्यांच्या विधायक एकेश्वरी-समाजवादाकडे त्यांच्या असंख्य अनुयायांचे लक्ष वेधणे जरूर आहे. असो.

ब्राह्मसमाजी झाल्यावर मला उत्तरोत्तर ब्राह्मधर्माचा अर्थ कळत गेला. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे निकट सान्निध्य व सहवास यांचा फार परिणाम झाला. मी एकदेशी राहिलो नाही. निःपक्षपात व संप्रदायातील दृष्टी ठेवण्याची इष्ट सवय झाली.

ब्रह्म म्हणजे जे विकास पावते ते. ब्रह्म शब्द परमेश्वरवाचक जसा आहे तसा तो प्रगती व विकास हा अर्थ दर्शवतो. ब्राह्मसमाजात व्यक्ती, ग्रंथ, व अवतार यांचे प्रामाण्य नसल्याने बुद्धिस्वातंत्र्याला पूर्ण वाव आहे. 'ब्राह्म' माणूस पक्षातीत असतो किंवा असला पाहिजे. ब्राह्मधर्म ही एक दृष्टी व विचारपद्धती आहे. एक प्रकारचा कस आहे. या कसावर कोणताही विचार अगर कोणतीही घटना परिक्षून घेता येते. हा संप्रदाय नाही. ब्राह्मधर्मात समन्वय, सहकार्य, सहिष्णुता, उदारता आहे. दुसऱ्यास नावे ठेवणे ब्राह्मधर्मास मान्य नाही. आत्मपरीक्षण व आत्मनिवेदन आणि आत्मोद्धार यांना स्थान आहे. यातील भक्ती निष्काम असून ती भोळी नाही. ज्ञानयुक्त आहे. ज्ञानविज्ञान, द्वैताद्वैत, प्रपंच परमार्थ, निवृत्ती व प्रवृत्ती, इत्यादी भिन्न वाटणाऱ्या बाबी येथे समन्वयित केल्या आहेत. निवृत्ती हा सामान्याचा मार्ग नाही. सर्वसाधारण जनता संसारी व प्रवृत्तिपार असते. या जनतेला प्रपंचात राहून परमार्थ व भक्ती साधता यावी, प्रपंच सुलभ व सुखी व्हावा, अशी ब्राह्मधर्माची ठेवण आहे. ब्राह्मधर्मात अतिरेकी मते (Extremes) नाहीत. निःपक्षपात व पूर्वग्रहदूषितपणा टाकून विचार केल्यास 'ब्राह्मधर्म' म्हणजे एक कल्पनावाद वाटणार नाही; तो वास्तववाद वाटेल. बुद्धी व श्रद्धा यांचा येथे मिलाफ आहे. विश्वधर्मात्मक असा मानवतावाद येथे आहे.

ब्राह्मधर्म म्हणजे फक्त भक्तिमार्गच नाही. सर्वक्षेत्रे व विचारांचे प्रांत आणि सुविचार ब्राह्मधर्मात समावेशित होऊ शकतात. प्रार्थनेप्रमाणे सदाचार व सत्कृती यांच्या योगेही परमेश्वर प्राप्त होतो. सर्वसमभाव, मानवतेवरील प्रेम व सेवा ब्राह्मधर्म शिकवतो. ब्राह्मधर्म माणसाचा इष्ट असा कायापालट करू शकतो. धर्मवेड, धर्मभ्रम, बुवाबाजी व पुरोहितशाही यांचे उच्चाटन ब्राह्मधर्मामुळे पूर्णपणे होऊ शकते. धर्मशुद्धी होते, धर्म हा धंदा होत नाही. कोणत्याही प्रकारची मूर्तिपूजा होऊ शकत नाही. धर्म-कर्म व व्यवहार यात माणूस नाडला जात नाही. कर्मठपणा, देवभोळेपणा, नशीबवाद, यापासून माणसाची सुटका होते. हिंदु-मुसलमानवाद, ब्राह्मण-अब्राह्मणवाद किंवा यासारखे उपलब्ध तंटे, ब्राह्मधर्माचे दृष्टिकोनानुसार मिटू शकतील. ते नाहीसे होतील. जगात एक धर्म व सर्व मानवाचे एक राष्ट्र व कुटुंब व्हावे हा ब्राह्मधर्माचा हेतू आहे. ब्राह्मधर्म सर्वांचे कल्याण चिंतितो. हे सर्व प्रकारे पाहता ब्राह्मधर्म ही उपयुक्त दृष्टी व बाब असल्याने मला ब्राह्मधर्मीय म्हणून जीवन जगण्यात हर्ष व प्रेम वाटते.

(सुबोधपत्रिका, ३०/१/५५, ६/२/५५, १३/२/५५)

******

# परिशिष्ट क्र. १

## दलितमित्र रा. ना. चव्हाण वाङ्मय

### रा. ना. चव्हाण हयात असेपर्यंत प्रकाशित झालेली पुस्तके

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | |
|---|---|---|
| १. | सुलभ लग्न संस्कारविधी, १९४६ | संपादक व प्रकाशक-रा. ना. चव्हाण |
| २. | सत्यशोधक जोतीराव फुले, १९५१ | लेखन व प्रकाशक-रा. ना. चव्हाण |
| ३. | गोष्टीरूप संत चरित्र माला | |
| | १) पं. विश्वनाथशास्त्री (पुष्प-१), १९५१ | संपादक व प्रकाशक-रा. ना. चव्हाण |
| | २) गौतम बुद्ध, १९५१ | संपादक, प्रकाशक व लेखक-रा. ना. चव्हाण |
| | ३) श्रीकृष्ण चरित्र, १९५१ | संपादक व प्रकाशक-रा. ना. चव्हाण |
| ४. | जोती-निबंध, १९४७ (ले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, १९४७) | प्रस्तावना व लेखन सहकार्य-रा. ना. चव्हाण |
| ५. | सार्वजनिक सत्यधर्मसार (पुस्तकसार), १९७३ | संपादक व प्रकाशक रा. ना. चव्हाण |
| ६. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, १९७४ (काही आठवणी) | संपादक-रा. ना. चव्हाण |
| ७. | रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय, १९८६ | संपादक - मो. नि. ठोके |
| ८. | रा. ना. चव्हाण विचारदर्शन, १९८७ | संपादक - शरद चव्हाण |
| ९. | नारायणराव चव्हाण स्मृतिग्रंथ, १९७१ | संपादक - रा. कृ. बाबर |
| १०. | जीजस वचनामृत (लक्ष्मण विनायक परळकर, १९७२) | प्रकाशक, संपादक-रा. ना. चव्हाण |
| ११. | कर्मवीर भाऊराव पाटील : शोध व बोध, १९८७ (रा. ना. चव्हाण लेखसंग्रह) | संपादक - मो. नि. ठोके |
| १२. | परिवर्तनाची क्षितिजे, १९९९ (रा. ना. चव्हाण लेखसंग्रह) | संपादक - डॉ. एस. एस. भोसले प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ |

### रा. ना. चव्हाण यांच्या लेखनसंग्रहाची १०-४-१९९३ नंतर प्रकाशित झालेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | ● अक्षर श्रद्धांजली (प्रथम पुण्यस्मरणानिमित्त विशेष प्रकाशन) | |
| २. | ● सेवितों हा रस। वाटितों आणिकां।। भाग-१ | प्रस्तावना - डॉ. अशोक कामत |
| ३. | ● सेवितों हा रस। वाटितों आणिकां।। भाग-२ | प्रस्तावना - डॉ. अशोक कामत |
| ४. | ● सेवितों हा रस। वाटितों आणिकां।। भाग-३ | प्रस्तावना - डॉ. अशोक कामत |
| ५. | ● जनजागरण | प्रस्तावना - डॉ. आ. ह. साळुंखे |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | ● | प्रबोधन | प्रस्तावना - सौ. वैशाली चव्हाण |
| ७. | ● | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : शोध व बोध | प्रस्तावना - डॉ. सदानंद मोरे |
| ८. | ●● | विचारधन | प्रस्तावना - डॉ. मा. प. मंगुडकर |
| ९. | ●● | महात्मा फुले यांचा शोध व बोध | प्रस्तावना - डॉ. राजेंद्र व्होरा |
| १०. | ●● | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शोध व बोध | प्रस्तावना - डॉ. रावसाहेब कसबे |
| ११. | ●● | लोकनेते राजर्षी शाहू महाराज : काळ आणि कार्य | प्रस्तावना - डॉ. शिवाजीराव चव्हाण |
| १२. | ●● | सत्यशोधकाची चिंतनिका | प्रस्तावना - डॉ. बा. ह. कल्याणकर |
| १३. | ●● | श्रीराजा शिवछत्रपती- एक प्रबोधक व परिवर्तनकार | प्रस्तावना - डॉ. जयसिंगराव पवार<br>अभिप्राय - कॉ. गोविंद पानसरे |
| १४. | ●● | म. फुले यांचे नवदर्शन - एक तौलनिक अभ्यास | प्रस्तावना - डॉ. मा. प. मंगुडकर |
| १५. | ●● | म. फुले, सत्यशोधक समाज | प्रस्तावना - डॉ. रमेश जाधव<br>अभिप्राय - डॉ. बाबा आढाव व प्रा. रमेश डुबल |
| १६. | ●● | महाराष्ट्र आणि मराठे | प्रस्तावना - डॉ. प्रकाश पवार<br>अभिप्राय - डॉ. सदानंद मोरे<br>डॉ. सुनीलकुमार कुरणे,<br>डॉ. अरुण शिंदे |
| १७. | ●● | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (परंपरा, प्रबोधन व परिवर्तन) | प्रस्तावना - डॉ. अशोक चौसाळकर<br>अभिप्राय - डॉ. अ. र. कुलकर्णी |
| १८. | ●● | यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण | प्रस्तावना - श्री. विश्वास नाईकनवरे<br>अभिप्राय - डॉ. प्रकाश पवार<br>डॉ. बाबा आढाव |
| १९. | ●● | भारतीय संस्कृती व तिची वाटचाल | प्रस्तावना - डॉ. अशोक चौसाळकर<br>अभिप्राय - डॉ. सदानंद मोरे,<br>डॉ. बाबा आढाव |
| २०. | ●● | गौतम बुद्ध व त्याचे बौद्धदर्शन | प्रस्तावना - डॉ. रावसाहेब कसबे |
| २१. | ●● | महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी राजारामशास्त्री भागवत | प्रस्तावना - डॉ. अशोक चौसाळकर<br>अभिप्राय - डॉ. सदानंद मोरे,<br>डॉ. श्रीराम गुंदेकर,<br>डॉ. बाबा आढाव |

| | | |
|---|---|---|
| २२. | ●● ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षण परंपरा - कर्मवीर भाऊराव पाटील आणि शिक्षणानंद डॉ. बापूजी साळुंखे | प्रस्तावना - डॉ. रा. कृ कणबरकर<br>अभिप्राय - भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव |
| २३. | ●● डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित चळवळ-एक मागोवा | प्रस्तावना - डॉ. सुरेंद्र जोंधळे<br>अभिप्राय - डॉ. बाबा आढाव |
| २४. | ●● राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य | प्रस्तावना - डॉ. प्रकाश पवार |
| २५. | ●● अक्षरवेध (पुस्तक परीक्षणे व परामर्ष) | प्रस्तावना - डॉ. प्रकाश पवार |
| २६. | ●● संत सुधारक व त्यांचे धर्मविचार : एक अभ्यास | प्रस्तावना - डॉ. सदानंद मोरे |
| २७. | ●● रा. ना. चव्हाण यांचे विचारविश्व | लेखक - डॉ. श्रीराम गुंदेकर<br>प्रस्तावना - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले |
| २८. | ●● महर्षी विठ्ठल रामजी शिंदे संस्थापित ब्राह्मसमाज, वाई-एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप | प्रस्तावना - डॉ. सदानंद मोरे |
| २९. | ●● प्रबोधनाची क्षितिजे | प्रस्तावना - डॉ. प्रकाश पवार |
| ३०. | ●● सकलजनसंवाद | प्रस्तावना - डॉ. प्रकाश पवार |

(टीप - ● संपादिका – सौ. वैशाली चव्हाण, ●● संपादक – श्री. रमेश चव्हाण)

******

## परिशिष्ट क्र. २

**रा. ना. चव्हाण व्यक्तिमत्त्वाविषयी, लिखाणाविषयी विविध मान्यवरांनी आजवर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांच्या प्रस्तावनेत/अभिप्रायात व्यक्त केलेले विचार खालीलप्रमाणे आहेत.**

१) रा. ना. चव्हाण यांचे 'समतोल लिखाण' महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने 'ठेवा' आहे.

- **मो. नि. ठोके (रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय, १९८६)**

२) व्यासंगाच्या दृष्टीने ते महर्षी शिंद्यांच्या परंपरेत मोडतात आणि दृष्टिकोनाच्या बाबतीत त्यांच्या लेखनात वस्तुनिष्ठ, शोधक प्रवृत्ती दिसून येते. आज- उद्याच्या सांस्कृतिक प्रश्नांत, काल-परवाच्या सांस्कृतिक परंपरेचे धागे कसे गुंतलेले आहेत, ते दाखवणे हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.

- **रा. ग. जाधव (रा. ना. चव्हाण विचारदर्शन, १९८७)**

३) समतेवर व न्यायावर आधारित असा नवा भारत निर्माण व्हावा म्हणून ज्या चळवळी झाल्या, विचार संग्राम घडले त्यांची त्यांनी मीमांसा केली. ते महाराष्ट्रातील एक आदर्श तत्त्वचिंतक समाज सुधारक होते.

- **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (अक्षर श्रद्धांजली १९९४, पुष्प एक)**

४) चिकित्सा, विवेक यांच्याबरोबरच समतोल विचार, हाही रा. ना. चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता.

- **डॉ. आ. ह. साळुंखे (जनजागरण, १९९५)**

५) महर्षी शिंदे यांच्या जनजागृती कार्याचा उदात्त वारसा कळकळीने पुढे चालवण्याचा वसा जसा रा. ना. चव्हाण यांनी उचलला तसा अन्य कोणी सामर्थ्याने उचलला असे दिसून येत नाही.

- **डॉ. अशोक कामत (सेवितो हा रस। वाटितों आणिकां, १९९६)**

६) 'रा. नां.' चे मुक्तचिंतन जसे सर्वस्पर्शी आहे तसेच ते व्यासंगयुक्त आहे आणि तरीही अनाग्रहसंपन्न, सुबोध आणि प्रासादिक आहे.

- **डॉ. अशोक कामत (सेविता हा रस। वाटितों आणिकां, १९९७)**

७) शंभर-दीडशे वर्षांचा महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचा शोध रानां. सातत्याने घेत राहिले. त्याचबरोबर पुढील समाज परिवर्तने कशी घडावीत त्याचा साक्षेपी बोध देत राहिले,

- **सौ. वैशाली चव्हाण (प्रबोधन, १९९९)**

८) त्यांच्या लेखनातील वृत्तीही समंजस, अनाग्रही सुधारकाची. लेखनात काटेकोर शब्दरचना आणि समतोल वृत्ती. कोठेही अभिनिवेश वा आक्रस्ताळेपणाचा मागमूस नाही. बहुजन समाजाने अज्ञानाची अंधारी वाट सोडून ज्ञानाचा प्रकाशमय मार्ग धरला पाहिजे, तीच खरी मुक्ती, हे त्यांच्या विचाराचे प्रमुख सूत्र.

**- द. मा. मिरासदार (परिवर्तनाची क्षितिजे, २०००)**

९) रा. ना. चव्हाण हे अज्ञात इतिहासावर प्रकाशझोत टाकणारे संशोधकही आहेत. ही त्यांच्या व्यासंगाची एक समृद्ध बाजू आहे. 'सत्संग आणि व्यासंग' या बलस्थानावर त्यांची अतूट श्रद्धा होती. 'बहुजन हिताय' ही त्यांच्या लेखनामागची एकमेव प्रेरणा होती.

**- डॉ. एस्. एस्. भोसले (परिवर्तनाची क्षितिजे, २०००)**

१०) म. शिंदे आणि चव्हाण या गुरूशिष्यांमध्ये असलेले साम्यही लक्षणीय आहे शिंद्यांच्या दूरदृष्टीमुळे सत्तेवर येऊन बसलेले बहुजन समाजाच्या काँग्रेसचे सरकार असतानाही रा. ना. चव्हाणांचे महत्त्व या समाजाने वा त्यांच्या सरकारने जाणले नाही.

**- डॉ. सदानंद मोरे (महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : शोध व बोध, २००१)**

११) 'रानां.' ची लेखनशैली स्वतंत्र असून तौलनिकता आणि समतोल, पण सखोल विषय विवेचन हे तिचे विशेष असून तर्कशुद्ध शोधक दृष्टिकोन ही या शैलीची खास वैशिष्ट्ये होत. चिंतनगर्भतेतून आलेले गेल्या काही शतकातील प्रबोधक व प्रबोधन चळवळी यांचे ज्ञानभांडार म्हणजे रा. ना. चव्हाण यांचे लेखन होय.

**- डॉ. शिवाजीराव चव्हाण (लोकनेते राजर्षी शाहू महाराज, २००२)**

१२) समाजातील दबल्या गेलेल्या माणसाबद्दल वाटणारी करुणा ही जीवनातील एक उदात्त प्रेरणा आहे. श्री. रा. ना. चव्हाण यांनी यथाशक्ती हीच प्रेरणा आपल्या जीवनात साकार करण्याचा प्रांजळ प्रयत्न केला.

**- डॉ. मा. प. मंगुडकर (रा. ना. चव्हाण यांचे विचारधन, २००३)**

१३) रानां. जो विचार मांडीत किंवा जो प्रसंग उभा करत त्याला संशोधनाची बैठक असे किंवा फुले-शिंदे यांच्या तत्त्वज्ञानाचा पाया असे. विठ्ठल रामजी व त्यांचे वडील यांच्याकडून त्यांनी विचारांचा समतोलपणा घेतला होता. अहंकार त्यांना शिवला नाही याचेही कारण हाच वारसा असावा.

**- डॉ. राजेन्द्र व्होरा (महात्मा फुले यांचा शोध व बोध, २००४)**

१४) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यापासून प्रेरणा घेऊन रा. ना. चव्हाण यांनी आयुष्यभर महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या सर्व परिवर्तनवादी चळवळींना एकत्र ठेवण्यासाठी, त्यांना क्रियाशील बनवण्यासाठी एक विचार-सूत्र दिले. त्यांच्या विचारांची आजही या सर्व चळवळीतील कार्यकर्त्यांना आवश्यकता आहे.

- **डॉ. रावसाहेब कसबे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शोध व बोध**, **२००५)**

१५) त्यांचे वैचारिक कार्य समाज प्रबोधन आणि समाज परिवर्तनाच्या चळवळीला सामर्थ्य देते आणि हेच रा. ना. चव्हाण यांच्या विचारांचं सामर्थ्य होतं. त्यांची वैचारिक बैठक नैतिकदृष्ट्या अतिशय निर्मळ होती. त्यांची लेखनशैली संयत, संयमी आणि निकोप होती. भारताच्या सामाजिक प्रबोधनाचा शास्त्रीय पाया त्यांच्या विचाराचा गाभा होता. समाज जीवनाची नितळ चिकित्सा आणि मानवता सुंदर करण्याचा विवेक यांचा सुवर्णसंगम त्यांच्या विचार आणि कार्यातून जागोजागी प्रत्ययाला येतो. त्याचे लेखन, सामाजिक चळवळीच्या अभ्यासकासाठी एक फार महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते.

- **प्रा. बा. ह. कल्याणकर (सत्यशोधकाची चिंतनिका**, **२००६)**

१६) रानां. च्या संपूर्ण लिखाणात एक प्रकारचा समतोलपणा, समाजातील विधायक वृत्ती वाढवण्याचा विचार, जातीजातींत, संघटना संघटनांत सौहार्द कसे वाढेल हे पाहण्याची दृष्टी आपणास अनेक ठिकाणी जाणवते.

- **डॉ. जयसिंगराव पवार (शककर्ते श्रीराजा शिवछत्रपती**, **२००७)**

१७) रा. ना. चव्हाण हे एक आदरणीय व अनुकरणीय व्यक्तिमत्त्व होते. म. फुले, शाहू, आंबेडकर यांचा वारसा गर्जुन गर्जुन सांगणारे खूप आहेत. परंतु तो वारसा जतन करून पुढे नेणारे कमी आहेत आणि ते कमी कमीच होत आहेत. रा. ना. चव्हाण खरे सत्यशोधक होते.

- **श्री. गोविंद पानसरे (शककर्ते श्रीराजा शिवछत्रपती**, **२००७)**

१८) सामाजिक चळवळी व सुधारक यांच्या विचारांचा तौलनिक अभ्यास करून म. फुले यांच्या विचाराने वेगळेपण काय आहे हे सांगण्याचा प्रयत्न रा. ना. चव्हाण यांनी केला आहे. अशा तऱ्हेचा प्रयत्न महाराष्ट्रामध्ये बहुधा प्रथमच केला असावा, असे मला प्रांजळपणे वाटते. रा. ना. चव्हाण यांचा मूळ पिंड चिंतनशील, व्यासंगी अशा लेखकाचा आहे. हे पुस्तक एखाद्या संदर्भ ग्रंथासारखे उपयोगी पडावे इतके ते महत्त्वाचे आहे. या पुस्तकामुळे मराठी सारस्वत समृद्ध झाले आहे.

- **डॉ. मा. प. मंगुडकर (म. फुले यांचे नवदर्शन**, **२००८)**

१९) रा. ना. चव्हाण यांनी गेल्या १५० वर्षांतील वेगवेगळ्या घटनांचा घेतलेला परामर्श सामाजिकशास्त्रांच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरेल. तरुण संशोधकांना त्यांच्या लेखनात अनेक संशोधनाची क्षेत्रे सापडू शकतात.

**- प्रा. रमेश डुबल (म. फुले, सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, २००९)**

२०) रा. ना. चव्हाणांचे लिखाण म्हणजे सामाजिक चळवळीची बखरच मानावी लागेल. त्यांचे समग्र लेखन-सामाजिक चळवळीच्या इतिहासाचा दस्तऐवज आहे.

**- डॉ. बाबा आढाव (म. फुले, सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, २००९)**

२१) पाच तपाहून अधिक काल रानां ची लेखणी आणि वाणी अविरतपणे आणि अथकपणे जात, धर्म पंथ, वंशवाद, भाषा इत्यादी मानवनिर्मित सर्वांगीण विषमतेचे अडथळे पार करून अवघ्या मानवसमाजाचे कल्याण व्हावे, मंगल घडून यावे यासाठी कार्यरत होती. समतोल, संयम आणि समन्वय ही त्यांच्या लेखणीची अंगभूत अशी काही महत्त्वाची वैशिष्ट्ये होती.

**- डॉ. रमेश जाधव (म. फुले, सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, २००९)**

२२) विशेष म्हणजे महाराष्ट्रातील विविध समाज व मराठा समाज यांचे नाते एकमेकांत गुंतलेले आहे. त्यांचे संबंध एकजीव आहेत. हा मुद्दा या लेख संग्रहाचे सामाजिक-सांस्कृतिक व राजकीय महत्त्व वाढवणारा आहे. ही या लेखसंग्रहाची खास जमेची बाजू आहे.

**- डॉ. प्रकाश रा. पवार (महाराष्ट्र आणि मराठे, २०१०)**

२३) परंपरा, प्रबोधन व परिवर्तन यांच्यातील अंतःसंबंध अत्यंत सूत्ररूपाने मांडणाऱ्या रा. ना. चव्हाण यांच्या या लेखांच्या संग्रहाचे सर्वजण स्वागत करतील, कारण स्वामी केवलानंद व लक्ष्मणशास्त्री यांच्या कार्याचे सम्यक असे विवेचन त्यात करण्यात आले आहे.

**- डॉ. अशोक चौसाळकर,**

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - परंपरा, प्रबोधन व परिवर्तन, २०१०)**

२४) रानां च्या लेखनात प्रतिक्रिया नोंदताना कुठेही अभिनिवेश दिसत नाही व लेखनशैली विनम्र असल्याचा प्रत्यय येतो.

**- विश्वास नाईकनवरे (यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण, २०१०)**

२५) रा. ना. चव्हाणांच्या मते भारतीय प्रबोधन काळात विकसित झालेल्या विचारांचे प्रतिबिंब आपणास भारतीय राज्यघटनेत दिसते. भारतीय घटनेने ज्या धारणामूल्यांचा स्वीकार केला आहे ती पूर्णतः पचवण्यास भारतीय समाजास वेळ लागेल. पण ते केल्याशिवाय आपणास पुढे जाता येणार नाही. भारतीय संस्कृतीत मूलतः विज्ञानाची उपेक्षा नव्हती. पण

नंतर ती झाली. आधुनिक काळात विज्ञाननिष्ठा गरजेची आहे. त्याचबरोबर विवेकनिष्ठा गरजेची आहे. समन्वयकता, सर्वसंग्राहकता, व्यापकता व सहिष्णुता ही जी भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत ती आपण जोपासली पाहिजेत. त्याचबरोबर धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, लोकशाही व समाजवाद यांचा स्वीकार करून नवे समाजप्रबोधन आंदोलन सुरू केले पाहिजे. असा आपल्या प्रतिपादनाचा निष्कर्ष चव्हाण यांनी शेवटी काढला आहे.

**- डॉ. अशोक चौसाळकर (भारतीय संस्कृती व तिची वाटचाल, २०११)**

२६) त्यांची विस्तृत ज्ञानसंपदा, चौफेर दृष्टी, आधुनिक दृष्टिकोन व सम्यक चिंतन आणि समतोल विवेकबुद्धी यामुळे त्यांच्या लिखाणाकडे आणि त्यातील प्रतिपादनाकडे प्रत्येकजण औत्सुक्याने पाहत असतो. त्यांचे लिखाण वाचताना त्यांचा उदारमतवाद, सत्यशोधकी आग्रह आणि समतोल विश्लेषण याकडे वाचक आकर्षिला जातो.

**- श्री. भाई वैद्य (ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षण परंपरा - कर्मवीर भाऊराव पाटील व शिक्षणानंद बापूची साळुंखे, २०१२)**

२७) रा. ना. चव्हाण हे विसाव्या शतकातील महत्त्वाचे तत्त्वचिंतक होते. १८/१९ व्या शतकामध्ये झालेल्या समाजप्रबोधन चळवळीचा तत्त्वविचार सांगणारे ते मार्गदर्शक होते. ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज आणि सत्यशोधक समाजाच्या सामाजिक आणि धार्मिक विचारांचा त्यांचा सखोल अभ्यास होता.

**- डॉ. सुरेंद्र जोंधळे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ एक मागोवा, २०१२)**

२८) रा. ना. चव्हाण यांनी ‘प्रगत’ व ‘मागास’ (forward and backward) अशी भारतीय संदर्भात वर्गाची संकल्पना गृहित धरली आहे. रा. ना. चव्हाण यांनी प्रस्तुत पुस्तकात प्रगत वर्गाच्या सांस्कृतिक प्रभुत्वाची सविस्तर चर्चा केली आहे. प्रगत वर्गाचे सांस्कृतिक वर्चस्व कमी करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी प्रयत्न केल्याचा वैचारिक इतिहास रा. ना. चव्हाण स्पष्ट करतात.

**- प्रा. डॉ. प्रकाश रा. पवार (राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, २०१३)**

२९) आज राना आपल्यात नसले तरी लेखनाच्या रूपाने त्यांनी ठेवलेला प्रबोधनाचा वारसा आपल्याजवळ आहे. त्याचा योग्य उपयोग केला तर अनेक प्रश्न सुटायला मदत होईल आणि असा उपयोग आपण करू शकलो नाही तर आपल्यासारखे करंटे आपणच ठरू !

**- डॉ. सदानंद मोरे (संत-सुधारक व त्यांचे धर्मविचार : एक अभ्यास, २०१३)**

३०) रा. ना. चव्हाण हे राजकारण, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण, परिवर्तन, बदल, सांस्कृतिक क्रांती अशा विविध अंगाने महाराष्ट्राचा विचार करत होते. त्याबरोबर विविध क्षेत्रात कृतिशील नेत्यांचे, चळवळीचे मूल्यमापन करत होते. चळवळीची व नेत्यांची विचारदृष्टी स्पष्ट करत होते. चळवळीचा व नेत्यांच्या कृतीचा अर्थ लावत होते. एवढेत नव्हे तर चळवळीचा व नेत्यांचा ज्या संशोधकांनी आणि अभ्यासकांनी अर्थ लावला तो अर्थ नव्याने जनसमूहाला समजून सांगत होते. यासाठी त्यांनी पुस्तकांची परीक्षणे केली आहेत.

- **डॉ. प्रकाश पवार (अक्षरवेध पुस्तक परीक्षणे व परामर्ष**, २०१३)

---

"आपण आयुष्यभर हे समाजकार्य केले, पण त्याचा गवगवा कधी केला नाही. आपले व्यक्तिमत्त्व विनयशील आणि प्रसिद्धीपराङ्‌मुख आहे. सत्यशोधक चळवळीला सामर्थ्य देणाऱ्या प्रकाशयात्रिकांच्या मालिकेत आपल्याही संयमशील व्यक्तिमत्त्वाचा अंतर्भाव इतिहासकारांना करावा लागेल. आज-उद्याच्या परिवर्तनवादी चळवळींना आपले हे कार्य आणि पद्धती विशेष मार्गदर्शक ठरण्यासारखे आहे."

- **यशवंत मनोहर**, अध्यक्ष (**महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, यांनी १ सप्टेंबर १९८९ रोजी दिलेल्या मानपत्रातून उद्‌धृत)**

---

## परिशिष्ट क्र. ३

### पूर्वप्रसिध्दी

१. **छ. शिवाजी व महात्मा जोतीबा फुले**
('राष्ट्रवीर', शिवजयंती खास अंक, बेळगाव १९९०)
(जनजागरण, १९९५)

२. **महात्मा जोतीबा फुले यांचे सामाजिक-राजकीय विचार व कार्य**
('शोधनिबंध', शिवाजी विद्यापीठ, राज्यशास्त्र विभाग परिषद, १९८३-८४)
(महात्मा फुले यांचा शोध व बोध, २००४)

३. **म. फुले काळ, कार्य आणि विचार यांचे नवदर्शन**
('जीवन शिक्षण', म. फुले विशेषांक, १९९०)
(प्रबोधन, १९९९)

४. **म. फुले, न्या. रानडे आणि डॉ. आंबेडकर**
('अस्मितादर्श', दिवाळी अंक, औरंगाबाद १९९०)
(जनजागरण, १९९५)

५. **राजर्षी शाहूंची सामाजिक विचारसरणी**
(साप्ताहिक 'साधना', १५ ऑगस्ट, १९७४)
(लोकनेते शाहू महाराज : काळ व कार्य, २००२)

६. **धर्मसुधारक अस्पृश्योद्धारक रा. शाहू महाराज**
(दैनिक 'राष्ट्रवीर', १२-७-१९६७)
(लोकनेते शाहू महाराज : काळ व कार्य, २००२)

७. **कर्मवीर शिंदे यांच्या जीवनाचे मर्म व वर्म**
('लोकराज्य', जानेवारी १९७५ मुंबई)
(जनजागरण, १९९५)

८. **डॉ. आंबेडकर : प्रभाव व परिणाम**
('लोकराज्य', डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक, १९९१ मुंबई)
(प्रबोधन, १९९९)

९. **डॉ. आंबेडकरांचे अद्वितीयत्व**
('अस्मितादर्श' दिवाळी अंक, १९९२ औरंगाबाद)
(डॉ. बाबासाहेब आंबेडकर शोध व बोध, २००५)

**१०. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराची एक नम्र चिकित्सा**
(अप्रसिद्ध निबंध, १९९१)
(डॉ. बाबासाहेब आंबेडकर शोध व बोध, २००५)

**११. सत्यशोधक समाज**
(भारतीय समाजविज्ञान कोश, पुणे, खंड ४, पाने ४५०, ४५१, ४५२, ४५३)
(महात्मा फुले, सत्यशोधक समाज आणि सामाजिक प्रबोधन, २००९)

**१२. ब्राह्मणेतर चळवळ**
(भारतीय समाजविज्ञान कोश, पुणे, खंड ३, पाने ३६८, ३६९, ३७०, ३७१)
(महात्मा फुले, सत्यशोधक समाज आणि सामाजिक प्रबोधन, २००९)

**१३. भारतातील धर्म व राजकारण**
(शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ, राज्यशास्त्र विभाग, अधिवेशन ५ वे २९ व ३० मार्च, १९८६)
(सत्यशोधकाची चिंतनिका, २००६)

**१४. लोकशाही राजकारणात सामाजिक प्रबोधनाचा झालेला संकोच**
(समाजविज्ञान प्रबोधिनीचे ‘युगकर्ता’, नोव्हेंबर, १९८६)
(महात्मा फुले, सत्यशोधक समाज आणि सामाजिक प्रबोधन, २००९)

**१५. प्रख्यात चिकित्सक सुधारक-दिनबंधू राजारामशास्त्री भागवत**
(मासिक ‘नवभारत’, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, १९७८)
(महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी राजारामशास्त्री भागवत-एक दर्शन, २०११)

**१६. यशवंतरावांचे समाजकारण**
(‘सुशिपांज’ ऑक्टोबर - नोव्हेंबर, १९९१)
(यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण, २०१०)

**१७. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
(रयत शिक्षण संस्थेची ‘रयत शिक्षण पत्रिका’, फेब्रुवारी, १९७७)
(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी परंपरा, प्रबोधन व परिवर्तन, २०१०)

**१८. परमेश्वराचे स्वरूप**
(‘सुबोधपत्रिका’, १६-४-१९३९)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**१९. परमेश्वराचे स्वरूप व साक्षात्कार**
(‘सुबोधपत्रिका’, २०-७-१९४९, १७-७-१९४९, २४-७-१९४९)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२०. धर्मजागृतीचा मार्ग**
(‘सुबोधपत्रिका’, २०-११-१९४९)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२१. परमेश्वराची प्रचीती**
(‘सुबोधपत्रिका’, १६-६-१९४०)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२२. प्रार्थनेचे ध्येय**
(‘सुबोधपत्रिका’, २०-१-१९५०)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२३. ब्राह्मधर्म आणि बहुजन समाज**
(‘सुबोधपत्रिका’, २०-१२-१९३६)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२४. अवतारवाद व ब्राह्मधर्माची शिकवणूक**
(‘सुबोधपत्रिका’, ६-८-१९३९)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२५. म. फुले यांचे धर्मपर विचार**
(‘सुबोधपत्रिका’, २१-११-१९४८, २८-११-१९४८, ५-१२-१९४८)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२६. म. फुले व ब्राह्मधर्म**
(‘सुबोधपत्रिका’, २१-७-१९४०)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२७. तरुण व धर्म**
(‘सुबोधपत्रिका’, १६-१२-१९५१, २३-१२-१९५१, ३०-१२-१९५१)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-२, १९९७)

**२८. परमेश्वराची सार्वत्रिक कृपा व एकेश्वरी धर्माचा समतावादी संदेश**
(‘सुबोधपत्रिका’, ११-११-१९४५)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

**२९. मी ब्राह्मधर्मीय कसा झालो व ब्राह्मधर्मीय का आहे ?**
(‘सुबोधपत्रिका’, ३०-१-१९५५, ६-२-१९५५, १३-२-१९५५)
(सेवितों हा रस । वांटितों आणिकां भाग-१, १९९६)

वाय ३४९-११०५-२.२०१६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.



रा. ना. चव्हाण

"घर-संसाराकडे दुर्लक्ष करून आयुष्यभर उभा केलेला हा त्यांचा 'लेखन-संसार' कशासाठी होता? सत्ता-संपत्ती, मान-सन्मान या आमिषापोटी त्यांनी ही साधना केलेली नव्हती. पाणी नसलेला नारळ आणि गंध नसलेला फुलांचा हार गळ्यात पडावा आणि दुस-या दिवशी रद्दीत जाणा-या दैनिकामध्ये फोटोसह चमकावे या मोहापोटी त्यांनी हा ज्ञानयज्ञ पेटता ठेवलेला नव्हता. तर आपला अवघा समाज जाचक नि गतार्थ रूढी-परंपरेच्या आणि वर्णजातींच्या जोखडातून मुक्त व्हावा, समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठ भावना नष्ट व्हावी, वैर आणि द्वेष यांची बाधा माणसाला व जातीला होऊ नये, कर्मकांडप्रधान उपासनेला शुद्धत्व लाभावे, समाजामध्ये सनातन मूल्यांची प्रतिष्ठा व्हावी, अवघा समाज इहवादी आणि विज्ञाननिष्ठ व्हावा, सर्वांनी उदारधर्माचा स्वीकार करावा; शूद्रातिशूद्रांच्या गळ्यात अडकलेल्या वेदनेचा हुंदका कमी व्हावा, प्रत्येकाने स्वातंत्र्य, समता, बंधुभाव याचा अंगीकार करावा, माणसाने माणसाला 'माणूस' म्हणून प्रेमाने जवळ घ्यावे. समाजात नांदणारी विषमता दूर व्हावी व अवघ्या मानव समाजाचे कल्याण व्हावे, यासाठी लेखनी वापरणारा हा थोर विचारवंत होता. थोर भाष्यकार होता. विवेक, व्यासंग, न्यायबुद्धी, समतोल, तटस्थता, संशोधन आणि शिस्त यांचे व्रतासारखे पालन करून आपल्या चिंतनाचे शाश्वत सार समाजाच्या ओंजळीत टाकणारा हा व्रतस्थ प्रबोधनकार होता.

समारोप करताना मी असे म्हणेन की, विज्ञान आणि अध्यात्म यांच्या पायावर सामाजिक प्रश्नांचे प्रबोधन करणारे, ज्ञानयोग, कर्मयोग, आणि भक्तियोग यांचा एकात्म साक्षात्कार घडविणारे, पैसा, प्रतिष्ठा, पद, पुरस्कार आणि प्रसिद्धी यांची जराही अपेक्षा न बाळगणारे; प्रांजळ आणि सत्यसाधकाची भूमिका ढळू न देणारे आणि दारिद्र्य, दुःख, उपेक्षा लेखनाच्या आड येत नाही याचा आदर्श समोर ठेवणारे; शांत मितभाषी, नम्र, सौजन्यशील व निगर्वी रा. ना. चव्हाणांचे हे लेखन महाराष्ट्राचा आणि मराठी वैचारिक साहित्यातील अनमोल ठेवा आहे, यात शंका नाही."

**मा. डॉ. द. ता. भोसले (प्रस्तावनेतून)**